प्रथम वर्ष कला

समाजशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. १

समाजशास्त्राची ओळख व मूलभूत तत्त्वे

© UNIVERSITY OF MUMBAI

डॉ. सुहास पेडणेकर
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. कविता लघाटे
प्राध्यापक नि-संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. अनिल आर. बनकर,
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

अभ्यास समन्वयक : **प्रो. पंक्ती सुर्वे**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ
मुंबई

लेखक : **श्री. अशोक शेलके**
कल्याण (प)

: **श्री. सर्जेराव बोराडे**
मोहिते आर्टस आणि कॉमर्स महाविद्यालय
कसारा (खोडाला)

: **अविनाश दैठणकर**
घाटकोपर (पूर्व)

: **संजय कांबळे**
समाजशास्त्र विभाग, कलीना कॅम्पस
सांताक्रुझ, मुंबई

संपादक : **फाल्गुनी वहानवाला**
एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालय
जुहु रोड, सांताक्रुझ, मुंबई

ऑक्टोबर २०१९, प्रथम वर्ष कला, समाजशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. १,
समाजशास्त्राची ओळख व मूलभूत तत्त्वे

प्रकाशक : प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

अक्षर जुळणी : अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

मुद्रण :

अनुक्रमणिका

क्रमांक	अध्याय	पृष्ठ क्रमांक
१)	समाजशास्त्राचा परिचय	०१
२)	समाजशास्त्राची व्याप्ती, अभ्यास विषय विकास, महत्त्व आणि कल्पना शक्ती	११
३) अ)	सामाजिक संस्था	२३
३) ब)	शासन संस्था	४०
४) अ)	कुटुंब संस्था	४५
४) ब)	धर्मसंस्था	५६
५)	संस्कृती - अर्थ, वैशिष्ट्ये, प्रकार आणि कार्य	६४
६)	संस्कृती	७८
७)	मीडिया - नवीन सामाजिक माध्यमे	९०
८) अ)	समाज माध्यमाचे आर्थिक परिणाम	१०५
८) ब)	समाज माध्यमाचे राजकीय परिणाम	११४
९)	सामाजिकीकरण	१२८
१०)	राजकीय सामाजिकरण	१४८
११)	गुन्हेगारी सिद्धांत	१६३
१२)	सायबर गुन्हेगारी, तस्करी	१८०
१३)	आरामदायी पर्यटन - भाग -१	१९५
१४)	आरामदायी पर्यटन - भाग -२	२०४
१५)	पर्यावरणात्मक पर्यटन	२११
१६) अ)	पर्यावरणा जागृतीचे महत्त्व	२३५
१६) ब)	शहरी पर्यावरण आणि स्त्रीवादी पर्यावरण	२५३

❖❖❖❖

New Syllabus with effect from academic year 2019-20
FYBA SOCIOLOGY PAPER I
Foundation & Fundamentals of Sociology

Objectives :

- To introduce the students to the basic concepts in Sociology.
- To familiarize students with the theoretical aspect of different concepts.
- To introduce the students to the emerging issues in Sociology.
- To enthuse students and to introduce them to the relevance and varied possibilities for future studies in Sociology.

FOUNDATION & FUNDAMENTALS OF SOCIOLOGY

1) Introduction to Sociology

a) Developing Sociological Imagination
b) Theoretical Perspectives : Functionalist, Conflict, Interactionist and Critical
c) Careers in Sociology

2) Social Institutions

a) Politics and Government
b) Family : Changing Trends
c) Religion

3) Culture

a) Components of Culture
b) Cultural Universals and Cultural Differences Ethnocentrism and Cultural Relativity Sub culture and Counter culture
c) Religion

4) New Social Media

a) Social Dimension : Social Networking
b) Economic Dimension : Marketing and Advertising Network
c) Political Dimension : Social Networking and Elections

5) Socialization

a) Understanding Socialization
b) The Self and Socialization
c) AnticipatorySocialization,GenderSocialization Resocialization, Political Socialization

6) Crime

a) Perspectives on Crime : Strain Theory Robert Merton
Labelling Theory - Howard Becker
Conflict Theory (Marxist Criminology) William Chambliss

b) Cyber Crime : Types, Control, Regulation and Laws

c) Trafficking : Women and Children

7) Leisure Tourism

a) Adventure Tourism

b) Eco Tourism : Friend or Foe?

c) Rural Tourism and Urban Tourism

8) Environment

a) Importance of Ecological Consciousness

b) Urban Ecology

c) Eco-feminism

❖❖❖❖

१

समाजशास्त्राचा परिचय
(INTRODUCTION OF SOCIOLOGY)

घटक रचना :

१.० उद्दिष्टये
१.१ प्रस्तावना
१.२ समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी
१.३ समाजशास्त्राचा उदय
१.४ समाजशास्त्राचा अर्थ
१.५ समाजशास्त्राची व्याख्या
१.६ समाजशास्त्राची शास्त्रीय वैशिष्ट्ये
१.७ समाजशास्त्रीय दृष्टिकोन
१.७.१ प्रकार्यवादी दृष्टिकोन
१.७.२ संघर्षवादी दृष्टिकोन
१.७.३ आंतरक्रियात्मक दृष्टिकोन
१.७.४ टीकात्मक सिद्धांत / विवेचनात्मक सिद्धांत
१.७.५ इतर समाजशास्त्रीय दृष्टिकोन
१.८ सारांश
१.९ अभ्यासाचे प्रश्न

१.० उद्दिष्टये

१. समाजशास्त्राची ओळख करुन देणे.
२. समाजशास्त्राचा शास्त्रीय अभ्यास करणे.
३. समाजशास्त्राची माहिती मिळवून ज्ञानात भर करणे.
४. समाजशास्त्राचा विविध दृष्टिकोनात्मक अभ्यास करणे.
५. समाजशास्त्राचा मुलभूत घटकांचा सविस्तर अभ्यास करणे.

१.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

समाजशास्त्राविषयी आपण विविध विचार ऐकत असतो. अशा समाजशास्त्राचा नेमका अर्थ आपणास समजणे आवश्यक आहे.

सामाजिक संबंध हा समाजशास्त्राचा प्रमुख अभ्यास विषय आहे. सामाजिक संबंधाचे वेगळेपण, त्याची निर्मिती, त्याचे परिणाम, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या वगैरे अनेक बाबींचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. व्यक्तीशिवाय समाजाला व समाजाशिवाय व्यक्तीला अर्थ नाही. मानवी गरजेमधून समाजाची निर्मिती झालेली आहे. समाजात निर्माण होणारे मानवी परस्पर संबंध, क्रिया-आंतरक्रिया, सामाजिक संबंध, सामाजिक घटना, सामाजिक समस्या, व्यक्ती वर्तन, त्यावर परिणाम करणारे घटक यांची माहिती घेण्यासाठी समाजशास्त्राचा अभ्यास करतात.

समाजशास्त्र हे विविध सामाजिक शास्त्रांच्या यादीत महत्त्वाचे ठरले आहे. कारण इतर शास्त्रांच्या अभ्यासाकरिता मर्यादा आहे. उदा. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, मानसशास्त्र अशा विविध शास्त्रांना विशिष्ट घटकांचा अभ्यास करावा लागतो, पण समाजशास्त्रामध्ये समाजाचा सर्वांगाचा अभ्यास केला जातो.

समाजशास्त्राचे जनक म्हणून ऑगस्ट कॉम्ट यांची ओळख आहे व त्यांनी प्रथम समाजशास्त्राचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यासही केला आहे. अशा या महत्व पूर्ण समाजशास्त्राची माहिती पुढीलप्रमाणे पाहता येईल.

१.२ समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी

जगाच्या इतिहासात प्राचीन व मध्ययुगीन काळातील विविध संस्कृती विविध विचारवंत धर्म-संस्थापक तत्ववेत्ते महाकवी अशा विद्वानांनी मानवी समाजाबद्दल विचार मांडले बॅबीलियन संस्कृतीमधील हम्मूराबी यांची कायदासंहित प्लेटो या ग्रीक विचारवंताने "रिपब्लिक" या ग्रंथामध्ये नागरी समाजाबद्दल माहिती दिली आहे. नीतीशास्त्र व राज्यशास्त्र या ग्रंथात ॲरिस्टॉटल ऑन जस्टिस या ग्रंथात रोमन विचारवंत सिसेरो यांनी तत्वज्ञान राज्यशास्त्र कायदा हे मूलभूत विचार मांडले आहे.

चीनमधील कन्फ्यूशिअस विचार भारतातील साहित्यामध्ये वेद, उपनिषद, सूत्रे, पुराणे, स्मृती, वाङ्मय, रामायण, महाभारत, बौद्ध वाङ्मय, जैन वाङ्मय, कौटिल्याचे अर्थशास्त्र, शुक्राचार्याचे नीतिसार, अबूल-पूजल यांचा ऐन-ए-अकबरी ग्रंथाचा विचार करावा लागतो. यामध्ये सामाजिक विचार होते.

युरोपमध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात मोठे बदल घडून आले. फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती, शहरीकरणातील वाढ, भांडवलशाहीचा उदय, आध्यात्मिकतेपेक्षा वास्तवता त्यातून धर्माचे वर्चस्व कमी होणे यामुळे सामाजिक जीवन ढवळून निघाले. यामुळे वर्चस्व कमी होणे यामुळे सामाजिक जीवन ढवळून निघाले. यामुळे ऑगस्ट कॉम्टचे गुरु सेंट सिमॅन यांनी सामाजिक जीवनातील समस्या आणि घटनांचा अभ्यास करणारा एखादा ग्रंथ असावा असे विचार मांडले.

या सर्व पार्श्वभूमीवर ऑगस्ट कॉम्टने आध्यात्मिक दृष्टिकोनापासून समाजशास्त्राला वेगळे केले.

१.३ समाजशास्त्राचा उदय (ORIGIN TO SOCIOLOGY)

ऑगस्ट कॉम्टने आपल्या पॉझिटिव्ह फिलॉसॉफी या ग्रंथाच्या पहिल्या तीन भागात समाजशास्त्राकरीता सामाजिक भौतिकशास्त्र (Social Physics) ही संज्ञा उपयोगात आणली परंतु ॲडॉल्फ फिवटलेट या बेल्जियम विद्वानाने आपला एका निबंधात (Essay on Social Physics) लिहिला होता म्हणून कॉम्टला सामाजिक भौतिक शास्त्राच्या नावात बदल करावा लागला. इ.स. १८३९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पॉझिटिव्ह फिलॉसॉफी या ग्रंथांच्या चौथ्या भागात ऑगस्ट कॉम्टने सर्वप्रथम समाजशास्त्र या शब्दाचा वापर केला म्हणून याच वेळेला समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला. म्हणून ऑगस्ट कॉम्ट यांना समाजशास्त्राचे जनक म्हणतात. यानंतर समाजशास्त्र हा स्वतंत्र अभ्यास विषय झाला.

१.४ समाजशास्त्राचा अर्थ (MEANING OF SOCIOLOGY)

समाजशास्त्र हे एक आधुनिक विज्ञान आहे. समाजशास्त्र हे इंग्रजीतील Sociology या शब्दाचा मराठी अनुवाद आहे. Sociology हा शब्द लॅटिन भाषेतील Socious आणि ग्रीक भाषेतील Logos हे दोन शब्द मिळून बनला आहे. सोशियस (Socious) म्हणजे सहचर किंवा Associate or Companion or Socicatas Society आणि (Logos) म्हणजे शास्त्र किंवा सिद्धांत Science or Theory or Study म्हणजे सोशियोलॉजी (Sociology) या शब्दार्थाचा अर्थ समाज विज्ञान किंवा शास्त्र असा आहे.

सोसायटस म्हणजे ज्यांच्या सहवासात राहतो तो समाज होय. 'लोगस' (Logos) याचा अर्थ विचार शब्द संवाद असा असला तरी कोणत्याही शास्त्राच्या नावाच्या शेवटच्या भागात प्रत्यक्ष म्हणून वापरण्यात आला. याचा अर्थ लोगस म्हणजे शास्त्र किंवा विज्ञान होय. या दोन शब्दांच्या एकत्रित संधीचा अर्थ म्हणजे समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.

मानवी समाज हा शब्द मानवी समूहाकरीता वापरला आहे. हे स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे. संपूर्ण विकास अवस्था केवळ मानवी समाजातच असते, इतर पशुपक्षांच्या समूहात विकास आणि संघटन दिसून येत नाही. मानवाने आपल्या सृजनशील बुद्धीमत्तेचा सामाजिक विकास केला आहे. प्रत्येक मनावी समूहांनी स्वतःची स्वतंत्र वैविध्यपूर्ण संस्कृती निर्माण केली आहे. यामुळे समाजशास्त्राचे अध्ययन करणे महत्त्वाचे आहे. त्याकरीता समाजशास्त्रात विविध समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

१.५ समाजशास्त्राची व्याख्या

समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्रीय अध्ययन करणारे शास्त्र आहे. तरी विविध समाजशास्त्रीय विचारवंतांनी विविध दृष्टिकोनातून संज्ञा मांडल्या आहेत.

१) ऑगस्ट कॉम्ट "समाजशास्त्राचा अभ्यास हा सामाजिक रचना व त्यामध्ये वेळोवेळी होणारे परिवर्तन व त्याचे होणारे दूरगामी परिणाम यांच्याशी निगडीत आहे."

२) हॅरी जॉन्सन (Harry Johnson) ''समाजशास्त्र हे सामाजिक समूहासंबंधीचे शास्त्र आहे.'' (Sociology is the Science that deals with social groups.)

३) मॅकआयव्हर आणि पेज (Maciver & Page) ''सामाजिक संबंध हाच समाजशास्त्राचा अभ्यासाचा विषय आहे.'' ("The Subject Matter of Sociology is social relation ship.")

४) हेन्री फेअरचाइल्ड (Henri Fairchild) ''समाजशास्त्र म्हणजे मानव व मानवी पर्यावरण यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास होय.'' "Sociology is the study of man and his human environment and their relations to each other."

५) मॉरीस गिन्सबर्ग (Morris Ginsberg) ''स्थूलमानाने मानवाच्या आंतरक्रिया व आंतरसंबंध आणि त्यांची कारणे व परिणाम यांचा अभ्यास करणे म्हणजे समाजशास्त्र'' ("In the broadest sense sociology is the study of human interactions and interrelations heir.")

६) गिडिग्ज (Giddihas) ''समाजशास्त्रात संपूर्ण समाजाचे व्यवस्थितीरीत्या वर्णन आणि स्पष्टीकरण करण्यात येते.'' ("Sociology is the systematic description and explanation of society as viewed is a whole.")

७) किंबाल यंग (Kimball Yang) ''समूहातील मानवांच्या वर्तणूकीचे अध्यय करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र आहे.'' ("Sociology deals with the bhaviour of human in Groups.")

वरील विविध समाजशास्त्रज्ञांच्या व्याख्या अभ्यासल्यास समाजशास्त्र हा अभ्यासविषय आणि त्याचे व्यापक स्वरुपाचे ज्ञान होण्यास मदत होते. यावरुन समाजशास्त्रीय अभ्यासात पुढील विविधता आढळून येते.

१) समाजशास्त्र समाजशास्त्राचे शास्त्र आहे.

२) समाजशास्त्रात सामाजिक संबंधाचा अभ्यास केला जातो.

३) समाजशास्त्र हे सामाजिक जीवन व घटनांचे अध्ययन आहे.

४) समाजशास्त्रात सामाजिक संबंधाच्या स्वरुपाचे अध्ययन केले जाते.

समाजशास्त्र हा विषय म्हणजे सामाजिक जीवनाचा सर्व क्षेत्रातून व्यापक अभ्यास करणे हे एक विज्ञान आहे. हा अभ्यास मानवी प्रगतीच्या दृष्टिकोनातून करणे महत्त्वाचे आहे.

१.६ समाजशास्त्राची शास्त्रीय वैशिष्ट्ये (SCIENTIFIC FEATURES OF SOCIOLOGY)

अ) हॅरी जॉन्सन यांनी समाजशास्त्राला शास्त्रीय स्वरुप प्रदान करणारी चार वैशिष्ट्ये प्रतिपादन केली आहेत.

१) समाजशास्त्र अनुभवनिष्ठ शास्त्र आहे -

समाजशास्त्राचा अभ्यास करताना, कोणत्याही प्रकारच्या श्रद्धा किंवा भाकीत कल्पनांना महत्त्व दिले जात नाही. तर प्रत्यक्ष मानवी प्रंचेद्रियांच्या मदतीने जे अनुभव येत असतात. त्यांना तर्कावर तपासून स्विकार केला जातो.

२) समाजशास्त्र सैद्धांतिक शास्त्र आहे -

अनुभवाच्या कसोटीवर आधारीत सत्य माहिती जमा करुन त्यांचे संकुलन केले जाते. त्याला सार स्वरुप दिले जाते. त्यानुसार सिद्धांत मांडला जातो. म्हणजेच समाजशास्त्रामध्ये अनुभवाद्वारे नवीन-नवीन सिद्धांत निर्माण केले जातात. म्हणून हे सैद्धांतिक शास्त्र मानले जाते.

३) समाजशास्त्र संचयी स्वरुपाचे शास्त्र आहे -

अनुभवधिष्ठीत ज्ञानावर आधारीत सिद्धांत मांडलेले अनुभव अंतिम नसतात. या ज्ञानामध्ये संशोधन केल्यामुळे सतत नवीन-नवीन ज्ञानाची भर पडत असते. ज्ञानाची पडताळणी आणि पुर्नमांडणी सतत केली जात असते. या प्रक्रियेमुळे समाजशास्त्रीय ज्ञानाचा संचय दिवसेंदिवस होत असतो.

४) समाजशास्त्र नैतिकदृष्ट्या तटस्थ शास्त्र आहे -

संशोधीत ज्ञानाचे आकलन करताना नैतिक तटस्थता राखली जात असते. तसेच या शास्त्रात बालमजूरी, बालगुन्हेगारी, आरोग्य, वेश्याव्यवसाय, बेकारी इत्यादी विषयांचे वस्तूनिष्ठ दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते. कोणताही पूर्वग्रह न ठेवता तटस्थ अध्ययन केले जाते. म्हणून समाजशास्त्र नैतिक तटस्थ असे मान्यता प्राप्त शास्त्र मानले जाते.

ब) रॉबर्ट बिरस्टीड यांनी The Social Order या ग्रंथात समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरुपाची पुढील काही वैशिष्ट्ये मांडली आहे.

१) समाजशास्त्र सामाजिक शास्त्र आहे (Sociology is a Social Science) -

समाजशास्त्र हे एक सामाजिक स्वरुपाचे शास्त्र आहे. यामध्ये सामाजिक जीवन, सामाजिक घटना, सामाजिक प्रक्रिया, सामाजिक आंतरक्रिया, सामाजिक संस्था, अशा सर्वच सामाजिक घटकांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो. कोणत्याही भौतिक घटनांचा सामाजिक-जीवनावर होणाऱ्या परिणामांचा मात्र समाजशास्त्रात जरुर अभ्यास केला जातो. म्हणून हे समाजशास्त्र केवळ सामाजिक घटनांचे अध्ययन करणारे सामाजिक शास्त्र आहे असे मानले जाते.

२) समाजशास्त्र हे सैद्धांतिक शास्त्र आहे (Sociology is Theoretical Science) -

उपयोगीतेनुसार शुद्ध आणि व्यवहारोपयोगी शास्त्र असे समाजशास्त्राचे प्रमुख दोन प्रकार आहेत. जे केवळ सत्य आणि वस्तुनिष्ठ ज्ञान मिळवतात ती शुद्ध शास्त्रे होय. उदा. पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास यांचा यांत समावेश होतो. तर व्यवहारोपयोगी शास्त्रामध्ये वैद्यकीयशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा, प्रशासन, समाजकार्य, अभियांत्रिकी इत्यादीचा समावेश होतो.

३) समाजशास्त्र अमूर्त शास्त्र आहे (Sociology is an abstract Science) -

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून समाज ही एक अमूर्त संकल्पना आहे. या अमूर्त घटकांचे म्हणजे समाजाचे अध्ययन समाजशास्त्रामध्ये केले जाते. सामाजिक संबंध, सामाजिक क्रिया, सामाजिक घटना इत्यादींचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. मानवी समाजाशी संबंधित सामाजिक जीवन अमूर्त असते. उदा. पती-पत्नी, आई-मुलगा, प्राध्यापक-विद्यार्थी धर्मगुरु-अनुयायी इत्यादी मधील सामाजिक संबंधाचे स्वरुप निरीक्षण किंवा कल्पनेच्या मदतीने समजून घ्यावे लागते. म्हणून समाजशास्त्राला अमूर्तशास्त्र मानले जाते.

४) समाजशास्त्र सामान्यीकरण शास्त्र आहे (Sociology is generalization of Science) -

समाजशास्त्राचा व्यक्तीगत घटना किंवा व्यक्तीगत कारणांशी संबंध नसतो. समाजशास्त्रामध्ये सामाजिक घटना, सामाजिक प्रक्रिया आणि कारणांचे अध्ययन सामान्य दृष्टिकोनामधून करण्यात येते. समाजशास्त्र हे कोणत्याही सामाजिक घटनांच्या कारणांचा शोध घेताना एका विशेष घटना, कारण किंवा प्रक्रियेचा एक पैलू विचार न करता त्याचा व्यापक आणि सामाजिक सामान्य दृष्टिकोनातून सकारणी विश्लेषण केले जाते. उदा. बालगुन्हेगारीचा अभ्यास करताना आर्थिक, सांस्कृतिक, मानसिक, सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक अशा विविध कारणांशी व्यापक शोध घेतला जात असतो.

५) समाजशास्त्र हे एक निरपेक्ष शास्त्र आहे (Sociology is categorical Science) -

समाजशास्त्रात सामाजिक घटनांचे वास्तविक दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते. सामाजिक घटनांना त्यांच्या वास्तविक स्वरुपात मांडत असताना समाजशास्त्रीय विचारवंत कोणत्याही प्रकारचा पक्षपात करीत नाही. एक विशिष्ट घटना व्यक्ती किंवा समूहाचे समर्थन करीत नाही. निरपेक्ष आणि वस्तुनिष्ठ शास्त्रांच्या रुपात समाजशास्त्र कार्य करते. समाजशास्त्र नैतिकदृष्ट्या तटस्थ असते. म्हणून समाजशास्त्र हे एक निरपेक्ष किंवा वास्तविक वस्तुनिष्ठ शास्त्र आहे.

६) समाजशास्त्र हे तार्किक आणि अनुभवजन्य शास्त्र (Sociology is a rational and an empirical Science) -

समाजशास्त्रात निरीक्षणाद्वारे तथ्यांचे संकलन करुन त्यांचे वर्गीकरण केले जाते आणि ती व्यक्ती संबंध स्पष्ट करुन तुलनात्मक अध्ययन केले जाते. तथ्यांच्या संबंधीत सिद्धांताचे वास्तविक स्वरुपात परीक्षण आणि पुर्नपरीक्षा केली जाते. त्यानंतर अनुभव व तर्काच्या आधारे समाजशास्त्रीय सिद्धांत प्रतिपादन केले जाते. समाज जीवनासंबंधीच्या अनुभव आणि तार्किक ज्ञानाच्या आधारे समाजशास्त्रीय सिद्धांत मांडले जातात.

वरील विविध मुद्द्यांचा अभ्यास केल्यास समाजशास्त्र हे शास्त्र किंवा विज्ञान आहे हे समजण्यास मदत होईल.

१.७ समाजशास्त्रीय दृष्टिकोन (SOCIOLOGICAL PERSPECTIVE)

समाजशास्त्राचा उदय, अर्थ व्याख्या यांची माहिती आपण पाहिली आहे. आता आपणास समाजशास्त्रीय सैद्धांतिक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. सामाजिक सत्य परिस्थिती माहीत करण्याकरिता विविध सैद्धांतिक दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न समाज-शास्त्रीय अभ्यासकांनी केलेला आहे. सामाजिक स्थितीशास्त्र, सामाजिक गतीशास्त्र या विचाराने सिद्धांत मांडल्याचे दिसतात. तसेच काही अभ्यासकांनी नवीन विचार मांडले आहेत. सामाजिक संरचनेची कार्य, रचना, समूह-स्पर्धा, संघर्ष देवाण-घेवाण, सामाजिक आंतरक्रिया, सामाजिक घटना, दैनंदिन सामाजिक जीवन प्रणाली, सामाजिक क्रिया, सामाजिक परिवर्तन इत्यादी विविध दृष्टिकोनातून समाजशास्त्रीय सिद्धांताची मांडणी समाजशास्त्रीय अभ्यासकांनी केलेली आहे.

समाजशास्त्राचे सिद्धांत महत्त्वाचे असतात. अशाच काही शास्त्राचा दर्जा मिळवण्याकरिता सिद्धांत महत्त्वाचे असतात अशाच काही सैद्धांतिक दृष्टिकोनाचा अभ्यास करता येईल.

१.७.१ प्रकार्यवादी दृष्टिकोन (Functional Perspective) :

सामाजिक संरचनेचा कार्यपद्धतीच्या संदर्भात ज्या समाजशास्त्रीय सिद्धांताची मांडणी केली जाते त्यास संरचनात्मक प्रकार्यवादी सिद्धांत म्हणतात. सजीव प्राण्यांचे अवयव त्यांना कार्य करण्यास मदत करतात. त्यातूनच जीवाचे स्वरुप व अस्तित्व टिकून राहते. कार्यात्मकतेतूनच प्रत्येक समाज विविध पद्धतीने बनलेला असतो. प्रकार्यात्मकतेमुळेच प्रत्येक समाजाचे सातत्य टिकून असते. मानवी समाजाचे अध्ययन करताना काही संरचनात्मक दृष्टिकोनांचा स्विकार केल्यामुळे प्रकार्यवादी विचार स्विकारणे आवश्यक होते. त्यामुळे समाजव्यवस्थेच्या अंतर भागाचा अभ्यास करणे शक्य झाले. हार्बर्ट स्पेन्सने १८२० ते १९०३ मध्ये या दृष्टिकोनातून प्रथम अभ्यास केला. एमिल डरखाईम यांनी कार्यात्मक स्पष्टीकरण व कारणात्मक यामध्ये फरक केला पाहिजे यावर भर दिला. आधुनिक कालखंडात राबर्ट मर्टन व टॉलकॉट पारसन्स यांनी अभ्यासाचा वापर केला आहे. सामाजिक मानवशास्त्रात रॅडक्लिफ ब्राऊन, मॅलिनोस्की यांनी कार्यवादी विचारसरणी मांडताना सामाजिक रचनेचे घटक परस्पर संबंधीत असतात यावर भर दिला. एस.एफ. नॅडेल, लेव्हिस्ट्रॉस, मायकेल फोकालटस, लेविस अल्युसा यांनी ही या विचाराला महत्व दिले आहे.

थोडक्यात प्रकार्यवद्यांच्या मते मानवी स्वभावाला समाजद्वारा अनुकूल बनवले जाते. सामाजिक स्वरुप हे क्रिया आणि आंतरक्रियाची व्यवस्था होय. सहकार्य आणि सनम्वयातून समाजाचे कार्य करतो ती प्रकार्य होय.

१.७.२ संघर्षवादी दृष्टिकोन (Conflict Perspective) :

संघर्षवादी समाजशास्त्राचे जनक म्हणून कार्ल मार्क्सचा (Karl-Marx) उल्लेख केला जातो. संघर्ष हा सामाजिक संबंधचा एक प्रभावी परिणाम घटक मानून समाजशास्त्रीय विचार संघर्षाचे विवेचन केले आहे. यामध्ये कार्ल मार्क्स, मॅक्सवेबर, जार्ज सिमेल, पॉलिवियस बॉटमोर, मर्टिन डेल, या परंपरावादी समाजशास्त्रज्ञांचा समावेश केला जातो. त्यानंतर राल्फ डाऱ्हेन

डार्फ, सी. वाईट मिल्स, आर. होरोबीटस, क्रोझर कॉलिन्स, ए.जी. फ्रँक या आधुनिक समाजशास्त्रीय अभ्यासकांचा नव संघर्षवादी म्हणून उल्लेख केला जातो.

समाज प्रगत असो किंवा अप्रगत असो प्रत्येक समाजामध्ये संघर्ष कायम असतो. संघर्षामुळे मित्र आणि शत्रू यांची जाणीव निर्माण होणे. वर्ग संघर्षामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते. समाजामधील सत्ता, उत्पन्न किंवा संपत्तीमुळेच संघर्ष घडत असतो. संघर्ष हा मानवाचा जन्मजात गुणधर्म आहे. असे ही अभ्यासकांचे मत आहे.

कार्ल मार्क्सच्या मते संघर्षाशिवाय विकास आणि परिवर्तन होत नाही. जार्ज सिमेलच्या मते विरोध करणे हा मानवी स्वभाव आहे.

साधारणतः संघर्ष किंवा विरोध करणाऱ्यांना समूहांना संमूलन करणारी काही शक्ती असते. समाजामध्ये दुर्मिळ घटकांना साध्य करण्याकरिता विविध स्वरुपात संघर्ष घडतो हे समाज मान्य आहे.

१.७.३ आंतरक्रियात्मक दृष्टिकोन (Interactionism Perspective) :

समाज व्यवस्थेचा मूलभूत घटक म्हणजे मूल्ये होय. मूल्ये अमूर्त स्वरुपात असतात. त्यांचा संबंध विचारांशी असतो. यामुळे मृत स्वरुप प्रकट होऊन प्रतिकांची निर्मिती करुन त्यांचा वापर केला जातो. त्यांना सामाजिक संस्कृतीचे प्रतिक मानले जाते.

"जेव्हा व्यक्ती-व्यक्तीत आंतरक्रिया या त्यांच्या समाजातील प्रतीकांवर आधारलेले असतात अशा आंतरक्रियेनाच प्रतिकात्मक आंतरक्रिया म्हणतात."

समाज व्यवस्थेमध्ये प्रतीकांद्वारे एकमेकांचे आचार-विचार, मूल्ये, भावना यांचे जेव्हा आदान-प्रदान होते तेव्हा त्यास प्रतीकात्मक आंतरक्रिया म्हणतात.

आंतरक्रियावादी विचाराचे विश्लेषण सर्वप्रथम जॉर्ज सिमेल यांनी केले. रॉबर्ट पार्क, बाल्डविन, सी.एच. कुले यांची 'स्व' संकल्पना, विल्यम थॉमस, जॉन डेव्हिड यांचे योगदान ही महत्त्वाचे आहे. जॉर्ज हार्बर्ट मीड, हार्बर्ट ब्लूमर यांची भूमिका, अभिनय, संकल्पना आंतरक्रियात्मक अभ्यासात भर घालताना दिसतात.

सामाजिक देवाण-घेवाण करण्यासाठी क्रिया आणि आंतरक्रिया महत्त्वाच्या असतात हा समाजशास्त्रीय विचार महत्त्वाचा आहे.

१.७.४ टीकात्मक सिद्धांत / विवेचनात्मक सिद्धांत (Critical Theory) :

कार्ल मार्क्स यांच्या साम्यवाद आणि आर्थिक भांडवलवाद विरोधी विचारामुळे सामाजिक विचारात क्रांतीकारी बदल घडून आले. कामगार आणि सामान्य समाजाचे शोषण थांबवणारे आंदोलन म्हणून या विचाराकडे पाहिले जात होते.

यांचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी फ्रेंकफ्रर्ट संप्रदाय जन्माला आला.

समाजातील सामाजिक संशोधनात्मक आणि दर्शन शास्त्रीय अभ्यास करणारा संघ फ्रँकफर्ट संप्रदाय (स्कूल) १९२३ मध्ये एकत्रित आला. यांचे प्रमुख मेकस हौरखेमर Horkheimer हे होते. प्रथम संघटन जर्मनीच्या फ्रँकफर्ट शहरात निर्माण झाले. औपचारिकता म्हणून "दि इन्स्टीट्यूट ऑफ सोशल रिसर्च" नाव दिले होते.

समाजशास्त्राच्या विचाराचा आधार मार्क्सवाद मनोविश्लेषण आहे जे विचारवंत या संप्रदायास जोडले होते ते दोन घटकांत जोडले होते. एक ते तत्कालीन समाजाचे टीकाकार (आलोचक) होते आणि दुसरे पारंपारिक सिद्धांताशी सहमत नव्हते. या सिद्धांताची आलोचना करत होते. हे लोक युरोपीयन जनतेच्या शोषण मुक्तीचे समर्थन करत होते.

प्रारंभी फँकफर्ट संप्रदायाचा उद्देश सामान्य होता. ते असा सिद्धांत मांडणी करु इच्छित होते की अर्थव्यवस्था, मानसिक विज्ञान संस्कृती आणि तत्कालीन भांडवलवादी समाज यांच्यातील सामाजिक संबंधाची तपासणी करणे. होरखेमने हे लक्ष प्राप्त करण्याकरिता समूह संशोधन किंवा सिद्धांत निर्माणाच्या रणनीतीला आपल्या प्रकल्पाप्रमाणे स्विकारले होते कारण हे समाज वैज्ञानिक भांडवलवादी समाज आणि प्रचिलीन सिद्धांताचे आलोचक होते म्हणून त्यांच्या सिद्धांतास टीकात्मक / विवेचनात्मक सिद्धांत (Critical Theory) किंवा समाजाचा विचलनात्मक असे म्हणत होते. अशा प्रकारे ऐतिहासिक अर्थाने फ्रँकफर्ट संप्रदायात विविध विषयांचा अभ्यास केलेला आहे आणि सत्ता सिद्धांताचा अभ्यास पहिल्या जागतिक महायुद्धांच्या नंतर फॉसिस्टवादी विचारांचा अभ्यास, स्टालियनवादी विचारांचा अभ्यास, प्रेक्सीसच्या अभ्यास अशा विविध समाज मुक्ती करीत विचारांचा अभ्यास मार्क्सवादी दृष्टिकोनातून हा टीकात्मक सिद्धांत करण्याचा प्रयत्न समाजशास्त्राच्या विकासात मोलाचे योगदान ठरले आहे.

१.७.५ इतर समाजशास्त्रीय दृष्टिकोन

समाजशास्त्रीय विचार विकास करण्यासाठी वरील दृष्टिकोनाशिवाय अनेक विचार किंवा दृष्टिकोन किंवा सिद्धांत आहेत ज्यामुळे समाजशास्त्राला परिपक्वता निर्माण झाली आहे.

उत्क्रांतीवादी सिद्धांत हा डार्विन यांच्या जैविक उत्क्रांतीवर आधारित आहे. यावर आधारित सामाजिक उत्क्रांती, क्रांती, प्रगती, परिवर्तन, वाढ, विकास याना विचार बळ येते. सामाजिक विनिमयवादी विचार या विचारामधून आर्थिक देवाण घेवाणीप्रमाणे आचार विचार देवाण-घेवाणाचे विकास मूल्य, सांस्कृतिक विकास घडत असतो. प्रघटनाशास्त्रीय दृष्टिकोन आधुनिक विकसित झालेला विचार आहे. यामध्ये सामाजिक घटनामधील वास्तविकता जाणून घेण्यावर भर देतात. एडमंड हसेल अलफ्रेड शुटझ यांचे योगदान महत्त्वाचे आहे. लोकजीवन पद्धतीशास्त्रीय दृष्टिकोन ही समाजशास्त्रीय सूक्ष्म अध्ययन पद्धती आहे. लोकजीवन पद्धतीच्या शास्त्रीय अभ्यासाला महत्त्व दिले जाते. हा ही विचार आधुनिक काळात प्रचलीत झाला आहे.

समाजशास्त्र ही एक मानवी जीवन पद्धतीचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा आहे. हे विविध समाजशास्त्रीय दृष्टिकोनाच्या अभ्यासामधून दिसून येते.

१.८ सारांश

आपण समाजशास्त्राचा उदय, पार्श्वभूमी, अर्थ, व्याख्या आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोन यांचा अभ्यास केला जेणे करुन समाजशास्त्राच्या स्वरुपाबरोबर त्याचा परिचयात्मक अभ्यास करता येईल. प्राचीन वाङ्मयातून सामाजिक विचार कसे आढळतात ? याचाही आढावा घेण्यात आलेला आहे. इतर नैसर्गिक शास्त्रांपेक्षा कमी अचूक असेल तरी समाजशास्त्र हे कसे सामाजिक शास्त्र आहे. याचा अभ्यास या ठिकाणी करण्यात आलेला आहे. समाजशास्त्राचे जनक फ्रेंच समाजशास्त्रज्ञ ऑगस्ट कॉम्ट यांचे याबाबतचे महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. समाजशास्त्र एक वास्तववादी शास्त्र, एका बाल्यवस्थाशास्त्रापासून शिखरशास्त्रापर्यंत बाबींचे स्पष्टीकरण या ठिकाणी देण्यात आलेले आहे.

विविध समाजशास्त्रज्ञांनी या शास्त्राच्या संकल्पना किंवा संज्ञा मांडलेल्या आहेत. या अभ्यासावरुन समाजशास्त्र विज्ञान आहे. समाजशास्त्र वास्तववादी शास्त्र आहे. समाजशास्त्रात व्यक्ती संबंधाचा अभ्यास केला जातो.

समाजशास्त्रामध्ये मानवी समाजाच्या वर्तनचा आणि क्रियांचा अभ्यास केला जातो. कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, डरखाईम, ऑगस्ट कॉम्ट, सी.एच. कुले अशा विविध विचारवंतांचे योगदान महत्त्वाचे आहे. समाजशास्त्राचा अभ्यास विविध दृष्टिकोनातून केला जातो. प्रकार्यवादी दृष्टिकोन, संघर्षवादी दृष्टिकोन, आंतरक्रियात्मकवादी दृष्टिकोन आणि टिकात्मक दृष्टिकोन हे मूलभूत सैद्धांतिक विचार समाजशास्त्राला विज्ञान संकल्पनेत मांडण्यासाठी उपयुक्त ठरतात. हे शास्त्र इतर सामाजिकशास्त्राप्रमाणे विज्ञान आहे हे सिद्ध करण्यास सैद्धांतिक विचार महत्त्वाची भूमिका पार पाडतात. अशा या सामाजिकशास्त्राचा अभ्यास सर्वाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे.

१.९ अभ्यासाचे प्रश्न

१) समाजशास्त्राचा उदय आणि अर्थ लिहा.
२) समाजशास्त्राची संकल्पना व व्याख्या लिहा.
३) समाजशास्त्रीय दृष्टिकोनावर माहिती सांगा.
४) समाजशास्त्राची व्याख्या सांगा. त्याचा विविध दृष्टिकोनात्मक आढावा घ्या.
५) संकल्पना लिहा.
   १) समाजशास्त्र
   २) कार्यवादी दृष्टिकोन
   ३) संघर्षवादी दृष्टिकोन
   ४) टीकात्मक दृष्टिकोन
   ५) आंतरक्रियात्मक दृष्टिकोन

❖❖❖❖

२

समाजशास्त्राची व्याप्ती, अभ्यास विषय विकास, महत्त्व आणि कल्पना शक्ती

घटक रचना :

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ समाजशास्त्राची व्याप्ती
२.३ समाजशास्त्राचा अभ्यास विषय
२.४ समाजशास्त्राचा विकास
२.५ समाजशास्त्रीय कल्पनाशक्ती आणि सामाजिक विकास
२.६ समाजशास्त्राचे महत्त्व / समाजशास्त्राच्या अभ्यासकर्त्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध
२.७ सारांश
२.८ अभ्यासाचे प्रश्न
२.९ संदर्भ सूची

२.० उद्दिष्ट्ये

१. समाजशास्त्राच्या व्याप्तीची ओळख होण्यास मदत होईल.
२. समाजशास्त्राच्या अभ्यास विषयांचे ज्ञान होईल.
३. समाजशास्त्राच्या विकासाची माहिती करुन घेता येईल.
४. समाजशास्त्रीय कल्पनाशक्ती आणि सामाजिक विकास यांचे सहसंबंधाचे आकलन होईल.
५. समाजसास्त्राचे महत्त्व जाणून घेता येईल.

२.१ प्रस्तावना

समाजशास्त्राची ओळख अर्थ वगैरे घटक पाहताना समाजशास्त्राचा अभ्यास अतिशय व्यापक आहे. समाजशास्त्राच्या अध्ययनाबाबत सामाजिक विचारवंतानी विविध मतमतांतरे मांडली आहेत. त्यामुळे समाजशास्त्राच्या अभ्यास विषयाच्या व्याप्तीबाबत देखील मतभेद आहेत. समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करणारे दोन विचार प्रवाह आहेत. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते समाजशास्त्र हे एक विशेष शास्त्र आहे. तर काही समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्र हे एक

सामान्यशास्त्र असल्याचे स्पष्ट केले आहे. या दोन विचारप्रवाहामुळे समाजशास्त्रात दोन प्रधान संप्रदाय निर्माण झाले. विशेषात्मक वा स्वरुप प्रधान संप्रदाय आणि समन्वयात्मक संप्रदाय विशेषात्मक संप्रदायानुसार समाजशास्त्र हे एक विशेष शास्त्र आहे.

समाजशास्त्राची निश्चित व्याप्ती याचे स्पष्टीकरण करतांना ऑगस्ट कॉम्टने केलेले स्पष्टीकरण लक्षात घेणे जास्त उपयुक्त व सोयीचे होईल. ऑगस्ट कॉम्ट हा समाजशास्त्राचा जनक, समाजशास्त्राचे स्थितीशास्त्र (Static) आणि गतीशास्त्र (Dynamic) असे दोन भाग पाडले आहेत. स्थित्यात्मक समाजशास्त्रात सामाजिक स्थितीचा अभ्यास केला जातो. यामध्ये व्यक्ती, कुटुंब, समाज, संघटना, सामाजिक संबंध हे स्थिर समाजशास्त्राचे विषयक व्यापक, दृष्टिकोनातून अभ्यास केले जातात तर सामाजिक परिवर्तन, सामाजिक परिवर्तनाची कारणे हे गतीशास्त्र समाजशास्त्राचे विषय आहेत.

२.२ समाजशास्त्राची व्याप्ती (SCOPE OF SOCIOLOGY)

समाजशास्त्रांच्या व्याप्तीचा अभ्यास करताना समाजशास्त्रज्ञांच्या मतभेदी विचारांचा अभ्यास ही करावा लागतो. हा विषय कोणत्या दृष्टिकोनातून अभ्यासला आहे त्यानुसार व्याप्तीचे स्वरुप अवलंबून आहे. याविषयी ऑगस्ट कॉम्ट, हर्बर्ट स्पेन्सर, एमिल डुरखाईम, मॅक्सवेबर, कार्ल मार्क्स, मॉरीन गिन्सबर्ग, किंग्जले डेव्हिस यांनी विचार मांडले आहेत तरी काही प्रमुख विचारवंताचा दृष्टिकोन पुढीलप्रमाणे अभ्यासता येईल.

अ) किंग्जले डेव्हिस - यांनी समाजशास्त्राचा अभ्यास पुढील पाच भागात मांडला आहे.

१) सामाजिक रचना (Social Structure) :

किंग्जले डेव्हिस यांच्या मते समाजरचनेची संज्ञा समाजरचनेतील आवश्यक घटना आहे म्हणजे विविध सामाजिक समूह, सामाजिक नीती नियम किंवा नियमने यांचे परस्परसंबंध यांचा अभ्यास केला जातो.

२) सामाजिक कार्य (Social Function) :

सामाजिक समूह व संस्था सामाजिक गरजा भागविण्याकरीता विविध कार्य करतात. विवाह, कुटुंब, धर्म, राज्यसंस्था वगैरे घटकांच्या कार्याचा व्यापक अभ्यास केला जातो.

३) व्यक्ती आणि समाज (Individual & Society) :

अनेक समूह एकत्र येऊन समाज बनतो तसेच अनेक व्यक्ती मिळून समाज बनतो. व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध कसे आहेत. व्यक्तीची जडणघडण सामाजिक संबंधामधून कशी होते अशा विविध घटकांचा अभ्यास केला जातो.

४) सामाजिक परिवर्तन (Social Change) :

समाज कायमस्वरुपी स्थिर नसतो त्यात सतत परिवर्तन घडून येत असते. सामाजिक परिवर्तन म्हणजे काय ? त्यांची कारणे कोणती ? परिवर्तनाची दिशा कोणती ? परिवर्तनाची गती म्हणजे काय ? ती कशी मोजली जाते ? सामाजिक परिवर्तनाचे परिणाम अडथळे कोणते ? अशा विविध प्रश्नांचे विश्लेषण केले जाते.

५) सामाजिक आंतरक्रिया (Social Interaction) :

मानव जेव्हा दुसऱ्या मानवाच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्कात येतो तेव्हा परस्परांवर परिणाम करणारी आंतरक्रिया घडून येते या आंतरक्रियेचे स्वरुप, स्पर्धा, सहकार्य, संघर्ष, प्रेम, राग या सारख्या आंतरक्रियेचे प्रकार त्याचे होणारे समाज जीवनावरील परिणाम इत्यादींचे अध्ययन यामध्ये केले जाते.

ब) ऑगस्ट कॉम्ट - यांनी समाजशास्त्राच्या व्याप्तीचे दोन घटकांत वर्गीकरण केले आहे.

१) स्थित्यात्मक समाजशास्त्र (Static Sociology) :

कॉम्ट यांच्या मते स्थित्यात्मक समाजशास्त्रात व्यक्ती, कुटुंब, सामाजिक संस्था, सामाजिक संबंध हे स्थिर घटक अभ्यास केले जाते.

२) गत्यात्मक समाजशास्त्र (Dynamic Sociology) :

सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक परिवर्तनास जबाबदार कारणे अशा बदलणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

क) मॉरिस गिन्सबर्ग - यांनी समाजशास्त्राच्या व्याप्तीचे चार भागात अध्ययन केले आहे.

१) सामाजिक स्वरुपशास्त्र (Social Morphology) :

यामध्ये समाजातील लोकसंख्या तिचे संख्यात्मक समूह, समूहांचे प्रकार, सामाजिक संख्या यांचा व्यापक अभ्यास केला आहे.

२) सामाजिक प्रक्रिया (Social Process) :

मानव-मानव, मानव-समूह, समूह-समूह यांच्यातील परस्परसंबंध आंतरक्रिया, त्यांची कार्यपद्धती परिणामाचे विश्लेषण केले जाते. विशेषतः स्पर्धा, संघर्ष, सहकार्य, विघटन, संघटना विकास, ऱ्हास यांचे विवेचन केले जाते.

३) सामाजिक विकृतीशास्त्र (Social Pathology) :

सामाजिक समस्यामुळे सामाजिक व्यवस्था अस्थिर आणि विस्कळीत निर्माण होते अशा समस्यांना सामाजिक विकृती मानले जाते. उदा. भष्ट्राचार, गुन्हेगारी, व्यभिचार, बलात्कार, बेकारी, जातीयवाद, मद्यपान वगैरे समस्यात्मक घटकांचे अध्ययन केले जाते.

४) सामाजिक नियंत्रण (Social Control) :

सामाजिक व व्यक्तीगत हिताकरिता समाजात एकता राखून त्यांचे सातत्य टिकवणे महत्त्वाचे असते. यासाठी समाजातील लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण करणाऱ्या नीती, लोकरुढी, लोकाचार, धर्म कायदा इत्यादीचा अभ्यास यामध्ये केला आहे.

ड) एमिल डरखाईम - यांनी समाजशास्त्राच्या व्याप्ती तीन भाग केले आहेत.

१) सामाजिक आकारशास्त्र (Social Morphology) :

डरखाईम यांच्या मते मानवी सामाजिक जीवनाचा अभ्यास भौगोलिक आधार, लोकसंख्यात्मक रचना, घनता आणि पर्यावरण या घटकाबद्दल समाजशास्त्रांच्या या भागात केला जातो.

२) सामाजिक शरीरशास्त्र (Social Physiology) :

धार्मिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व तत्सम घटकांचे अध्ययन करणारी स्वतंत्र शास्त्रे निर्माण झाली आहेत. उदा. धर्माचे समाजशास्त्र, राजकीय समाजशास्त्र, आर्थिक समाजशास्त्र वगैरे घटक अभ्यास केले जातात.

३) सामान्य समाजशास्त्र (General Sociology) :

समाज जीवनात घडणाऱ्या घटनांचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करुन त्याच्या आधारे सामान्य नियम व सिद्धांताची मांडणी केली जाते. हे समाजशास्त्रीय अभ्यास क्षेत्र सामान्य समाजशास्त्र म्हणून ओळखले जावे असे मत डरखाईम यांचे होते.

वरील विविध विचारवंतांनी मांडलेल्या व्याप्तीशिवाय समाजशास्त्राची व्याप्ती व्यापक आहे वैचारिक संप्रदायाप्रमाणे स्वरुप प्रधान संप्रदाय समन्वयात्म संप्रदाय तसेच समाजशास्त्राच्या विविध शाखा आहेत. मानववंशशास्त्र, आदिवासींचे समाजशास्त्र, ग्रामीण समाजशास्त्र, शहरी समाजशास्त्र, शैक्षणिक समाजशास्त्र, राजकीय समाजशास्त्र, श्रमाचे समाजशास्त्र, गुन्हेगारीचे समाजशास्त्र अशा अनेक शाखामध्ये व्यापक अभ्यास केला जातो.

२.३ समाजशास्त्राचा अभ्यास विषय (SUBJECT MATTER OF SOCIOLOGY)

समाजशास्त्राचा विविध दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. त्यांच्या समन्वयातून समाजशास्त्राचे काही प्रमुख अभ्यास विषय पुढीलप्रमाणे आहेत.

१) सामाजिक संबंध (Social Relationship) :

समाज हा मानवी संबंधाचे एक जाळे आहे. मानवी सामाजिक संबंध बदलत असतात. अशा सामाजिक संबंधाचा अभ्यास करुन खरी परिस्थिती लक्षात घेता येते. व्यक्तीची आपली गरज पूर्ण करण्यासाठी सामाजिक संबंध निर्माण होतो अशा सामाजिक संबंधाचा अभ्यास समाजशास्त्र घेतो.

२) सामाजिक समूह / गट (Social Groups) :

समाजातील विविध गरजा पूर्ण करण्याकरिता व्यक्ती सामाजिक संबंध निर्माण करते. या सामाजिक संबंधातून विविध गट निर्माण होतात. अशा प्रत्येक गटातील व्यक्तीचे स्थान आणि दर्जा ठरलेला असतो. त्यानुसार व्यक्ती आपली भूमिका पार पाडते. सामाजिक गटाची रचना बदलल्यास व्यक्तीची भूमिका बदलत जाते हा समाजशास्त्राच्या अभ्यासाचा विषय आहे.

३) सामाजिक संस्था (Social Institutions) :

समाजशास्त्रात विश्व-व्यापारी सामाजिक संस्था आहेत. मानवी गरजांची पूर्ती करण्यासाठी संस्था निर्माण झाल्या आहेत. कामवासना, अन्न, प्रजोत्पादन, अर्थविषयक शिक्षण वगैरे गरजा पूर्ण करण्यासाठी विवाह, कुटुंब, राज्य, धर्म, अर्थ वगैरे संस्थांची निर्मिती झाली. या सर्व सामाजिक संस्थांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

४) सामाजिक प्रक्रिया (Social Process) :

मानवी आंतरक्रियाचे शास्त्रीय अध्ययन म्हणजे समाजशास्त्र होय. ज्यावेळी दोन व्यक्ती एकमेकांच्या सहवासात येऊन एकमेकांवर परिणाम करतात, तेव्हा आंतरक्रिया निर्माण होते. व्यक्ती-व्यक्तीतील व गटागटातील सामाजिक संपर्कातून सामाजिक आंतरक्रियामुळेच व्यक्तीचे अस्तित्व शक्य आहे. यामुळे सहकार्य समावेशन, संम्मीलन वगैरे संघटनात्मक प्रक्रियांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. याशिवाय विघटनात्मक सामाजिक प्रक्रियाही आहेत. संघर्ष, स्तरीकरण वगैरे विघटनात्मक प्रक्रियांचाही अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

५) सामाजिक नियमने व नियंत्रण (Social Norms and Social Control) :

व्यक्ती स्वैराचारी बनली तर ती समाजविघातक वर्तन करते म्हणून व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. समाजाची व्यवस्था सुरळीत व्हावी म्हणून व्यक्तीच्या वर्तनावर निर्बंधनाद्वारे नियंत्रण निर्माण केले जाऊ शकते. सामाजिक नियमामुळे व्यक्ती योग्य वर्तन करते. विविध चालीरिती, प्रथा, परंपरा, कायदा, रुढी, नैतिक नियमने यामुळे समाजावर नियंत्रण प्रस्थापित होते. अशा सर्व घटकांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

६) सामाजिक समस्या (Social Problems) :

समाजात वैयक्तिगत आणि सामाजिक विघटनामधून विविध समस्या निर्माण होतात. या सर्व सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते. समाजात विघटन निर्माण करणाऱ्या विविध समस्या आहेत, गुन्हेगारी, चोरी, व्यसनाधीनता, वेश्याव्यवसाय, भिक्षावृत्ती, बालमजूरी, जातीभेद या घटकांचा समाजावर वाईट परिणाम करतात. या घटकांच्या कार्यकारण संबंधाचा शोध घेऊन त्यावर योग्य उपाययोजना सूचवण्याचे काम समाजशास्त्रामधून सुचवले जाते.

७) समाज व पर्यावरण (Society & Environment) :

व्यक्तीच्या वर्तनावर सामाजिक पर्यावरण परिणाम करते. सामाजिक पर्यावरणामध्ये सामाजिक मूल्ये, रुढी, चालीरिती, परंपरा, श्रद्धा, सामाजिक समस्या, उद्योग, शिक्षण, व्यवसाय, लोकसंख्या, शिक्षण, राज्य अशा विविध घटकांचा समावेश असतो. हे घटक सामाजिक पर्यावरण आणि सामाजिक संबंध परस्परांवर परिणाम करतात. म्हणून सामाजिक पर्यावरणाचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

८) सामाजिक नियोजन (Social Planning) :

आर्थिक नियोजनाप्रमाणेच सामाजिक नियोजनाची देखील आधुनिक समाजात गरज आहे. सामाजिक नियोजनाद्वारे सामाजिक हिताच्या दृष्टिने समाजाचा बदल घडवून आणला आहे.

९) सामाजिक परिवर्तन (Social Change) :

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. यामुळे समाज हा परिवर्तनशील आहे. अर्थात समाजाच्या परिवर्तनाची गती त्या मानाने मंद आहे. समाज बदलत्या काळानुसार बदलत असतो. समाजाच्या बदलाला जे घटक कारणीभूत ठरतात त्याचा अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जातो. विशेष म्हणजे काही घटक समाजाच्या बदलात अडथळा निर्माण करतात हे ही घटक समाजशास्त्राचे अभ्यास विषय आहेत.

१०) विविध संस्कृतिचा अभ्यास :

बदलत्या व्यवस्थेप्रमाणे मानवी जीवन बदलत जाते. मानवी विकास घडून येतो त्याप्रमाणे मानवांच्या संस्कृतीचा विकास होतो. संस्कृतीची निर्मिती मानवाने केलेली असून ती मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. ही मानवी संस्कृती विविध घटकांत विभागली जाते. त्या घटकांचा मानवी जीवनावर कोणता परिणाम होतो याचा सविस्तर अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जातो.

अशा पद्धतीने वरील विषय समाजशास्त्रात अभ्यास केले जातात. विवाह, धर्म, सामाजिक स्तरीकरण, दर्जा, भूमिका असे घटक अभ्यासले जातात. ग्रामीण मानसशास्त्र, श्रम, उद्योग, व्यवसाय, अर्थ इत्यादी विविध शाखामध्ये समाजशास्त्राचा अभ्यास केला जातो.

२.४ समाजशास्त्राचा विकास (DEVELOPMENT OF SOCIOLOGY)

१) फ्रान्समधील समाजशास्त्राचा विकास

अ) ऑगस्ट कॉम्ट (August Compte) :

समाजशास्त्राचे जनक ऑगस्ट कॉम्ट यांनी सर्व प्रथम समाजशास्त्र Sociology हा शब्दांचा प्रयोग केला आहे. १८३९ मध्ये पॉझिटिव्ह फिलॉसॉफी या ग्रंथाच्या चौथ्या खंडात लॅटीन भाषेतील Socious आणि ग्रीक भाषेतील Logos या दोन शब्दापासून Sociology म्हणजे समाजशास्त्र होय. त्यानंतर मानवी विचाराच्या तीन अवस्था आणि हे सिद्धांत प्रत्यक्ष मांडून शास्त्रीय अध्ययन करण्यास प्रारंभ झाला. स्थितीक आणि गतीक समाजशास्त्र वर्गीकरण करुन त्यांनी समाजशास्त्राचा पाया घातला आहे.

ब) इमील डरखाईम :

फ्रान्समधील दुसरे समाजशास्त्रीय विचारवंत म्हणजे एमिल डरखाईम यांनी समाजशास्त्र विकासाला योगदान केले आहे. त्याच्या मते समाजशास्त्र सामाजिक संख्यांचा (Social Facts) आणि सामाजिक दृष्टिकोनाचा अभ्यास आहे. त्यांनी श्रमविभाजनाचा सिद्धांत प्रतिपादन करुन समाजशास्त्राचा विकास केला आहे.

२) इंग्लंडमधील समाजशास्त्राचा विकास :

हर्बर्ट स्पेन्सर यांनी भावी योगदान समाजशास्त्रासाठी केलेले आहे. समाजशास्त्राचा अभ्यास आणि समाजशास्त्र तत्वे हे दोन प्रमुख ग्रंथ त्यांनी निर्माण केले आहेत. सामाजिक डार्विनवाद, सेंद्रिय सिद्धांत, उत्क्रांतीवादी सिद्धांत हे प्रमुख तीन विचार मांडले आहेत. याशिवाय इंग्लंडमध्ये गिन्सबर्ग आणि हॉब्जहाऊस व वेस्टर मार्क यांनी आदिवासी समाजाचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

३) जर्मनीमधील समाजशास्त्राचा विकास :

जर्मनीमध्ये अनेक समाजशास्त्रीय विचारवंत उदयास आले. कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, जॉर्ज सिमेल, वॉन विज इत्यादीचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो.

अ) कार्ल मार्क्स :

यांनी 'दास कॅपिटल' आणि कम्युनिष्ठ जाहिरनामा यामुळे संपूर्ण समाज व्यवस्थेत साम्यवादी विचार शोषणा विरुद्ध बंड, भांडवलशाहीस विरोध करणारे अनेक सिद्धांत मांडले ज्यामुळे सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय विचारात परिवर्तन घडून आले. यामुळे कार्ल मार्क्स यांच्या साम्यवादी विचारांचे योगदान मिळाले आहे.

ब) जॉर्ज सिमेल -

समाजशास्त्राच्या स्वरुप संप्रदायाचे (Formal School) चे जनक आहेत. यांनी सामाजिक आंतरक्रिया, भूमिका, सभासद, व्यवस्थेचे महत्त्व, संघर्ष या विषयांवर प्रमुख विचार प्रतिपादन केले.

क) मॅक्स वेबर :

समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांनी भांडवलशाही, नोकरशाही, धर्म, आदर्श स्वरुप, सत्ता, आणि अधिकार, सामाजिक क्रिया अशा समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण संकल्पनाचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे.

४) अमेरिकन समाजशास्त्राचा विकास :

अ) लेस्टर वार्ड -

यांना अमेरीकन समाजशास्त्राचे जनक म्हणून ओळखतात. मानव आणि पशू (प्राणी) यांच्यातील बुद्धीचा फरक हा निसर्गतः आहे. शुद्ध समाजशास्त्रज्ञ केवळ सामाजिक घटनांचा अभ्यास करते. व्यावहारिक समाजशास्त्रात असे अनेक विशेष संशोधनात्मक आहेत.

ब) टॉलकॉट पारसन्स :

यांनी सामाजिक क्रिया सिद्धांताचा कार्यात्मक दृष्टिकोनातून मूल्ये, नियमने, गट, उपगट, दर्जा, भूमिका, सत्ता व अधिकार अशा विविध संकल्पनांचा अभ्यास केला आहे.

क) रॉबर्ट मर्टन :

यांचे मध्यस्तरीय सिद्धांत, प्रमाणक शून्यतेचा सिद्धांत, समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरुपासाठी महत्त्वाचे आहेत.

या शिवाय मॅक आयव्हर, सारोकिन, समनेर, गिन्डींग्ज अशा अनेक विचारवंतानी समाजशास्त्राच्या विकासाला योगदान दिले आहे.

५) जपानमधील समाजशास्त्राचा विकास :

टोकियोमधील इंपिरियल विद्यापीठात अमेरिके बरोबर समाजशास्त्र हा विषय अध्ययनास प्रारंभ झाला. प्रथम येथे हर्बर्ट स्पेन्सरच्या विचाराचा प्रभाव होता. परंतु नंतर अमेरिकन विचारांचा प्रभाव जपानी समाजशास्त्रात अधिक जाणवू लागला. टोकियो व क्यूटो ही प्रमुख समाजशास्त्रीय अध्ययन केंद्रे आहेत.

६) भारतीय समाजशास्त्राचा विकास :

मुंबई विद्यापीठेने पेट्रीक गेडीस यांच्या नेतृत्वाखाली इ.स. १९१९ मध्ये पदव्यूत्तर अभ्यासक्रमात समाजशास्त्राचा स्वतंत्र विभाग निर्माण केला. पुढे १९२४ मध्ये डॉ. जी.एस. घुर्ये यांनी मृत स्वरुप देण्यास प्रारंभ केला. घुर्ये यांनी भारतीय संस्कृती, समाजव्यवस्था, कलाशास्त्र

वगैरे विषयावर लिखाण केले म्हणून डॉ. घुर्ये यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक मानतात पुढील संशोधन कार्य व्यापक स्वरुपात सुरु झाले. डॉ. डी.पी. मुखर्जी, आर.के. मुखर्जी, एस.पी. दुबे, ए.आर. देसाई, इरावर्ती कर्वे वगैरे सारखे अनेक विचारवंत भारतात उदयास आले. आज भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनास महत्त्व प्राप्त झाले आहे.

वरील विविध राष्ट्रातील समाजशास्त्र विकासातील योगदान लक्षात घेतल्यानंतर समाजशास्त्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासाची सीमा ही दिवसेंदिवस वाढत असताना दिसते.

२.५ समाजशास्त्रीय कल्पनाशक्ती आणि सामाजिक विकास (SOCIOLOGICAL IMAGINATION AND DEVELOPMENT)

समाजशास्त्र हे मानवी समाज जीवनाच्या प्रत्येक अंगाशी संबंधीत आहे. समाजाच्या विकासाकरीता समाजशास्त्राचे योगदान महत्त्वाचे आहे. समाजशास्त्र केवळ ज्ञानाचा विषय न राहता समाजाच्या प्रत्येक समस्येचा अभ्यास करुन उपाय सुचवण्याची जबाबदारी समाजशास्त्राची आहे.

सामाजिक संस्था, सामाजिकरण, सामाजिक नियंत्रण, सामाजिक परिवर्तन, सामाजिक सुधारणा, सामाजिक विकास, सामाजिक शिक्षण, सामाजिक व्यवसाय, रोजगार, आरोग्य अशा प्रत्येक क्षेत्राकरिता समाजशास्त्र आवश्यक आहे. समाजशास्त्र केवळ ज्ञानावदी न राहता ते उपयोगितावादी होणे आवश्यक आहे. अशा विचारातून काही महत्त्वाची कार्ये समाजशास्त्र करु शकते.

अ) समाजशास्त्र एक उपयोगित शास्त्र :

समाजशास्त्रात सामाजिक जीवनाचा अभ्यास केला जातो. यामुळे आदर्श नागरिक घडवण्याची जबाबदारी समाजशास्त्राची आहे. म्हणून जगा आणि जगू द्या ही शिकवण समाजशास्त्रामार्फत मानवाला मिळते. सामाजिक संस्कृतीच्या अभ्यासामुळे प्राप्त परिस्थितीशी समायोजन घेण्याची माहिती मिळते. कुटुंब, समूह, समाज हे मानवी जीवनाचे आधार आहेत याचे ज्ञान समाजशास्त्रामुळे होते.

समाजशास्त्राच्या उपयोगावरुन दोन दृष्टिकोन निर्माण झाले आहे.

१) शुद्ध संशोधनवादी दृष्टिकोन :

यामध्ये केवळ समाजशास्त्राच्या शास्त्रीय संशोधनावर भर दिला. यामध्ये वैज्ञानिक पद्धतीचा आणि नवीन तंत्रांचा उपयोग करुन समाजशास्त्राय ज्ञानात वाढ केली जाते.

२) उपयोगितावादी दृष्टिकोन :

यामध्ये समाजशास्त्राकडे उपयोगितावादी शास्त्र म्हणूनच बघावे. शास्त्रनिर्मितीबरोबर नवनवीन संशोधन महत्त्वाचे आहे. पण त्याचा उपयोग समाज विकासासाठी अपेक्षित आहे. समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग सामाजिक संघटन, सुव्यवस्था, मानवी विकासाकरीता होणे गरजेचे आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, व्यावसायिक,

प्रशासकीय, समाजसेवा, वगैरे क्षेत्रांच्या करिता समाजशास्त्राचे ज्ञान उपयुक्त ठरत आहे. यामुळे समाजशास्त्र हे उपयुक्त शास्त्र होऊ लागले आहे.

ब) समाजशास्त्र आणि सामाजिक समस्या :

मानवी समाजात सामाजिक समस्या निर्माण होत असतात. यामुळे सामाजिक अस्थिरता येते. अशा समस्या सोडवण्यासाठी शास्त्रीय वस्तूनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे. लोकसंख्या वाढ, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, पांढरपेशी गुन्हेगारी, बेकारी, भिक्षवृत्ती, दहशतवाद, आंतकवाद, स्त्री समस्या, व्यसनाधिनता, आरोग्य अशा अनेक समस्या आहेत. त्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करुन त्यांच्या कारणांचा शोध घेऊन ह्या समस्या समूळ नाहीशा करणे. तसेच पुन्हा ही समस्या निर्माण होऊ नये म्हणून काळजी घेणे, समस्याग्रस्त व्यक्तीचे पुर्नवसन करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी समाजशास्त्र योग्य कार्य करु शकते.

क) समाजशास्त्र व सामाजिक परिवर्तन :

समाजशास्त्र आणि सामाजिक परिवर्तनाचा जवळचा संबंध असतो. सामाजिक जीवनाचा अभ्यास करताना सामाजिक परिवर्तनाचा अर्थ, स्वरुप, कारणीभूत घटक, चालना देणारे घटक, अडथळा निर्माण करणारे घटक यांचा अभ्यास केला जातो.

सामाजिक संबंधातील परिवर्तन, दर्जा व भूमिका मधील परिवर्तन, संस्थात्मक परिवर्तन, शैक्षणिक परिवर्तन, मूल्यांमधील परिवर्तन अशा प्रत्येक परिवर्तन घटकांचा अभ्यास समाजशास्त्रांमध्ये केला जातो. ज्यामुळे सामाजिक सुधारणा घडून सामाजिक विकासाला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी सामाजिक परिवर्तनाचा सखोल अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

ड) समाजशास्त्र व विकास :

समाजशास्त्राचा सर्वांगिण विकास साध्य करण्यासाठी समाजशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक आहे. वैचारिक विकास, तांत्रिक विकास, व्यक्तीचा विकास, सामाजिक विकास, सांस्कृतिक विकास अशाप्रकारे समाजविकासात समाजशास्त्राच्या ज्ञानाचा मोठा वाटा असतो. समाजाचा सर्व समावेशक अभ्यास समाजशास्त्रात होत असतो. राज्यशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, समाजसुधारक या सर्वांनाच समाजाचे गुणात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी म्हणजेच समाजाचा विकास करण्यासाठी समाजशास्त्राचा उपयोग होऊ शकतो.

इ) समाजशास्त्र व सामाजिक धोरण :

समाजात सुधारणा घडवण्यासाठी काही नियोजनबद्ध कार्यक्रम आखले जातात ज्यांची अपेक्षा समाजाची प्रगती करण्याची असते. उद्‌भवणाऱ्या समस्य सोडवण्यासाठी असे कार्यक्रम शासन, जागतिक संस्था, समाजसुधारक वगैरे घटकांकडून राबवले जात असतात. आर्थिक धोरणे, सामाजिक धोरणे, समाजसुधारणात्मक धोरणे, समाजकल्याण योजना, सामाजिक नियंत्रण कार्यक्रम, ज्यामुळे सामाजिक समस्या सोडवण्यास मदत होत असते.

फ) समाजशास्त्र व व्यावसायिकता :

समाजशास्त्राचा अध्ययनामुळे समाजाचा सर्वांगिण विकास होईल परंतु अध्ययन करणाऱ्या व्यक्तीस भविष्यात अनेक रोजगार संधी उपलब्ध होतील. समाज कल्याण अधिकारी गुन्हे नियंत्रक अधिकारी, सामाजिक नियोजन अधिकारी, कौटुंबिक सल्लागार, आरोग्य सेवक वगैरे रोजगार संधी मिळतील.

२.६ समाजशास्त्राचे महत्त्व / समाजशास्त्राच्या अभ्यासकर्त्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध (SIGNIFICANCE OR IMPORTANCE OF SOCIOLOGY)

समाजशास्त्रीय अध्ययनाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी केला जातो. सामाजिक विकासात पुढीलप्रमाणे महत्त्व सांगता येईल.

१) मानवी समाजाचे वस्तुनिष्ठ आकलन :

समाजशास्त्रामध्ये केवळ मानवी संबंधाचा सामाजिक अभ्यास केला जातो. सामाजिक संरचना, संरचनेचे घटक, मानवी संबंध, प्रकार्य-अपकार्य, सामाजिक नियंत्रण, सामाजिक परिवर्तन, सामाजिक विचलन, अनुकूलन, सामाजिक समस्या यांचे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते. यामुळे यथार्थ आणि वस्तुनिष्ठ आकलन होणे शक्य झाले आहे. समाजाच्या वस्तुनिष्ठ अध्ययनाचा उपयोग सामाजिक प्रश्न सोडवणे आणि सामाजिक विकास करण्यासाठी केला जातो.

२) सामाजिक समस्यांचा अभ्यास :

नवयुगात नवनवीन समस्या निर्माण होताना दिसते. या समस्या सामाजिक जीवनावर वाईट परिणाम करतात. यामुळे सामाजिक विकासाला अडथळा निर्माण होतो. समाजशास्त्रांत सामाजिक समस्यांचे शास्त्रीय पद्धतीने संशोधनात्मक अभ्यास केला जातो. या समाजशास्त्रीय अभ्यासामुळे समस्यांचे सत्य स्वरुप माहित होऊन समस्यांचे निराकरण करण्यास मदत होते.

३) सामाजिक कल्याण :

समाज कल्याण करण्याकरिता समाजशास्त्राचे खूपच महत्त्व आहे. समाजातील सर्व घटकांचा समान विकास होत नाही. काही सामाजिक घटक मागासलेले आहेत. भारतीय जगातील आदिवासी अनुसूचित जाती जमातीचे घटक सामाजिक सांस्कृतिक दृष्ट्या मागे आहेत. कामगार, छोटे व्यावसायिक लोकांचे अनेक प्रश्न आहे. या सर्वांच्या हिता करिता समाजशास्त्राचे विशेष अध्ययन करुन वृद्ध महिला, बालक कामगार आणि मागास सामाजिक घटकांच्या कल्याणाकरिता योजना तयार करण्यात शासनास समाजशास्त्राची मदत घ्यावी लागते.

४) सामाजिक नियोजन :

समाजाच्या विशिष्ट दिशेने अपेक्षित विकास करण्यासाठी नियोजन आवश्यक आहे. आर्थिक नियोजनाप्रमाणेच सामाजिक नियोजन केले जात आहे. आधुनिक काळ नियोजनाचा काळ म्हणून ओळखला जातो. त्यामुळे सामाजिक नियोजनही होणे महत्त्वाचे आहे. या करिता सामाजिक घटकांची सत्य आणि वस्तुनिष्ठ माहिती मिळाल्याशिवाय समस्यांची जाणीव होऊ शकत नाही. याकरिता समाजशास्त्राचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा आहे.

५) मानवी समाजाचा विकास :

मानवी समाजाचा विकास करण्याच्या संदर्भात समाजशास्त्राचे योगदान महत्त्वाचे असते. समाजात विविध प्रकारच्या रुढी, परंपरा, चालीरिती, धार्मिक परंपरा, अंधश्रद्धा,

गैरसमज असतात. यामुळे समाजाचा विकास होऊ शकत नाही. म्हणून अशा सामाजिक घटकांचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केला जातो. यामुळे समाजातील अनिष्ट घटकांची जाणीव होते. यामुळे मानवी प्रगती करुन घेण्यास समाजशास्त्राची मदत होते.

६) व्यावसायिक महत्त्व :

आधुनिक काळात सामाजिक विकास करण्यासाठी समाजाच्या प्रत्येक क्षेत्राचा वेध घेतला जातो. त्यामुळे समाजशास्त्राच्या अभ्यासकर्त्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. औद्योगिक क्षेत्रात सामाजिक सुरक्षा, रोजगार, बेरोजगारी, विमा योजना, सामाजिक सुरक्षा योजना, गुन्हा सुधार क्षेत्र, बालसुधार केंद्र, समाज कल्याण, न्याय विभाग, आरोग्य सुधारणा, सामाजिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, महिला सुधार केंद्र, आश्रम कुटुंब नियोजन अशा विविध क्षेत्रात समाजशास्त्राचा उपयोग अशा विविध रोजगार संधीसाठी उपयुक्त आहे.

७) सामाजिक एकता निर्माण करणे :

सामाजिक जीवनात सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक भिन्नता दिसून येते. एकाच देशातील समाजातही विविधता दिसून येते. त्यामुळे सामाजिक, धार्मिक, भाषिक प्रश्नावरुन अनेक समस्या निर्माण होतात म्हणून सामाजिक, धार्मिक एकता निर्माण करणे आवश्यक आहे. समाजशास्त्रात विभिन्न जाती, धर्म आणि सामाजिक जीवन यांचे सत्य आणि वस्तुनिष्ठ अध्ययन केले जाते. तसेच सामाजिक जीवन आणि धर्माचा परस्परांमध्ये संबंध आणि महत्त्व समाजशास्त्रात स्पष्ट होते. थोडक्यात समाजशास्त्राचे व्यापक अध्ययन आणि संशोधनामुळे समस्या आणि प्रश्न सोडवले जावून सामाजिक एकता निर्माण करण्यास मदत होते.

वरील विविध मुद्यांविषयी समाजशास्त्राचे अध्ययन सामाजिक जीवनासाठी आवश्यक आहे.

२.७ सारांश

अशा पद्धतीने या प्रकरणात आपण समाजशास्त्राची व्याप्ती, विकास, कल्पना आणि महत्त्व अशा घटकांचा अभ्यास थोडक्यात करण्याचा प्रयत्न केला आहे. समाजशास्त्र तसे खूपच व्यापक आणि महत्त्वपूर्ण स्वरुपाचे आहे. कारण विश्वातील प्रत्येक ज्ञानशाखा मानवाकरिता आणि पर्यायाने समाजाकरिता निर्माण केली आहे. यामुळे समाजशास्त्राचा अभ्यास हा जागतिक स्वरुपाच्या सामाजिक घटना आणि घडामोडीशी संबंधीत आहे. सामाजिक समस्यांचा अभ्यास करताना जगातील समाज समूहांचा विचार करुन अध्ययन करावे लागते. जगात अनेक यंत्र तंत्राचे शोध लागत आहेत. यामुळे सामाजिक बदल घडून येत असताना विचार आणि अभ्यास करण्यासाठी आधुनिक काळात समाजशास्त्राला महत्त्व प्राप्त होत आहे.

राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, व्यावसायिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात समाजशास्त्रीय अभ्यासाची गरज भासू लागली आहे. आधुनिक नियोजनासाठी सामाजिक दृष्टिकोनातून संशोधन करुन विविध योजना राबवल्या जाऊ लागल्या आहेत. यामुळे समाजशास्त्र हे आधुनिक अभ्यासाचा केंद्र बिंदू होऊ लागले आहे. कारण जगामध्ये जे काही शोध लागले जातात, उत्पादन केले जाते ते केवळ सामाजिक सुखासाठी असते. अर्थात मानवी कल्याण हा उद्देश असतो. म्हणजेच समाजशास्त्र हा सामाजिक समस्यांचा अभ्यास सामाजिक

कल्याणासाठी करावयाचा असतो. म्हणून समाजशास्त्र हे महत्त्वाचे अभ्यासशास्त्र उदयास येत आहे.

२.८ अभ्यासाचे प्रश्न

१) समाजशास्त्राचा अभ्यास विषयाबद्दल सविस्तर लिहा.
२) समाजशास्त्राच्या विकासावर निबंध लिहा.
३) समाजशास्त्र हा आधुनिक काळात महत्त्वपूर्ण अभ्यास विषय आहे अशी कल्पना करा.
४) समाजशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.
५) टीपा लिहा.
   १) समाजशास्त्राची व्याप्ती
   २) समाजशास्त्र आणि सामाजिक विकास
   ३) समाजशास्त्र आणि सामाजिक परिवर्तन

२.९ संदर्भ सूची

१) समाजशास्त्रीय संकल्पना आणि सिद्धांत - डॉ. प्रदीप आगलावे

२) समाजशास्त्र संकल्पना व व्याप्ती - प्रा. ज्योती डोईफोडे

३) समाजशास्त्रीय मूलभूत संकल्पना - डॉ. साळुंखे सर्जेराव

४) समाजशास्त्र - प्रा. घाटगे जयंत, प्रा. पाटील दिनेश

५) आधुनिकता - उत्तर आधुनिकता एक नव समाजशास्त्रीय सिद्धांत - एस.एल. दोशी

६) सुलभ समाजशास्त्र - नी. स. वैद्य, रमेश पांडे

❖❖❖❖

३ अ

सामाजिक संस्था

घटक रचना :

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ व्याख्या
३.३ सामाजिक संस्थाची वैशिष्ट्ये
३.४ राजकीय संस्था
३.५ राज्याच्या निर्मितीस आवश्यक असणारे घटक
३.६ कल्याणकारी राज्य
३.७ राज्याच्या अधिकारांचे किंवा सत्तेचे स्वरुप आणि प्रकार
३.८ अधिकाराचे प्रकार
३.९ सारांश
३.१० कठिण शब्द
३.११ अभ्यासाचे प्रश्न

३.० उद्दिष्ट्ये

१) संस्था म्हणजे काय ते समजावून घेणे.
२) राजकीय संस्थेचा अभ्यास करणे.
३) समाजव्यवस्थेचे अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी राजकीय संस्था कशी महत्त्वाची आहे हे समजावून घेण्यासाठी.
४) कल्याणकारी राज्यांचा अभ्यास करण्यासाठी.
५) कल्याणकारी राज्याचे महत्त्व समजून घेणे.
६) सामाजिक व राजकीय संस्थेचा अभ्यास करणे हा मुख्य उद्देश आहे.

३.१ प्रस्तावना

प्रस्तावना - (Introduction)

जीवननिर्वाहासाठी प्रत्येक प्राण्याची सतत धडपड चालू असते. मानवप्राणीही याला अपवाद नाही. भ्रमंती अवस्थेत असलेल्या मानवाला भ्रमंती करावी लागत होती. कारण अन्न शोधण्यासाठी ही भ्रमंती अपरिहार्य होती. औद्योगिक अवस्थेतही ही धडपड थांबलेली नाही.

मानव व मानवेतर प्राणी आपल्याला मुलभुत गरजांच्या पूर्तीसाठी सांघिक प्रयत्न करीत असतात. पण यातील मुख्य भेद लक्षात घेतला पाहिजे. तो असा की, मानवेतर प्राण्यातील सांघिक प्रयत्न केवळ भक्ष्य मिळविण्याच्या उद्देशाने केले जातात व नंतर मात्र 'बळी तो कान पिळी' ही स्थिती असते. पण मानव समाजात सांघिक प्रयत्नात सहभागी झालेल्या सर्व सदस्यांच्या गरजापूर्तीचा विचार केला जातो. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करणे गरजेचे असते. अनिर्बंध वर्तन म्हणजे जवळजवळ स्वैराचार असतो. म्हणूनच व्यक्तीने कसे वर्तने केले पाहिजे हे निर्धारित करण्यासाठी काही बंधने किंवा नियम निर्माण केले जातात. त्याच बरोबर त्या नियमाचे पालन होते की नाही, हेही काटेकोरपणे पाहिले जाते. मानवी समाजात सामाजिक संस्थांचा उदय याच प्रेरणेतुन झाला आहे. म्हणून मानवीसंबंधाच्या अध्ययनाला महत्त्व देणाऱ्या समाजशास्त्रात सामाजिक संस्थांच्या अध्ययनाचे महत्त्व आहे.

नेहमीच्या प्रचारात 'संस्था' या शब्दाचा अर्थ समाजशास्त्रीय अर्थाहून वेगळा असल्याचे दिसून येते. नेहमीच्या बोलण्यात संस्था, गट, मंडळ हे शब्द जवळ-जवळ समानार्थीचे वापरले जातात. पण या तिन्ही संकल्पना समाजशास्त्रीय दृष्टिने वेगवेगळ्या आहेत. त्याचे स्वरूप व कार्ये ही वेगवेगळे आहेत. म्हणूनच संस्थेचा समाजशास्त्रीय अर्थ कोणता ? त्याची उद्दिष्टे व कार्ये कोणती ? या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी विविध लेखकांनी संस्थेच्या व्याख्या प्रथम लक्षात घेतल्या पाहिजेत.

३.२ व्याख्या (DEFINITION)

१) हॉर्टन व हंट :-

"संस्था ही अशी सामाजिक संबंधाची संघटीत व्यवस्था आहे की, ज्यामध्ये काही समान मूल्ये व वर्तनपद्धती यांचा समावेश होतो व जी समाजाच्या काही मूलभूत गरजा भागविते."

२) किंग्जले डेव्हिस यांच्या मते :–

"एक किंवा अधिक कार्याच्या भोवती रचल्या गेलेल्या परस्परसंबंधित अशा लोकरूढी, लोकनीती व कायदा यांचा संच म्हणजे संस्था होय."

३) लेसली लार्सन आणि गॉर्मन :–

"एखाद्या मूलभूत सामाजिक मुल्याचे जतन करण्यासाठी संघटित झालेला सामाजिक नियमांचा गुंतागुंतीचा व समन्वित स्वरूपाचा गट होय."

वर नमूद केलेल्या व्याख्या व इतर विचारवंतांनी केलेले सामाजिक संस्थांचे विश्लेषण लक्षात घेता सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. हीच वैशिष्ट्ये सामाजिक संस्थांच्या स्वरुपावर प्रकाश टाकतात. ही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

३.३ सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये

१) निश्चित उद्दिष्ट :-

सामाजिक संस्थांची उभारणी कोणत्या ना कोणत्या तरी निश्चित उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी झालेली असते. हे निश्चित उद्देश साध्य करण्यासाठी सामाजिक संस्था कटिबद्ध असतात.

उद्दिष्ट व प्रत्यक्ष केले जाणारे कार्य यामध्ये जरी सुक्ष्म फरक असला तरी उद्दिष्टाला अनुरूपच कार्य व्हावे, ही अपेक्षा असते. तेव्हा कुटुंबसंस्था - प्रजोत्पादन, राज्यसंस्था - संरक्षण, धर्मसंस्था - मानसिक व नैतिक सुरक्षितता, अर्थसंस्था - मूलभूत गरजांपूर्ती इत्यादी उद्दिष्ट्ये पुढे ठेवूनच कार्यरत होत असतात.

२) सापेक्ष स्थैर्य :-

विशिष्ट गरज पूर्ण करणे हे उद्दिष्ट गाठण्यासाठी संस्था काही नियम तयार करीत असतात. कारण विशिष्ट गरज साध्य करण्यासाठी व्यक्तीचे वर्तन नियमबद्ध होणे गरजेचे असते. त्यामुळे हे नियम एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होतात. साहजिकच पिढ्या बदलतात, पण सामाजिक संस्थांनी विशिष्ट गरजेच्या पूर्तीसाठी व्यक्तीने कसे वर्तन करावे यासाठी उभे केलेले नियम, पिढ्यानपिढ्या चालू राहतात. याचा अर्थ नियमात बदल होत नाहीत, असे नाही. पण कोणते ना कोणते तरी नियम हे असतातच यामुळेच संस्थेला स्थैर्य मिळते.

३) विशिष्ट वर्तनप्रकार :-

समाजातील व्यक्तीचे वर्तन कोणत्या प्रकारचे असावे हे निर्धारित केले जाते. अनिर्बंध स्वातंत्र्य व्यक्तीला देणे हे धोक्याचे असते. त्यामुळे सामाजिक संस्था आपले निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व्यक्तीकडून ठराविक वर्तनपद्धतीची अपेक्षा ठेवून असते. राज्यसंस्था व्यक्तीकडून राष्ट्रनिष्ठा व कायदापालन, कुटुंबसंस्था व्यक्तीकडून कुटुंबीय भावना, तर अलौकिक शक्तीपुढे लीनता ही धर्मसंस्थेची अपेक्षा असते.

४. उपयुक्त साधने :-

विशिष्ट गरजांभोवती संस्थेची उभारणी झालेली असल्याने त्या गरजांपूर्तीसाठी काही साधनांचा वापर संस्था करीत असते. ही साधने सामाजिक संस्थांच्या एकूण वाटचाली अगदी आवश्यक असतात. यामध्ये इमारती, यंत्रायुधे इत्यादीचा समावेश होतो. कुटुंबसंस्थेसाठी संसारोपयोगी वस्तु लागतात तर राज्यसंस्थेसाठी शस्त्रे लागतात. धर्मसंस्थेसाठी देवळे, चर्च, बस्ती इत्यादीची गरज असते. संस्थेच्या उद्दिष्टाच्या स्वरूपाप्रमाणे संस्थेच्या साधनाचे स्वरूपही वेगळे असते.

५. प्रतीके :-

सर्वच सामाजिक संस्थांमध्ये कोणती ना कोणती तरी प्रतिके निर्माण केलेली असतात. यामुळे संस्थेबद्दल व्यक्तीच्या मनात काही जाणीवा निर्माण होत असतात. या प्रतिकांचे स्वरूप भौतिक व अभौतिक असते. सैन्याचे गणवेश, शाळेतील मुलांचे गणवेश, मंगळसुत्र, तुळशीवृंदावन, स्वस्तिक या प्रतिकांचे हिंदू धर्मातील महत्त्व, ख्रिश्चन धर्मातील क्रॉसचे महत्त्व, इस्लाममध्ये चांदचे महत्त्व ही प्रतिकांची उदाहरणे आहेत. तेव्हा प्रतिकाच्या माध्यमातुन विशिष्ट सामाजिक संस्थांतील सदस्यांच्या श्रद्धा, विश्वास, वर्तनपद्धती स्पष्ट करते. यामुळेच लोकांच्या मनात समान श्रद्धा, समान कार्य व समान विचार इत्यादी सदैव ताजी राहतात.

६. लिखित किंवा अलिखित परंपरा :-

विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक संस्था व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करीत असते. हे नियम लिखित असतात. भारतीय राज्यघटना लिखित स्वरूपात असल्याने राज्यसंस्थेची

कृती घटनेला अनुसरून होत असते. पण प्रत्येक संस्थेची कृती ठरविणारे नियम लिखित स्वरूपात असतातच असे नाही. वर्तनविषयक आचारसंहिता लिखित व अलिखित स्वरूपात आढळून येते. सामाजिक संस्थातील सदस्यांचे वर्तन परस्परपुरक व एकाच दिशेचे असावे म्हणूनच या लिखित व अलिखित परंपरा निर्माण केलेल्या असतात.

३.४ राजकीय संस्था (THE POLITICAL INSTITUTION)

प्रस्तावना (Introduction) :-

राज्य व सरकार यांची व्याप्ती व कार्य इत्यादी बाबतचे संशोधन करणे हे राजनीतिशास्त्राचे उद्दिष्ट होय. शासन व्यवस्थेच्या अंतर्गत कार्याशी आपल्याला काही कर्तव्य नाही. आपण सामाजिक संघटन आणि सरकार यांचा काय संबंध आहे याचा विचार करणार आहोत. समाजातील सुव्यवस्थेशी ज्या संस्थेचा तात्त्विक संबंध येतो, तिला राजकीय संस्था असे म्हणतात. (The Political institution is the institution formally concerned with the Maintenance of order in society) समाजातील व्यक्ती व गट यांच्यामधील शांततापूर्ण व प्रभावी अशा अंतर्गत क्रिया व व्यवहार यांना उद्देशुन सुव्यवस्था (Order) हा शब्द आयोजिला जातो. सुव्यवस्था आणि संघटना (Organisation) यात फरक आहे. संघटनेत जटिलता (Complexity) अभिप्रेत असते. सुव्यवस्थेत ती अभिप्रेत नसते.

कोणत्याही समुदायात सुव्यवस्था असणे अत्यंत आवश्यक असते. राज्य संस्थेव्यतिरिक्त इतरही काही संस्था समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करू शकतात. उदाहरणार्थ धर्मसंस्था आदिवासी समाजात धर्मसंस्थाच शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यात अधिक प्रभावी ठरते. परंतु समाज जेव्हा अधिक गुंतागुंतीचा होतो तेव्हा स्वतंत्र अशा राजकीय संस्थेची गरज भासते. अर्थात इतर संस्थाही शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम करीत असतातच. परंतु काही विक्षेप निर्माण झाल्यास शांतता प्रस्थापित करण्याची अंतिम जबाबदारी राज्यसंस्थेवर येऊन पडते. उदाहरणार्थ जातिसंस्था आपल्या जातीतील सदस्यांवर जातिमंडळातर्फे नियंत्रण प्रस्थापित करते. पुर्वीप्रमाणे आता या जातिमंडळांना अस्तित्व नसले तरी जातीसंस्था आजही अनौपचारीकरित्या आपल्या जातीपुरते नियंत्रण करण्याचे काम करते.

आधुनिक समाजात कमालीचे व्यवच्छेदन झाले आहे. जातिसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था यांचे विघटन व वर्गविग्रह इत्यादी अनौपचारीक नियंत्रण जवळजवळ नष्ट झाले आहे. त्यामुळे राज्यसंस्थेचे कार्य व महत्त्व वाढले आहे. राज्यसंस्थेबाबत आपल्याला पुढील मुद्द्यांचा विचार करावयाचा आहे. राज्याचा अर्थ काय ? राज्य आणि समाज यातील भेद काय आहेत ? समाजाच्या दृष्टिने राज्याचे कार्य कोणते आहेत ? सरकारपुढे आज कोणत्या समस्या आहेत ?

राज्याचा अर्थ - (The Meaning of State)

राज्याच्या अनेक व्याख्या आहेत. त्यापैकी प्रमुख व्याख्या अशा:

१) "विशिष्ट भुभागावर कमी अधिक लोकसंख्येत कायम राहणारा परकीय सत्तेच्या नियंत्रणापासून संपूर्णत: मुक्त असणारा व राज्यातील सुसंघटित अशा शासनसंस्थेचा

आदेश वा हुकूम बहुसंख्य नागरीक स्वभावत:च पाळतात असा समाज म्हणजे "राज्य" अशी व्याख्या प्रो. गार्नर यांनी केली आहे."

२. प्रो. लास्की यांचे मते :-

"राज्य म्हणजे विवक्षित भूभागातील सरकार व प्रजा यात विभागलेला आणि स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजून त्या भुप्रदेशातील अन्य सर्व संस्थावर सत्ता गाजवू पाहणारा समाज होय."

३. प्रो. मॅक आयव्हर :-

"दंडसत्ताधारी शासनसंस्थेने केलेल्या कायद्यानुसार विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या समाज व्यवस्थेसाठी आवश्यक असलेली सार्वत्रिक बाह्यस्थिती अबाधित ठेवणारी संघटना म्हणजेच राज्य होय."

वरील व्याख्या आजच्या परिस्थितीत सर्वस्वी उपयुक्त ठरतील असे नाही. याचे कारण प्रत्यक्ष व्यवहार पाहिल्यास शासन संस्थेला आपल्या सर्वश्रेष्ठ अधिकाराला मुरड घालावी लागते. म्हणून वरील व्याख्यात सुधारणा करून सर्वसामान्यपणे असे निवेदन करता येईल की, मर्यादित सार्वभौम सत्ता प्रस्थापित करणारा गट म्हणजे राज्य होय.

३.५. राज्याच्या निर्मितीस आवश्यक असणारे घटक

१) भूप्रदेश (Territory) :-

भूप्रदेश असणे ही राज्याची पहिली गरज होय, भटक्या समाजाला राज्य म्हणता येणार नाही. पूर्वीच्या काळी भूप्रदेश हा आवश्यक घटक मानला जात नव्हता. राज्य म्हटले की, भूप्रदेश हे निश्चित असले तरी त्याचे क्षेत्रफळ किती असावे, याबाबत नियम असलेला आढळून येत नाही. मोनॅकोचे क्षेत्रफळ ८ चौरस मैल आहे, तर सैनमरीनोचे क्षेत्रफळ ३८ चौरस मैल इतके आहे. रशिया, चीन यासारख्या राज्याचे क्षेत्रफळ लक्षावधी चौरस मैल आहे. तसेच हा भूप्रदेश सलग असला पाहिजे असेही नाही. पूर्व पाकिस्तान एका टोकाला तर पश्चिम पाकिस्तान दुसऱ्या टोकाला आहे व मध्ये हिंदुस्थान आहे. रशियन शास्त्रज्ञ रूसो यांनी असा सुवर्णमध्ये काढला आहे की, राज्यकारभार करणे अवघड होईल इतका तो मोठा नसावा आणि अगदीच लहानही नसावा. भूप्रदेशात जमीन, पाणी, आकाश, हवामान, जमीनीलगतची समुद्राची पट्टी वगैरेचा समावेश होतो.

२) लोकसंख्या किंवा लोकसमूह (Population) :-

राज्यनिर्मितीस लोकसंख्या ही एक आवश्यक बाब आहे. तथापि लोकसंख्या किती असावी याबाबत नियम असा नाही. सिलोन, स्वित्झर्लँड यांची लोकसंख्या थोडी आहे. तर चीन व भारत ही अति लोकसंख्येची राज्ये होत. राज्य स्वयंपूर्ण होईल इतकी मोठी व राज्यकारभार सुव्यवस्थितपणे करता येईल इतकी लहान लोकसंख्या असावी असे ॲरीस्टॉटलने सुचविले. ही विचारसरणी योग्यच आहे असे कोणालाही वाटेल. तथापि येथे एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात ठेवण्यासारखा आहे तो हा की, लोकसंख्येच्या संख्यात्मक विचाराबरोबरच तिच्या गुणात्मक, बाजूचा विचार केला पाहिजे. राज्याचे स्थैर्य, शक्ती, दर्जा व वैभव या गोष्टी गुणवान लोकसंख्येवर अवलंबून असतात, म्हणजेच बुद्धिमान, कर्तव्यतत्पर, देशाभिमानी, परार्थपरायण व सहिष्णू असे लोक हेच खरे राज्याचे आधारस्तंभ होय.

३) सरकार किंवा शासनसंस्था (Government) :

आपली उद्दिष्टे साध्य व्हावीत व राज्यात शांतता व सुव्यवस्था सतत नांदावी म्हणून जी यंत्रणा किंवा व्यवस्था आवश्यक असते, तिला शासनसंस्था किंवा सरकार असे म्हणतात. सरकारचे स्वरूप देश कालसापेक्ष असते. आपले कामकाज करता यावे म्हणून सरकारचे तीन विभाग असतात. त्यांना कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ असे म्हणतात.

४) सार्वभौमत्व (Sovereignty) :

राज्यातील लोकांना अंतर्गत बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य असावे लागते. त्याचप्रमाणे त्यांच्यावर बाहेरचे कोणाचेही दडपण असता कामा नये म्हणजे लोकांना अंतर्बाह्य मोकळीक असावी. राज्यांतर्गत संस्थावर नियंत्रण ठेवून व्यक्ती व समाज यांच्या संबंधात समतोल वा समन्वय राखणे हे महत्त्वाचे आहे. कठीण व कठोर काम करण्याकरिता राज्याचे हाती सार्वभौमत्व असणे अपरिहार्य आहे. सार्वभौमत्व सत्ता अविभाज्य असावी लागते.

राज्य व इतर संघटना यातील भिन्नत्व (The difference between state and other organisation) :

राज्याचे स्वरूप स्पष्ट होण्याकरीता राज्य व इतर संघटना यामधील भेद काय आहे हे विचारात घेणे उपयुक्त ठरते. समाजशील माणसाच्या गरजा अनेक असतात. शारीरिक, नैतिक, मानसिक, सांस्कृतिक इत्यादी गरजांची अधिकृतपणे व सामान्यपणे पूर्तता व्हावी म्हणून मंडळाची व संघटनेची निर्मीती होते. तथापि राज्य व राज्येत्तर संघटना यात भेद आहे.

१) राज्याला प्रादेशिक मर्यादा असते. राज्येत्तर संघटनाच्या बाबत अशी मर्यादा असते असे नाही. उदाहरणार्थ - ख्रिस्ती धर्मसंघटना, रोटरी क्लब, जागतिक आरोग्य संघटना इत्यादी.

२) राज्याचे सभासदत्व ऐच्छिक नसून आवश्यक असते. प्रत्येक व्यक्ती ही कोणत्या ना कोणत्या तरी राज्याची सभासद असतेच व्यक्ती ज्या राज्यात जन्म पावते त्या राज्याचे सभासदत्व तिला लाभते. इतर संघटनांचे सदस्यत्व ऐच्छिक स्वरूपाचे असते. कम्युनिस्ट पक्षाचे सभासदत्व स्विकारायचे कि नाही हे त्या त्या व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून राहील.

३) राज्य इतर संघटनावर पूर्णपणे बंदी आणू शकते, अगर त्यांना काही मर्यादा घालून देते. त्यांचेवर आंशिक वा संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित करण्याची जबाबदारी काही वेळा राज्यावर येऊन पडते. म्हणजे राज्य ही सार्वभौम व सर्वसत्ताधिनिष्ठित अशी संघटना आहे. ती सर्वव्यापी नसली तरी सर्वस्पर्शी आहे असे म्हणता येईल.

४) इतर संघटनांशी तुलना करता राज्य ही एक शाश्वत चिरकालीन संघटना आहे. इतर संघटना तात्पुरत्या स्वरूपाच्या असतात. त्याच्या सभासदांमध्ये अराजकता माजली किंवा संघर्ष विकोपाला पोचले, तर त्या संघटनांचे अस्तित्वच धोक्यात येते. राज्यसरकार एक वेळ बदलले तथापि राज्य अबाधित राहते.

५) राज्याचे राज्यक्षेत्र विशाल व व्यापक असते. इतर संघटनांचे कार्य व उद्दिष्ट ही मर्यादित असतात. उद्दिष्टपूर्तीनंतर संघटनेचे अस्तित्व समाप्त होते. परंतु राज्याला नेहमीच विकासीक कार्य करावयाचे असल्यामुळे ते प्रासंगीक स्वरूपाचे असते. सुव्यवस्था कायम टिकविणे हे अभावात्मक कार्य होय. त्यामुळे समाजाची प्रगती होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होते. तथापि या कार्याव्यतिरिक्त राज्याला समूह विकासासारखी व्यापक कार्य

करावी लागतात. अशा रीतीने राज्याच्या कार्याची व्याप्ती व राज्येतर संस्थांच्या कार्याची व्याप्ती यात भेद आढळतो.

६) राज्य आपल्या सार्वभौमत्वाच्या रक्षणार्थ आपल्या दंडशक्तीचा कायदेशीर उपयोग करू शकते. राज्याविरूद्ध गुन्हा केल्यास गुन्हेगाराला शिक्षा करण्याचा अधिकार राज्याला आहे. राज्येतर संस्था ही शिक्षा करतात. परंतु त्याच्या हातात दंडशक्ती नसते. राज्येतर संस्था पुढीलप्रमाणे शिक्षा करू शकतात. सभासदाच्या गैरवर्तनाचा निषेध करणे, त्याचे सभासदत्व तात्पुरते वा कायमचे रद्द करणे, बहिष्कृत करणे. किंवा पैशाच्या स्वरूपात आर्थिक दंड वसुल करणे इत्यादी.

राज्य व राज्येतर संघटना यांचेमध्ये रचना, कार्ये, उद्दिष्ट व अधिकार क्षेत्र इत्यादी अनेक बाबतीत भिन्नत्व आहे हे वरील विवेचनावरून लक्षात येईल.

राज्य व समाज (State and Society) :

मानवी समाजाच्या राजकीय गरजेतूनच राज्य निर्माण झाले आहे. तथापि राज्य व समाज या दोन्ही संघटनाची कार्यक्षेत्रे व स्वरूप मात्र भिन्न आहे. राजकीय दृष्ट्या संघटीत समाज म्हणजेच राज्य होय. उलट कोणतीही मानवी संघटना 'समाज' या संज्ञेला पात्र असते. समाजाची निर्मीती उत्स्फूर्त व नैसर्गिक अशी असते. पण राज्य हेतुपरस्पर निर्माण केलेले असते. राज्याचे ध्येय मानवी आकांक्षाचे संपूर्ण प्रतिक होऊच शकत नाही. राजकीय जीवनाव्यतिरिक्त समाजाला इतरही अंगे असतात. राज्याला भौगोलिक मर्यादा असतात. समाजाला तशा भौगोलिक सीमा असू शकत नाहीत, त्याची व्याप्ती त्या उद्दिष्टानुसार एखाद्या लहान गटापासून जगातील सर्व मानवी जातीपर्यंत असू शकते.

समाजाचे तीन प्रमुख घटक असतात. कुटुंबसंस्था हा समाजाचा आदर्श व प्रमुख घटक होय. यात मनुष्य जन्माला येतो व त्याला जगाचे ज्ञान होते. दुसऱ्या प्रकारच्या संघटनेत व्यक्तीला स्वतःच्या व्यावसायिक गरजांसाठी सामील होणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, कामगार संघटना, व्यापारी संघ, शिक्षक संघटना इत्यादी. तिसऱ्या प्रकारच्या संस्थेत व्यक्ती स्वतःच्या विकासासाठी स्वेच्छेनुसार सामील होते. उदाहरणार्थ, गायन समाज, अभ्यासामुळे राजकीय पक्ष इत्यादी. या सामाजिक संस्था व्यक्ती विकासाच्या गरजा भागविण्यासाठी निर्माण झालेल्या असल्या तरी, विशिष्ट मर्यादेपर्यंत राज्याचे नियंत्रण त्यांचेवर असते. त्याचबरोबर समाजातील या संस्थांचाही प्रभाव राज्यावर पडत असतो. त्यापैकी काहींचे अस्तित्व राज्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, कुटुंबसंस्थेचे अस्तित्व हे विवाह व वारसा हक्कांच्या विधिनियमांवर अवलंबून असते.

अनेक कुटुंबे एकत्र येऊन समाज निर्माण होतो. या समाजात वर वर्णन केल्याप्रमाणे लहानमोठ्या संस्था संघटना व मंडळे आपापल्या उद्दिष्टांसाठी अस्तित्वात येतात. पण त्यांना एकसूत्रात ठेवण्यासाठी केवळ समाजसंघटनेचे बंधन पुरेसे होत नाही. त्यासाठी राजकीय स्वरूपाच्या संघटनेची गरज असते. म्हणून समाज आणि राज्य यांच्या परस्पर संबंधाचा विचार केल्यास असे म्हणता येईल की, राज्य हे समाजाच्या उपयोगासाठी निर्माण केलेले असते. समाज राज्याच्या उपयोगासाठी निर्माण झालेला नसतो. याचा अर्थ असा की मानवी संस्कृतीच्या विकासात समाज प्रथम निर्माण झाला आणि नंतर राज्य निर्माण झाले. समाज संघटना ही राज्यापेक्षा अधिक व्यापक असते. तिची कार्यक्षेत्रे आणि ध्येय अधिक समावेशक असतात.

राज्याचे कार्य राजकीय जीवनापुरतेच मर्यादित असते. राज्यासारखे राजकीय संघटनेव्यतिरिक्त अनेक समाज प्राचीन काळी अस्तित्वात होते, आणि आजही एस्किमोसारखे समाज राज्यविरहीत आहेत. राज्य आणि समाज समानार्थी समजली जाऊ नयेत. राज्यामुळे राज्यव्यवस्था सुसूत्र राहते. समाजातील व्यक्ती आणि कुटुंबे यांच्या सामूदायिक जीवनासाठी काही सर्वसामान्य नियमांची आवश्यकता असते. हे नियम प्रस्थापित करून त्याचे पालन, सर्व व्यक्तीकडून करवून घेण्याची जबाबदारी राज्यावर असते. प्रा. वार्कर यांनी म्हटल्याप्रमाणे समाजाचे कार्यक्षेत्र स्वयंस्फूर्त सहकार्य हे आहे. सदिच्छा ही त्याची कार्यशक्ती आहे. आणि सतत तडजोड ही त्याची कार्यपद्धती होय. उलट राज्याचे कार्यक्षेत्र भरीव व साचेबंद असते. दंडशक्ती ही त्याची कार्यशक्ती आणि सक्तीचे नियम पालन ही त्याची कार्यपद्धती आहे.

राज्य ही समाजातील एक संघटना आहे. पण ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. राज्याचे कार्यक्षेत्र कोणते याविषयी काटेकोर नियम सांगता येणार नाहीत. देशकालपरिस्थितीनुसार त्या दोन्हीतही बदल घडून येतात. ऐतिहासिक दृष्ट्या पाहता राज्याचे कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढते आहे. परिणामतः समाजाचे कार्यक्षेत्र संकुचित होत आहे. या कार्यक्षेत्र वाढीचे मुख्य कारण सत्तेच्या केंद्रीकरणाची वाढती गरज हे होय. पण असे असले तरी समाजाचे मुलभूत स्थान व महत्व कमी होत नाही. कारण राज्य हे समाजनिर्मित असे साधन आहे. काही शास्त्रज्ञांच्या मते, राज्य आणि समाज ही एकरूप समजावयास हवीत. पण असे गृहीत धरण्यात एक मोठा धोका असतो. तो म्हणजे, व्यक्ती जीवनाच्या सर्व क्षेत्रावर राज्याचे नियंत्रण आपोआपच येते. व्यक्तीस्वातंत्र्य नष्ट होते. व त्यामुळे व्यक्तीविकासाचा मार्ग खुंटतो. राज्याला सर्वंकष स्वरूप प्राप्त होते, आणि मानवी बुद्धि व विचार खुरटली जाऊन ठोकबाजपणा येतो. यासाठी समाज आणि राज्य यांच्यामधील भिन्नत्व आग्रहाने कायम ठेवणे आवश्यक आहे. राज्यापेक्षा समाज अधिक व्यापक, समावेशक आणि श्रेष्ठ आहे. साहजिकच राज्याच्या नागरिकांपेक्षा व्यक्ती श्रेष्ठ आणि नागरिकत्वापेक्षा व्यक्तीला अधिक महत्व आहे.

३.६ 'कल्याणकारी राज्य'

राज्याची सर्वश्रेष्ठत्वाची कसोटी आधुनिक काळात केवळ शक्तीवरूनच केली जात नाही. राज्याचे (Police State) संरक्षक स्वरूप आज राहिले नसून राज्याने आता 'कल्याणकारी राज्याचे' रूप धारण केले आहे. म्हणजेच राज्य चांगले की वाईट याचा निर्णय ते किती प्रमाणात लोकहितकारी आहे यावरून ठरविले जाते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपल्या नाशिक अधिवेशनात कल्याणकारी राज्याच्या स्थापनेचे उद्दिष्ट घोषित केले होते. परंतु कल्याणकारी राज्य म्हणजे काय, त्याचे प्रयोजन काय याचा विचार करणे आहे. कल्याणकारी राज्याचा आदर्श हा नविन नसून फार प्राचीन आहे. भारतात आणि प्राचीन ग्रीसमध्येसुद्धा राज्याने कल्याणकारी असावे अशीच लोकांची धारणा होती. अठराव्या - एकोणिसाव्या शतकातील पोलीस राज्याचे विसाव्या शतकात समाजसेवी राज्यात परिवर्तन होण्यास सुरुवात झाली. मागील शतकातील औद्योगिक प्रगतीमुळे उत्पन्न होणाऱ्या दुरगामी, परिवर्तनांच्या परिणामास कल्याणकारी राज्याची कल्पना एक आदर्श म्हणून विसाव्या शतकात पहिल्या महायुद्धानंतर अधिकाधिक लोकप्रिय होत गेली व द्वितीय महायुद्धानंतर ही कल्पना विश्वव्यापी झाली आहे.

कल्याणकारी राज्याचा अर्थ :-

कल्याणकारी राज्याची कल्पना फार आकर्षक आहे परंतु त्याचे वास्तविक स्वरूप तेवढे स्पष्ट नाही. प्रत्येक राज्य जनतेच्या हितासाठीच कार्य करीत असल्यामुळे आपल्याला कल्याणकारी म्हणून घेत असते. म्हणून या शब्दाचा आशय समजून घेणे आवश्यक असते. यासाठी कल्याण म्हणजे काय ? कोणाचे कल्याण ? कल्याणकारी कार्य कोणकोणती आहेत ? या सर्वांचा अर्थ स्पष्ट केला पाहिजे.

'कल्याण' याचा सर्वसाधारण अर्थ 'हित' होय. म्हणजेच लोकांचे हित करणारे राज्य म्हणजेच लोक कल्याणकारी राज्य असा सर्वसाधारण अर्थ करता येईल. परंतु यामुळे लोक कल्याणकारी राज्याचे वास्तविक स्वरूप आपल्या लक्षात येऊ शकत नाही. लोककल्याणकारी राज्याचे वास्तविक स्वरूप योग्य प्रकारे समजण्यासाठी अधिक सूक्ष्म निरिक्षण करणे आवश्यक आहे. लोकहित असा जेव्हा शब्द उपयोगात आणला जातो तेव्हा त्याचा अर्थ व्यक्तिगत हित असा होत नाही. लोककल्याणकारी राज्याच्या संदर्भात लोकहिताचे तात्पर्य राजकीय, सामाजिक व आर्थिक दृष्टिने व्यक्तीला प्राप्त होणाऱ्या संधीमधील असमानता दूर करून त्याच्या सर्वसाधारण आवश्यकतांची पूर्ती करण्याची व्यवस्था करणे होय. या व्यवस्थेचे उद्दिष्ट्ये एखाद्या विशिष्ट समूदायाचे, विशिष्ट वर्गाचे व विशिष्ट विभागाचे कल्याण करण्याचे नसते तर त्याचे उद्दिष्ट जनतेच्या सर्व अंगाचे काही आवश्यक हितांची प्राप्ती करून देण्याचे असते.

कल्याणकारी राज्याच्या व्याख्या :-

डी. डब्ल्यू. केटने म्हटले आहे की, 'जे राज्य आपल्या नागरीकांना व्यापक प्रमाणात सामाजिक सेवा पूरविते ते कल्याणकारी राज्य होय.' अशा राज्याचा मूळ उद्देश नागरीकांना सुरक्षितता प्राप्त करून देण्याचा असतो. ही सुरक्षितता राजकीय, आर्थिक आणि सामाजिक या तिन्ही प्रकारची असते. डॉ. अब्राहमच्या मते, कल्याणकारी राज्य म्हणजे असा समाज की ज्यात राजसत्तेचा प्रयोग समाजातील आर्थिक शक्तीत योग्य असा बदल करून त्याद्वारे राज्यातील नागरीकास उत्पन्नाची हमी प्राप्त करून देण्यासाठी बुद्धिपरस्सर आणि जाणिवपूर्वक केला जातो. लोक कल्याणकारी राज्याविषयी व्यक्त केलेल्या वरील विचारात मानवी हिताच्या आर्थिक पैलूवरच जास्त भर दिलेला आढळून येतो. कारण की, आर्थिक हिताची प्राप्ती झाल्यामुळेच इतर हितांची पुर्ती सहज सुलभ होते. परंतु अशा प्रकारे कल्याणकारी राज्यांच्या कक्षेत (अ) राज्याकडून हाती घेण्यात आलेल्या सामाजिक विमा योजना. (ब) वृद्धावस्था व अन्य प्रकारच्या परिस्थितीत राज्याद्वारे नागरीकांना होणारे आर्थिक साहाय्य. (क) अल्प उत्पन्नाच्या नागरीकांसाठी गृहनिर्माणविषयक कार्य. (ड) नागरीकांना आरोग्यविषयक सुखसोयीची तरतुद. (इ) दारिद्र्याचे उच्चाटन इत्यादी कार्याचा समावेश होतो. लोककल्याणकारी राज्य नागरीकविषयक आपल्या कर्तव्यांचे योग्य प्रकारे पालन करणार नाही, तर त्याचे समर्थन होऊ शकणार नाही. ही कल्पना कल्याणकारी राज्याच्या मागे आहे. नागरीकांना राज्यांकडून लोककल्याणविषयक कार्य करवून घेण्याचा अधिकार आहे. तरच त्या राज्याचे समर्थन केले जाईल.

कल्याणकारी राज्य निर्मितीसाठी राष्ट्रीय संपत्तीत वाढ होणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्याचप्रमाणे मुलोद्योगाचे राष्ट्रीयकरण प्रमंडळाची निर्मीती, किमान वेतनाचे कायदे, सहकारी शेती, इत्यादी संस्थात्मक आणि नागरिकांची कार्यतत्परता, शिस्त, चारित्र्य, इत्यादी नैतिक

बदल घडवून आणणेसुद्धा महत्त्वाचे असते. कारण यावरच कल्याणकारी राज्याची सफलता अवलंबून असते.

कल्याणकारी राज्यात खालील गोष्टींचा समावेश करता येईल

१) व्यक्तीच्या आर्थिक सुरक्षिततेच्या निरनिराळ्या योजना आखणे. प्रत्येक व्यक्तीच्या किमान आर्थिक गरजाची पूर्ती करण्याचा राज्य प्रयत्न करते. प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मौलिक गोष्टी प्राप्त झाल्या पाहिजेत. प्रत्येक व्यक्तीला योग्य शिक्षण प्राप्त करून देण्याची संधी उपलब्ध करून देणे आजारपणात औषधोपचाराची सोय राज्याकडून करून देणे बेकारी निर्मूलनाचे प्रयत्न, सेवानिवृत्तीनंतरचा काळ इत्यादीसाठी आर्थिक मदतीची व्यवस्था राज्यातर्फे केली आहे.

२) प्रत्येक व्यक्तीला राजकीय सुरक्षितता प्राप्त करून देणे हे देखील कल्याणकारी राज्याचे एक उद्दिष्ट असते. त्यात व्यक्तीला कोणत्याही राजकीय विचाराचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य आणि प्रसंगी शासनाचे कार्यावर टिका करण्याचे स्वातंत्र्य इत्यादीचा समावेश होतो.

३.७ राज्याच्या अधिकारांचे किंवा सत्तेचे स्वरूप आणि प्रकार (NATURE AND TYPE OF AUTHORITY AND POWER OF THE STATE)

प्रस्तावना (Introduction) :

अधिकार किंवा सत्ता हे दोन्ही शब्द सारखे असल्याचे मानले जाते. प्रत्येक राज्य आपल्या शासनयंत्रणेतर्फे किंवा सरकारतर्फे राज्यातील नागरीकांवर अधिकार गाजवित असतात. अधिकार किंवा सत्ता या संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट करतांना प्रा. हॅरी जॉन्सन असे म्हणतात कि, "अधिकार किंवा सत्ता म्हणजे इतरांचा विरोध असतांनाही, आपल्या इच्छा इतर व्यक्तीवर लादण्याची काही व्यक्तीची क्षमता होय. समाजात काही व्यक्तीना असे अधिकार किंवा अशी सत्ता त्यांच्या पदामुळे प्राप्त होतात." कुटुंबात पिता प्रशासनात प्रशासनअधिकारी, राजकारणात राजकीय नेता इत्यादीना अधिकार किंवा सत्ता गाजविण्यात हक्क समाजाने प्रदान केलेला आहे. अधिकार किंवा सत्ता या संकल्पनेवर त्यांच्या "समाजशास्त्राचा शब्दकोश" या ग्रंथात विवेचन करताना प्रा. एच. पी. केअरचाइल्ड म्हणतात की, "अधिकार किंवा सत्ता म्हणजे एका व्यक्तीची इतर अन्य व्यक्तीवर वर्चस्व गाजविण्याची क्षमता होय." अशा प्रकारचे वर्चस्व, अधिकार किंवा सत्ता प्राप्त झालेली व्यक्ती, इतर अन्य व्यक्तींवर खालील कारणांसाठी प्रस्थापित करू शकते. (१) बळजबरी वा जबरदस्ती करण्यासाठी. (२) नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी. (३) इतर व्यक्तींकडून आज्ञाधारकतेची अपेक्षा पूर्ण होण्यासाठी. (४) इतर व्यक्तींच्या स्वातंत्र्यात ढवळाढवळ करण्यासाठी. (५) अन्य व्यक्तींकडून विशिष्ट प्रकारे क्रिया करवून घेण्यासाठी.

अधिकाराच्या स्वरूपावर अधिक स्पष्टीकरण करताना प्रा. एच. पी. केअरचाइल्ड म्हणतात की, "प्रत्येक समाज-व्यवस्था ही श्रेष्ठत्व - कनिष्ठत्व. या स्तरीकरणात्मक भावनांवर आधारलेली आणि स्पर्धा व संघर्ष यांनी नियमित केलेली अधिकार किंवा सत्ता संबंध व्यवस्था होय. "

अधिकार किंवा सत्तेचे स्वरूप :-

अधिकार किंवा सत्ता यांच्या स्वरूपावर विवेचन करताना प्रा. हॅरी जॉन्सन असे म्हणतात की, आंतरक्रियात्मक प्रक्रियेत काही व्यक्तींना इतर व्यक्तींपेक्षा जास्त अधिकार असतात. जेव्हा आपण असे समजतो की एखाद्याला दुसऱ्यापेक्षा जास्त किंवा कमी अधिकार आहेत. तेव्हा आपणास असे सुचवायचे असते की, अशा ठिकाणी संभाव्य संघर्षाचे क्षेत्र पण कमी अधिक प्रमाणात विस्तृत झालेले असते. तसेच संभाव्य संघर्षाचे क्षेत्र काय आहे हे तपशीलवार पद्धतीने सांगावे लागते. तरीसुद्धा अधिकार किंवा सत्ता याच्या बाबतीत बरीच संदिग्धताच असल्याचे दिसून येते. कारण एकाच व्यक्तीच्या अधिकाराची किंवा सत्तेची अनेक क्षेत्रे असतात. एका विशिष्ट क्षेत्रात व्यक्तीला जितका अधिकार असेल तितक्या प्रमाणात तो दुसऱ्या क्षेत्रात असेलच असे नाही. राजकीय क्षेत्रात सर्वोच्च अधिकार किंवा सर्वोच्च सत्ता धारण करणारी व्यक्ती साहित्य किंवा विज्ञानाच्या क्षेत्रात तेवढाच अधिकार प्राप्त करीलच असे नाही. दुसऱ्या शब्दात असेही म्हणता येईल की, परिस्थितीनुसार अधिकाराचे स्वरूपही बदलते. यासाठी प्रा. हॅरी जॉन्सन यानी एक सुंदर उदाहरण दिले आहे. ते म्हणतात की, एखादा मनुष्य काही वजन उचलण्याच्या दृष्टिने प्रयत्न करतो, पण त्यात तो अयशस्वी होतो. याचा अर्थ असा घ्यावयाचा का की त्या माणसात सामर्थ्य वा शक्ती नाही ? आपण जर तसा अर्थ घेतला तर चूक ठरेल. या संदर्भात आपण फक्त एवढेच म्हणून की त्या माणसाजवळ ते विशिष्ट वजन उचलण्याइतकी शक्ती अथवा सामर्थ्य नाही. अधिकार किंवा सत्तेचे पण तसेच आहे. याचा दुसऱ्या शब्दात अर्थ असा की अधिकार परिस्थिती सापेक्ष आहे. जोपर्यंत एखाद्या व्यक्तीच्या अधिकाराचे विशिष्ट परिस्थितीत आपण प्रत्यक्ष परिक्षण करीत नाही. तोपर्यंत त्या व्यक्तीच्या अधिकाराच्या संदर्भात आपण केवळ अंदाजच करत असतो. उदा. कोणत्याही एखाद्या जागतिक क्रिडास्पर्धेत जेव्हा एखाद्या राष्ट्राचा संघ जेव्हा सहभागी होतो. तेव्हा क्रिडास्पर्धेतील त्यांच्या कामगिरीबद्दल अनेक क्रिडारसिक पूर्वानुमान व्यक्त करतात, परंतु हे पूर्वानुमान व त्या संघाची क्रिडा स्पर्धेतील प्रत्यक्ष कामगीरी यात फरक किंवा तफावत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. इ.स. १९९९ च्या विश्वक्रिकेट स्पर्धेच्या अंतीम सामन्यात 'पाकिस्तान' संघाचा इतका दारूण पराभव होईल असे अनुमान त्या संघाच्या तोपर्यंतच्या कामगीरीवरून कोणीच केले नव्हते. पण वास्तवात तसे घडले नाही, खेळाप्रमाणे राजकीय क्षेत्रातील अधिकार वा सत्ता याबाबत पूर्वानुमान करता येत नाही. वरवर सत्तेचा सदुपयोग करण्याचा देखावा करणारा राजकीय नेता आपल्या सत्तेचा दुरूपयोग करीत असल्याचे जेव्हा जनतेच्या लक्षात येते तेव्हा त्यांना धक्का बसतो. एक गोष्ट सत्य आहे की वेगवेगळ्या परिस्थितीत अधिकार व सत्ता यांची संभाव्यता वेगवेगळी असू शकते.

अधिकार व सत्ता यांच्या संदर्भात एक गोष्ट सत्य आहे. ती ही की अधिकार व सत्ता या संकल्पनेत एका व्यक्तीची इतर व्यक्तीवर प्रभाव पाडण्याची क्रिया समाविष्ट केली जाते. अधिकार व सत्ता यांच्या माध्यमातुन लोकांवर प्रभाव पाडू शकतील असे दोन सर्वसाधारण मार्ग आहेत.

१) लोक ज्या वास्तव परिस्थितीत काम करतात त्यात कोणतेही परिवर्तन न करता लोकांच्या कल्पना, भावना ध्येये यास अनुरूप असे काम करणे दुसऱ्या शब्दात असेही म्हणता येईल की, विशिष्ट परिस्थितीत अस्तित्वात असलेल्या लोकांच्या कल्पना, भावना, ध्येय यास अनुरूप असे वर्तन करून लोकांवर आपला प्रभाव पाडणे होय.

२) लोकांच्या भावना, कल्पना, ध्येये यावर पूर्वनियोजित असा परिणाम होईल अशी परिस्थिती निर्माण करण्याच्या दृष्टिने कार्य करणे. दुसऱ्या प्रकारच्या या प्रभावात लोकांच्या भावभावना पूर्वसंकल्पित असे बदल घडविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

लोकांवर प्रभाव पाडून सत्ता व अधिकार हस्तगत करण्यासाठी या दोन्ही मार्गाचा स्वतंत्रपणे अथवा संयुक्तपणे वापर केला जातो.

अधिकार वा सत्ता हस्तगत करण्यासाठी प्रभाव पाडण्याच्या विविध पद्धती (Mode of various influences to get Power Authority) :

अधिकार किंवा सत्ता या संकल्पनेत प्रभाव किंवा वर्चस्व हे महत्त्वाचे मानले जाते. दुसऱ्या व्यक्तीवर प्रभाव टाकून सत्ता वा अधिकार प्रस्थापित किंवा हस्तगत करावे लागतात. दुसऱ्या शब्दात वर्चस्व अथवा प्रभावाशिवाय अधिकार प्राप्त करता येत नाहीत. अगदी प्रेमातसुद्धा आपल्या प्रेयसीला पत्नीत्वाचा अधिकार देण्यासाठी प्रियकराला तिच्यावर प्रभाव टाकून तिला वश करावे लागते. त्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावयाचा? हे प्रियकर स्वतः ठरवतो. राजकारणातसुद्धा सत्ता व अधिकार हस्तगत करणाऱ्या नेत्याला आपल्या अनुयायावर, त्यांनी पाठींबा द्यावा म्हणून, वर्चस्व प्रस्थापित करावे लागते. अधिकार किंवा सत्ता हस्तगत करण्यासाठी खालील मार्गाचा म्हणजे प्रभावांचा अवलंब करावा लागतो त्याचा आपण सविस्तर विचार करू.

१) नवीन माहिती देणे :-

लोकांना बोध देणारी, एखाद्या गोष्टीचे स्पष्टीकरण करणारी नवीन माहिती पुरविणारी व्यक्ती लोकांच्या चर्चेचा विषय बनते व नकळत त्या व्यक्तीचा लोकांवर प्रभाव पडतो. काही वर्षापूर्वी ॲड. राम जेठमलानी यांनी बोफोर्स तोफा खरेदी प्रकरणी जी नवीन माहिती लोकांसमोर मांडली, त्यामुळे त्या काळात ते बहुचर्चित व्यक्ती बनले होते. गॉडमॅन चंद्रास्वामी माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांना हवाला प्रकरणात अडकविणारे जैनबंधु असेच प्रसिद्धीच्या झोतात आले होते.

२) चुकीची माहिती देणे :-

बऱ्याचवेळा विपर्यस्त, खोडसाळ व चूकीची माहिती देणाऱ्या व्यक्तीसुद्धा लोकांवर प्रभाव प्रस्थापित करू शकतात. जातीय, धार्मिक व दंगलीच्या प्रसंगी आपल्या गटाचा फायदा व्हावा म्हणून मुद्दाम खोटी वा चूकीची माहिती सर्वत्र पसरविली जाते. अशी व्यक्ती नकळतच आपल्या गटातील इतर व्यक्तीवर प्रभाव गाजविते व आपला राजकीय फायदा करवून घेते. युद्धकाळातही चूकीची माहिती प्रसारीत करून शत्रुपक्षाचे धैर्य खच्चीकरण केले जाते तर स्वपक्षाचे मनोधैर्य वाढविले जाते. त्याचप्रमाणे लोकशाही प्रधान देशात निवडणूक प्रक्रियेत प्रचार करताना राजकीय पक्षाचे नेते आपल्या आपला व आपल्या पक्षाचा प्रभाव वाढावा म्हणून विरोध पक्ष व विरोधी पक्षाचा उमेदवार यांच्या संदर्भात अवास्तव, खोटी बदनामीकारक विधाने करून जनतेची दिशाभुल करतात. सर्वसामान्य जनता अज्ञानी व भोळी असते. ती अशा प्रचाराला बळी पडते. 'राजकारणात सर्व गोष्टी शक्य असतात' या विचाराचा प्रभाव राजकीय नेत्यावर पडल्यामुळे ते 'खोट्या' प्रचाराच्या आहारी जातात.

३) उपदेश करणे किंवा सल्ला देणे :-

उपदेश करणाऱ्या किंवा सल्ला देणाऱ्या व्यक्तीचे पण इतर व्यक्तीवर वर्चस्व असते. अन्य व्यक्तीवर प्रभाव टाकण्याचा हा एक प्रतिष्ठित मार्ग समजला जातो. विशिष्ट व्यक्तीच्या विशिष्ट क्षेत्रातील अनुभव, तिच ज्ञान, तिची हुशारी, तिचे चातुर्य इत्यादीवर व्यक्तीचा उपदेश मानावयाचा की नाही ? हे ठरविले जाते. नेत्याने अनुयायांना केलेला उपदेश आणि मातापित्याने स्वत:च्या मुलांना केलेला उपदेश या प्रकारच्या वर्चस्वात मोडतो. उपदेश करणाऱ्या व्यक्तीजवळ उपदेश करण्यासाठी लागणारा नैतिक अधिकार वा नैतिक सत्ता तर पाहिजेच पण तो स्वत: त्या नैतिकतेचे पालन करणारा असणे जरूरी आहे. स्वत: दारूच्या आहारी गेलेला शिक्षक वा पिता आपल्या विद्यार्थ्यांना अथवा मुलांना दारू न पिणाचा उपदेश करीत असेल तर त्याचे पालन कसे केले जाईल ?

४) अधिकारनिदर्शक वर्चस्व :-

इतर व्यक्तीवर प्रभाव किंवा वर्चस्व प्रस्थापित करण्याचा हा सर्वसामान्य मार्ग आहे. ज्यांच्या हातात अधिकार आहेत अशा व्यक्ती त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या व्यक्तीना आदेश देऊन आपल्याला पाहिजे ते काम करवून घेतात. लष्करातील सेनाधिकारी, पोलिस खात्यातील वरिष्ठ अधिकारी. प्रशासनातील श्रेष्ठ अधिकारी, मंत्रालयातील मंत्री इत्यादी व्यक्ती अधिकार किंवा सत्ता या माध्यमातून आपले वर्चस्व प्रस्थापित करतात. अर्थात अशा प्रकारचे वर्चस्व कायद्याच्या कक्षेत येते. या अधिकारी वा सत्ताधीश व्यक्तीना कायद्याच्या मर्यादेत राहूनच आपले वर्चस्व प्रस्थापित करावे लागते.

५) मूल्य व भावना यांना आवाहन करून केलेल्या उपदेशाद्वारे प्रस्थापित झालेले वर्चस्व

ज्या ठिकाणी अन्य व्यक्तीवर प्रभाव पडत नाही अशा ठिकाणी प्रामुख्याने लोकांच्या भावना किंवा लोकांचे मूल्ये यांना आव्हान करून आपले वर्चस्व प्रस्थापित केले जाते. विशेषत: विविध धार्मिक नेते या मार्गाने लोकांच्या भावना व लोकांची मुल्ये यांना आवाहन करून आपले वर्चस्व वाढविण्याचा प्रयत्न करतात. आपली संस्कृती, आपली भाषा, आपले राष्ट्र याबाबत लोकांना अभिमान वाटतो. म्हणून या क्षेत्रात प्रभाव पाडण्यासाठी हा मार्ग सुलभ समजला जातो.

६) बळजबरी किंवा जबरदस्ती करून वर्चस्व गाजविणे :-

सरळ, सोप्या मार्गाने जर वर्चस्व व प्रभाव पाडण्यासाठी शक्यता नसेल तर बळजबरीने या मार्गाचा अवलंब करून वर्चस्व प्रस्थापित केले जाते. या मार्गाचा अवलंब करणाऱ्या व्यक्ती ज्या व्यक्तीवर प्रभाव गाजवायचा आहे त्या त्या व्यक्तीला शारीरिक इजा करण्याची धमकी देते. म्हणून हा मार्ग लाच देण्याच्या वा लालूच दाखविण्याच्या मार्गाच्या विरोधी असल्याचे मत, "प्रा. हॅरी जॉन्सन" यांनी व्यक्त केले होते. प्रा. हॅरी जॉन्सन असे म्हणतात की, जेव्हा लालच दाखवूनही संबंधित व्यक्ती लालच दाखविणाऱ्या व्यक्तीचे काम करत नसेल तेव्हा संबंधित व्यक्तीवर बळजबरी करून, त्याला धमकी देऊन काम करवून घेतले जाते. "तु जर माझ्या मनाप्रमाणे, माझ्या मर्जीप्रमाणे वागलास तर मी तुला त्रास देणार नाही, अन्यथा!" विधानात वर्चस्व किंवा प्रभाव प्रस्थापित करणारी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला गर्भित धमकी देऊन आपल्या मर्जीप्रमाणे वागण्यास भाग पाडते यात दुसऱ्या व्यक्तीकडून जबरदस्तीने धाक दाखवून पाहिजे ते काम करवून घेतले जाते.

सारांश :-

प्रभावाच्या किंवा वर्चस्वाच्या मार्गाचा पुनर्विचार करताना आपल्या हे सहज लक्षात येईल की अधिकार व त्या अंतर्गत प्रभाव हे प्रत्येक सरकारचे अंग आहे. आपले कार्य सुरळीत चालावे म्हणून आपल्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ नये म्हणून, प्रत्येक सरकारला केव्हा ना केव्हा शक्तीचा वा बळजबरीचा मार्गाचा वापर करावाच लागतो. समाजातील सर्व व्यक्ती, सर्व संस्था यावर सत्ता गाजविण्याचा अधिकार राज्यसंस्थेला आहे. दुसऱ्या शब्दात असेही म्हणता येईल की शासनयंत्रणेच्या किंवा सरकारच्या माध्यमातून राज्यसंस्था ही राज्यातील जनतेवर वर्चस्व प्रस्थापित करते. राज्यात व पर्यायाने समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे, राज्यातील नागरिकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्याची व्यवस्था करणे, परकीय आक्रमणापासून राज्याच्या सीमांचे व एकूण राज्याचे संरक्षण करणे, राज्यातील ताणतणाव कमी करणे. इत्यादीसाठी शासनसंस्थेला किंवा सरकारला अनिर्बंध अधिकार बहाल करण्यात आले आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की राज्याचे म्हणजे पर्यायाने सरकारचे वा शासन यंत्रणेचे हे महत्त्वाचे अंग असून अधिकाराशिवाय किंवा सत्तेशिवाय ही संकल्पना संभवतच नाही.

३.८ अधिकारांचे प्रकार (TYPES OF AUTHORITY)

प्रस्तावना (Introduction)

राजकीय संस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून सरकारचा व शासन यंत्रणेचा उल्लेख केला जातो. राज्याच्या संस्थेचा कार्यात्मक घटक म्हणून सरकारकडे पाहिले जाते. सरकारमध्ये समाविष्ट होणाऱ्या व्यक्तीच्या समुहाला राज्यकर्ते ही संज्ञा दिली जाते. हे राज्यकर्ते राज्याचे धोरण निर्धारित करण्यात महत्त्वाची भुमिका बजावतात. राज्यकर्त्यांचा समूह म्हणजेच सरकार किंवा शासनयंत्रणा होय म्हणून सरकारनिवडीच्या पण तीन पद्धती आहेत. राज्याचे अधिकार सरकार व शासन यंत्रणेच्या हातात असतात. शरकारला अधिकार प्राप्त होण्याच्या ज्या तीन पद्धती आहेत त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) संयुक्तिक - कायदेशीर अधिकार (Rational Legal Authority) :

संयुक्तिक कायदेशीर अधिकारात दोन शब्द असून त्यांचा अर्थ जाणून घेणे जरूरीचे आहे. यातील पहिला शब्द हा 'संयुक्तिक' असून दुसरा शब्द 'कायदेशीर' हा आहे. संयुक्तिक (Rational) या शब्दाचा अर्थ आहे. बुद्धीप्रामाण्यवाद म्हणजे बुद्धीला जे पटते. जे वास्तव आहे तेच मान्य करणे. कायदेशीर याचा अर्थ समाजमान्य असे नियम वा अशी प्रमाणके 'संयुक्तिक कायदेशीर' या शब्दाचा एकत्रित अर्थ असा की बुद्धीप्रामाण्यवादावर आधारित अशी समाजमान्य नियमन वा प्रमाणकव्यवस्था होय. प्रा. हॅरी जॉन्सन यांच्या मतानुसार संयुक्तिक कायदेशीर अधिकारी व्यवस्थेत या तथ्यावर भरवसा ठेवला जातो की विशिष्ट कायदा हा काही ध्येये साध्य करण्यासाठी कमी – अधिक प्रमाणात उपयोगी पडू शकतो. कारण तो विशिष्ट कायदा मनुष्याने बुद्धीप्रामाण्यवादी दृष्टिकोणातून मानवाचे कल्याण साधण्यासाठी बनविला आहे. अशा कायद्याच्या आधाराने जे सरकार सत्तेवर येते त्यास संयुक्तिक कायदेशीर अधिकारवादी सरकार ही संज्ञा देता येते. भारताच्या राज्यघटनेचा, अमेरिकेच्या राज्य घटनेचा समावेश आपल्याला संयुक्तिक कायदेशीर व्यवस्थेत करता येईल. भारताची संसद आणि अमेरिकेचा अध्यक्ष यांची निवड त्या त्या देशाच्या घटनेतील तरतुदीनुसार होते. व त्यानंतरच संसदेत निवडून आलेल्या बहुमताचा

पक्ष व निवडून आलेला अध्यक्ष यांना सरकार बनवण्याचा अधिकार प्राप्त होतात व मग ते सरकार बनवितात. अशा प्रकारचे सरकार 'संयुक्तिक कायदेशीर अधिकार' प्राप्त झालेली शासनयंत्रणा असते.

२) परंपरावादी अधिकार (Traditionalistic Authority) :

राज्याची सत्ता व अधिकार हस्तगत करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे 'परंपरावाद होय' 'परंपरावादी अधिकार'. सैद्धांतिक दृष्टिने विचार करता फक्त परंपरांच्या पावित्र्यावर अवलंबून असते. हे परंपरावादी अधिकार धारण करणारा. मनुष्य आपल्या अधिकारासाठी अतिप्राचीन काळाचा किंवा पूर्वीचा संदर्भ देवून आपल्या आज्ञा पाळण्याचा हुकूम बजावतो. परंपरावादी अधिकारांच्या प्रकारावर चर्चा करताना प्रा. मॅक्स वेबर यांना त्यात पुढील वैशिष्ट्ये आढळली आहेत.

- ❖ नौकरशाहीवर आधारीत प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा अभाव
- ❖ अव्यैक्तिक कायद्यावर आधारीत सत्तेची किंवा अधिकाराची क्षेत्र निर्धारित करणारी सुस्पष्ट व्याख्या केली नाही.
- ❖ श्रेष्ठत्व – कनिष्ठत्व संबंधाबाबत बुद्धीप्रामाण्यवादी पद्धतीचा अभाव.
- ❖ दैनंदिन गरज म्हणून तांत्रिक शिक्षणाचा अभाव.

परंपरावादी सरकारचा प्रमुख अधिकारावर येण्याचा किंवा सत्ता ग्रहण करण्याचा सर्वसामान्य मार्ग म्हणजे आनुवंशिक वारसापरंपरा होय. काही वेळेला सत्ताधीश आपला वारस स्वत:च निवडतो व तो वारस हा प्रामुख्याने त्याच्या ३ मुलांपैकी एक असतो. सत्ताधारी काही वेळेला आपला वारस निवडतना वा नेमताना अन्य मार्गाचा पण अवलंब करतो. उदा. धार्मिक क्षेत्रात धर्मगुरू किंवा मठाधिपती आपला वारस नेमताना आपल्या एखाद्या प्रामाणिक सत्प्रवृत्त व ज्ञानी शिष्याला आपला वारस निवडतो. सर्व समाज त्यास मान्यता देतो. परंपरावादी अधिकाराला आव्हान देता येत नाही. कारण या अधिकाराचे मुळ समाजाच्या प्रथा व परंपरा यात असते. त्यामुळे परंपरावादी अधिकार प्राप्त झालेला प्रमुख आपल्या अज्ञांचे सर्व अनुयायांनी पालन करावे अशी अपेक्षा करतो. वास्तविकता: त्यांचे बरेचसे अधिकार हे प्रथा व परंपरा यांनी जरी निर्धारित केले जात असले तरी पारंपारीक क्षेत्रात या परंपरावाद्याचे वर्तन हे स्वेच्छाचारी वा जुलमी असते. परंपरावादी सत्ताधारी व्यक्तीची प्रतिष्ठा वाढविली जाते. ती ह्या श्रद्धेमुळे की तो कमी अधिक प्रमाणात पवित्र आहे. राजघराण्यातील लोकांचे रक्त हे सर्वसामान्य माणसाच्या रक्तापेक्षा अधिक शुद्ध व वेगळे असते. ही श्रद्धा आनुवंशिक सत्ताधीशाला अधिक प्रतिष्ठा तर प्राप्त करून देतातच शिवाय सत्ताधाऱ्याभोवती आनुवंशिक विभुतीमत्त्वाचे वलय निर्माण करतात.

३) विभुतीमत्त्वाचे अधिकार (Charismatic Authority) :

विभुतीमत्त्वाच्या अधिकाराच्या प्रकारात मुख्य भर हा प्रामुख्याने व्यक्तीत असलेल्या अद्वितीय अथवा कमीत कमी असामान्य गुणधर्मामुळे ती व्यक्ती तिच्यात विभुतीमत्त्वाचे अधिकार किंवा दैवी अधिकार असल्याची समज लोकांमध्ये पसरवून तिच्यातील विभुतीमत्त्वाची अथवा दैवीशक्ती लोकांना मान्य करण्यास लावते. इंग्रजी शब्द कॅरीझमा (Charisma) या शब्दाचे मराठीत रूपांतर करताना आपण 'विभुतीमत्त्व' अथवा 'दैवी' असा शब्दप्रयोग करतो. लॅटीन भाषेतील 'कॅरीझमा' (Charisma) या शब्दाचा अर्थ आहे. परंतु जर्मन समाजशास्त्रज्ञ आणि तत्त्व-वेत्ता प्रा. मॅक्स वेबर यांनी प्रथम तो शब्द समाजशास्त्रीय सिद्धांतात वापरला तो काही व्यक्तीत असलेल्या असामान्य किंवा विशेष गुणवत्ता यांचे निर्देशन करण्यासाठी वेबरच्या मते

धर्मगुरूप्रमाणेच काही राजकीय नेत्याजवळ असे असामान्य गुणधर्म असतात व त्यांच्यासाठी 'कॅरीझमाटिक ॲथॉरिटी' (Charismatic authority) हा शब्द वापरण्यात आला. विभुतीमत्वादी नेता किंवा दैवी नेता नेहमीच असा दावा करीत नाही की त्यांच्यात अमानवी, अती नैसर्गिक वा दैवी शक्तीचा वास आहे. परंतु तो हे मात्र मान्य करतो की व्यक्ती म्हणून त्याच्या जवळ असे काही असामान्य किंवा असाधारण गुणधर्म आहेत की ते त्याला सर्वसामान्यांपासून अलग करतात. नंतर तो अशी अपेक्षा करतो की त्याच्या या गुणधर्मामुळे लोकांनी त्याचे वर्चस्व मान्य करून त्याच्या आज्ञांचे पालन करावे. शुद्ध स्वरूपाचे अथवा शुद्ध प्रकारचे विभुतीमत्वाचे अधिकार हे क्रांतिकारी स्वरूपाचेच असतात. यापूर्वीच्या चर्चेत आपण हे पाहिले की विभुतीमत्वाचे अधिकार हे काहीवेळा संयुक्तिक कायदेशीर अधिकारी व्यवस्था आणि परंपरावादी अधिकार यातसुद्धा आढळतात. लोकशाही शासन हे संयुक्तिक कायदेशीर व्यवस्थेचे अपत्य. तेथे सर्वोच्च नेता हा निवडणुक प्रक्रियेद्वारा निवडला जातो. परंतु भारताचा विचार करता तेथे विभुतीमत्वादी नेतृत्त्व भारतीय लोकशाहीत वारंवार उदयाला आलेले दिसते. अजूनही भारतीय लोकांच्या मनात नेहरू-गांधी घराण्याबाबतचे 'दैवीवलय' कायम आहे आणि म्हणूनच कदाचित राजकारणाचा विशेष अनुभव नसलेल्या 'श्रीमती सोनिया गांधी' याची अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी वर्णी लावली गेली ती या घराण्याच्या वलयामुळेच तसेच राजसत्ताक राज्यपद्धतीद्वारे प्राप्त होणारे अधिकार हे प्रामुख्याने परंपरावादी अधिकार असतात. परंतु जेव्हा राजा हा स्वतःला परमेश्वराचा अवतार मानतो. परमेश्वरानेच त्याला पृथ्वीवर लोकांवर अधिकार गाजविण्यासाठी पाठविले असे मानतो. तेव्हा तो स्वतःला दैवी नेताच मानतो. प्रा. हॅरी जॉन्सन पुढे असे प्रतिपादन करतात की वास्तविकता खरे वा शुद्ध विभुतीमत्वाचे अधिकार हे असा दावा करतात की विभुतीमत्वाचे अधिकार प्रामुख्याने संयुक्तिक कायदेशीर अधिकार व परंपरावादी अधिकार यांच्या विरोधात असतात.

आपण पूर्वी पाहिले की शुद्ध प्रकारचे अधिकार हे क्रांतिकारी असतात. परंतु क्रांती (Revolution) ही संज्ञा काही प्रमाणात अस्पष्ट किंवा संदिग्ध स्वरूपाची आहे. आधुनिक इतिहासातील काही प्रमुख क्रांत्या -फ्रान्स, रशिया व नाझी या काही बाबतीत एकसारख्या आहेत व या प्रत्येक क्रांतिकारी चळवळीचा पहिला परिणाम हा ज्या समाजात क्रांती झाली. त्या समाजाच्या सामाजिक संरचनेत आप्तसंबंध व्यवस्थेत अर्थव्यवस्थेत धार्मिक संघटनात, वर्गसंरचनेत आप्तसंबंध व्यवस्थेत, अर्थव्यवस्थेत धार्मिक संघटनात वर्गसंरचनेत आणि अर्थातच शेवटी राजकीय व्यवस्थेत परिवर्तन झाले. या सर्व क्रांत्यांचा दुसरा परिणाम हा हे सर्व परिवर्तन समाजाच्या सामाजिक गतीमत्वाशी जोडले गेले. अनेक व्यक्ती की ज्यांना पूर्वी कनिष्ठ श्रेणी प्राप्त झालेली होती. त्यांना एकदम मोठी सत्ता आणि प्रतिष्ठा प्राप्त होऊन त्यांची श्रेणी उंचावली गेली. जर जे एके काळी सामाजिक श्रेष्ठता होती त्यांची त्या पदावरून उचलबांगडी होऊन ते कनिष्ठ दर्जात गेले. क्रांतीकारी चळवळीचा तिसरा परिणाम हा की क्रांतीकारी चळवळीमुळे जी काही परिवर्तने झाली ती हिंसाचाराशिवाय झाली नसून या हिंसाचाराचे रूपांतर कालांतराने नागरीयुद्धात झाल्याचे दाखले इतिहास देतो. क्रांतिकारी चळवळीचा चौथा व शेवटचा परिणाम असा की क्रांतीची बीजे जरी अतिप्राचीन काळात सापडत असली तरी क्रांतीचा कालावधी हा तिच्या तीव्रतेचा विचार करता, एक वा दोन वर्षापेक्षा कधीच जास्त नव्हता.

३.९ सारांश :-

मनुष्याचे राजकीय जीवन हे त्याच्या सामाजिक जीवनाचा एक भाग आहे. सोप्या शब्दात आपण आपले सामाजिक जीवन समाजाचा एक घटक आणि राज्याचा एक नागरीक अशा दुहेरी नात्याने जगत असतो. दैनंदिन अथवा व्यवहारीक जीवनात राज्य आणि समाज या दोहोंमधील वेगळेपण चटकन लक्षात येत नाही. परंतु अभ्यासाच्या स्तरावर किंवा विश्लेषणाच्या पातळीवर राज्य आणि समाज या दोन्ही स्वतंत्र व भिन्न अर्थाच्या संकल्पना ठरतात. राज्याचे कायदे, धोरण, निर्णय सर्वासाठी सक्तीचे असतात. या सर्वाचा प्रभाव त्याच राज्याचे नागरिक असणाऱ्या लोकांच्या सामाजिक जीवनावर पडतो. सोप्या शब्दात सामाजिक जीवनाच्या विभिन्न बाजू प्रभावित करण्याचे कार्य राज्याद्वारे होत असते. म्हणूनच सामाजिक जीवनाचे अध्ययन करणाऱ्या सर्वांनाच राज्यसंस्थेची ओळख करून घेणे आवश्यक ठरते असेही म्हणता येईल. इसवी सन पूर्व काळातील प्लेटो, ॲरिस्टॉटलपासुन आधुनिक काळातील मार्क्स, लास्कीपर्यंत विभिन्न विचारवंतांनी राज्याचा सामाजिक जीवनावर कोणता व किती प्रभाव पडतो याचेच वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे असेही म्हणता येईल. या संदर्भात इसवी सन पूर्व काळातील ॲरिस्टॉटलचे प्रसिद्ध विधान "मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे तसेच तो राजकीय प्राणी देखील आहे." असे नमूद करता येईल. विचारवंतांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांतूनच राज्यशास्त्र उदयास आले व विकसित झाले असेही म्हणता येते.

३.१० कठीण शब्द :-

१) विभुत्वमतवादी - वैचारिक
२) मुरड - आटोक्यात आणणे
३) सहिष्णुता - आपलेपणाची भावना
४) परार्थपरायण - इतरांना आपले मानणे
५) सार्वभौमत्व - स्वातंत्र्य
६) अधिकृतपणे - कायदेशीर
७) विशाल - मोठा
८) मौलिक - गुणवत्ता

३.११ अभ्यासाचे प्रश्न :-

१) राज्याचा अर्थ सांगा व राज्याच्या निर्मितीस आवश्यक असणारे घटक या विषयी माहिती सांगा.
२) राज्य व समाज यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.
३) कल्याणकारी राज्य ह्याविषयी माहिती द्या.
४) राज्याच्या अधिकाराचे स्वरूप स्पष्ट करा.

❖❖❖❖

३ ब

शासन संस्था

घटक रचना :

३.० उद्दिष्टये
३.१ प्रस्तावना
३.२ शासन संस्थेचा अर्थ

३.० उद्दिष्टये

१) शासनसंस्थेची मानवी समाजाला कशी गरज आहे याविषयी माहिती जाणून घेणे.
२) शासनसंस्थेचा सविस्तर अभ्यास करणे.
३) धर्म म्हणजे काय याचा अभ्यास करणे.
४) धर्माचे मानवी समाजाला किती महत्त्व आहे याचा अभ्यास करणे.
५) धर्म व्यक्तीसाठी की व्यक्ती धर्मासाठी याविषयी अध्ययन करणे.
६) धर्माचे महत्त्व व उद्दिष्टे यांचा अभ्यास करणे.

३.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

मनुष्याचे राजकीय जीवन हे त्याच्या सामाजिक जीवनाचा एक भाग आहे. सोप्या शब्दात आपण आपले सामाजिक जीवन समाजाचा एक घटक आणि राज्याचा एक नागरीक असा दुहेरी नात्याने जगत असतो. दैनंदिन अथवा व्यवहारिक जीवनात राज्य आणि समाज या दोघांमधील वेगळेपण चटकन लक्षात येत नाही परंतु अभ्यासाच्या स्तरावर किंवा विश्लेषणाच्या पातळीवर राज्य आणि समाज या दोन्ही स्वतंत्र व भिन्न अर्थाच्या संकल्पना ठरतात. राज्याचे कायदे, धोरण, निर्णय सर्वांसाठी सक्तीचे असतात. या सर्वांचा प्रभाव त्याच राज्याचे नागरीक असणाऱ्या लोकांच्या सामाजिक जीवनावर पडतो. सोप्या शब्दात सामाजिक जीवनाच्या विभिन्न बाजू प्रभावित करण्याचे कार्य राज्याद्वारे होत असते म्हणूनच सामाजिक जीवनाचे अध्ययन करणाऱ्या सर्वांनाच राज्यसंस्थेची ओळख करून घेणे ठरते असेही म्हणता येईल. इसवी सन पूर्व काळातील प्लेटो, ॲरिस्टॉटलपासून आधुनिक काळातील मार्क्स, लास्कीपर्यंत विभिन्न विचारवंतांनी राज्याचा सामाजिक जीवनावर कोणता, कसा व किती प्रभाव पडतो ? याचेच वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे असेही म्हणता येईल. या संदर्भात इसवी सन पूर्व काळातील ॲरिस्टॉटलचे प्रसिद्ध विधान 'मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे तसेच तो राजकीय प्राणी देखील आहे.' नमूद करता येईल. विचारवंतांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नातुनच राज्यशास्त्र उदयास आले व विकसित झाले असेही म्हणता येते.

पृथ्वीच्या पाठीवरील पहिले राज्य कोणते याचे निश्चित उत्तर देणे अवघड आहे. परंतु राज्य का व कसे निर्माण झाले याचे स्पष्टीकरण करणारे विविध सिद्धांत राजकीय विचारवंतांनी मांडले आहेत. राज्य ही मानवनिर्मित संस्था आहे. टोळी नगरराज्ये या क्रमाने राज्याचा विकास होऊन आधुनिक काळातील शक्तीशाली संस्था असणारे राज्य काळाच्या ओघात विकसित झाले. याबाबत विभिन्न राजकीय विचारवंतांमध्ये एकमत असल्याचे दिसून येते. राज्य हाच अध्ययनाचा विषय असणारे राज्यशास्त्र असतांनाही समाजशास्त्रात राज्याचा अभ्यास का केला जातो या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक ठरते.

३.२ शासन संस्थेचा अर्थ :-

शासनसंस्था किंवा सरकार राज्यांचा एक अत्यावश्यक घटक आहे. राज्याची इच्छा शासनसंस्थेद्वारेच व्यक्त होत असते. गार्नरने म्हटल्याप्रमाणे, "शासनसंस्था ही अशी एक संघटना आहे की, ज्याद्वारे राज्यच आपली इच्छा व्यक्त करते, आदेश देते आणि आपले कार्य पूर्ण करीत असते." थोडक्यात राज्याच्या इच्छेला मूर्त स्वरूप देण्याचे कार्य शासनसंस्था करीत असते. शासनाचे कार्य साधारणतः तीन विभागात विभागण्यात येते.

१) शासन विषयक २) विधिविषयक ३) न्यायविषयक

या तीन प्रकारच्या कार्यामुळे शासनाची तीन विभागात विभागणी करण्यात येते व प्रत्येकाकडे विशिष्ट प्रकारचे एक कार्य सोपविण्यात येते. शासनाचे हे तीन विभाग आणि त्यांच्याकडे सोपविलेली कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

विभाग	कार्ये
१) कार्यकारी मंडळ	१) शासन विषयक कार्ये
२) विधीमंडळ	२) विधिविषयक कार्ये
३) न्यायमंडळ	३) न्यायविषयक कार्ये
४) सनदी नोकरवर्ग	४) धोरण अंमलात आणण्याचे कार्ये

१) कार्यकारी मंडळ (Introduction) :

कार्यकारी मंडळ हा शासन संस्थेचा प्रमुख विभाग होय. कार्यकारी मंडळ विधीमंडळाने निश्चित केलेले धोरण कार्यक्रम तसेच विधिमंडळाने मंजूर केलेले कायदे अंमलात आणण्याचे कार्य करीत असते. साधारण भाषेते कार्यकारी मंडळालाच सरकार असे म्हणतात. कार्यकारी मंडळ म्हणजे राजकीय पदाधिकारी (राष्ट्रपती, मंत्रीमंडळ इत्यादी आणि कायम शासक वर्ग, परंतु कार्यकारी मंडळाकडे कार्य आणि प्रकार याचे स्पष्टीकरण करताना राष्ट्र प्रमुख व त्याचे मंत्रीमंडळ म्हणजे कार्यकारी मंडळ असा अर्थ घेतला जातो आणि अभ्यासाच्या दृष्टीने तोच अर्थ योग्य आहे.

कार्यकारी मंडळाचे प्रकार :

कार्यकारी मंडळाचे मुख्यतः दोन प्रकार पडतात.

१) एकल आणि अनेकात्मक (बदल) कार्यकारी मंडळ

२) नाममात्र आणि वास्तविक कार्यकारी मंडळ

एकल कार्यकारी मंडळ (Singular Executive) :

"जेव्हा राज्याची शासनविषयक सत्ता ही एका व्यक्तीच्या हाती सोपविलेली असते तसेच त्या सत्तेचा वापर तो स्वनिर्णयानुसार करीत असतो तेव्हा अशा कार्यकारी मंडळाला एकल कार्यकारी मंडळ असे म्हणतात." उदा. अमेरीकेचा राष्ट्रपती अमेरीकन राज्यघटनेने राष्ट्रपतीकडे सर्व शासनविषयक सत्ता सोपविल्या आहेत. तसेच या सर्व सत्तांचा वापर तो स्वतः करीत असतो. शासनाच्या सर्व कार्याबद्दल तो एकटाच जबाबदार असतो. एकल कार्यकारी मंडळ प्रशासकीय संचालन करण्यासाठी सर्वोत्तम होय, कारण यात सत्ता आणि जबाबदारी याचे स्थान निश्चित होत असल्यामुळे कार्य उत्तम प्रकारे होत असते. याशिवाय तात्काळ निर्णय घेण्यासाठीसुद्धा ही पद्धतीच सर्वोत्तम आहे.

गुण :-

१) **शीघ्र निर्णय -** या पद्धतीचा सर्वात महत्वाचा गुण म्हणजे या पद्धतीत सत्ता एकाच व्यक्तीच्या हाती असल्यामुळे ती व्यक्ती अनेक व्यक्तीच्या तुलनेत शीघ्र निर्णय घेत असते. परिणामतः तात्काळ निर्णय घेण्यासाठी ही पद्धती अतिशय उपयुक्त ठरते.

२) **जबाबदारीची निश्चिती -** या पद्धतीत शासनाचा प्रमुख एक व्यक्ती असल्यामुळे जबाबदारी स्पष्टपणे निश्चित करता येते. व त्याला शासकीय कार्याबद्दल जबाबदार धरता येते.

३) **आदेशाची एकता -** एकल पद्धतीत एकाच व्यक्तीकडून आज्ञा दिल्या जात असल्यामुळे कनिष्ठ अधिकारी त्याचे काटेकोरपणे पालन करतात. यामुळे प्रशासन हे कार्यक्षम तसेच प्रभावी ठरते.

४) **एकरूपता -** या पद्धतीत एकाच व्यक्तीद्वारे आज्ञा देण्यात येत असल्यामुळे प्रशासनात एकरूपता आणणे, सहज शक्य होते.

५) **उत्साह -** या पद्धतीत एकाच व्यक्तीवर संपूर्ण शासनाची जबाबदारी सोपवलेली असल्यामुळे त्यांच्या यशासाठी तो उत्साहाने कार्य करीत असतो. शासनाची प्रतिष्ठाही शासन प्रमुखावर आधारीत असल्यामुळे तो सर्व कार्यावर स्वतः देखरेख ठेवीत असतो.

दोष :-

१) **ज्ञान आणि अनुभवाचा अभाव -** शासनाचे कार्य हे अत्यंत गुंतागुंतीचे तसेच विविध प्रकारचे असल्यामुळे एका व्यक्तीकडून ते पूर्ण होण्याची अपेक्षा फारच कमी असते. तसेच त्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि अनुभव हा अनेक व्यक्तीच्या ज्ञान आणि अनुभवापेक्षा निश्चितच मर्यादित असतो.

२) **चूकीचे निर्णय घेण्याची शक्यता** – वर उल्लेख केल्याप्रमाणे शासन प्रमुखाचे ज्ञान आणि अनुभव मर्यादित असल्यामुळे चुकीचे निर्णय घेण्याची अधिक शक्यता असते. शासन प्रमुखाकडून झालेल्या चुकामुळे संपूर्ण राष्ट्राला अडचणींना तोंड द्यावे लागते.

३) **नियंत्रणामध्ये शिथिलता** – शासनप्रमुख म्हणून एकच व्यक्ती असल्यामुळे त्याला शासनाच्या सर्व कार्यावर आणि प्रशासकीय अधिकाऱ्यावर नियंत्रण ठेवता येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे नियंत्रणाचे क्षेत्र कमी असते. परिणामतः शिथिल नियंत्रणाचा परिणाम शासनविभागाच्या कार्यक्षमतेवर होतो.

४) **सत्तेचा दुरूपयोग -** एकल पद्धतीत एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता केंद्रीत झालेली असते. त्याने घेतलेल्या निर्णयावर वैधानिक तसेच नैतिक स्वरूपाचे असे कोणतेच बंधन नसल्यामुळे निसर्गत:च त्याच्या हातून सत्तेचा दुरूपयोग होत असतो.

५) **राजकीय प्रभाव -** या पद्धतीत सत्ता एकाच व्यक्तीच्या हाती असल्यामुळे या व्यक्तीचे निर्णय राजकीय प्रभावाने प्रेरीत झालेले असतात; कारण त्याला आपला राजकीय क्षेत्रातील प्रभाव वाढवयाचा असतो. असे निर्णय हे शासकीयदृष्ट्या चूकीचे असतात.

६) **अनेकात्मक कार्यकारी मंडळ -** कार्यकारी मंडळात दुसरा प्रकार म्हणजे अनेकात्मक कार्यकारी मंडळ या पद्धतीत "शासनाचा प्रमुख म्हणून एक व्यक्ती नसून काही सदस्यांचे एक मंडळ असते. या पद्धतीला सामुहीक अध्यक्षपद्धती असेही म्हणतात." या पद्धतीत अनेक व्यक्ती सामूहीकरीत्या शासनाची जबाबदारी पार पाडतात. कोणताही निर्णय हा सामूहीकरीत्या आणि परस्परांच्या सल्ल्याने घेतला जातो. अनेकात्मक कार्यकारी मंडळाचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे स्वित्झर्लंडचे 'फेडरल कौन्सिल' अर्थात सांघिक कार्यकारी मंडळ हे होय. स्विसमध्ये सर्व शासनविषयक सत्ता सात सदस्य असलेल्या मंडळाकडे सोपविलेली आहे.

अध्यक्षपद हे आलटून पालटून प्रत्येकाला एक वर्षासाठी देण्यात येत असल्यामुळे प्रत्येकालाच अध्यक्ष होण्याची संधी मिळते. अध्यक्ष हा राष्ट्राचे प्रतिनिधीत्व करीत असला तरी त्याला अमेरीकेच्या अध्यक्षाप्रमाणे वास्तविक सत्ता नाही. सर्व सत्ता ही सात सदस्य असलेल्या मंडळाच्या हाती असते. शासनासंबंधीचे सर्व निर्णय मंडळाचे सदस्य परस्परविचार विनिमयाने घेत असतात. रशियातील प्रेसिडियम हे सुद्धा अनेकात्मक कार्यकारी मंडळाचे उत्तम उदाहरण होय. प्रेसिडियम हे ३३ सदस्य असलेले कार्यकारी मंडळ होय.

गुण :-

१) **राजकीय प्रभावापासून मुक्त -** अनेकात्मक कार्यकारी मंडळ सर्व पक्षाना प्रतिनिधीत्व देण्यात येत असल्यामुळे ते राजकीय प्रभावापासुन मुक्त असते. मंडळ हे सर्वपक्षीय असल्यामुळे परिणामत: कोणत्याच पक्षाच्या प्रभावाने प्रेरित नसते व प्रत्येकजण आपले पक्षहीत सांभाळतो.

२) **विवादास्पद समस्या सोडविण्यासाठी उपयुक्तता -** ही पद्धती विवादास्पद समस्या सोडविण्यासाठी अतिशय उपयुक्त मानली जाते. कारण सर्व सदस्य परस्पर विचारविनिमयाने तसेच सामूहीकरित्या निर्णय होत असतात. शिवाय कोणत्याही एका व्यक्तीस दोषी धरता येत नसल्यामुळे तो निर्णयाप्रत पोहोचण्यास उपयुक्त असे विचार व्यक्त करीत असतो.

३) **ज्ञान आणि अनुभवाचा फायदा -** अनेकात्मक पद्धतीत सर्व सदस्य परस्परविचार विनिमयाने निर्णय होत असल्यामुळे प्रत्येकाच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा होत असतो. शासनाचे कार्य इतके गुंतागुंतीचे आणि जटील झाले आहे की, त्यासाठी विविध ज्ञानाची आणि अनुभवाची आवश्यकता असते.

४) **सत्तेचा योग्य प्रयोग -** वर स्पष्ट केल्याप्रमाणे निर्णय सामूदायिकरित्या घेतले जात असल्यामुळे ते निर्णय योग्य असतात. कोणतीही एक व्यक्ती सत्तेचा प्रयोग करू शकत नसल्यामुळे सत्तेचा दुरूपयोग या पद्धतीत होत नाही.

दोष :-

अनेकात्मक कार्यकारी मंडळात वरीलप्रमाणे गुण असले तरीसुद्धा ही पद्धती पूर्णपणे दोषरहीत नाही. साधारणतः या पद्धतीत खालील दोष आढळतात.

१) **जबाबदारीचा अभाव -** या पद्धतीत जबाबदारी कोणत्याही एका व्यक्तीवर निश्चित करता येत नाही. शासनसंबंधी ज्या चूका होतात त्याबाबत कोण दोषी आहे हे निश्चित करता येत नाही. मंडळातील प्रत्येक सदस्य हा दुसऱ्याला दोष देण्याचा प्रयत्न करतो.

२) **उत्साहाची कमतरता -** या पद्धतीत निर्णय घेतांना परस्पर-विरोधी विचाराना स्थान देण्यात येते, त्यामुळे कोणताही सदस्य अशा निर्णयाची अंमलबजावणी करण्यास उत्साह दाखवित नाही. परिणामतः शासकीय कार्यात शिथिलता येते. एकल कार्यकारी मंडळात निर्णय एकच व्यक्ती घेत असल्यामुळे, तो त्याची तत्परतेने अंमलबजावणी करीत असतो.

३) **निर्णयात विलंब -** या पद्धतीत निर्णय सर्व सदस्यांच्या सल्ल्याने तसेच संमतीने घ्यावयाचे असल्यामुळे निर्णय घेण्यास उशीर लागतो. शासनातील काही निर्णय असे असतात की ते तात्काळ घ्यावे लागतात. अन्यथा संपूर्ण राष्ट्राला संकट आणि अडचणींना तोंड द्यावे लागते. अनेकात्मक कार्यकारी मंडळ या दृष्टीने उपयुक्त ठरत नाही.

४) **आदेशांची एकता कायम राहत नाही -** शासन प्रमुख म्हणून अनेक व्यक्ती असल्यामुळे आदेशासंबंधी एकता कायम राहत नाही. कधी-कधी तर परस्परविरोधी आदेश दिले जातात. परिणामतः प्रशासन योग्य मार्गदर्शन आणि नियंत्रण या दोन्हीं गोष्टीना मुकते.

अशा प्रकारे एकल आणि अनेकात्मक कार्यकारी मंडळ या दोन्हींही गुणांबरोबर दोष आहेत. प्रत्येक देशाची राजकीय आणि सामाजिक स्थिती लक्षात घेऊन कार्यकारी मंडळ हे एकल असावे की, अनेकात्मक हे ठरवावे लागेल.

२) नाममात्र आणि वास्तविक कार्यकारी मंडळ –

शासनाची सत्ता ही किती व्यक्तीच्या हातात आहे. यावरून कार्यकारी मंडळाची एकल अनेकात्मक कार्यकारी मंडळ असे दोन प्रकारात वर्गीकरण करण्यात येते. कार्यकारी मंडळाच्या वर्गीकरणाचा दुसरा आधार म्हणजे शासनविषयक सत्तेचा वापर प्रत्यक्षात कोण करीत असतो. सत्तेच्या वापरावरून कार्यकारी मंडळाचे नाममात्र आणि वास्तविक कार्यकारी मंडळ असे दोन प्रकार पडतात.

१) नाममात्र कार्यकारी मंडळ (Nominal Executive) :

साधारणतः राष्ट्रप्रमुख हा कार्यकारी मंडळाचा प्रमुख असतो. परंतु त्याला प्राप्त झालेल्या सत्तावरून तो नाममात्र शासक आहे की, वास्तविक शासक आहे हे निश्चित केले जाते. उदा. इंग्लंडचा राजा किंवा भारताचा राष्ट्रपती हे राष्ट्रप्रमुख तसेच शासनप्रमुख आहे. परंतु दोन्ही राष्ट्रप्रमुखाची सत्ता ही नाममात्र स्वरूपाची आहे. हे दोन्हीही प्रमुख शासनविषयक सत्तेचा उपयोग निर्णयानुसार किंवा विवेकानुसार करीत नाहीत त्यांनी घेतलेले सर्व निर्णय हे मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने किंवा मंत्रीमंडळाने घेतलेले असतात. राज्याची सार्वभौम सत्ता ही मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने किंवा मंत्रीमंडळाने घेतलेले असतात. राज्याची सार्वभौम सत्ता ही मंत्रीमंडळाच्या हातात असल्यामुळे इंग्लंडचा राजा किंवा भारताचा राष्ट्रपती यांना नाममात्र कार्यकारी मंडळ जे राज्याच्या सार्वभौम सत्तेचा वापर स्वनिर्णयानुसार करीत नसून अन्य व्यक्तीच्या सल्ल्याने करीत असतो.

❖❖❖❖

४ अ

कुटुंब संस्था
(FAMILY INSTITUTION)

घटक रचना :

४.० उद्दिष्टये
४.१ प्रस्तावना
४.२ कुटुंब संस्थेची वैशिष्ट्ये
४.३ कुटुंब संस्थेची कार्ये
४.४ कुटुंबाचे प्रकार
४.५ पितृसत्ताक संयुक्त कुटुंबाची वैशिष्ट्ये
४.६ कुटुब संस्थेचे बदलते स्वरुप
४.७ सारांश
४.८ कठीण शब्द
४.९ अभ्यासाचे प्रश्न

४.० उद्दिष्ट्ये

१) कुटुंब म्हणजे काय आणि कुटुंब संस्थेविषयी अध्ययन करणे.
२) कुटुंब संस्था मानवासाठी कशी महत्त्वाची आहे हे जाणून घेणे.
३) कुटुंब संस्थेची निर्मीती का व कशासाठी झाली याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातुन अभ्यास करण्यासाठी.
४) कुटुंबाच्या प्रकाराविषयी अभ्यास करण्यासाठी.
५) कुटुंब संस्थेचे महत्त्व जाणून घेण्यासाठी.
६) कुटुंब संस्थेच्या बदलत्या स्वरूपाविषयी अध्ययन करण्यासाठी.

४.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

सर्व सामाजिक समुहात कुटुंब एक मुलभुत व प्राथमिक स्वरूपाचा सामाजिक समूह आहे. इतर कोणत्याही समुहापेक्षा कुटुंब सर्वव्यापक स्वरूपाचे आहे. मानव विकासाच्या सर्व अवस्थांत जसे कुटुंब आढळून येते तसेच कुटुंबाचे अस्तित्व सर्व समाजात दिसून येते. मानव समाजाच्या विकासाची पहिली अवस्था म्हणजे कुटुंब होय. कुटुंबनिर्मीतीमुळे समाजातील सातत्य व स्थैर्य टिकून राहिले. कुटुंबसंस्थेच्या अभावाने हे सातत्य व निरंतरता अश्यक्य होती. म्हणूनच मानवी

समाजात कुटुंबाचे हे स्थान महत्त्वपूर्ण आहे. प्रगत वा अविकसीत समाजातील कुटुंबाची वैशिष्ट्ये लक्षात घेतली पाहिजेत.

कुटुंबाला इंग्लिशमध्ये Family असे म्हणतात. Family हा शब्द famalus या लॅटीन शब्दापासुन बनला आहे. famalus हा असा समूह की ज्यात माता-पिता त्यांची मुले व त्यांचे नोकर चाकर व गुलाम यांचा समावेश होतो. जर्मनी व फ्रान्समध्ये कुटुंबाची व्याख्या याप्रमाणे केली जात असे. पण इतर देशात कुटुंब या समूहात माता-पिता व मुले यांचाच केवळ अंतर्भाव केला जातो. कारण कुटुंबात आप्तसंबंधाच्या बंधनाला महत्त्व आहे. किंबहुना आप्तसंबंध हाच कुटुंबाचा एकमेव आधार आहे. त्यामुळे माता-पिता व त्याची मुले यांच्यामध्ये रक्ताचे नाते असल्याने या सर्वांचा मिळून जो समूह तयार होतो यालाच कुटुंब असे म्हणतात.

कुटुंब म्हणजे काय? अधिक स्पष्ट होण्यासाठी काही समाजशास्त्रज्ञाच्या व्याख्या अभ्यासणे गरजेचे ठरते.

१) **मॅकायव्हर व पेज :-**

"प्रजोत्पादन व बालसंवर्धन करण्यासाठी पुरेसा लहान व कायम स्वरूपाच्या लैंगिक संबंधावर आधारलेला असा समूह म्हणजे कुटुंब होय."

२) **डॉ. डी. एन. मुजुमदार :–**

"एकाच घरात राहणाऱ्या एकमेकाशी रक्तसंबंधित असणाऱ्या व स्थान, हित व परस्परांविषयीच्या कर्तव्याची जाणीव याबद्दल जागरूक असणाऱ्या व्यक्तीच्या समुहाला कुटुंब म्हणतात." अशी व्याख्या मुजुमदार यांनी केली आहे.

३) **रॉबर्ट लुई** यांनी कुटुंबाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

"कुटुंब हा विवाहावर आधारलेला सामाजिक समूह आहे. या समूहात माता-पिता व त्यांची मुले यांचा समावेश होतो."

४) **किंबाल यंग :–**

"ज्या समुहात एक किंवा अधिक पुरूष आपल्या एक किंवा अधिक स्त्रिया व आपल्या अगर दत्तक घेतलेल्या मुलांसहित मुले लहान असेतोपर्यंत तरी एकाच घरी राहतात अशा सामाजिक समूहाला कुटुंब म्हणतात."

वरील व्याख्यावरून कुटुंबसंस्थेची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये स्पष्टपणे दिसून येतात. मानवसमाजाच्या विविध अवस्थांत आढळून येणाऱ्या सर्व प्रकारच्या कुटुंबात काही समान वैशिष्ट्य आढळतात. प्रगत अगर अप्रगत अशा समाजातील कुटुंबाची ही वैशिष्ट्ये सार्वत्रिक आहेत. ती वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

४.२ कुटुंबसंस्थेची वैशिष्ट्ये

१) विवाह - बंधन :–

कुटुंबसंस्थेचे हे प्रमुख लक्षण आहे. स्त्री-पुरूषाच्या विवाहबंधनातुनच कुटुंबसंस्था उदयास येते. या विवाह बंधनाला समाजमान्यता असते. हे विवाहबंधन, दिर्घकाल टिकणारे, कायमचे अगर अल्पजीवीही असते. पतिपत्नीपैकी कोणाही एकाच्या मृत्यूने हे विवाहबंधन जसे संपुष्टात येते तसेच बुद्धिपुर:सर घेतलेल्या घटस्फोटानेही संपते.

२) आप्तसंबंध :–

कुटुंबातील सर्व व्यक्तीचे एकमेकांशी रक्तसंबंध असतात. हे रक्ताचे संबंधच कुटुंबीयांच्या नात्यातील आधार असतात. आईबाप व मुले यांच्यामध्ये जसे रक्ताचे संबंध असतात तसेच आईबापांची ज्या व्यक्तीशी रक्ताची नाती असतात त्या लोकांशीसुद्धा अभावितपणे मुलांचेही रक्तसंबंध प्रस्थापित होतात. म्हणजेच, एकाच कुटुंबातील व्यक्ती दत्तकमुलाचा अपवाद वगळता एकाच रक्तगटातील असतात.

३) द्विपक्षीय स्वरूप :–

कुटुंबात माता-पिता या दोघांचा समावेश असतो. त्यांच्याविना कुटुंबसंस्था अस्तित्वात येणे शक्य नाही. त्याचबरोबर कुटुंबाचे सातत्यही टिकून राहणार नाही. इतकेचं नव्हे तर कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे आई व वडील या दोहोच्या आप्तसंबंधीयांशी नाते प्रस्थापित होते. म्हणूनच कुटुंबाचे स्वरूप हे द्विपक्षीय असते.

४) समान निवासस्थान :–

एकाच कुटुंबातील सर्व व्यक्ती एकाच घरात राहतात. माता-पिता व त्याची मुले एके ठिकाणीच राहत असल्याने समान निवासस्थान हे कुटुंबाचे वैशिष्ट्य ठरते. पितृस्थानीय कुटुंबात विवाहानंतर प्रौढ मुलगी आपल्या पतीच्या घरी जशी नांदावयास जाते. तसेच मातृस्थानीय कुटुंबात विवाहानंतर प्रौढ मुलगा आपल्या पत्नीच्या घरी जातो. अशा कुटुंबातुन सुद्धा माता-पिता व त्याची मुले यांचे निवासस्थान एकच असते. हिंदू समाजातील संयुक्त कुटुंबपद्धतीत कुटुंबातील तीन पिढ्या एकत्रच राहत असतात.

५) वंश परंपरा पद्धती :–

मुलाचा रक्तसंबंध हा जरी त्याच्या माता-पित्याशी असला तरीसुद्धा मुलांची वंशपरंपरा मातेमार्फत किंवा पित्यामार्फत ठरविली जाते. मातृवंशीय कुटुंबात मुलांची वंशपरंपरा मातेमार्फत निश्चित केली जाते. कुटुंबात मालमत्तेचा व पदाचा अधिकार आईकडून मुलाकडे येता तर पितृवंशीय कुटुंबात हे अधिकार पित्याकडून मुलाकडे आलेले असतात.

६) आर्थिक व्यवस्था :–

माता-पिता व त्यांची मुले हे सर्व एकत्रच राहत असतात. या सर्व कुटुंबीयाच्या चरितार्थांचा व पालनपोषणाचा आर्थिक प्रश्न महत्त्वाचा असतो. कुटुंबप्रमुखाला सर्व कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाची काळजी घ्यावी लागते. कुटुंबप्रमुखाच्या या महत्त्वाच्या आर्थिक कार्यात प्रत्येक

जण आपापल्यापरीने कुटुंबप्रमुखाला साहाय्य करीत असतो. त्यामुळेच मरडॉक यांनी कुटुंबातील आर्थिक सहकार्याला महत्त्व दिले आहे.

वर नमुद केलेल्या वैशिष्ट्यावरून कुटुंबसंघटनेचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट होते. म्हणूनच मॅकायव्हर व पेज म्हणतात, "समाजातील कोणत्याही लहानमोठ्या संघटनेची सामाजिक महत्त्वाच्या दृष्टीने कुटुंबसंघटनेशी तुलनाच होऊ शकत नाही. अनेक रीतीने कुटुंबाचा समाजावर प्रभाव पडत असतो. कुटुंबसंघटनेतील बदलांचा आविष्कार समाजरचनेत दिसून येतो."

४.३ कुटुंब संस्थेची कार्य

कुटुंबसंस्थेचे समाजातील अनन्यसाधारण महत्त्व हे कुटुंबसंस्थेच्या कार्यावरच ठरले गेले आहे. त्याशिवाय या संस्थेस समाजात एवढे महत्त्व लाभले नसते. अर्थातच या कार्याच्या स्वरूपात कालमानाप्रमाणे बदल होत चालला आहे, हे खरे प्राचीन कुटुंबाची कार्य अर्वाचीन कालात इतर संस्थांकडे सोपवली आहेत. तरीसुद्धा कुटुंबाच्या मुलभुत स्वरूपाच्या कार्यात बदल झालेला दिसून येत नाही.

१) कुटुंबाची जैविक कार्ये :-

मानवाची कामतृप्ती ही मानवाची गरज आहे. ही कामतृप्ती कुटुंबसंस्थेमार्फतच होत असते. कुटुंबसंस्थेच्या या प्रमुख उद्दिष्टाला समाजमान्यता लाभलेली असते. लैंगिक संबंधावर आधारीत असलेल्या कुटुंबात प्रजोत्पादन होत असते. समाजाचे अस्तित्व टिकविण्याच्या व समाजाचे सातत्य टिकविण्याच्या दृष्टिकोनातून हे कार्य अत्यंत जरूरीचे आहे. वंशसातत्याचे हे महत्त्व असल्याने हिंदू धर्मात वंशसातत्याला पितृऋण फेडणे असे म्हणतात. कोणत्याही समाजाच्या अस्तित्वासाठी हे कार्ये अनिवार्य आहे. आजच्या विज्ञान युगात प्रयोगशाळामध्ये प्रजावृद्धी होणे असले तरीसुद्धा कुटुंबसंस्थेच्या या कार्याचे महत्त्व कमी झाले नाही. प्रजोत्पत्ती हे नुसतेच कार्ये कुटुंबाचे असते तर कुटुंबसंस्थेला इतके महत्त्व लाभले नसते. प्रयोगशाळेतील प्रजावृद्धीवरून ही बाब अगदी स्पष्ट होते. मुलांचे पालनपोषण हे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. कारण मानवी मुल पालनपोषणासाठी दिर्घकाळापर्यंत इतरांवर अवलंबून असते. मुलांचे पालन पोषण करण्यासाठी इतर अनेक संस्था जाणीवपूर्वक आजच्या युगात निर्माण करून सुद्धा कुटुंबसंस्था करत असलेल्या पालनपोषणाची सर या संस्थांना लाभत नाही. शिशुअवस्थेचा दिर्घकाळ व त्यामुळे वात्सल्ययुक्त पालनपोषणाची जरूरी याचा मानवी विकासाच्या दृष्टीने विचार करता कुटुंबाचे महत्त्व स्पष्ट होते.

२) मनोवैज्ञानिक कार्ये :-

व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास सर्व दृष्टीनी व खऱ्या अर्थाने होण्यासाठी कुटुंबाचे हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला मानसिक समाधान व सुरक्षिततेची भावना वाटली पाहिजे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे एकमेकांवर असणारे प्रेम, सहानुभूती, आदर यामुळेच त्यांना फार मोठे मानसिक समाधान मिळत असते. याच्यामुळेच जीवनातील व्यावहारिक कठोर समस्यांचा विसर पडून कुटुंबीय जीवन व्यवस्थितपणे जगु शकतात. व्यावहारिक समस्यांनी व्यग्र झालेल्या मानवी मनाला कुटुंबामुळेच फार मोठा आराम व दिलासा मिळत असतो.

बालगुन्हेगारीचा प्रभाव अशाच समाजात आढळून येतो की जेथे या मानसिक सुरक्षिततेचा अभाव आहे. त्याचबरोबर कुटुंबातच मुल समाजाच्या रूढी परंपरा, चालीरीती इत्यादी शिकत असते. त्यामुळे मुलाचे मानवीकरण कुटुंबातच घडून येत असते. म्हणूनच सामाजिक मानसशास्त्रज्ञ व्यक्तिमत्त्वाच्या विकसनात कुटुंबालाच महत्त्व देतात.

३) आर्थिक कार्ये :-

कुटुंबाचे आर्थिक कार्ये तितकेच महत्त्वाचे आहे. प्राचीन कालापासून कुटुंबाचे हे आर्थिक कार्य अखंडितपणे चालू आहे. औद्योगिक क्रांतीपूर्वी तर कुटुंब हा एक आर्थिक दृष्टिने स्वयंपूर्ण घटक होता. आर्थिक उत्पादनापासून ते व्यावसायिक शिक्षणापर्यंतच्या सर्व क्रिया कुटुंबच करीत असे. कुटुंबियांतील श्रमविभाजन, संपत्ती विभाजन इत्यादीची जबाबदारी कुटुंबच घेते. आजसुद्धा आर्थिक क्रियांचे संपादन करणे कुटुंबाला जरूरीचे आहे.

४) सामाजिक कार्ये :-

प्रत्येक कुटुंबाला समाजात एक निश्चित स्थान असते. त्याप्रमाणे कुटुंबियांना समाजात स्थान किंवा दर्जा मिळत असतो. अजुनही काही समाजात कुटुंबाचा परंपरागत व्यवसाय कुटुंबियांना करावा लागतो. व्यवसायनिवडीचे स्वातंत्र्य त्यांना नसते. आधुनिक काळात कुटुंबियांना हे स्वातंत्र्य जरी मिळत असले, तरीसुद्धा व्यक्तीना मिळणारा दर्जा हा त्यांच्या कुटुंबाच्या दर्जावर अवलंबून असतो. हे नाकारून चालणार नाही. त्याचबरोबर कुटुंबाची सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टिकोनातून विचार करता कुटुंब हे सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन असल्याचे दिसुन येते. कुटुंबातील परंपरा, रूढी झुगारून टाकण्याचे धाडस व्यक्तीला सहजासहजी होत नाही. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनातील सामाजिक महत्त्वाच्या घटनांवर कुटुंबाचे पूर्ण नियंत्रण असते. कुटुंब हे जसे सामाजिक नियंत्रणाचे साधन आहे तसेच समाजाची संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नेण्याचे कुटुंब हे प्रभावी व परिणामकारक साधन आहे.

वरील महत्त्वाच्या कार्याचा विचार करता कुटुंबाचे समाजातील अनन्यसाधारण स्थान स्पष्ट होते. मानवी विकासाची सुरूवात कुटुंबातच होऊ शकते. व्यक्तीचे मानवीकरण व व्यक्तीचा पूर्ण विकास कुटुंबामुळेच होतो. ही प्रस्थापित झालेली वस्तुस्थिती आहे. जैविक व सामाजिक कार्याच्या दृष्टिकोनातून तर कुटुंबाचे महत्त्व वाढतच आहे. म्हणजेच कुटुंबसंस्थेचे स्वरूप जरी बदलत असले तरीसुद्धा कुटुंबसंस्थेचे महत्त्व कमी होत नाही.

४.४ कुटुंबाचे प्रकार

प्रस्तावना - (Introduction)

कुटुंबसंस्थेचे स्वरूप बदलत चालले आहे. इतकेच नव्हे तर सर्व समाजात कुटुंबाचे एकच स्वरूप आढळत नाही. भिन्न भिन्न समाजात कुटुंबात भिन्न भिन्न प्रकार अस्तित्वात असल्याचे दिसुन येते. कुटुंबाच्या प्रत्येक प्रकाराचे वैशिष्ट्ये वेगळे असते. या प्रत्येक प्रकारचे निकषसुद्धा वेगळे असल्याचे दिसते. काही समाजात कुटुंबात माता-पिता व त्यांची मुले एकत्र राहिल्यांचे चित्र दिसते, तर काही समाजात तीन पिढ्या एकत्र असल्याचे चित्र दिसते. काही कुटुंब पितृसत्ताक तर काही मातृसत्ताक आढळतात. थोडक्यात कुटुंबाचे वर्गीकरण कुटुंबातील सदस्यांच्या संस्थेवरून किंवा कुटुंबाची सत्ता कोणत्या व्यक्तीकडे सदस्यांच्या संस्थेवरून किंवा कुटुंबाची सत्ता कोणत्या व्यक्तीकडे केंद्रीत झालेली असते यावरून करता येते.

कुटुंबातील सदस्यांच्या संख्येवरून कुटुंबाचे दोन प्रकार पडतात.

१) विभक्त कुटुंब (Nuclear or elementary family)

२) संयुक्त कुटुंब (Joint family)

केंद्र कुटुंब किंवा प्राथमिक कुटुंब :-

विभक्त कुटुंबात माता-पिता व त्यांची मुले एकत्र राहत असतात. अशा प्रकारचे कुटुंब हे जवळ जवळ सर्व समाजात आढळून येते. कुटुंबाचे हे सर्वात लहान प्रकार होय.

संयुक्त कुटुंब :-

संयुक्त कुटुंबात तीन पिढ्यांपर्यंतचे सदस्य एकत्र राहतात व आपली उपजीविका समान मालमत्तेवर करतात. संयुक्त कुटुंबातील विवाहीत मुले स्वतंत्र बिऱ्हाड न करता आपल्या पत्नीसह त्याच कुटुंबात राहतात.

कुटुंबाची औपचारिक सत्ता, निवासस्थान या आधारावर कुटुंबाचे दोन प्रकार पडतात.

१) पितृसत्ताक कुटुंब २) मातृसत्ताक कुटुंब

१) पितृसत्ताक कुटुंब :-

या कुटुंबात औपचारीक सत्ता पित्याकडे असते. तोच कुटुंबप्रमुख असतो. पित्यामार्फतच पुरूषक्रमाने वंशपरंपरा निश्चित केली जाते. मालमत्ता व अधिकारसुद्धा पित्याकडून मुलाकडे जातो. अशा कुटुंबात पितृस्थानीय निवासपद्धती असते.

२) मातृसत्ताक कुटुंब :-

या कुटुंबात मातेकडे सर्व सत्ता असते. पित्याचे स्थान या कुटुंबात कायदेशीर दृष्टिने गौण असते. वंशपरंपरा मातेमार्फतच स्त्रीक्रमाने निश्चित होते. मालमत्तेचा व अधिकाराचा वारसा मुलीकडेच येतो. अशा कुटुंबात मातृस्थानीय निवास-पद्धती असते.

कुटुंबातील पति-पत्नीच्या विवाह स्वरूपावरून एकविवाही कुटुंब व बहुविवाहकुटुंब असे प्रकार आढळतात. एकविवाही कुटुंबात पति-पत्नी व त्यांची मुले एकत्र राहतात. बहुविवाही कुटुंबाचे १) बहुपत्नी कुटुंब व २) बहुपती कुटुंब असे दोन प्रकार पडतात.

प्रा. रिव्हर्स यांनी कुटुंबाचे चार प्रकार केले आहेत. १) कुल (Clan) २) मातृस्थानीय कुटुंब (Matrilocal famiy) ३) पितृस्थानीय कुटुंब (Patrilocal famiy) ४) विभक्त कुटुंब (Individual family) काही समाजशास्त्रज्ञांच्या मते कुटुंबाचे उपरिनिर्दिष्ट चार प्रकार म्हणजे मानव समाजाच्या उत्क्रांतीचे चार प्रमुख टप्पे आहेत. मानवसमाजातील कुलप्रकारात मूळ पूर्वजापासून आपली वंशपरंपरा समान आहे असे मानणाऱ्या व्यक्तीचा एकपक्षीय आप्तसंबंधितांचा विस्तृत केलेला समूह असतो. या अवस्थेत माणूस शिकार व अन्नसंकलन या साधनावर निर्वाह करीत होता. मातृस्थानिक कुटुंब शेतीची व पशुपालनाची सुरूवात दर्शविते. पितृस्थानिक कुटुंब नांगर व जनावरे यांच्या साहाय्याने केलेली प्रगत शेती अवस्था दर्शविते, तर विभक्त कुटुंबाने अर्वाचीन औद्योगिक अर्थव्यवस्था दर्शविली जाते. भारतीय ग्रामीण समाजात हे कुटुंबाचे चारही प्रकार कमी जास्त प्रमाणात आढळून येतात. फुलाचे अवशेष जसे दृष्टोत्पत्तीस येतात, तसेच कुटुंबाचे इतर प्रकारही दिसतात. भारतीय समाज विकासातील सर्व टप्प्यांचे पुरावे भारतीय ग्रामीण समाजात उपलब्ध होतात. पण तरीसुद्धा भारतीय ग्रामीण समाजात पितृसत्ताक संयुक्त

कुटुंब हा प्रकार बहुतांशाने आढळून येतो. सर्व कुटुंबियांचे एकमेकांचे नाते घनिष्ठ स्वरूपाचे असते. एकत्र निवास व सामाईक संपत्ती या भौतिक बाबींपेक्षाही सर्व कुटुंबियातील एकरूपता हे संयुक्त कुटुंबपद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. जवळ-जवळ तीन पिढ्यांचे वास्तव्य एके ठिकाणी असल्याने या कुटुंबाचा आकारही मोठा असतो. समान निवासस्थान या वैशिष्ट्याला कै. डॉ. सौ. इरावती कर्वे यांनी विशेष महत्त्व दिले आहे. संयुक्त कुटुंब प्रकारात सर्व कुटुंबियांच्यात जिव्हाळा व आत्मीयता आढळते, याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांचे एकत्र राहणे होय. एवढेच नव्हे तर उत्पादन साधनावरील सामाईक मालकी व त्याचा सामाईक उपभोग हे याच स्वरूपाच्या कुटुंबात आढळून येते. या मोठ्या सामूहिक संघटनेचा विश्वस्त म्हणजे कुटुंबप्रमुख किंवा कर्ता पुरूष असतो. भारतीय ग्रामीण समाजात पितृसत्ताक संयुक्त कुटुंबाचे प्राबल्य दिसुन येते. वर उद्धृत केलेली कुटुंबाची वैशिष्ट्ये भारतीय ग्रामीण समाजात आढळतात म्हणूनच या पितृसत्ताक संयुक्त कुटुंबाची सर्व वैशिष्ट्ये विस्तृतरीत्या विचारात घेतली पाहिजेत. ही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

४.५ पितृसत्ताक संयुक्त कुटुंबाची वैशिष्ट्ये :-

१) एकजिनसीपणाचे प्राबल्य :-

ग्रामीण पितृसत्ताक संयुक्त कुटुंब हे जास्त एकजिनसी, स्थिर व सुसंघटीत दिसून येते. याचे कारण म्हणजे सर्व व्यक्तींमध्ये आपलेपणा व कर्तव्यपरायणता आढळते. त्याचमुळे त्यांच्यात विलक्षण संसक्ती (cohesion) प्रस्थापित होते. संयुक्त कुटुंबात अनेक सदस्यांची संख्या जास्त असतेच, पण त्याचबरोबर वय, लिंग, प्रवृत्ती याबाबत भिन्नताही असते. पण एकमेकांतील सहकार्य, प्रेम व परस्परांबद्दल आदर यामुळे त्यांच्यात भावबंध निर्माण झालेले असतात. याचाच परिणाम म्हणजे कौटुंबिक संघटन प्रभावीपणे आकार घेते. व्यक्तीचे जीवन पुष्कळ अंशी कुटुंबाभिमुखच असते.

बदलती आर्थिक व सामाजिक रचना आणि सामाजिक मूल्ये औद्योगिकरण इत्यादींचा प्रभाव आजच्या ग्रामीण कुटुंबावर पडत आहेत. तरीसुद्धा भारतीय खेडे म्हणजे अशा कुटुंबाचा समुच्चयच वाटतो. अशा तऱ्हेचे दृश्य नागरी कुटुंबात अगदीच विरळ नागरी कुटुंबाचा आकार झपाट्याने कमी होत आहे. विभक्त कुटुंबाची संख्या वाढती आहे.

२) शेती या एकाच व्यवसायावर कुटुंबाची रचना :-

हे ग्रामीण पितृसत्ताक संयुक्त कुटुंबाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. भारतीय वैदिक काळापासुन शेती हाच लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. एवढेच नव्हे तर सर्व कुटुंबियांचा व्यवसाय शेतीच आहे. शेती हेच सर्वांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. याच व्यवसायात सारेजण गुंतलेले असतात. शेतीच्या सर्व कामाचे विभाजन केलेले असते. कुटुंबाचा कर्ता सर्व कुटुंबियांनी करावयाची कामे ठरवून देतो. तरीपण या समान व्यवसायामुळे सर्वजण एकमेकाच्या सहवासात राहत असताना सर्वांच्या मालकीच्या जमिनीवर कुटुंबप्रमुखाच्या आदेशाप्रमाणे सर्वजण सतत काम करीत असतात. सर्वांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण या समान व्यवसायाने होत असते. त्यामुळे असे म्हणता येईल की, "समान जमीन, समान घर, समान आर्थिक कार्ये व समान आप्तसंबंध यामुळेच ग्रामीण कुटुंब आकारित होते."

३) ग्रामीण कुटुंबात शिस्तीची व अवलंबनाची भावना तीव्रपणे दिसून येते :-

प्रत्येक कुटुंबियांचा व्यवसाय एकत्र असल्याने सहजीवन हाच त्यांच्या जीवनाचा आधार असतो. प्रत्येकाला सुख व स्वास्थ्य हे सहजीवनाचे मिळत असते. त्यामुळे आपल्या शक्तीप्रमाणे कुटुंबसंपत्तीत भर घालणे प्रत्येकाला अगत्याचे वाटत असते. साहजिकच ग्रामीण कुटुंबात एकोप्याच्या व शिस्तबद्ध जीवनाचे दर्शन घडत असते.

ग्रामीण कुटुंबात अवलंबनाची भावना तीव्रपणे दिसून येते. याचे एक प्रमुख कारण म्हणजे कुटुंबियांच्या सर्व गरजा कुटुंबाकडूनच पूर्ण केल्या जातात. ग्रामीण कुटुंबाला या गरजांविषयी गंभीरपणे विचार करावाच लागतो. सर्व कुटुंबियांना रूढी पंरपरा, लोकाचार, वर्तनाचे आदर्श यांसंबंधीचे शिक्षण देणे, कुटुंबियांच्या आजारपणात त्यांची शुश्रूषा करणे, औषधपाणी करणे इत्यादी महत्त्वाची कामे कुटुंबालाच करावी लागतात. इतकेच नव्हे तर कुटुंबियांच्या मनोरंजनाची व्यवस्था कुटुंबालाच करावी लागते. ही सर्व कार्ये ग्रामीण कुटुंबाला करावी लागतात, याचे कारण ग्रामीण समाजात ही सर्व कामे स्वतंत्रपणे करणाऱ्या संस्था आढळून येत नाहीत. नागरी समाजात स्वतंत्र शिक्षणसंस्था, दवाखाने, मनोरंजनाची केंद्रे असल्याने कुटुंबियांना या मुलभूत गरजांसाठी आपल्या कुटुंबावर इतके अवलंबून राहावे लागत नाही. त्यामुळे ग्रामीण कुटुंबात अवलंबनाची भावना जेवढ्या तीव्रपणे दिसून येते. तेवढ्या प्रमाणात नागरी कुटुंबात आढळून येत नाही.

४) सर्व कुटुंबियांना कुटुंबाबद्दल अभिमान वाटत असतो :-

ग्रामीण कुटुंबात प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरजापूर्तीसाठी कुटुंबावरच अवलंबून राहावे लागत असते. त्यामुळे कुटुंबातील सर्व आबालवृद्धावरच कुटुंबाचा विलक्षण प्रभाव पडलेला असतो. त्याचमुळे कुटुंबाबद्दलचा विलक्षण अभिमान व प्रेम कुटुंबियांमध्ये दिसून येतो. सर्व कुटुंबियात सहचर्य, भावनिक बंध निर्माण झाल्याने सहकार्य, त्याग, सहिष्णुता, बंधुभाव या भावना वाढीला लागतात व वैयक्तिक आशा - आकांक्षा कुटुंबाच्या आशा - आकांक्षेशी एकरूप झाल्याचे दिसुन येते. त्याचमुळे व्यक्तीने केलेल्या गौरवास्पद पराक्रमाचे श्रेय त्याच्या कुटुंबाला दिले जाते. तसेच व्यक्तीच्या हातून घडलेल्या कृत्याचे दुषणही त्याच्या कुटुंबालाच दिले जाते.

नागरी कुटुंबात मात्र कुटुंबियांतही एवढी सहकार्याची भावना व कुटुंबाबद्दलचा अभिमान दिसत नाही. औद्योगिकरणामुळे आपापल्या स्वतंत्र व्यवसायप्रित्यर्थ सर्वजण एकमेकांपासून दूर व स्वतंत्र राहतात. याचाच परिणाम म्हणजे कौटुंबिक भावना इतकी दृढ व कौटुंबिक अभिमान इतका जबरदस्त नागरी कुटुंबात आढळून येत नाही.

ग्रामीण कुटुंबात कुटुंबप्रमुखाचे म्हणजेच पित्याचे महत्त्व अनन्यसाधारण असते. कुटुंबाचे सर्व अधिकार पित्याकडे असतात व त्याचेच वर्चस्व सर्व कुटुंबावर असते. तो जवळजवळ निरंकुश असा सत्ताधारी असतो. कुटुंबाचा तो कर्ता पुरूष असल्याने त्याला जसे संपूर्ण अधिकार असतात, तसेच याला काही कर्तव्ये पार पाडावी लागतात. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी त्याचीच असते. समान मालमत्तेचे व्यवस्थापन करणे, सर्व कुटुंबातील श्रम-विभाजन व्यवस्था करणे, प्रत्येकाच्या हितसंबंधाची काळजी वाहणे, विवाहाला योग्य असलेल्या कुटुंबियाचे विवाह जमवून आणणे अशी विविध कार्ये त्यालाच जबाबदारीने करावी लागतात. त्याचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे कुटुंबाच्या परंपरागत व्यवसायाचे कुलाचारांचे व समाजपरंपरेचे ज्ञान कुटुंबातील नवीन, पिढीला करून देणे होय. साहजिकच एवढी महत्त्वाची कार्ये करणाऱ्या कुटुंबप्रमुखाचे वर्चस्व सर्व कुटुंबियावर असल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. त्याच्या शब्दाला

वजन व मान असतो. त्याच्या इच्छेप्रमाणे कुटुंबीय वागत असतात. इतर कुटुंबीयांचे स्थान कुटुंब प्रमुखापुढे अगदीच दुय्यम असते. नागरी कुटुंबातील चित्र याबाबतीत अगदीच वेगळे असते. कुटुंबप्रमुखाचे प्राबल्य एवढ्या तीव्रपणे नागरी कुटुंबात आढळून येत नाही.

ग्रामीण कुटुंबात कुटुंबप्रमुखाचे म्हणजे पित्याचे महत्त्व अनन्यसाधारण असते. कुटुंबाचे सर्व अधिकार पित्याकडे असतात व त्याचेच वर्चस्व सर्व कुटुंबावर असते. तो जवळजवळ निरंकुश असा सत्ताधारी असतो. कुटुंबाचा तो कर्ता पुरूष असल्याने त्याला जसे संपूर्ण अधिकार असतात. तसेच त्याला काही कर्तव्ये पार पाडावी लागतात. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी त्याचीच असते. समान मालमत्तेचे व्यवस्थापन करणे, सर्व कुटुंबियातील श्रम-विभाजन व्यवस्था करणे, प्रत्येकाच्या हितसंबंधाची काळजी वाहणे व विवाहाला योग्य असलेल्या कुटुंबियांचे विवाह जमवून आणणे अशी विविध कार्य त्यालाच जबाबदारीने करावी लागतात. त्याचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे कुटुंबाच्या परंपरागत व्यवसायाचे, कुलाचारांचे व समाजपरंपरेचे ज्ञान कुटुंबातील कुटुंबप्रमुखाला नवीन पिढीला करून देणे होय. साहजिकच एवढी महत्त्वाची कार्ये करणाऱ्या कुटुंबप्रमुखाचे वर्चस्व सर्व कुटुंबियावर असल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. त्याच्या शब्दाला वजन व मान असतो. त्याच्या इच्छेप्रमाणेच कुटुंबीय वागत असतात. इतर कुटुंबियांचे स्थान कुटुंबप्रमुखापुढे अगदीच दुय्यम असते. नागरी कुटुंबातील चित्र याबाबतीत अगदीच वेगळे असते. कुटुंबप्रमुखाचे प्राबल्य एवढ्या तीव्रपणे नागरी कुटुंबात आढळून येत नाही.

ग्रामीणे कुटुंबाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कुटुंबाच्या सर्व कार्यात सर्व कुटुंबीय सहभागी झालेले असतात. शेती हा सर्वाचाच व्यवसाय असल्याने सर्वांना सर्वकाळ एकत्र राहण्याची संधी प्राप्त झालेली असते. व्यवसायिक भिन्नता नसल्याने सर्व कुटुंबियांच्या दिनक्रमात कोणतीच भिन्नता असण्याचे कारण नाही. त्यामुळे कोणत्याही कौटुंबिक कार्यक्रमात सर्वांचा सहभाग निकटचा असतो. या उलट नागरी कुटुंबात प्रत्येक कुटुंबाचा व्यवसाय वेगवेगळा असतो. त्यामुळे दिवसातील बराच काल आपल्या नोकरी-व्यवसायामुळे कुटुंबीय घराबाहेरच असतात. नव्हे तर सर्व सदस्यांच्या कामाच्या वेळा भिन्न भिन्न असल्याने त्या सर्वांना एकाच वेळी एकत्र आणणे हे सुद्धा जमून येऊ शकत नाही. त्यामुळे नागरी कुटुंबाला केवळ विश्रांती स्थानाचे रूप आले आहे.

४.६ कुटुंब संस्थेचे बदलते स्वरूप (FAMILY CHANGING TRENDS)

आधुनिक काळातील वाढत्या औद्योगीकरणाचा परिणाम सर्व समाजावर झालेलाच आहे. भारतीय ग्रामीण कुटुंब यातून निसटू शकले नाही. ग्रामीण कुटुंब रचनात्मक व कार्यात्मक दृष्टिकोनातुन बदलते आहे. हे संक्रमण बदलत्या कालाप्रमाणे अभावितपणे होत आहे. पण तरीसुद्धा हे नमूद केले पाहिजे की, पाश्चात्य सामाजिक जीवनात औद्योगिकरणामुळे जसे क्रांतिकारक बदल घडून आले, तसे ते भारतीय सामाजिक जीवनात विशेषतः भारतीय ग्रामीण कुटुंबात घडून आले नाहीत. याचे कारण म्हणजे भारतात नागरीकरणाची व औद्योगिकरणाची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने चालू आहे. पण या संथ गतीने होणाऱ्या नागरीकरणाचा व औद्योगिकरणाचा परिणाम ग्रामीण कुटुंबावर लक्षणीय असाच झाला. ग्रामीण कुटुंबात परिवर्तन

घडू लागले. म्हणूनच नागरीकरणाच्या प्रभावाने ग्रामीण कुटुंबात होत असणाऱ्या परिवर्तनाची दिशा समजण्यासाठी खालील मुद्द्यांचा विचार केला पाहिजे.

ग्रामीण कुटुंबाची कार्यकक्षा, दिवसेंदिवस अरूंद होत आहे. परंपरागत ग्रामीण कुटुंबाला अनेक कार्ये पार पाडावी लागत. आर्थिक क्षेत्रात तर कुटुंब म्हणजे एक स्वयंपूर्ण घटक होते. सर्व मालमत्ता कुटुंबाच्या मालकीची असते. आर्थिक वस्तुंचे उत्पादन, नियंत्रण व संरक्षण हे कुटुंबामार्फतच होत असते. लौकिक शिक्षण, धार्मिक शिक्षण, मनोरंजन, औषधपाणी इत्यादींची सोय कुटुंबातच करावी लागे. पण नागरीकरणाच्या प्रभावाने कुटुंबाच्या या कार्यात बदल घडून आला आहे. ज्या गरजापूर्तींसाठी कुटुंबीय पूर्णतया कुटुंबावरच अवलंबून असत, त्या गरजांची पूर्ती उत्तम रीतीने करण्यासाठी आज अनेक स्वतंत्र संस्था अस्तित्त्वात आल्या आहेत. हा नागरीकरणाचा प्रभाव मानला पाहिजे.

ग्रामीण कुटुंबाचे एकजिनसी स्वरूप नाहीसे होऊ लागले आहे. कुटुंबातील सर्व सदस्य कुटुंबात समरस होऊन आपल्या जबाबदाऱ्या अत्यंत निष्ठापूर्वक पार पाडीत असत. कुटुंबाबद्दल विलक्षण प्रेम व जाज्वल्य अभिमानही सर्व कुटुंबियांना वाटत होता. व्यक्तीच्या हातून घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टीचे भुषण वा दुषण कुटुंबालाच दिले जाई. त्यामुळे कुटुंब अभंग राहावे, कुटुंबाचे सहकारी जीवन कायम राहावे. यासाठी सर्व कुटुंबीय सतत प्रयत्नशील असत. पण नागरीकरणाच्या प्रभावाने कुटुंबबद्दलची ही भावना कमी कमी होत आहे. सर्व कुटुंबियात दिसुन येणारी तादात्म्यवृत्ती लोपत आहे. इतकेच नव्हे तर व्यक्ती आपले स्वतंत्र अस्तित्व विसरू न शकल्याने कुटुंबात अस्थिरपणा डोकावत आहे. व्यक्ती व कुटुंबाबाहेरील कार्याना महत्त्व येऊ लागल्याने कुटुंबसंस्थेविषयी वाटणारा आपलेपणा कमी होत आहे. म्हणजेच ग्रामीण कुटुंबातील एकजिनसीपणा कमी होऊ लागला म्हणूनच असे म्हणता येईल की, ग्रामीण समाजात कुटुंबविरोधी वृत्ती (Anti-familism) जरी बळावली नसली तरी कुटुंब-वृत्ती (familism) मात्र कमी होत आहे.

नागरीकरणाने ग्रामीण कुटुंबातील कुटुंबियांच्या संबंधात सुद्धा बदल घडून येत आहेत. सर्व कुटुंबीय एकाच घरात आपल्या वडिलार्जित जमिनीवर आपले समान व्यवसाय करीत होते. साहजिकच सर्व कुटुंबिय एकमेकांच्या सहवासात सतत राहत होते. त्यामुळे त्यांच्यात अकृत्रिम जिव्हाळा, आपलेपणा व सहचर्याची भावना दिसून येत होती. पण आज मात्र नागरीकरणाच्या प्रभावाने हे संबंध औपचारीक व करारात्मक स्वरूपाचे होत आहेत. भिन्न भिन्न व्यवसायांच्या भिन्नतेमुळे, स्वतंत्र पद्धतींच्या शिक्षणामुळे कुटुंबियांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बळावल्या. कुटुंबाच्या मालकीच्या मालकीची वाटणी होऊ लागली. साहजिकच ग्रामीण कुटुंबाचा पाया सहजीवन यालाच तडा गेला. नागरीकरणाने बदललेल्या परिस्थितीमुळेच ग्रामीण कुटुंबातील जिव्हाळ्याचे बंध क्षीण होऊ लागले.

ग्रामीण जीवनातील कुटुंबप्रभाव नागरीकरणाने जसा कमी झाला तसाच कुटुंबप्रमुखाचा प्रभावही संपुष्टात आला. विवाहसंबंध, अर्थोत्पादन, राजकारण, धर्मपरंपरा या बाबतीत कुटुंबप्रमुखाचे नियंत्रण सर्व सदस्यांवर होते. पण आज मात्र नागरीकरणाने व्यक्तीवाद वैयक्तिक स्वातंत्र्य व महत्त्वाकांक्षा यांनाच महत्त्व आल्याने कुटुंबप्रमुखाचे महत्त्व संपले. कुटुंबप्रमुखाचे प्राबल्य न मानण्याचीच वृत्ती कुटुंबियांच्यात आज दिसून येते. अशा रीतीने ग्रामीण कुटुंबात दिसून येणारी कुटुंबवृत्ती बदलत्या बाजारपेठीय अर्थव्यवस्थेने संपुष्टात आणली. नवीन उद्योगधंदे निर्माण झाले. नवीन व्यवसाय, वाटचाल करण्याची प्रवृत्ती कुटुंबियांच्यात उत्पन्न झाली. त्यामुळे

संयुक्त कुटुंबातील आपला वाटा घेऊन कुटुंबीय शहराच्या रोखाने जाऊ लागले. साहजिकच पारंपारिक भारतीय ग्रामीण कुटुंबाचे विघटन होऊ लागले.

४.७ सारांश

कुटुंब हा एक 'प्राथमिक समूह' आहे. कुटुंब ही एक 'सामाजिक व्यवस्था' (Social System) आहे. तसेच कुटुंब ही एक 'सामाजिक संस्था' देखील आहे. थोडक्यात समाजशास्त्रात कुटुंबाचे अध्ययन तीन विभिन्न पद्धतीने केले जाते. 'एक प्राथमिक समूह' या दृष्टिने कुटुंब आपल्यापैकी जवळपास सर्वांना परिचित आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक मानवी मुलासाठी समाजीकरणाच्या प्रक्रियेचा प्रारंभ कुटुंब या समूहात होते. कुटुंबातील लहान मुल अथवा अन्य कोणताही सदस्य गंभीर स्वरूपाच्या कारणाने आजारी असेल तर त्याचा परिणाम त्या कुटुंबातील सर्वच सदस्यांच्या कार्यावर होतो. 'परस्परावलंबी संबंधाची व्यवस्था' या दृष्टिनेच कुटुंब ही एक सामाजिक व्यवस्था आहे असे म्हणता येते. व्यक्ती व समाज या दोहोंच्याही काही मुलभुत स्वरूपाच्या अस्तित्वविषयक गरजा कुटुंबामुळेच पूर्ण होतात. म्हणून कुटुंब ही एक सामाजिक संस्था आहे असे ही म्हणता येते. अशा प्रकारे समाजशास्त्रात कुटुंबाचे अध्ययन करण्याच्या विभिन्न पद्धती असल्या तरीही आपणास एक सामाजिक संस्था या दृष्टिनेच कुटुंबाचा विचार करावयाचा आहे.

४.८ कठीण शब्द

१) सातत्य - नियमीतपणा
२) प्रजोत्पादन - बाळाला जन्म देणे.
३) बालसंवर्धन - लहान मुलांच पालन पोषण करणे.
४) दिर्घकाळ - जास्त काळ
५) प्रौढ - वयस्कर, वयात आलेला
६) श्रमविभाजन - कामाची विभागणी
७) उपजिविका - उदरनिर्वाह
८) पितृसत्ताक - वडीलांची सत्ता असणे, पित्याची सत्ता असणे.
९) मातृसत्ताक - आईची सत्ता असणे.
१०) निवासस्थान - राहण्याचे ठिकाण

४.९ अभ्यासाचे प्रश्न :

१) कुटुंब संस्थेची व्याख्या सांगून कुटुंब संस्थेची वैशिष्ट्ये सांगा.
२) कुटुंब संस्थेची कार्य विशद करा.
३) कुटुंबाचे प्रकार याविषयी थोडक्यात माहिती सांगा.
४) कुटुंब संस्थेचे बदलते स्वरूप याविषयी चर्चा करा.

❖❖❖❖

४ ब

धर्मसंस्था

घटक रचना :

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ धर्माचा अर्थ
४.३ धर्माची व्याख्या
४.४ धर्माची भूमिका व कार्य
४.५ सारांश
४.६ कठीण शब्द
४.७ अभ्यासाचे प्रश्न

४.० उद्दिष्ट्ये - (OBJECTIVES)

१. धर्म म्हणजे काय आणि धर्मसंस्थेविषयी अध्ययन करणे.
२. धर्म संस्थेची भूमिका व कार्य हे जाणून घेणे.

४.१ प्रस्तावना - (INTRODUCTION)

ईश्वराने माणसास निर्माण केले की नाही हा श्रद्धेचा म्हणून वादाचा विषय आहे. पण ईश्वरास माणसाने निर्माण केले हे वादातीत सामाजिक तथ्य (Social fact) आहे. कारण मानव व त्याच्या समाजाची ती एक मुलभूत गरज आहे. अत्यंत प्राचीन काळापासून म्हणजे निॲंडरथल मानवाच्या काळात देखील धर्माच्या प्राथमिक अवस्थेचे अस्तित्व पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखविले आहे. तर रशियन राज्यक्रांतीनंतर कार्ल मार्क्सच्या विचाराने प्रभावित झालेल्या राज्यकर्त्यांनी धर्माचे समुळ उच्चाटन समाज जीवनातून करावयाचे ठरवूनदेखील त्याना त्यात यश आले नाही. पूर्वी काही विचारवंतांना असे वाटत असे की, मानवी समाजाचा विकास होत गेल्यावर धर्म विषयक संकल्पना निर्माण झाली. पण मानव शास्त्रज्ञांनी व पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे की मानवी समाजाच्या सुरूवातीपासून धर्मव्यवस्था आढळत आली आहे. त्याचप्रमाणे काहीना असे वाटते की विज्ञानाचा जसजसा प्रसार होत जाईल तस तसे धर्माचे समाज जीवनातून उच्चाटन होईल. पण तसे झालेले नाही. म्हणजे कोणत्याही काळातील व कोणत्याही प्रकारच्या समाजात मग तो आदिवासी असो वा प्रगत यांना त्या स्वरूपात धर्मसंस्था आढळतेच.

४.२ धर्माचा अर्थ

लॅटिन भाषेतील Relegare म्हणजे ईश्वराशी जोडणे, या अर्थाच्या शब्दावरून ख्रिश्चन धर्मात Religion हा शब्द, धर्म या अर्थी रूढ झाला आहे. तर हिंदूच्या संकल्पनेनुसार धर्म, या शब्दाची उत्पत्ती 'धृ धारयति इति धर्म' अशी आहे. म्हणजे ज्या (नियम, वर्तणूक, आचारविचार, श्रद्धा, दृष्टिकोण इत्यादीच्या) योगे समाजाची धारणा होते. तो धर्म होय. पण अशा प्रकारे विशिष्ट धर्माच्या संदर्भातील विवेचनावरून समग्र मानव समाजातील धर्म ही संकल्पना व संस्था याचे समाजशास्त्रीय आकलन होणार नाही. त्यासाठी समाजशास्त्र, मानवशास्त्र इत्यादी क्षेत्रातील विचारवंतांच्या विचाराचा मागोवा घेणे आवश्यक आहे. पण त्याही आधी पार्श्वभूमीच्या स्वरूपात (अ) मानवी जीवनातील अनिश्चितता, अनाकलनीयता व (ब) अलौकिक शक्ती वा प्राण्याच्या अस्तित्वाबद्दलच्या श्रद्धा या दोन बाबी समजावून घेऊ.

अ) मानवी जीवनातील अनिश्चितता, अनाकलनीयता –

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांचे निराकरण करण्यासाठी मानवसमाज भोवतालच्या परिस्थितीशी प्रारंभापासून मिळतेजुळते घेत आला आहे. म्हणजेच पर्यावरणाशी समाजयोजन वा अनुकूलन साधत आला आहे. पण हे अनुकूलन मानवाला सहजासहजी साधता आले नाही तसेच त्यात नेहमीच यश आले असेही नाही. मानवी जीवनात सर्वच गोष्टी वेळेवर व अपेक्षीत घडल्या नाहीत व घडत नाहीत. शेत पिकविण्यासाठी कष्ट केले तरी त्याला निसर्गाची साथ मिळाली पाहिजे, नाही तर दुष्काळ, पूर, टोळधाड या मार्गाने श्रम वाया जातात. श्रीमंताचा गरीब होणे. गरीबाचा श्रीमंत होणे, धडधाकट माणूस मृत्युमुखी पडणे, रोगराई येणे, अचानक धनलाभ, भुकंप, दुष्काळ, अपघात शत्रूचा हल्ला, फसवणूक, विश्वासघात वगैरे पदोपदी दिसणाऱ्या गोष्टी मानवी जीवनातील अनिश्चितता दर्शवितात. यामुळे मानवाला त्याच्या गरजा पूर्ण करण्यात अडथळे येतात.

त्याचप्रमाणे जीवनातील अनेक गोष्टी मानवाला अनाकलनीय वाटत आल्या आहेत. सावलीची हालचाल, प्रतिध्वनी ऐकू येणे, मृत वा दुरचा माणूस स्वप्नात येणे, दिवस रात्र होणे, भुकंप-वादळ-पूर असा उत्पात होणे, अचानक आजारी पडणे, जन्म-मृत्यु होणे वगैरे अनेक बाबी प्राथमिक अवस्थेतील मानव समाजास अनाकलनीय होत्या. त्यांच्यातील कार्यकारणसंबंध त्याला प्रस्थापित न करता आल्याने त्या अतर्क्य, अनाकलनीय वाटल्या. कालाच्या ओघात भूगोल, जीवशास्त्र, विज्ञान इत्यादीच्या साहाय्याने, परवापर्यंत अनाकलनीय वाटणाऱ्या गोष्टीचे मानवाला आकलन झाले तरी आजही अशा अनेक घटना मानवाला अनाकलनीय वाटतात. जीवनातील या अनिश्चित, अनाकलनीय गोष्टीमुळे मानव प्रयत्नांची शर्त करूनही हतबल ठरत आलेला आहे. त्याची जैविक व मानसिक सुरक्षा, त्याची सुखदुःखे पूर्णपणे त्याच्या हातात नाहीत याची त्याला अगोदरपासूनच जाणिव झालेली आहे. तीच त्याच्या धर्मसंस्थेची पार्श्वभूमी आहे.

ब) अलौकिक शक्ती वा प्राण्याच्या अस्तित्वाबद्दलच्या श्रद्धा :-

अनिश्चित, अनाकलनीय घटनांमधील कारण काय असते? सृष्टीतील चक्रामागे कोणती शक्ती असावी? आपले सुखदुःख, जीवन-मरण कोण नियंत्रित करीत असावे? अशा प्रश्नांची स्वतःशी, निसर्गाशी व इतरांशी विचारणा करता करता मानवाने त्यांचे जे उत्तर शोधून काढले ते म्हणजे अलौकिक शक्ती वा दिव्य प्राण्याचे अस्तित्व ही शास्त्रीय वस्तुस्थिती नाही तर

मानवी श्रद्धा आहे. मानवाचे सुख-दु:ख, आशा-निराशा, समृद्धी-दारिद्र्य, स्थैर्य-अस्थैर्य, जीवन-मृत्यू वगैरे स्थिती या अलौकिक शक्ती वा प्राण्याच्या इच्छेचा परिणाम होय असे मानण्यात येऊ लागले. एवढेच नव्हे तर, सुख स्वास्थ्य, समृद्धी, वैभव, आनंद प्राप्त करण्यासाठी व दु:ख, दारिद्र्य, अपघात, आजार, संकट वगैरे टाळण्यासाठी या अलौकिक शक्तीला विशिष्ट आचरण विधी करून (Rituals) करून प्रयत्न करून घेतले पाहिजे. अशीही मानवाची धारणा बळकट होत गेली.

४.३ धर्माची व्याख्या

वरील विवेचनाच्या आधारे आपणांस असे म्हणता येईल की, जीवनातील अनपेक्षित, अनाकलनीय, दु:खदायी घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी मानवाने अलौकिक शक्ती वा दिव्य प्राण्याच्या अस्तित्वावर जी श्रद्धा ठेवून विशिष्ट प्रकारच्या आचारास जीवनात स्थान दिले त्यास धर्म म्हणता येईल.

१) एडवर्ड टायटलरच्या मते, 'धर्म म्हणजे दिव्य प्राण्यावरील श्रद्धा होय.'
२) पी. गिस्बर्ट - 'धर्म म्हणजे मानवाचे अलौकिक प्राण्याशी असलेले संबंध व त्यावरील अवलंबन होय.'
३) सर जेम्स फ्रेझर - 'मानवापेक्षा श्रेष्ठ अशा शक्तीची आराधना म्हणजे धर्म होय. या शक्ती मानवी जीवन व निसर्गक्रम निर्देशित व नियंत्रित करतात अशी मानवाची श्रद्धा असते.'
४) एमिल डरखीम :-

'धर्म म्हणजे पवित्र वस्तुशी संबंधित श्रद्धा व आचार विधी यांची संकलित व्यवस्था होय. या श्रद्धा व आचारविधीचे संघटन चर्चसारख्या नैतिक समूहात होते.'

धर्माबाबतचा मुलभूत बाबी –

१) सार्वत्रिकता :-

समाज मग तो प्राचीन वा अर्वाचीन अत्यंत प्राथमिक अवस्थेतील आदिवासींचा वा अत्याधुनिक प्रगत तसेच कोणत्याही शासन पद्धतीचा असो. तेथे या ना त्या स्वरूपात धर्मसंस्था आढळतेच.

२) अलौकिक शक्तीच्या अस्तित्वावर श्रद्धा :-

मानवी जीवन व निसर्ग यांचे नियंत्रण करणारी असाधारण आदि अंत नसलेली, सर्वत्र संचार करणारी व अमानवी सामर्थ्य असलेली एक अलौकिक शक्ती आहे ही मानव समाजाची श्रद्धा धर्माचा मुलाधार आहे. अर्थात, या श्रद्धेचे स्वरूप मानव, समाज व त्याची संस्कृती यानुसार वेगवेगळे आढळते. एडवर्ड टायलरने 'जीवनाचे व निसर्गाचे नियंत्रण करणारा अविनाशी स्वरूपाचा आत्मा सर्वत्र आहे.' अशी आदिवासीत आढळणारी सर्वात्मवादाची (Animism) संकल्पना स्पष्ट करून आदिवासींच्या धर्मश्रद्धेचे व धार्मिक संबंधाचे स्पष्टीकरण दिले आहे. हे आदिवासी या आत्म्यालाच प्रेतात्मा, पिशाच्च, देव, भुत वगैरे म्हणतात. या आत्म्याचे वास्तव्य पशू, पक्षी, वनस्पती तसेच निसर्गातील इतर बाबतीत असते असेही या आदिवासींना वाटते. तर काही आदिवासींत मानव व मानवाभोवतालचे जीवन सर्व चेतन-अचेतन वस्तुत असलेल्या

शक्तीमुळेच निर्धारित होत असते अशी दृढश्रद्धा असते. ही शक्तीवादाची (Animatism) संकल्पना मॅरट, प्रिअस यांनी मांडली. मॅक्समुल्लरने निसर्गवादाची (Naturism) संकल्पना मांडून निसर्गाच्या प्रभावाने सुर्य, चंद्र, आकाश, वारा, पाऊस, जंगल, डोंगर, नदी वगैरेना मानव अलौकिक शक्ती कसा मानू लागला, तेच त्याचे कसे देव बनले याचे विवेचन केले आहे.

प्रगत व विशाल स्वरूपाच्या समाजात ही श्रद्धा गुंतागुंतीची होत जाते. त्यामुळेच धार्मिक श्रद्धांना सुसंघटित स्वरूप देऊन धार्मिक ग्रंथातून त्यांचे विवेचन केले जाते. यातूनच काही धर्म एकेश्वरवादी (Monotheists) तर काही (Polytheists) अशा श्रद्धा जोपासतात. काहींना इश्वर निर्गुण, निराकार तर काहीना सगुण, साकार वाटतो.

३) श्रद्धेनुसार आचार विधी :-

अलौकिक शक्तीच्या स्वरूपाबाबत समाजा-समाजात भिन्नता आढळली तरी तिच्या अस्तित्वाबद्दल जसा दृढ विश्वास असतो. त्याचप्रमाणे या शक्तीला शरण जाऊन तिला प्रसन्न करून घेतल्याने सुख, समृद्धी, यश, स्वास्थ्य लाभेल अशीही मानवाची दृढश्रद्धा असते. त्यामुळे प्रत्येक धर्मात इश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी त्याचा आशिर्वाद मिळविण्यासाठी कोणते धार्मिक विधी करावेत इतरांशी कसे वागावे. पवित्र वस्तुचे कसे सांभाळावे यासाठी अनेक आचार विधी वा कर्मकांडे (Rituals) असतात. या कर्मकांडात पूजा, प्रार्थना, स्तवन, दानधर्म, बळी, होमहवन, मंत्रोच्चारण, उपवास, व्रतवैकल्ये, विशिष्ट वस्तुंचाच वापर, विशिष्ट खाद्यपदार्थाचा त्याग यांचा समावेश होतो. शिवाय धार्मिक सण, उत्सव, गाणी, नृत्य वगैरेंचाही समावेश यात केला जातो. आचारविधी धार्मिक श्रद्धेशी सुसंगत असतात.

४) पवित्र - अपवित्रतेचा भेद :-

एमिल डरखीम याने धर्मश्रद्धानुसार काही वर्तन व वस्तुतः पवित्र-अपवित्र असा भेद केला जातो. आचरण करणारे धार्मिक व प्रशंसनीय ठरतात. तर अपवित्र वस्तु बाळगणारे, पवित्र वस्तुचे पावित्र्य धोक्यात आणणारे अपवित्र वर्तन करणारे अधार्मिक, धिक्कारार्ह ठरतात. असे वर्तन, पाप वा पूण्य समजले जाते. त्या बदल्यात हिंदूला मृत्यूनंतर स्वर्ग किंवा नरक, इस्लाम धर्मियांना जन्नत किंवा जहन्नुम व ख्रिश्चनात हेवन किंवा हेल या ठिकाणी जावे लागते, अशीही त्या त्या धर्मात दृढश्रद्धा असते.

एमिल डरखीम याने पवित्र-अपवित्रतेच्या संकल्पनेमागील लोकांची श्रद्धा स्पष्ट केली आहे. पापाचरणामुळे व्यक्ती व समाज या दोहोंवर निश्चितच आपत्ती, अरिष्ट कोसळते व पुण्याचरणामुळे व्यक्ती व समाजास त्याची चांगली फळे मिळतात. अशी त्या समाजाची धारणा असते. अर्थातच धर्म व समाजसापेक्ष या पवित्र-अपवित्रतेच्या कल्पना बदलतात हे ओघाने आलेच. हिंदूना गाय पवित्र व गोमांस भक्षण हे पापाचरण आहे तर काही धर्मात गायींना मारणे, मांस खाणे या सर्वसाधारण बाबी वाटतील.

५) प्रतिकात्मक व उपयुक्त सांस्कृतिक लक्षणांचा समावेश :-

धर्माचे जाणीवपूर्वक प्रतिनिधित्व करण्यासाठी धर्माचरणाची जाणीव करून देण्यासाठी प्रत्येक धर्मात काही प्रतिकात्मक सांस्कृतिक लक्षणे दिसून येतात. ताईत, क्रॉस, ओम, स्वस्तिक, 786 ही संख्या वगैरे ही विविध धर्माची सांस्कृतिक लक्षणे आहेत. त्याचप्रमाणे धर्मानुसार आचार विधी पार पाडण्यासाठी मंदिरे, मस्जिद, चर्च, गुरूद्वारा, पूजेचे साहित्य,

धर्मग्रंथ वगैरे उपयुक्त सांस्कृतिक लक्षणे देखील संबंधित धर्मात दिसून येतात. आदिवासींच्या समाजामध्ये देखील कुलचिन्हांना (Totem) असेच स्वरूप प्राप्त झालेले आहे.

६) आचार विधीसाठी खास प्रशिक्षित लोकांचा वर्ग :-

प्रत्येक धर्मातील धर्मविधी पार पाडले तरच अलौकिक शक्ती प्रसन्न होणार. यास्तव पुरोहित, पुजारी, प्रिस्ट, मुल्लामौलवी, भगत, मांत्रिक वगैरे लोक प्रत्येक समाजात आढळतात. त्यानी धर्माचे समग्र आकलन करून घेतले आहे. व धर्मविधीबाबत मार्गदर्शन करण्याचा त्यांना अधिकार आहे. अशी लोकांची दृढ भावना झालेली असते. प्रसंगी ही भावना इतकी टोकाची असते की असे लोकदेखील अलौकिक मानले जाऊन ते पुज्य मानले जातात व त्यांच्या वाटेल त्या आज्ञा शिरसावंद्य मानल्या जातात.

४.४ धर्माची भूमिका व कार्य

मानव समाजाच्या अस्तित्वासाठी मानव समाजाची जी व्यवस्था आहे. त्या व्यवस्थेच्या विविध घटकांत एकात्मता टिकविणे व दृढ करण्यात धर्माला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. ऑस्ट्रेलियात अरूंटा या आदिवासी जमातीचा कार्यवादीतील दृष्टिकोणातून एमील डरखीम याने अभ्यास करून धर्माची ही प्रधान भुमिका विशद केली आहे.

धर्म ही सामाजिक घटना असून तिचा समाजातील अन्य संस्थांशी संबंध असते. धर्मातील श्रद्धांतून पवित्र वस्तुच्या संबंधात कोणते आचार-विधी करावेत व करू नयेत याचे समुहातील लोकांना प्रभावीपणे मार्गदर्शन होते. यामुळे लोकांच्यात समान जीवनमुल्ये रूजून भावनिक एकता निर्माण होते. या भावनिक बंधामुळे एकाच धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्ती परस्परांशी जोडल्या जातात. परिणामी सामाजिक दृढत्व (Social Solidarity) आकारला येते. समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टिने ही भावनिक एकता व सामाजिक दृढत्व अत्यंत महत्त्वाचे असते. या दृढत्वामुळे समाजातील संघटन जोपासले जाते व प्रभावीपणे टिकविले जाते. समाजाला त्याच्या विविध गरजा कुटुंब, विवाह, कुल मालमत्ता, अर्थ, राज्य वगैरे संस्थांकडून सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सामाजिक दृढत्व निर्माण करण्याचे कार्य धर्माकडून होते. धर्म या संस्थेकडून वरील भुमिकेला पोषक अशी जी विविध कार्ये पार पाडावी लागतात. ती खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) भोवतालच्या परिस्थितीशी समायोजन :-

धर्म आपल्यापरीने पण प्रभावीपणे भोवतालच्या अनाकलनीय, परिस्थितीचे स्पष्टीकरण व माहिती मानवाला देवून त्या परिस्थितीशी मानवाचे समायोजन साधतो. हे स्पष्टीकरण व माहिती वैज्ञानिकदृष्ट्या खरी वा खोटी असेल. पण अमूक एका शक्तीमुळे अमूक गोष्टी घडतात. या निव्वळ श्रद्धेमुळे तो निश्चित होतो. त्याच्या मनावरचा ताण कमी होऊन तो भोवतालच्या परिस्थितीशी समायोजन साधता.

२) मन:शांती व व्यक्तिमत्त्वाचे संघटन :-

प्रयत्नाची पराकाष्ठा करूनही यश, सुख, समृद्धी, इच्छापूर्ती होत नाही. दु:ख, दारिद्र्य आजार, अपघात या गोष्टी टाळता येतीलच असे नाही. वृद्धत्व व मृत्युला तर सामोरे जावेच

लागते. यामुळे मानव विकल, निराश होण्याची अधिक शक्यता असते. अशावेळी धर्मावरचा त्याचा विश्वास त्याला अशा प्रेरणा देतो. वाईटाप्रमाणे चांगले दिवस येतील, यश मिळेल, समृद्धी लाभेल अशी मनोधारणा होते. आजारपण, अपघात, अपयश, मृत्यु याबाबत समर्थन व सांत्वन धर्म प्रभावीपणे करून व्यक्तिमत्त्व विघटनापासून व्यक्तीचे म्हणजेच शेवटी समाजाचे संरक्षण करतो. एवढेच नव्हे तर ऐहिक जीवनातील उद्दिष्टांपेक्षा पारमार्थिक जीवनातील उद्दिष्टांचे महत्त्व बिंबवून त्यासाठी व्यक्ती व समाजाला क्रियाशील ठेवतो. निराशा, वैफल्य या बाबी व्यक्तीला समाजविरोधी बनविण्याचा दाट धोका असतो. तो धर्मामूळे टाकला जातो. व्यक्तीची मन:शांती व व्यक्तिमत्त्वाचे संघटन टिकविले जाते.

३) जीवनमूल्यांचे संरक्षण व सामाजिक नियंत्रण :-

प्रत्येक समाजाच्या संस्कृतीनुसार त्या त्या समाजात चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, इष्ट-अनिष्ट अशी मूल्य-व्यवस्था तयार झालेली असते. त्यातुनच त्या समाजात काही नैतिक कल्पना रूढ झालेल्या असतात. अशा बऱ्याच मूल्यांना व नैतिक कल्पनांना धर्माचा आधार मिळालेला असतो. त्यामुळे अशी जीवनमूल्ये व नैतिक कल्पनांनुसारच्या वर्तनाचा लोक आदरयुक्त भीतीने स्वीकार करतात. त्यानुसार ते आपले आचरण ठेवतात. ही बाब समाजाचे नियंत्रण व संघटन यासाठी अत्यंत आवश्यक व महत्त्वपूर्ण आहे.

समाज नियंत्रणविषयक विविध वर्तनाचे आचरण करून समाजाचे संघटन टिकविण्यासाठी व्यक्तीवर बाह्य व आंतरिक दडपण येत असते. शासन यंत्रणा, कायदा यामूळे व्यक्तीवर सामाजिक नियमनांचे पालन करण्याचे दडपण येत असले तरी ते बाह्य दडपण असते. संधी मिळताच असे बाह्य दडपण व्यक्ती फेकू शकते. उदा. कोणी पाहात नाही, कोणाच्या लक्षात येणार नाही म्हणून व्यक्ती चोरी करण्यास प्रवृत्त होऊ शकते. पण धर्माचे दडपण हे आंतरिक दडपण असते. धर्माने पापाचरण व पुण्याचरण आणि त्याचे परिणाम याचा ठसा व्यक्तीच्या मनावर लहानपणापासुन असा बिंबवलेला असतो की तो त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनलेला असतो. त्यामुळे ईश्वराचा कोप टाळणे, पुण्यसंचय करणे व स्वर्ग-मोक्षाची प्राप्ती करण्यासाठी व्यक्ती नैतिक नियमांचे पालन मनोमन करते.

त्यामूळे सत्य बोलावे, चोरी करू नये, हिंसा करू नये, व्यभिचार करू नये अशा नैतिक मुल्यांचा अंतर्भाव बऱ्याच धर्मात आढळतो. याच्यावरच त्या समाजाचे स्वास्थ्य व संघटन मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. तेव्हा लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण करण्याचे धर्म हे एक प्रभावी अनौपचारिक साधन आहे. धार्मिक संस्कार झालेली व्यक्ती पोलिसाला घाबरणार नाही. पण त्याची श्रद्धा असलेल्या देवाची खोटी शप्पथ घेण्याऐवजी आपल्या कृत्याचा जाब देईल.

४) कल्याणकारी कार्याना चालना :-

धर्मसंस्थेत व्यक्ती व अलौकिक शक्ती यांच्यातील संबंध कसे असावेत याचे जसे विवेचन केलेले असते, तसेच त्याने इतरांशी कसे वागावे याबद्दलही मार्गदर्शन केलेले असते. भुतदया, परोपकार, क्षमा, शांती, दया वगैरे कितीतरी उदात्त भावनांचा आविष्कार धर्मातुन केलेला असतो. अशा वागण्यामुळे ईश्वर प्रसन्न होतो असे सांगितल्याने लोक दुसऱ्याला संकटात मदत करतात, दानधर्म करतात, चुकांबद्दल क्षमा करतात, हिंसेचा त्याग करतात, संघर्षाऐवजी सहकाराची प्रक्रिया स्विकारतात. यामुळे त्यांच्यातील समुदाय भावना वाढीस लागते. सेवाभावी वृत्तीने इतरांचे कल्याण करण्याची वृत्ती धर्माकडूनदेखील जोपासली जाते.

५) इतर कार्ये :-

अ) शिक्षणविषयक कार्ये :- आज जरी शिक्षणसंस्था धर्मापासून अलग झालेली दिसून येत असली तरी प्राचीन काळापासून नव्या पिढीला किंवा जिज्ञासुला ज्ञान देण्याचे कार्य धर्माकडून होत आले आहे. ख्रिश्चनांचे प्रार्थना मंदिर, हिंदूंची मंदिरे व पाठशाळा, बौद्धांचे मठ, मशिदीजवळ असलेला मदरसा येथून शिक्षणविषयक कार्ये दीर्घकाळ होत आलेली आहेत.

ब) मनोरंजन व कलांना उत्तेजन :- धर्मातील श्रद्धांचा आविष्कार करण्यासाठी व विशिष्ट धार्मिक वर्तन करण्यासाठी प्रत्येक धर्माकडून लोकांचे मनोरंजनदेखील होते. धर्माच्या रूक्ष स्वरूपाचा अतिरेक कमी होण्यासाठी सण, उत्सव, जत्रा, महोत्सव, नृत्य, गाणी, संगीत, भजन, कथा-किर्तन वगैरेंचा वापर केला जातो. त्यामूळे लोकांचे मनोरंजन होऊन त्यांच्या मनाला आनंद, शांती देण्याचे कार्य होते.

क) विविध संस्कारांतून बदलाची जाणीव :- आदिवासीत व्यक्ती तारूण्यात पदार्पण करतेवेळी यौवनारंभ विधी केला जातो. स्त्री पहिल्यांदा गर्भवती होते. त्यावेळीही विशिष्ट विधई केला जातो. विवाहाच्या वेळी विधी केला जातो. असे विधी आणि संस्कार व्यक्तीला तिच्यातील बदलाची व त्यांनुसार तिचा दर्जा बदलल्याची जाणीव करून देतात.

अर्थात, धर्माची केवळ अनुकूलच कार्ये आहेत, असे नाही तर प्रतिकुल कार्येही आहेत. त्याचा निर्देश धर्माच्या समाजशास्त्रीय अध्ययनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. स्वतःचा धर्म व त्यानुसार धर्माचरण श्रेष्ठ समजणे व दुसऱ्या धर्मास विरोध, तिरस्कार यांतून समाजाच्या विघटनाला चालनाही मिळते. धर्मयुद्धे, धार्मिक वाद यामूळे कित्येक निरपराध लोकांना मारले गेल्याचा इतिहास आहे. नरबळी, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, सतीची चाल, देवदासी अशा अमानुष प्रथांना मानवाने धर्माचेच पाठबळ दिले आहे. धार्मिक श्रद्धा व कर्मकांडे यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोणाचा स्वीकार व मानव समाजाची प्रगती यात वारंवार अडथळे उभारले गेले आहेत. सामाजिक परिवर्तन घडून येण्यात धर्माची वारंवार अडचण जाणवली आहे. त्याचप्रमाणे दैववाद, निष्क्रियतेचे समर्थन धर्माच्या साहाय्यानेच करून अनेक लोक आळशी, क्रियाशून्य राहिले. भक्त व ईश्वर यामध्ये भटजी, पाद्री, काजी, भगत यासारख्या पुरोहीत वर्गाने मध्यस्थ म्हणून बऱ्याच वेळेला धर्माचा दुरूपयोग केला. कर्मकांडाचे महत्त्व वाढवून अज्ञान, अंधश्रद्धा जोपासल्या. कारण यामुळेच त्याना समाजावर वर्चस्व निर्माण करून धर्माच्या चांगल्या बाबींचा व्यक्ती व समाजासाठी वापर केला पाहिजे ही भावना लोकांची बनत चालली आहे. धर्म न मानणे ही बाब केवळ मुठभर बुद्धीवाद्यांनाच शक्य झाली आहे.

४.५ सारांश :-

राज्यशास्त्राच्या उदय काळापासून ते अगदी अलीकडच्या काळापर्यंत मानवी जीवनातील एक सर्वोच्च व शक्तीशाली संस्था म्हणून राज्याचा अभ्यास करण्यावर विभिन्न विचारवंतांनी आपले लक्ष केंद्रीत केले. सोप्या शब्दात राज्य, राष्ट्र, शासनसंस्था, राज्याची कार्ये अथवा राज्याचे कार्यक्षेत्र, राजकीय पक्ष आदिंचे प्रामुख्याने वैधानिक, संस्थात्मक, तात्त्विक, ऐतिहासिक, तुलनात्मक दृष्टिकोनातून (त्या सर्वांना राजकीय दृष्टीकोण या एकाच नावाने संबोधता येईल.) अध्ययन करण्यावर राज्यशास्त्रात भर देण्यात आला. त्यामूळे राजकीय

जीवनाच्या सामाजिक बाजुकडे अभ्यासकांचे काही प्रमाणात दुर्लक्ष झाले. उदा. मतदान करणे, राजकीय पक्षांच्या सभांमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे हे राजकीय वर्तन आहे.

एक सामाजिक संस्था म्हणून धर्माचे अध्ययन करतांना समाजशास्त्रात धर्माच्या अपकार्याचेही अध्ययन केले जाते. उदा. धर्म समाजात एक्यभाव निर्माण करून तो वृद्धींगत करण्याचे कार्य करतो. तसेच धर्म या आधारावरच दंगली, लूटमार, जाळपोळ देखील घडून येत असल्याचे, आपणास दिसून येते. एक संस्था म्हणुन धर्माचे अध्ययन करताना धर्माची प्रकार्ये, अपकार्ये, प्रकट कार्ये व अप्रकट कार्ये या सर्वांचेच अध्ययन करणे आवश्यक ठरते. कुटुंब, विवाह, खाजगी मालमत्ता इत्यादी संस्थांच्या मुळांशी धर्माने घालून दिलेल्या नियमांचा आधार आढळतो. या संस्थांचे कार्य तसेच व्यक्तीचे उत्तरदायित्त्व धर्माने निश्चित केले असल्याचे सर्वत्रच आढळून येते. म्हणूनच समाजशास्त्रात धर्माचा एक संस्था म्हणून अभ्यास करण्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

४.६ कठीण शब्द

१) शिघ्र - लवकरात लवकर, ताबडतोब
२) निश्चिती - ठरविणे
३) शिथिलता - कमतरता
४) सर्वोत्कृष्ट - अधिक चांगले
५) अनेकात्मक - एकापेक्षा अधिक
६) नाममात्र - नावासाठी
७) अलौकिक - अतिशय शक्तीशाली
८) सार्वत्रिकता - सगळीकडे

४.७ अभ्यासाचे प्रश्न :

१) शासन संस्थेचा अर्थ सांगा आणि शासन संस्थेच्या तीन्ही विभागाविषयी माहिती द्या.
२) धर्म या संस्थेचा अर्थ व व्याख्या सांगून धर्माबाबतच्या मुलभूत बाबी यावर चर्चा करा.
३) धर्माची भूमिका व कार्य स्पष्ट करा.

❖❖❖❖

५

संस्कृती - अर्थ, वैशिष्ट्ये, प्रकार आणि कार्य

घटक रचना :

५.० उद्दिष्ट्ये
५.१ प्रस्तावना
५.२ संस्कृतीचा अर्थ
५.३ संस्कृतीची व्याख्या
५.४ संस्कृतीची वैशिष्ट्ये
५.५ संस्कृतीचे प्रकार
५.६ उप-संस्कृती
५.७ प्रति संस्कृती
५.८ संस्कृतीची कार्य
५.९ सारांश
५.१० संदर्भ सूची
५.११ अभ्यासाचे प्रश्न

५.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVE)

१. संस्कृतीची संकल्पना समजून घेणे.
२. संस्कृतीच्या संकल्पनेची वैशिष्ट्ये व कार्य जाणून घेणे.
३. संस्कृतीच्या संकल्पनेची प्रकार वरती चर्चा करणे.

५.१ प्रस्तावना

संस्कृती ही संकल्पना सामाजिक शास्त्रामध्ये महत्त्वपूर्ण समजली जाते. या सामाजिक शाखामध्ये मानसशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंश शास्त्र आणि समाजशास्त्र या अभ्यास शाखांमधून ही संकल्पना अभ्यासण्यात येते. कारण या सामाजिक अभ्यास शाखा मध्ये मानवी समाजाचा अभ्यास करताना संस्कृतीचा स्वतः समावेश करण्यात येतो. संस्कृती आणि समाजाचा परस्पर संबंध स्पष्ट करताना संस्कृती अभ्यासाचा समावेश करण्यात येते. मानवी समाजाचा अभ्यास करत असताना संस्कृती संकल्पना समाज व्यवस्थेशी जोडण्यात येतो जी मानवी जीवन व्यवहाराची बाब आहे. कारण ती इतर प्राण्यापेक्षा मानवी जीवन जगण्याची पद्धती स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारी आहे. कारण मानव हा समाजशील प्राणी आहे. त्यामूळे त्याची विशिष्ट वर्तन

पद्धती व्यवहाराचे निश्चितीकरण आणि प्रतिनिधीत्व हे संस्कृतीच्या माध्यमातूनच होते आणि म्हणून ती जीवन व्यवहाराची बाब असते. यामध्ये कला साहित्य, भाषा, विचार-मूल्य, नियम, परंपरा, रुढी, संस्कृती, लोकरीती, लोकरुढी, लोकनिती इत्यादी घटकांचा समावेश केला आहे. यानुसार व्यक्तीगत आणि सामुहिक जीवन व्यवहाराचा गतिनियम प्रस्थापित केला जातो. यातून सामुहिक समुह किंवा सामाजिक वारसाचे जतन संवर्धन आणि प्रसारित करण्याचा मार्ग म्हणून संस्कृतीच्या माध्यमातून केले जाते.

साधारणतः संस्कृती या शब्दाचा अर्थ संस्कृती सभ्य या अर्थाने केला जातो. सामाजिक शास्त्रात संस्कृती शब्दाचा अर्थ मानवी समाजाला सामाजिक शिष्टाचार, मूल्य निर्मिती, नैतिकता, बौद्धिक विकास, इत्यादी घटकाच्या संदर्भात घेतला जातो म्हणून संस्कृती सामाजिक व्यवस्थेच्या वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक बाबीशी संबधीत आहे. याद्वारे संस्कृती ही मानवी जीवन जगण्याचा मार्ग आहे. यातून मानवाचे व्यक्तीगत व सामूहिक जीवनाचा व्यवहार प्रस्थापित केला जातो. यामधून संस्कृती व्यक्तिमत्त्व आणि समाज यांचे संबंध निर्माण होतात. त्यामूळे सामाजिक संरचनेचे व प्रघटनाचे निश्चितीकरण करतात. याचा संबंध भौगोलिक परिस्थिती वंश, धर्म, जात, स्त्री-पुरुष, व्यवसाय, ऐतिहासिक कालखंड यांच्यानुसार संस्कृतीचे स्वरुप भिन्न भिन्न स्वरुपात पाहण्यास मिळते. त्याचे विवेचन भिन्न स्वरुपात आढळते.

५.२ संस्कृतीचा अर्थ (MEANING AND DEFINITION OF CULTURE)

'संस्कृती' या शब्दाचा अर्थ सभ्य व सुसंस्कृतिक मानवी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण अशी जीवनपद्धती आहे. ती मानवी समाजात आढळून येते कारण मानवी समाजाची विचार करण्याची प्रवृत्ती इतर प्राण्यापेक्षा वेगळी आहे. त्यामूळे ही संस्कृती विभिन्न घटकांच्या आधारावर उभारली जाते कारण प्रत्येक समाजाची संस्कृती ही भिन्न भिन्न स्वरुपात पाहण्यास मिळते असे असले तरी प्रत्येक व्यक्ती व समाज आपली स्वतःच्या संस्कृतीचे प्रतिनिधीत्व आणि अस्तित्व विभिन्न स्वरुपात जतन करतात. म्हणून समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञानी संस्कृतीचा अर्थ विभिन्न प्रकारे स्पष्ट केला आहे.

समाजशास्त्रज्ञानी संस्कृती शब्दाचा अर्थ व्यवस्थेशी जोडला यामध्ये परंपरा, रुढी, मूल्य, सामाजिक नियमने, ज्ञान, भाषा, श्रद्धा, रीतीरिवाज, वागण्याच्या पद्धती मधून संस्कृती निर्देशीत होते. संस्कृती मध्ये मानवी प्रघटनाचा समावेश समाजात केला जातो. संस्कृती ही वर्तन, व्यवहार शिकण्याची बाब आहे. ती विस्तृत स्वरुपाचे आहे. मानवाच्या जन्मापासून तिच्यावरती करण्यात येणाऱ्या संस्काराच्या बऱ्याच भौतिक आणि अभौतिक पातळीवरती स्पष्ट केले जाते. यामध्ये व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाचे वर्तन तत्व आणि नैतिकतेची बांधणी निश्चितीकरण आणि प्रतिनिधत्वाच्या आधारे असते. त्यांचा व्यवहार हा आपल्या परंपरा, लोकरुढी, लोकनिती, कायदे, धार्मिक, राजकीय, आर्थिक आणि इतर प्रकाराच्या व्यवहाराशी जोडण्यात आल्या आहे.

५.३ संस्कृतीची व्याख्या (DEFINITION OF CULTURE)

संस्कृतीचा समाजिक शास्त्रीय अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न मानववंशशास्त्रज्ञ आणि सामाजिक शास्त्रज्ञ विविध प्रकारच्या व्याख्या केल्या आहेत त्यापैकी काही निवडक व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) सर एडवर्ड बी, टायलर यांनी १८७१ मध्ये संस्कृतीची व्याख्या केली. त्यांच्या मते, "संस्कृती ही एक अशी संकीर्ण समग्रता आहे की ज्यात ज्ञान, श्रद्धा, कला, नीती, कायदा, रुढी या व अशाच इतर पात्रतांचा व सवईचा समावेश होतो आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सभासद या नात्याने संपादित केलेल्या असतात." ("Culture is that complex whole which includes, knowledge, beliefs, art, morals, law, custom and any other capabilities and habits acquired by man as a member of society")

२) हार्टन आणि हंट -"ज्याचे सामाजिक अध्ययन होते आणि ज्यात समाजातील सदस्यांचा सहभाग असतो असे सर्व काही म्हणजे संस्कृती होय." ("Culture is everything which is socially learnt and shared by the members of soceity")

३) मॅलीनॉस्की - ''यांनी A Scientific Theory of culture' या ग्रंथात नमूद केले की, "संस्कृती अंतर्गत उत्तराधिकारामध्ये प्राप्त कलात्मक तथ्य, वस्तू यांत्रिक प्रक्रिया, विचार सवय व मूल्य संमिलित असतात." ("Culture as the handiwork of man and as the medium through which he achieves his ends.")

४) गोल्डनवाझर यांच्या मते, "संस्कृती अंतर्गत आमच्या धारणा विश्वास, विचार, आमचे निर्णय व मुल्य, आमच्या संस्था राजकीय व न्यायिक, धार्मिक तसेच आर्थिक, आमचे शिष्टाचार पुस्तक व यंत्र विज्ञान तत्वज्ञान आणि तत्वज्ञानी, सर्व वस्तू आणि प्राणी दोन्हीही स्वतः अनेक अंतर संबंधातंर्गत संमिलित आहे." ("Culture includes our attitudes, beliefs and ideas, our judgements, and values, our institutions, political and legal, religious and economic our ethical codes of etiquette, our books and machines, our science philosophies and philosophers all of these things and beings both in themselves and in their multiform interrelations.")

५) ड्रेसलर आणि विलीत्र यांच्या मते, "अनेक लोकांना समान असलेल्या व ज्यांचे त्यांच्या मुलांकडे संक्रमण होते अशी कौशल्य, श्रद्धा, ज्ञान आणि उत्पादित वस्तूंचा संस्कृतीत समावेश होतो." ("Culture consists of the some total of skills, beliefs, knowledge and products that are share by a number of people and transmitted to their children.")

६) डॉ. इरावती कर्वे - "संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत (जीवनपद्धत व जीवनमुल्ये म्हणजे संस्कृती")

वरील सर्व व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, संस्कृती ही गुंतागुंतीची बाब आहे. ज्यामध्ये मानवनिर्मिती भौतिक आणि अभौतिक घटकांचा समावेश होतो. यामध्ये ज्ञान, बुद्धी, कौशल्य, रुढी, परंपरा, भाषा, नम्रता, संयम या सारख्या अनेक गोष्टीचा समावेश होतो. मानवाला या सर्व गोष्टी समाजात राहून आत्मसात कराव्या लागतात असे असले तरी प्रत्येक समाजाची विभिन्न संस्कृती असते तरी ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमीत केली जाते त्यामूळे संस्कृतीचे अस्तिव बरोबर नवी संस्कृती व्यवहारात परिवर्तन स्वीकारले जाते म्हणून संस्कृती ही जगण्याचा आराखडा आहे.

५.४ संस्कृतीची वैशिष्ट्ये

संस्कृती संकल्पना समजून घेताना तिचा मुख्य अर्थ हा संस्कृती गुंतागुंतीची बाब आहे. त्यामध्ये मानवी समाजाने निर्माण केलेली सामाजिक संरचना असते. ही संस्कृती सामाजिक समुहात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमीत प्रसारित आणि संवर्धन केले जाते. ती विशिष्ट समुदायाची जीवन जगण्याची पद्धती आहे. म्हणून संस्कृतीची वैशिष्ट्ये समजून घेणे आवश्यक आहे. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) संस्कृती ही शिकावी लागते (Culture is Learnt) :

संस्कृती ही प्रत्येक व्यक्तीला शिकून घ्यावी लागते. ती व्यक्तीला परंपरेने प्राप्त होत नसते. पण त्या व्यक्तीच्या अंगभूत असणाऱ्या गुणवैशिष्ट्याच्या आधारे संस्कृती शिकली जाते. कारण तीचे स्वरुप सामाजिक समुहाच्या विभिन्न संस्कृती असते. त्यानुसार व्यक्ती वर्तनाच्या माध्यमातून संस्कृतीचे आचार विचार आणि व्यवहार शिकण्याचे काम सामाजिक समुहात करत असतो. उदा. नमस्कार आणि आभार या बाबी आदरयुक्त भावनेचा संस्कार म्हणून व्यक्ति शिकत असते.

२) संस्कृती ही सामाजिक आहे (Culture is Social) :

संस्कृती मानवी समुहामध्ये निर्माण केली जाते. त्यामूळे ती व्यक्तीगत प्रघटना नसून सामाजिक बाब आहे. कारण व्यक्ती संस्कृतीचे शिक्षण समाजातील मुल्य, परंपरा, रुढी, ज्ञान, श्रद्धा, विश्वास, नीती, प्रेरणा या सारख्या बाबी शिकत असतो. या सर्व गोष्टी समाजात निर्माण केल्या जातात. त्यामूळे व्यक्तीला या बाबी सामाजिक समुहामध्ये राहून शिकाव्या लागतात. त्यामूळे व्यक्तीच्या व्यक्तीमहत्त्वाची जडण–घडण संस्कृतीच्या वर्तन व व्यवहारानुसार समाजातच निर्माण होते म्हणून संस्कृती ही सामाजिक बाब आहे.

३) संस्कृतीचे संक्रमण होते (Culture is Transmitted) :

संस्कृती ही सयुमीत होते म्हणजे संस्कृतीचे ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होते. मानवी समाजामध्ये जन्माला येणाऱ्या बालकाला संस्कृती शिकवली जाते हे करत असताना एका पिढीची संस्कृती दुसऱ्या पिढीकडे संस्कारातून रुजवण्याचा व वर्तन व्यवहार शिकवण्याच्या स्वरुपात संस्कृतीचे संक्रमण केले जाते. हे करत असताना कुटुंब, शेजार, मित्र परिवार, वडीलधारी मंडळी, नाते संबंध, व्यक्ती, शाळा, प्रसार माध्यमे या माध्यमातून संस्कृतीचे संक्रमण केले जाते. मुले मोठी होत जातात तसतशी ती कोणते वर्तन योग्य अयोग्य यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात त्यानुसार संस्कृती, वर्तन, नियमने, मुल्य, प्रेरणा,

अभिवृत्ती इत्यादी गोष्टी जाणीवपूर्वक जुन्या पिढीकडून नवीन पिढीकडे संक्रमीत होतात. प्रत्येक पिढी आपला सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीला संस्काराच्या माध्यमातून वर्तनाच्या स्वरुपात संक्रमीत करत असतो.

४) संस्कृती मानवी गरजांची पूर्तता करते (Culture Satisfies need of the members of Society) :

प्रत्येक समाजात मानवी गरजांची निर्मिती झालेली असते. या गरजा भागल्या असता मानवी जीवन सुखी, समृद्ध, समाधानी आणि आनंदी होऊ शकते. मानवाला सामाजिक मानसिक गरजा पूर्ण करण्याचे काम संस्कृतीच्या माध्यमातून केले जाते. ह्या मानवाच्या गरजा भौतिक आणि अभौतिक संस्कृतीच्या प्रकारानुसार पूर्ण केल्या जातात. मानवाला अभौतिक गरजा मध्ये प्रेम, आपुलकी, भावना, स्नेह, मैत्री, नातेसंबंध रचना, विश्वास, प्रेरणा, श्रद्धा, नाती इत्यादी मधून पूर्ण होत असतात. तसेच संस्कृतीच्या भौतिक पातळीवर मानवाच्या उदरनिर्वाहाची साधने निर्माण केली जातात. ह्या गरजा पूर्ण करण्यासाठी संस्कृती दिशादर्शक व मार्गदर्शक भूमिका निभावत असते. यामध्ये नवीन उत्पादन वितरण आणि विनिमयाच्या पद्धती विकसित केल्या जातात. याप्रमाणे मानवी समुहातील विविध प्रकारच्या गरजा पूर्ण केल्या जातात. यातून आंतरक्रियेच्या स्वरुपात संस्कृती निर्माण होते.

५) संस्कृती अभियोजनक्षम किंवा अनुकूलदाय असते (Culture is Adeptive) :

प्रत्येक व्यक्तीला संस्कृती ही आत्मसात किंवा अनुकलक्षम करावी लागते. कारण व्यक्तीला जैविक वंशवादाच्या आधारे संस्कृती प्राप्त होत नाही तर ती संस्कृती सामाजिक वर्तन व्यवहाराच्या आधारे शिकवल्या जातात. त्यानुसार व्यक्तीला आपल्या सभोवतालच्या पर्यावरणा सोबत मिळते जुळते घ्यावे लागते. त्यामधून सामुहिकरित्या संस्कृतीचा विकास करत असतो. तसीच ती संक्रमीत करत असतो. हे करत असताना संस्कृतीच्या वर्तन व्यवहार सामाजिक समुहामध्ये अपेक्षित असणारी वर्तने, नियमने, ज्ञान, मुल्य, परंपरा, रुढी, कायदे, यांचे पालन करताना त्याला ही व्यवस्था आत्मसात करावी लागते. त्या वर्तन व्यवहाराच्या प्रकाराला सामाजिक अधिमान्यता प्राप्त करुन दिले जाते. त्या वर्तन व्यवहाराला अनुसरुन संस्कृतीचे आत्मसात केले जाते.

६) संस्कृतीचे आदर्श स्वरुप (Culture is ideal) :

संस्कृती ही आदर्श स्वरुपात असते. प्रत्येक समाजाची संस्कृती ही त्या समूदायाची आदर्श जीवन रीत असते. हा आदर्श प्रत्येक समाजात तिच्या वर्तन व्यवहाराशी संबंधीत बाब आहे. त्याचे स्वरुप विभिन्न स्वरुपात असते. ही संस्कृती आपला वारसा प्रत्येक पिढ्यांमध्ये संवर्धन, प्रसार आणि वितरण करत असते. त्यामूळे ती एक आदर्श संस्कृती म्हणून नवीन पिढीच्या समोर येते. ही संस्कृती जीवन जगण्याचा कौशल्य मूल्य आधारित शिक्षण देतात. त्यामूळे ही संस्कृती मानवी जीवन समृद्ध, सुखी, समाधानी, आनंदी करण्यास मदत करते. त्याचबरोबर नवीन ज्ञान, व्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम आदर्श संस्कृतीमधून केल्या जातात. या ज्ञानाचा वापर करुन आदर्श जीवनमार्ग निर्माण करतात म्हणून प्रत्येक नव्या पिढीला जुन्या पिढीची संस्कृत आदर्श स्वरुपात स्विकारली जाते. भारतीय संस्कृती हा जीवन जगण्याची एक आदर्श पद्धती म्हणून समोर येते.

७) भाषा-संस्कृतीचे एक मुलभूत वैशिष्ट्ये (Language - A basic characteristics of culture) :

'भाषा' ही कोणत्याही संस्कृतीचे एक मुलभूत अंग असते. या भाषेच्या माध्यमातून सामाजिक प्रतिकाची निर्मिती केली जाते. ही प्रतिके प्रत्यक्ष जीवन व्यवहारामध्ये संस्कृतीची निर्मिती, संवर्धन व प्रसारण करण्यासाठी उपयोगात आणली जाते. त्यामूळे जुन्या पिढीमधील ज्ञान, मुल्य, नियमने, कायदे, निती, प्रेरणा इत्यादीचा प्रसार वारसाच्या स्वरुपात दुसऱ्या पिढीकडे संक्रमीत होत असतो. म्हणून 'भाषा' हे कोणत्याही संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे.

८) संस्कृती ही एकात्मता निर्माण करते (Culture is integrative mechanism) :

समाज जीवनामध्ये संस्कृती ही एकात्मता निर्माण करते ती व्यक्ती आणि समाजामध्ये संस्कृती एकात्मता प्रस्थापित करत असते. ती समाजाचा कार्यभार एकत्रित करण्याचा प्रत्येय करते. तीची नियमाची व्यवस्था संघटीत रुपात रुपांतर करते ती सामाजिक संस्थांच्या स्वरुप संबंध प्रस्थापित करते. त्यानुसार समाजात प्रत्येक व्यक्तीला तिचा दर्जा भूमिक नियमने मुल्य प्रमाणके प्रदान केली जाते याला संस्कृतीचा भूमिकेतून एकसंघ निर्माण केले जाते. त्यानुसार व्यक्तिला अनेक भूमिका निभवाव्या लागतात. त्याला संघटीत स्वरुप प्राप्त होते हे संघटीत स्वरुप समाजात एकात्मता प्रस्थापित करण्याचे काम करते. याचे स्वरुप विभिन्न असले तरी संस्कृतीच्या माध्यमातून एकात्मता प्रस्थापित केली जाते. त्यामध्ये व्यक्तीच्या भूमिकेचे असणारे परस्परावलंबन हे समाजात एकात्मता निर्माण केले जाते. उदा. कुटुंब संस्थेच्या माध्यमातून समाजात संस्कृतीच्या माध्यमातून एकात्मता निर्माण करण्यात येते. अशाप्रकारे संस्कृती ही समाजात एकात्मता निर्माण करते.

९) संस्कृती अमृर्त आणि अतिव्यैक्तिक असते (Culture is abstract and it is super-individual) :

सामाजिक समुहामध्ये संस्कृतीची निर्मिती एक अमृर्त बाब आहे. संस्कृतीचे अमृर्त स्वरुप म्हणजे अप्रत्यक्ष वर्तन व्यवहार जो आपल्या डोळ्याना दिसत नाही. ही संकल्पना समाजशास्त्रीयदृष्ट्या व्यक्ती व समाज यांच्या वर्तन व्यवहाराचे स्वरुप ज्ञान, मूल्य, परंपरा, प्रेरणा, श्रद्धा, अभिवृत्ती, या गोष्टी अमृत असतात असे असले तरी मानवाने या सर्व वर्तन व व्यवहारावरती नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी उपयोगात आणली जाते. याच बरोबर ती वैयक्तिक संबंधाच्या असतात जी आपल्या पिढीना संस्कृतीक वारसा प्रस्थापित केले जाते. यामुळे संस्कृती अमृत पातळीवरती आपले वास्तव स्वतंत्ररित्या टिकवून ठेवण्यात येते.

१०) संस्कृती परिवर्तनशील असते (Culture undergoes a process of change) :

संस्कृती ही सातत्याने चालणारी परिवर्तनाची प्रक्रिया आहे. प्रत्येक समाजामध्ये संस्कृती ही कमी अधिक प्रमाणात परिवर्तित होते हे परिवर्तन लोकरुढी, लोकरीती, लोकनिती, कायदे परंपरा रुढी, श्रद्धा, विश्वास, नीती इत्यादीच्या माध्यमातून होते. प्रत्येक समाजाची सामाजिक नियमने व व्यवहार काव्यानुरुप बदलत असतात. यामागे समाजात नवीन शिक्षण व तंत्रज्ञान माध्यमातून नवीन मूल्य व वर्तन व्यवहार संस्कृती परिवर्तन निर्माण करतात तेव्हा नवीन सामाजिक मुल्य व्यवस्थेची प्रस्थापना केली जाते. त्यामूळे समाजातील जूनी जीवन मुल्य नकारुन नवीन मूल्य स्विकारली जातात. कारण नव्या मूल्याच्या प्रस्थापनेचा प्रसार प्रचार अधिक

प्रमाणात करण्यात येते. भारतात भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय धर्मनिरपेक्षता समाजवाद ही लोकशाही मूल्य स्विकारण्यात आली. त्यामूळे समाजात सामाजिक सांस्कृतिक मूल्य स्विकारली जातात ती केवळ सांस्कृतिक परिवर्तनातील बदलामधून स्पष्ट होतात.

वरील सर्व वैशिष्ट्येमधून स्पष्ट होते की, संस्कृती ही मानव निर्मित बाब आहे ती केवळ मानवी समाजामध्येच निर्माण होते. ही संस्कृती प्रत्येक पिढ्या पिढ्या मध्ये संक्रमीत करण्याबरोबर स्वीकार ही केला जातो. समाजात संस्कृतीच्या माध्यमातून एकात्मता प्रस्थापित करण्यात येते. त्यामूळे समाजात विभिन्न संस्कृती असली तरी सामाजिक वर्तन व्यवहारावरती सामाजिक नियमने प्रस्थापित केली जात ही नियमने वर्तन व्यवहाराचे स्वरुप भौतिक आणि अभौतिक स्वरुपात निर्माण करतात त्यामूळे संस्कृतीला तिचे स्वातंत्र अस्तित्व निर्माण करण्यात येते.

आपली प्रगती तपासा :

१) संस्कृती संकल्पना सविस्तर लिहा.
२) संस्कृतीची संकल्पना सांगून त्याची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

५.५ संस्कृतीचे प्रकार

संस्कृती हा शब्द सर्व समाजातील प्रत्येक व्यक्ती स्वीकार वर्तन पद्धती म्हणून स्वीकारली आहे. या संस्कृतीची निर्मिती ही सामाजिक समुहामध्ये निर्माण होते. त्याची स्वत:ची उद्दिष्ट्ये-नियम मुल्य आणि कार्य पद्धती असते. ही संस्कृती स्वंयपूर्णरित्या निर्माण केली जाते. ही संस्कृती कुटुंब, वंश समूदाय, व समाज यातून निर्मान केली जाते. प्रत्येक व्यक्ती हा समूदायाचा स्वत:ची संस्कृती निर्माण करत असतात. त्याचा विविध संस्कृती मध्ये सहभाग घेतला जातो. या व्यक्ती जुन्या परंपरा रुढी नाकारुन नवीन जीवनपद्धती स्वीकारण्याचे काम करतात.

संस्कृतीचा अभ्यास करत असताना काही समाजशास्त्रज्ञांनी संस्कृतीचे प्रकार सांगत असताना भौतिक आणि अभौतिक प्रकारामध्ये विभागणी करण्यात येते. अभौतिक संस्कृतीचे विभाजन उपसंस्कृती मध्ये करण्यात येते. त्यांच्यामध्ये परस्परासंबंधाची व्यवस्था निर्माण करण्यात आली त्यामूळे संस्कृतीच्या प्रकाराची विभागणी सविस्तरपणे करता येते.

भौतिक संस्कृती (Material Culture) म्हणजे मानवाने बनवलेल्या आणि तो वापरत असलेल्या सर्व वस्तूचा समावेश ज्या संस्कृतीमध्ये होता तीला भौतिक संस्कृती म्हणता येईल. यामध्ये अगदी सुईपासून ते विमान माहिती तंत्रज्ञानाच्या साहित्याप्रमाणे वास्तव स्वरुपातील सर्व वस्तू साधनाचा समावेश यामध्ये केला जातो. भौतिक संस्कृती मानवाच्या गरजाच्या पूर्तीमधून निमार्ण होते. त्याशिवाय मानवाच्या गरजांचि पूर्ती शिवाय जीवन जगणे अशक्य होते. मानवाने आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा इ. गरजा पूर्ण करण्यासाठी भौतिक संस्कृतीची निर्मिती करण्यात आली आहे. त्यावरती मानवाचा उदरनिर्वाह आधारभूत आहे. म्हणून मानवी जीवनामध्ये भौतिक संस्कृतीला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले. मानवाने भौतिक संस्कृतीच्या माध्यमातून पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीवरती नियंत्रण निर्माण केले आहे.

तर अभौतिक संस्कृती ही ज्ञान श्रद्धा मूल्ये प्रमाणके इत्यादी अमूर्त घटकांनी मिळून बनलेली एक संकीर्ण समग्रता होय. ही संस्कृती सामाजिक संस्थाच्या माध्यमातून संघटीत करण्याचा प्रयत्न केला जातो. या संस्कृतीचे घटक व्यक्तीकडून शिकल्या. अभौतिक संस्कृतीची व्यवस्था ही धर्म, कुटुंब विवाह, शिक्षण, अर्थ आणि शासन इत्यादी सामाजिक संस्थांच्या माध्यमातून अभौतिक संस्कृती निर्माण केले जातात. या संस्थांच्या मार्फत यांचा अभौतिक संस्कृतीचा स्वीकार केला जातो. भौतिक आणि अभौतिक संस्कृतीच्या प्रकाराचे विश्लेषणात्मक स्वरुपात मांडणी केली जाते. या दोन्ही संस्कृती सांस्कृतिक प्रतिकांची निर्मिती करण्याचे काम करतात त्या दोन्हीच्या एकत्रीत स्वरुपात दिसतात. त्या गोष्टी परस्पर संबंधी आणि अवलंबीत आहे. उदा. संगीत वादन प्रकारामध्ये वीना या साधनाचा वापर करुन संगीतातील लय पद्धत निर्माण केली जाते. यामध्ये वीणा हा भौतिक संस्कृतीचा भाग जरी असला तरी त्याच्या वादना मधून संगीत ही अभौतिक संस्कृती निर्माण होत असते. त्यामूळे भौतिक आणि अभौतिक संस्कृती ही परस्परांशी जोडण्यात आल्याचे स्पष्ट होते.

५.६ उप-संस्कृती (SUB-CULTURE)

संस्कृतीच्या प्रकाराचा अभ्यास करत असताना उपसंस्कृती आणि प्रतिसंस्कृती या दोन्हीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. व्यापक समाजामध्ये अनेक सामाजिक समुहाची विभागणी पाहण्यास मिळते. या विविध समूदायाची विभागणी मध्ये समान संस्कृती काही प्रमाणात दिसून येते. त्यानुसार त्या समुहाच्या आचार विचार आणि वर्तन व्यवहाराचे स्वरुप संस्कृतीच्या प्रकारामध्ये विभागले जाते. तेव्हा एकाच समाजातील विभिन्न समूहाच्या ज्या समूह विशिष्ट संस्कृती असतात. त्यांना उपसंस्कृती (Sub-Culture) असे म्हणतात. भारतीय लोक परदेशामध्ये जाऊन आपली संस्कृती वैशिष्ट्ये आपल्याबरोबर घेऊन जातात. या मध्ये आपली संस्कृतीक आत्मसात करतात व दोहोचे मिसळून वेगळी संस्कृती अस्तित्वात येते तिला उपसंस्कृती म्हणून ओळखून येते. या संस्कृती समग्र समाजाशी संबंधीत असतो.

उपसंस्कृती ही आधुनिक समाजात पाहण्यास मिळते. ही गुंतागुंतीची बाब आहे ती समुहाच वैशिष्ट्य म्हणून ओळखत नाही. उदा. स्थलांतरित समुदाय ही आपली स्थानिक संस्कृती घेऊन इतर ठिकाणी घेऊन जात असतो. त्या ठिकाणच्या संस्कृती मध्ये उपसंस्कृती म्हणून ओळख निर्माण करतात. त्यामूळे तो मुख्य संस्कृतीचा एक लहान भाग म्हणून

उपसंस्कृतीची ओळख केली जाते. त्यामूळे संस्कृती आणि सामाजिक व्यवस्थेचा भाग बनतो उपसंस्कृती मध्ये व्यक्तीगत कार्य आणि जीवन जगण्याचे काम केले जाते.

प्रत्येक समाजामध्ये उपसंस्कृती निर्मिती होत असते. व्यक्तीगत पातळीवरती संस्कृतीचे स्वरुप उपसंस्कृती मध्ये केले जाते. त्यामधून नवीन संस्कृती निर्माण करण्याचे काम उसंस्कृतीच्या विविधतेतून करत असतात. त्यातून संस्कृतीचे जीवन चर्द्धिं निर्माण करतात. ही संस्कृतीच्या भौतिक पातळीवरती उपसंस्कृतीची निर्मिती बर्हिगत समुहाकडून केली जाते. यामधून उपसंस्कृती अस्तित्व निर्माण करते.

काही समाजशास्त्रज्ञानी उपसंस्कृतीची नोंद ही विशिष्ट जीवनपद्धती, मुल्य, प्रमाणके आणि श्रद्धा मधून उपसंस्कृती निर्माण करतात. ही संकल्पना सामाजिक समूहामधील विविध लोकसंख्या वैशिष्टपूर्ण भागाच्या संदर्भात केली आहे. ही संकल्पना प्राथमिक स्तरावरती वंशीक समुह आणि सामाजिक वर्गाच्या संबंधीत आहे. ज्यामधून उपसंस्कृतीचे स्वरुप स्पष्ट होते. समाजशास्त्रज्ञानी उपसंस्कृती संकल्पना ही समाजातील लोकसंख्येच्या विश्लेषणात संस्कृती संदर्भात उपयोगात आणली जाते. याविषयीचे उपसंस्कृतीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येतील.

१) भौगोलिक उप-संस्कृती (Geographical sub-culture)
२) वंशिक उप-संस्कृती (Ethical sub-culture)
३) धार्मिक उप-संस्कृती (Religious sub-culture)
४) सामाजिक उप-संस्कृती (Social sub-culture)
५) राजकीय उप-संस्कृती (Political sub-culture)
६) व्यावसायिक उप-संस्कृती (Occupational sub-culture)

१) भौगोलिक उप-संस्कृती (Geographical sub-culture) :

विस्तृत भौगोलिक क्षेत्रामध्ये संस्कृती ही अधिक प्रमाणात व्यापक समाजात दिसते. त्यानुसार व्यापक संस्कृतीचे विभाजन ही उप-संस्कृती मध्ये आढळून येते. ही संस्कृती व्यावहारिक पातळीवरती बदल होतो. त्याप्रमाणे उप-संस्कृतीची निर्मिती होते. उदा. भारत देशाच्या व्यापक भौगोलिक क्षेत्रामध्ये अनेक धर्म पंथ जातीचे लोक वेगवेगळ्या प्रदेशात वास्तव करतात. त्या भागात आपले संस्कृतीक अस्थित्व उप-संस्कृतीच्या माध्यमातून अधिक काळ टिकवून ठेवण्याचे काम करत असतात. त्याप्रमाणे त्याचे जीवन पद्धती उपसंस्कृती मध्ये विभागली गेलेला आहे.

२) वंशिक उप-संस्कृती (Ethical sub-culture) :

व्यापक समाजव्यवस्थेमध्ये वंशिक उप-संस्कृती विस्तारलेला आहे. जगभरातील प्रदेशामध्ये वंशाचे अस्तित्व प्रत्येक शब्दामध्ये विभागणी झाली आहे. त्या प्रत्येक भूभागामध्ये वंशाचा स्वत:चा अभिमान अधिक प्रमाणात दिसते. त्यानुसार त्यांच्या वर्तन व्यवहाराच्या पद्धती स्पष्ट दिसते. विशेषत: वंशिक समूहाचे होणारे स्थलांतरण अधिक प्रमाणात असतात. उदा. अमेरिका, आफ्रिका, दक्षिण आशिया, युरोपीयन खंडामधील देशामध्ये भारत, चीन, जपान, कोरिया, तैवान येथून युरोपीयन अमेरिकन देशात स्थलांतरण होणारी वंशिक समूह उप-संस्कृती निर्माण करताना दिसतात. या भागामध्ये नव्या विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण व

विकासाचे कार्यक्रम निर्माण करत असतात त्यामूळे नवीन वंशिक गटाची उप-संस्कृती अधिक स्पष्ट होते.

३) धार्मिक उप-संस्कृती (Religious sub-culture) :

सामाजिक समूहामध्ये विविध धार्मिक गट स्वत:ची धार्मिक उप-संस्कृती विभागली जाते. प्रत्येक धर्म आपल्या धार्मिक तत्व विचार आचार आणि व्यवहार पद्धतीचा प्रत्यक्षामध्ये उपयोगात आणली जाते. यानुसार धार्मिक संस्कृती आपल्या उपनगरामध्ये त्याची विभागणी विविध पंतामध्ये विभागणी करण्यात यते. त्यानुसार त्याच उप-संस्कृती घटकाची व्यवस्था निर्माण होतात. या उप-संस्कृतीनुसार धार्मिक श्रद्धा, मूल्य, परंपरा, रुढी, नीती, प्रेरणा व वर्तन व्यवहाराचे नियम कायदे यांची निर्मिती केली जाते. या मधून आपली उप-संस्कृती अस्तित्वात ठेवण्यासाठी प्रयत्न करत असतात. या धार्मिक समूदायामध्ये ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदू, जुऊ बौद्ध, जैन या धर्मिय समूदायाची उप-संस्कृतीची निर्मिती करण्यात येते. त्यानुसार धार्मिक संस्कृती त्या समुदाया अंतर्गत उप-संस्कृती निर्माण करण्यात येते.

४) सामाजिक उप-संस्कृती (Social sub-culture) :

सामाजिक संरचनेची निर्मिती मध्ये सामाजिक वर्गीय हितसंबंध निर्माण केले जाते. त्यामूळे त्या विशिष्ट वर्गाच्या जीवन पद्धतीनुसार त्याची संस्कृती निर्माण होते. त्याची संस्कृती वर्गीय पातळीवरती आधारित असते. समाजशास्त्रीय दृष्ट्या सामाजिक वर्गीय उपसंस्कृती ही कुटुंब, घराच्या पद्धती भाषेच्या खानपान पद्धती या आधारे समजून घेता येते. त्याचबरोबर त्याच्या श्रद्धा, मूल्य, परंपरा रितीरिवाज प्रमाणके यांची निर्मिती करण्यात येते. त्यानुसार सामाजिक वर्गीय उप-संस्कृती पाहण्यास मिळते.

५) राजकीय उप-संस्कृती (Political sub-culture) :

राजकीय व्यवस्थेमध्ये उप-संस्कृती निर्माण करण्यात येते. यामध्ये सीमांत समुदायातील राजकीय समूह मध्ये राजकीय चर्चा करण्यामध्ये सभासद सहभागी होतात. या समुहाची उप-संस्कृती स्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. यामधील डावे आणि उजवे गट अशी विभागणी मधून राजकीय उप-संस्कृती निर्माण केले जाते. त्यांनी प्रस्थापित राजकीय संस्कृती पेक्षा आपली संस्कृती वेगळ्या स्वरुपात आहे हे उप-संस्कृतीच्या माध्यमातून स्पष्ट दर्शवतात.

६) व्यावसायिक उप-संस्कृती (Occupational sub-culture) :

व्यावसायिक उप-संस्कृती ही कामाच्या परिस्थितीशी अनुसरण निर्माण केली जाते. कामाच्या संस्कृतीचे स्वरुप अधिक गुंतागुंतीचे असते. त्याप्रमाणे त्यांचे उपविभाग स्थापित केले जातात. या उप-संस्कृती मध्ये औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रातील कामगार अधिकारी कर्मचारी व व्यवस्थापक यांच्या संबंधातून उप-संस्कृती निर्माण होते. या कर्मचाऱ्याची कामाच्या ठिकाणचे असणारे वातावरण हे व्यवस्थापक संस्कृती अंतर्गत आणि बर्हिगत स्वरुपात स्पष्ट करते.

वरील सर्व उप-संस्कृतीच्या प्रकारामधून संस्कृतीचे स्वरुप स्पष्ट केले जाते. समाजामध्ये मुख्य संस्कृतीमध्ये उप-संस्कृती निर्माण केली जाते. ही उप-संस्कृती स्वत:चे श्रद्धा, मूल्ये, परंपरा, रुढी, नीती प्रमाणके नियमने यांची निर्मिती करण्यात येते. त्यामूळे संस्कृतीचे

वेगळेपण स्थापित करण्यात येते ही संस्कृती मुख्य संस्कृतीपासून वेगळेपण निर्माण करते. ते अंतर्गत आणि बर्हिगत स्वरुपामध्ये समाविष्ट करण्यात येते.

आपली प्रगती तपासा :

१) उप-संस्कृती संकल्पना स्पष्ट करा.
२) उप-संस्कृतीची संकल्पनेचे प्रकार स्पष्ट करा.

५.७ प्रति संस्कृती (COUNTER-CULTURE)

संस्कृतीच्या प्रकाराचा अभ्यास करत असताना उप-संस्कृती आणि प्रति-संस्कृती या दोन्हींचा करता येईल. यामध्ये उप-संस्कृती ही प्रभुत्वकारी संस्कृतीचे पेक्षा वेगळ्या प्रकारे निर्माण करते. तर प्रति-संस्कृती ही प्रस्थापित संस्कृतीच्या परस्पर विरोधी स्वरुपामध्ये निर्माण झालेला असते. ही संस्कृती तरुण पिढ्यामध्ये अधिक प्रमाणात वाढत असते. जुन्या प्रथा परंपरा रुढी निती श्रद्धा मूल्य नियमने यांना प्रति नवी संस्कृती निर्माण करण्याचे काम केले जाते. सन १९६० नंतरच्या काळामध्ये प्रति-संस्कृती उभारण्यात आल्याचे दिसते. यामध्ये विशेषतः नव तरुण वर्गाने स्वतःची संस्कृती प्रस्थापित संस्कृतीच्या विरोधात जाऊन उभारण्याचे काम केले. उदा. हिप्पीची संस्कृती ही देखील प्रति-संस्कृती म्हणून समोर आली त्यांनी समाजाने घालून दिलेल्या सामाजिक वर्तन व नियमाच्या बाह्य वर्तन करुन स्वतःची संस्कृती प्रति-संस्कृतीच्या स्वरुपात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. म्हणून ती प्रति-संस्कृती म्हणून ओळखण्यात आली.

प्रति-संस्कृतीची निर्मिती ही प्रस्थापित संस्कृतीच्या विरोधामध्ये आपले स्वतःची संसकृती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. ते जुन्या मूल्य, परंपरा, श्रद्धा, मूल्य नियमने प्रमाणके इत्यादीच्या विरोधाजन्य व्यवस्था प्रस्थापित प्रति-संस्कृती म्हणून उभारताना दिसतात. प्रति-संस्कृतीची निर्मिती ही प्रभुत्वकारी संस्कृतीच्या पद्धतीच्या पालन करण्यामधून व्यक्तीगत पातळीवरती अपयश निर्माण होते. त्यामूळे व्यक्ति त्या संस्कृती विरोधा प्रति संस्कृती प्रस्थापित करण्याचे काम करत असतो. उदा. बेरोजगार तरुण समाज विघातक कृत्यामध्ये समावेश होतो. कारण त्याच्या रोजगाराचा प्रश्न सोडवला जात नाही. त्यामूळे त्यांना असा समाज विघातक समूहामध्ये समावेश होतात ते त्याचे नैराश्य घालवण्यासाठी समाजातील प्रस्थापित संस्कृती विरोधा प्रति-संस्कृती गटात सहभाग होतात.

आपली प्रगती तपासा :

१) प्रति-संस्कृती म्हणजे काय त्याचे स्वरुप स्पष्ट करा.

५.८ संस्कृतीची कार्य (FUNCTION OF CULTURE)

संस्कृती संकल्पनेचा अभ्यास केला असता मानवी जीवनामध्ये संस्कृतीचे महत्त्व असल्याचे स्पष्ट होते. याविषयी संस्कृती मानवी जीवनाशी बांधणी कार्यात्मक स्वरुपात करते. त्यामूळे मानवी जीवन सुखी, समृद्ध, आंनदमय आणि समाधानी निर्माण होते. सामाजिक बदलाच्या प्रक्रियेमध्ये संस्कृतीचे कार्य महत्वपूर्ण राहते. म्हणून संस्कृती अभ्यासकांनी संस्कृतीची कार्य पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

१) समाजसुधारणेत योगदान (Contribution in Social Reforming) :

समाजामध्ये संस्कृतीच्या माध्यमातून समाजसुधारणा निर्माण केली जाते. समाजामध्ये व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह आणि समूहा-समूहा मध्ये संस्कृतीच्या माध्यमातून संबंध प्रस्थापित होतात. तेव्हा या संबंधामध्ये सुधारणा घडवून आणणारी श्रद्धा, मूल्य, ज्ञान, परंपरा, रीतीरिवाज निती नियमने निर्मिती करण्यात येते तेव्हा समाज सुधारणा निर्माण होते यासाठी संस्कृती योगदान देत असते.

२) समाजव्यवस्थेची बांधणी करणे (Contruction of Social System) :

संस्कृती समाजव्यवस्थेच्या बांधणी मध्ये सामाजिक संस्थांच्या माध्यमाने बांधणी करते. समाजामध्ये सामाजिक संस्थांच्या माध्यमात सामाजिक नियमांची निर्मिती करत असतात. ही करत असताना समाजव्यवस्थेची रचना अधिक बळकट करण्यासाठी संस्कृती प्रयत्न करते. त्यासाठी समाजामध्ये समाजव्यवस्थेची बांधणी करणारी मूल्य व नियमनाची रचना करण्यात येते. त्यामूळे समाजात एकात्मता निर्माण केली जाते. परिणामी समाजव्यवस्थेची बांधणी करण्यात संस्कृति कार्य करते.

३) व्यक्तींच्या गरजांची पूर्तता (Fulfillment of human needs) :

संस्कृती ही प्रत्येक समाजात विभिन्न स्वरुपात आढळून येते. त्या समाजाची जीवन जगण्याची पद्धती म्हणून प्रचलीत होते, ती संस्कृती व्यक्तीची शारीरिक, मानसिक आणि सामाजिक गरजांची पूर्तता करत असतात. हे करत असताना आपल्या संस्कृतीक मूल्य, परंपरा, ज्ञान, श्रद्धा, नियमने प्रमाणकाचे नीती प्रेरणा विश्वास इ. सर्व घटकांचा प्रचार संवर्धन जतन करण्यात येते. ही मूल्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण करण्यात येतात. त्यामूळे

समाजाला अपेक्षित असणारी जीवन मूल्ये संस्कृती माध्यमातून व्यक्तीच्या गरजा पूर्ण केल्या जातात.

४) समाजीकरण आणि व्यक्तिमहत्त्वाच्या विकासात योगदान (Contribution in Socialization and personality Development) :

संस्कृतीच्या माध्यमातून समाजातील व्यक्तीचे समाजीकरण आणि व्यक्तिमहत्त्वाचा विकासाचे कार्य केले जाते. या माध्यमातून व्यक्तीचे समाजीकरणामध्ये नवीन वर्तन पद्धतीची शिकवण दिली जाते. व्यक्तीला सामाजिक वर्तन व नियमाची ओळख करुन दिली त्यामूळे व्यक्तीची व्यक्तिमहत्व विकसित करण्यासाठी योग्य, अयोग्य, चूक बरोबर वर्तन व नियमाच्यानुसार व्यक्तीपर संस्कार निर्माण केला जातो. त्यातून व्यक्तीच्या व्यक्तिमहत्त्वाची योग्य जडण घडवून करवून आणली जाते. त्यामूळे संस्कृती ही व्यक्तिमहत्त्वाची व समाजीकरणाची निर्मिती कार्य करते.

५) सुसंवाद निर्माण करणे (Good Communication) :

संस्कृती ही व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह, समूह-समुहा मध्ये आंतरक्रियेचे व्यवस्था निर्माण करते. संस्कृती ही सुसंवादाच्या माध्यमातून समाजव्यवस्था निर्माण करते. यासाठी भाषांचा माध्यम म्हणून सुसंवादाची निर्माण करण्यास उपयोगात आणल्या जातात. त्यामधून प्रतिक व लिपीची याचा वापर करुन संवाद साधला जातो. या सांस्कृतिक साधण्याचा वापर करुन समाज व्यवस्थेला व्यक्तीच्या योग्य वर्तनाला मान्यता देते यामुळे सुसंघटीत व सुशिक्षित सामाजिक जीवन जगता येते.

वरील सर्व मुद्यांवरुन संस्कृतीची कार्य समाजव्यवस्थेमध्ये सुरक्षित, सुसंघटित आणि सुशिक्षित एकात्मा निर्माण करण्यासाठी होते, समाजव्यवस्थेमध्ये स्थिरता प्राप्त करण्यासाठी संस्कृती महत्त्वपूर्ण भूमिका निभावत असते.

आपली प्रगती तपासा :

१) संस्कृतीची कार्य थोडक्यात स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

५.९ सारांश (SUMMARY)

सर्व मानवी समाज हा गुंतागुंतीचा प्रक्रियेत परस्पर संबंधीत आहे. त्या समाजाचे स्वतंत्र अस्तित्व टिकवुन ठेवण्यात येते. यामध्ये संस्कृतीचा अर्थ मानवी जीवन पद्धतीशी संबंधीत अशी बाब आहे. ज्यामध्ये व्यक्ती व समाज स्वत:ची कृती करण्यामध्ये कार्यरत असतात. त्याचा उपयोग, उत्पादन आणि समजून घेणे या संबंधीत संस्कृतीची कृतीशिलता स्पष्ट होते ही व्यवस्था सामाजिक समुहातील अंतरसंबंधाची व्यवस्था निर्मिती करत असते.

मानवी समाजात संस्कृतीचे स्वरुप हे लवचिक स्वरुपात व्यवस्था पर्यावरण निर्माण करते. यामध्ये भौतिक आणि अभौतिक संस्कृतीचे प्रकार निर्माण करतात. त्याचबरोबर भाषेची निर्मिती ही संस्कृती निर्मितीमध्ये सहभाग घेतात. तो संस्कृतीचा भाग आहे ती समूहाच्या माध्यमातून निर्माण केली जाते. त्यामध्ये उप-संस्कृति निर्माण होते. ही संस्कृती निर्माण करताना वर्तन व व्यवहाराचे नियम स्थापित करण्यात ज्ञान, श्रद्धा, मूल्य, परंपरा, रुढी, विश्वास, नाती, प्रेरणा या सर्व घटकांचा समावेश होतो. या सर्व गोष्टी शिकाव्या लागतात. प्रत्येक समाजात विभिन्न सांस्कृतिक स्थरावरती निर्माण करतात. आधुनिक समाजात नवी सांस्कृतिक मूल्याची परंपरा गुंतागुंतीची दिसून येतात. त्यातुन जुनी सांस्कृतिक मूल्य सोडून नवीन मूल्यव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम संस्कृतीच्या माध्यमातून होताना दिसून येतात.

५.१० संदर्भ सूची (SUGGESTED READING)

1. Abraham Francis M. (2010) Contemptorary Sociology : An Introduction to Concept and Theories, New Delhi, Oxford University Press.
2. Macionis John (2005) Sbmociology (10th Edition) Prentce Hall.
३. डॉ. सर्जेराव सांळुखे २०१० समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना, पुणे प्रोपिशन्ट हॉऊस.
४. डॉ. दिलीप खैरनार २००८ समाजशास्त्राचा परिचय, पुणे डायमंड पब्लिकेशन.

५.११ अभ्यासाचे प्रश्न (QUESTION PATERN)

१. संस्कृतीची व्याख्या सांगून त्याची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.
२. संस्कृतीच्या उपसंस्कृतीच्या प्रकाराचे विश्लेषण करा.
३. संस्कृतीच्या उपसंस्कृती आणि प्रतिसंस्कृतीचे स्वरुप स्पष्ट करा.
४. संस्कृतीच्या कार्याच्या सविस्तर विश्लेषण करा.
५. उप-संस्कृती संकल्पना स्पष्ट करा.
६. उप-संस्कृतीची संकल्पनेचे प्रकार स्पष्ट करा.
७. प्रति-संस्कृती म्हणजे काय त्याचे स्वरुप स्पष्ट करा.

❖❖❖❖

६

संस्कृती (CULTURE)

घटक रचना :

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ संस्कृतीचे घटक
६.३ स्व-समूह श्रेष्ठतावाद
६.४ संस्कृतिक सापेक्षावाद
६.५ संस्कृतिक धक्का / भीषणता
६.६ संस्कृती गुण-विशेष
६.७ सांस्कृतिक सार्वत्रिकता
६.८ सांस्कृतिक परिवर्तन / बदल
६.९ पर-संस्कृति केंद्रियवाद / पर-संस्कृति श्रेष्ठ केंद्रियवाद
६.१० सारांश
६.११ संदर्भसूची
६.१२ अभ्यासाचे प्रश्न

६.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVE)

१. संस्कृतीचे घटक समजून घेणे.
२. संस्कृतीचे विविध प्रकारांचे विश्लेषण स्पष्ट करणे.

६.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

संस्कृती या शब्दाचा अर्थ मानवी जीवन जगण्याची पद्धत असा होतो. ही गुंतागुंतीची व अमृत स्वरुपात समजली जाणारी संकल्पना आहे. त्यामुळे तिचे स्वरुप विभिन्न समाज घटकांमध्ये आढळून येते. समाजशास्त्रीय दृष्ट्या सर्व मानवी समाजामध्ये संस्कृती आढळून येते ही संस्कृती श्रेष्ठ व कनिष्ठ अशा स्वरुपात मानली जाते. त्याप्रमाणे त्याचे स्वरुप परंपरा, रुढी, नीती, कायदे, श्रद्धा, ज्ञान, भाषा सामाजिक नियमने, विश्वास वागण्याच्या प्रथा, पद्धती याद्वारे स्पष्ट होते. या सर्वांमधून संस्कृतीचे प्रतिनिधित्वकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. हे

प्रतिनिधीत्व कला, क्रीडा, संगीत, नाटक, सिनेमा, तंत्रज्ञान इत्यादींच्या स्वरुपामध्ये करत असते, ही संस्कृती प्रसारित होते त्यासाठी एक संस्कृतीक जीवनाचा वारसा दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केला जातो. त्यामुळे संस्कृतीचे सातत्य व वारसाचे सर्वधन करण्याचे काम केले जाते. तसेच ही संस्कृती विशिष्ट कालखंड व भूप्रदेश याप्रमाणे परिवर्तीत होत असते. म्हणून या प्रकरणात संस्कृती या संकल्पनेचे विश्लेषण समजून घेताना संस्कृतीचे घटक, स्व-समूह श्रेष्ठवाद सापेक्षवाद, सांस्कृतिक धक्का संस्कृती गुण विशेष संस्कृती सार्वत्रिकता परिवर्तन पर समूह श्रेष्ठतवाद इत्यादी संकल्पना समजून घ्यायच्या आहेत.

६.२ संस्कृतीचे घटक (COMPONENTS OF CULTURE)

संस्कृती ही समाजाचे स्वरुप म्हणून समोर येते. यासाठी संस्कृतीची संकल्पनेची रुपरेषा आणि व्याप्ती लक्षात घेण्यासाठी संस्कृतीचे घटक समजून घेणे आवश्यक आहे. या घटकांमध्ये ज्ञान, श्रद्धा, मूल्य, प्रमाणके आणि भाषा इत्यादीचा समावेश केला जातो. या घटकाच्या माध्यमातून नागरीकरणाची / सभ्यताकरणाची प्रक्रिया केली जाते. यासाठी समाजात परंपरा, रुढी, प्रथा, मूल्य, प्रमाणके इत्यादीचा वापर करुन संस्कृतीचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी संस्कृतीच्या घटकाची व्यवहारामध्ये उपयोजन केले जाते. त्यामूळे संस्कृतीचे संवर्धन, प्रसारण आणि आत्मसातीकरण करण्यात येते. यासाठी संस्कृतीचे घटक पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ज्ञान (Knowledge)
२) विश्वास / श्रद्धा (Beliefs)
३) मूल्ये (विश्वास) (Values)
४) प्रमाणके किंवा नियमने (Norms)
५) प्रतिके (Symbols)

१) ज्ञान (Knowledge) :

संस्कृतीच्या निर्मिती मध्ये ज्ञानाचा समावेश हा बोद्धात्मक संस्कृती घटकांमध्ये करण्यात येते. ती जगाचे वास्तव म्हणून ओळखली जाते. ज्यामध्ये माहितीचा स्त्रोत म्हणून त्याचा वापर करण्यात येतो. ही माहिती वास्तवाशी निगडीत स्वरुपात असते. हे ज्ञान भौतिक जगतामधून निर्माण केले जाते. हे ज्ञान, सवय, अंतर्ज्ञान, सामान्यज्ञान आणि अधिकार या प्रमुख उगम स्त्रोतापासून होते. या ज्ञानाच्या आमस्त्रोताना ज्ञानाचे अशास्त्रीय स्त्रोत असे म्हटले जाते. हे ज्ञान वस्तुनिष्ठ आणि सत्याच्या आधारावरती निर्माण करण्यात येते. त्याआधारे वास्तविक पुरावा उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. तरच त्याची सत्यता पडताळून पाहता येते. जे ज्ञान वास्तव सत्यतेच्या पातळीवरती तपासता येते त्यालाच ज्ञानाचा दर्जा देता येतो. या ज्ञानाची संस्कृतीच्या संरचनेच्या बांधणीत महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. कारण सामाजिक जगता मध्ये ज्ञानाचा वापर सामान्याकडून विशिष्ट घटकांकडे निर्माण होतो. उदा. तंत्रज्ञानाच्या वापरामधून तांत्रिक उत्पादन प्रक्रिया वाढते, पण त्याचा परिणाम बेरोजगारी वरती अधिक स्वरुपात पाहण्यास मिळते.

२) विश्वास / श्रद्धा (Beliefs) :

श्रद्धा किंवा विश्वास हे घटक संस्कृतीची निर्मिती करतात. समाजामध्ये व्यक्ती व समूह यांच्यामध्ये विश्वास किंवा श्रद्धा या सामाजिक संबंधाची व्यवस्था निर्माण करतात. यातून संस्कृतीच्या आचरण व्यवहाराची निर्मिती केली जाते. विश्वास आणि श्रद्धांची निर्मिती ही भुतकालीन, धार्मिक, आधार, लोकमत शास्त्रीय आधार इत्यादी घटकांच्या आधारे मानवी विश्वास आणि श्रद्धांची निर्मिती केली जाते. त्या आधारे प्रत्येक घटनेच्या संदर्भात सत्य-असत्य, खरे-खोटे ठरवणे अशक्य होते. हा एक भावनात्मक मानसिक प्रक्रियेचा भाग आहे. उदा. देवावर विश्वास श्रद्धा ठेवणे, पूर्नजन्म, स्वर्ग-नरक, पाप-पूण्य, भूत-पिशाच्य, शकून-अपशकून इत्यादी बाबींचा विश्वास आणि श्रद्धा यांच्याशी संबंधीत बाबी आहेत. या श्रद्धा आणि विश्वास यांचे स्वरुप विभिन्न प्रकारे समाजात दिसते. त्याचे सार्वत्रिक स्वरुप आढळत नाही. कारण त्या शास्त्राच्या कसोटीवरती तपासता येत नाही ते केवळ अभौतिक जाणीवेच्या सामाजिक जगताची व्यवस्था संस्कृतीच्या स्वरुपात निर्माण करतात. उदा. देवावरती श्रद्धा ठेवून नमस्कार करणे. पवित्र्य वस्तू मानने अशा अनेक प्रकारच्या श्रद्धा समाजात निर्माण होतात.

३) मूल्ये (Values) :

समाजामध्ये मूल्यांच्या आघातावरती संस्कृती आधारभूत आहे. यामध्ये काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे यासंबंधीत निर्देशीत करणाऱ्या सामाजिक विचारांना मूल्य असे म्हटले आहे. यानुसार व्यक्तीचे आचरण कसे असावे याचे निश्चितीकरण केले जाते. मूल्य हे व्यावहारिक सामान्यकृत अशा नियमाची व्यवस्था संवेदनात्मक व सकारात्मक स्वरुपाचे असते. यामध्ये व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात भावनात्मक निर्मिती होते. यातून व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडण होते तसेच मूल्यांच्या माध्यमातून आंतरक्रिया घडून येतात. त्यामुळे समाजात एकीकरण अधिक प्रमाणात वाढते. समाजात आपलेपणातून भावनिक एकात्मकीकरण घडून आणल्यामुळे वितुष्ठ वाद आणि संघर्षाचे प्रमाण कमी होते. उदा. भारताने लोकशाही व्यवस्था टिकवण्यासाठी राज्यघटनेमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय आधारित मूल्यव्यवस्था प्रस्थापित केली आहे.

४) प्रमाणके किंवा नियमने (Norms) :

सामाजिक नियंत्रणाचे काम नियमने प्रमाणकाच्या माध्यमातून समाजव्यवस्थेत केले जाते. व्यक्ती व समूहाच्या वर्तनाची पद्धती मूल्यांच्या आधारे प्रमाणकाची निर्मिती केली जाते. समाजातील विविध भूमिका धारण केलेल्या व्यक्तीची परस्परांशी कसे वागावे याविषयीचा नियम आहे. सर्वच मानवी समाजात नियमाची प्रमाणकांची व्यवस्था असते. त्यांना संपूर्ण समाजाचा पाठिंबा असतो. हे नियम वर्तन व्यवहारांची बाब असल्याने ते कोणाला दिसत नाही. म्हणजेच ते अर्मुत पातळीवर मनात बाळगता व वर्तनावर नियंत्रण आणणारी म्हणजे नियम होय. व्यक्तीने कसे वागावे हे सांगणारे नियम असतात. समाजातील व्यक्ती व समूहाचे वर्तनाचे नियम करुन समाजव्यवस्था निर्माण करणे व समाजाला स्थैर्य प्राप्त करुन देणे ही महत्त्वाची जबाबदारी नियमने / प्रमाणके निभावतात.

नियमनाचे तीन प्रकारे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

अ) लोकरीती (Fokways) :

'Fokways' ही इंग्रजी संज्ञा सर्वप्रथम विल्यम ग्रॅहम समनेर या समाजशास्त्रज्ञानी वापरली. Fokways या शब्दाचा अर्थ लोकरीती असा होतो. समनेर यांच्या मते, 'समाजमान्य

असे वागणुकीचे किंवा वर्तनाचा प्रकार म्हणजे लोकरीत.' दैनंदिन जीवनामध्ये एखाद्या समाजात दृढ झालेला वर्तन प्रकार म्हणजे लोकरीती होय. संभाषण, भोजन, अभिवादन, पोशाष यासंबंधीच्या वर्तनप्रकार लोकरीतीमध्ये समावेश होतो. ही वर्तन पद्धत साचेबद्ध स्वरुपाची असते. पण या पाळल्या जाव्यात अशी सक्ती नसते. ती अनोपचारी रित्या व्यक्तीच्या वर्तनावरती नियंत्रण ठेवते. याचा फायदा असा होतो की कसे वागावे, कसे बोलावे, यांचा स्वतंत्रपण विचार करावा लागत नाही. ही पद्धती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. त्या माध्यमातून संस्कृतीचे संक्रमण होत राहते.

ब) लोकनीती (Mores) :

समाजशास्त्रज्ञ विल्यम सम्नेर यांनी लोकनीती ही संकल्पना वापरली. लोकरीती आणि लोकनीती यांची तुलना केली असता लोकनीतीना अधिक प्रमाणात मान्यता दिली जात नाही. लोकनीती मोडल्या तर लोक इतके गंभीरपणे घेतले जात नाहीत. उदा. रस्त्याने जाताना एखाद्याने नमस्कार केला नाहीतर काही फरक पडत नाही. समाजामध्ये लोकनीतीचे पालन केले नाही तर त्याचे इतके गांभीर्याने घेतले जात नाही. पण लोकरीतीचे पालन करण्यास उल्लंघन केल्यास त्याचे परिणाम समाजामध्ये दिसतात. सम्नेर यांच्या मते, लोकांच्या ज्या सवयी आणि परंपरा लोकनात्याला पोषक आहेत अशी पक्की खात्री जेव्हा होते आणि त्यानुसार लोकांचे वर्तन असावे म्हणून सक्ती होते तेव्हा त्याला लोकनीती म्हणतात. तर जे.एम. शेफर्ड म्हणतात, सामाजिक रचनेच्या कल्याणासाठी केंद्रीय महत्त्वाची अशी जी नियमने असतात त्यांना लोकनीती म्हणतात. या व्याख्याचा अर्थ असा स्पष्ट होतो की, समाजाच्या कल्याणासाठी उपयोगात आणला जातो. लोकनीतीची उदाहरणे अनेक असतात. एक पतीनीत्व पाळणे, विवाहपूर्वी लैंगिक संबंध पाळणे, राष्ट्रध्वजाचा मान राखणे इ. लोकनीती उदाहरणे आहेत. प्रत्येक समाजात लोकरीत विभिन्न स्वरुपात असतात. लोकरीती ही त्या त्या समाजातील मूल्ये असतात. लोकनीतीना आदर्श मानून वर्तनाची योग्ययोग्यता ठरवली जातात. याची अंमलबजावणी अनौपचारिक रित्या होत असते. यामुळे सामाजिक स्वास्थ निर्माण करतात.

क) कायदा (Law) :

समाजाच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेमध्ये औपचारिक नियंत्रण ठेवण्यासाठी कायद्याची निर्मिती करण्यात येते. जेव्हा लोकनीतीच्या अंमलबजावणीसाठी शासनयंत्रणा क्रियाशील बनते तेव्हा लोकनीतीचे कायद्यामध्ये रुपांतरण होते याचे लिखित स्वरुपात रुपांतरण केले जाते. यामध्ये कायद्याचे दोन प्रकार पडतात. पहिला प्रथागत कायदा (Customary Law) म्हणजे समाजातील संबंधीत लोकरीतीना प्रथागत कायदा म्हणतात तर अधिनियमित कायदा म्हणजे राज्या मार्फङत कायदेमंडळात जाणीवपूर्व व नियोजनबद्ध कायदे तयार करतात याला अधिनियम कायदा (Enacted Law) असे म्हणतात. हे कायदे लिखित स्वरुपात असतात याची अंमलबजावणी न्यायालय व पोलिस यंत्रणे मार्फत प्रभावीपणे केली जाते. कायदे तयार करण्यासाठी राज्यव्यवस्थेची निर्मिती केली जाते. त्याचे स्वरुप लिखित असते. ते हेतुपूर्वक तयार करतात. ते आधुनिक समाजाच्या नियंत्रणाचे साधन आहे ते सामाजिक परंपरा रुढी, प्रथा, अंधश्रद्धा यामध्ये सुधारणा करवून समाजात सामाजिक परिवर्तन निर्माण करण्याचे काम करतात. सामाजिक नियंमने ही समाजात लोकरीती, लोकनीती आणि कायदे यांच्या माध्यमातून सामाजिक वर्तनावरती नियंत्रण प्रस्थापित करतात. हे तिन्ही घटक परस्परांशी संबंध आहे. कारण याचे मुख्य उद्दिष्ट्ये समाजामध्ये सामाजिक वर्तनावरती नियंत्रण ठेवण्यासाठी असतो.

५) प्रतिके (Symbols) :

प्रतिकाद्वारे संस्कृतीची निर्मिती केली जाते. संस्कृतीचे भौतिक आणि अभौतिक प्रकाराचा अभ्यास करताना प्रतिकाचा वापर केला जातो. प्रतिकाचा मुख्य हेतू हा विशिष्ट संस्कृतीला अर्थ प्रदान करण्याचे काम करणे या प्रतिकांच्या माध्यमातून सामाजिक आंतरक्रियेची निर्मिती केली जाते. व्यक्ति समाजामध्ये आंतक्रिया करत असताना प्रतिकाचा वापर साधन म्हणून करत असतो. या साधनामध्ये कला, चिन्ह, भाषा, हावभाव इत्यादींचा वापर करुन प्रतिकाची निर्मिती केली जाते. संस्कृती निर्मिती मध्ये प्रतिकाच्या स्वरुपात भाषेचा वापर केला जातो. ती व्यक्ती व समुदायाच्या मध्ये भाषेच्या माध्यमातून संवाद साधला जातो. त्या माध्यमातून शब्द लिपी आणि चिन्हाचा वापर करुन भाषेचे स्वरुप नोंदवण्यात येते. भाषेचा वापर करुन ज्ञान, विचार, मूल्य अभिवृत्ती श्रद्धा यांचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला वारसाच्या स्वरुपात देण्यात येतो. हे भाषेच्या माध्यमातून संवाद साधला जातो. त्याआधारे सामाजिक जीवनाचे नियोजन करण्यात येते. तसेच विचाराचे आदान-प्रदान करण्यासाठी भाषा ही प्रतिकाची व्यवस्था निर्माण करते, समाजव्यवस्थेत भाषेच्या आधारे विविध घटकांचे वर्गीकरण करणे शक्य होते, त्यामुळे सहजरित्या सामाजिक घटनेचे स्पष्टीकरण आणि विश्लेषण करणे शक्य होते. त्यानुसार संस्कृतीच्या भाषेच्या प्रतिकाचे स्वरुप स्पष्ट केले जातात. उदा. धर्माचे प्रतिक म्हणून धार्मिक स्थळे ग्रंथ संगीत गायन या सारखी प्रतिके निर्माण होतात.

वरील सर्व मुद्यामधून संस्कृतीच्या घटकांचे विश्लेषण करणे शक्य होते. संस्कृतीचे घटक हे सामाजिक संरचनेची बांधणी करत असतात. यामध्ये ज्ञान मूल्य प्रमाणके प्रतिके यांचा समावेश केला जातो. संस्कृती समजून घेण्यासाठी या सर्व घटकाचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. तरच संस्कृतीची संकल्पना समजून घेणे शक्य होईल.

आपली प्रगती तपासा :

१) संस्कृतीच्या घटकांचे सविस्तर विश्लेषण करा.

_____

_____

_____

_____

_____

६.३ स्व-समुह श्रेष्ठतावाद (ETHNOCENTRISM)

समाजशास्त्राच्या मुलभूत संकल्पना मध्ये स्व-समुह श्रेष्ठतावाद ही संकल्पना महत्त्वाची समजली जाते. ही संकल्पना सर्वप्रथम विल्यम जी. सम्नेर यांनी 'Fokways' (१९०६) या ग्रंथात प्रथम मांडली. मराठी मध्ये Ethnocentrism या शब्दाचे रुपांतर स्व-समूह श्रेष्ठतावाद असे करतात. सर्व साधारणपणे या शब्दाचा अर्थ असा की आपली संस्कृती केंद्रस्थ मानून आपला समुह वा संस्कृती हीच श्रेष्ठ आहे आणि इतरांची संस्कृती कनिष्ठ स्वरुपाचे आहे अशी मानण्यास प्रवृत्ती म्हणजे स्व-समूह श्रेष्ठतावाद होय. आपली संस्कृती श्रेष्ठ आहे असा स्व-समूह

श्रेष्ठतावाद होय. आपली संस्कृती श्रेष्ठ आहे असा स्व-समुह श्रेष्ठतावाद मानत असतो ही संकल्पना संस्कृतीच्या अभ्यासामध्ये वर्तन व व्यवहाराच्या संदर्भात समजली जाते. ज्यामध्ये दोन समूहाचा स्व-संस्कृतीचा तुलनात्मक विश्लेषण श्रेष्ठ-कनिष्ठात्वाच्या आधारे केले जाते.

स्व-समुह श्रेष्ठतावादाची व्याख्या समजून घेताना विल्यम सम्नेर यांच्या मते, "स्वतःच्या समुहाला सर्व गोष्टी केंद्रस्थानी मानून इतर सर्व गोष्टीचे मोजमाप करण्याच्या व इतरांचा दर्जा आपल्या समुहाच्या संदर्भात निश्चित करण्याचा दृष्टिकोन म्हणजे स्व-समुहकेंद्रियता होय." (Ethnocentrism is that "View of things in which one's own group is the center of everything and all others are scaled and reted with reference to it.") विल्यम पी. स्कॅट (समाजशास्त्र शब्दकोष) 'आपलीच संस्कृती वा समूह मुलतःच श्रेष्ठ आहे अशी त्याच्याविषयीची अभिवृत्ती म्हणजे स्व-समूहकेंद्रियता होय.' (Attitude of regarding one's own culture or group as inherently superior')

लाईट आणि केनर यांच्या मते "आपली जीवनरीत-वर्तनप्रकार श्रद्धा, मूल्य, नियमने, हीच जीवन जगण्याची खरी योग्य रीत आहे अशी मानण्याची प्रवृत्ती म्हणजे स्व-समुहकेंद्रियता होय." (The tendency to see one's own way of the life including behaviour, beliefs, values, and norms as the only right way of living")

वरील सर्व व्याख्या मधून स्व-समूह श्रेष्ठतावादाची संकल्पना समजून घेण्यास सोपे जाईल. या सर्व व्याख्या मध्ये काही समान अर्थ सामावलेला आहे. स्व-समूह श्रेष्ठतावाद ही एक सामाजिक मानववंशशास्त्रीय संकल्पना अभिवृत्तीच्या संदर्भात पाहिली जाते. ती स्वतःच्या केंद्रस्थानी मानून इतर संस्कृतीला कनिष्ठ मानते. यामध्ये मूल्यमापन करत असताना स्वतःच्या संस्कृतीला मानले जाते. त्यामूळे साहजिकच इतर समूदायाला कनिष्ठ स्वरुपात पाहिले जाते.

आपलीच संस्कृती इतरांपेक्षा कशी श्रेष्ठ आहे याविषयीची चर्चा केली जाते. आपल्या समाजातील परंपरा, रुढी, प्रथा, श्रद्धा, चालीरीती इतर संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ आहे असा समज प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. त्यामूळे स्वतः समूह श्रेष्ठ ही अभिवृत्ती समोर येते. आपल्या समूहाची कला, संगीत, नृत्य, गायन, साहित्य हे स्वतःहून श्रेष्ठ मानताना इतरांच्या संस्कृतीची तुलना केली जाते. तेव्हा इतर संस्कृतीला कनिष्ठ मानले जाते. हे अभिवृत्त प्रत्येक समूहातील उपसमुहामध्ये विभिन्न स्वरुपामध्ये पाहण्यास मिळते. उदा. आपला धर्म, जात, वंश, कुटुंब, शाळा, महाविद्यालय व राजकीय पक्ष, हेच श्रेष्ठ मानताना इतरांना कनिष्ठ समजले जाते. या प्रकारामध्ये स्व-समूह अंतर्गत केंद्रस्थानी श्रेष्ठ मानतात तर इतर समुहाच्या संस्कृतीला दुय्यम समजण्यात येते.

स्व-समुह केंद्रियता निर्माण होण्यामागच्या कारणांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की त्यामध्ये स्व-समूहश्रेष्ठतावाद ह्या सवयीमूळे निर्माण होतो. आपल्या सवईच चांगल्या वाटायला लागतात. इतरांना दुय्यमतेचे स्थान दिले जाते. दूसरे संस्कृतीच्या संदर्भात ज्ञानाचा अभाव मधून स्व-समूहकेंद्रीयवाद निर्माण होतो. इतरांची संस्कृती विषयीचे असणारे ज्ञानविषय माहिती नसते तरी देखील इतरांची संस्कृती दुय्यम मानून आपलीच संस्कृती श्रेष्ठ असा स्व-समूहकेंद्रियता निर्माण करते. आपल्या संस्कृतीची जोपासना करण्यासाठी स्व-समूह

केंद्रीयवादाचा आग्रह धरला जातो. त्याचबरोबर काही व्यक्ती व समूहामध्ये व्यक्तिगत उणिवा समोर न आणण्यासाठी स्व- समूहकेंद्रीयदाची जोपासना केली जाते. इतर समूदायाच्या संस्कृती आचार व अभिव्यक्तीला दुय्यम स्वरुपात समजले जाते.

स्व-समूहकेंद्रियवादाचे परिणाम संस्कृतीच्या संदर्भात अभ्यास केला जातो. याचे चांगले वा वाईट परिणाम कसे होतात त्यानुसार त्या समूहाचे स्वरुप समजून घेता येते. हे कार्य सहकारात्मक आणि संघर्षात्मक स्वरुपात पाहण्यास मिळते. स्व-समूहकेंद्रवादामुळे समाजामध्ये एकात्मतेची भावना निर्माण मध्ये सहिष्णुता, समूहनिष्ठा आणि मनोधैर्य वाढवण्यास मदत होते. स्व-समूहकेंद्रियतावादी विचारामधून देशभावना राष्ट्रवादाची जाणीव निर्माण करता येते.

स्व-समूह केंद्रीयवादामधून चांगले परिणाम दिसतात. तसेच वाईट परिणाम ही आढळून येते. यामुळे सामाजिक परिवर्तना विषयीचा विचार आणि कृती करण्यास आढळता येतो. केवळ समाज आपली स्व-समूहकेंद्रीयवाद संकल्पना श्रेष्ठ मानून इतर संस्कृतीला दुय्यमत्व दिले. आपल्या संस्कृतीमध्ये नवीन घटकांचा स्वीकार केला जात नाही. त्यामूळे नवीन परिवर्तनाच्या बाबींचा समावेश करण्यास नकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यात येतो. उदा. स्व-समूहकेंद्रीयवाद स्वरुप धार्मिक अल्पसंख्यांक समूहामध्ये अधिक प्रमाणात दिसते.

६.४ सांस्कृतिक सापेक्षवाद (CULTURAL RELATIVISM)

सांस्कृतीक सापेक्षवादाचा अर्थ योग्य अयोग्यता, नीती-अनीतीच्या, चांगले-वाईटपणाचा कल्पना असते असा अर्थ समजला जातो. एखाद्या समाजात जी नियमने व मूल्ये असतात त्यापेक्षा अगदी वेगळी नियमने व मूल्ये दुसऱ्या एखाद्या समाजात असू शकतात. एखाद्या समाजाने निश्चित केलेल्या नियमने आणि मूल्ये ही दुसऱ्या समाजात चुकीचे समजून येतात. कोणते वर्तन योग्य कोणते वर्तन अयोग्य. नैतिक अनैतिक याविषयीच्या कल्पना ह्या त्या समाजापुरत्या मर्यादित असतात. अशा प्रकाराला सांस्कृतिक सापेक्षवाद असा अर्थ घेतात. उदा. काही समाजात दारु पिणे योग्य समजले जाते तर काही समाजात दारु पिणे अयोग्य समजले जाते.

सांस्कृतिक सापेक्षवाद या संकल्पनेचा अर्थ असा की, प्रत्येक संस्कृती गुण तो ज्या संस्कृतीचा घटक आहे त्या संस्कृतीच्या चौकटीतच अर्थपूर्ण असतो. त्याचा अर्थ त्या संस्कृती संदर्भाथच घेतला जातो कारण तो गुण त्या विषिष्ट समूहापुरताच मर्यादित असतो. याचा अर्थ वर्तकृता अभिव्यक्ती आणि व्यवहाराच्या संदर्भात स्पष्टीकरणाच्या व विश्लेषणाच्या स्तरावरती अभ्यासली जाते.

भारतीय समाजव्यवस्थेत विवाहापूर्वी संतती जन्मास घालण्यास समाज स्वीकारत नाही. त्यामुळे समाजात गर्भपाताचे आणि अनाथ मुलांचे प्रमाण अधिक वाढते. पण फिलिपाईन्स देशातील बोन्टोक (Bontoc) या आदिवासी जमाती मध्ये विवाहपूर्व गर्भधारणा मान्य केली जाते. या जमातीमध्ये विवाहपूर्व तरुण तरुणींना लैंगिक संबंध ठेवण्याची अधिमान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे विवाहपूर्व गर्भधारणेतून होणाऱ्या अपत्याला समाज मान्यता देतो. ज्या मुलींना मुले होत नाहीत त्यांची लग्ने होणे अडचणीचे होऊन बनते या संस्कृती अभ्यासामध्ये सापेक्षवाद हा वर्तन व्यवहाराचे चांगला वाईट अर्थ निश्चित केला जातो. त्या संस्कृतीनुसार श्रद्धा, आचार-

विचार, मूल्य, परंपरा, रुढी, नीती व व्यवहार यांचे निश्चितीकरण केले जाते. ही व्यवस्था चांगली किंवा आदर्श म्हणून व्यक्ती त्याचा स्वीकार करत असतो. त्याची समाजाच्या दृष्टीने उपयुक्तता लक्षात घेऊन इतर समुदायाच्या संस्कृतीचा व्यवहार समजून घेता येईल.

आपली प्रगती तपासा :

१) स्व-समूह केंद्रीयता संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.
२) सांस्कृतिक सापेक्षवादाची संकल्पना म्हणजे काय ?

६.५ सांस्कृतिक धक्का / भिषणता (CULTURAL SHOCK)

संस्कृतीच्या प्रकारामध्ये सांस्कृतिक धक्का भिषणता या संकल्पनेचा समावेश केला आहे. प्रत्येक समाजामध्ये स्वत:ची अशी सामाजिक संस्कृती असते. आपल्या संस्कृतीनुसार व्यक्ती, श्रद्धा, परंपरा, रुढी, ज्ञान, आचार-विचार पद्धती, नीती, नियमने, मूल्य यांचे आचरण करत असतो. पण ही व्यवस्था विभिन्न भिन्न समाजामध्ये पाहण्यास मिळते. या सांस्कृतिक भिन्नतेमुळे एखाद्या समूदायातील व्यक्तीला अचानक दुसऱ्या समाजामध्ये जाऊन त्याची सांस्कृतिक वर्तन प्रकार शिकावे लागते. तेव्हा जुन्या अगोदरच्या परंपरा सोडून नवीन संस्कृती पद्धती स्वीकारावी लागते तेव्हा सांस्कृतिक धक्का भिषणता म्हणता येते.

त्या मूल्य परंपरा अशा रुढी नियमाशी व्यक्तीला स्वीकाराव्या लागतात. त्यावेळी त्या सर्व गोष्टी नव्याने स्वीकाराव्या लागतात. उदा. भारतीय व्यक्ती अमेरिकन देशामध्ये गेल्यानंतर त्या व्यक्तीला अमेरिकेन पद्धतीचे सांस्कृतिक आचार-विचार मूल्य परंपरा श्रद्धा प्रथा नियमांचे पालन करावे लागते तेव्हा त्याला भारतीय सांस्कृतिक व्यवहाराप्रमाणे जीवन जगता येत नाही त्यांना त्या गोष्टी सोडून नवीन गोष्टी स्वीकाराव्या लागतात तेव्हा त्याच्या जीवनात अचानक सांस्कृतिक जीवनात बदल होतो हे स्वीकारताना सांस्कृतिक भिषणता धक्का निर्माण केला जातो ही संकल्पना इतर संस्कृतीशी एकरुप न होणाऱ्याच्या बाबत वापरलेली आहे. कारण परदेशी संस्कृतीशी कोणीही सहजासहजी एकरुप होताना आढळून येत नाही. त्यामध्ये व्यक्ती समुदायातही नवीन पद्धतीचे सांस्कृतिक जीवन जगावे लागते. उदा. फॅशन मध्ये दिवसेंदिवस बदल होताना पाहावयास मिळते. तेव्हा व्यक्तीला फॅशनच्या विविध प्रकारचा स्वीकार सांस्कृतिक पातळीवरती करावे लागतात.

६.६ संस्कृती गुण विशेष (CULTURE TRAIT)

संस्कृतीची रचना निर्माण केलेली असते. तिचा संबंध हा परस्पर घटकावरती आधारभूत असतो. ती विभिन्न घटकापासून निर्माण करण्यात येते हे घटक सांगणे त्यांचे वर्णन

संस्कृती रचना मध्ये पहावे लागते. संस्कृतीक रनचेमधील महत्त्वाचा घटक म्हणून संस्कृती गुणाकडे पाहिले जाते. Hobel यांच्या मते, "संपादित वर्तनप्रबंध किंवा भौतिक वस्तू यांचा सर्वात लहान घटक म्हणजे संस्कृती गुण होय." संस्कृतीच्या भौतिक स्वरुपामध्ये असणारे घटक हे गुण म्हणून ओळखले जातात. उदा. पुस्तक, शाळा, वाहन यासारखे अनेक भौतिक वस्तू व गुण म्हणून ओळखतात. तर अभौतिक घटकामध्ये विश्वास श्रद्धा, करुणा, मैत्री, प्रज्ञा, मूल्य या सर्व घटकाचा अभौतिक गुण म्हणून समावेश होतो.

प्रत्येक संस्कृती अनेक गुण असतात यांचा परस्पर संबंधातून गुणाचा मिळालेला पुंज म्हणजे संस्कृती संकुल (Cultural Complex) होय. जेव्हा अनेक संस्कृती गुणविशेष व्यवस्थितरित्या एकत्र येतात, एकमेकांशी गुणबद्धरित्या संबंधित असतात व एकत्रितपणे विशिष्ट कार्य एकत्रितपणे पार पाडतात तेव्हा त्या संस्कृती गुणविशेषाच्या समूच्याला संस्कृती संकुल (Cultural Complex) म्हणतात. उदा. शाळेच्या निर्मितीमध्ये विद्यार्थी शिक्षक वर्ग, फळा, नकाशा, पुस्तके खडू इत्यादी घटकांचा समावेश एकत्र आल्याने होतो. शाळेमध्ये शिक्षक अध्यापनाचे कार्य करत असतो. तसेच विद्यार्थी ही अध्ययन करण्याचे काम काम करतो असे विविध संस्कृतीचे संकुल समाजामध्ये संस्थात्मक पातळीवर निर्माण केले जातात. त्यामधून समाजातील व्यक्तीच्या गरजा पूर्ण केल्या जातात.

समाजामध्ये संस्कृती संकुलनाच्या माध्यमातून एकत्रित येऊन एक नवीन संस्कृती विशिष्ट रुप धारण करते. तेव्हा संस्कृतीच्या त्या रुपास सांस्कृतिक प्रतिमान (Cultural Pattern) असे म्हणतात. या संस्कृतीच्या रचने मधून विशिष्ट संस्कृती इतरांपेक्षा वेगळेपण स्पष्ट करत असते. ही संकल्पना रुथ बेनडिक्ट यांनी Patterns of Culture या ग्रंथामध्ये मांडली. त्यांनी विभिन्न आदिवासींच्या संस्कृतीचा अभ्यास करुन संस्कृती प्रतिमान संकल्पना मांडली. त्यांनी मेलॅनेशियातल डोबुयन, न्यू मेक्सिकोतील अुनी आणि व्हकुव्हर बेटावरील कबकिअन इंडियन या समाजाचा सविस्तर अभ्यास केला.

६.७ सांस्कृतिक सार्वत्रिकता (CULTURE UNIVERSALS)

विभिन्न समाजामध्ये अनेक प्रकारच्या संस्कृतीचे वास्तविक स्वरुप पाहण्यास मिळते असे असले तरी प्रत्येक समाजातील संस्कृती भिन्न असली तरी सामाजिक संस्था रचना व्यवस्थामध्ये साधर्म आढळते. कारण ती प्रत्येक मानवी समूहात आढळून येते. तसेच समाजातील व्यक्तीच्या मुलभूत स्वरुपाच्या गरजा समान प्रमाणात दिसून येतात. या मुलभूत गरजाची पूर्ती करण्यासाठी सामूदायिक पातळीवरती सामाजिक संस्थाची निर्मिती करण्यात आली. ह्या गरजा भौतिक आणि अभौतिक पातळीवरील सामाजिक संबंधामधून पूर्ण केल्या जातात. प्रत्येक संस्कृतीमध्ये परंपरा, रुढी, प्रथा, विश्वास, श्रद्धा, नीती, नियमने, भाषा इत्यादी घटकांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे प्रत्येक समाजात भौतिक, संस्कृती असते. त्यामध्ये अगदी सुईपासून आधुनिक तंत्रज्ञानापर्यंत वस्तू व सेवांचा समावेश केला जातो. या दोन्ही संस्कृतीच्या माध्यमातून मानवी गरजा पूर्ण करण्यात येतात. या गरजा करण्याचे माध्यम म्हणून सामाजिक संस्थांची निर्मिती करण्यात आली. उदा. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था, राज्यसंस्था, शिक्षणसंस्था असा अनेक संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. ज्यामधून मानवी गरजा पूर्ण केल्या जातात. यामध्ये विशिष्ट प्रकारचे जीवन जगण्याची पद्धती स्पष्ट केली आहे. त्याला

सांस्कृतिक सार्वजिकता असे म्हणू शकतो. कारण संस्कृतीच्या व्यवहाराचे सार्वत्रीकरण झालेले असते, त्यानुसार जीवन जगण्याची पद्धत रुढ झाल्याचे स्पष्ट दिसून येते.

६.८ सांस्कृतिक परिवर्तन / बदल (CULTURE CHANGE)

समाजामध्ये सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया सातत्याने चालू असते. सद्यस्थितीमध्ये समाज अनेक श्रद्धा व्यवस्था आणि संस्कृती व्यवहाराणी बांधणी करण्यात आला आहे. ज्यांना शास्त्रीय आधार प्राप्त झालेला नाही. यामध्ये अनेक श्रद्धा मिथक आणि अंधश्रद्धा यांचा समावेश होतो. त्या संस्कृतीची आचार विचार वर्तन व्यवहार पद्धती विभिन्न आहेत. याचे स्वरुप जातीव्यवस्था आणि संयुक्त कुटुंबामध्ये पाहण्यास मिळते. या सांस्कृतिक परिवर्तनामध्ये शिक्षण, राजकारण आणि राजकीय क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. मानवाने निर्माण केलेल्या अशा भौतिक आणि अभौतिक गोष्टींचा समावेश यामध्ये होतो. संस्कृतीच्या कोणत्याही घटकात होणारा बदल म्हणजे सांस्कृतिक परिवर्तन (Cultural Change) होय. उदा. मानवाने निर्माण केलेली वस्तू, यंत्र, इमारती, तंत्रज्ञान, वाहने इत्यादी घटकांचा समावेश होतो. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम भाषण, गायन, वादन, नृत्य प्रकार, वेशभूषा, कपडे या घटकाचा समावेश सांस्कृतिक घटकांमध्ये सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक परिवर्तन यांच्या संबंधाची व्यवस्था परस्पर संबंधीत असली तरी सांस्कृतिक परिवर्तन सामाजिक परिवर्तन होऊ शकत नाही. उदा. नवीन तंत्रज्ञान शोध हा सांस्कृतिक परिवर्तनाचा भाग असतो. उदा. संगणकाच्या शोधाने अर्थ व्यपित्य सेवा क्षेत्रे यामध्ये बदल घडून आले आहे. ऑगर्बन यांनी तंत्रज्ञानाच्या परिवर्तनाचा परिणाम सार्वत्रिक जीवनावरती होताना पाहण्यास मिळतो. त्याचे चांगले व वाईट परिणाम असू शकतात.

सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रसारण अधिक प्रमाणात येताना दिसतात. कारण नवीन विकासात्मक तंत्रज्ञान आणि प्रसारमाध्यमामध्ये प्रचंड प्रमाणात बदल होत आहे. त्यामूळे दैनंदिन जीवनामध्ये सांस्कृतिक बदलाचा परिणाम सांस्कृतिक प्रसारणामधून अधिक प्रमाणात परिणाम करतो. त्यामधून अध्यावत स्वरुपाची संस्कृती निर्माण होते. Fast food, Rock music, Coca Cola, Pizza या सारख्या खाण्यापिण्याच्या पद्धती बदल जाताना दिसतात. विशेषतः प्रसारमाध्यम गतिशिलता अधिक प्रमाणात असल्याने माहिती व तंत्रज्ञानचा प्रसार अधिक गतिशील वापर संस्कृतीच्या प्रसारात हातो. नवीन फॅशन सवयी क्षेत्रे आणि ठिकाणे यांमध्ये बदल दिसून येतात.

सांस्कृतिक परिवर्तनाच्या संदर्भात अनेक संकल्पना आणि सैद्धांतिक पद्धतीचा वापर करण्यात येऊ लागला. या सांस्कृतिक परिवर्तनामधून नवीन आयाम संस्कृतीच्या संदर्भात निर्माण होत आहेत. विल्यम ऑगबॉर्न निमकॉक यांनी संस्कृतीच्या रेंगाळण्याची (Cultural lage) ची संकल्पनात्मक सिद्धांत स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते संस्कृतीच्या भौतिक घटकात वेगाने परिवर्तन घडवून येते आणि अभौतिक सांस्कृतिक अतिशय मंद गतीने परिवर्तन घडवून येत असल्याने ती परिवर्तनात मागे राहते म्हणून या स्थितीचे निर्देशन करण्याला सास्कृतिक प्रस्थापन रेंगाळणे (Cultural lag) अशी संज्ञा वापरली आहे.

ऑगबर्न यांच्या मते तंत्रज्ञानात्मक प्रगती वेगाने घडून येते. पण त्यामानाने नियमने, मूल्ये, श्रद्धा, धर्म आणि दैनंदिन जीवनातील वर्तन पद्धती नियंत्रित ठेवण्यासाठी अभौतिक

संस्कृती बाब मात्र मंद गतीने बदलत असते. तंत्रज्ञानाच्या बदलामुळे नवीन सांस्कृतिक मूल्यव्यवस्था प्रस्थापित केली जाते. या सर्वांमधून नवीन ताणतणावाची व विसंवादाची परिस्थिती निर्माण होते. समाजामध्ये अटळता निर्माण होते. त्यामधून सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रियाला सामोरे जावे लागते.

६.९ पर-संस्कृति केंद्रियवाद / पर-संस्कृति केंद्रियवाद (XENOCENTRISM)

पर-समूह केंद्रियवाद हा स्वृसमुहवादाच्या सांस्कृतिक संकल्पनेपेक्षा भिन्न स्वरुपाचा आहे. पर-समूह श्रेष्ठतावाद म्हणजे इतर समुहाच्या संस्कृतीला श्रेष्ठतावाद देऊन आपली स्वत:ची संस्कृती कमी समजणे असा होतो. आपल्या समाजाचे सांस्कृतिक जीवन पद्धती जगत असतो त्याही पेक्षा वेगळी पद्धतीचे इतर संस्कृती जीवन जगत असतात. त्यामध्ये त्याचे आचार विचार परंपरा श्रद्धा मूल्य खाणपाण, केशभूषा, वेशभूषा, पूजा-अर्चा इत्यादींचा समावेश होतो. ही एक मनोभावना आहे की जी उत्पादन पद्धतीची संकल्पना ह्या आपल्या समुहाचे संस्कृतीवेद श्रेष्ठता देण्याचे काम केले जाते. याचे उदाहरण म्हणून १८ व्या शतकामध्ये युरोपामध्ये Primitive movement म्हणून Noble Savage ही संकल्पना कलेच्या संदर्भामध्ये समोर येताना दिसते. या संकल्पनेचा वापर स्वयमकेंद्रियवादाची संकल्पना तपासण्यासाठी केला जातो. व्यक्ति पातळीवरती स्वसमूहकेंद्रियवादाची चिकित्सा करण्याच्या दृष्टिकोनातून पाहिली जाते. पर-संस्कृतीक केंद्रियवाद ही परकीय सांस्कृतिक व्यवस्थेला महत्त्व देण्याचे काम करते. त्यामुळे साहजिकच स्वसमूहकेंद्रियवादाच्या विरोद्धामध्ये अभ्यासता येते. ज्यामध्ये स्वत:च्या उत्पादन पद्धती ही इतरांच्या श्रेष्ठतेहून कमी समजली जाते. ही संकल्पना विकसनशील आणि अप्रगत राष्ट्राच्या जनतेमध्ये दिसून येते. ही काही कारणाने निर्माण होते. पहिले अप्रगत आणि प्रगत राष्ट्रातील आर्थिक सामाजिक तफावत दूसरे स्थानिक बाजारपेठेच्या अभावी बंद पडणारे उद्योग तिसरे विकसनशील आणि अप्रगत राष्ट्रांवर प्रगत राष्ट्रातील व्यक्तीचे असणारे वर्चस्व. उदा. अमेरिकन देशाचे अविकसनशील देशावरील वर्चस्व या संकल्पनेचा वापर स्वृसमूहाच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी इतर समूदायाच्या सांस्कृतिक मूल्याचा आधार घेतला जातो.

आपली प्रगती तपासा :

१) सांस्कृतिक परिवर्तनाच्या संकल्पनेची व्याख्या स्पष्ट करा.
२) पर समूह श्रेष्ठतावादाची संकल्पना सविस्तर लिहा.

_____

_____

_____

_____

_____

६.१० सारांश (SUMMARY)

संस्कृती या शब्दाचा अर्थ समाज किंवा समूहाच्या मूल्य व्यवस्थेचा संदर्भात वापरला जातो. याचा भाग भौतिक आणि अभौतिक व उपसंस्कृती या प्रकारातून समजून घेता येतो. ही सामाजिक वास्तवाची विश्लेषणात्मक बाब आहे. यामध्ये सांस्कृतिक पार्श्वभूमि निर्माण करण्याचे काम संस्थात्मक पातळीवरती संघटनात्मक स्वरुपात केले जाते. ही मानवनिर्मित बाब आहे जी मानवी सक्षमतेची निर्मिती आणि शिकण्याची प्रक्रिया आहे. ती प्रतिकांच्या माध्यमातून परस्पर संबंधीत बाब म्हणून समोर येते. यासाठी प्रतिकात्मक संवाद म्हणून भाषेचा वापर केला जातो. ही भाषा नवीन संकल्पनात्मक मांडणी करते. या विषयाचा अभ्यास समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्र या सामाजिक अभ्यास शाखामध्ये वर्तन व्यवहाराची बाब म्हणून समोर येते. याचाच प्रकार म्हणून स्वसमूह केंद्रीयवाद, पर समूह केंद्रियवाद सांस्कृतिक रेंगाळणे या संकल्पना मधून संस्कृती प्रकार समोर येतो. या सामाजिक मानसशास्त्रीय प्रक्रिया आहेत. प्रत्येक संस्कृती ही विशिष्ट भौगोलिक परिस्थिती मध्ये निर्माण होत असते. त्यामध्ये विभिन्न व्यवहारामध्ये साध्यर्म व वैधर्म्य स्वरुपात दिसून येतात त्याचे स्वरुप अनेक घटकात विभागले जाते. ज्यामध्ये प्रभूत्वकारी संस्कृती उभारताना दिसून येते. ती बहुसंख्य समूदायाला आपल्या वर्तनाच्या पद्धती स्वीकाराव्या लागतात. त्यातून सांस्कृतिक वर्चस्व आधारित समाज उभारताना पाहण्यास मिळतो. त्याच्या विरोधामध्ये प्रतिसंस्कृती निर्माण केली जाते. ही दैनंदिन जीवनात घडणारी बाब आहे. संस्कृती ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

६.११ अभ्यासाचे प्रश्न (QUESTION PATERN)

१. संस्कृती म्हणजे काय सांगून संस्कृतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
२. संस्कृतीचे घटक सविस्तर लिहा.
३. संस्कृतीची स्व-समूहकेंद्रियता ही संकल्पना सविस्तर लिहा.
४. सांस्कृतक परिवर्तन - टीप लिहा.

६.१२ संदर्भ सूची

1. Abraham Francis M. (2010) Contemptorary Sociology : An Introduction to Concept and Theories, New Delhi, Oxford University Press.
2. Giddens Anthony (2001) Sociology (4th Edition) Polity Press.
3. Macionis John (2005) Sociology (10th Edition) Prentce Hall.
४. सांळुखे सर्जेराव २०१३ समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना, पुणे प्रोफिशन्ट पब्लिशिंग हॉऊस.
५. खैरनार दिलिप २००८ समाजशास्त्र परिचय, पुणे डायमंड पब्लिकेशन.

❖❖❖❖

७

मिडिया - नवीन सामाजिक माध्यमे
(NEW SOCIAL MEDIA)

घटक रचना :

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ समाज माध्यमाचा अर्थ
७.३ समाज नेटवर्किंग / मिडिया
७.४ सामाजिक माध्यमाचे प्रकार
७.५ समाज माध्यमांचा नकारात्मक परिणाम
७.६ समाज माध्यमांचे सेवांचे वैशिष्ट्ये / गुण
७.७ सारांश
७.८ अभ्यासाचे प्रश्न
७.९ संदर्भ सूची

७.० उद्दिष्ट्ये

१. नविन समाज माध्यमांची ओळख करुन देणे.
२. नविन समाज माध्यमांची विविध प्रकाराचा परिचय करुन देणे.
३. समाज माध्यमांचा समाजावर होणारा नकारात्मक आणि सकारात्मक परिणामांची माहिती करुन देणे.
४. समाज माध्यमाचा नविन सेवे संबंधी गुण वैशिष्ट्यांचे अवलंबन होण्यासाठी मदत करणे.

७.१ प्रस्तावना

आधुनिक काळात नविन नविन पद्धती यंत्र आणि तंत्राचे संशोधन केले जात आहे. यामधून मानवी सेवेसाठी यांचा विकास आणि संपूर्ण जगात प्रसार ही केला जात असतो अशा माहितीच्या प्रसारणासाठी पारंपारिक प्रसार माध्यमे पुस्तके, वर्तमानपत्रे, चित्रपट, नाटके, दूरदर्शन, रेडियो वगैरे साधणे उपयोगात आणली जात होती परंतु अशा पारंपारिक समाज माध्यमांवर विशिष्ट उच्च प्रभुत लोकांचीच मक्तेदारी निर्माण झाली आहे. आधुनिक काळात माहिती प्रसार तंत्र ही बाब अतिशय महत्त्वाची बनली आहे. याचाच फायदा घेऊन नविन माहिती तंत्रज्ञानाच्या विकासातून एक नवीन संकल्पना निर्माण झाली ती म्हणजे समाज माध्यमे होय. मोबाईल आणि संगणकाच्या मदतीने जागतिक वेबला जोडून कोणती व्यक्ती आपली माहिती

प्रसारित करु शकते आणि दुसऱ्याची माहिती मिळवू शकते यासाठी एका संकेत स्थळावर आपले खाते खोलावे लागत असते.

समाजाच्या हातातील इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यम म्हणजे समाज माध्यम होय. समाज ही माध्यमे पाहिजे तसे आणि हवे तसे वापर करु शकतात आणि या माध्यमांचा वापर करण्याची पद्धती अगदी सुलभ आहे. आज सर्वांकडे स्मार्टफोन सहजतेने उपलब्ध आहेत. हा स्मार्टफोन आपले विचार आणि संदेश आपल्या नेटवर्क मध्ये जलद आणि प्रभावीपणे प्रसारित करु शकतो. मग ते फोटो असो किंवा विडियो जर सदर पोस्ट किंवा मजकुर चांगला असेल तर वाइरल (प्रसार) होण्यास वेळ लागत नाही. पण या सर्व प्रस्तुतीकरण आणि वेळ टाइमिंग खूप महत्त्वाची असते.

समाज माध्यमातील प्रमोशन :

एकाच वेळी बऱ्याच सोशल साईटस वरती जेव्हा आपण कॅम्पेन / प्रचार करतो आणि जेव्हा लोक ती पोस्ट (मजकुर) आपल्या नेटवर्क मध्ये शेअर करतात आणि जेव्हा आपोआप आपल्या व्यवसाय किंवा विचारांचे प्रमोशन होते. हा समाज माध्यमांचा सर्वात मोठा उपयोग आहे. जो पारंपारिक माध्यमांतून करणे शक्य नाही. यामध्ये आपल्या पोस्टचे "सेल्फ लाईक" जास्त असेल तर ती पोस्ट कायम राहत असते म्हणजे जो पर्यंत ती साईट अस्तित्वात आहे अगदी कमी खर्चात आपण जास्तीत जास्त लोकांपर्यंत सहज पोहाचू शकतो. म्हणूनच अनेक NGOs आणि सरकारी संस्था समाज माध्यमांचा अधिक उपयोग करतात.

जनसंपर्क घडवून आणणारे क्रांतीकारी साधन म्हणजे समाज माध्यमे होय. जगातील बहुसंख्य लोकांची जीवन या समाज माध्यमांनी व्यापून टाकली आहे. भारतासारख्या देशामध्ये तर या नविन समाज माध्यमांचा वापर वाढत आहे. एका सर्वेक्षणानुसार जगातील सर्वात अधिक समाज माध्यमांच्या वापर करणांच्या यादीत भारताच्या प्रथम क्रमांक लागत आहे. परंतु यामुळे व्यक्ती जीवन संकुचीत बनत चालले आहे. सामाजिक जीवना संबंधी आभासी आणि चुकीची चित्र रंगवली जात आहे का ? नैराश्य वाढत चालले आहे का ? द्वेषभाव वाढत चालला आहे का ? अशा अनेक प्रश्नांचा विचार करण्याची वेळ आलेली आहे.

७.२ समाज माध्यमाचा अर्थ

नव सामाजिक जीवनाचा अविभाज्य घटक बनलेली फेसबुक, व्हॉट्सॲपचा वापर म्हणजे समाजमाध्यमे होय. समाजमाध्यमे अभासी विश्वात वावरत असल्यामुळे सामाजिक विचार-आचार संकुचित मानसिकता निर्माण होत आहे. असे काही समाजशास्त्री अभ्यासकांच्या लक्षात येत आहे. कारण बहुत समाजमाध्यमे वापरकर्ते आपल्या विचारांची साम्य असलेले विचार, लेख, बातम्या आणि चित्रांचा शोध घेत असतात.

समाज माध्यमांमुळे जनसमूह, आपले लोक आपल्या विचारांचे मुद्दे यांच्यामध्ये समतोल राखणे आणि त्या संबंधी चर्चेत सहभागी होण्याची सर्वांना संधी मिळत आहे, पण त्याच बरोबर सामाजिक सलोखा बिघडवणे, हिंसक कृत्य करण्याची, चूकीचे वर्तन करण्याच्या प्रवृत्ती बळावत

आहे. शिवाय वैयक्तिक स्वार्थ साधण्याचा प्रयत्नही केला जात आहे. म्हणून समाजमाध्यमे ही फायदा पेक्षा नुकसानच अधिक करणारी ठरु लागली आहेत.

समाज माध्यमांमुळे मानवांची संकुचित विचारधारा आणि मानसिकता बनु लागली आहे. असे समाजशास्त्री अभ्यासकांचे मत आहे. अनेक समाजमाध्यमांचे वापरकर्ते आपल्या विचारांशी जुळणाऱ्या विचाराच्या बातम्यांचा शोध घेत आहेत. समाजमाध्यमे समाजाला एकमेकांपासून वेगळे करु लागली आहेत. सामाजिक भेदभाव वाढीस मदत करु लागली आहेत. या शिवाय अपुरा किंवा चुकीचे समज पसरवण्यासाठी समाज माध्यमांची मदत होत आहे. असे अभ्यासवृत्ती पाहिल्यास दिसून येत आहे.

अमेकरिकेतील बोस्टन विद्यापीठातील एक संशोधना :

सूचना आणि कटकारस्थान या दोन मुद्यांवर आधारित संशोधन करण्यात आले आहे. यानुसार फेसबुकचे काही वापरकर्ते विशिष्ट प्रकारचीच माहिती निवड करुन इतर लोकांशी शेअर करतात म्हणजे बाकीच्या बाबी दुर्लक्ष करताना दिसून आले होते. सोशल मिडियाच्या वापर करणाऱ्या लोकांत ही बाब स्पष्टपणे दिसून आली होती. बहुसंख्य समाज माध्यम वापरकर्ते आपल्या विचारांशी साम्य असलेल्या विचारांशी संबंधीत मजकुरांच्या शोधात असतात.

नैराश्यग्रस्त समाज :

समाजमाध्यमाच्या वापर केल्यामुळे पाच पैकी एक व्यक्तीने सांगितले होते की, समाजमाध्यमाच्या वापरा नंतर नैराश्य येते. यामध्ये ३० वर्षापेक्षा कमी वयोगटातील वापरकर्त्यांचे प्रमाण अधिक होते. तरुण वयातील व्यक्तीच्या आयुष्यात समाजमाध्यमे एक महत्त्वाचा घटक निर्माण झाली आहेत. असे लोक स्मार्टफोन्स शिवाय इतरांशी संवाद साधण्यास असमर्थ होऊ लागली आहेत. या लोकांना स्नॅपचॅट, इन्स्टाग्राम आणि फेसबुक पाहणे आणि नेहमीच प्रत्येक गोष्टीत दैनंदिन अपडेट माहिती टाकण्याची सवयी या वर्गांना लागल्या आहेत. ही बाबी समाजाच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे हे प्रत्येकांनी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

जीवनात चुकीचे चित्र :

समाज माध्यमांचा समान उपयोग केल्यामुळे चिंताग्रस्त, एकलकोंडेपणा, आणि आत्मविश्वासाचा अभाव वाढण्याचे प्रमाण दिवसेंदिवस बळावत आहे. शिवाय झोप कमी येण्याची समस्या ही निर्माण होऊ लागली आहे. समाजमाध्यमात आपल्या समुहाबरोबर ऑनलाईन राहून आपल्या जीवनाचे अभासी चित्र रंगवले जात आहे.अशा आभासी काल्पनिक विश्वात आपल्या अपेक्षा वाढत आहेत. परिणामी आपल्या फोटोला किंवा पोस्टला लाईक, शेअर्स किंवा कंमेट कमी मिळाल्यास काहीतरी कमतरता आपल्यात आहे असे वाटत असते.

चिडचिड व्यक्ती स्वभाव :

समाज माध्यमांतून वापरकर्ते आपल्या वैयक्तिक अनुभवांना अनोळखीच्या व्यक्तीसमोरही खुलेपणाने मांडत असतात. आजकाल ट्विटर व फेसबुक सारख्या माध्यमांचा उपयोग एक-दुसऱ्यांच्या उखाळ्या-वाकाळ्या काढण्याचे प्रभावी साधन निर्माण झाले आहे. आज अनेक महिलांना वाईट दृष्टिकोनातून लक्ष केले जात आहे. आज अनेक तरुण फोनवरील संदेश वाचण्यात आणि त्यावर विचार करण्यात अनेक वेळ घालवत असतात. समाजमाध्यमे सर्वांसाठी खुली असल्यामुळे कोणीही फोटो, मेसेज, आणि कमेंट्स करीत असतात. सर्वांनाच संभाषण

करणे किंवा संवाद साधण्याची संधी असते. यामुळे किशोरवयीन मुले स्वतःची निर्णयक्षमता हरवुन बसतात म्हणजे डिसिजन पॅरालिसिसचे शिकार होत आहेत. कारण समाजमाध्यमामुळे असंख्य पर्याय उपलब्ध असल्यामुळे मेंदुला निर्णयाची निवड करण्यात संभ्रम अवस्था निर्माण होत आहे.

द्वेष भावनेची वाढ :

समाज माध्यमांच्या मदतीने एकमेकांना अभासी पद्धतीने जोडलेले असते. अशा लाखोंच्या गर्दीतून काही सकारात्मक दिशा तर काही नकारात्मक दिशाचे विचार पुढे येत असतात. यात दुःखाची बाब अशी आहे की अदृश्य स्वरुपात एक-दुसऱ्याशी जोडलेल्या गर्दीला काही स्वार्थीवृत्ती किंवा गैरसमज आणि पुर्वग्रह दुषित भावनेतून समाजात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असतो. समाजमाध्यमांचा वापरकर्ता आपला विरोधी विचारांच्या व्यक्ती विरुद्ध दुष्प्रचार आणि द्वेष पसरवण्यासाठी वापर करत असतात. बहुधा एखाद्या व्यक्तीबाबत कोणताही खटला न चालवता सत्य-असत्य न तपासता त्या व्यक्तीची बाजू न ऐकता समाज माध्यमातून अशा व्यक्तींना गुन्हेगार ठरवले जात आहे. यासाठी समुह भावनेचा प्रभाव असतो. काहि व्यक्ती कोणताही आधाराशिवाय वक्तव्ये करत असतात. अशा वेळी खोट्या बाबींना ही सत्य मानले जात असते. परंतू अशा प्रसार समाज माध्यमात होणाऱ्या बदनामीमुळे अनेक लोकांची आयुष्ये उध्वस्त होत असतात.

कोणाचीही सुटका नसते :

समाजमाध्यमांतून द्वेष पसरवणारे लोक कोणालाही माफ करत नाहीत. कोणालाही देशद्रोही, देशभक्त, हुशार, मुर्ख, समाजकंटक करवून मोकळे होत असतात. जसे की आपण जन्मजात अधिकार मिळाला आहे अशा भावनेत कृत्ये करत असतात. समाजमाध्यमाच्या निर्मितीचा असा वाईट उद्देश नक्कीच नव्हता. समाजातील लोकांच्या मुक्त संवाद व्हावा तसेच त्यांच्यामध्ये सहकार्यभावना विकसित करण्याची प्रभावी माध्यम म्हणून यांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

जगातील जनमाणसातील संवादाचे अंतर कमी करण्याच्या उद्देशांनी या माध्यमांची निर्मिती केली होती. विश्वातील सर्व समाजाला जवळ आणण्याची हे एक उत्तम साधन आहे. परंतु समाजातील दृष्टविचारांमुळे समाज माध्यमांचा घातक स्वरुपात वापर केला जात आहे.

आजच्या समाजात सायबर बुकिंग, सायबर स्टॉकिंग, इंटरनेट ट्रॉकिंग, अपमान, अश्लील पोस्ट, बालकांचे शोषण केले जात आहे. याशिवाय काही समाज माध्यमाच्या वापरकर्त्यांच्या ओळखीची खात्यावरील माहिती चोरी केली जात आहे. समाजात कलह निर्माण करुन जातीय व धार्मिक दंगे घडवले जातात. यामुळे समुह भावना भयभीत होते. काहीवेळा दहशतग्रस्त वातावरण निर्माण केले जात असते. तर काही वेळा निर्दोष व्यक्तीलाच गुन्हेगार ठरवले जात असते.

आज समाज माध्यमातून अनियमित पद्धतीने मत व्यक्त करणारे संदेशावर कसे नियंत्रण मिळवावे तसेच शिस्त कशी लावावी या राज्यव्यवस्था आणि कायदा व्यवस्थे समोरील गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे समाज सुप्त स्वरुपातून अराजकतेकडे जात आहे अशी भिती अभ्यासक व्यक्त करत आहेत. समाजमाध्यमे ही प्रसार आणि प्रचाराची एक प्रभावी शक्ती

आहे. परंतु समाजमाध्यमांतील अनिर्बंध आणि अविवेकी विचारांच्या वापरामुळे समाजाची अपरिमिती हानी होत आहे.

आपली प्रगती तपासा :

१) समाजमाध्यमांचा अर्थ सांगा.

_____

_____

_____

_____

_____

समाज माध्यम स्वरुप :

समाज माध्यम हे एक अपारंपारिक माध्यम आहे. समाज माध्यम आभासी विश्व निर्माण करते जे इंटरनेटच्या माध्यमातून प्रवेश करु शकते. समाजमाध्यमे हे मोठे जागतिक विश्व नेटवर्क आहे. ज्या माध्यमात संपूर्ण जगातील समाजाला जोडेले जात असते. हे समाजाच्या संवादाचे उत्तम साधन आहे. या मधून माहितीचे सुलभ आणि जलदगतीने देवाणघेवाण करणे शक्य असते. यामध्ये प्रत्येक क्षेत्रातील माहितीचा समावेश असतो. सामाजिक माध्यमे सकारात्मक भूमिका बजावत असतात. म्हणजे समाजातील कोणतीही व्यक्ती, गट, संघटना, शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या समृद्ध केले जाऊ शकते. सामाजिक माध्यमातून देशाच्या लोकशाहीला समृद्ध करण्यासाठी अनेक विकासात्मक योजनात्मक कार्यक्रम केले जात असतात. ज्यामुळे कोणत्याही देशाचे ऐक्य, अखंडत्व, देशभक्ती, धर्मनिरपेक्षता, समाजवादी गुण विकसित केले जातात.

१) भारतातील भ्रष्टाचार मुक्ती आंदोलनात अण्णा हजारे यांच्या विचाराला समाज माध्यमांनी लोकांसमोर जाऊन एक व्यापक 'जन आंदोलन' बनवले होते. यामुळे राज्यव्यवस्थेत याची दखल घेणे भाग पडले होते.
२) २०१४ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत समाज माध्यमांची मदत घेऊन राजकीय पक्षांनी जनजागृती घडवून आणली होती. या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ही वाढवण्यात समाजमाध्यमाचे योगदान मोलाचे होते. तसेच तरुण वर्गात जागृती निर्माण केली होती. दिल्ली निर्भया बलत्कार केसमध्ये न्याय मिळवून देण्यासाठी मोठ्या संख्येने तरुणवर्ग समाज माध्यमामुळेच रस्त्यावर आला होता. ज्यामुळे राज्यव्यवस्थेला एक नविन प्रभावी कायदा करण्यास भाग पाडले होते.
३) लोकप्रियतेसाठी समाजमाध्यमे हे एक प्रभावी माध्यम आहे. येथे व्यक्ती स्वत:ची किंवा त्याच्या उत्पादनाची जाहिरात करुन लोकप्रियता मिळू शकते. आज चित्रपटांचा ट्रेलर, टीव्ही कार्यक्रमांची जाहिरात पण समाजमाध्यमातून केली जात आहे. समाजमाध्यमातून व्हिडियो आणि ऑडियो चॅटची व्यवस्था आहे. ज्यामध्ये फेसबुक व्हाट्सॲप इन्स्टाग्राम सारके प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत.
४) समाजमाध्यमे सकारात्मक भूमिका बजावत असतात. तर काही व्यक्तीकडून याचा दुरुपयोग केला जातो. माध्यमांचा गैरवापर करुन काही लोक वाईट विचार पसरविण्याचा

प्रयत्न करतात. दिशाभूल करणारा आणि नकारात्मक माहिती समाज माध्यमातून प्रसारित केली जाते. ज्यामुळे समाज मनावर वाईट परिणाम होत असतात.

५) समाज माध्यमांच्या गैरवापरा बद्दल सरकारलाही कठिण समस्या वाटू लागली आहे. जम्मू-काश्मिर सारख्या राज्यात दहशतवादी माध्यमांचा गैरवापर करत असतात म्हणून बंदी घालणे गरजेचे आहे.

दैनंदिन जीवनावर समाजमाध्यमांचा प्रभाव :

माहितीचे वहन करणारे समाजमाध्यमे हे एक वेगवान साधन आहे. माहितीचा भरपूर प्रमाणात साठा करणे शक्य झाले आहे. सामान्य विषयाला ही बातमी स्वरुप देता येते. समाजातील सर्व वर्गासाठी याचा वापर करणे शक्य आहे. फोटो, व्हिडियो, माहिती, दस्तऐवज वगैरेसाठी सहजपणे प्रसारित करणे शक्य झाले आहे.

विविध स्वरुपाची माहिती प्रसारित करत असल्यामुळे वापरकर्त्याच्या मनात गोंधळ होतो. कोणत्याही पद्धती माहिती प्रसारित करुन ती पुसलीही जाऊ शकते. कोणतीही माहिती प्रत्यक्षात बदलू शकत नसलो तरीही त्याच्या प्रत्यय बदलू शकतो. कोणती माहिती सामग्री मुळ स्वरुपात नसते तसेच सामग्रीची मालकी नसते. गोपनियता पूर्णपणे नष्ट होते. वादग्रस्त मजकुर प्रसारित करुन समाजात दंग निर्माण होऊ शकतो. समाज माध्यमांमुळे सायबर गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

आपली प्रगती तपासा :

१) समाजमाध्यमांचे स्वरुप स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

७.३ समाज नेटवर्किंग / मीडिया

सोशल मीडियाने विचार, लेखन व प्रतिक्रिया या सर्वांत बदल केलेला आहे. सोशल मीडियाने सामान्य माणसावर (स्त्रि-पुरुष दोघांवरही) अशा प्रकारे छाप पाडली आहे की, ज्यामुळे सामान्यांना आपले मत, विचार व्यक्त करण्यासाठी एक महत्त्वाचे माध्यम मिळाल्याची खात्री झाली आहे. आपण जणू समक्षपणे आपले अस्तित्व सोशल मीडियाद्वारे कायम करु शकतो, असा विश्वास निर्माण झाला आहे.

सोशल मीडिया म्हणजे समाजाचे असे माध्यम आहे की, ज्याद्वारा मानवी समाज अधिक सामाजिक बनून योग्य संवाद सुरु करु शकेल, असे माध्यम होय.

सोशल मीडियामूळे व्यक्ती आपल्या मनात असणाऱ्या भावना, विचार त्याच्याजवळ असणाऱ्या नेटवर्कद्वारे अधिक लोकांजवळ पोहोचवू शकतील. यासाठी एखादे चित्र, मत, व्हिडियो किंवा आपण वाचलेली एखादी गोष्ट रेकॉर्ड करुन तया आधारे स्वत:ला व्यक्त करु शकतात. अशाप्रकारे सोशल मीडियाने माणसांवर सर्वांगीण प्रभाव टाकला असून संपूर्ण मानवी जीवन व्यापून टाकले आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा मानवाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर सर्वव्यापी परिणाम झाला आहे.

आज याचा साक्षीदार आहे की, २००४ च्या अध्यक्षीय निवडणूकीत बराक ओबामा यांनी अमेरिकेत सोशल मीडियाचा अत्यंत प्रभावीपणे उपयोग केला. त्यासाठी त्यांना टेकनोसॅव्ही टीम आपल्या हाताखाली नोकरीला ठेवली होती. टीमने सोशल मीडिया SKL, NASS, फेसबूक, ट्विटर, कोरम यांद्वारे आपले विचार ओबामा यांनी सर्व दूर पोहोचविण्याचे काम केले.

आपण सर्वांनी बघितले आहे की, सोशल मीडिया नव्या पदार्पण करणाऱ्याचे प्रतीक बनला आहे. कारण निवडणूक तज्ज्ञ जसे निर्माण केले तसेच उमेदवार जाहिर करणे, निवडणूक निकाल जाहीर करणे, राजकारण्यांना त्यांच्या चुकीच्या वर्तनाचा जाब विचारणे, उघडे पाडणे तसेच जमिनीवर आणणे (चुकीची जाणीव करुन देणे) हे काम सोशल मीडिया करते.

सोशल मीडिया लोकांना एकत्र येण्याला अशाप्रकारे भाग पाडतो की, त्यामुळे अनेक अयोग्य गोष्टींविरुद्ध एकत्र आवाज उठविणे सोपे जाते. सोशल मीडिया हा लोकांचा आवाज बनून जातो. उदा. दिल्लीत घडलेल्या निर्भया बलात्कारानंतर सर्व देशभर आवाज उठविला गेला व शासनाला या आवाजाची तातडीने दखल घेऊन बलात्कार कायद्यात कठोर बदल करावे लागले. 'अण्णा हजारेंचे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन' हे याचेच उदाहरण आहे. जागतिक पातळीवर जागतिक, आर्थिक कोरम (वर्ड इकोनॉमिक कोरम) च्या बाहेर झालेल्या पर्यावरण धोरणाविरुद्ध निदर्शने अशा अनेक समस्यांवर मीडिया राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटनांना ऑनलाइनद्वारे एका प्रकारे मोठ्या प्रमाणात प्रचाराची भूमिका सोशल मीडिया पार पाडतो. सर्वमत तयार करण्याचे अन्यायाविरुद्ध एकत्र येण्यास प्रोत्साहित करण्याचे, निदर्शनासाठी एकत्र आणण्याचे काम सोशल मीडिया करत असतो. सोशल मीडियाद्वारा असे महत्वपूर्ण बदल घडून येतात.

आपली प्रगती तपासा :

१) सामाजिक नेटवर्किंग म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

_____

७.४ सामाजिक माध्यमाचे प्रकार

१) फेसबूक (Facebook) :

फेसबूक हे एक लोकप्रिय सोशल नेटवर्किंग संकेतस्थळ आहे. सर्वसामान्यतः १३ वर्षाहून मोठ्या कोणालाही फेसबूकवर सदस्य म्हणून नोंदणी करता येते. सदस्यांना आपल्या ओळखीच्या व फेसबूक सदस्य असलेल्या इतर व्यक्तीच्या खात्याशी मित्र / मैत्रिण म्हणून जोडणी करता येते. आपल्या मित्रमंडळीना संदेश अथवा फोटा पाठविणे, सर्व मित्रमंडळींना दिसेल अशा रीतीने एखादी घोषणा करणे व इतर अनेक सोयी फेसबूकवर उपलब्ध आहेत. फेसबूकवर प्रवेश करताच पहिले पान उघडते ते म्हणजे होम पेज. या पानावर सदस्याच्या मित्रमंडळीनी प्रकाशित केलेल्या घोषणा व फोटा सर्वांकरिता प्रकाशित केले तर त्या सदस्याच्या सर्व मित्रमंडळींना त्यांच्या मुखपृष्ठावर त्या घोषणा दिसतात. सदस्याच्या फेसबूकवरील मित्रमंडळीची सूची फ्रेन्ड्रस या पानावर दिसते. तर सदस्याच्या मित्रांनी सदस्याकरिता लिहिलेले संदेश वॉल या पानावर दिसतात. फेसबूकमध्ये सदस्याचे नाव, जन्म, तारीख, निवासस्थान, राजकीय कल, आवडी, सदस्याचे फोटो इ.उपलब्ध आहे.

२) व्हॉट्सॲप (Whatsapp) :

व्हॉट्सॲप हे एक लोकप्रिय सोशल नेटवर्किंग संकेतस्थळ आहे. संदेश, प्रतिमा, ऑडिओ किंवा व्हिडियो इंटरनेटचा वापर, संदेश पाठविता येतात. व्हॉट्सॲपवर संदेश पाठविण्यासाठी इंटरनेटचा वापर आवश्यक ठरतो. व्हॉटॲपचा वापर खर्च आवडलेल्या पुस्तकांच्या / विषयांपेक्षा लक्षणीय कमी आहे. हे गट गप्पा मारणे. आवाज संदेश आणि स्थान शेअर वैशिष्ट्येसाठी लोकप्रिय आहे. व्हॉट्सॲप अंदाजे ७०० दशलक्ष लोक वापरतात. यासाठी एप्रिल २०१३ मध्ये भारती Soft Bank १६ ऑगस्ट, २०१६ रोजी ८१७५ दशलक्ष वाढ असण्याचा नेतृत्व. निधीत एक नवीन टप्पा Tencent आणि Foxcom या फेरीत बदलता नंतर वाढ ८१.४ अब्ज मूल्यांकन गाठली. पुढील काही महिन्यांमध्ये, तर अनूप्रयोग आपण मुक्त मजकुर संदेश कुठेही भारतात सादर, गप्पा सुधारित स्टिकर्स, लपलेले गप्पा आणि निर्मितीवर भर, वापरकर्ता इंटरफेस ऑगस्ट २०१४ मध्ये वाढ ३५ दशलक्ष वापरकर्ते दावा आणि निधी एक मोठा टप्पा असण्याचा ८६५ लक्षलक्ष - The Tiger ग्लोबल नेतृत्व वाढ मॅसेंजर कॉल वापरकर्त्यांसाठी नावारुपाला येत आहेत.

३) ब्लॉग (Blogs) :

एक ब्लॉग एक चर्चा किंवा माहितीची आहे. वेबसाइटवर प्रकाशित वर्ल्ड वाईड वेब अलग, अनेकदा अनौपचारिक होणारी डायरी मजबूर नोंदी टिप्पणी पोस्ट करा. विशेषत सर्वात अलीकडील पोस्ट, प्रथम दिसते जेणेकरुन वेब पृष्ठाच्या शीषस्थानी, उलट सामान्य क्रमाने प्रदर्शित होतात. २००९ पर्यंत ब्लॉग सहसा एकच व्यक्ती काम करत होते. कधी-कधी एक लहान गट, आणि अनेकदा एकाच विषय किंवा विषय झाकून इ.स. चे २०१० च्या दशकामध्ये, मल्टि लेखक ब्लॉग (MABS) लेखक मोठ्या प्रमाणावरील यांनी लिहिलेले लेख विकसित केले आहे आणि कधी-कधी व्यावसायिक संपादित केला आहे. MABS पासून वर्तमानपत्र इतर मीडिया आऊटलेट, विद्यापीठे, टाक्या विचार, पुरस्कार गट व समान संधी ब्लॉग रहदारी वाढत प्रमाणात साठा आहे. उदय ट्विटर आणि प्रमाली ही बाब मीडियामध्ये MABS आणि एकमेव

लेखक ब्लॉग समाकर्षित करण्यात करते. ब्लॉगदेखील राखण्यासाठी किंवा ब्लॉग सामग्री जोडण्यासाठी अशा एक क्रियापद म्हणून वापरले जाऊ शकते टर्म वेबलॉगद्वारे होते.

४) गूगल प्लस (Google +) :

गूगल प्लस हे एक लोकप्रिय सोशल नेटवर्किंग दृष्टिकोन ठेवून एक मार्ग उपयुक्त स्त्रोत असू शकते. ब्लॉग सामग्री समूदाय आणि उंच व्यक्ती यांचा आढावा आणि ब्रॅड उत्पादने आणि सेवा शिफारशी शेअर जेथे प्लॅटफॉर्म आहेत. व्यवसाय टॅप करा आणि ग्राहक आणि विपणन उद्देशांसाठी सोशल मीडिया निर्माण अभिप्रिय विश्लेषण करण्यास सक्षम आहेत. या अर्थाने सोशल मीडियाचे तुलनेने स्वस्त स्त्रोत आहे. बाजार गुप्तधर ट्रॅक आणि प्रतिसाद विक्रेते आणि व्यवस्थापकांची वापरले जाऊ शकते.

उदा. इंटरनेट, व्हिडियो आणि हवासा वाटणारा फोन हात दबाव भ्रष्टाचारी जाऊ शकते. आयफोन ६ बॅड चाचणी चित्रे त्यामुळे तशीच आयफोन नवीन गायन सुरु महिन्यासाठी थांबली ग्राहकांनी मागे संभ्रम मागे संभ्रम निर्माण तथापि ऍपल तातडीने समस्या अत्यंत दूर्मिळ होते की, एक निवेदन जारी आणि कंपनी मोबाइल डिव्हाइसची बाबतीत मजबूत करण्यासाठी अनेक पावले घेतला होता. अशा सर्वेक्षणा, विशेष लक्ष्य गट, आणि डेटा खप म्हणून पारंपारिक बाजार संशोधन पद्धती वेळ घेणारी आणि महाग आहेत आणि विश्लेषण आठवडे किंवा महिन्यात जे विपरित विक्रेत्यांना भेट किंवा प्राप्त करण्यासाठी सामाजिक मीडियाचा वापर करु शकता. वास्तविक वेळ बदल माहिती, ग्राहक वर्तणूक आणि एक कंपनीच्या ब्रॅड किंवा उत्पादनावर मते हे अत्यंत गतिमान इ.स. २०१० चे दशक प्रतिस्पर्धी जलद पेस आणि जागतिक बाजारात उपयोग असू शकते.

५) सक्रिय दृष्टिकोन :

सामाजिक मीडियांचा वापर केला जातो. जनसंर्पक आणि भेट विक्री साधने परंतू सोशल मीडिया प्रभावी आणि सामाजिक मीडिया व्यक्तिमत्त्व म्हणून प्रभावी अतिशय विशिष्ट प्रेक्षकांना लक्ष्य बनवित संवाद माध्यमे म्हणून ग्राहक प्रतिबद्धता साधने इ. अशा प्रसारण टी.व्ही. सोशल मीडिया तंत्रज्ञान आणि वर्तमानपत्र देखील जाहिरातदार बऱ्यापैकी लक्ष्य प्रेक्षकांना क्रीडा खेळ प्रसारण दरम्यान किंवा वृत्तपत्र खेळ विभागात ठेवलेल्या जाहिरात क्रीडा चाहते इत्यादीची शक्यता आहे की, दिलेल्या प्रदान करु म्हणून जानेवारी २०१५ च्या व्हॉट्सॲपवर सध्या बाजारात सर्वात मोठा ऑनलाइन दूत अनूप्रयोग आहे. तसेच कर्मचारी हे लहान स्मार्टॲप म्हणून सुरुवात केली. फक्त काही महिन्यात २,५०,००० वापरकर्त्यांनी मध्ये स्थापन केली. २०१४ मध्ये व्हॉट्सॲपवर व फेसबूक खरेदी केला. व्हॉट्सॲपमुळे आपल्याला खूप माहिती मिळते.

६) ट्विटर (Twitter) :

ट्विटर हे एक ऑनलाइन लोकप्रिय व सोशल नेटवर्क्रिंग आहे. संदेश नोंदणीकृत वापरकर्ते वाचू शकता आणि ट्विट पोस्ट, पण नोंदणी न झालेले आहेत. त्यांनी फक्त वाचू शकता, वापरकर्ते वेबसाइट इंटरकेस माध्यमातून ट्विटर प्रवेश एसएमएस किंवा संवाद म्हणून हा घटक सोशल मीडियाचा फायदा घेत आहेत. ट्विटरमुळे लोकांना आपापसात सामाजिक कनेक्शन प्रोत्साहन देते. जगभरातील संवाद त्यांच्या की एक घटक म्हणून सोशल मीडियामधून सकारात्मक आणि नकारात्मक विकल्प ट्विटर वाढते. ट्विटरवर आपण चर्चा, अभ्यास गट, पोस्ट, मित्र, नातेवाईक यांच्याशी संपर्क होतो. ट्विटरवर सामाजिक मीडिया विविध प्रकारे

योगदान करु शकता. परवानगी देते, ट्विटरवर काही पोस्ट खूप लोकप्रिय आहे. फायदेशीर धोरण, लोकप्रिय ट्रेंड, पोस्ट आणि घटना बदल ट्विटरवर व्यक्ती सूचित करतात.

७) व्हॉट मेसेंजर (Hike) :

व्हॉट मेसेंजर खूप लोकप्रिय आहे. क्रॉस प्लॅटफॉर्म इन्स्टंट मेसेजिंग सेवा स्मार्टफोनचा वापर इंटरनेट संपर्क मजकूर संदेशन व्यतिरिक्त वापरकर्ते प्रत्येक इतर ग्राफिकल, स्टिकर्स पाठवू शकतात. इमोटिकॉन, प्रतिमा, व्हिडीयो, ऑडिओ, फाइल्स, आवाज, संदेश संपर्क आणि वापरकर्ता स्थान, १२ डिसेंबर २०१२ रोजी वाढ झाली.

आपली प्रगती तपासा :

१) समाज माध्यमांचे प्रकार सांगा.

_____

_____

_____

_____

_____

७.५ समाज माध्यमांचा नकारात्मक परिणाम (SOCIAL MEDIA NEGATIVE EFFECTS)

सामाजिक मीडिया किंवा नेटवर्क नकारात्मक परिणामामुळे एक ते व्यसन ठरत आहे. सामाजिक साइटवर अगणित तास खर्च विशिष्ट कामावर फोकस आणि लक्ष दूसरीकडे वळविणे. विशेषत: युवक आणि विद्यार्थी, लोक प्रेरणादायी पातळी कमी करत आहे. ते प्रामुख्याने तंत्रज्ञान आणि इंटरनेटऐवजी दररोज जीवनात कमी व्यवहारिक ज्ञान आणि कौशल्यावर अवलंबून असतात. ते त्यांचा वापर करण्याची परवानगी असल्यास दोन लहान मुले मोठ्या मानाने या सोशल नेटवर्किंग साइटवर प्रभावित केले जाऊ शकतात. कारण कधी-कधी लोक, मुले आणि यूवक यांचे वर्तन नुकसानकारक होऊ शकते जे हिंसा आणि लैंगिक समाविष्टित असते. सोशल मीडियावर फोटो शेअर होतात मुले आणि यूवक गुन्हयासंबंधित कार्यात स्वत: सहभागी होतात. म्हणून एकूण समाजात नकारात्मक परिणाम होतात. सोशल मीडिया दुसरा down side आहे असे वापरकर्त्यास शेअर खूप माहिती यांना धमक्या ठरु शकतो. आपल्या व्हिडियो किंवा चित्रे डाऊनलोड आणि कॉपी करणे सोपे काम आहे आणि क्लिक मध्ये केले जाऊ शकते.

फेसबूक किंवा ट्विटर यांच्या व्यसन लागल्या मुळे मानसोपचार तंज्ञाची मदत घेण्याची वेळ येऊ लागली आहे. कारण या समाज माध्यमांचा वापर दिवसेंदिवस अतिरेकी स्वरुपाचा होत आहे. समाज माध्यमांमुळे संपूर्ण जग आपल्या मुट्ठीत आले आहे असे वाटत आहे. आपल्याला हव्या त्या पद्धतीने व्यक्त करण्याचा स्वतंत्र समाज माध्यमांमुळे मिळाले आहे. आपण आपल्या मनातील भावना सहजरीत्या दुसऱ्यांकडे पोहचवण्यासाठी सोय झाली आहे. तसेच अनेकांना

सहभागी करुन घेण्याची समाज माध्यम एक व्यासपीठ निर्माण झाले आहे. यामुळे काही दुरोपयोग करुन सामाजिक दृष्ट्या काही तोटे ही सहन करावे लागत आहेत.

१) आभासी ओळख :

समाज माध्यमातील ओळख ही आभासी स्वरुपाची असते. अनेक वेळा खोट्या माहितीच्या आधारे अकाउंट चालू करुन माहितीचे देवाण-घेवाणकेले जात असते. यामुळे अनेक गुन्हेगारी वृत्तीचे लोक असे खाते चालू करुन लोकांची फसवणूक करुन अनेक प्रकारचे गुन्हे बिनधास्तपणे करत असतात.

२) व्यक्तीगत माहितीच्या गैरवापर :

फेसबूकवर आपण आपल्या संबंधीच्या आवडी-निवडी, पत्ते, फोटो वगैरेच्या माहिती संपूर्ण जगाला उघड करतो. या माहितीच्या गैरवापर करणाऱ्या अनेक टोळ्या तयार झाल्या आहेत. त्यात लहानांना पळवणे, खंडणी मागणे, बँक खाते लुटणे, वगैरे बाबी साठी गैरवापर केले जात आहेत.

३) समाज माध्यमांमुळे माणुसकीचा ऱ्हास :

समाज माध्यम हे एक शस्त्र आहे. याचा वापर कसा केला जात आहे. यामुळे उपयोगा पेक्षाही घातकच अधिक ठरत आहे. अशा माध्यमामुळे आजची पिढी भावना हटकुन बसली आहे. लोकांना मदत करण्यापूर्वी त्या गोष्टीचा फोटो काढून तो लवकरात लवकर शेअर कसा करता येईल याकडे अधिक कल असल्याचे दिसून येते. अपघात, संकट वगैरे घडत असताना हि बाब स्पष्टपणे दिसून येत असते.

४) सायबर दांडगाई (cyberbullying) :

समाज माध्यमांच्या मार्फत अनेक लोकांना बदनामीकारक मजकुर प्रसिद्ध करण्याचे धमकी दिली जात असते. समाज माध्यमातून अनेक फेक माहितीच्या आधारे खाते खोलून राजरीतपणे लोकांना धमक्या देण्याचे उद्योग चालू आहेत. काही चुकीचे संदेश पसरवून एखादी व्यक्ती समाज संघटन वगैरेची बदनामी केली तसे असे बदनामीचा धाक दाखवून खंडणी मागण्याचे प्रकारही समाज माध्यमांतून चालू आहेत.

५) हॅकींग (Hacking) :

समाज माध्यमातील वैयक्तिक माहिती सहज रित्या चोरी करुन सार्वजनिक केली जात आहे. उद्योगातील तोटे किंवा अपयश कौटुंबिक जीवनातील माहिती हँकींग करुन समाज माध्यमातून प्रसारित केली जात आहे. फेसबूक ट्विटर खात्यातील माहिती चोरी करुन माहितीचा गैरवापर करुन झाल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. समाज माध्यमाचा वापर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी हँकिंग हा सर्वात मोठा धोका आहे.

६) वाईट सवयी (Addiction) :

समाज माध्यमामुळे वापर ही एक वाईट सवय लागते आणि यामुळे वैयक्तिक जीवन विचलीत होत असते. लहान मुलांसाठी समाज माध्यमांचे व्यसन अतिशय वाईट. याचे वापर करणे समाजाला दुर्लक्ष करुन एकांत माध्यमातील गोष्ट हातळत असतात. यामुळे आपला

महत्त्वाचा वेळ समाजमाध्यमाच्या हाताळणीत अधिक वाया जात आहे. याचा दुष्परिणाम मुलांच्या अभ्यासावर आणि प्रौढीच्या उत्पादनावर वाईट परिणाम होत आहे.

७) फसवणूक धोका व कांड (Fraud & Scams) :

आपण सामाजिक जीवनात अनेक फसवणूक घोटाळे ची उदाहरण पहातो. परंतु अनेक फसवणूक आणि घोटाळे हे समाज माध्यमांच्या मदतीने ही केले जात आहेत. उदा. अमेरिकन राष्ट्राध्यक्षच्या निवडणूकीसाठी फेसबुक माहितीचे वगैरे वापर केला होता.

८) संरक्षण प्रश्न (Security Issues) :

आजकाल सुरक्षा संस्था ही लोकांच्या वैयक्तिक माहितीचा उपयोग करत आहेत. यामुळे लोकांची वैयक्तिक जीवन सार्वजनिक होत आहे. आपण कोणत्याही कार्यालयात पुर्व परवानगी शिवाय भेट देऊ शकत नाही. यासाठी आपणांस इंटरनेटच्या माध्यमातून नोंदणी करावी लागते. यामुळे आपली सर्व माहिती सुरक्षित असलेच याची खात्री नसते.

९) ख्याती (Reputation) :

समाजमाध्यमे काही वेळ सहज एखाद्या व्यक्तीला ख्याती मिळवून परंतू काही वेळेतच बदनामी पण होत असते यामुळे व्यक्ती दर्जा ओळख निश्चित करते.

आपली प्रगती तपासा :

१) समाज माध्यमांचा वाईट परिणाम कोणते ?

_____

_____

_____

_____

_____

७.६ समाज माध्यमांचे सेवांचे वैशिष्ट्ये / गुण

इंटरनेटवर उपलब्ध असणाऱ्या विविध मानवाशी संपर्क साधून तो कायम साठवून ठेवणाऱ्या व्यवस्थेला सामाजिक माध्यमांचे नेटवर्क सेवा म्हणून ओळखले जाते. याला सामाजिक माध्यमांचे जाळे असे ही म्हटले जाते. यामध्ये समान विचारांची आवडीनिवडीची लोक एकत्रित येत असतात. यामधील लोक जरी प्रत्यक्ष भेटून संवाद न साधता ही इंटरनेटच्या सेवेमुळे ही अप्रत्यक्ष भेट प्रत्यक्ष भेटी प्रमाणे असते. अशी भेटीची सेवा इंटनेटवरील विविध संकेत स्थळामार्फत पुरवली जात असते. अशा संकेत स्थळांनाच सामाजिक संपर्कचा जाळे म्हणून सामाजिक माध्यमांचे जाळे यात ओळखीच्या व्यक्तीबरोबर अनोळखी व्यक्तींचा ही समावेश असतो. सामाजिक संपर्क माध्यमे या शब्दात व्यापक अर्थ आहे.

समाज माध्यमातील संपर्क सेवेचा पाया म्हणजे एखाद्या व्यक्तीला संबंध माध्यमांच्या संकेतस्थळावर जाऊन स्वतःची प्रोफाईल तयार करावी लागते. याला माहितीचे पान म्हणजे वेब पेज असे म्हणतात. या माहितीच्या पानावरुन संकेत स्थळांना जोडलेल्या असंख्य व्यक्तीच्या प्रोफाईल बनवलेल्या असतात. अशा व्यक्तींशी ओळख करुन मैत्री करुन माहितीचे देवाणघेवाण करणे शक्य होते. आज फेसबुक सारख्या सामाजिक माध्यमात असंख्य लोक जोडले आहेत. लोक आपली भाषा, सीमा विसरुन एकमेकांशी मैत्री भावनेने जोडली जात आहेत. तरी काही लोकांना आपले जुने मित्र मैत्रीणींशी संपर्क साधने सोपे झाले आहे.

१) प्रोफाईल किंवा माहितीचे पान :

सर्व समाजसंपर्क माध्यमांच्या संकेत स्थळांचा मुलभूत घट म्हणजे वेबपेज किंवा माहितीचे पान होय. या पानावर त्या संकेत स्थळाच्या सदस्यांची माहिती प्रकाशित केली जात असते. उदा. व्यक्तीचे नाव, वय, लिंग, व्यवसाय, निवासस्थान, आवडी-निवडी, वगैरेची माहिती असते. अनेक वेळा काही सदस्या माहिती`ज वर फोटो देखील प्रकाशित करतात. अशी सर्व माहिती संबंधी संकेत स्थळावर संचय करुन ठेवली जाते. जेव्हा कोणी त्या सदस्यांची माहिती शोधूत असेल तर ते पान माहिती पुरवण्याचे काम करत असते. असे पानावर प्रोफाईल तयार करण्यासाठी किमान वयोमर्यादा असते. पण विविध संकेत स्थळानुसार ती वेगवेगळी असू शकते.

२) ओळख / संपर्क व मैत्री :

समाज माध्यम सेवेचा मुख्य उद्देश इंटरनेटवर संपर्क जाणे निर्माण करणे हा आहे. त्यामुळे सर्व समाज माध्यमांच्या संकेत स्थळाचा उपयोग प्रामुख्याने व्यक्तीच्या ओळखी आणि मैत्री निर्माण करण्यासाठी केला जातो. हा सर्व समाज माध्यमांच्या संकेतस्थळांचा महत्त्वाचा घटक आहे. ही संपर्क माध्यमे प्रत्येक संकेत स्थळांवर विविध नावानी ओळखली जात आहे. उदा. फेसबुक, ओर्कुटवर घ्यास फ्रेडंस / मित्र असे म्हणतात. तर ट्विटरवर त्यास फॉलोवर्स / अनुयायी असे म्हणतात. अनेक वेळा विविध लोक अशा व्यक्तींशी ऑनलाईन मैत्री करत असतात. ज्यांची प्रत्यक्ष ओळख ही नसते. कधी भेटलेले ही नसतात. तरीही समाज माध्यमांच्या संपर्कामुळे त्यांच्या चांगली मैत्री असते. विविध सदस्यांच्या संपर्काचे जाळे तयार करणे हा प्रमुख उद्देश समाज माध्यमांचा असतो. एखाद्या समाज माध्यमाचा पाया म्हणजे एखाद्या व्यक्तीने संकेत स्थळावर तयार केलेली प्रोफाईल होय.

३) घोषणा व संदेशाचे वहन :

समाज माध्यमात विविध व्यक्तीशी संपर्क साधण्याचे प्रभावी साधन म्हणजे घोषणा होय. प्रत्येक व्यक्ती कोणतीही घोषणा किंवा विधान प्रकाशित करु शकते. यास इंग्रजीत स्टेटस मेसेज असे म्हणतात. सदस्याने प्रकाशित केलेल्या घोषणा त्या व्यक्तीच्या संकेत स्थळावरील सर्व मित्रमैंत्रीणींना सहज दिसतात. तसे हे मित्रमैत्रीणी त्यावर प्रतिक्रिया म्हणून आपले मत ही मांडू शकतात. त्याचप्रमाणे एकमेकांना संदेश पाठवण्याची सोय देखील येथे उपलब्ध असते.

४) संवाद :

समाज माध्यमांच्या संकेत स्थळांचा वापर संवाद म्हणजे चॅट करण्यासाठी पण केला जात असतो. समाज माध्यमे सुरु होण्यापूर्वी पण अशा प्रकारचे चॅटिंग इंटरनेटवर केले जात होते.

५) इतर तंत्रज्ञानाशी संबंध :

समाज माध्यमे ही समाजात अतिशय लोकप्रिय आहेत. विविध मोबाईल फोन कंपन्यांनी ही सेवा मोबाईलवर ही उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणजेच समाज माध्यमांचा वापर आज संगणकाशिवाय करणे शक्य झाले आहे. मोबाईल फोन हे सुलभ साधन झालेले आहे.

६) ॲप्लिकेशन्स :

समाजमाध्यमांची महत्त्व पूर्ण वैशिष्ट्ये म्हणजे ॲप्लिकेशन्स होय. समाज माध्यमांच्या संकेतस्थळावर विविध व्यक्तींना ॲप्लिकेशन्स ही पुरवत असते. अशा ॲप्लिकेशन्सचा वापर करुन आपले वेबपेज सजवता येत असते. आपल्या फोटोमध्ये बदल करणे, विविध खेळ खेळणे, अशी ॲप्लिकेशन्स प्रत्येक संकेत स्थळानुसार बदलतात. एखाद्या संकेतस्थळाच्या लोकप्रियतेवर याचा मोठा प्रभाव पडत असतो.

७) व्यावसायिक तंत्र :

अनेक व्यावसायिक कंपन्या व संघटना ह्या समाज माध्यमांचा उपयोग आपल्या कंपनी संबंधी माहिती लोकापर्यंत पोहचवण्यासाठी करतात. विविध कंपन्या समाज माध्यमांच्या संकेत स्थळावर आल्या. कंपनी संस्था आणि संघटनांची प्रोफाईल प्रकाशित करतात.

८) जाहिरात तंत्र :

समाज माध्यमांच्या संकेत स्थळांची लोकप्रियता व विस्तार पहाता अनेक व्यावसायिक कंपन्या व उद्योगधंदे या संकेतस्थळांचा वापर जाहिरातीसाठी पण करतात. उदा. बाजारातील नविन वस्तुच्या जाहिराती, नोकऱ्यांची जाहिरात वगैरे जाहिराती समाजमाध्यमातून केल्या जातात. अशा जाहिरातींना प्रचंड प्रतिसाद मिळतो आणि खर्चपण कमी असतो. यामुळे नफा कमवणे शक्य झाले आहे.

आपली प्रगती तपासा :

१) समाज माध्यमांचे महत्त्व सांगा.

_____

_____

_____

_____

_____

७.७ सारांश

आज स्मार्ट मोबाईल हा सामान्य व्यक्तीकडे ही सहजपणे उपलब्ध होत आहे. आजच्या बाजार भावानुसार रु. २००० पासून 4G मोबाईल उपलब्ध आहेत. यामुळे कोणत्याही व्यक्तीला असा मोबाईल खरेदी करुन समाज माध्यमांच्या साईटना जोडणी करणे ही बाब सामान्य झालेली आहे. आज तरुण वर्गाला या समाज माध्यमांच्या साईटचे विशेष आकर्षण आहे. कोणतीही व्यक्ती

व्हॉटसॲप आणि फेसबुक सारख्या समाज माध्यमांच्या संकेत स्थळावर जाऊन आपले फोटोस संदेश सहज पण देवाणघेवाण करताना दिसतात. यामुळे सामान्य व्यक्तीला ही आपल्याला प्रसारित करण्याची ही एक संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे अगदी सुलभ पद्धतीने आपले विचार आणि व्यवसायाचे प्रसार करण्यासाठी कोणताही खर्च न करता सुलभ पद्धतीने समाजासमोर मांडण्याचे साधन उपलब्ध झाले आहे. या माध्यमातून अनेक लोकांना आपल्या व्यवसायाच्या विकास करण्यास मार्ग मिळाला आहे. जगात अनेक नविन चळवळी ही या मार्फत निर्माण झाल्या आहेत. अनेकांना रोजगार ही मिळाले आहेत.

परंतु समाज माध्यमांवर माहिती प्रसारित करण्यासाठी कोणतेही निर्बंध किंवा नियंत्रण नसल्यामुळे खोटी, फसवी, अपमानजन्य, बदनामीकार, आणि हिंसाचार भडकवणारी माहिती प्रसारित करुन समाजात अशांतता निर्माण होत आहे. सामाजिक ऐक्याला धोका निर्माण होत आहे.

थोडक्यात नविन समाज माध्यम ही दुधारी तलवारीप्रमाणे आहेत. यामुळे यांचा फायदा आणि तोटा वापर करण्याच्या मानसिकतेवर आधारित आहे. परंतु लवकरच अशा माध्यमांच्या वापरा संबंधी संहिता सांगणारा कायदा होणे काळाची गरज आहे.

७.८ अभ्यासाचे प्रश्न

१. नविन समाज माध्यमे म्हणजे काय? समाज माध्यमांच्या वापरा संबंधीची थोडक्यात चर्चा करा.
२. समाज माध्यमांची विविध प्रकारांची सविस्तर माहिती सांगा.
३. आधुनिक समाजमाध्यमांचा समाज होणाऱ्या परिणामाचे वर्णन करा.
४. समाज माध्यमांच्या गुण वैशिष्ट्यांची माहिती लिहा.
५. समाजमाध्यमांचे स्वरुप स्पष्ट करा.
६. थोडक्यात टिपा लिहा.
   अ) समाज माध्यमांचे नेटवर्किंग
   ब) समाज माध्यमांचे महत्त्व
   क) समाज माध्यमांचे नकारात्मक परिणाम

७.९ संदर्भ सूची

1. Julia Jary and D. Jary, 2005, Dietionarty of Sociology.
2. Shaili Chopra, The Big Connect Politics in the Age of Social Media, Random House
3. सर्जेराव बोराडे (२०१७) समाजशास्त्र निराली प्रकाशन, पुणे.

❖❖❖❖

८ अ

समाज माध्यमाचे आर्थिक परिणाम
(ECONOMIC DIMENSION - SOCIAL MEDIA)

घटक रचना :

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ आर्थिक दिशा आणि समाज माध्यमे
८.३ समाज माध्यमे आणि विपणन
८.४ विक्री आणि जाहिरातील सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम
८.५ सारांश
८.६ अभ्यासाचे प्रश्न
८.७ संदर्भ सूची

८.० उद्दिष्ट्ये

१. समाज माध्यमे आणि आर्थिक दिशा बद्दल माहिती मिळवण्यास मदत करणे.
२. समाज माध्यमे आणि विपणन संदर्भातील ज्ञान करुन देणे.
३. विक्री आणि जाहिराती संदर्भात

८.१ प्रस्तावना

आधुनिक काळ समाज माध्यमाने मानवाचे सर्व विश्व व्यापून टाकले आहे. यामुळे आर्थिक आणि रोजगार क्षेत्र ही अपवाद नाही. आज आर्थिक क्षेत्राचा विकास करुन नवनविन रोजगाराच्या संधी निर्मितीसाठी समाजमाध्यमे महत्त्वाची भूमिका ठरु लागली आहे. आज सामान्यत सामान्य उत्पादकाला आपल्या उद्योगाची जाहिरात करुन ग्राहक मिळवणे समाज माध्यमांमुळे सहज शक्य होत आहे. आपल्या उत्पादना बद्दल लोकमत आजमवणे आणि जाहिरात करण्यात आज मोठ्या कंपन्यापासून सामान्य घरगुती कारागीरापर्यंत सर्वजण हा मार्ग वापरात आहेत. शहरी कारखान्या उत्पादना बरोबर ग्रामीण शेतमाल पण बाजारपेठ मिळवण्यासाठी समाज माध्यमे फार उपयुक्त ठरत आहेत. पर्यटन, हॉटेल, शेतीमाल, प्रवास सेवा मनोरंजन, कला वगैरे क्षेत्राच्या विकासा बरोबर नविन रोजगार पण निर्माण होत आहेत. प्रत्येक व्यक्तीला आपला आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी रोजगार शोधावा लागतो. असे रोजगार पण मिळवून देण्यासाठी आज समाज माध्यमे महत्त्वाची ठरत आहेत.

या सर्व आर्थिक विकासाबरोबर काही समान विघातक व्यवसायाचा पण प्रचार आणि प्रसार समाज माध्यमातून केला जात आहे. मादक द्रव्य विक्री, वेश्या व्यवसाय, माहितीची चोरी करणे वगैरे बाबीत पण समाज माध्यमांचा वापर केला जात आहे. तसे अनेक नामंवत उद्योगाची बदनामी करणे विशिष्ट वस्तू व सेवा बद्दल गैरसमज पसरवणे यासाठी उपयोग होत नाही. म्हणून समाजमाध्यमे हे दुधारी तलवारीप्रमाणे आहेत. यामुळे आर्थिक देशाला नविन दिशा मिळते आहे.

८.२ आर्थिक दिशा आणि समाज माध्यमे

हल्ली बऱ्याचशा कंपन्या सामाजिक विषयांशी जोडलेल्या दिसतात. उदा. एड्स विषयि जागृती, मादक द्रव्य सेवनास प्रतिबंध, समलिंगी व्यक्तीचे हक्क, वांशिक सामंजस्य आणि संवर्धन या कृतीचे कार्यक्रमाचे वर्णन अनेक प्रकाराने केले जाते. उदाहरणार्थ, सामाजिक विषयांशी संबंधित विपणन मोहिम, सामाजिक समस्येविषयी विपणन, उद्योग समूहाचे सामाजिक विपणन, सामाजिक हेतूसाठी जाहिरात करणे इत्यादी. अशा जाहिरातीविषयी ग्राहकांना काय वाटते व त्यांचा प्रतिसाद कसा आहे याविषयी जरी संशोधन झाले असले तरी जाहिरात देणाऱ्या व्यवस्थापकांचा हेतू, त्यांची जाण किंवा त्यांचा दृष्टिकोन याकडे विद्वानांचे फारसे लक्ष गेलेले दिसत नाही.

मिनेट ड्रमराईट यांनी सामाजिक दिशा दर्शविणाऱ्या व्यवस्थापकांच्या मोहिमांच्या उद्दिष्ट्यांचा अभ्यास केला. त्यामध्ये अशी मोहीम उघडण्याची प्रक्रिया आणि त्यांच्या यशाला कारणीभूत असणारे घटक यांचा अभ्यास केला. या अभ्यासामध्ये २२ मोहिमांचा समावेश होता. त्यापैकी ११ सामाजिक कार्यासाठी होत्या आणि ११ मोहिमा त्यांच उत्पादनासाठी पण नेहमीच्या म्हणजेच असामाजिक होत्या.

१) जाहिरात :

जाहिरातीमध्ये सामाजिक विषयाचा वापर करण्यातून मोहिमेच्या उद्दिष्टांविषयी फारच थोडे ज्ञान होते. अशा प्रकारच्या जाहिरातींमध्ये काही केवळ आर्थिक व्यवहारांसबंधी, तर काही फक्त सामाजिक हेतू डोळ्यांसमोर ठेवून केलेल्या असतात. सामाजिक विषयासंबंधी केलेल्या जाहिरातीत त्या कार्याविषयी उत्तरदायित्व दिसून येते. काही बाबतीत उद्दिष्टांची सरमिसळ दिसते. म्हणजेच आर्थिक आणि सामाजिक हेतूंचे एकत्रीकरण आढळते. तेव्हा उद्दिष्ट मूख्यत्वे अल्पकालीन आणि आर्थिक असते. तेव्हा अशा जाहिरातींना क्वचितच प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येते. जेव्हा आर्थिक ध्येये दीर्घकालीन असतात.

उदाहरणार्थ - विक्री खात्यातील मनुष्यबळ वाढविणे, त्यांचे मनोधैर्य वाढविणे किंवा महत्त्वाच्या खात्यांना कंपनीच्या अभियानाविषयी माहिती देणे तेव्हा सामाजिक उद्दिष्टांनी केलेल्या जाहिराती यशस्वी झाल्याचे दिसतात.

सामाजिक कार्यासाठी केलेल्या जाहिरातींमध्ये खूपच वैविध्य असते. उदाहरणार्थ - सामाजिक कार्यासाठी केलेल्या जाहिरातील विक्री खात्यातील कर्मचारी आणि किरकोळ करण्याची विरोध असतो. अशा जाहिरातीबाबत सर्जनशीलता आणि जाहिरात तयार करण्याची प्रक्रिया दीर्घ काळ घेणारी आणि खूप गुंतागुंतीची असते. कार्याचे मूल्यमापन करताना सामाजिक

हेतूने केलेल्या जाहिरातींबाबत बरेच अडथळे येतात, त्यामानाने सर्वसाधारण जाहिरात मोहिमेत समस्या उद्‌भवत नाहीत. धोका जरी मोठ्या प्रमाणावर असला तरी सामाजिक कार्याबाबत केलेल्या मोहिमेतून बरेच वेळा फायदाच झालेला दिसून येते. उदाहरणार्थ - मनूष्यबळ व्यवस्थापनात अपेक्षित किंवा अनपेक्षित मार्गाने बरेच फायदे होतात. कंपनीला तिच्याशी संबंधीत असणाऱ्या संस्थांशी संबंध सुधारल्याचा अनुभव येतो. काही वेळा अशा संस्था, जाहिरातील मॉडेल्स आणि छायाचित्रकार सामाजिक कार्यासाठी आपला वेळ देतात.

हा अभ्यास करण्याआधी काही तज्ज्ञांची मते मुलाखतीद्वारा अजमावण्यात आली. त्यांचे असे मत होते की, आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टांची परस्परांत स्पर्धा असते.

त्यामुळे ती उद्दिष्टे एकमेकांत सामावलेले आढळून येतात. या अभ्यासाच्या अहवाल ड्रमराईटने सामाजिक आणि असामाजिक मोहिमांमधील बदलत्या स्वरुपाचा अभ्यास करुन भविष्यातील संशोधनाची दिशा काय असेल याविषयी मते मांडली आहेत.

२) व्यस्थापकीय परिणाम :

यात धोका मोठा असला तरी सामाजिक कार्यासाठी केलेल्या जाहिरात मोहिमांमधून निश्चितच मोठा फायदा होतो. त्यांच्या परिणामकतेवर प्रकाश टाकताना या अभ्यासातून अशा प्रकारच्या जाहिरातींद्वारे चांगला परतावा मिळवण्याची शक्यता आहे असे म्हटले आहे. उदाहरणार्थ - उद्दिष्टे दीर्घकालीन असावीत. त्यांचे स्वरुप कंपनीशी जोडलेले असावे, जाहिरात ज्या कारणासाठी केली आहे, ते कंपनी आणि तिच्या महत्त्वाच्या घटकांशी मिळतेजुळते असावे. कारण असे असावे की ज्यावर कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या विश्वास बसेल. विक्री खात्यातील कर्मचारी, वितरण आणि किरकोळ विक्रेता यांना जाहिरातीच्या उद्दिष्टाविषयी आस्था असल्यास मदतच होते. त्यांना अधिक माहितीची जरुर असावी.

जाहिरातीचा विषय असावा की त्यातून एक सकारात्मक संदेश देता येईल. यात समस्येला प्रतिबंध करणारी जाहिरातसुद्धा वापरता येईल. उदाहरणार्थ - मादक द्रव्य सेवनातील धोका, रोगाचे लवकर निदान वगैरे, स्तनाचा कॅन्सर यावर निश्चितच उपाय आहे व रोगी वाचण्याची शक्यताही आहे हे सर्व तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे हे अत्यंत अवघड काम आहे. सामाजिक जाणिवेसाठी केलेल्या जाहिरातींमध्ये अनेक उद्दिष्टे असतात. उद्दिष्टांचे स्वरुप विवादात्मकही असू शकते. अशा जाहिरातींचे मूल्यमापन विचारपूर्वक केले पाहिजे. इतर जाहिरातींच्या तूलनेत अशा जाहिरातींसाठी गूणवत्तेवर आधारित पद्धती वापरल्या जाव्यात. यासाठी नवा दृष्टिकोन विकसित केला गेला पाहिजे.

आपली प्रगती तपासा :

१) समाज माध्यमे आणि आर्थिक दिशा संबंध सांगा.

_____

_____

_____

_____

_____

८.३ समाज माध्यमे आणि विपणन

सामाजिक मीडियामध्ये विपणनाचा वापर केला आहे. सामाजिक मीडिया प्लॅटफॉर्म आणि वेबसाइट उत्पादन किंवा सेवा प्रोत्साहन करणे या सामाजिक मीडिया प्लॅटफॉर्मवर बहुतेक प्रगती, यश आणि प्रतिबद्धता ट्रॅक कंपन्या सक्षम जे त्यांच्या स्वतःच्या अंगभूत डेटा विश्लेषण साधने आहेत. जाहिरात मोहिम कंपन्या वर्तमान आणि संभाव्य ग्राहकांना, वर्तमान आणि संभाव्य कर्मचारी, पत्रकार समावेश सामाजिक मीडिया विपणन माध्यमातून येणी भागधारक पत्ता ब्लॉगर्स सामान्य एक मोक्याचा स्तरावर सामाजिक मीडिया विपणन एक अशी विपणन मोहीम अंमलबजावणी व्यवस्थापन समावेश शासन व्याप्ती आणि एक टणक इच्छित सामाजिक मीडिया संस्कृती आणि स्थापना सेट प्रभावीपणे सामाजिक मीडियाचा वापर कंपन्या ग्राहक आणि इंटरनेट वापरकर्त्यासाठी पोस्ट करण्याची परवानगी शिकले. सामाजिक मीडिया विपणन अनेकदा कंपन्या संबंधित आहे. तर २०१६ च्या म्हणून श्रेणी नाही. नफा संघटना आणि सरकारी संस्था त्यांच्या कार्यक्रम किंवा सेवा सामाजिक मीडिया विपणन अडकत आहेत.

नीती

१) निष्क्रिय दृष्टिकोन (Passive Outlook) :

सोशल मीडियाचा बाजार माहिती आणि ग्राहक आपण वय, लिंग, उत्पन्न, नोकरी, स्थान, नातेसंबंध स्थिती आणि बरेच काही करुन सूचित जथे आपण कार्यासाठी गेलो. आणि घरी आपण कोणत्या प्रकारे आपल्या मालकीचे असलेल्या फेसबूक मोहीम आहे. आम्ही कमी खर्चात त्यांच्या अचूक लक्ष्य बाजार व्यवसाय कनेक्ट करण्यासाठी हा डेटा कायदासह आणि १०० पेक्षा कमी आम्ही आमच्या ग्राहकांसाठी १०,००० संबंधित लोक पोहोचण्याचा शक्य झाले आहे. आमच्या ग्राहकांच्या सर्व आम्हाला बंद ठसा दर खर्च क्लिक किमान २००% कमी आणि परिवर्तनाचा फेसबूकवरील जाहिरात पाहिले आहे.

२) ट्विटर जाहिरात (Twitter Advertisement) :

आम्ही ट्विटर जाहिरात कसे वापरावे झटपट वेबसाइट रहदारी माहिती ट्विटरवर कारण प्लॅटफॉर्म शेअरिंग, निसर्ग महान आहे. कोणीतरी ते ट्विटरवर गंमतीशीर काही पाठवले तर ते त्यांचे मित्र सामायिक होईल. आम्ही मध्ये व्याज दर्शविण्यासाठी शक्यता लीक ट्विटरवर आणि वाढ वेबसाईट जाहिरात फेसबूक विवरित आम्ही ते अनुसरुन शोध घेतात. कीवर्ड आणि पृष्ठे आधारित लोक लक्ष ठेवू शकतात. आम्ही कोणाला काही विशिष्ट विषय ट्विट किंवा काही पाने खालील तर ते आपल्या उत्पादन खरेदी शक्यता होईल गृहीत धरतात. आम्ही वेगाने ट्विटर जाहिरात माध्यमातून वाढण्यास आपल्या ब्रँडचा की संधी शोधण्यासाठी सखोल अंतदृष्टी वापरा.

३) करा जाहिरात (Make Adverstisement) :

सर्वात रोमांचक जाहिरात प्लॅटफॉर्म आहे. तो त्याच्या लवकर टप्याटप्याने जे खर्च नेहमीपेक्षा कमी आहेत. याचा अर्थ असा की अजूनही आहे. त्याच्या वापरकर्त्यांची एक बहुतांश माहित आहेत आणि त्याचे वापरकर्त एक चांगला भाग उच्च उत्पन्न मानले जातात. करा जाहिरात सर्वात जास्त आहे की ब्रॅड त्याच हितसंबंध लक्ष केंद्रित असतील या आरोग्य, घरगूती, वस्तू, अन्न, सूती कपडे, फॅशन ट्रेंड केस आणि अधिक समावेश आहे. हे एक स्वास्थ्य आधारित आहे. सामाजिक नेटवर्क मालकीचे आणि चालविणे जाते की Google सेवा, सोशल नेटवर्किंग,

गूगलच्या त्याच्या सुरुवातीच्या वर्षात वाढीचा अनुभव वापर आकडेवारी बदललेली आहे. जरी सेवा कशी व्याख्या आहे. तीन Google कार्यावर नोव्हेंबर २०१५ मध्ये पुनर्रचना अग्रगण्य खास बदल घडून आलेला आहे जी सेवा ज्यांच्यावर आहे. २०१६ माजी फेसबूक कर्मचारी पुस्तक, मते काही नेते फेसबूक कंपनी एक गंभीर धोका म्हणून सामाजिक नेटवर्किंग आहे.

आपली प्रगती तपासा :

१) समाज माध्यमातून संबंधी उद्योग क्षेत्रात आहे का ?

_____

_____

_____

_____

_____

८.४ विक्री आणि जाहिरातील सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम - सामाजिक माध्यमाची जाहिरात आणि मार्केटिंग (SOCIAL MEDIA ADVERTISEMENT AND MARKETING)

आमचे सोशल मीडिया जाहिरात सेवा सोशल मीडियावर परिणाम मिळून जलद मार्ग आहे. आम्ही हजारो लोक त्यांना स्वारस्य असू शकते. कोणतेही आपली उत्पादके किंवा सेवांची जोडणी करा. आमचे सोशल मीडिया जाहिरात सेवा वापरुन फायदे वाढ वेबसाइट रहदारी, आघाडी पिढी आणि प्रभाव विक्री असते. आमच्या एजन्सी आपल्या वेबसाइटवर प्रगत सामाजिक जाहिरात तंत्रज्ञान नीती आणि अत्यंत कमी खर्च संपादन, क्लिक निर्माण साधते, आणि धर्मांतर वापरते.

सोशल मीडिया जाहिरात आपल्या व्यवसाय मदत करण्यासाठी तीन गोष्टी आहेत.

अ) आकर्षक सामाजिक मीडिया जाहिराती तयार करा.

ब) लेझर - लक्ष्य

क) डेटा, A/B चाचणी विश्लेषण आणि जाहिरात अनुकूल

उदा. फेसबूक जाहिरात - फेसबूक जाहिरात वापरुन त्या डेटा आणि कमी खर्च हा फायदा होतो. फेसबूक आपण कोणत्याही सामाजिक मीडिया प्लॅटफॉर्मवर वापरता येते. आपले अचूक खरेदीदार ती जाहिरात चांगली लक्षात ठेवतात.

समाज माध्यमातून जाहिरात करुन विक्री करण्यासाठी समाजमाध्यमे महत्त्वाची ठरत आहेत. आज विविध क्षेत्रात जाहिरात करुन आपल्या उत्पादनाला ग्राहक मिळवून विक्री वाढवणे हा एक उद्योग क्षेत्राचा महत्त्वाचा भाग असतो. पूर्वी पारंपारिक माध्यमातून जाहिराती करुन ग्राहकांना आकर्षित केले जात असते. पण आधुनिक काळात समाजमाध्यमांची भूमिका आणि वाढते महत्त्व लक्षात घेऊन विपणन क्षेत्रात या माध्यमांची वापर करण्याची स्पर्धा निर्माण झालेली

आहे. फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप वगैरे सारख्या माध्यमांतून सरास आणि मोफत जाहिराती केल्या जात आहेत. यातून ऑनलाईन विक्री आणि खरेदी ची नवीन पद्धत पुढे आली आहे. तसे आपण खरेदी केलेल्या वस्तूच्या बद्दल प्रतिक्रिया समान माध्यमातून दिल्या जात असतात. या प्रतिक्रिया चांगल्या बरोबर नकारात्मक पण असतात. यामुळे उद्योगांना आपल्या मालाची प्रतवारी सुधारणा करत असतात. अशा या समाज माध्यमाची जाहिरात आणि विपणनासाठी केलेल्या व्यापाराची काही फायदे आहेत. तसेच काही तोटे पण आहेत. या संदर्भातील माहिती पुढीलप्रमाणे अभ्यासता येते.

समाजमाध्यमांचे विक्री आणि जाहिरातील उपयोग किंवा वैशिष्ट्ये :

१) असंख्य प्रेक्षक (Large Audiences) :

समाज माध्यमात असंख्य प्रेक्षक असतात. यामुळे व्यावसायिक जाहिराती करण्यासाठी हा एक उत्तम मार्ग आहे. हजारो लाखो लोकांना एखादी पोस्ट किंवा संदेशाद्वारे आपल्या व्यवसायिक किंवा विक्रेत्याला आपल्या वस्तू किंवा सेवांची माहिती देणे सहज शक्य झाले आहे. प्रसाधन साधना पासून घर उपयोगी वस्तू पर्यंत विविध स्वरुपाच्या वस्तूची जाहिरात करणे शक्य झाले आहे.

२) मोफत प्रसारण (Free to Create) :

समाज माध्यमातून एकदा आपण मोबाईल किंवा संगणक सारखे उपकरण खरेदी केले की इंटरनेट जोडणी करुन अगदी सुलभ पद्धतीने हवी तशी जाहिरात करता येते. यासाठी विशेष खर्च लागत नाही. जाहिरात हवी तेवढा वेळा प्रसारित करणे शक्य आहेत. याचा फायदा मोठमोठ्या उद्योगापासून सामान्य विक्रेत्या पर्यंत सर्वच लोक करत आहेत. याचा फायदा अनेक लोकांना मिळवता आला आहे.

३) उत्साही सहभाग (Encourages Sharing) :

समाज माध्यमाचा उपयोगकर्त्या मध्ये अती उत्साह असतो. याचा फायदा घेऊन विक्रेते आणि जाहिरातदार विविध स्वरुपाची जाहिरात करुन आपल्या वस्तू व सेवांची जाहिरात करतात. यामुळे वस्तूचा अधिक खप झाल्याची असंख्य उदाहरणे आहेत. तरुण वर्गात समाज माध्यमांचा वाढता कल लक्षात घेऊन तरुणांशी संबंधित वस्तू व सेवांची जाहिरात केली जात असते. यामुळे बाजारपेठ आणि उद्योगाचा विकास होताना दिसत आहे.

४) वाढता विश्वास (Increases Barnd Loyalty) :

पुर्वी उद्योगाची जाहिरात केवळ मोठ्या आणि प्रतिष्ठित नावाजलेल्या वस्तूचीच केली जात होती. यामुळे नवीन उद्योजकाला बाजारात प्रवेश करण्यास संधी अधिक प्रमाणात नव्हती. पण आज समाजमाध्यमांचा वापर करुन कोणताही व्यक्ती आपल्या वस्तू व सेवांची जाहिरात करुन अगदी अल्प काळात ब्रँड किंवा प्रसिद्धी मिळवू शकतात. त्यामुळे बाजारपेठ स्पर्धेचे वातावरण निर्माण झालेले. पुर्वीचे बँड आज चालतील असे नाही. नविन कंपन्याही आपला ब्रँड तयार करत आहेत. यासाठी समाज माध्यमे वरदान ठरली आहेत.

५) दुरदृष्टी मुल्य (Uncovers Valuable insights) :

समाज माध्यमाच्या वापरासाठी एकदा उपकरण खरेदी केले ते अनेक काळासाठी फायदेशीर ठरते. थोडक्यात एक वेळा गुंतवणूक करुन मोबाईल किंवा संगणक संच खरेदी केल्यास आपण अनेक वर्ष आपल्या वस्तू व सेवांची जाहिरात करु शकतो. समाजातील विविध वर्गामध्ये आज समाज माध्यमांच्या वापराची क्रेज निर्माण झालेली आहे. यामुळे आपल्या उद्योग विकासाच्या दृष्टीने ही गुंतवणूक फायद्याचे ठरु लागली आहे.

समाज माध्यमांचा उद्योग व्यावसायावरील प्रतिकुल परिणाम :

१) नकारात्मक प्रतिक्रिया (Negative Feedback) :

समाज माध्यमातून आपला उद्योग व्यवसायाची जाहिरात करण्यासाठी नव्याने आलेल्या उद्योजकांना काही वाईट अनुभव येतात. समाज माध्यमातील असंख्य वापरकर्ते हे विविध आवडी-निवडी आणि विचाराचे असतात. यामुळे आपली वस्तू किंवा सेवा त्यांना पसंत पडेलच असे नाही. परंतू काही वापरकर्ते नकारात्मक प्रतिक्रिया देत असतात. त्याचा परिणाम नविन उद्योगजकांसाठी चांगला नसतो. त्यांना प्रोत्साहनाची गरज असते पण त्यांची संदेश पाहून अनेक उद्योजक व्यवसाय करणे सोडून देत आहेत.

२) लज्जपद अनुभव (Potential for Emburrassment) :

समाज माध्यमातून जाहिरातीमध्ये स्त्री-पुरुष सर्वजण आपल्या वस्तू आणि सेवांचे प्रमोशन करत असतात यामध्ये विशेषता स्त्री जाहिरातील वाईट अश्लील प्रतिक्रिया दिल्या जातात. सामान्य माणसाला लज्जा निर्माण होईल असे संदेश पाठवले जातात. यामुळे उद्योगाची जाहिरात बाजूला राहते बेअब्रू करणारे संदेश दिले जात असतात. यावर कार्यवाही करण्याचा प्रयत्न केल्यास असे वगैरे वर्तन करणारे खाते फसवे आणि खोट्या नावाने चालवली जात असतात.

३) वेळेचा अपव्यय (Time Intensive) :

समाज माध्यमातून आपल्या वस्तू आणि सेवांची जाहिरातील मिळालेले अल्प प्रतिसाद आणि नकारात्मक आणि अश्लील संदेशामुळे अनेकांना वाटते आपले वेळ अपव्यय होत आहे. यापेक्षा अधिक खर्च करुन पारंपारिक माध्यमातून जाहिरात केलेली योग्य आहे. असे मत अनेक जाहिरात कर्त्याचे आहे

४) ठोस उद्देशाचा अभाव (Unsetconcrete goals) :

समाजामध्ये विविध विचार आणि प्रवृत्तीचे लोक असतात यामुळे समाज माध्यमाचा वापर करणारे लोक कोणताही ठोस उद्देश न करता केवळ समाज माध्यमाचा संकेत स्थळाचा वापर करत असतात. यामुळे जाहिरातीच्या तत्त्व समजून घेण्याची मानसिकता नसते. म्हणून केवळ प्रतिक्रिया द्यावी म्हणून कशीही प्रतिक्रिया देत असतात. त्यामुळे मिळालेला प्रतिसाद सकारात्मक आहे की नकारात्मक हे ठरवणे अशक्य असते. म्हणून उद्योजकांनी आपल्या वस्तू सेवांची जाहिराती बद्दल लोकांचे योग्य मत समजलेच असे नाही.

५) सामाजिक गटांची निर्मिती (Create a Social Team) :

समाज माध्यमात आपल्या विचार, जात, धर्म, भाषा, प्रदेश, व्यवसाय पक्ष संघटना मित्र वगैरे सारखे गटांची रोजच्यारोज निर्मिती केली जात आहे. यामुळे बहुतांशी लोक केवळ आपल्या अनुकुल गटालाच प्रतिक्रिया देतात. इतर संदेश दुर्लक्ष करत असतात. यामुळे ज्या उद्देशाने जाहिरात केली जात असते तो साध्य होत नाही. परिणामाने उद्योगाच्या विकासावर होत असतो.

६) मार्गदर्शक तत्त्वाचा अभाव (Unset Guidelines) :

समाज माध्यमाच्या संदर्भात कोणत्याही तत्त्व किंवा नियमांची निर्मिती झालेली नाही. परिणामी उद्योग विकासाच्या दृष्टिने केलेली जाहिरात सफल होत नाही. विविध प्रकारचे नकारात्मक संदेश पाठवून संदेश पाठवले जातात. समाज माध्यमांचे वापरकर्ते आपले विचार मांडण्याचे मुक्त आणि सैराचारी आहेत. ही बाब उद्योगाच्या दृष्टीने योग्य नाही. म्हणून लवकरच मार्गदर्शन तत्त्व प्रमाण निर्माण होणे गरजेचे आहे.

आपली प्रगती तपासा :

१) उद्योगातील जाहिरातीवर होणारा परिणाम सांगा.

_____

_____

_____

_____

_____

८.५ सारांश

आज असंख्य कंपन्या समाज माध्यमांचा वापर करत असतात. सामाजिक जनजागृतीचे नविन मार्ग म्हणून समाज माध्यमांकडे पाहिले जाते. मादक पदार्थांच्या सेवनास विरोध, मानवी हक्कांचे संवर्धन, मुलगी बचाव वगैरे सारखी अभियाने चालवली जात असतात. या बरोबरच व्यापार आणि उद्योग बाजारातील वस्तू व सेवांची जाहिरात केली जात आहे. नविन कंपन्या बरोबर सामान्य गृहउद्योगातील वस्तू व सेवांची जाहिरात करणे समाजमाध्यमामुळे शक्य झालेले आहे. प्रतिष्ठित कंपन्याही आपली जाहिरात समाज माध्यमातून करण्याकडे वळू लागल्या आहेत. याचा फायदा अनेक व्यावसायिक वर्गांना झालेला आहे. यामुळे ग्राहक आणि उत्पादक यांची प्रत्यक्ष देवाणघेवाण करणे शक्य झालेले आहे. यामुळे नवनवीन रोजगार रोज विकसित होत आहे. पर्यटन, मनोरंजन, गृहउद्योग, हस्तकला, वगैरे क्षेत्रात रोजगार विकसित होत आहेत. यामुळे देशाचा अर्थव्यवस्थेला नविन दिशा मिळू लागली आहे असे म्हणून चुक ठरणार नाही. पंरतु समाज माध्यमातून येणारे वाईट स्वरुपाचा अनुभव आहे. नकारात्मक प्रतिक्रिया ही एक वेगळीच समस्या आहे. अनेक वेळा एखाद्या वस्तू व सेवेसंबंधी बदनामीकार संदेश ही पाठवले जात आहे. यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. म्हणून समाज माध्यमातील संदेश व माहिरातीवर एक नियंत्रण कायदा असावा अशी प्रतिक्रिया सर्वत्र निर्माण झाली आहे.

८.६ अभ्यासाचे प्रश्न

१) समाज माध्यमांचा सामाजिक-आर्थिक परिणाम काय आहे ? याचे उदाहरणासह स्पष्ट करा.
२) विक्री आणि जाहिरात क्षेत्रात समाज माध्यमांचा कसा उपयोग केला जातो ते स्पष्ट करा.
३) आर्थिक विकासाला समाज माध्यमांचा मार्ग फायदेशीर ठरत आहे चर्चा करा.
४) टिपा द्या.
   अ) जाहिरात आणि समाजमाध्यमे
   ब) आर्थिक विकास व समाजमाध्यमे

८.७ संदर्भ सूची

1. Macionis John (2005) Sociology (10th Edition) Prentce Hall.
2. Schaeffer and lamn (1998) Sociology, McGraw
3. सर्जेराव बोराडे (२०१७) समाजशास्त्र निराली प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

८ ब

समाज माध्यमांचे राजकीय परिणाम

घटक रचना :

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ राजकीय क्षेत्रातील समाज माध्यमांचा वापर
८.३ राजकीय प्रचारातील समाज माध्यमांची भूमिका
८.४ राजकीय निवडणूकांचे स्वरुप
८.५ समाज माध्यमांच्या राजकारणातील वापरांचे फायदे-तोटे
८.६ सारांश
८.७ अभ्यासाचे प्रश्न
८.८ संदर्भ सूची

८.० उद्दिष्ट्ये

१. राजकीय क्षेत्रातील समाज माध्यमांच्या वापरांची माहिती करुन देणे.
२. राजकीय प्रचारातील समाजमाध्यमांची भूमिकांची ओळख करुन देणे.
३. आधुनिक राजकीय निवडणूकांचे स्वरुप विशेष करुन सांगणे.
४. समाज माध्यमांचे वापराचे फायदे तोटे स्पष्ट करा.

८.१ प्रस्तावना

अनेक राजकीय पक्षांकडून समाज माध्यमासंबंधी कार्यशाळा (Workshops) आयोजन करुन निवडणूका जिकंण्याचा व्यवसाय निर्माण झाला आहे. यासाठी नवनविन विषयांच्या संदर्भात गंभीर गोष्टी रंगवल्या जातात. बाररुम संकल्पना, चित्तमुक्त, कणखर, शुद्ध सफेद बिछाना, तक्क्थ असा रुबाबदार पक्ष संभाचा दरबार पद्धतीने व्यवस्था करणे या सर्व जून्या पद्धती बाद आहेत. आधूनिक काळात सामाजिक तंत्रज्ञान माध्यमांच्या साधनांवर भर दिला जातो. गूगल हंगआऊट स्वरुपाचे कॉल्स आणि फेसबूक ग्रृप निर्माण केले जात आहेत. भेटी आणि सभा घेण्याची संस्कृतीला समाजमाध्यम तंत्रामुळे ब्रेक दिला आहे. चर्चा वादविवाद निवडणूक तंत्राला बदल झाला आहे. प्रत्येक राजकीय नेत्याकडे स्मार्ट फोन असणे संभाव्य झाले आहे. यामुळे समाजातील विविध प्रसंगी जनतेला ट्विीट करतात. समाजमाध्यम आणि तंत्रज्ञानामुळे राजकीय नेत्यांना विविध गुप्त संदेश ही पाठवणे शक्य झाले आहे. समाज मन उत्सुकता निर्माण करण्यासाठी सतत संदेश आणि चित्र पाठवून आपल्या मतदारांना गुंतवून ठेवणे

या तंत्रामुळे शक्य झाले आहे. जनजागृतीच्या जून्या उपयोगात आणले जात आहे. भारतीय प्रशासन व्यवस्थेत या तंत्राचे शिक्षण दिले जात आहे. कॉमस्कोअरच्या नविन अहवालानुसार भारत हा जगातील इंटरनेट वापरणाऱ्या लोकसंख्येत तिसरा देश ठरला आहे.

जपानमध्ये १७.६ मिलियन लोक नेट वापरणारे आहेत. मतदारांना आकर्षित करणारे समाजमाध्यम हे एक नविन तंत्र उदयास आले आहे.

राष्ट्रीय नेते, उमेदवार आणि सरकारी संघटना हे समाज माध्यमात विविध तंत्रा संबंधी कार्यशील असतात. भारतात नेत्यांना ही समाजमाध्यमे उपयोगी ठरु लागली आहेत. सरकारी यंत्रणेकडून ही आपल्या दैनंदिन व्यवहारासाठी या नवीन प्रणालीलाच उपयोगात आणले जात आहे. माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंह हे पण फेसबूक आणि टिवीटर वर अनेक संदेश देत होते. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी ही रोज समाज माध्यमातून लोकांशी संवाद साधताना दिसतात. या माध्यमातून राजकीय आणि राष्ट्रीय गोष्टींचा आढावा घेतात. नियोजन आयोगाची वेबसाईट वा चांगल्या प्रकारे वादविवाद केले जातात. त्या वेळच्या नियोजनाची चर्चा उत्तर पद्धतीने केली होती. गुगल हंगऊट संदर्भात सरकारी समिती निर्माण केली होती. राष्ट्रीय काँग्रेस पार्टी, आम आदमी पार्टी, भारतीय जनता पार्टी, समाजवादी पार्टी आणि बहुजन समाजवादी पार्टी हे राजकीय पक्ष टिवटरवर सक्रिय असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, अरुण जेठली सूष्मा स्वराज, शेशी थअरु जय पंडा, अकिलेस यादव, मायावती यांच्या सारखे अनेक राजकीय नेते टिवटरच्या माध्यमातील लोकांशी संवाद साधत असतात. यातील विविध नेते समाजमाध्यमात सतत सक्रिय राहून माहिती शेअर करत असतात.

बॅल्ग वर्कर राजशे लालवाणी म्हणतो की, भाजप व आदमी पाटी सारख्या पक्षांनी माध्यमा संबंधीत वर रुढ स्वरुपाचे संघटन निर्माण केले आहे. यामुळे जनआधार बांधताना दिसत आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि इतर पक्षांनी हे लवकर समजून घेतले नाही याचा परिणाम लोकसभेच्या २०१४ च्या निवडणूकीत पराजयाला सामोरे जावे लागले.

समाजमाध्यमातील चर्चा व वाद विवादाचा शासकीय आणि राजकीय संघटनासाठी अधिक जलद गतीने माहिती पुरवण्यासाठी उपयोगी केला जात आहे. देशातील नागरिकांना वस्तू मूल्य माहिती देण्यासाठी महत्त्वाचा माध्यम निर्माण झाले आहे. प्रधानमंत्र्याच्या माहिती तंत्रज्ञान सल्लागाराच्या या नविन माध्यम तंत्राच्या उपयोगावर नारे दिला आहे. आज जगात सर्वात अधिक भारतीय लोक समाजमाध्यमांशी जोडलेले आहे. भारतीय नविन तंत्रज्ञान व समाजमध्यमांना जोडण्यासाठी सर्वात मोठी समस्या ही दारिद्र्याची आहे. ज्यामुळे शासकीय योजनाच्या सेवांची माहिती समाजमाध्यमातून देण्यास प्रारंभ झाला आहे. जागतिक दर्जाचे वेब ॲप्लीकेशन उदय झाल्यामुळे नागरिकांच्या लोकांना आवडी-निवडी, रस्ते, खड्डे, रहदारीची समस्या अतिआवश्यक सेवेची माहिती, जोडणी, महिला, सुरक्षा, आणि इतर विविध समस्यासाठी आवाज उठवण्यासाठी ही माध्यमे महत्त्वाची आहेत. बंगलोर शहरांत नागरी पुढाकारातून एक संघटना निर्माण झाले आहे.

www.ipaidabribe.com सरकारी कार्यालवाजी भ्रष्टाचार

संदर्भात चर्चा करणारा विचारमंच निर्माण झाला आहे. स्थानिक स्वराज संस्थेतील समस्यांवर या माध्यमातून भर दिला आहे. फेसबूक टिवटर आणि यूट्यूबच्या माध्यमातून भ्रष्ट्राचाराच्या विरुद्ध सामान्य लोकांनी आवाज उठवला जात आहे.

८.२ राजकीय क्षेत्रातील समाज माध्यमांचा वापर

राजकारण :

प्रत्येक गटाच्या सर्व सदस्यांचे अर्ज अशी निर्णय प्रक्रिया आहे आणि नीट निरखून तो साध्य आणि पोझिशन्स व्यायाम संदर्भात शासन-एक नवीन मानवी समाज विशेषतः नियंत्रण आयोजित राज्याशिवाय राजकारण दिलेल्या समूहातील अभ्यास किंवा शक्ती आणि संसाधने वितरण सराव तसेच परस्परांचे संबंधीचे समूदाय दरम्यान आहे. विविध पद्धती किंवा प्रसार लोकांमध्ये एक स्वतःच्या राजकीय मताबाबत Forcing ज्यात राजकारणामध्ये तैनात करण्यात आहे. चर्चा व इतर राजकीय विषय बनविण्यासाठी कायदे आणि आयाम शक्ती यांचा समावेश युद्धविरोधी कार्यात केला.

सामाजिक मीडियाचा राजकीय सहभागात वापर (Social Media and Politics Use) :

राजकीय मोहीम कुठे आणि ज्यांच्याशी ते त्यांच्या पैसे गुंतवणूक अधिक जाणून झाले आहेत. कारण इंटरनेट आणि सामाजिक मीडिया मूलतः मोहीम कशी बदलली आहेत. तंत्रज्ञान आणि डिजिटल जाहिरात हे निर्णय वाहनचालक आहेत. धोरण ठरविण्यासाठी आणि आपल्या मतदारांना संपर्क करण्यासाठी उमेदवार - पूरस्कार गट व कार्यकर्त्यांनीही योग्य संदेश करणे योग्य वेळी, योग्य व्यक्तीसमोर मिळविण्यासाठी नेहमीपेक्षा अधिक दबाव आहेत. खरेतर Borrcell व सहयोग २०१६ राजकीय जाहिरात खर्च शीर्ष की ८ अब्ज सह १ अब्ज डिजिटल जाहिरात फक्त अंदाजे इत्यादी खाली डिजिटल आणि सामाजिक मीडिया, जाहिरात, राजकारण या चार मार्गांनी बदलत आहे.

१) स्त्रोत (Webpage FX) :

एक ऑनलाइन हजेरी कायदेशीरपणे निर्माण होते. इंटरनेट कुठेही जात नाही व तंत्रज्ञान फक्त पुढील समाजात एकत्रित जाईल. सुमारे प्रौढांपर्यंत दोन तृतीयांश सामाजिक मीडियाचा वापर आणि अनेक बातम्या आणि माहिती मिळविण्यासाठी प्रथम स्त्रोत आहे. ऑनलाईन जाहिरात केवळ bolgerig प्रयत्न करुन वीज स्थितीमध्ये मोहीम ठेवले नाही, पण एक वाढत्या कैद केलेल्या संबंध बातम्या व संदेश संवाद साधण्यासाठी एक सोपा मार्ग पूरवतात. एक ऑनलाइन हजेरीचा अभाव आहे. फार चांगले की उमेदवार किंवा कारणे मतदार दृष्टीने अस्तित्वात नाही.

२) सामाजिक मीडिया ड्रायव्हस् कारवाई :

एक मोहिमेत व्यस्त एक मतदार सर्वात सोईस्कर मार्ग ऑनलाइन आहे. मतदान पूर्ण एक इव्हंटसाठी RSVP किंवा त्यांच्या समर्थनार्थ ठेवावे. व्टिटर (Casbtage) एक ऑनलाइन प्लॅटफॉर्म आहे. जे वापरकर्त्यांना व्टिटरद्वारे राजकीय मोहीम किंवा कारणे थेट ही सांगण्यास परवानगी दिली आहे.

३) राजकीय क्रांती (Politics Revolution) :

राजकीय क्रांती ही बहूधा सशस्त्र उठाव व युद्ध यांच्या ओघातच घडून येते. सशस्त्र उठावावाचून राजकीय तत्वज्ञ सामाजिक क्रांती घडू शकते. असा विचार क्रांतीचा सर्वश्रेष्ठ

तत्वज्ञ कार्ल मार्क्स याला त्याच्या युद्धाच्या शेवटी सूचला होता. तो लिहितो की, इंग्लंडमध्ये सशस्त्र उठावावाचून शांततामय उपयांनीच समाजवादीची स्थापना होऊ शकेल. निःशस्त्र क्रांतीचा पूरस्कार भारतीय स्वातंत्र्याचे नेते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी प्रामूख्याने मांडला आणि भारताने स्वातंत्र्य व लोकशाही संघराज्य हे एका अर्थी सत्याग्रहाच्या आंदोलनाने सशस्त्र युद्धावाचून निर्माण झाले. हे जरी खरे असले तरी जगातील आजपर्यंतच्या राजकीय क्रांत्यांचा इतिहास हा मूख्यतः युद्ध आणि हिंसा यांनी भरलेला दिसतो. पूष्कळ वेळा प्रस्थापित राज्यसंस्थेतील सत्ताधारी हे क्रांतिकारक आंदोलनाला आळा बसण्याकरिता पोलीस व सैन्य यांचा वापर करतातच. त्यामुळे क्रांतिकारक आंदोलनाचे युद्धात रुपांतर होते. नंतर सशस्त्र क्रांती झाली त्यानंतर प्रतिक्रांती व क्रांति यांची मालिका लागली ती बांगलादेशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात दिसते. म्हणून असे निश्चित म्हणता येते की, भारतातील शांततामय लोकशाही क्रांति हा जगाच्या इतिहासात एक अपवादच ठरतो व हा अपवादी एका अर्थी ब्रिटनच्या जागतिक राजकीय धोरणाचाच परिणाम होय.

राजसंस्था ईश्वराच्या संकेताने निर्माण झाली आहे. अशी श्रद्धा राज्यसत्तेच्या मूळाशी हजारो वर्षे होती. परमेश्वर काही निवडक माणसांना राजकीय सत्तेचे वरदान देतो आणि तो माणसे त्या वरदानाच्या आधारे सनदशीर शासनाची स्थापना करुन वंशपरंपरागत राज्ये चालवितात. वजद्रोह, बंड, कायदेभंग इत्यादी कृती यामूळे आधार सापडतो. नवीन उदयास येणारा व्यापारी वर्ग आणि सूस्थितीतील मध्यम वर्ग वरचढ होऊ पाहतात. तेव्हा त्यांना सरदारवर्ग राजाश्रयाच्याद्वारे ठेवतो. कारण त्यांनाही राज्य बळकावण्याची किंवा स्वसत्ता वाढविण्याची इच्छा असते. तसेच राजाला कायदे करण्याचा आणि कायद्याची अंमलबजावणी करण्याचा व जनतेवर सत्ता चालविण्याचा नैसर्गिक व दैवी हक्क आहे. या श्रद्धेला उखडून टाकले. राजाच्या विरुद्ध जाणे व राजसत्तेला नष्ट करणे.

४) निवडणूकांचे राजकीय स्वरुप :

निवडणूकांचा अभ्यास हे बूद्धिप्रधान काम आहे. त्यात निवडणूक काळातील प्रक्रिया म्हणजे प्रचार, मतदान, निकाल घोषित करणे आणि नंतर सरकार बनविणे यांचा समावेश होतो. यामध्ये लोकशाहीचा अभ्यास अंतर्भूत आहे. या अभ्यासातून प्रतिनिधिक लोकशाहीची यंत्रणा कशी चालते यावर भर दिला जातो. प्रातिनिधीक लोकशाहीच्या अभ्यासातून त्यातील ठळक विषय नजरेसमोर येतात. या विषयांचे राजकीय क्षेत्रातच नव्हे तर शिक्षणक्षेत्रातही परिणाम झालेले दिसून येतात. सन १९८० पासूनच्या भारतीय निवडणूकांविषयी प्रसिद्ध झालेल्या साहित्याचा आढावा घेऊन त्याचे चिकित्सक मूल्यमापन करणे यावर या अभ्यासात जोर दिलेला आहे. हा लेख लिहिणाऱ्यांचे असे मत आहे की, निवणणूकांचा अभ्यास हा खरे म्हणजे विज्ञान आणि राजकारण यांच्यामध्ये कोठेतरी आहे. म्हणूनच त्यांचा संदर्भ घेणे महत्त्वाचे आहे.

जगातिल सर्वात मोठ्या लोकशाहीच्या निवडणूकांचा अभ्यास करणे हे एक मोठे आव्हान आहे. देशाचा आकार आणि लोकसंख्या लक्षात घेता भारतातील सार्वत्रिक निवडणूका ही जगातील सर्वात मोठी निवडणूक प्रक्रिया ठरते. सन १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या तेव्हापासून हे लक्षात आलेले आहे. भारतातील राजकीय, भाषाविषयक, जात आणि धर्म यातील वैविध्य लक्षात घेता आणि भारतातील अध्यक्षीय पद्धती लक्षात घेता. निवडणूक प्रक्रिया ही अधिकच गुंतागुंतीची ठरते. ही एवढी प्रचंड राजकीय घटना सूरळीतपणे पूर्ण व्हावी व त्याचा अभ्यास करता यावा म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या गेल्या आहेत ?

निवडणूक अभ्यासात कोणते विषय येतात? याविषयी कोणत्या प्रमुख लेखकांनी लिहिले आहे? कोणत्या पद्धतीने हे अभ्यास प्रसिद्ध होतात आणि कोणत्या प्रकारचे वाचक असे अभ्यास वाचतात? हे प्रश्न मनात ठेवून सध्या उपलब्ध असणाऱ्या साहित्याचे बदल दर्शविण्याचा येथे प्रयत्न केला आहे. याचा अर्थ व परिणाम समजून घेण्यासाठी या क्षेत्रातील काही तज्ज्ञांच्या मुलाखती घेतल्या गेल्या आणि वाचनात समोर आलेले काही अर्थ लक्षात येऊ लागले. १९८० सालापासून भारताच्या सार्वत्रिक निवडणूकाबाबत प्रसिद्ध झालेल्या साहित्याचा आढावा घेऊन वैज्ञानिक आणि राजकीय चर्चाचा वेध घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

निवडणूकांच्या अभ्यासाविषयी वर दिलेली व्याख्या मर्यादित आहे. प्रातिनिधिक लोकशाहीची मध्यवर्ती संस्था म्हणजे निवडणूका. म्हणून त्या राजकारणाच्या सर्व विभागांशी निगडित आहेत. तरीही निवडणूकांचा अभ्यास हा लोकशाहीच्या अभ्यासातील एक स्वतंत्र उपविषय आहे. या अभ्यासाचा भर यंत्रणेवर जास्त असून त्यातील मूलतत्वावर कमी आहे. हा उपविभाग जास्त ठळकपणे समोर येतो. आणि त्याचे परिणाम फक्त शिक्षण क्षेत्रावरच नाही तर राजकीय क्षेत्रावरही झालेले दिसून येतात. या चिकित्सक आढाव्याचा हाच मूख्य विषय आहे.

भारतातील निवडणूकांविषयी केलेल्या वेगवेगळ्या अभ्यासाचा या लेखात आढावा घेतलेला आहे. निवडणूकांच्या अभ्यासाविषयी बरेच प्रश्न आणि चर्चा यांचे विश्लेषण येथे केले आहे. यातून राजकीय आणि वैज्ञानिक गुंतागूंतीचे स्वरुप नजरेसमोर येतात.

आपली प्रगती तपासा :

१) राजकीय क्षेत्रातील समाज माध्यमांचा वापर लिहा.

_____

_____

_____

_____

_____

८.३ राजकीय प्रचारातील समाज माध्यमांची भूमिका

मोठे आणि आपण विचारांपेक्षा लहान दुर्देवाने सामाजिक मीडिया निवडणूक या शेवटच्या कॅनेडियनल फेडरल निवडणूक दलाली जगातील सर्व मोहीम प्रत्यक्ष गोष्टींशी तूलना करु शकत नाही. कोणतेही मीडिया आपल्यासाठी हे फक्त मतदार कोणत्याही परिस्थितीत जेथे पाहिजे तेथे बदल करुन एक निवडणूक होतील असे स्पष्ट झाले आहे की उशिरा निकाल होता तरी अद्याप सोशल मीडियाची मदत होते.

१) लीड अप :

सामाजिक मीडिया, हे अक्षरक्ष: जटिल आहे. पहिल्या भागात देशभरातील मोठा पक्ष डेटा अधिक विसंबून आहेत मोठे डेटा हार्परच्या प्रथा सुरु केले आहे की लवकर २००० चा मार्ग परत मतदार प्रतिबद्धता सॉफ्टवेअर संदर्भीत मतदारांना माहिती स्विंग, गोळा आणि पक्ष त्यांचा

कायदा त्यांना सूक्ष्म आणि सरकार शेवटी १० वर्षे मदत करण्यासाठी पक्ष सक्षम ही प्रणाली होती. मतदान करण्यासाठी त्यांच्या मतदान वर्तन निग्रहपूर्वक पून्हा सांगणे, मित्र, कुटूंब, बातम्या आऊटलेट्स आणि सामाजिक मीडिया त्याऐवजी करणे.

२) उदारमतवादी सामाजिक मीडिया यशस्वी :

सोशल मीडिया निवडणूक येत आहे की, परिणाम सिद्ध या मोहीम take a ways आहेत. उदारमतवादी पक्षाचे आणि जस्टीन इलियट यूदू या अभियानामध्ये प्रभावीपणे सोशल मीडियाच वापर शेअर्समध्ये पक्षाचे आणि मोठा प्रतिसाद प्रदान करत आहे आणि रिअल मागे आणि पुढे प्रतिबद्धता खालील किती मोठ्या ट्विअलच्या तो फक्त सल्ला नाही आहे. जस्टीन इनियट यूदू मतदार चित्र प्रदान असावे. सामाजिक मीडिया पोस्ट प्रकाश पाहिले तर ते दिसत नाही. सोशल मीडिया असू शकते कसे प्रभावी कठीण आहे.

३) राजकीय मोहीम सामाजिक मीडिया वापरुन (Politics and Social Media Use) :

सामाजिक मीडिया एक राजकीय मोहिम वेबसाइट आहे. त्यात अलीकडील पोस्टच्या गूल होणे खालील एक उमेदवार वेब उपस्थिती इमारत महत्त्वाच्या आहेत. ऑनलाइन जाहिरात साधणे आणखी एक पैलू वेधून भिन्न ऑनलाइन साधने शेकडो सोशल मीडिया म्हणून वर्णन केले जाऊ शकते की शब्दश: आहेत. सामाजिक मीडिया आपण भेटू आणि गट माहिती ऑनलाइन शेअर करण्यास परवानगी देते. कोणत्याही वेबसाइट किंवा इंटरनेट कार्यक्रम आहे. अधिक सोशल मीडियावर काही ट्विटर, फेसबूक ज्यात माहितीचा आपण जवळजवळ निश्चित ऐकले आहे. ज्यात अनेक माहितीचा समावेश आहे. प्रत्येक सामाजिक मीडिया साइट आपण विविध प्रकारे आणि साहित्य मित्र आणि सहकारी गतीन वाढवण्यात या माध्यमाचा मोठा वाटा आहे. समकालीन भारतीय राजकारण विकासाविषयी समज आणि इतिहासातील योगदानाविषयी गैरसमज निर्माण करण्याभोवती आकार घेत आहे. त्यामूळे या माध्यमाच योगदान हे आत्ताच्या राजकारणाचं कॅरेक्टर आहे.

आपली प्रगती तपासा :

१) निवडणूकीत समाज माध्यमांचा उपयोग सांगा.

_____

_____

_____

_____

_____

८.४ राजकीय निवडणूकांचे स्वरुप

अ) अमेरिकेतील सार्वजनिक निवडणूक :

अमेरिकेच्या काही महिन्यापूर्वी पार पडलेल्या निवडणूकीत फेसबूकचा एकाच वेळी एकाच यंत्रणाकडून दुहेरी वापर झाला. ज्यांनी दूसऱ्यांच्या बदनामीच्या जाहिराती दिल्या. त्यांनीच

स्वत:च्या कौतुकाचा जाहिराती दिल्या. त्यामूळे नियंत्रण नसणे आणि ते ठेवणे अतिशय कठीण असणे हे या माध्यमाची जाणीव आहे.

या माध्यमाच्या मूख्य बलस्थानाचा राजकारणाला जेवढा उपयोग आहे. त्याहीपेक्षा या माध्यमाच्या उपद्रव्य क्षमतेचा उपयोग अधिक आहे. अस म्हणायला आपल्या देशात वाव आहे. कारण हे माध्यम जेवढ ज्ञान देते, तेवढेच अज्ञान परंतु जेव्हा आपण राजकारणाचा या माध्यमाशी संबंध जोडतो तेव्हा अर्थातच त्याच्या सर्व बाजू समजून घ्याव्या लागतात. मूळात समाजातील जवळपास सर्वच घटक या माध्यमान आपलेसे केले आहेत. या माध्यमाने माणसाच अस्तित्व अन चारित्र्य तपासण्याची पद्धत देखील जन्माला घातलेली आहे. पूर्वी गाव, तालुका, जिल्हा किंवा जातीच्या लिंकवरुन नात लावण्याचा प्रयत्न केला जात होता. आता फेसबूकच्या म्यूच्यूअल फ्रेंडलिस्टवरुन नात ठरतं आणि पोस्टवरुन त्याच आलन आवाका अन आकर्षण याचा बांधला जातो म्हणून हे माध्यम राजकारण या मानवी व्यवहाराला आपल्या कवेत घेण्यात यशस्वी झालेल आहे. समाजात ज्या ज्या गोष्टीचा प्रभाव असतो त्या गोष्टी राजकारणाला अन राजकारण्यांना वर्ज्य करता येत नाहीत. त्यामूळे सोशल मीडिया उपयोगी असो वा उपद्रवी त्याचा प्रभाव असल्यानं समकालीन राजकारण त्या भोवती कटिबद्ध आहे.

जास्त आहे अर्थात त्यातले सगळेच तसे असतात किंवा सगळेच खोटे आहेत असं नाही या माध्यमावर काही लोक एकमेकांशी एकमेकांवर लक्ष ठेवण्यासाठी जोडलेले असतात. त्यामुळे हे माध्यम माणसांना संख्यात्मक बाजुनं एकत्र करत असलं तरी त्यात गुणात्मकता मात्र फारशी नाही. अर्थात माणसांमध्ये काहीशी आपूलकी हे माध्यम वाढवत आहे. पण त्यात आभासीपणा जास्त आहे. जातीपातीच्या भिंती ओलांडण्याच काम हे माध्यम करत नाही. अस असल तरी हे माध्यम संकूचित आहे असही नाही. या माध्यमाला कुठल्याही चौकटीत गूंफण अवघड आहे. मात्र अस असल तरी आजच्या राजकारणाचा गाभा अन आवाका घडवण्यात या माध्यमाचा मोठा वाटा आहे. आजच राजकारण बेभरवशाचं होण्यातही याच माध्यमाचा मोठा हातभार आहे. अर्थात ते सामाजिक प्रतिबिंब आहे. माध्यम तिथे निमित्त मात्र आहे.

ब) भारतातील २०१४ ची सार्वत्रिक निवडणूक :

मोदी सत्तेवर येण्यापूर्वीच आपल्या देशात सोशल मीडिया लोकप्रिय झालेला आहे. सुरुवातीच्या काळात हे माध्यम उच्चशिक्षित मध्यमवर्गाकडे होते. अण्णा हजारे यांच्या आंदोलनात सर्वप्रथम हे माध्यम दखलपात्र झाल कारण अण्णांच्या आंदोलनात ज्या समूहान झटकत क्रांतीची स्वप्न पाहिली, त्याच वर्गानं हे माध्यम स्वयम घोषित क्रांतीच्या नादात कवेत घेतलेल होत. तत्कालीन काँग्रेस सरकार अन् त्या सरकारमधील महत्त्वाच्या नेत्यांना यथेच्छ बदनाम करण्यात या माध्यमाचा रोल राहिला. त्यामुळे भारतीय राजकारण भ्रष्टाचार मूक्तीसाठी या माध्यमातून जेवढ प्रबोधन झाल त्यापेक्षा अधिक उपयोग सत्ताधारी पक्षाच्या बदनामीसाठी झालेला आहे. अगदी आत्ताही हे माध्यम तेच काम नेटानं पार पाडत आहे.

या माध्यमाने अण्णांच आंदोलन राजकीय अर्थान यशस्वी केल. कारण त्यातून आपलं राजकीय भवितव्य घडवू इच्छिणाऱ्या केजरीवाल्यांचा पक्ष जन्माला आला. त्याच आंदोलनात काँग्रेस पुरेशी बदनाम झाल्यान मोदींच्या स्वप्नाला पंख फुटले अन ते पंतप्रधान झाले. मोदी प्रणीत भाजप यशस्वी होण्यात सोशल मीडियाचा मोठा वाटा आहे.

हे माध्यम ट्रेंड निर्माण करण्यात कमलीच यशस्वी झालेल आहे. पण या माध्यमावर एकाच वेळी परस्परविरोधी ट्रेंड निर्माण होत असतात. त्यामुळे या माध्यमानं जन्माला घातलेले अन वाढवलेले पक्ष असोत वा नेते त्याची विश्वासार्हता ट्रेंड सारखीच आहे. मोदी सत्तेवर आल्यानंतरचा काळ सगळ्याच बाजुंनी सोशल मीडियाच्या जंजाळात अडकलेला आहे. अन तो ट्रेंडभोवती आहे. देशात कोणत्या विषयावर काय भूमिका घ्यायची इथपासून कोणत धोरण कसं असाव इथपर्यंत सगळं काही सोशल मीडियावर घडवलं गेल आहे. ज्यांना या माध्यमान बळ दिल, मोठ केल, आधार दिला; त्यानाच आता हे माध्यम कायद्याच्या कचाट्यात आणून संवादी रुप थांबवावसं वाटत हेच या माध्यमाचं बलस्थान आहे आणि हीच त्याची मर्यादाही आहे. राजकारण अनिश्चित असत अस म्हटलं जात, ते अधिक खरं करुन दाखवण्याची जबाबदारी सोशल मीडिया पार पाडत आहे. म्हणून त्याला समजून घेणं अधिक महत्त्वाच आहे.

त्यातच आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सोशल मीडियाच प्रचंड आकर्षण आहे (काही दिवसांनी होत म्हणाव लागेल की, काय असं वाटाव इतक्या झपाट्यानं या माध्यमान मोदींना चिंताग्रस्त केलेलं दिसत) पंतप्रधानाच्या आवडीच्या विषयाला राजकीय महत्त्व असणं स्वाभाविक आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरु यांना लहान मूल खूप आवडायची अस म्हणतात खर तर लहान मुल आवडणं अतिशय स्वाभाविक गोष्ट. पण तीच गोष्ट राष्ट्रप्रमूखांना आवडते, तेव्हा त्याचं महत्त्व निराळ असत. अशा मोठ्या नेत्याच्या आवडीनिवडीच देखील एक राजकारण असत. सोशल मीडियाचं अगदी तसच आहे. आत्ताच्या आपल्या पंतप्रधानांना सोशल मीडिया आवडत असल्याने त्याचं राजकीय महत्त्व अन त्याचे राजकीय परिणाम असणे स्वाभाविकच म्हणाव लागेल.

हे प्रस्थापित व्यावसायिक माध्यम मालकीला अप्रत्यक्षपणे आव्हान देणाचा भाग म्हणूनही जन्माला आलेल आहे. तसच माध्यमांच्या प्रस्थापित मालकीला आव्हान देण्याबरोबर या माध्यमानं अनेक प्रस्थापित मूल्यांना देखील आव्हान दिल आहे. एकूण प्रस्थापित मानसिकतेला या माध्यमानं आव्हान दिलेले आहे. त्यामुळे प्रस्थापित मानसिकतेच्या राजकारणाला कलाटणी देण्यात या माध्यमाचा मोठा वाटा आहे. गावच्या राजकारणापासून देशाच्या राजकारणापर्यंत या माध्यमाचा प्रभाव आहे. कारण सार गाव या माध्यमावर येऊन बसलं आहे. म्हणून आत्ताच्या राजकारणाचा एक कंगोरा सोशल मीडिया भोवती गूरफटलेला आहे.

आत्ताची तरुण पिढी मोठ्या प्रमाणात वर्तमानात रमते. तिला इतिहास महत्त्वाचा वाटत नाही. कारण वर्तमान आपल्या हातात असतो. तो हवा तसा घडवता येतो. आपल्याला हव्या त्या दिशेनं वळवता येतो. त्यात इतिहासाचं दडपण नसतं हा बदल आहे. इथ बदलाची बाजू कितीही आकर्षक असली तरी ती धोकादायक आहे. राजकारणासाठी तर हा धोका अधिक गंभीर आहे. इतिहास नाकारणाऱ्या काळाच आव्हान आपल्या समोर आहे ते आव्हान वाढवण्यात सोशल मीडियाचा मोठा वाटा आहे. त्यातच जेव्हा आपण राजकारणाच्या अनूषंगानं बघतो. तेव्हा इतिहास महत्त्वाचा असतो. पण मूळात इतिहासाचं देण-घेण नसेल तर बाकी मूल्यांना कुठे महत्त्व ? आपण समाज म्हणून मूल्यात्मक बाजूनं जेव्हा इतिहासाशी फारकत घेतो. तेव्हा मात्र आपलं वर्तमान चिंतनीय असतं आत्ताचा काळ तसाच काळ आहे.

इतिहासाची मोडतोड हा आपल्यापूढच्या धोका आहे. तो आपल्या देशात आता निर्माण केला जातोय. त्यात भाजपचा वाटा आहे. हा धोका पसरवण्यात सोशल मीडियाचा मोठा आधार घेतला जातो.

आपल समकालीन राजकारण (भाजपच्या पुढाकारानं) इतिहास, मुल्य संस्कृती याची नव्या राजकारणासाठी फेरमांडणी करण्यात गर्क आहे. त्यात सत्य अन वास्तव हे गौण मुद्दे आहेत. सोशल मीडियाचा अशा फेरमांडणीला अवास्तव महत्त्व देण्यात हातभार आहे.

हे माध्यम व्यक्तीच आहे. या माध्यमाला प्रसाराच्या मर्यादा आहेत ही आणि नाहीत ही. कारण सर्वसामान्यपणे हे माध्यम आपापल्या मित्र परिवारापूरतं बंधिस्त ठेवता येते. आवश्यकता असल्यास जाहिरात देऊन हव्या त्या लोकांपर्यंत पोहचताही येतं, त्यामुळे राजकीय नेत्यांना आपल्या भूमिका अन भावना लोकांपर्यंत पोहचवता येतात. त्यामुळे हे माध्यम जिथे जिथे निवडणूकाचं राजकारण व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व देत तिथे तिथे महत्त्वाचं आहे.

हे माध्यम गतिशील असल्यास त्याची परिणामकारकता तितकेच गतिशील आहे. ज्या गतीने ते एखाद्याला उंचीवर घेऊन जाते, त्याच गतीने खाली खेचते. हे माध्यम एकेकाळी ज्यांना आता त्याच्यावर बंधन घालावीशी वाटतात कारण एकच नियंत्रणाचा अभाव तसंच हे माध्यम कूणा एकाच्या मालकीच नसल्याने कुणा एकाबरोबर राहायला तयार नसते. त्यामुळे ते आज ज्याच्या फायद्याचं असते उद्या त्याच्या तोट्याचही ठरु शकत.

या माध्यमाने राजकारण कस बदललं आहे, हे पाहणं अधिक महत्त्वाचे आहे.

क) मोदी विरोधात समाज माध्यमाचा वाढता वापर :

आपल्या देशात मोदी सत्तेत आल्यानंतर या माध्यमाचा प्रभाव अधिक वाढला. मोदीप्रणीत भाजपन आपली बहुतांश शस्त्र याच माध्यमांद्वारे वापरली. विशेषतः विरोधकाची बदनामी करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर मोठ्या उपयोगिता वाढवलेली आहे. विशेषतः या माध्यमानं आता व्यक्तिगत रुप काहीस सोडलं आहे. त्यात व्यापक प्रगतीचा मुद्दा अस्तित्वाच्या प्रश्नामुळे शिरकाव करत आहे. कारण हे एका बाजूला ट्रोल करुन बदनामीसाठी जसं वापरलं गेले, तसेच आत्ता सरकारी धोरणाची चिकित्सा करण्यासाठी त्याचा उपयोग केला जात आहे. अर्थात त्यात अजून दोष आहेत. पण तरीही मर्यादित अर्थानं विश्वासार्हता निर्माण करुन काही व्यावसायिक संस्था हे माध्यम नीटपणे वापरत आहेत. सर्वच पक्षातील दीर्घकालीन भवितव्य असलेले नेतेही या माध्यमाचे प्रबोधनात्मक भूमिकांसाठी उपयोग करत आहेत.

सोशल मीडियामुळे महत्त्वाच्या मुद्याचं महत्त्व कमी होण अन नको त्या मुद्याचं महत्त्व वाढण्याचं काम चोखपणे पार पाडल जात. राजकीय पक्षांना किंवा नेत्यांना काही महत्त्वाच्या गोष्टीवरच लक्ष विचलित करण्यात जे राजकारण घडवायचं असत, ते काम सोशल मीडियाच्या मदतीन नेमकेपणाने पार पाडता येते. त्यातच नको त्या मुद्याचं अवास्तव महत्त्व वाढवण राजकारणासाठी आवश्यक असते. ते ही काम हे माध्यम चोखपणे पार पाडत समकालीन राजकारणाच्या बाजून पाहिलं तर गाईचे प्रेम हे राष्ट्रीय कार्य झाल अन गाय वाढवणारा शेतकरी मात्र दूय्यम झाला मात्र हे माध्यम कसं वापरायच हे जस सामान्य माणसाच्या, विशेषतः शेतकऱ्यांच्या हाती आल, तेव्हा मात्र हे माध्यम सार्वजनिक चर्चाविश्वाची दिशा निर्धारित करु

शकल. जिथ मूल्यात्मक सिद्धांत आहे त्यासाठी आग्रह धरणार कुणीतरी आहे. त्यात सातत्य आहे, तेव्हा अधोरेखित झाल तेव्हा मात्र या माध्यमाची भूमिका अधिक परिणामकारक दिसायला लागली.

सोशल मीडिया हे जागतिकीकरणानंतरच्या गतिमान युगाचं प्रतिबिब आहे. माणसं व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रेमात गुरफटत असताना सामाजिकतेचा सामूहिक आधूनिक अर्थ लावायला भाग पाडणं, हे या माध्यमाच फलित आहे. समाजाच्या रोज बदलणाऱ्या अपेक्षांचा दबाव निर्माण करणाऱ्या भूमिकाचं त्यात प्रतिबिंब आहे. आमच्या अपेक्षांची आभसी का होईना, पण दखल घ्या अस ज्या आजच्या काळात म्हटल जात आहे, अशा काळात हे माध्यम चौथ्या स्तंभाची आधूनिक पद्धतीची बाजू सांभाळण्याचा प्रयत्न करत आहे.

त्यातच माणसं आत्मकेंद्री झाली आहेत. त्यांच्यात चांगल्या गोष्टी घडवण्याचं समूहभान पूर्वीसारखं राहिलेल नाही, अस म्हणत असताना हे माध्यम प्रस्थापित होऊ पाहणाऱ्या प्रत्येकासाठी सुद्धा माणसांच्या अभासी समूहभानातून का कनेक्ट मदत करतो आणि आपल्याला ऑनलाइन You Tube व्हिडिओ लक्ष केंद्रित करतो.

आपण आपल्या राजकीय प्रचारात सोशल मीडियावर वापर कल्पना करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार याची पर्वा न करता आपल्या जिल्ह्यातील आकार, शक्यता अनेक अधिक्य संभाळण्यापेक्षा एक किंवा या सोशल नेटवर्किंग साइट त्या सामाजिक मीडिया समूदाय सहभागी होतात आणि आपली मोहीम स्वयंसेवक तसेच देणगीदार आणि मते शोधण्यासाठी त्यांचा वापर करण्यासाठी उमेदवार म्हणून असंख्य मार्ग आहेत.

सोशल मीडिया अधिक आणि अधिक लोकप्रिय निवडून अधिकार आणि संपूर्ण राजकीय उमेदवारांना होते. म्हणून देश आणि सर्व पातळी आहेत.इद्रियगोचर समर्थन पडघम की आश्चर्यकारक क्षमता लक्षात सुरु होत आहे. पहिल्या इंटरनेट आधी लांब निवडून आले अगदी कार्यालयधारक घटक आणि समर्थक पोहचण्यासाठी सुरुवात केली आहे. सामाजिक मीडिया उत्तम प्रकारे राजकीय मोहीम मदतीसाठी तयार आहे कारण हजारो समर्थक तत्काळ आणि भेट संपर्कात राहण्यासाठी सूलभ मार्ग कधीच नव्हते. पूर्वी राजकीय मोहीम, जाहिरात अशा मोठ्या प्रमाणावर मेल सूची आणि स्वयंचलित फोन कॉल मेहनती कामे सहभागी असताना, सोशल मीडिया तूम्ही बाहेर येणे काही कीस्ट्रोक्स आपल्या समर्थकांच्या प्रत्येक एक बाहेर पोहोचू देते.

सामाजिक मीडिया इंटरनेट दौऱ्यावर होता जरी ई-मेल listbuiling आपल्या Consitituents नाडी वर बोट ठेवून आणि आपल्या राजकीय मीडिया आपण अधिक पैसे आणि आपल्या कल्पना एक इशारा समर्थन वाढविण्याची मदत करु शकतो. हे तो स्वतःच्या डोळ्यांनी आपण सांगू शकता. सुरुवातीला आपण आपल्या सामाजिक मीडिया खाली व्यवस्थापित करण्यासाठी दोन्ही मित्र संवाद करण्यासाठी याला तयार करण्यासाठी जाणून घेण्यासाठी थोडे काम ठेवले आहे आणि आपण पूर्णपणे आपण निवडणूक दिवशी विजय मदत करण्यासाठी एक साधन म्हणून सोशल मीडियाचा फायदा घेण्यासाठी राजकीय मोहीम वेबसाइट असणे आवश्यक आहे असे मला वाटत नाही. एक वेबसाइट डिझायनर भाड्याने घेऊ शकत नाही. राजकीय उमेदवारांनी प्रभावीपणे वापरले जाऊ शकते. भविष्यात लॅबमध्ये आम्ही फेसबूक, ट्विटर आणि यू ट्यूब विशिष्ट सामाजिक मीडिया साइट्स आपण मते मिळविण्यासाठी त्यांना

वापरुन बदल माहित असणे आवश्यक सर्व काही सांगून लक्ष केंद्रित करणारा आहेत तोपर्यंत या साइटवर भेट देऊन आणि त्यांच्या माध्यमातून नॅव्हिगेट करुन आपल्या स्वत:च्या वेळी सामाजिक मीडिया बदल शिकणे.

संलग्न जाहिरात (Attached Advertisement) :

संलग्न जाहिरात कंपन्या बी २ बी काही उद्योग कंपन्या की कार्यावर लक्ष्यसाठी एक शक्तिशाली मंच आहे. व्यवसाय व्यावसायिक लॉग वर संलग्न प्रत्येक दिवस व्यवसाय आयोजित करणे, जाहिरात माध्यमातून आम्ही लगेच आज संबंधित हजारो लोक लक्ष ठेवू शकतो आम्ही जाहिराती आणि प्रायोजित माध्यमातून आपल्या ब्लॉग किंवा वेबसाईट रहदारी संलग्न जाहिरात वापरतो.

आपली प्रगती तपासा :

१) अमेरिका आणि भारतीय निवडणूकीतील समाज माध्यमांची भूमिका सांगा.

_____

_____

_____

_____

_____

८.५ समाज माध्यमांच्या राजकारणातील वापरांचे फायदे-तोटे

राजकारणी नेत्यांना सोशल मीडियावर असणं आत्ताच्या काळाची अनिवार्य गरज झाली आहे. तिथं नसणं काळाबरोबर नसल्याचं लक्षण मानलं जात. त्यामुळे काळान निर्माण केलेल हे माध्यम समाजान आपलस करण स्वाभाविक आहे. हे माध्यम आत्ताच्या समाज मनाचा आरसा आहे. बदलत्या राजकारणाला समजून घेताना सोशल मीडियाला वगळून पुढे जाता येत नाही. सध्याच्या काळात एकूणच राजकारण अन समाजकारण अधिक समकालीन होत चालल आहे अस एका बाजूला वातावरण आहे. तर दूसऱ्या बाजूला माध्यमाचं लोकशाहीतील स्थान व महत्त्व, राजकारणाशी आपले संबंध घट्ट करु ठेवण्यात हे माध्यम यशस्वी झाल आहे. लोकशाहि ज्या देशात आहे, तिथं हि बाब संयूक्तिक मानायला हवी. त्यामूळे या दोन्ही क्षेत्रांचा गूंता समजून घेण्यात बदलत्या राजकारणाचा वेध दडलेला आहे.

१) राजकारण परिवर्तशील असतं,तसचं माध्यम देखील सतत बदलत असतात. सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे राजकारणातील परिवर्तनात काळाची भूमिका माध्यम बजावत असतात. सोशल मीडिया हे अंतिमत: माध्यम आहे मात्र, मुद्दा एवढाच आहे की, राजकारण बदलत तशी माध्यम बदलतात का ? माध्यम राजकारणाला बदलवतात का ? या दोन्ही प्रश्नांची उत्तरं एकाच वेळी होकारार्थी अन नकारार्थी येतील.

२) आज राजकारणाचा एकूणच, केंद्रबिंदू जून्या मूल्यांपासून, प्रतीकांपासून व निष्ठांपासून दूसरीकडे सरकलेला आहे. त्या सरकण्याच्या मूळाशी सकारात्मक व नकारात्मक कंगोरे आहेत.

त्या दोन्ही संदर्भातून सोशल मीडियाचा प्रभाव आणि परिणामकारकता आजच्या राजकारणात कशी दिसते हे पाहण महत्त्वाच आहे.

सोशल मीडिया जसं काळाचं देणं आहे तसच ते समाजाच्या समकालीन प्रतिबिंबही आहे. यामये काळ ही गोष्ट प्रतीकात्मक अर्थाने आहे. कारण काळ ही अशी अगंतूकपणे जन्माला येणारी बाब नाही. काळ हे त्या त्या परिस्थितीतील सामाजिक आकलनातुन आणि आकर्षणातून आकाराला येणारी अभासी संकल्पना आहे. सामूहिक कृतीची भावना प्रवाहपतित होते. त्यातून ज्या कशाचा जन्म हातो त्याला व्यापक अर्थानं काळ मानल जातं सोशल मीडिया हे प्रकरण अशाच पद्धतीनं जन्माला आलेलं आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना सामाजिक मूल्यांपेक्षा सध्या वरचढ झाल्या आहेत. अशा काळात हे माध्यम जन्माला आलेलं आहे. त्यामुळे राजकारण समाजकारण यातून मूल्यांची फारकत आणि सोशल मीडिया मान्यता पावणं हे एकाच काळात घडलेलं आहे. सध्याच्या काळात बदलांचा वेग वाढत्या परिणामी आपसूकच बदलांची गूंतागूंत देखील वाढली. ते समजून घ्यायला अधिक समकालीन व्हाव लागेल. त्याचा एक प्रमुख भाग सोशल मिडिया आहे. तो सामूहिक आकर्षण अन कृतीचा दस्ताऐवज आहे. हे माध्यम जन्मानं परदेशी आहे मात्र ते आजमितीला इतकं देशी झालेल आहे की, जणू काही ते आपणच जन्माला घातलं आहे. या माध्यमानं आपल्या देशात जे काही चांगल्या अन् वाईट अर्थानं थैमान घातलेल आहे, ते पाहता, त्यातून राजकारण, उद्योग, करमणूक, आरोग्य कशी जवळपास सगळीच क्षेत्र पादाक्रांत केलेली आहेत. या सगळ्यांना सोशल मीडियाची गरज भासत आहे. किंबहुना माध्यम म्हणून त्याचा दबाव वाढत असल्यान ते अपरिहार्य आहे. या माध्यमानं एकाच वेळी समाजाच जेवढ प्रबोधन चालवल आहे, तेवढीच काहि घटकांची बदनामीही या माध्यमांच्या अनियंत्रित व्यवस्थेमुळे होत आहे. जगाच्या वेगाबरोबर अन बदलाबरोबर चालायचं असेल तर तूम्ही सोशल मीडियावर असलचं पाहिजे. भारत नावाचा देश बदलतोय. तो सतत बदलत आलेल्या आहे पण सोशल मीडियाच्या रेट्यानं तो अधिकच बदलतोय असं भासवलेलं आहे. कारण हे माध्यम जे घडतं, ते सांगण्यात प्रचंड यशस्वी झालेलं आहे. त्याचबरोबर जे घडत नाही ते देखील तितक्याच किंबहूना अधिक गतीनं सांगण्यात या माध्यमाना यश संपादन केलेलं आहे.

३) घडणाऱ्या गोष्टी अन न घडणाऱ्या गोष्टी यांना राजकारणात अतोनात महत्त्व असतं त्यातच राजकारणात वेळ ही बाबही खूप महत्त्वाची असते. सोशल मीडिया या दोन्ही महत्त्वाच्या गोष्टींना न्याय देण्यात तत्पर आहे जे घडत नाही ते सोशल मीडिया मोठ्या शिताफीनं पार पाडत असल्यानं हे आजच्या धोरणात्मक उपद्रवी राजकारणातील महत्त्वाचं माध्यम झाल आहे.

संकुचित राजकारणाला जे हवं आहे ते सोशल मीडिया देत असल्यानं या माध्यमाला अधिक महत्त्व आलेलं आहे.

सोशल मीडिया हे सर्वार्थान प्रभावी माध्यम आहे. यामध्ये फेसबूक, ट्विटर, व्हॉटस्ॲप ही सोशल मीडियातील लोकप्रिय उपमाध्यम आहेत. याशिवाय देखील अनेक नवनवीन प्रकार जन्माला आले आहेत, येत आहेत. या माध्यमानां एकाच वेळी अनेक कंगोरे आहेत यातल्या प्रत्येक माध्यमांची क्षमता अन उपयोगिता वेगवेगळी आहे. या माध्यमात मजकूर, व्हिडियो चित्र अन कार्टून सारखे विविध प्रकार वेगवेगळ्या पद्धतीनं हाताळता येतात.

४) फारसं विशेष नियंत्रण नसलेलं हे माध्यम आहे. एका बाजूनं हे माध्यम व्यक्तिगत आहे आणि समूहाचंही आहे. दूसऱ्या बाजूनं नियंत्रण अभावी हे माध्यम कूणाचच नाही. त्यामुळेच या माध्यमाची विश्वासार्हता अडगळीत सापडलेली आहे. राजकारणाची विश्वासार्हताही अशीच असते. या माध्यमातून फार पटकन आपलेपण साधता येत. तितकीच पटकन कटूतादेखील हे माध्यम निर्माण करु शकत. समज अन गैरसमज अधिक.

आपली प्रगती तपासा :

१) समाज माध्यमांचे राजकीय फायदे तोटे लिहा.

८.६ सारांश

आधुनिक काळात समाज माध्यमांचा वापर सामाजिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात केला जात आहे. त्यास राजकीय क्षेत्र ही अपवाद असणार नाही. आधुनिक काळात राजकीय क्षेत्रातील उमेदवारी देत असताना त्यांची समाज माध्यमातील किती मित्र आणि चाहते आहेत. तो किती सामाजिक माध्यमातील गटांशी (गृप) जोडलेला आहे. या बाबी पण इतर राजकीय पैलू प्रमाणे तपासले जात आहे. अमेरिकेतील ट्रम्प आणि हिलटी यांची निवडणूक दिल्लीतील अरविंद केजरीवाल यांनी संपादन केलेला विधान सभेतील विजय आणि नरेंद्र मोदी यांनी २०१४ ची जिंकलेली निवडणूक तसेच त्यांच्या राजकारभारावर होत असलेली टिका द्या. सर्व बाजू मध्ये केवळ समाज माध्यमांचा प्रचार आणि प्रसाराचा सहभाग आहे. लोकांना आपलेसे करण्यासाठी ज्या प्रमाणे राजकीय लोक डावपेच तयार करुन समाज माध्यमांचा वापर केला जात आहे. तसाच राजकीय विरोधकांकडून सत्ताधारांना कोंडीत पकडण्यासाठी पण खर्च केला जात आहे. परंतू कधीकधी चांगल्या राजकीय नेत्याच्या विरोधात प्रचारासाठी पण गैरसमज पसरवणारे संदेश पाठवले जात असतात. यामुळे अनेकांचे राजकीय करीअर संपवण्याचा डाव पण आखले जात आहेत. यामुळे राजकीय क्षेत्रातील सत्य आणि असत्य याचे वस्तुस्थिती स्वरुप समजणे कठिण होत आहे. समाज माध्यमे ही चांगले आणि वाईट विचार पसरवण्यासाठी वापरली जात आहे. पण जनतेने यासाठी डोळसपणे पाहुनच आपल्या राज्य किंवा राष्ट्राचा नेता निवड करणे काळाची गरज आहे.

८.७ अभ्यासाचे प्रश्न

१) समाज माध्यमाच्या वाढत्या प्रभावात होणाऱ्या राजकीय निवडणूकांची थोडक्यात चर्चा करा.
२) राजकीय मत बदल करण्यात समाज माध्यमांची वाढती भूमिका थोडक्यात सांगा.
३) राजकीय निवडणूकीतील समाजमाध्यमांचा वापराचे फायदे आणि तोटे सांगा.

४) टिपा लिहा.

अ) २०१४ ची लोकसभा निवडणूक

ब) अमेरिकेतील ट्रम्प आणि हिलरीची निवडणूक

क) राजकीय गैरसमजाचे प्रचार

८.८ संदर्भ सूची

1. Schaeffer and Lamn (1998) Sociology, McGraw Hill.
2. Macionis John (2005) Sociology (10th Edition) Prentce Hall.
3. Jalia Janu and David Jany (2005) Dictionary of Sociology Colline
4. बोराडे सर्जेराव (२०१७) समाजशास्त्र निराली प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

९

सामाजिकीकरण
(SOCIALIZATION)

घटकरचना :

९.० उद्दिष्ट्ये

९.१ सामाजिकरणाचा अर्थ, व्याख्या व महत्व

९.२ सामाजिकरणाची साधने / माध्यमे

९.३ स्वत्व आणि सामाजिकीकरण

९.४ अपेक्षित सामाजिकीकरण

९.५ लिंग सामाजिकीकरण

९.६ पुर्नसामाजिकीकरण

९.७ अभ्यासाचे प्रश्न

उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

१) स्वत्वाचा विकास अभ्यासला येईल.
२) सी. एच. कुलेचा स्व बाबत विचार समजून घेता येईल.
३) जी. एच. मीडचा स्व बाबत विचार समजून घेता येईल.

९.१ सामाजिकरण - अर्थ व व्याख्या (SOCIALIZATION - MEANING AND DEFINITION)

मनुष्यप्राणी हा जन्मतः असहाय्य व दुर्बल असतो. आपल्या रक्षणासाठी व वाढीसाठी त्याला इतरांवर अवलंबून रहावे लागते. जन्मतः मनुष्यप्राण्यात सुरुवातीला कोणतेही सामाजिक गुण आढळत नाहीत. नवजात अर्भकांचे मनुष्यप्राण्यात रुपांतर होण्यासाठी त्याला इतरांबरोबर भाषा, विचार, भावना इत्यादीची देवाण घेवाण करण्यास शिकावे लागते. प्रत्येक समाजाच्या संस्कृतीने व्यक्तींच्या जैविक आणि सामाजिक गरजांच्या पूर्तीसाठी देवाण - घेवाणीच्या काही पध्दती निश्चित केलेल्या असतात. नियमांची विशिष्ट पध्दत घालून दिलेली असते. व्यक्ती ज्या समाजात जन्म घेते त्या समाजाने घालून दिलेल्या पध्दती तिला आत्मसात कराव्या लागतात. तसे न झाल्यास व्यक्तीला समाजजीवनात सक्रिय भाग घेणे शक्य होत नाही. समाजमान्य प्रमाणकांचे आणि नियमांचे पालन करुनच व्यक्तीला आपल्या गरजांची पूर्ती करणे, इतरांशी सहकार्य करणे व समाजमान्यता मिळवणे शक्त होते.

सामाजिकरणाला मानवी जीवनात विशेष महत्वाचे स्थान आहे. हे मानवी सहवासाला पूर्णपणे मुकलेल्या काही बालकांचा विचार पुढीलप्रमाणे येईल.

उदा. :-

१) कमला आणि अमला :

रेव्हरंड जे. एल.ए. सिंग. या ख्रिस्तीमिशनऱ्याला बंगालमध्ये मिदनापूर गावाजवळील एका जंगलात लांडग्याच्या गुहेत दोन मुली सापडल्या. त्यातील एक मुलगी सुमारे दीड वर्षाची होती. तर दुसरी सुमारे आठ वर्षाची. रेव्हरंड सिंग यांनी या मुलीचे नामकरण केले ते पुढीलप्रमाणे एक दीड वर्षाची अमला तर आठ वर्षाची कमला. मानवी सहवासात आल्यानंतर अमलाचा थोडक्यात दिवसात मृत्यु झाला. परंतु 'कमला' मात्र मानवी सहवासात किंवा मानवी समाजात, सापडल्यानंतर सुमारे आठ वर्ष म्हणजे ती मुलगी १६ वर्ष वयाची होईपर्यंत होती. या सुमारे आठ वर्ष लांडग्याच्या व नंतर सुमारे ८ वर्षे मानवाच्या सहवासातआल्यानंतर कमलाच्या वर्तनातील तुलनात्मक विवेचन, रेव्हरंड सिंग यांनी त्यांनी त्यांच्या 'लांडग्याची मुले आणि रानटी माणूस' या इ.स. १९४२ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात सविस्तरपणे केले आहे. ते म्हणतात 'कमला' जेव्हा त्यांना जंगलात लांडग्याच्या गुहेजवळ सापडली तेव्हा तिची वागणूक पुर्णपणे लांडग्याच्या पिलासारखी होती. कमला न शिजविलेले कच्चे मांस लांडग्यासारखे दातांनी तोडून खात होती. ती लांडग्यासारखी चार पायावर चालत असे व त्याचप्रमाणे लांडगा जसा ओरडतो तशीच ती ओरडत असे. लांडग्यासारखे जीभेच्या साहाय्याने ती पाणी पित असे परंतु मानवाच्या म्हणजे रंव्हरंड सिंग आणि त्यांचे सहकारी यांच्या सहवासात आल्यानंतर मात्र तिने मानवी गुणधर्म आत्मसात करावयास सुरुवात केली. प्रथम ती माणसारारखे शिजवलेले अन्न खाऊ लागली. मानवी भाषेतील काही शब्द तिने आत्मसात केले. लांडग्याप्रमाणे चार पायावर न चालता मानवाप्रमाणे दोन पायावर ती सरळ उभी राहू लागली व चालू पण लागली. मुलांबरोबर ती खेळू लागली. मानवी गुणधर्म आत्मसात करण्यात तिने अल्पावधीत खूपच प्रगती केली होती. या सर्व विवेचनाच्या मतितार्थ असा की मानवी शरीर लाभूनही जर मूल मानवी सहवासात वाढले नाही. तर त्यांच्यात मानवी गुणधर्माची वाढ होत नाही.

या वरील सर्व प्रकरणावरुन किंवा उदाहरणावरुन आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, मानवी देह वा शरीर धारण केलेल्या व्यक्तीना जर मानवाचा सहवास लाभला नाही तर त्या व्यक्तीला मानवी आचार - विचार मानवी वर्तनासाठी मानवी सहवासाची म्हणजे पर्यावरणाची म्हणजेच सामाजिकरणाची अत्यावश्यकता आहे.

सामाजिकरणाच्या व्याख्या (Definition of Socialization) :

वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी सामाजिकरणाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

१) **हॅरी जॉन्सन :-** "ज्या प्रक्रियेत व्यक्ती समाजात वावरत असताना आपल्या भूमिका योग्य पध्दतीने पार पाडावयास शिकते, त्या प्रक्रियेला सामाजिकरण असे म्हणता येईल."

२) **ऑगबर्न :-** "सामाजिकरण म्हणजे अशी प्रक्रिया की जिच्यामुळे व्यक्ती सामाजिक नियमने आत्मसात करते."

३) **हॉर्टन व हंट :-** "सामाजिकरण ही एक अशी प्रक्रिया आहे जिच्यामुळे व्यक्तीला तिच्या समूहाची नियमने आत्मसात करता येतात. परिणामी व्यक्तीच्या ठिकाणी एकमेव त्याचे असणारे 'स्वत्व' विकसित होते."

४) **किम्बॉल यंग :-** "सामाजिकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, जिच्यामुळे व्यक्तीला सामाजिक, सांस्कृतिक जगात प्रवेश करता येतो, ज्यामुळे व्यक्ती समाजाची व समाजाच्या विभिन्न समूहांची सदस्य बनते आणि जी प्रक्रिया व्यक्तीला सामाजिक मूल्यांचा आणि मानवीकरणाचा स्वीकार करण्यास प्रेरित करते."

सामाजिकरणाचे महत्व / कार्ये / उद्दिष्टे (Definition of Socialization) :

सामाजिकरणाचे महत्व सामाजिकरणाच्या उद्दिष्ट प्राप्तीत दिसून येते. हॅरी जॉन्सन यांनी यशस्वी सामाजिकरणातून पुढील तीन बाबी साध्य झाल्या पाहिजेत असे सांगितले आहे. त्यांचा अभ्यास करताना सामाजिकरणाचे महत्व लक्षात येते.

(अ) भेदाचे आकलन : सामाजिकरण होत असलेल्या मानवाला पूर्वी कोणत्या गोष्टी शिकल्या, कोणते वर्तनप्रकार आत्मसात केलेत व कोणत्या नवीन गोष्टी, वर्तनप्रकार आत्मसात करीत आहेत त्यातील फरक त्याला करता आला पाहिजे. हा भेद करण्याची क्षमता अंगी बाणल्यानेच तो नवीन अनुभव, वर्तनप्रकार, नवे ज्ञान अधिक वेगाने आत्मसात करतो.

(ब) बक्षीस व शिक्षेची सोय : सामाजिकरण होत असताना व्यक्तीने समाजाच्या हिताचा विचार करावयाचा असतो. त्यासाठी त्याने योग्य वर्तन करावे व अयोग्य वर्तन टाळावे यासाठी बक्षीस व शिक्षा याची सोय करावी लागते. चांगल्या वर्तनाबद्ल कौतूक, शाबासकी, सत्कार, पद, वस्तू रोख रक्कम या स्वरुपात बक्षीस दिले जाते, तर रागावणे, चिडविणे, मारणे, बहिष्कृत करणे, तुरुंगात टाकणे, प्राण घेणे वगैरे स्वरुपात शिक्षा टाळण्यासाठी दक्ष राहून चांगले वर्तन करु लागते.

(क) नैराश्य भावनेवर मात : व्यक्तीच्या सर्वच आशा - आकांक्षा पूर्ण होत नाहीत. यातून वैफल्य, निराशा या भावना निर्माण होणार नाहीत, निर्माण झाल्या तर त्याचे विवेचन देखील लगेच होणे आवश्यक असते. अर्थातच याची जबाबदारी आई - वडील, घरातील अन्य व्यक्ती, शेजारी, सवंगडी, शिक्षक व शेवटी समाजाने घ्यायची असते. खेळताना पडणे, मित्राने मारणे, पेन हरविणे, नापास होणे, खेळात हरणे वगैरे बाबींत मुलांचा अपेक्षाभंग होतो. पुढे तर अशा अपेक्षाभंगाचे प्रमाण वाढतच जाते. मग तो प्रेमभंग असेल किंवा मुलाखतीत अपयश असेल तेव्हा अपेक्षाभंगांना सामोरे जाण्याचे, नैराश्य भावनेवर मात करण्याचे सामर्थ्य व्यक्तीत येणे आवश्यक असते. विफल निराश व्यक्ती समाज व्यवस्थेला अहितकारक असे वर्तन करु शकते. उदा. आदळआपट, संताप इतरांची खोटी निंदा - नालस्ती, आक्रमण, हिंसा, विध्वंस, व्यसनाधिनता किंवा स्वतःचा आत्मघात अशी कृत्ये विघटनकारी असून समाज व्यवस्थेला धोक्यात आणणारी आहेत.

सामाजिकरणाचे सामाजिक जीवनातील महत्व

सामाजिकरणाचे व्यक्ती व समाज या दोहोंसाठी असणारे महत्व अनन्यसाधारण असेच आहे साामाजिकरणाच्या प्रक्रियेने प्रामुख्याने

१) नवजात अर्भकाचे सामाजिक प्राण्यात रुपांतर करुन त्याला समाजाचा क्रियाशील सदस्य बनवले जाते, तसेच

२) समाजाच्या संस्कृतीचे संक्रमण त्याच्या व्यक्तिमत्त्वात आणि सामाजिक वर्तनात करुन समाजाचे सातत्य टिकवले जाते.

सामाजिकरणाचा अभाव असेल तर.....

जे. ए. एल. सिंग यांना मिदनापूर जवळील एका अरण्यात लांडग्यांच्या गुहेत दोन मुली सापडल्या. दीड वर्षाच्या मुलीस 'अमला' व आठ वर्षाच्या मुलीस 'कमला' ही नावे देण्यात आली यापैकी अमला लवकरच वारली तर कमला आणखी नऊ वर्ष जगली. तिचे वागणे माणसासारखे नव्हते तर लांडग्यासारखे होते. ती दोन हातांचा पायासारखा वापर करुन चार पायावर चालणारी, कच्चे मांस खाणारी, लांडग्यासारखेच ओरडणारी, माणसांना पाहून भिऊन पळणारी होती. पुढे माणसांच्या सहवासात ती शिजचलेले अन्न खाऊ लागली, दोन पायांवर ताठ चालू लागली. थोडे - बहुत इतरांसारखे बोलू लागली. पण तरीही सतरा वर्षाच्या कमलाचे वागणे अगदीच प्राथमिक होते. सतरा वर्षाच्या मुलीसारखे नव्हते.

याचप्रमाणे अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया राज्यात 'ॲना' नावाच्या मुलीस अनैतिक संबंधातून जन्मास आली म्हणून तिच्या आईने शेतातील घरात वरच्या मजल्यावर स्वतंत्र ठेवले. सहा वर्षाची असताना तिची माहिती इतरांना झाली. व ती मानवी संपर्कात आली. त्या वेळेस तिला मानवासारखे चालता, बोलता येत नव्हते. कोणत्याच भावना तिच्या चेहऱ्यावर व्यक्त होत नव्हत्या. तिच्या वयाची मुले - मुली ज्या गोष्टी करु शकत होती त्यातील तिला काहीच करता येत नव्हते. सुरुवातीस तिला अपंग मुलांच्या व नंतर मतिमंद मुलांच्या शाळेत घालण्यात आले. या काळात सुरुवातीस चालणे, स्वतः खाणे, एक वर्षाच्या मुलांसारखे बोलणे, नंतर हात धुणे, दात घासणे, बाहुली बरोबर खेळणे, रंग ओळखणे एवढया गोष्टी तिला येऊ लागल्या होत्या.

अमेरिकेतील ओहियो येथील 'इसाबेला' हिची कथा ॲनासारखीच. अनैतिक संबंधातून जन्मलेल्या इसाबेलाला जवळ जवळ साडेसहा वर्षे अंधारात, एकाकीपणे वाढवले. जेव्हा तिचे अस्तित्व उघडकीस आले त्या वेळी ती अत्यंत अशक्त व आजारी होती. परक्या माणसाला पाहताच ती फक्त द्वेष व भीतीच व्यक्त करीत असे. तिला फक्त अस्पष्ट असा आवाज काढता येत होता. इतरांसारखे बोलता येत नव्हते. तिला परिश्रमपूर्वक योग्य शिक्षण देण्यात आले आणि चौदाव्या वर्षी ती इतर मुलांसारखी वागू लागली.

कमला, ॲना, इसाबेला यांना असे करुणास्पद जीवन जगावे लागले कारण त्यांच्यावर सामाजिकरणाची प्रक्रिया होऊ शकते.

सामाजिकरणाची उद्दिष्टे (Objective of Socialization) :

लिओनार्ड ब्रुम आणि फिलीप सेल्झनिक यांनी आपल्या या ग्रंथात सामाजिकरणाचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट करणारी सामाजिकरणाची चार उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगितली

आहेत. कोणत्याही समाजात सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून ही चार मूलभूत उद्दिष्टे साध्य करण्याचा सातत्याने चाललेला प्रयत्न दिसून येतो.

१) व्यक्तीच्या अंगी मूलभूत शिस्तीचे संस्कार बाणवणे :

मानवाच्या जैविक प्राणी म्हणून ज्या मूलभूत गरजा आहेत त्यांचे निराकरण करण्यासाठी त्यास वाटेल तसे वागू देणे हे व्यक्ती व समाज या दोहोंसाठी इष्ट नसते. त्यासाठी त्याने समाजमान्य मार्गाने वर्तन करावे यासाठी त्याच्यावर शिस्तीचे संस्कार होणे आवश्यक असते. तेव्हा खाणे - पिणे, मलमूत्र विसर्जन, कामतृप्ती, प्रज्योत्पादन, निद्रा वगैरे अत्यवश्यक गरजांपासून ते केशभूषा, वेशभूषा, बोलणे, चालणे वगैरे गरजांचे निराकरण यासाठी व्यक्तीला शिस्तबध्द वर्तनाची गरज असते. व्यक्तीला याबाबतचे मार्गदर्शन हे सामाजिकरणामुळेच घडून येते. जर हे मूलभूत शिस्तीचे संस्कार व्यक्तीच्या मनावर बिंबवले नाहीत तर व्यक्ती कोणताही सारासार विचार न करता अविवेकी वागतील. मग त्यांच्या कोणत्याही गरजा असोत त्या भागवताना त्यांच्यात व पशूत काहीच फरक राहणार नाही. याचा परिणाम इतरांना व समाजाला नुकसानकारक ठरतो, तसेच बेशिस्तीने वागणाऱ्या व्यक्तीलाही शेवटी त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. हे व्यक्तीचे व समाजाचे नुकसान टाळण्यासाठी व्यक्ती नवजात अर्भक असल्यापासून तिच्यावर मूलभूत शिस्तीचे संस्कार बानवणे हे सामाजिकरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट असते.

२) संस्कृतीनुरुप उत्कृष्ट आकांक्षा ठसविणे :

सामाजिकरणाच्या प्रक्रियेत व्यक्ती त्या सामाजाची संस्कृती आत्मसात करते. प्रत्येक समाजात संस्कृतीने उत्कृष्ट - निकृष्टतेच्या कल्पना जपलेल्या असतात. साहजिकच प्रत्येक व्यक्तीचे सामाजिकरण होत असताना त्या समाजातील चांगल्या-वाईट, योग्य-अयोग्यतेच्या आदर्शाबरोबरच व्यक्तीला उत्कृष्ट आकांक्षांचा परिचय होतो. सुरुवातीस व्यक्तीला शिस्तीच्या बंधनात राहणे जड जाते पण शिस्तीमुळेच आपणास हव्या त्या गोष्टी मिळवता येतात. हे लक्षात येताच तो शिस्तबद्ध रीतीने उत्कृष्ट आकांक्षांची पूर्ती करण्यासाठी प्रयत्न करू लागतो. लहानपणी मुलाला थोड कळू लागताच आपण कोण होणार हे तो बोलून दाखवतो,'मी पोलीस होणार' अगर 'मी मास्तर होणार' या शाळेत असताना त्याच्या उत्कृष्ट आकांक्षापुढे वास्तवतेने भाग आल्यावर बदलतात व तो 'मी इंजिनियर किंवा डॉक्टर होणार' अगर 'संशोधक होणार' अशी आपली महत्त्वाकांक्षा बोलून दाखवतो. आपले जीवन सुखी होण्यासाठी समाजात चांगला दर्जा -प्रतिष्ठा मिळवण्यासाठी तो उच्चपदाच्या प्राप्तीचे ध्येय आपल्या समोर ठेवतो. त्या दृष्टिने तो प्रयत्न करतो. पण आपण 'स्मगलर व्हायचे' किंवा 'भिकारी होऊन आरामात फक्त पोट भरायचे' अशा आकांक्षा कोणीच बाळगत नाही. कारण त्याचे सामाजिकरण होत असतानाच उत्कृष्ट काय आहे याबाबतची मूल्ये त्याने आत्मसात केलेली असतात. या उत्कृष्ट आकांक्षांची पूर्तता होईल अगर न होईल हा भाग वेगळा, पण निदान त्या दृष्टिने तो प्रयत्न करीत राहतो. डॉक्टर होण्याची उत्कृष्ट आकांक्षा सफल झाली नाही तरी प्राध्यापक वा वकील होण्याचा तो प्रयत्न करतो. अर्थातच उत्कृष्ट आकांक्षा या समाजाच्या स्वरुपावर अवलंबून राहतात. आदिवासी समाजातील व्यक्ती उत्कृष्ट योध्दा अगर शिकारी होण्याची आकांक्षा बाळगील तर ज्या समाजात धर्मव्यवस्थेचे, पुरोहितांचे प्राबल्य आहे तेथे व्यक्ती धर्मोपदेशक होण्याची आकांक्षा बाळगील. तात्पर्य, व्यक्तीचे सामाजिकरण होत असताना व्यक्तीच्या मनावर त्या समाजाच्या संस्कृतीनुरुप उत्कृष्ट आकांक्षा हसवल्या जातात.

३) सामाजिक भूमिका व त्यांना पोषक अभिवृत्तींचे ज्ञान :

सामाजिकरणाच्या प्रक्रियेत व्यक्ती ज्या विविध बाबी आत्मसात करीत असते त्यात व्यक्तीला पार पाडाव्या लागणाऱ्या विविध सामाजिक भूमिकांचे ज्ञान सर्वांत महत्त्वाचं असते. व्यक्तीला केवळ त्याच्या भोवतालच्या भौतिक व सामाजिक पर्यावरणाचे ज्ञान पुरेसे नसते. त्याला त्याच्या समाजाचा क्रियाशील सदस्य होण्यासाठी विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. एक व्यक्ती मुलगा, मित्र, भाऊ, विद्यार्थी, फुटबॉलचा खेळाडू, पती, पिता, नोकर मालक वगैरे समाजातील अनेक भूमिका पार पाडत असते. या विविध भूमिका पार पाडत असताना त्या भूमिकेशी संबंधीत कोणते अधिकार व्यक्तीला मिळतात व या बदल्यात त्याने कोणती कार्ये पार पाडावयाची याचे ज्ञान त्याला सामाजिकरण प्रक्रियेतून होते. एखाद्यास जर आपण न्यायाधीश व्हावे असे वाटत असेल तर त्याचबरोबर त्या स्थानावर जी कर्तव्ये पार पाडावयाची असतात. त्यासाठी कोणती अभिवृत्ती म्हणजे वागणूक आवश्यक आहे याची माहिती त्या त्याव्यक्तीस होते. आदिवासी जमातीत एखाद्यास मांत्रिक व्हावयाचे असेल तर त्यासाठी कोणती गुणवत्ता अंगी बाणवणे आवश्यक आहे याचे ज्ञान त्या व्यक्तीला सामाजिकरणातून होते.

४) विविध कौशल्यांचे ज्ञान :-

व्यक्तीस समाजाचा क्रियाशील सदस्य होण्यासाठी विविध कौशल्यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एखादी भूमिका पार पाडण्यासाठी कोणत्या अभिवृत्ती अंगी बाणवल्या पाहिजेत एवढेच माहित असून चालत नाही तर त्यासाठी आवश्यक कौशल्येदेखील व्यक्तीला ज्ञात पाहिजेत. ही कौशल्ये त्याने प्राप्त केल्यास त्याचे समाजातील स्थान निश्चित होते. आदिवासी जमातीत वा ग्रामीण समुदायात अनौपचारिक पध्दतीने या कौशल्याचे ज्ञान व्यक्तीला होते. निरीक्षण, अनुकरण, परंपरा, प्रथा सततची धडपड या मार्गाने व्यक्ती ही कौशल्ये ज्ञात करुन घेते, तर प्रगत समाजात औपचारिक मार्गाने व्यक्तीला शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक शिक्षण वगैरे घेता येते. या कौशल्याच्या बळावरच व्यक्तीला समाजाच्या विविध क्षेत्रात परिणामकारक सहभाग घेता येतो.

संस्कृती ही मानवाच्या विविध गरजांचे निराकरण करण्याचे साधन आहे. तर त्या संस्कृतीचा शक्य होईल तितका भाग आत्मसात करण्यासाठी सामाजिकरण ही अत्यावश्यक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेने मानवाचे सामाजिक प्राण्यात रुपांतर होऊन तो समाजाचा क्रियाशील सदस्य तर होतोच पण त्याचबरोबर संस्कृतीचे संक्रमण पुढील पिढीत होऊन समाजाचे सातत्य चालूच राहते.

९.२ सामाजिकरणाची साधने / माध्यमे (AGENCY OF SOCIALIZATION)

नवजात अर्भकाला समाजाचा क्रियाशील सदस्य बनविण्याची प्रक्रिया निरंतर म्हणजे जन्मापासून मृत्यु पर्यंत चालूच असते. ही समाजिकरणाची प्रक्रिया सामाजिक आंतरक्रियेमुळे घडून येते. व्यक्तीचे हे सामाजिकरण व्यक्तीला व समाजाला उपयोगी व्हावे यासाठी समाज जाणीवपूर्वक हे सामाजिकरण विशिष्ट उद्दिष्टे डोळयांसमोर ठेवून करत असतो. व्यक्तीचे सामाजिकरण होते म्हणजे संस्कृतीचा जमेल तेवढा भाग व्यक्ती आत्मसात करते व व्यक्तिमत्व

प्राप्त करते. या गोष्टी घडवून आणण्यात समाजाचे जे घटक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या सहभागी होतात, त्यांनाच सामाजिकरणाची साधने म्हटले जाते.

किंग्जले डेव्हिस यांनी समाजिकरणाच्या साधनांचे पुढील दोन वर्ग कल्पिले आहेत.

१) सामाजिकरणातील अधिकारी व्यक्ती (साधने) :

माता, पिता व कुटुंबातील इतर व्यक्ती, शिक्षक, शेजारी, धमगुरु वगैरेंना किंग्जले डेव्हिस यांनी सामाजिकरणातील अधिकारी व्यक्ती (Authoritarian Agency) मानले आहे. कारण मुलावर हयांचे वर्चस्व प्रस्थापित झालेले असते. मूल त्यांच्या धाकात असते व त्यांच्या शब्दांबाहेर नसते. यापैकी महत्वाची साधने म्हणजे कुटुंब, शेजार, शाळा व शिक्षक होत.

२) समानतेचे नाते असलेल्या व्यक्ती :

मुलाच्या समवयस्क सवंगडयांना किंग्जले डेव्हिस यांनी समाजिकरणाच्या प्रक्रियेतील समानतेचे नाते असलेली व्यक्ती (Equalitarian Agency) मानले आहे. व्यक्तीचे सामाजिकरण कोणताही भावनिक तणाव, दडपण धाक न आणता अनौपचारिकरित्या घडवून आणणारे ते प्रभावी साधन आहे. यात खेळगडी, सवंगडयांचा समूह यांना महत्त्वाचे साधन मानले जाते.

सामाजिकरणाचे साधने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) कुटुंब (Family) :

मुलाचा जन्मच मुळात कुटुंबात होतो. कुटुंबतील एक सदस्य म्हणूनच त्याचा संबंध प्रस्थापित होतो. कुटुंब हा एक सार्वत्रिक समूह आहे. नवजात अर्भकाचे सामाजिकरण करण्यात कुटुंब हे प्रभावशाली साधन आहे. या कुटुंबात मुलाचा प्रथम इतर सामाजिक प्राण्यांशी अन्य सदस्य यांच्याशी त्याच्या आंतरक्रिया होऊ लागतात. यातूनच त्याच्या 'स्व' निर्मितीस सुरुवात होते. व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीची सुरुवात कुटुंबातच होते. आईवडील व घरातील इतरांच्या वतुणुकीचे ते अनुकरण करते. समाजाची अभिवृत्ती, सामाजिक संस्कृतीचा अन्यभाग कुटुंबातील इतर सदस्यांकडून मूल आत्मसात करते. उदा. ज्या विविध भूमिका मुलाला पर पाडावयाच्या आहेत त्याचे प्रारंभिक ज्ञान व विविध सामाजिक स्थितीत (social situations) कसे वागावयाचे याचे शिक्षण त्याला कुटुंबातच मिळते. विशेषतः बालकाच्या परावलंबनाचा काळ इतर प्राणिमात्रांपेक्षा दीर्घ असल्याने कुटुंबात मुंलांवर सामाजिकरणाची प्रक्रिया दीर्घकाळापर्यंत शक्य होते. परिणामी कुटुंबात झालेल्या संस्कारांचा खोल ठसा मुलाच्या व्यक्तिमत्त्वात उमटतो. कुटुंबाचा समाजातील दर्जा इतयादींचा मुलाच्या सामाजिकरणांवर फार मोठा प्रभाव पडतो. आर्थिक स्तर, शिक्षण, जात, धर्म इत्यादींच्या कसोटीवर एखाद्या कुंटुंबाचा दर्जा वरच असेल तर मुलाचे सामाजिकरण अनुकूल असे होऊ शकते. कारण कुटुंबाचा दर्जा मुलाला मिळतो. कुटुंबाचा व्यवसाय त्याच्याकडे चालत येतो. त्याचे समाजातील स्थान निश्चित करण्यात कुटुंबाचा हातभार मोठा असतो. याउलट अशिक्षित, अज्ञानी, दारिद्रयाने गांजलेल्या तथाकथित नीच जातीच्या समजल्या जाणाऱ्या कुटुंबातील मुलांचा सामाजिकरणात कितीतरी उणिवा दिसून येतात.

जवळजवळ सर्वच समाजशास्त्रज्ञ, मनसशास्त्रज्ञ वगैरेंनी सामाजिकरणातील म्हणजेच मुलाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीतील कुटुंबाचे, विशेषतः आईवडिलांचे अनन्यसाधारण महत्त्व मान्य केलेले आहे. आईवडिलांकडूनच मुलाला प्रेम, संरक्षण मिळते. चांगल्या वर्तनाबद्दल शाबासकी मिळते, तर वाईट वर्तनाबद्दल शिक्षा पदरात पडते. शिवाय आईवडिलांच्या विशिष्ट अधिकारही आपोआप प्राप्त होतो. त्यामुळे त्यांचा वर्चस्वाचा अनुकूल प्रतिकूल परिणाम मुलाच्या व्यक्तिमत्वात दिसून येतो. जर आई-वडील आनंदी, समाधानी, सद्वर्तनी, प्रेमळ, धर्मपरायण असतील तर त्याचा अनुकूल परिणाम मुलाच्या व्यक्तिमत्त्वावर होतो. याउलट आई-वउील भांडखोर, संशयी, दुर्वर्तनी, सतत मार-झोड करणारे असतील तर त्याचा प्रतिकूल परिणाम मुलावर हातो.

आई-वडिलांखेरीज कुटुंबातील इतर वडीलधाऱ्या व्यक्तींचा व वडील भावंडांचाही मुलावर थोडाफार अधिकार प्रस्थापित झालेला असतो. त्यांचाही मुलांच्या सामाजिकरणात सहभाग असतो.

२) शेजार (neighborhood) :

मुलाचे सामाजिकरण घडवून आणण्यात शेजार या घटकाचा प्रभावी परिणाम होतो. आपण जेथे राहतो, त्याच्या आसपासच्या कुटुंबाचा समावेश शेजारात होतो. मूल थोडेसे मोठे झाले की ते एकदम उघडया जगात प्रवेश करत नाही. तर त्याची पावले शेजारी पडतात. या शेजारील व्यक्ती, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा दर्जा, त्यांची वर्तणूक, त्यांचा व्यवसाय याचा फार मोठा परिणाम मुलाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवर होतो. शेजारच्या घरातील व्यक्तीदेखील शेजारच्या मुलास शिकविण्याचा आपणास अधिकारच आहे असे कळत-नकळत मानतात. शिवाय या व्यक्ती सामाजिकरणाची प्रक्रिया घडवून आणताना घरातील व्यक्तीपेक्षा थोडीशी वेगळी भूमिका घेत असतात. उदा. चिंटू जेवणाच्या वा झोपण्याच्या वेळी शेजारच्या घरी खेळायला गेला असता शेजारचे लोक गोड बोलून चिंटूला घरातून जायला सांगतात. पुढे या दुराव्याचे करण मुलाला चांगलेच समजते. मग आपल्या घरातील व्यक्ती व शेजारच्या घरातील व्यक्तींच्या वर्तनाची तुलना मूल करु लागते. शिवाय शेजारील व्यक्ती इतरांच्या मुलांच्या चुकांच्या जणू काही शोधातच असतात. त्यामुळे ते आपल्या चुकीच्या वर्तनाची चुगली करु शकतात याची जाणीव मुलाला असते.

त्यामुळे ते शेजाऱ्यांच्या धाकात असते. एखादे वेळेस घरी काय म्हणतील यापेक्षा शेजारीकाय म्हणतील याचे दडपण त्याच्यावर अधिक असते. परंतु निंदकाचे घर असावे शेजारी या उक्तीप्रमाणे ते फायद्याचेही असते. अर्थात, बऱ्याच वेळेला शेजारी आपल्या अनुभवाचा, माहितीचा फायदाही करुन देतात. मार्गदर्शन करतात. हे मार्गदर्शन कदाचित घरी शक्यही नसेल. शेजारी वेगळ्या जातीचे, धर्माचे, भाषेचे असतील तर त्याचाही सामाजिकरणावर ठसा उमटतो. अर्थात, शेजारी चांगले आहेत याची चौकशी करण्याचे हेही एक मोठे कारण आहे. शेजार चांगला नसेल तर आपण मुलांना शेजारी जाऊ देत नाही.

३) शाळा व शिक्षक (School & Teacher) :

मुलाचा कुटुंबा बाहेरील ज्या व्यक्तीशी सातत्याने संबंध येतो त्यात शाळा व शाळेतील शिक्षक हे अतिशय महत्वाचे होत.संस्कृतीच्या औपचारिक अंगांची ओळख मुलास शिक्षकांकडून होते. मूल घरी बोलायला शिकले तरी भाषेचे व्याकरण सहित्य लेखन या गोष्टी त्याला शाळेतून

शिकविल्या जातात. त्याचबरोबर अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य किती तरी गोष्टी शिक्षक त्याला शिकवितात. नैतिक तत्वे, राष्ट्रप्रेम, सामुदायिक जीवन, सहकार्य, बंधुभाव वगैरे शाळेतील शिस्त, शिक्षकांचे स्थान इतयादींमुळे मुलांवर माता - पित्याच्या खालोखाल शिक्षकांचा अधिकार चालतो. विद्यार्थी आपल्या शिक्षकांचे वर्तन व शिकवण आदर्श मानून त्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न करतो. शिवाय शिक्षक हे प्रशिक्षित असल्याने मुलांना काय शिकवावे व काय शिकवू नयो याचेही त्यांना ज्ञान असते. त्यामुळे मुल्याच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत शिक्षकाचाही वाटा अत्यंत महत्त्वाचा असतो. मुलांच्या मनावर उत्कृष्ट संस्कार घडविण्याचे महत्त्वाचे कार्यशाळा करतात.

४) खेळगडी, सवंगडयांचा समूह :

सामाजिकरणाची प्रक्रिया घडवून आणणाऱ्या अन्य व्यक्तींत मुलाचे समवयस्क मित्र, रस्त्यावर खेळावयास जमलेले सवंगडी यांचाही सहभाग महत्वाचा असतो. मुलाची वाढ होत असतानाच हळूहळू त्याचा कुंटुंबाबाहेरील व्यक्तींशी संबंध येऊन परस्परांत आंतरक्रिया होऊ लागतात. शेजारील समवयस्क मित्र, रस्त्यावर खेळावयास जमलेले सवंगडी, शाळेतील सोबती वगैरे व्यक्ती कळत नकळतपणे व्यक्तीवर सामाजिकरणाची प्रक्रिया घडवून आणतात. हे सर्व सवंगडी साधारणपणे समवयसक असतात. त्यांच्यात समानतेचे संबंध असतात. त्यामुळे त्यांच्यातील संबंधात अधिक मनमोकळेपणा असतो. परस्परांवर कोणतेही मानसिक दडपण नसते. त्यामुळे समवयस्कांच्या या समूहात व्यक्ती आपल्या शंका - कुशंका निःसंकोचपणे इतरांना विचारते. ज्या बाबींची माहिती कुंटुंबातून वा शिक्षकांकडून मिळत नाही ती माहिती अशा समूहातून देण्या - घेण्याचा प्रयत्न केला जातो. विशेषतः समाजातील अन्य भूमिकांची माहिती व त्या भूमिका साकारण्याची तालीम व्यक्ती या समूहातच करते. विशिष्ट परिस्थितीत कसे वागावे व कसे वागू नये याचे धडे व्यक्ती स्वतंत्ररित्या या समूहातच गिरविते. आपल्या अंगच्या सुप्त शक्तींचा, गुणांचा अविष्कार करण्याची संधी व्यक्तिला घरापेक्षा आपल्या सवंगडयांतच जास्त मिळते. तयामुळे तिच्या व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीत या समवयस्क मित्रांच्या समूहांचा (Peer groups) फार मोठा वाटा असतो. कुटुंबातील व्यक्ती वा शिक्षक यांच्याकडून मिळालेल्या माहितीतील उणिवा या समवयस्कांच्या समूहातून भरुन निघतात. व्यकतीला समाजाच्या आवडी-निवडी लैंगिक शब्दांचा वापर व त्यांचे ज्ञान, शब्दांचे विविध अर्थ, विविध अनुभव, छंद, फॅडस्, फॅशन यांची माहिती या समूहातून अधिक उत्तमरित्या होते. घरात व्यक्तीला मायेने, आपुलकीच्या नात्याने वागविले जाते व त्याच्या गरजा पुरविल्या जातात. पण या समूहातील मित्र एकमेकांशी रोखठोकपणे वागतात. आपल्या हक्कांसाठी भांडतात. त्याचप्रमाणे दुसऱ्याकडून वस्तू हिरावून घेण्याचाही प्रयत्न करतात. दुसऱ्यांच्या दोषावर बोट ठेवून त्यांना चिडवितात. त्यामुळे व्यक्तीच्या 'स्व' त्वाची जडण-घडण करण्यात हा समूह महत्त्वाचा ठरतो. म्हणजे व्यक्तीचे सामाजिकरण करण्यात या समवयस्क सवंगडयांना प्रत्येक समाजात महत्वाचे स्थान असते.

५) लोक शिक्षणाची माध्यमे :

सामाजिकरणाच्या वरील दोन माध्यमाशिवाय आजच्या आधुनिक समाजाच्या पार्श्वभूमीवर लोकशिक्षणाच्या माध्यमाचाही सामाजिकरणाची साधने म्हणून विचार करावा लागतो.आजच्या आधुनिक विकासित समाजात मुद्रण, नभोवाणी, दूरवाणी, चित्रवाणी, चित्रपट, टेपरेकॉर्डर, व्हिडिओ टेप्स इत्यादी केवळ करमणुकीची साधने राहिली नाहीत तर ती माहिती व शिक्षणाची उत्तम साधने ठरली आहेत. या साधनांचा परिणाम अत्यंत प्रभावी असतो. स्थल,

कालाची बंधने या साधनांवर पडत नाहीत. रोजच्या वर्तमानपत्रापासून ते ग्रंथालयातील ज्ञानकोशापर्यंत विविध क्षेत्रातील छापील वाङ्:मय आपणास अद्दयावत माहिती देत असते. पाश्चत देशात तर प्रौढांचे ज्ञानकोश, मुलांचे ज्ञानकोश व अन्य उपयुक्त पुस्तके घरी असणे हे फ्रीज वा फोन असण्याइतकेच महत्वाचे मानले जाते ऑस्ट्रेलियात तर चित्रवाणीने औपचारिक शिक्षणाचा फार मोठा भाग व्यापला आहे. अशा माध्यमांतून विविध क्षेत्रांतील तज्ञ विचारवंत, कार्यकर्ते, समाजसुधारक, कलाकार वगैरे अत्यंत प्रभावीपणे सामाजीकरणातील आपला वाटा उचलत असतो. एवढेच नव्हे तर जी माहिती पालक शिक्षक, सवंगडी देऊ शकत नाहीत. त्याची उणीव ही माध्यमे फार मोठया प्रमाणात भरुन काढतात. गतिशील समाजात तर या माध्यमांचे महत्व दिवसेंदिवस अधिकच वाढत चाललेले आहे.

परंतु या माध्यमांचा अमर्याद, अनियंत्रीत नियोजनविरहित वापर तोटयाचा देखील ठरत आहे. हिंसा गुन्हेगारी, सवंग करमणूक, कामुक दृश्ये यांचा भयावह परिणाम प्रेक्षकांवर विशेषत: मुले व तरुणांवर होत आहे. चार भिंतीच्या खोलीत व्यक्ती अधिक एकलकोंडया व व्यक्तिवादी होतात. कुंटुंबातील, समुदायातील सुसंवाद यामुळे धोक्यात येऊ शकतो. लहानपणीच मुलांच्या आवडीनिवडी निश्चित होतात. त्यातूनच मग पालकांच्या आवडी निवडीशी संघर्ष होऊ शकतो. स्वत:चे निर्णय ते स्वत:च घेतात . प्रसंगी ते चुकीचेही असू शकतात शिवाय या माध्यमांतून चांगल्याबरोबर वाईटचेही शिक्षण मिळते आणि तेच अधिक घेतले जाते. तेव्हा या माध्यमांचा रचनात्मक वापर कसा करावा हे संबंधितांना आधुनिक समाजात एक आव्हानच आहे.

सामाजिकरणाच्या अवस्था / पायऱ्या / टप्पे

नवजात अर्भकावर समाजाचा क्रियाशील सदस्य बनविण्याची सामाजिकरणाची जी प्रक्रिया असते. ती अत्यंत गुंतागुंतीची असते. ही प्रक्रिया जन्मल्यापासून अखेरपर्यंत चालत राहते. तरीही लहानपणी ती मोठया वेगात चालते तशी तिची आवश्यकताही असते. किंग्जले डेव्हिस यांनी म्हटल्याप्रमाणे ही प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असून ती नेमकी कशी होते याबाबत काटेकोरपणे व समग्रपणे सांगता येत नाही. तरीही समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ वगैरेनी या बाबत आपली मते मांडली आहेत. मूल वाढत असताना त्या मुलावर समाजातील 'स्व' ची भावना निर्माण होऊन त्याचे व्यक्तिमत्व विकास पावू लागते. त्याला समाजातील आपला दर्जा, भूमिका याची जाण होऊ लागते. तो सामाजिक प्राणी बनून समाजाचा क्रियाशील सदस्य होतो. ही सामाजिकरणाची प्रक्रिया काही एकाएकी होत नाही तर त्याच्या विविध अवस्था म्हणजेच पायऱ्या **(**stages**)** असतात. टॉलकॉट पार्सन्स यांनी सामाजिकरणाच्या चार अवस्था सांगितल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे आहेत. या प्रत्येक अवस्थेत सामाजिकरण ज्याच्यावर होत आहे त्यात होणारा बदल स्पष्टपणे दिसून येतो.

१) मौखिक अवस्था (The oral stage) :

सुप्रसिध्द मानसशास्त्रज्ञ डॉ. सिगमंड फ्रॉईडनी नवजात बालकाच्या या अवस्थेत सुख तत्वाची **(**Pleasure Principle**)** अवस्था म्हटले आहे. नुकतेच जन्मास आलेले मूल हे संगोपन, संवर्धन व संरक्षणासाठी आईच्या कुशीत राहून पूर्णतया आईवर विसंबून असते. आपल्या भोवतालच्या सजीव - निर्जीव, मूर्त - अमूर्त वस्तूंपेक्षा आपण वेगळे आहोत. याची त्याच्यात जाणीव निर्माण झालेली नसते. सभोवतालच्या व्यक्ती, त्यांचे संबंध, त्यांच्याशी वागण्याच्या पध्दती याची त्याला अजिबात जाणीव नसते. त्याच्यात 'स्व' ची जाणीव निर्माण झालेली नसते.

२) गुदावस्था (The Anal stage) :

पण नवजात अर्भकाच्या जैविक विकासाची वाटचाल होऊ लागते तशी त्याला त्याच्या भोवतालच्या वस्तू, व्यक्ती यांची सुरूवातीस पुसटशी व नंतर स्पष्ट जाणीव होऊ लागते. जेन पिगेट यांनी बालकाच्या १९ महिन्यांपर्यंतच्या सहा मानसिक अवस्थांचे विवेचन केले आहे. अत्यंत प्रारंभिक अवस्थेत आई जवळ होते, स्तनपान करते याची अत्यंत पुसटशी जाणीव मुलाला होते. नंतर एकाच दिशेकडे पाहत राहणे, नंतर इतर व्यक्तीचे बोट वा इतर वस्तू हातात धरुन ठेवणे या क्रिया सुरू होतात. पाचव्या - सहाव्या महिन्यात दिसलेली वस्तू घेणे, फेकलेल्या वस्तूच्या मूळ जागेकडे पाहणे या गोष्टी ते करु लागते. नवव्या व दहाव्या महिन्यात मुलाला दाखवून एखादी वस्तू लपवून ठेवली तरी ती शोधून काढण्याचे ज्ञान मुलाला होऊ लागते. पंधराव्या ते एकोणिसाव्या महिन्यांच्या कालावधीत मुलाच्या मानसिक विकासातील एक फार मोठा टप्पा गाठला जातो. तो म्हणजे पूर्वी पाहिलेल्या वस्तू तो ओळखू लागतो. इतर वस्तूंचे वेगळेपण, स्वतंत्र अस्तित्व तो आत्मसात करतो. ही सामाजिकरणातील महत्त्वाची बाब आहे. आई, बाबा, खेळणे, दुधाची बाटली वगैरे व्यक्ती, वस्तूंच्या प्रतिमा त्याच्या मनात तयार हातात. या वस्तू वा व्यक्तीविषयी त्याला ज्ञान होत असतानाच त्या व्यक्ती वा वस्तू या संदर्भात कसे वागले पाहिजे याबाबत त्याच्या मनात प्रेरणा तयार होतात. उदा. दुधाची बाटली दिसताच ती घेऊन तोंडाला लावणे, चारचौघात असलेल्या आईकडेच झेपावणे, खुळखुळा वाजवणे, दार ढकलणे वगैरे. अर्थात, व्यक्ती व वस्तू याविषयीच्या त्याच्या मनात तयार झालेल्या प्रतिमा व त्या बाबतच्या त्याच्या मनात निर्माण होणाऱ्या वर्तनविषयक प्रेरणा याबदल्याही जाऊ शकतात. थोडक्यात, १८ व्या महिन्यांपर्यंत मुलाला पूर्वी पाहिलेली व्यक्ती वा वस्तू यांची स्मृती होऊ लागते व त्या वस्तूंना ओळखू लागतो. म्हणजेच त्याला इतर पदार्थांच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव निर्माण होते व त्या वस्तूसंबंधी वर्तनविषयक प्रेरणादेखील निर्माण होतात.

ही त्याची अवस्था त्याला वळण लावण्यासाठी महत्वाची असते. साधारणपणे तीन वर्षाचे मूल झाले की त्याने मलमूत्र विसर्जनाबाबत स्वतःच काळजी घेणे आई वा इतर व्यक्तींच्या वागण्याला प्रतिसाद देणे याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. एकूण त्यांच्या वर्तनाला दिश दिली जाते. तसेच त्याच्याकडून अपेक्षित वर्तन न झाल्यास त्याला रागे भरणे, मारणे या शिक्षा दिल्या जातात. म्हणजे या अवस्थेत त्याला वस्तूस्थितीची जाणीव होऊ लागते. फॉईड यांनी याबाबत केलेल्या विश्लेषणावरुन ही बालकाची वास्तवता तत्वाच्या ओळखीची अवस्था मानली जाते. त्याला वस्तूस्थितीची हळूहळू जाणीव होऊ लागते. इतर व्यक्तीशी तो मिळतेजुळते होऊ लागतो. बोगार्डस यांनी या अवस्थेत होणारी वस्तूस्थितीची जाणीव हाच सामाजिकरणाचा गाभा मानला आहे.

३) इडिपस अवस्था (oedipal stage) :

साधारणतः वयाच्या चौथ्या वर्षापासून ते बाराव्या वर्षापर्यंतचा काळ इडिपस अवस्था (The oedipal stage) मानला जातो. या काळाच्या सुरुवातीलाच स्वतः बदलची त्याला जाणीव निर्माण होत जाते. लिंगभेदाच्या जाणिवेबरोबरच इतर व्यक्ती या आपल्यापेक्षा वेगळ्या आहेत आपण वेगळे असून आपणास स्वतंत्र अस्तित्व आहे. याबाबत त्याच्या गुंतागुंतीच्या कल्पना तयार हातात.

पाच-सहा वर्षांनंतर मूल घराबाहेर पडते. शाळा, मित्र, शिक्षक, पुस्तके, खेळ इतर माणसे यांच्याशी म्हणजे त्याच्या बाह्य जगाशी न संपणाऱ्या संपर्कांची सरुवात होते. त्याचे 'स्व'

किंवा 'आत्म' यांच्या विकासाला म्हणजेच व्यक्तिमत्वाच्या विकासाला अत्यंत जोराची चालना मिळते. घरी आई-वडील 'माझा राजा' किंवा 'माझी गुणाची लक्ष्मी' असे म्हणत असले तरी बाहेर 'नालायक' 'अवदसा' 'बेशरम' अशीही विशेषणे मुलांना ऐकावी लागतात. इतरांशी त्याच्या ज्या आंतरक्रिया घडून येतात. त्यातूनच त्याला आपण कसे आहोत याची जाणीव निर्माण होऊ लागते. स्वत:बदलची एक प्रतिमा त्याच्या मनात तयार होऊ लागते.

'स्व' किंवा 'आत्मा' ही सामाजिक आंतरक्रियेची निर्मिती असते. 'स्व' घेऊनच व्यक्ती जन्मास येत नसते. जी. एच. मीड यांनी महटल्याप्रमाणे 'स्व' स्वरुप संपूर्णतया सामाजिक असते. 'स्व' संकल्पनेचा विकास हाच खऱ्या अर्थाने सामाजिकरणाचा गाभा आहे. आंतरक्रियेतूनच हा विकास साधत असतो. याबाबत भाषा ही अत्यंत महत्वाची आहे. भाषेमुळे आंतरक्रिया अधिक प्रभावी होतात. इतरांचे विचार आवडी निवडी, मते, भावना मुलाला समजते. त्याचप्रमाणे तेही आपला विचार व्यक्त करु लागते. त्यामुळे तेही आपला विचार व्यक्त करु लागते. त्यामुळे 'स्व' च्या विकासाला अधिक वेग मिळतो. सामाजिक नियमांचे ज्ञानही त्याला या भाषेनेच होते. त्यामुळे समाजात आपण कसे वागावे व कसे वागू नये, कोणत्या भूमिका स्वीकाराव्यात व त्या कशा पार पाडाव्यात याबद्दलची कल्पना ते आत्मसात करते. मी, मला, माझे यासारख्या शब्दांतून ते स्वत: विषयीची जाणीव प्रकट करु लागते.

या अवस्थेत 'स्व' त्वाची जाणीव कशी विकसित होत जाते या बाबत काही नामवंत समाजशास्त्रज्ञांनी, मानसशास्त्रज्ञांनी सिध्दांत मांडले आहेत.

(अ) सी. एच. कूले यांचा 'स्व' प्रतिबिंब दर्पणाचा सिध्दांत :

ज्याप्रमाणे दर्पणात म्हणजे आरशात आपणा कसे दिसतो. हे पाहतो. त्याप्रमाणे मुले इतरांचा आरशासारखा उपयोग करतात. आपल्या वर्तनाबाबत इतर व्यक्तींकडून चांगल्या - वाईट, योग्य - अयोग्य वगैरे काय प्रतिक्रिया होतात. त्या अजमावतात. त्यावरुन आपण कोणत्या प्रकारचे वर्तन करावे, कोणत्या भूमिका पार पाडाव्यात याबाबत निर्णय घेतात. थोरामोठ्यांच्या मुलाला आदर, मान मराबत मिळत जातो. त्यामुळे ते स्वत:ला मोठे समजते. तर गरीबाच्या मुलाला पदोपदी अवमानीत केले जाते. तेव्हा ते स्वत:ला तुच्छ समजते. अशा प्रकारे आपणांकडे दुसऱ्याच्या नजरेने पाहात मुलांच्या ठिकाणी 'स्व'त्वाची निर्मिती होत असे कूले यांनी प्रतिप्रादन केले आहे.

(ब) जॉर्ज हर्बर्ट मीड 'भूमिका' साकारणे बाबतचे विचार :

जार्ज हर्बर्ट मीड यांच्या मते, सामाजिक आंतरक्रियांमुळे मुलाच्या ठायी स्वत:ची जाणीव निर्माण होते. सामाजिकरणाच्या प्रारंभिक असस्थेपासून मूल हळूहळू संपर्कात येणाऱ्या इतरांच्या म्हणजे आई, वडील, भाऊ, ताई, शेजारी वगैरे प्रमाणे हळूहळू वागू लागते. त्यांच्या भूमिका स्वीकारुन पार पाडताना स्वत:कडे वस्तुनिष्ठपणे पाहते. यातूनच त्याची स्वत्वाची जाणीव विकसित होत जाते. उदा. लहान मूले भातुकलीचा खेळ खेळताना आई, बाबा, काकू, ताई, डॉक्टर, पोस्टमन वगैरे भूमिका साकारतात.

(क) सिगमंड फ्रॉईड यांची 'अहं' (Ego) :

फॉईडच्या मते, मूल आपल्या माता-पित्याचे वर्तन प्रमाण मानून तसे वागण्याचा प्रयत्न करते. कोणते वर्तन चांगले व कोणते वर्तन वाईट याबदल माता-पित्यांची प्रमाणे असतात. तीच प्रमाणे मुलांच्या व्यक्तिमत्वाच्या जडण-घडणीत ठसवली जातात. या प्रक्रियेतून मुलाचा अहं (Ego) निर्माण होत जातो. माता-पित्याच्या प्रामाणिक वर्तनाच्या कल्पना या शेवटी समाजाच्याच

असतात. अशा प्रकारे मूल समाजाच्या सामाजिक नियमनांना सामाजिकरणाच्या प्रक्रियेने आत्मसात करीत असते.

४) पौगंडावस्था (Adolescent stage) :

या अवस्थेतील मूले साधारणतः १३ ते १८ वर्षापर्यंतची असतात. आई-वडिलांपासून काही प्रमाणात स्वतंत्र झालेली मुले समाजात स्वतंत्र वागू लागतात. पण तो पूर्णपणे स्वतंत्र नसल्याने त्यांच्या मनात गोंधळ उडालेला असतो. एकीकडे एखाद्या बाबतीत स्वतंत्र निर्णय घ्यावा असे वाटत असले तरी त्यांना इतरांच्या विशेषतः आई-वडीलांच्या मार्गदर्शनाची गरज असते.

याच काळात त्यांच्यात शारीरिक बदल वेगाने होत असताना त्यांच्यात लैगिंक जाणिवा निर्माण होतात. त्यांना भिन्न लिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण वाटू लागते. त्याचे भावनिक विश्व अत्यंत संवेदनशील होते. त्यात स्वप्नाळूपणा येतो. घराबाहेरच्या जगाशी त्यांच्या बाढत्या संपर्कातूनच आपण कोण व्हावे? कोणासारखी वर्तणूक करावी? अशा अनेक प्रश्नांचा गुंता त्यांच्या मनात निर्माण होतो. अशा वेळी त्यांच्यातील हा जैविक, मानसिक बदल त्याच्या समाजीकरणतील महत्वाचा भाग असतो. या वेळेस त्याला भावनिक, मानसिक गोंधळातून समतोल साधण्यासाठी वडीलधाऱ्यांची वा शिक्षक, पुरेहित वगैरे अन्य मार्गदर्शकांचे साहाय्य मौलिक ठरते. लोकरुढी, लोकनीती, कायदे यांचे पालन करण्यातील गांभीर्य त्याला पडते. त्याच्या वर्तनाच प्रभावी नियंत्रण या सामाजिक नियमनामुळे होऊ लागते. इतरांना दृष्टिकोण व त्याचा दृष्टिकोण यात कमालीची एकरुपता निर्माण होते. समाजाच्या अभिवृत्ती, आवडीनिवडी याचे त्याला ज्ञान होऊन कसे वागावे कसे वागू नये या बाबी तो आत्मसात करतो. सद्सद्विवेक बुध्दीची त्याच्या ठायी निर्मिती होऊन त्याआधारे चुकल्या गोष्टींबद्ल त्याला वाईट वाटणे, शरमल्यासारखे होणे हे दिसून येते. महणजे आदर्श स्वरुपाच्या 'स्व' ची निर्मिती या समाजीकरणाने होते. समाजाचा तो क्रियाशील सदस्य होतो.

सामाजिकरणाच्या या अवस्थांतच सामजिकरणाची प्रक्रिया पूर्ण होते असे नाही. बाल्यावस्था, किशोरावस्था या काळात समाजीकरणाची प्रक्रिया मोठया प्रमाणात होत असली तरी प्रौढावस्था, वृध्दावस्था या अवस्थेत मानवी व्यकतीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण चालूच असते.

९.३ स्वत्व आणि सामाजिकरण (THE SELF AND SOCIALISATION)

प्रस्तावना (INTRODUCTION)

सामाजिकरण प्रक्रियेत 'स्वत्व' जाणिवेच्या निर्मितीला महत्व दिले जाते. सामाजिकरण प्रक्रियेद्वारे स्वत्व कसे निर्माण केले जाते. सर्वसाधारणपणे असे म्हटले जाते की, मनुष्य आणि इतर मानवेत्तर प्राणी यातील सुस्पष्ट भेद म्हणजे मानवी प्रण्यात असलेली 'स्वत्व' जाणीव इतर प्राण्यात आढळत नाही. मग आपलयापुढे असा प्रश्न उभा राहतो की, 'स्वत्व' म्हणजे काय? आणि ते कसे प्राप्त केले जाते? आज तरी सर्वसाधारणपणे स्वत्वाच्या स्वरुपाबाबत विधानांमध्ये मतैक्य आहे. परंतू स्वत्वाच्या अभ्यासाच्या मार्गाबाबत मात्र विविध अभ्यासकांच्या गटात काही मतभेद असेल तरी 'स्वत्व' ही संकल्पना आज सर्वमान्य आहे.

स्वत्व आणि सामाजिकरण (THE SELF AND SOCIALISATION)

स्वत्व संकल्पना (Self concept)

स्वत्व अर्थ व व्याख्या (Meaning & Definition of Development of self)

आपण कोण आहोत ? याबाबत आपली कल्पना म्हणजे 'स्व' संकल्पना किंवा 'स्वत्व संकल्पना' होय. आपल्या स्वत: बाबतच्या कल्पना या स्व - संकल्पनेचा एक भाग असतात. स्वत्वाचा अर्थ आपल्या लक्षात येण्यासाठी 'स्वत्व' या संकल्पनेच्या काही व्याख्यांचा आपण या ठिकाणी आढावा घेऊ या.

१) प्रा. अल्विन एल्. बरट्रांड :- "आत्मनिष्ठ दृष्टीकोनातून विचार करावयाचा झाल्यास असे महणता येईल की, 'स्वत्व' म्हणजे स्वत:च्या अस्तित्वाची जाणिव आणि इतर व्यक्तीच्या व्यक्तिमत्वापेक्षा आपण कसे वेगळे आहोत यांचीही जाणीव होय".स्वत्वाच्या अस्तित्वाची जाणिव व्यक्ती मी, मला, माझ्या (I, Me, My) या सर्वनामाद्वारे व्यक्त करतात.

२) प्रा. डब्ल्यु. ए. ॲल्डरसन आणि एफ. बी. पार्कर :- "स्वत्व म्हणजे इतरांशी आपल्या होणाऱ्या आंतरक्रियांबाबत आपल्या विकसित झालेल्या भावनांची अवस्था होय".

३) हॅरी एम्. जॉनसन :- "एखाद्या व्यक्तीच्या स्वत:च्या व्यक्तीच्या स्वत:च्या व्यक्तिमत्वाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या वस्तूंचे किंवा हेतूंचे आत्मसातीकरण करणे म्हणजे 'स्वत्व' होय".

स्वत्वाचा विकास होण्यासाठी मुलांच्या इतर व्यक्तीशी आंतरक्रिया होणे फार महत्वाचे असते. लहान मूल आत्मकेंद्री असते. ते त्याच्याच विश्वात गुरफटलेले असते. मूल व त्याच्या स्वत:च्या गरजा या दोन गोष्टींना त्या विश्वात प्राधान्य असते. आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी ते आईवर व अन्य कुटुंबीयांवर अवलंबून असते. पण त्याचे इतरांशी येणारे संबंध हे शारीरिक पातळीवरचे असतात. त्याच्या गरजा वेळोवेळी पुऱ्या केल्या जातात. माणसे त्याच्या तैनातीस हजर असतात आणि मूल कुटुंबीयावर हुकूमत चालविते. या अवस्थेत निराशा, वैफल्य याचा अनुभवच मुलाच्या वाट्याला येत नाही. किंबहुना तो येऊ दिला जात नाही. त्याची भूक, तहान, झोप इत्यादींची काटेकोरपणे काळजी घेण्यात येते.

परंतु ही परिस्थिती कायम टिकून राहान नाही. तीत बदल होणे आवश्यक असते. हळू हळू मुलाला वेगळे अनुभव यावयास लागतात. त्याने मागता क्षणीच खाणे मिळत नाही. त्याने रडताक्षणीच आई व अन्य माणसे हातातील कामे सोडून नेहमीच त्याला उचलण्यास धावत नाहीत. याची त्याला जाणीव होते. मग मूल भोवतालच्या विश्वाचा शोध घ्यावयास लागते व त्या अनुभवातून त्याला खऱ्या विश्वाची म्हणजे ज्यात त्याला राहावयाचे आहे त्याची कल्पना यावयास लागते. त्या विश्वात आपल्याबरोबर अन्य माणसेही राहतात. त्यांचाही आपण विचार केला पाहिजे. त्यांच्याशी जुळते घेतले पाहिजे याची मुलाला जाणीव व्हावयास लागते. त्यांना खूष करुन व त्यांच्या कलाने वागून आपल्यालाही सुख मिळेल हे मुलाला यथावकाश स्पष्ट व्हावयास लागते.

अशी जाणीव होत असताना मुलाची आत्मकेंद्री वृत्ती विरघळू लागते. ते दुसऱ्यांचा विचार करावयास शिकते. म्हणजेच आपलयाबद्दल इतरांना काय वाटते किंवा काय वाटेल याचा विचार करु लागते. आता ते स्वत:कडे आपल्या दृष्टीकोनातून न पाहता इतरांच्या दृष्टिकोनातून पाहावयास लागते व त्याची आत्मप्रतिमा घडते. अशी आत्मप्रतिमा घडण्यासाठी व्यक्तीने इतरांशी

आंतरक्रिया करणे व त्यांच्या विचारांना व मतांना महत्व देणे फार महत्वाचे असते. आपण हुशार आहोत. सुंदर आहोत, उंच आहोत किंवा खुजे आहोत. हे माणसांना इतरांच्या मदनीने व्यक्तीला 'आत्मशोध' होत असतो. इतरांच्या स्वत्वाचा विकास होणे.

सी. एच. कूले यांची स्व प्रतिबिंब दर्पणाची कल्पना (C. H. COOLEY)

अमेरिकेन समाजशास्त्रज्ञ सी. एच. कूले यांनी स्वतःच्या मुलांच्या वर्तणुकीचे निरीक्षण करुन 'स्व'त्वाच्या विकासाबद्दल काही मूलभूत विचार मांडले. मुले इतरांकडे आपल्या वर्तनाचा आरसा या दृष्टीने पाहतात. आपण कसे दिसतो? चांगलेकी वाईट, तरतरीत की गबाळग्रंथी हे जसे आरशात पाहून ठरवतो व त्यानुसार आपल्यात फेरफार करतो. त्याचप्रमाणे मूले इतरांना आरसा मानतात व त्यांच्याकडून आपल्या वर्तनाच्या प्रतिक्रिया अजमावतात. त्या आधारे आपले वागणे योग्य - अयोग्य खपणारे - नखपणारे, चांगले - वाईट, लक्षणीय - दुर्लक्षणीय वगैरेचा निर्णय ते स्वतः घेऊ लागतात. यातूनच ते स्वतःचे मूल्यमापन करु लागतात त्यानुसार आपण कोणत्या प्रकारचे वर्तन करावे व कोणती भूमिका पार पाडावी याच्या जाणीवा त्यांच्या ठायी निर्माण होतात. अगदी प्रारंभिक अवस्थेत मूले रडून आपल्या आईला आपल्या अस्तित्वाची जाणीव करुन देतात. बाळाला काय हवे, काय झाले याकडे आई - वडील वगैरे लक्ष देतात. त्याच प्रमाणे खेळताना, गप्पा मारताना वा इतर प्रकारचे वर्तन करताना मुले रडणे, मोठा आवाज करणे, मोठ्याने बोलणे वगैरे मार्गांनी इतरांचे आपणांकडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतात. आपल्या वर्तनाची प्रक्रिया काय होते हे आजमावतात. अशाप्रकारे आपणाकडे दुसऱ्यांच्या नजरेत पाहात व्यक्तीच्या ठायी स्वत्वाची निर्मिती व विकास होतो.

अशाप्रकारे स्वत्वाचा विकास हा आंतरक्रियेतून विशेषतः सुरुवातीस कुटुंब, सवंगडी या सारख्या प्राथमिक समूहातून होतो. त्याच्या वर्तणूकीविषयी इतरांच्या तो जसा प्रतिक्रिया आजमावतो. तद्वत इतरांच्या वर्तनाबद्दल त्याच्याही मनात प्रतिक्रिया तयार होतात. अशा प्रकारे स्वतःचे प्रतिबिंब इतरांच्या प्रक्रियात्मक आरशात पाहाणे (Looking Glass self) ची प्रक्रिया सातत्याने चालत असते व स्वत्वाचा विकास होत जातो.

जॉर्ज हर्बर्ट मीड G. H. Mead यांची भूमिका साकारणे बाबतचे विचार

जे. एच. मीड या शिकागो विद्यापीठाच्या तत्वज्ञ व मानसशास्त्रज्ञाने भूमिका साकारणे बाबत किंवा स्वत्व बाबत विचार मांडतांना सामाजिक आंतरक्रियामुळे व्यक्तीला स्वतःची जाणीव निर्माण होते असे म्हटले आहे. सामाजिकरणाच्या प्रारंभिक अवस्थेपासून मूल हळूहळू इतरांच्या प्रमाणे स्वतः वागण्याचा प्रयत्न करु लागते. हे इतर म्हणजे त्याचे आई - वडील, जवळचे नातेवाईक आणि शेवटी त्याच्या प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष संपर्कात येणाऱ्या अन्य कितीतरी व्यक्ती होत. म्हणजे तो इतरांच्या भूमिका स्वीकारुन त्या साकारण्याच्या (Role playing) प्रयत्न करतो. याचबरोबर या भूमिका साकारताना इतरांच्या नजरेतून मूल स्वतःकडे वस्तु निष्ठपणे पाहते. यातूनच त्याची स्वत्वाची जाणीव विकसित होत जाते. उदा. लहान मूल बाहुलीशी खेळतांना बाहुला - बाहुलीची लग्ने लावताना वा भतुकलीचा खेळ खेळताना स्वतः आई, बाबा, ताई, दादा, नवरा, बायको, भटजी वगैरेच्या भूमिका साकारतात. अर्थात या इतरांच्या भूमिका जगात असताना मुलाला 'काही इतर' हे अत्यंत महत्वाचे (significant others) वाटतात. उदा. आई, वडील, दादा, ताई वगैरे.

अशाप्रकारे 'नवजात' अर्भक ज्याला सुरुवातीस आपण व आई यात फरक करता येत नसतो. त्याला नंतर आई व आपण वडील - आई - आपण असा भेद करता येऊ लागतो. नंतर इतर व्यक्ती व स्वतः यातील मी सुक्ष्मपणे जाणवतो. पण मूल एवढयावरच थांबत नाही. तर इतरांच्या भूमिका साकारण्याचा प्रयत्न देखील करु लागते. या बाबत त्याला भाषेचे फार मोठे सहाय्य होते. अशा या भूमिका जगताना त्याचे भूमिकांचे क्षेत्र अत्यंत व्यापक होते. समाजातील असंख्य लोकांच्या समान्याकृत भूमिका (The Generalised other) साकारण्याचा प्रयत्न मूल करु लागते. या भूमिका साकारण्याच्या प्रक्रियेत मूल आपल्या वर्तनाबद्दल इतरांच्या काय प्रतिक्रिया होतील, इतर लोक काय म्हणतील यांचाही विचार करत असते. याचा त्याच्या वर्तनावर निश्चित परिणाम होतो. अशाप्रकारे इतरांच्या भूमिका साकारण्याच्या प्रक्रियेतून व्यक्तीला स्वतःची व समाजाची ओळख होते. समाजाच्या अभिवृत्ती, आवडी निवडी याचे त्याला ज्ञान घेऊन कसे वागावे आणि कसे वागू नये याबद्दलच्या जाणिवा तो आत्मसात करतो. यातूनच त्याच्या स्वत्वाचा विकास होऊन तो समाजाचा क्रियाशील सदस्य होतो.

सारांश (Summary) :

व्यक्ती, तिची स्वत्वप्राप्ती व त्यात सामाजिकरणाची भूमिका या तिघांच्या परस्परसंबंधावर स्वत्वाचा विचार मांडला जातो. व्यक्ती हा जीवशास्त्रीय दृष्टीने विचार करता एक सजीव प्राणी असून व्यक्तीचे व्यक्तीमत्व घडविण्यात जीवशास्त्रीय घटकाचे मोठे योगदान आहे. स्वत्वाची प्राप्ती विकास कसा होतो हे अनेक विचारवंतानी आपल्या सिद्धांतात सांगितले आहे. सामाजिकरणात शिक्षण प्रक्रियेचे काय महत्व आहे? यातून व्यक्तित्वात कोणते बदल घडून येतात? दुसऱ्याच्या मनातील स्व बद्दलच्या आपल्या काय कल्पना आहेत? इत्यादी थोडक्यात माहिती मिळविता येते.

९.४ अपेक्षित सामाजिकीकरण (ANTICIPATORY SOCIALIZATION)

समाजामध्ये राहत असताना स्वतःमध्ये बदल घडवून आणणे आणि स्वतःमध्ये विकास घडवून आणणे हे कार्ये व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत अखंडपणे चालू असते. मानवी जीवनक्रमात अनेक वेळा पुढील दोन तऱ्हेचे सामाजिकरण होत असते.१) अपेक्षित सामाजिक आणि २) पुर्नसामाजिकरण होय.

समाजातील काही व्यक्ती अगोदरपासून त्यांना काय करायचे आहे ते ठरवितात नंतर ते त्यांची संपूर्ण कौमार्यावस्था किंवा प्रौढपषातील काही काळ भविष्याच्या तयारीसाठी घालवितात. उदा. काही व्यक्ती त्यांचा संपूर्ण वेळ नृत्य शिकण्यात घालवितात. तर काही सर्व वेळ क्रिकेटचे धडे घेण्यात घालवितात काही जण वडिलोपार्जित व्यवसाय पुढे चालू ठेवण्यासाठी महाविद्यालयीन शिक्षण घेत - घेत वडिलांबरोबरचे काम करु लागतात. आणि भविष्यात व्यवसाय सांभाळण्यासाठी स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करतात. अशा तऱ्हेने स्वतःचे भवितव्य घालविण्यासाठी तयार करण्याला 'अपेक्षित सामाजिकरण' म्हटले जाते.

अपेक्षित याचा अर्थ सामाजिकरणाची अशी प्रक्रिया ज्यात भविष्यातील भूमिकांसाठी व्यक्ती सराव करीत असते. तसेच भविष्यातील व्यवसाय आणि सामाजिक संबंधांसाठीही

स्वत:ला तयार करीत असते. एखादी संस्कृती कार्यक्षमतेने कार्य करीत असते. आणि अशा व्यक्ती संस्कृतीच्या मानकांना, मूल्यांना आणि वर्तनाला आधीच समजून घेतात.

मागसलेल्या समाजातील अनेक मुले कौटुंबिक व्यवसायातील कौशल्ये, निरीक्षण आणि सरावाद्वारे सुरुवातीपासूनच शिकत असतात. म्हणजेच ती भविष्यासाठी स्वत:ला तयार करत असतात.

एकूण आयुष्याचा विचार केला तर लोकांच्या दृष्टिकोनात, मुल्यात आणि स्वतः विषयीच्या संकल्पनात बदल होत असतो. ते एखादी नवीन भूमिका स्वीकारतात आणि नवीन अनुभव घेतात.

प्रौढवयात होणारे बदल मंद गतीने आणि तुकडया तुकडयाने होतात. पण काही बदल मात्र मूलभूतच असतात. आणि ते वेगाने होतात. विशेषतः जेव्हा एखादी व्यक्ती नियमित जगत असलेले आयुष्य सोडून दुसऱ्या प्रकारचे आयुष्य जगू लागते की जे पहिल्यापेक्षा अत्यंत वेगळे असते. यासंबंधी एक महत्वाचे उदाहरण म्हणजे पुर्नसामाजिकरणाच्या प्रयत्नात पूर्वीच्या सर्व घडलेल्या घटना विसरायला लावले जाते. (ब्रेनवॉशिंग) याचप्रमाणे गुन्हेगारांचे पुनर्वसन आणि पापी लोकांना पुन्हा धर्मात सामावून घेणे, ही अशीच प्रक्रिया आहे. अशा प्रकरणांमध्ये मुळापासून वेगळी व्यक्ती बनविणे आणि भूतकाळासासून विलग करणे, हा हेतू असतो. काही व्यावसायिक भूमिकेत आतून आणि बाहेरुन सामाजिकरणाची आणि प्रशिक्षणाची गरज असते. यालाच पुर्नसामाजिकरण म्हटले जाते. ख्रिस्ती धर्मगुरु किंवा नन यांची पारंपरिक भूमिका अशी असते की, नव्या धर्माप्रमाणे जीवन जगता यावे आणि धार्मिक सेवांमुळे जुने आयुष्य विसरले जावे.

आपली प्रगती तपासा (check your progress)

१) अपेक्षित सामाजिकरण म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

_____

९.५ लिंग सामाजिकरण (GENDER SOCIALIZATION)

नवजात बालकाला जन्मतः संस्कृतीचे ज्ञान नसते. मुलाच्या वाढत्या वयात त्याला हळूहळू संस्कृतीचा, समाजातील मूल्ये व प्रमाणकांचा परिचय करुन दिला जातो. अन्य व्यक्तीसमवेत राहून त्यांचे अनुकरण करुन व त्यांच्याशी आंतरक्रिया करुनच मूल अनेक गोष्टी शिकते. मुलांना भावी आयुष्यातील त्यांच्या भूमिकांसाठी लागणारे शिक्षण सामाजिकरणाद्वारेच दिले जाते.

समाजात 'स्त्रीत्व' 'पुरुषत्व' या लिंगविषयक भूमिकांशी संबंधित असलेल्या पारंपारिक कल्पनांचा प्रभाव सामाजिकरणांच्या प्रक्रियेवर पडत असतो. व त्या कल्पनांनुसार मुलांमुलीचे व्यक्तीमत्व विकसित करण्याकडे समाजाचा कल असतो. उदा. मुलींच्या बाबतीत नम्रता, त्यागी वृत्ती, सहनशीलता, आज्ञाधारकता, कर्तव्यदक्षता, शालीनता इ. गुण आवश्यक समजले जातात. तर मुलांकडून धडाडी, नेतृत्व, कणखरपणा इ. गुणांची अपेक्षा असते. त्यामुळे त्या त्या भूमिकेशी आवश्यक अशा गुणाची जोपासना करण्याचा प्रयत्न कुटुंब, शाळा, जनसंपर्क, माध्यमे इ. सामाजिकरणाच्या साधनांद्वारे केला जातो. समाजाकडून स्वीकृत असे वर्तन मुलांमुलींकडून घडल्यास त्ययाबद्दल त्यांना बक्षिसे किंवा शाबासकी दिली जाते. त्यांचे कौतुक केले जाते. याउलट समाजाला अस्वीकृत वर्तन त्यांच्याकडून घडल्यास त्यांना शिक्षा दमदाटी केली जाते. मुलीच्या बाबतीत तिच्या पत्नी, माता, गृहिणी या भूमिका अधिक महत्व दिले जाते. मुलीच्या अगदी बाल्यावस्थेपासून तिचे सामाजिकरण अशा रीतीने केले जाते की, ज्यायोगे तिच्यामध्ये दुय्यम स्थानाची भावना निर्माण व्हावी. उदा. अनेक कुटुंबात आहार, आरोग्य, शिक्षण इ. बाबतीत मुलीपेक्षा मुलाकडे अधिक लक्ष पुरवले जाते.

प्रत्येक समाजात स्त्री - पुरुषांच्या भूमिका किंवा त्यांनी करावयाची कामे निश्चित केलेली असतात. मुलामुलीचे सामाजिकरण होत असतांना मुलेमुली या लिंगविषयक भूमिकांशी समरस होण्याचा प्रयत्न करतात. कुटुंबात मुलगी आपल्या आईच्या भूमिकेशी आणि मुलगा पित्याच्या भूमिकेशी तादात्म्य पावू लागतात. कुटुंबातील वडील मंडळीही मुलांमुलीना त्याच्या लिंगानुसारी भूमिकांकडे वळवण्याचा प्रयत्न करतात. मुलामुलींभोवतीचे सामाजिक विश्व त्यांना त्यांच्या भूमिका स्वीकारण्यास मदत करते. आईवडीलही आपल्या मुलांनी समाजाने ठरवून दिलेल्या भूमिकांप्रमाणे वागावे अशी अपेक्षा करतात. त्यामुळे लहानपणापासून त्यांना वागवण्याच्या पध्दतीत फरक केला जातो. मुलांमुलीचे पोषाख त्यांना दिली जाणारी खेळणी, त्यांच्यावर सोपवली जाणारी कामे, त्यांना खेळण्या वावरण्याची दिली जाणारी संधी, त्यांचे छंद, त्यांच्या शिक्षण व व्यवसायाची निवड इ. सर्वच बाबतीत मुलांमुलींमध्ये भेद केला जातो. मुलगी आपली स्त्री - भूमिका व मुलगा आपली पुरुष - भूमिका कुटुंब, शाळा, शेजार, समवयस्क समूह, साहित्य, जाहिराती, चित्रपट टी. व्ही. यांच्याद्वारे आत्मसात करतात. ही सर्व साधने मुलींनी व मुलांनी कसे असायला हवे व कसे असू नये हे सांगत असतात. सामाजिकरणाच्या या विविध साधनांच्या द्वारे त्या - त्या भूमिकेशी संबंधीत असणाऱ्या समाजमान्य मूल्यांचे आंतरीकरण केले जाते. आणि लिंगविषयक भूमिकेच्या पूर्वापार चालत आलेल्या प्रतिमाच व्यक्तीच्या मनावर ठसवल्या जातात. स्त्री - पुरुष हे भावनिक बौध्दिक व सामाजिक दृष्टया वेगळे दिसतात. कारण त्यांचे सामाजिकरण विशिष्ट पध्दतीनेच केले जाते.

अलिकडे काही कुटुंबे सामाजिकरणाद्वारे मुलांमुलीमध्ये समान अभिरुची व क्षमता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. शिक्षकांनीही मुलांमुलीचे सामाजिकरण करतांना नवीन दृष्टीकोण बाळगला पाहिजे. शिवाय आज सामाजिकरणांच्या इतर साधनांद्वारेही, अभिवृत्तींमध्ये व वर्तन व्यवहारांमध्ये स्त्री - पुरुष समान आहेत ही जाणीव निर्माण होण्याच्या दृष्टीने नवीन मूल्यांची जोपासना केली गेली पाहिजे. संपूर्ण व आमूलाग्र परिवर्तन सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्वारे साधता येण्यासारखे आहे.

९.६ पुर्नसामाजिकीरण (RE - SOCIALIZATION)

काही वेळेला माणसांना आयुष्यात केव्हातरी अचानक नवीन अभिवृत्तींचा, नवीन मूल्यांचा व नवीन भूमिकांचा स्वीकार करुन नव्या अनुभवाला सामोरे जावे लागते. असे पुन:सामाजिकरण हे अधिक मूलभूत स्वरुपात आणि अधिक जलद घडून येणारे असते. व्यक्तीचे आधी झालेले सामाजिकरण हे चुकीचे आहे असे वाटल्याने आधीचे संस्कार पुर्णपणे नाहीसे करुन व्यक्तीवर पुन्हा नवीन मूल्याचे संस्कार करण्याचा प्रयत्न पुन:सामाजिकरणाने केला जातो. पुन:सामाजिकरण हे जीवनात आधी आलेल्या अनुभवांपेक्षा केवळ वेगळेच असते. असे नाही तर ते आधीच्या अनुभवांशी विसंगतही असते. उदा. बालगुन्हेगारांचे किंवा गुन्हेगारांचे केले जाणारे पुनर्वसन किंवा 'पापी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीने धार्मिक जीवनाच्या मार्गाने केलेले अनुसरण हे पु:सामाजिकरण होय. या उदाहरणांवरुन आपल्याला असे दिसून येते की, या ठिकाणी व्यक्तींच्या आयुष्यक्रमात मूलभूत बदल घडवून आणण्याचा आणि त्यांच्या गतकालीन अनुभवांत भंग करण्याचा उद्देश असतो.

दुसऱ्या बाजूने आधुनिक गतीशील समाजात व्यक्ती शिक्षणाच्या किंवा नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करीत असतात. स्थलांतरामुळे व्यक्तींना नवीन भागातील संस्कृतीची ओळख करुन घ्यावी लागते. इतकेच नाही तर त्या संस्कृतीशी स्वत:चे समायोजन साधावे लागते. पूर्णपणे वेगळया व नवीन संस्कृतीची मूल्ये व प्रमाणके आत्मसात करावी लागतात. उदा. ग्रामीण भागातून शहरी भागात येणारी व्यक्ती किंवा एका देशातून दुसऱ्या देशात वास्तव्यासाठी जाणारी व्यक्ती यांना अशा परिस्थितीला सामोरे जावे लागते. वेगळया संस्कृतीत स्वत:ला सामावून घेण्याची प्रक्रिया देखील पुन:सामाजिकरणाची प्रक्रिया ठरते. पुन:सामाजिकरणात, व्यक्तीला नव्याने स्वीकारावी लागणारी भूमिका ही गुंतागुंतीची असेल, व्यक्तीमध्ये ताण - तणाव निर्माण करणारी असेल तर पुर्न:सामाजिकरण हे त्रासदायक ठरते.

तुमची प्रगती तपासा. (Check your progress)

१) पुर्न:सामाजिकरण ही संकल्पना स्पष्ट करा.

२) सामाजिकरणाचा अर्थ व व्याख्या सांगा.

३) सामाजिकरणाचे महत्व विशद करा.
४) सामाजिकरणाची कार्ये स्पष्ट करा.
५) सामाजिकरणाची उद्दिष्टये सांगा.
६) सामाजिकरणाची साधने / माध्यमे नमूद करा.
७) सामाजिकरणाच्या अवस्था किंवा पायऱ्या किंवा टप्पे यावर चर्चा करा.

८) स्वत्वाचा विकासः सी. एच. कूले, जी. एच मीड यांचा स्पष्ट करा.
९) सी. एच. कुलेची 'स्वत्वाचा विकास' ही संकल्पना विशद करा.
१०) जी. एच. मीडची 'स्वत्वाचा विकास' ही संकल्पना विशद करा.

११) लिंग भूमिकेची सामाजिकरण संकल्पना सांगा

❖❖❖❖

१०

राजकीय सामाजिकरण
(POLITICAL SOCIALIZATION)

घटक रचना :

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रस्तावना
१०.२ राजकीय सामाजिकरणाचे स्वरुप
१०.३ राजकीय सामाजिकरणाची साधने / माध्यमे
१०.४ प्रचार माध्यमे, जनसंपर्काची साधने
१०.५ सरकार
१०.६ अनुभव
१०.७ राजकीय सामाजिकरणाचे महत्त्व
१०.८ सारांश
१०.९ अभ्यासाचे प्रश्न
१०.१० संदर्भ सूची

१०.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVE)

१. राजकीय सामाजिकरणाचा अभ्यास करता येईल.
२. राजकीय सामाजिकरणाची साधने किंवा माध्यमे कोणती हे लक्षात घेता येईल.
३. प्रचार माध्यमे, जनसंपर्काची साधने यांचा अभ्यास करता येईल.
४. सरकार, अनुभव आणि राजकीय सामाजिकरणाचे महत्त्व समजून घेता येईल.

१०.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

प्रत्येक देशाची राजकीय संस्कृती भिन्न असते. वर्षानुवर्षे देशाच्या राजकीय संस्कृतीत कमी-अधिक प्रमाणात सातत्य आढळते. राजकीय संस्कृतीत एका टोकाचा बदल झाल्याचे दिसत नाही. या सर्वांचे एकच कारण आहे व ते म्हणजे 'राजकीय सामाजिकरण'.

राजकीय सामाजिकरण ही एक संकल्पना आहे. तसेच प्रक्रिया देखील आहे. ज्या प्रक्रियेद्वारे मानवामध्ये मानवी गुणधर्माचा विकास होतो. मनुष्य प्राण्याचे सामाजिक प्राण्यामध्ये

रुपांतर होते, त्या प्रक्रियेस सामाजिकरण म्हणतात. सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिकरण होय.

सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्वारेच व्यक्ती समुहाच्या चालीरीती, परंपरा, विचार करण्याची पद्धती अंगीकारतो व स्वतःस समूहाचा शारीरिक व मानसिक हिस्सा बनवतो. काहींच्या मते सामाजिकरण हे शिक्षण आहे. या शिक्षणाद्वारेच व्यक्तीस सामाजिक भूमिका पार पाडण्याचे ज्ञान मिळते. समाजाच्या स्थिरतेसाठी समाजाला विशिष्ट मानसिकता असणाऱ्या व्यक्तीची गरज असते. अशा व्यक्ती समाज ज्या प्रक्रियेद्वारे बनवतो त्यास सामाजिकरण म्हणतात. थोडक्यात "मनुष्य प्राण्याचे सामाजिक प्राण्यामध्ये रुपांतर करण्याची अव्याहत सातत्याने निरंतर चालणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिकरण होय."

राजकीय सामाजिकरणाचे स्वरुप (POLITICAL SOCIALIZATION) :

अर्थ (Meaning) :

राजकीय सामाजिकरण हा राजकीय संस्कृतीचा एक भाग आहे. राजकीय सामाजिकरणाद्वारेच व्यक्ती आपल्या राजकीय भूमिकांना आत्मसात करीत असते. व्यक्ती या प्रक्रियेद्वारेच राजकारणात सहभागी होत असते. राजकीय व्यवस्थेत कोणत्या तरी पातळीवर व्यक्तीला सहभागी करुन घेण्याची प्रक्रिया म्हणजे राजकीय सामाजिकरण होय. राजकीय दृष्टिकोण, राजकीय मान्यता, राजकीय क्षेत्रात चांगले व वाईट म्हणण्याचे समाजमान्य मापदंड ज्या प्रक्रियेद्वारे एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित होतात त्या प्रक्रियेस राजकीय सामाजिकरण असे म्हटले जाते.

तरुण किंवा पौढ व्यक्तींनी राजकारणात कोणती भूमिका घ्यावी हे सतत सांगितले जाते. हे सांगताना मागील पिढीतील तरुणांनी कोणती भूमिका घेतली याचा आवर्जून उल्लेख केला जातो. प्रौढांची राजकीय भूमिका निश्चित करण्याचा प्रयत्न होत असतो. समाज स्वीकृत राजकीय मूल्ये तरुणांच्या मनावर बिंबवली जातात. तरुणांकडून विशिष्ट भूमिका पार पाडण्यासाठी त्यांची मानसिकता ज्या प्रक्रियेद्वारे तयार केली जाते त्यास राजकीय सामाजिकरण असे म्हटले जाते.

राजकीय सामाजिकरणाच्या व्याख्या (Definition of Political Socialization):

१) **डेव्हिड इस्टन :** "व्यक्तीस राजकीय प्रवृत्ती व वर्तनविषयक ज्ञान प्राप्त करुन देणारी प्रक्रिया म्हणजे राजकीय सामाजिकरण होय."

२) **कैनेथ लेंगटन :** "राजकीय संस्कृती एका पिढीकडून भावी दुसऱ्या पिढीत संक्रमित होत असते. या संक्रमण प्रक्रियेस राजकीय सामाजिकरण असे म्हणतात."

३) **हर्बट हिमेन :** "राजकीय सामाजिकरण हे संपूर्ण ज्ञान प्रक्रियाचे अंग आहे. ज्याद्वारे राजकीय व्यवस्था, राजकीय संस्था, कार्य याचे ज्ञान व्यक्तीस होते. या ज्ञानाच्या द्वारे तो राजकारणात भूमिका घेत असतो."

४) **आलमंड व पॉवेल :** "ज्या प्रक्रियेद्वारे राजकीय संस्कृतीची अंगभूत मूल्ये, श्रद्धा, संकेत, दृष्टिकोन भावी पिढ्यांना संक्रमित होतात त्यास राजकीय सामाजिकरण म्हणतात."

५) **लुसियन पाय :** "सातत्याने पण धीमेपणाने एखाद्या राजकीय व्यवस्थेची मूल्ये श्रद्धा, संकेत, दृष्टिकोन, विश्वास, ती राजकीय व्यवस्था जिवंत ठेवण्यासाठीची प्रक्रिया होय."

६) **सिगल :** "राजकीय व्यवस्थेला पूरक व्यक्ती पुरविणारी व तयार करणारी प्रक्रिया म्हणजे राजकीय सामाजिकरण होय."

१०.२ राजकीय सामाजिकरणाचे स्वरुप (NATURE OF POLITICAL SOCIALIZATION)

राजकीय सामाजिकरणाकडे दोन दृष्टिकोनातून पाहिले जाते. अ) राजकीय सामाजिकरणाचे विश्लेषण एक प्रक्रिया म्हणून केले जाते. ब) राजकीय सामाजिकरणाकडे प्रक्रियेचा परिणाम म्हणून अभ्यासले जाते. वास्तविक पाहता राजकीय सामाजिकरण राजकीय संस्कृतीचे आकलन करण्याची व एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित करण्याची प्रक्रिया आहे. तसेच राजकीय मान्यता हस्तांतरित करण्याची प्रक्रिया आहे.

राजकीय सामाजिकरणाची प्रक्रिया कशी होते हे ग्रीनस्टेन या अभ्यासकाने त्याच्या 'पॉलिटिकल सोसियलायझेशन' या लेखाद्वारे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामते राजकीय सामाजिकरणाच्या बाबतीत पाच प्रश्न आहेत. त्याच्या मते या प्रक्रियेच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण होतात.

१) या प्रक्रियेत कोण शिकतो ?
२) काय शिकतो ?
३) कुणाकडून शिकतो ?
४) कोणत्या परिस्थितीत शिकतो ?
५) या शिकण्याच्या काय प्रभाव पडतो ?

या प्रश्नांच्या सविस्तर उत्तरात राजकीय सामाजिकरणाच्या प्रक्रियेचे स्वरुप दडलेले आहे. राजकीय सामाजिरणाच्या बाबतीत काही सर्वमान्य गोष्टी आहेत.

१) राजकीय सामाजिकरण सर्वव्यापी प्रक्रिया आहे. याचा अर्थ समाज कोणताही असो, मागासलेल्या किंवा विकसित असो, एक पिढी दुसऱ्या पिढीत विचार, मूल्ये, श्रद्धा संक्रमित करीत असते.
२) राजकीय सामाजिकरण अव्याहत अखंडित चालणारी प्रक्रिया आहे. वडिलांच्या आज्ञापासून, सत्तेचा संबंध येतो तर वडील झाल्यानंतर आज्ञा देण्याचा अधिकार प्राप्त होतो.
३) राजकीय सामाजिकरणाद्वारे जनमत तयार केले जाते. समाजाचे आदर्श सांगून इतिहास सांगून, गौरवपर घटना सांगून काही बाबतीत काही प्रश्नांवर सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न या प्रक्रियेद्वाराच होत असतो.
४) राजकीय सामाजिकरण साधारणत: सहज अनौपचारिक पद्धतीने होत असते. पण क्रांतीद्वारे एखादी राजकीय व्यवस्था निर्माण झाली तर तिला पूरक राजकीय संस्कृती निर्माण करण्यासाठी राजकीय सामाजिकरण हेतत: औपचारिक पद्धतीने धाक दाखवून बळजबरीने,

शिक्षणातून मुद्दाम केले जाते. चीनमध्ये ग्रेट लिप, सांस्कृतिक क्रांती, शिक्षणातील अमूलाग्र बदल याद्वारे सामाजिकरण करण्याचा प्रयत्न झाला आहे. भारतात देखील धर्मनिरपेक्ष लोकशाहीची तत्वे व जीवनपद्धती रुजविण्यासाठी शिक्षणातून व अनेक माध्यमातून अनेक स्तरावर राजकीय सामाजिकरण औपचारिकता केले जाते.

राजकीय सामाजिकरणांच्या संदर्भात काही गोष्टी स्पष्ट आहेत.

१) राजकीय संस्कृतीला दुसऱ्या पिढीत संक्रमित करुन राजकीय व्यवस्थेला स्थिरता प्रदान करते.

२) राजकीय सामाजिकरणाद्वारे नवी राजकीय संस्कृती निर्माण केली जाते. उदा. १९१७ नंतर रशियात व १९४५ नंतर चीनमध्ये.

३) राजकीय सामाजिकरणाद्वारे एका पिढीने तिच्या काळात ज्या गोष्टी, मूल्ये, विचार स्वीकारलेले असतात ते ही संक्रमित होतात. पुढची पिढी मागच्या पिढीच्या गोष्टी, बदल स्वीकारते म्हणजे राजकीय सामाजिकरण परिवर्तन देखील करीत असते.१९५२ च्या निवडणुकीच्या वेळी भारतीय मतदारांची जी राजकीय मानसिकता होती ती १९६७ ला नव्हती. १९७७ ला त्यात बदल जाला. १९९८ ला मोठा बदल झाला.

४) राजकीय सामाजिकरण प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या होत असते. शाळा, महाविद्यालयातून दिले जाणारे राज्यशास्त्राचे शिक्षण हे प्रत्यक्ष आहे तर शैक्षणिक संस्थातून होणाऱ्या निवडणूकांद्वारे होणारे राजकीय सामाजिकरण अप्रत्यक्ष आहे.

५) राजकीय सामाजिकरणाची प्रक्रिया अनेक कारणांमुळे खंडित होते.

अ) उदा. क्रांती होऊन भिन्न प्रकारची क्रांतीकारी राजकीय व्यवस्था सत्तेवर आल्यास राजकीय सामाजिकरण खंडित होते. प्रामुख्याने स्वाभाविक, सहज समाजद्वारे होणाऱ्या राजकीय सामाजिकरणात खंड पडतो.

ब) मोठ्या प्रमाणात लोकांनी स्थलांतर केल्यास ग्रामीण भागातून शहरात व मोठ्या शहरात जेव्हा ग्रामीण लोकांचे स्थलांतर होते, तेव्हा त्याचे परंपरागत राजकीय विचार, दृष्टिकोन खंडीत होतात.

क) जलद संसुचन व दळणवळणामुळे नागरिकांना राजकीय घटनांची माहिती होते. त्यावरील प्रतिक्रिया माहित होतात. त्या प्रतिक्रियांना लोक जेव्हा स्वीकारतात तेव्हा परंपरागत राजकीय उदासिनता समाप्त होते. थोडक्यात राजकीय सामाजिकरणाची निरंतरता खंडीत होते.

१०.३ राजकीय सामाजिकरणाची साधने / माध्यमे (AGENCIES OF POLITICAL SOCIALIZATION)

व्यक्तीला मिळणारे राजकीय ज्ञान अनेक माध्यमातून मिळते. राजकीय घटना ज्या राजकीय माहिती देतात, त्या विविध दृष्टिकोनासहित व्यक्तींना मिळतात. सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था, समाजसेवी संस्था, राजकीय संस्था, संसूचन व दळणवळण याद्वारे राजकीय घटना विविध दृष्टिकोनासहीत व्यक्तीपर्यंत पोहचविल्या जातात. राजकीय दृष्टिकोन निर्माण करणाऱ्या या संस्थानाच राजकीय सामाजिकरणाची साधने असे म्हटले जाते.

१) कुटुंब (Family) :

बाल या अभ्यासकाच्या मते सत्तेचा संबंध बालकास प्रथम कुटुंबातच येतो. सत्ता संबंध व अधिकार याची जाणीव प्रथम प्रत्येक नागरिकास कुटुंबातच होते. राष्ट्राध्यक्षाला असलेल्या अधिकाराचे स्वरुप अस्पष्टपणे का होईना मुलास कुटुंबातच कळते.

रॉबर्ट लेन या अमेरिकन अभ्यासकाने या संदर्भात पाहणी करुन काढलेले निष्कर्ष महत्त्वाचे आहेत. त्याच्या मते कुटुंबाद्वारे तीन पद्धतीने मुलात राजकीय श्रद्धा व निष्ठा याचा पाया घातला जातो.

१) स्पष्ट किंवा अस्पष्ट, उघड किंवा गुप्तपणे राजकीय सिद्धांताचा चर्चेतून होते.
२) कुटुंबामध्ये मुलास एका विशिष्ट सामाजिक वातावरणात ठेवले जाते.
३) मुलाला विशिष्ट प्रकारचे वळण लावून या प्रकारे व्यक्तीचे राजकीय व्यक्तित्व तो प्रत्यक्ष राजकारणात सहभागी होण्यापूर्वीच कुटुंबाने निश्चित केलेले असते.

कुटुंबात वडील 'सत्ते'चे प्रतीक असतात. वडीलांबरोबर मुलांचे असणारे संबंध त्या मुलाचे प्रत्यक्ष राजकारणातील सत्ताधिशांबरोबर त्याचे असणारे वर्तनच, त्याचे तारुण्यातील राजकारणातील वर्तन निश्चित करणारे असते.

अमेरिकेत आर.इ. लेन या अभ्यासकाने जेव्हा बालकांच्या राजकीय दृष्टिकोनाची पाहणी केली तेव्हा त्याच्या असे लक्षात आले की, कोणत्याही पिढीतील जवळपास तीन चतुर्थांश मुलांला राजकीय दृष्टिकोन तोच असतो. जो त्यांच्या आई वडिलांचा असतो. दोन पिढीत सामाजिक, आर्थिक असं जरी असेल तरी राजकीय दृष्टिकोनात मात्र साम्य आढळते.

राजकीय सामाजिकरणात कुटुंबात वाटा मोठा आहे याला काही कारणे आहेत.

१) अनेक वर्षे कुटुंबाकडूनच मुलांच्या गरजांचा पूर्तता केली जाते. यामुळे मुलगा कुटुंबावर अवलंबून असतो. परिणामतः त्यांच्यावर कुटुंबाच्या राजकीय विचारांचा, दृष्टिकोनाचा परिणाम होत असतो.
२) मुलांमध्ये आई-वडिलांचे अनुकरण करण्याची स्वाभाविक प्रवृत्ती असते. मुलीसाठी आईचे विचार व मुलासाठी वडिलांचे विचार साधरणतः आदर्शच असतात.

मुलगा मोठा झाल्यानंतर माता-पित्याचा प्रभाव कमी होऊ लागतो. मात्र आई-वडिलांचा राजकीय दृष्टिकोन त्याच्या डोक्यातून कधीच समाप्त होत नाही. यात देखील निरक्षरत्व कमी शिकलेल्या मुलाच्या मनावर आई-वडिलांचा राजकीय विचार सदैव घर करुन असतो.

३) कुटुंबातील व्यक्ती एकाच आर्थिक व सामाजिक वातावरणात वाढत असतात. त्यामुळे त्यांचे सर्वसाधारण राजकीय विचार सारखेच असतील तर मुलांचे विचार तशाच प्रकारचे होणे स्वाभाविकच आहे.
४) परंपराप्रिय रुढीवादी समाजात कुटुंबाचे राजकीय सामाजिकरणातील योगदान सर्वांत जास्त असते. ज्या समाजात कुटुंबाची पकड अधिक असते तेथे राजकीय परिवर्तन कठीण असते. हा जवळपास आता नियमच आहे. हा कुटुंबाचा परिणाम भारतात पाहावयास मिळतो.

आई-वडिलांच्या राजकीय मताविषयी मुलगा सुरुवातीला सहमती दर्शवितो. पण क्रमाने त्यात बदल करताना दिसतो. मात्र मुलगी आई-वडिलांच्या राजकीय मताबाबत फारसा विरोध करताना किंवा त्यात बदल करताना दिसत नाही. अभ्यासकांच्या या मतात मोठी सत्यता आहे. राजकीय स्त्रियांचे क्षेत्र नाही. या राजकीय उदासिनतेमुळे भारतात सहा ते सात टक्यापेक्षा अधिक महिला संसदेत गेल्या नाहीत. याचा अर्थ कुटुंबाकडून मुला-मुलीच्या बाबतीत राजकीय सामाजिकरण सारखेच होत नाही.

कुटुंबाद्वारे होणारे राजकीय सामाजिकरण प्रभावी असते. हा प्रभाव कमी करण्यासाठीच १९१७ नंतर रशियात व १९४९ नंतर चीनमध्ये कम्युनिझमची स्थापना करण्यात आली. रशिया व चीनमध्ये कुटुंबाद्वारे पारंपारिक राजकीय मुल्ये दुसऱ्या पिढीत संक्रमित होऊ नयेत हा त्यामागचा उद्देश होता.

भारत, पाकिस्तान या देशात कुटुंबातून लोकशाहीची नव्हे तर हुकूमशाहीचीच झिरपण होताना दिसते. म्हणूनच या देशात काही दिवस हुकुमशाही पाहिजे असा विचार मांडला जातो. तेव्हा समाजातून त्यास जितका प्रखरपणे विरोध व्हावयास पाहिजे तितका होताना दिसत नाही. जर्मनीतच हिटलर निर्माण होऊ शकतो. इटालिसच मुसोलिनी सत्तेवर येऊ शकतो. कारण तेथे त्या प्रवृत्तीचे आकर्षण कुटुंबाकडूनच होते. मात्र अत्यंत महत्त्वाकांक्षी व्यक्ती हुकुमशाही प्रवृत्तीची असते. म्हणूनच दुसऱ्या महायुद्धानंतर चर्चिलचा पराभव इंग्लडमध्ये होतो. तर लोकशाही असताना राजा राणीला विरोध इंग्लडमध्ये होताना दिसत नाही. कारण कुटुंबाद्वारेच राजा, राजपद, संस्थांच्या आवश्यकतेचे प्रतिपादन केले जाते.

भारतात आज कुटुंबातील राजकीय उदासीनता पूर्वीपेक्षा कमी झालेली आहे. पिढीजात एका पक्षात असणारी अनेक कुटुंबे भारतात पाहावयास मिळतात. वडिलांचे वैचारिक ओझे मुलगा वाहताना मोठ्या प्रमाणात भारतात पाहावयास मिळते.

२) समवयस्क गट (Peer Group) :

कुटुंबानंतर राजकीय सामाजिकरणाच्या प्रक्रियेत मोठा वाटा समवयस्क गट किंवा मित्रमंडळीचा आहे. प्रत्येक मुलगा, मुलगी एका समवयस्क गटाचा किंवा मित्राच्या अनौपचारिक गटाचा स्वाभाविक सभासद असतो. या गटातील मुला-मुलीचे संबंध मोठ्या प्रमाणात प्राथमिक स्वरुपाचे व स्वाभाविक असतात.

साधारणतः मित्र परिवारात वयाचे अंतर फार नसते, त्यांच्यात समानता असते. त्यांच्यात स्वाभाविक विचारविनिमय होत असतो. मोकळी चर्चा व्यक्तीला प्रभावित करीत असते. किशोर अवस्थेत कुटुंबापेक्षाही शाळेतील मित्रपरिवाराच्या विचारांचा परिणाम प्रभावकारी असतो.

ज्या देशात कुटुंब व्यवस्थेचा पगडा अधिक आहे. मुक्त विचारांना व आचारांना कुटुंबाकडून विरोध केला जातो. तेथे समवयस्काकडून राजकीय सामाजिकरण कमी होते. मात्र जेथे कुटुंबाकडून विचारांची सक्ती केली जात नाही, तेथे समवयस्कांकडूनच मोठ्या प्रमाणात राजकीय सामाजिकरण होताना आढळते. जर्मनीत अशा प्रकारचे राजकीय सामाजिकरण कमी होते तर अमेरिकत सर्वात जास्त होते असे व्हबी या अभ्यासकाचे मत आहे.

माटीन लेवी या अभ्यासकाच्या मते, ज्या समाजात कुटुंबाचे मुलावरील नियंत्रण लवकर संपते, त्या समाजात समवयस्काकडून होणारे राजकीय सामाजिकरण प्रभावी असते. समवयस्काकडून ज्याचे राजकीय सामाजिकरण झालेले असते अशा व्यक्तीमध्ये बहुमताच्या निर्णयास मान्यता देण्याची प्रवृत्ती दिसून येते.

भारतात यामुळेच काही संघटना हेतूतः लहान मुला-मुलीचे गट निर्माण करताना दिसतात. याद्वारे त्यांना एका विशिष्ट राजकीय विचारांचे सामाजिकरण समवयस्क गटाकडून करावयाचे असते.

३) शिक्षण संस्था (Educational Institutions) :

कुटुंब व मित्र-मंडळानंतर व्यक्ती शिक्षण संस्थांच्या संपर्कात येते. त्याच्यावर शाळा, महाविद्यालय व विद्यापीठ यांचा प्रभाव पडतो. शैक्षणिक संस्थांतून होणारे राजकीय सामाजिकरण सर्वात प्रभावी असते.

भारतात देखील काही विद्यापीठे निश्चित राजकीय विचारांचे सामाजिकरण करतात हे सर्वांनाच ज्ञात आहे. विद्यापीठ व महाविद्यालये आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करीत असतात. शैक्षणिक संस्थांना आर्थिक सहाय्य करुन संस्कार अनुकूल राजकीय संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

साम्यवादी देशात शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून साम्यवादी विचारांना संक्रमित करण्याचा प्रयत्न केला जातो. इतकेच नव्हे तर अभ्यासक्रम, विचार असेच शिकविले जातात ज्याद्वारे राजकीय व्यवस्थेला समाज अधिमान्यता प्राप्त होईल.

शाळेतील पुस्तके तर सरळ राजकीय सामाजिकरण करत असतात. या पुस्तकात इतिहास राष्ट्रीय साहित्य, प्रथा, संकेत, राष्ट्रीय नेत्यांची माहिती दिली जाते. त्याबद्दल आदराची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. शाळेत शिस्तीला प्राधान्य दिले जाते. महाविद्यालयात व विश्वविद्यालयात निवडणुका होतात. विद्यार्थी प्रतिनिधींना अधिकार दिले जातात. प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली जाते. नेतृत्व निर्मितीची ही रंगीत तालीमच असते.

शाळा, महाविद्यालयात वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेतील विषय बहुतेक आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांच्या संदर्भात असतात. त्याद्वारे विद्यार्थ्यांना सरकारवर टीका करण्याची किंवा समर्थन करण्याची संधी मिळते. एका राजकीय विचारांशी विद्यार्थी स्वतःला बांधून घेतो.

राजकीय पक्ष महाविद्यालयातून व विद्यापीठातूनच राजकीय भरती करीत असतात. विद्यार्थ्यांच्या संघटना कोणत्यातरी राजकीय पक्षासाठी काम करतात. राजकीय पक्ष त्यांना आर्थिक सहकार्य करीत असतात. आता सर्वच महाविद्यालये व विद्यापीठे राजकीय सामाजिकरणाची महत्त्वपूर्ण साधने झालेली आहेत.

जयप्रकाश नारायण यांनी विद्यार्थ्यांपासूनच आंदोलनाची सुरुवात केली होती. सर्वच देशात विद्यार्थी वर्गास मोठी राजकीय शक्ती मानली जाते. चीनमधील तीनामेन चौकातील विद्यार्थ्यांची निदर्शने त्याचे उत्तम उदाहरण आहे.

भारतात सर्व शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे यातून जवळपास सारखाच अभ्यासक्रम शिकवला जातो. पण प्रत्येक शैक्षणिक संस्थेतून बाहेर पडणारा विद्यार्थी निश्चित राजकीय विचारसरणीचा असतो. कारण त्या शैक्षणिक संस्थांच्या परिसरातून एका निश्चित विचारांची झिरपण केली जात असते. निश्चित विचारनिर्मितीसाठी काही शैक्षणिक संस्थांची निर्मिती केली जाते.

भारतात आज मोठ्या प्रमाणात जात निहाय, धर्म निहाय शाळा, महाविद्यालये झालेली आहेत. त्या महाविद्यालयातून एका निश्चित राजकीय विचारांचे संक्रमण होत असते. शाळा, महाविद्यालयपरत्वे नेत्यांची व राजकीय पक्षाची पसंती बदलते असे सकृतदर्शनी दिसते. याचे कारण अभ्यास शिकवताना, समजून सांगताना शिक्षक, प्राध्यापकांनी घेतलेली भूमिकाच कारणीभूत असते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात अलिगढ विद्यापीठाची भूमिका, स्वदेशी शाळाची भूमिका व त्यांनी केलेले राजकीय सामाजिकरण दाखवते की, शिक्षणसंस्था राजकीय सामाजिकरण अतिशय प्रभावी साधन आहे.

शाळेत सकाळी होणारी प्रार्थना प्रतिज्ञा अनेक नेत्यांची जयंती व पूण्यतिथी निमित्ताने आयोजित भाषणे याद्वारे निश्चित राजकीय दृष्टिकोन निर्मितीस चालना मिळते. मतदानाचे वय २१ वरुन १८ झाल्यापासून राजकीय पक्षांना शिक्षणसंस्था अतिशय महत्त्वाच्या वाटू लागलेल्या आहेत. मोठ्या प्रमाणात दृष्टिकोन निर्मितीसाठी व राजकीय भरतीसाठी त्याचा वापर करीत आहेत.

४) राजकीय पक्ष (Political Parties) :

कोणत्याही देशातील राजकीय पक्षाचा उद्देश सत्ता संपादन करणे हा असतो. त्यासाठी राजकीय पक्ष सातत्याने निश्चित राजकीय विचार मांडत असतात. राजकीय सामाजिकरण करणे हाच राजकीय पक्षांचा सतत कार्यक्रम असतो. सत्ता संपादनासाठी.

अनेक गुंतागुंतीचे प्रश्न राजकीय पक्षामुळेच लोकांना माहित होतात. हे प्रश्न सांगताना राजकीय पक्ष त्या प्रश्नांच्या संदर्भात त्यांची भूमिकाही सांगतात. त्यांचीच भूमिका कशी योग्य आहे हे सांगून ते राजकीय सामाजिकरण करीत असतात.

ज्या देशात सर्वकष राजकीय व्यवस्था आहे त्या देशात बहुतेच एकच पक्ष असतो. तो राजकीय पक्ष सर्व पातळीवर राजकीय सामाजिकरण करीत असतो. जर्मनीत नाझी पक्षाने इटलीत फॅसिस्ट पक्षाने, १९९१ पर्यंत रशियात साम्यवादी पक्षाने, आज चीनमध्ये साम्यवादी पक्ष त्यांच्या विचारांचे सामाजिकरण करीत असतो.

सर्वच देशात पक्षांच्या तरुणांसाठी खास संघटना असतात. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, युवक काँग्रेस, ऑल इंडिया स्टूडंटस फेडरेशन, मागासवर्गीय विद्यार्थी संघटना, छात्रभारती इ. कोणत्यातरी पक्षाशी, विचारसरणीचा प्रभाव नवीन पिढ्यांवर टाकत असतात.

समाजातील प्रत्येक क्षेत्रात राजकीय पक्षांनी आपले गट (सेल) निर्माण केलेले आहेत. प्रत्येक जातीत प्रत्येक पक्षाचा गट कार्यरत आहेत. त्याद्वारे राजकीय पक्ष त्यांच्या विचारांचे सामाजिकरण करीत असतात.

लोकशाही जीवन पद्धतीत राजकीय पक्ष अनिवार्य आहेत. राजकीय संस्कृतीचे ते अविभाज्य भाग असतात. त्यामुळे त्यांचे राजकीय सामाजिकरण प्रक्रियेत सर्वात जास्त महत्त्व आहे.

नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रात लोकशाही राजकीय पद्धतीच्या मूल्यांचे सामाजिकरण राजकीय पक्षातच करावे लागते. भारतात राजकीय संस्कृतीचा वारसा नसताना लोकशाही राजकीय पद्धती आजही टिकून आहे. याचे श्रेय राजकीय पक्षांनाच मोठ्या प्रमाणात द्यावे लागते. हेच कार्य पाकिस्तानात राजकीय पक्षाने केले नाही. त्यामुळे तेथे अनेक वेळेस लोकशाही समाप्त झाली होती.

१०.४ प्रचार माध्यमे, जनसंपर्काची साधने (MASS COMMUNICATION MEDIA)

राजकीय सामाजिकरणात आज अधिक व्यापक, परिणामकारक, भूमिका जनसंपर्काच्या साधनाची आहे. यात रेडिओ, दुरदर्शन, वृत्तपत्रे, साप्ताहिक मासिके, यांचा प्रामुख्याने समावेश होतो. जनसंपर्काच्या साधनांना राजकीय सामाजिकरणाचे माध्यम म्हणता येणार नाही. असे मत अभ्यासकांच्या एका गटाचे आहे. त्यांच्या मते, कुटुंब, शिक्षणसंस्थाप्रमाणे जनसंपर्काची साधने सामाजिकरण करीत नाहीत. त्यांच्याद्वारे इतर सामाजिकरण करीत असतात. जनसंपर्काची साधने राजकीय सामाजिकरणाचे माध्यम नाही तर यंत्र आहे असे त्यांना वाटते.

ज्या देशात शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे, त्या देशात या साधनांचा परिणाम राजकीय सामाजिकरणात अधिक प्रभावी असतो.

सर्वकष राजकीय व्यवस्थेत जनसंपर्काच्या साधनावर सरकारचे नियंत्रण असते. तेथे सत्ताधारी पक्षाच्या विचारानाच फक्त महत्त्व दिले जाते. एकच विचारसरणी सर्व प्रश्न सोडण्यास समर्थ आहे. असा प्रचार वारंवार केला जातो. प्रभावीपणे एकाच विचारांचे राजकीय सामाजिकरण ही माध्यमे करीत असतात.

लोकशाही राजकीय व्यवस्थेत प्रचार माध्यमे मुक्त असतात. सर्वच विचारसरणीच्या राजकीय पक्षांना त्यांचे विचार मांडता येतात. त्यामुळे लोकांसमोर प्रश्नांच्या सर्व बाजू येतात. त्यातून व्यक्ती एकाची निवड करते. थोडक्यात विचार निवडण्याचे स्वातंत्र व्यक्तीस असते.

यामुळे लोकशाहीसाठी पूरक वातावरण जनसंपर्काच्या साधनांद्वारे निर्माण केले जाते. येथे लोकशाहीवृत्तीचे सामाजिकरण जनसंपर्काच्या साधनाकडून केले जाते.

जनसंपर्काची साधने विचारांच्या, मूल्यांच्या संदर्भात उदासीन असतात. त्यांना स्वत:चा म्हणून विचार नसतो. ते स्थितीशील नसतात किंवा गतीशील नसतात. सामाजिक किंवा राजकीय संदर्भात त्यांची स्थितीशीलता किंवा गतीशीलता त्यांचा वपार कोण करतो. यावर अवलंबून असते. सर्वकर्ष राजकीय व्यवस्थेत स्थितीशीलतेसाठी त्यांचा वापर केला जातो. भारतात समाजाची मानिसकता जी रुढीवादी सरंजामशाहीला चांगले म्हणणारी आहे. ती बदलण्यासाठी व लोकशाहीला पूरक मानसिकता करण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो.

दूरदर्शनवर होणाऱ्या राजकीय चर्चा, मतदानाच्या बाबतीत होणाऱ्या चर्चा, राजकीय स्थिरता व अस्थिरतेवर होणाऱ्या चर्चा नागरिकांच्या मतांचे निश्चितीकरण करत असतात. आज दुरदर्शन व वृत्तपत्रे सर्वात प्रभावी राजकीय सामाजिकरण करतात असे म्हटल्यास फारसे अयोग्य होणार नाही.

प्रतिके : राजकीय सामाजिकरणात यांची भूमिका महत्त्वाची आहे. प्रत्येक प्रतीक इतिहासातील महत्त्वाच्या घटनांचे अपत्य असते. त्या घटनांचा अर्थ त्या प्रतिकातून व्यक्त होत असतो. प्रतीकाद्वारे मूल्यांचे, घटनांचे, प्रसंगांचे, परंपराचे स्मरण होत असते. उदा. राष्ट्रीय ध्वज, विविध राजकीय पक्षाची चिन्हे, विशिष्ट रंग, या सर्व प्रतीकांतून काही राजकीय संदेश दिला जात असतो.

प्रतिकांचे महत्त्व राजकीय सामाजिकरणाच्या संदर्भात जगभर आहे. युरोपातील 'मे' दिवस, इंग्लंडमधील राज्याभिषेक सोहळा, अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षाचा शपथविधी यातून ऐतिहासिक सातत्य व राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडत असते.

राजकीय पक्षाची चिन्हे निश्चित विचारांना समाजासमोर ठेवतात. चिन्हांचाच उल्लेख निवडणूक प्रचारात होत असतो. प्रतिके राजकीय सामाजिकरण करण्याचा सोपा मार्ग आहे. खादी नुसता कपडा नाही तर विचार आहे असे म्हटले जाते. तेव्हा महात्मा गांधीच्या विचारांचे सामाजिकरण त्याच्या वापरातू केले जात असते.

१०.५ सरकार

शासनसंस्था राजकीय सामाजिकरणाचे प्रमुख साधन आहे. अर्थात शासनसंस्थेद्वारे होणारे सामाजिकरण शासनसंस्थेच्या स्वरुपावर अवलंबून असते. साम्यवादी किंवा सर्वकषवादी शासन व्यवस्थेत शासनसंस्था प्रत्यक्ष राजकीय सामाजिकरण करीत असते.

सर्वकष राजकीय व्यवस्थेत तिच्या पूर्वीची राजकीय संस्कृती पुसून टाकण्याचे काम करावे लागते. रशियात १९१७ पूर्वीची मानसिकता संपवण्यासाठी सरकारने सर्व माध्यमांचा वापर केला. चीन मध्ये देखील उंच उडी, सतत क्रांती, सांस्कृतिक क्रांतीद्वारे चीनी लोकांमधील राजकीय अनास्था घालविली. चीन व्यक्तीला साम्यवादी विचारसरणीचे पाईक केले. परंपरागत

राजकीय विचार कुटुंबामार्फत संक्रमित होतील म्हणून कुटुंबाची मुलावरची पकड ढीली करण्याचा प्रयत्न केला. इतर देशातील विचारांचा प्रभाव चीन नागरिकांवर होऊ नये म्हणून इतर देशातील व्यक्तीसाठी 'लोखंडी पडदी' घातली. यापेक्षा प्रभावी राजकीय सामाजिकरण हिटलरने जर्मनीत व मुसोलीनी यांने इटालीत केले.

अरब राष्ट्रातील नागरिक लोकशाहीचा आग्रह धरीत नाहीत, कारण लोकशाही पद्धतीच्या दोषावरच पाढा तेथे सरकार वाचत असते.

लोकशाही पद्धतीची शासनव्यवस्था जेथे असते तेथेही शासनसंस्था सामाजिकरण करीत असते. उदा. नागरिकांना सरकारच्या धोरणावर टीका करण्याचा अधिकार घटनेने दिलेला असतो. सरकार देखील टीका करणाऱ्याच्या हक्कास मान्यता देते. यातून परमत सहिष्णुता विचार स्वातंत्र्य या लोकशाहीसाठी आवश्यक अशा विचारांचे राजकीय सामाजिकरण होत असते. संसदेत होणारी चर्चा, चर्चेने प्रश्न सोडविण्याच्या मार्गाने सामाजिकरण करीत असते.

राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना यामार्फत राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारकडून लोकशाहीत केला जातो.

१०.६ अनुभव

अनुभवामुळे राजकीय सामाजिकरण होत असते. १९७५ ते १९७७ च्या अनुभवाने भारतीय जनतेत लोकशाही मुल्याबाबत, लोकशाही जीवन पद्धतीबाबत निश्चितच आदर वाढलेला आहे. संप, निर्दशने, हिंसाचार केल्याशिवाय शासन मागण्यांचा विचारच करीत नाही. या अनुभवामुळे भारतात सुरुवातीलाच या मार्गाचा वापर केला जातो.

अन्य संघटना :

कामगार संघटना, विद्यार्थी संघटना, महिला संघटना सर्वांचे नव्हे तर समाजातील एका घटकांचे राजकीय सामाजिकरण निश्चित करीत असतात. कामगारांच्या आर्थिक लढ्यांचा उद्देश राजकीय असतो. किंवा राजकीय उद्दिष्टांसाठी आर्थिक लढा घ्यावयाचा असतो. जेव्हा डावे पक्ष म्हणतात तेव्हा त्यांना कामगार संघटनामार्फत निश्चित विचारांचे राजकीय सामाजिकरण कामगार संघटनामार्फ करावयाचे असते.

महिलांचे राजकरणातील वाढत्या संख्येचे श्रेय किमान काही राज्यात, प्रामुख्याने केरळात महिला संघटनाना द्यावे लागेल. राजकारणात सक्रिय सहभागी झाल्याशिवाय घटलेले दिलेल्या समतेच्या अधिकाराला व्यवहार्य अर्थ प्राप्त होणार नाही. असे सांगून राजकीय जागृतीच्या गरजेचे प्रतिपादन महिला संघटना करतात. एका राजकीय विचारांचे सामाजिकरण तेथे केले जाते.

विद्यार्थ्यांच्या अनेक संघटना आहेत. प्रत्येक संघटना एका स्वतंत्र राजकीय विचार संक्रमित करीत असते. वादविवाद, स्पर्धा, खेळ व इतर उपक्रमांद्वारे त्या संघटना राजकीय सामाजिकरण करीत असतात.

भारतात आता सर्वच जातीच्या संघटना झालेल्या आहेत. या संघटना कोणत्यातरी राजकीय पक्षाशी संलग्न असतात. त्याचा परिणाम भारतात आज जातीनिहाय पक्ष झालेले आहेत. धर्मनिहाय पक्ष आहेत. प्रत्येक पक्षाला विशिष्ट जातीचा, धर्माचा वास असतो. जातीय संघटना त्यांच्या मेळाव्यातून एका विशिष्ट राजकीय विचारसरणीचे राजकीय सामाजिकरण करीत असते.

मुस्लिम राष्ट्रात धार्मिक संघटना प्रभावीपणे सामाजिकरण करतात. श्वेत, अश्वेत लोकांच्या युरोपीय देशातील संघटना, एशियन लोकांच्या अमेरिका व युरोपीय देशातील संघटना राजकीय सामाजिकरण करण्यासाठी दहशतवादी मार्ग स्वीकारतात.

या रीतीने राजकीय सामाजिकरणाची प्रक्रिया विविध माध्यमांतून पार पडत असते. काही माध्यमे प्रत्यक्ष तर काही अप्रत्यक्ष राजकीय सामाजिकरण करीत असतात.

१०.७ राजकीय सामाजिकरणाचे महत्त्व (SIGNIFICANCE OF POLITICAL SOCIALIZATION)

व्यक्तीला राजकीय संस्कृतीशी एकरुप व्हावे लागते. त्यासाठी काही विचारांचा, आचारांचा स्वीकार करावा लागतो. तर काही आचार, विचार सोडावे लागतात. लहान मुलगा राजकीय विचारांच्या बाबतीत शून्य असतो. तो राजकीय प्राणी नसतोच त्यास राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रथम राजकीय प्राणी करणे आवश्यक आहे. हे कार्य सामाजिकरणाद्वारे होत असते.

राजकीय व्यवस्थेनेच 'जंगल कायदा' समाप्त केला. तो पुन्हा येऊ नये म्हणून राजकीय व्यवस्थेला पूरक राजकीय संस्कृतीची निर्मिती झाली. ही राजकीय संस्कृती कायम राहिली तरच राजकीय व्यवस्था स्थिर राहते. त्यासाठी नंतरच्या पिढ्यात राजकीय व्यवस्थेला पूरक अशी राजकीय संस्कृतीची झिरपण केली जाते. थोडक्यात राजकीय संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी राजकीय सामाजिकरणाचे खास महत्त्व आहे.

अधिमान्यतेसाठी :

राजकीय व्यवस्थेजवळ सत्ता असते पण त्या सत्तेला अधिमान्यता प्राप्त व्हावी यासाठी ती सतत प्रयत्नशील असते. कारण राजकीय व्यवस्थेला जर अधिमान्यता मिळाली तर कमीत-कमी शक्तीद्वारे तिला कायदा व सुव्यवस्था ठेवता येते. या अधिमान्यतेसाठी राजकीय सामाजिकरणाची गरज असते.

राजकीय सामाजिकरण कायद्याच्या पालनाचे महत्त्व सांगते. त्यामुळे कायदापालन होत असते. कायदाबाह्य कृतीच्या परिणामांची जाणीव सामाजिकरणाद्वारे होते. थोडक्यात नियमांचे

पालन करणारा नागरिक वर्षानुवर्ष निर्माण होतो याचे श्रेय राजकीय सामाजिकरणाला द्यावे लागेल.

इंग्लंडमध्ये तर राज्यघटनाचा अलिखित आहे. सर्व नियम संकेतावर आधारित आहेत. राजाने नामधारी असावे, पंतप्रधानांनी प्रथांचे पालन करावे, इंग्लंडची व्यवस्था मोठ्या प्रमाणात राजकीय संकेतावर अवलंबून आहे. या राजकीय संकेतांच्या सामाजिकरणामुळेच आजपर्यंत इंग्लंडला लिखित राज्यघटना निर्माण करण्याची गरज भासली नाही.

राजकारणात यशस्वी व्हावयाचे असेल तर भूमिका यशस्वीपणे वाढवता आली पाहिजे. यशस्वी भूमिका कशी वाढवावी याचे ज्ञान राजकीय सामाजिकरणाद्वारे मिळते. यशस्वी नेत्याच्या वर्तनाची माहिती त्यास ती पुरवते.

राजकारण कला आहे. ही कला सामाजिकरणाद्वारे माहित होते. मोठ्या राजकीय नेत्याबद्दल सतत सांगितले जाते. त्यांच्या यशाचे गमक सांगितले जाते. हे राजकीय यशस्वी वाटचाल करण्यासाठी निश्चितच मोलाचे असते.

दुवा :

राजकीय सामाजिकरण राजकीय व सामाजिक व्यवस्थेतील दुवा आहे. या दुव्यामुळेच राजकीय व्यवस्थेचे सातत्य कायम राहते.

काही देशातून राजेशाही समाप्त झाली. काही देशात त्याऐवजी लोकशाही पद्धती आली. तर काही देशात हुकूमशाही आली. काही देशात सतत हुकूमशाहीचा धोका असतो. काही देशात लोकशाहीला अजिबात धोका नसतो. लोकशाहीचा फारसा वारसा नसताना भारतात लोकशाही स्थिरवली तर भारताबरोबरच पाकिस्तानमध्ये लोकशाहीची स्थापना झाली पण ती तेथे अनेकदा खंडीत झाली. या सर्व गोष्टीचा उलगडा केवळ राजकीय सामाजिकरणाचा अभ्यास केल्यासच होऊ शकतो.

व्यक्तीच्या राजकीय वर्तनाला योग्य दिशा लावण्याच्या प्रयत्न राजकीय व्यवस्था सामाजिकरणाद्वारेच करीत असते. कायदापालनाचे महत्त्व सतत सांगून चांगला नागरिक निर्माण करण्याचे प्रयत्न राजकीय सामाजिकरणाद्वारे केले जाते. एका अर्थाने राजकीय नियंत्रणाचा उद्देशच राजकीय सामाजिकरणामुळे साह्य होत असतो.

'मतास मूल्य आहे किंमत नाही ते विकू नको' अशी सूचना निर्वाचन आयोग निवडणुकींच्या काळात देत असते. याद्वारे मतांच्या संदर्भात विशिष्ट विचारांचे सामाजिकरण केले जाते. हे राजकीय सामाजिकरण लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक सामाजिक मानसिकता निर्माण करते.

भारतात 'धर्मनिरपेक्षतेचा' विचार सतत झिरपण्याचा प्रयत्न होत असतो. कारण या विचारांच्या सामाजिकरणातच या देशाचे अखंडत्वाची ग्वाही आहे. याचा अर्थ देशाच्या एकात्मतेसाठी, अखंडत्वासाठी राजकीय सामाजिकरणाचे खास महत्त्व आहे.

राजकीय व्यवस्थेला पूरक संकल्पकांचे, विचारांचे राजकीय सामाजिकरण झाले नाही तर राजकीय व्यवस्थेला सुसंगत राजकीय संस्कृती राहत नाही. परिणामत: राजकीय व्यवस्था व राजकीय संस्कृतीनी यात संघर्ष निर्माण होतो. राजकीय व्यवस्था जनाधार गमावते व समाप्त होते.

राजकीय सामाजिकरणाद्वारेच अनावश्यक विचारांची समाप्ती केली जाते. तेथे पोकळी राहू नये म्हणून नवीन विचारांचे रोपण केले जाते. आवश्यक ते राजकीय परिवर्तन केले जाते. इथे परिवर्तन करुन राजकीय व्यवस्थेचे सातत्य राजकीय सामाजिकरणाद्वारे टिकविले जाते.

सहभागासाठी :

लोकशाहीत जनतेच्या राजकीय सहभागास महत्त्व दिले जाते. जितका जास्त सहभाग तितकी अधिमान्यता अधिक असते. हा सहभाग विवेकी असावा लोकांचा अशाप्रकारे सहभाग वाढविण्याचे कार्य राजकीय सामाजिकरणामुळेच होते.

राजकीय जाणीव :

राजकीय व्यवस्था समजण्यासाठी राजकीय प्रक्रिया, राजकीय संस्था, राजकारण समजणे आवश्यक आहे. नागरिकात राजकीय जाणिवेचा विकास केवळ राजकीय सामाजिकरणाद्वारेच होत असतो. अनेक अभ्यासकांनी केलेल्या पाहणीद्वारे हे सप्रमाणे सिद्ध झालेले आहे.

१०.८ सारांश (SUMMARY)

राजकीय सामाजिकरणाचे महत्त्व यात आहे की त्यामुळेच राजकीय संस्कृती पुढच्या पिढीत संक्रमित होते. राजकीय व्यवस्थेला स्थिरता प्राप्त होते. राजकीय व्यवस्थेला अधिमान्यता मिळते. नागरिकांना राजकारणात सहभागी करुन त्यांना तेथे योग्य भूमिका पार पाडण्यासाठी आवश्यक ती माहिती राजकीय सामाजिकरणाद्वारेच दिली जाते. काही देशांना राजकीय परिवर्तनाची गरज असते. राजकीय संस्कृती वा बदल करण्याची गरज असते. हे परिवर्तनाचे कार्य देखील राजकीय सामाजिकरणाद्वारे होऊ शकते. सहभागी लोकशाही सर्वांत चांगली राजकीय व्यवस्था मानली जाते. तिची निर्मिती देखील राजकीय सामाजिकरणाद्वारेच शक्य आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे राजकीय प्रक्रिया समजण्यासाठी राजकीय सामाजिकरणाच्या अध्ययनाला खास महत्त्व आहे.

आपली प्रगती तपासा :

१) राजकीय सामाजिकरणाचा अर्थ व व्याख्या सांगा.
२) राजकीय सामाजिकरणाचे स्वरुप सांगा.
३) राजकीय सामाजिकरणाची माध्यमे कोणती ते लिहा.
४) राजकीय सामाजिकरणाचे महत्त्व विशद करा.

१०.९ अभ्यासाचे प्रश्न (QUESTIONS)

१. राजकीय सामाजिकरणाचा अर्थ व व्याख्या सांगून स्वरुप स्पष्ट करा.
२. राजकीय सामाजिकरण म्हणजे काय ? राजकीय सामाजिकरणाची माध्यमे / साधने कोणती ते सांगा.
३. राजकीय सामाजिकरणाची व्याख्या सांगून राजकीय सामाजिकरणाचे महत्त्व स्पष्ट करा.
४. प्रचार माध्यमे, जनसंपर्काची साधने यांची राजकीय सामाजिकरणातील भूमिका स्पष्ट करा.

१०.१० संदर्भ सूची (REFERENCES BOOK)

१. बी. वाय. कुलकर्णी, राजकीय समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

❖❖❖❖

११

गुन्हेगारी सिद्धांत

घटक रचना :

११.० उद्दिष्ट्ये
११.१ प्रस्तावना
११.२ गुन्हेगारी सिद्धांताचे विविध दृष्टिकोण
११.३ रॉबर्ट मर्टन यांचा सिद्धांत
११.४ गुन्ह्यांचे प्रकार
११.५ विद्यार्थ्यांमधील कुचेष्टाखोरी (रॅगिंग)
११.६ भारतातील गुन्हेगारीचे प्रमाण
११.७ सारांश
११.८ कठीण शब्द
११.८ अभ्यासाचे प्रश्न

११.० उद्दिष्ट्ये

१. गुन्हा म्हणजे काय, हे समजून घेण्यासाठी व गुन्ह्याचा अभ्यास करण्यासाठी
२. गुन्हेगारी सिद्धांताचा सैद्धांन्तिक पद्धतीने अभ्यास करण्यासाठी.
३. गुन्हेगारी सिद्धांताचे विविध दृष्टिकोण अभ्यासणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.
४. गुन्हा व गुन्ह्यांचे प्रकार अभ्यासणे.
५. गुन्हेगारी जगतातील आकडेवारी जाणून घेणे.

११.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

समाजात जेव्हापासून गुन्हे घडत आहेत, तेव्हापासूनच गुन्ह्याच्या कारणांचा शोध मानव सातत्याने घेत आलेला आहे. त्यामुळेच अपराधाच्या अथवा गुन्ह्यांच्या कारणांचा शोध एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे असे म्हणता येईल. मानवी स्वभाव व त्याचे व्यक्तीमत्त्व हे तर अत्यंत गुंतागुंतीचे आहेच पण त्याचबरोबर त्याच्या सभोवताली असणारी सामाजिक, आर्थिक परिस्थिती आणि पर्यावरण हे देखील तितकेच गुंतागुंतीचे आहे व ते अधिकाधिक गुंतागुंतीचे बनत चालले आहे. त्यामुळेच गुन्ह्याच्या कारणांचा शोध हा गुंतागुंतीचा व बहुआयामी विषय बनला आहे. गुन्ह्यांच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न समाजशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, अपराधशास्त्रज्ञ, मनोविकृतितज्ज्ञ यांनी केला आहे, व त्यातुनच गुन्ह्याची विभिन्न कारणे

कारणमीमांसा आपल्या समोर अभ्यासासाठी उपलब्ध झाली आहे. अपराधकृतीचे विभिन्न दृश्य व अदृश्य पैलू या अध्ययनातून पुढे आले आहेत. यातुनच अभ्यासकांना एक अनदृष्टी लाभु शकते हे नाकारता येत नाही.

गुन्ह्यांची व्याख्या, स्वरुप, गुन्हेगारी वर्तन हे काळ व स्थळ यावर अवलंबून असते. काळस्थळानुसार गुन्हेगारीविषयक दृष्टीकोणही बदलत जात असतो. हे स्पष्ट करताना अपराधशास्त्रज्ञ स्टीफेन चॅकेर यांनी सांगितलेला विचार महत्त्वाचा वाटतो. “Crimes and Criminals change in defition by time and place, what is a crime today, may not be a crime tomorrow”. काळ व स्थळानुसार गुन्हा व गुन्हेगार यांची व्याख्या बदलते. आज ज्यास आपण गुन्हा मानतो तो उद्या कदाचित गुन्हा मानला जाणारही नाही. उदा. ‘गर्भपात’ हा आवश्यकता असेल तर डॉक्टर करु शकतात.

११.२ गुन्हेगारी सिद्धांताचे विविध दृष्टिकोण

गुन्हेगारी वर्तनाची कारणमीमांसा करण्यासाठी अपराधशास्त्रज्ञांनी अनेक पैलूंनी गुन्हेगारी वर्तनाचा अभ्यास केला. ज्यातून काही सिद्धांत मांडले गेले. डॉ. राम आहुजा यांनी अशा प्रमुख दृष्टिकोणाची चर्चा या आपल्या ग्रंथात केली आहे. त्याचा आढावा घेणे योग्य ठरेल. अभिजात व नव अभिजात सिद्धांत (Classical and Neo-classical theories) जैविक वा शरीरचनात्मक सिद्धांत (Biological or constitutional theories) मनोविकृती आणि मानसशास्त्रीय सिद्धांत (Psychopathological and Psychological theories) आर्थिक सिद्धांत (Economic Theories) भौगोलिक किंवा स्थानविषीकृत सिद्धांत (Geographical or Topographical Theories) समाजशास्त्रीय सिद्धांत (Sociological theories) व बहुघटक सिद्धांत (Multiple Factor theory) अशा प्रमुख सैद्धांतिक प्रवाहांची मीमांसा डॉ. राम अहुजा यांनी त्यांच्या “Criminology” व विवेचनात्मक अपराधशास्त्र या ग्रंथात केला आहे. त्याबाबत त्यांनी अपराध सिद्धांताचे विविध दृष्टिकोन अभ्यासकांना समजुन घेण्यास उपयुक्त ठरेल. यातील काही सिद्धांताचा थोडक्यात आढावा पुढे घेतला आहे.

अभिजात सिद्धांत (Classical Theory) :

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात अभिजात सिद्धांताचा जन्म झाला, या सिद्धांताची मांडणी प्रथम इंग्लंड व इटली या दोन देशांमध्ये झाली. त्यानंतर युरोप व अमेरिकेत या सिद्धांताचा प्रसार झाला. या सिद्धांताची मांडणी करणाऱ्यामध्ये सिझर बेकारिया (१७३८-१७९४), जेरेमी बेथम (१७४८-१८३२) व सर सॅम्युअल रोमीली (१७५७-१८१८) यांचा समावेश होता.

अभिजात सिद्धांत हा मुखवादी किंवा विलासवादी तत्त्वावर आधारलेला आहे. माणूस हा सुखलोलूप आहे. तो सुखकारक कृती करण्याकडे प्रवृत्त होतो आणि ज्या दु:खकारक गोष्टी आहेत त्या तो करण्यास टाळतो, ही मानवाची सहजप्रवृत्ती आहे. यासच विलासवादी मानसशास्त्र (Hedonistic Psychology) असे म्हटले जाते. या सिद्धांतास सुख-दु:ख सिद्धांत असेही म्हणतात. एखादी कृती करण्यापूर्वी माणूस हा त्या कृतीपासून त्यास किती सुख लाभणार आहे व

किती दु:ख होणार आहे याचे गणित मांडतो. सुखाचा अधिक लाभ होणार असेल तर तशी कृती तो करतो असे तत्व मानले आहे. या सिद्धांताची प्रमुख तत्वे अशी -

१) व्यक्ती विवेकी आहे, त्याचा व्यवहार सुख-दु:ख सिद्धांतावर आधारित आहे.
२) प्रत्येक अपराध्यास शिक्षा दिली गेली पाहिजे. ज्यामुळे अपराध्यास जो आनंद मिळालेला असतो तो नष्ट झाला पाहिजे.
३) शिक्षा ही अतिकठोर असु नये तर ती गुन्ह्याच्या प्रमाणात असावी, झालेल्या हानीच्या प्रमाणात असावी.
४) कायदा सर्व नागरिकांना समान असावा.
५) कायद्यात स्पष्टता असावी, न्यायाधीशाने कायद्याचे विश्लेषण न करता फक्त न्याय देण्याचे कार्य करावे.

अभिजात सिद्धांताच्या पुरस्कर्त्याने जुनाट व रानटी पद्धतीने गुन्हा नियंत्रणाच्या तत्कालीन पद्धतीविरुद्ध विचार मांडला व नव्या प्रकारचा कायदा करण्याच्या तत्वाचे प्रतिपादन केले. गुन्हेगार हा माणुस आहे हे लक्षात घेऊन मानवतेच्या पातळीवर त्याला शिक्षा दिली गेली पाहिजे. शिक्षेचे उद्दिष्ट प्रतिबंध करणे हे असावे, प्रतिरोध अथवा सुड असू नये असे प्रतिपादन केले. अभिजात सिद्धांताच्या स्पष्टीकरणात असणाऱ्या काही त्रुटी मांडल्या गेलेल्या आहेत. त्याप्रमाणे जर व्यक्तिमध्ये विवेक आहे तर ती कायद्याचे उल्लंघन का करते? त्याचप्रमाणे सराईत गुन्हेगार हा सराईत आहे का आकस्मिक आहे हे लक्षात घेतले नाही. सर्वांचे सारख्याच पद्धतीने मुल्यमापन केले गेले. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव या सिद्धांतात आहे अशी टिका केली गेली.

नव-अभिजात अपराध सिद्धांत (Neo-classical Theory) :

"नव अभिजात अपराध सिद्धांत" अभिजात अपराध सिद्धांताचे सुधारित वा प्रगत स्वरुप असे म्हणता येईल. अभिजात सिद्धांताचे समान गुन्हा करणाऱ्या सर्व व्यक्तीना समान शिक्षा द्यावी व शिक्षा देताना लिंग, वय, शारीरिक, मानसिक क्षमता यात भेद करु नये असे विचार मांडले. नव अभिजात विचार प्रवाहाने सर्व गुन्हेगारांना शिक्षा याचे समर्थन केले. परंतु हे सर्वांना समान लागु करणे अयोग्य ठरेल, अन्यायकारक ठरेल, असा विचार मांडला. त्यांच्या मते मुले व मनोरुग्ण यांचा वेगळा व स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे. फ्रेंच क्रांती व त्यानंतरच्या कालखंडात विकसित झालेल्या नव-अभिजात सिद्धांताने, अभिजात सिद्धांताचे महत्त्व लक्षात घेतले पण त्यात सुधारणा सुचविल्या. त्यांच्या मते, मुले व रुग्ण हे सुख व दु:ख यांचे कृतिजन्य मोजमाप करु शकत नाहीत. त्यामुळे (Pleasure and Pains theory) 'सुख व दु:ख सिद्धांत' सुधारीत स्वरुपात मांडला जाणे गरजेचे झाले. आजचा बाल गुन्हेगारांचा केलेला स्वतंत्र विचार व कायदा, याचे मुळ हे नव-अभिजात सिद्धांतामध्ये आहे.

नव-अभिजात अपराध (गुन्हेगारी) सिद्धांतामध्ये ब्रिटिश अपराध शास्त्रज्ञांचे लक्षणीय योगदान आहे. त्यांनी १८१० ते १८१९ ह्या दरम्यान अभिजात सिद्धांताची समिक्षा केली. आणि नव-अभिजात सिद्धांताची जी तत्वे त्यांनी मांडली ती अशी सांगता येतील.

१) परिस्थिती आणि कायदा याचा साकल्याने विचार करुन विवेकाने न्याय दिला गेला पाहिजे.
२) समान गुन्ह्यास समान शिक्षा या तत्वास विरोध करुन सतरा वर्षाखालील मुले, मनोरुग्ण यांना शिक्षा दिली जाऊ नये.

३) गुन्हा घडण्यामागील कारणांचा शोध घेण्याच्या विचार मांडला.
४) अभिजात सिद्धांतामधील मानवाची स्वतंत्र इच्छा व तसेच सुख मिळेल तशीच कृती करण्याची प्रवृत्ती या विचारास मान्यता दिली.

थोडक्यात अभिजात व नव-अभिजात सिद्धांतामध्ये वैज्ञानिकता कमी असली तरीही अपराधशास्त्रातील पायाभुत विचार बैठक तयार केलेली दिसुन येते.

११.३ रॉबर्ट मर्टन यांचा सिद्धांत

डरखाईम यांनी मांडलेल्या "प्रमाणकशुन्यता" या अमूर्त संकल्पनेचा विस्तार रॉबर्ट मर्टन या अमेरिकन समाजशास्त्रज्ञानी केला. मर्टन यांनी सामाजिक वर्ग व सामाजिक संरचना यामुळे गुन्हेगारीत काय फरक पडतो याचा अभ्यास केला. वेगवेगळ्या समाजसंरचनेत गुन्हेगारीचे वेगवेगळे प्रमाण स्वरुप का असते, याचा शोध त्यांनी घेतला. रॉबर्ट मर्टन यांच्या मते, व्यक्तींच्या आशा, आकांक्षा, समाजातुनच निर्माण होतात. सामाजिक संरचनेवर व्यक्तीच्या अवास्तव अशा आशा, आकाक्षांच्या दडपणाचा ताण वाढल्याने 'प्रमाणकशुन्यता' निर्माण होते. व्यक्तीची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी कायदेशीर मार्गाची, सामान्य मार्गाची उपलब्धता जर कमी असेल तर उद्दिष्टे व कायदेशीर मार्ग किंवा समाजमान्य मार्ग यात असंतुलन अथवा दोषपुर्ण संबंध निर्माण होतात व व्यक्ती प्रमाणक नाकारुन वाममार्गाकडे वळते.

मर्टन यांनी म्हटले आहे एकीकडे समाज नागरिकांना योग्य व कायदेशीर मार्गानी संपत्ती जमा करण्याचे उद्दिष्ट देतो, परवानगी देतो आणि दुसरीकडे त्यांना मोठ्या प्रमाणात संस्थात्मक रीत्या संपत्ती निर्माण करण्याची कायदेशीर मार्गाची संधी दिली जात नाही. अशी संधी न मिळाल्याने साध्य आणि साधन यामधील विसंगती ही व्यक्तीच्या गुन्हेगारी वर्तनाचे प्रतीक ठरते. व्यक्ती त्याच्या क्षमतेनुसार, इच्छेनुसार मार्ग स्विकारते, प्रमाणके नाकारते व त्याच्यासमोर "प्रमाणकशुन्यता" निर्माण होते. समाजात उद्दिष्ट पुर्ततेसाठी कायदेशीर मार्ग, बहुसंख्य व्यक्तींना पुरेसे उपलब्ध करुन देणारी सामाजिक संरचनाच साध्य आणि साधन यांच्यामध्ये समतोल राखु शकते. जेव्हा हजारो बेरोजगार कायदेशीररित्या काम मागतात, उद्दिष्टांची पूर्तता करु इच्छितात तेव्हा त्यांना साधने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अत्यंत वैकल्यातून अन्याय व त्यातून प्रमाणकशुन्यता निर्माण होऊन व्यक्ती गुन्हेगार बनतात.

मर्टन यांच्या सिद्धांतानुसार काही आक्षेप घेण्यात आले. मर्टन यांनी समाज संरचनेच्या समतोलास अधिक महत्त्व दिले आहे. तुलनेने व्यक्तीच्या वैयक्तिक गरजांकडे दुर्लक्ष केले आहे.

तणावयुक्त संबंध नेहमीच विलनास जन्म देतात असे नाही. तसेच ज्या व्यक्तींना सामाजिक संरचनेत प्रगतीची चांगली संधी देऊनही त्या व्यक्ती गुन्हेगारी वर्तन का करतात याचे विश्लेषण मर्टन यांनी केलेले नाही.

विभेदित संधी सिद्धांत (Different opportunity theory) :

संधी सिद्धांतातील हा एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. हा सिद्धांत रिचर्ड फ्लोवर्ड व लॉईड ऑलीन यांनी १९६० साली प्रकाशित झालेल्या "Delinquency and opportunity" या

ग्रंथात मांडला आहे. गुन्हेगारी वर्तन करण्याकडे प्रवृत्त करणाऱ्या प्रेरणा किंवा दबाव यांचा विचार करण्याऐवजी, हा सिद्धांत व्यक्ती विशिष्ट गुन्हेगारी कृतीच का निवडते याचे विश्लेषण करतो. यातुन वेगवेगळे गुन्हेगार आपल्या आशा-आकांक्षा पुर्ण करण्यासाठी वेगवेगळ्या गुन्हेगारी कृत्याचे मार्ग का हाताळतात याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. रॉबर्ट मर्टनचा कार्यकारण विसंगतीतुन प्रमाणक प्रयत्न केला आहे. रॉबर्ट मर्टनचा कार्यकरण विसंगतीतुन प्रमाणक शुन्यतेचा सिद्धांत व सदरलँड यांचा विभेदित साहचर्य या सिद्धांताच्या संयुक्त प्रभावातून हा सिद्धांत मांडण्यात आला आहे.

या सिद्धांतानुसार प्रत्येक व्यक्ती ही दोन प्रकारच्या संधी संरचनेत राहत असते.

१) कायदेशीर संधी संरचना (Legitimate opportunity structure)

२) बेकायदेशीर संधी संरचना (Illegitimate opportunity structure)

कायदेशीर संधी संरचना मर्यादित असतात. जेव्हा व्यक्तीला उद्दिष्ट पुर्ततेसाठी यश प्राप्तीसाठी कायदेशीर संधीरचना मर्यादित मिळते किंवा मिळत नाही तेव्हा बेकायदेशीर मार्गाचा अवलंब त्या करु शकतात. परंतु असे बेकायदेशीर मार्ग वा वर्तन शिकण्यासाठी आवश्यक पर्यावरण वा परिस्थिती आवश्यक आहे. नुसता मार्ग ठरवून चालत नाही. बेकायदेशीर मार्गाने वाटचाल करण्याची मनोवृत्तीही शिकावी लागते.

अशारितीने 'विभेदित संधी सिद्धांत' हा आपले लक्ष रचनात्मक असमतोलाकडे वेधतो व त्याद्वारे कायदेशीर व बेकायदेशीर वर्तनाचा शोध घेतो.

वरील सर्व संधी सिद्धांत सामाजिक व संरचनात्मक पैलूंनी अपराधाचे विश्लेषण करताना दिसतात.

अतिनियंत्रणाचे सिद्धांत (Theories of overcontrol) :

प्रो. हॅगन यांनी विशद केलेला समाजशास्त्रीय सिद्धांताचा तिसरा गट म्हणजे अतिनियंत्रणाचा सिद्धात होय. या सिद्धांताचे तत्व असे की, व्यक्ती गुन्हेगारी वर्तन का करतात याचा शोध घेण्याऐवजी त्यांना गुन्हेगार म्हणून शिक्का मारण्यावर समाजात अधिक भर का दिला जातो ? गुन्हा नियंत्रणाच्या नावाखाली जे अतिनियंत्रण होते त्यातुनच गुन्हा कमी होण्याऐवजी वाढण्याचीच शक्यता असते. अशा प्रकारच्या स्थितीचा पुढील सिद्धांतामध्ये समावेश होतो.

लेबलींग सिद्धांत - नामाभिधान सिद्धांत (Labelling Theory) :

१९३८ साली फ्रक्लीन टेनेनबम (Franklin Tannenbaum) यांनी त्यांच्या "Crime and the community" या ग्रंथात हा सिद्धांत मांडला. एखाद्या वर्तनास 'गुन्हेगारी' वर्तन ठरविणाऱ्या प्रक्रियेवरच हा सिद्धांत बोट ठेवतो. एखाद्या व्यक्तीच्या वर्तनास 'गुन्हेगारी' असे नामाभिधान देण्याच्या कृतीने असे वर्तन कमी होण्याऐवजी वाढण्याची शक्यता असते. असे हा सिद्धांत सांगतो. टेनेनबम यांनी नामाभिधान प्रक्रियेस "Dramtization of evil" असे म्हटले आहे. समाजाचा गुन्हेगार व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा गुन्हेगारी वर्तन कमी करण्याऐवजी असे वर्तन पुन्हा करण्यास उत्तेजन देतो. याचे उदाहरण देतांना ते म्हणतात, एखाद्या तरुणाने एक साहस म्हणून किंवा मजा म्हणून गुन्हेगारी वर्तन केले तर, न्यायालयात त्याचा गुन्हा सिद्ध झाल्यानंतर त्यास 'गुन्हेगार' हा शिक्का / लेबल लागते. आणि गुन्हेगार म्हणून

त्याची समाजाला एक नवी ओळख करुन दिली जाते. या लेबलमुळे इच्छा नसतानाही त्याच गुन्हेगारी मार्गाने जीवन जगणे त्यास भाग पडते. टेनेनबम यांच्या मते, अशा प्रकारच्या गुन्हेगारास समजावून सांगुन, समज देऊन अशा वर्तनापासुन परावृत्त केले जाऊ शकते. त्याने प्रथमच गुन्हा केलेला असतो त्यास गुन्हेगारी वर्तन करण्याची सवय नसते. त्यामुळे तो सराईत गुन्हेगार होण्यापासून वाचु शकतो. समाजाचा प्रयत्न हा त्याला गुन्हेगारी वर्तनातून मुक्त करण्यासाठी असायला हवा. त्याऐवजी तु गुन्हेगार आहेस असा शिक्का / लेबल दिले जाते. ती चांगली व्यक्ती असली तरीही या लेबलमुळे तीला गुन्हेगारी वर्तनाचाच मार्ग शिल्लक राहतो. लेबलिंग पद्धत ही गुन्हा नियंत्रणाऐवजी गुन्हा वाढवण्यास पोषक ठरते.

प्रो. एडविन लेमर्ट यांनी १९५१ साली याबाबत अभ्यास करुन प्राथमिक विपथगमन (Primary deviation), दुय्यम विपथगमन (Secondary deviation)असे दोन प्रकारचे गुन्हेगारी वर्तन सांगितले. त्यांच्या मते, प्राथमिक विपथगमन म्हणजे गुन्हा करणाऱ्या (First time offenders) व्यक्तीस योग्य तो सल्ला देऊन सर्वसाधारण जीवनमार्ग अवलंबण्यास प्रवृत्त करता येते. "गुन्हेगार" लेबल देऊन हे साध्य होत नाही. उलट त्यामुळे गुन्हेगारीवर्तनाकडे वळण्याचाच धोका अधिक असतो.

दुय्यम विपथगमन असेल तर म्हणजेच प्राथमिक विपथगमनानंतरही समज देऊन ही त्याने पुन्हा गुन्हेगारी वर्तन केलेले असते. त्यामुळे असे वर्तन करणाऱ्या व्यक्तीस योग्य ती शिक्षा देणे आवश्यक असते, असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

होवर्ड बेकर यांनी १९६३ मध्ये प्रकाशित केलेल्या "The outsiders" या ग्रंथात या नामाभिधान सिद्धांतात भर टाकली तसेच ॲरोन सिकारेल यांनीही पोलीस, न्यायालयीन अधिकारी आपली कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी 'प्रथम गुन्हा' करणाऱ्या गुन्हेगारास गुन्हेगार ठरविण्याची घाई करतात असे स्पष्ट केले आहे.

गट संघर्ष सिद्धांत (Group Conflict Theory) :

हा सिद्धांतही अतिनियंत्रण सिद्धांत मानला जातो. येथे गट संघर्ष सिद्धांताची मांडणी व्यक्तीऐवजी गटपातळीवर केली आहे.

राज्यशास्त्राचे अभ्यासक जॉर्ज होलड यांना गट संघर्ष मांडणारे तज्ज्ञ मानले जाते. १९५८ साली त्यांनी या संदर्भात अध्ययन केले. त्यांनी असे सांगितले की, अपराधामध्ये दोन घटक आहेत. १) ते एक मानवी वर्तन आहे, २) त्या वर्तनाची व्याख्या करणे व नामाभिधान देणे कोणत्याही देशातील सत्ताधारी गट (Power group) अपराध कोणत्या मानवी वर्तनास म्हणावे या व्याख्या ठरविण्यात सक्रीय सहभागी असतो. सत्ताधारी गटाचा विरोध गटाचे अथवा हितसंबंधाला बाधा येणारे वर्तन गुन्हेगारी ठरविण्यावर या गटाचा भर असतो. गुन्हा व विपथगमन हे नेहमिच अल्पसंख्य गटाचे वर्तन असते, असे आपणांस आढळते याचे कारण हेच होय. होलड यांनी सांगितले की एखाद्या देशात क्रांती करु पाहणाऱ्यांना त्या देशाचा सत्ताधारी गट देशद्रोहाचा गुन्हा करणारे गुन्हेगार ठरतात. तर तेच क्रांतीकारक पुढे चालून सत्ताधारी झाल्यावर आधीच्या सरकारमधील अधिकाऱ्यांना गुन्हेगार म्हणून शिक्कामोर्तब करतात. एकाच प्रकारचे वर्तन गुन्हेगारी वर्तन म्हणून ठरवले जाते. (व्याख्याच्या माध्यमातुन) तर तेच वर्णन गैरगुन्हेगारीचेही ठरु शकते. तेव्हा गुन्हेगारी वर्तनापेक्षाही त्या वर्तनास 'गुन्हेगारीवर्तन' असे नामभिधान देणारी

व्याख्या करणारी प्रक्रिया महत्त्वाची आहे. आपल्या विरोधी गटाशी संघर्ष करताना त्यांना 'गुन्हेगार' असल्याचे दोषारोपण करुन आपली सत्ता अबाधीत ठेवण्याचे प्रयत्न सत्ताधारी गट करतो व विरोधी गट सत्तेवर आल्यावर पुन्हा तशीच कृती करतो.

ऑस्टीन तुर्क (१९६९) विल्यम चॅम्बलिस, रॉबर्ट सिडमन (१९७१), रिचर्ड क्वीने (१९७०) यांनीही यावरच संशोधन करुन सत्ताधारी गट हा आपल्या कनिष्ट गटांना अथवा दुर्बल गटांना गुन्हेगार ठरविण्याचा प्रयत्न करतो असे प्रतिपादन केले आहे. सिडमन व चॅम्बलीस यांनी असे प्रतिपादन केले आहे की, नोकसशहा हे आपल्या सत्तेच्या सुरक्षेला उपयुक्त कायदे करुन गुन्ह्याची व्याख्या ही त्यांच्या सोईने करतात.

क्वीन यांनी म्हटले आहे, गुन्ह्याची संकल्पना व व्याख्या ही सामाजिक, आर्थिक दृष्ट्या प्रभावी शक्तीशाली गटाच्या हितसंबंधाचेच रक्षण करण्याच्या हेतूने केली जाते. इतर घटकांना ती हानिकारकच असते. अशा रीतीने 'गट संघर्ष सिद्धांत' हा सत्ताधारी गट हा गुन्ह्याची व्याख्या सत्तारक्षणासाठी करतो असे सांगतो. 'गुन्हा सिद्धांत' या प्रकरणात गुन्हेगारीविषयक विभिन्न सिद्धांताचा व त्या अनुषंगाने अपराधशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांनी केलेल्या संशोधनाचा सैद्धांतिक आढावा घेतला आहे.

गुन्हा व गुन्हेगारीचे सूक्ष्म पैलू अखंडपणे संशोधनात राहतील व गुन्हेगारी वर्तनाच्या गुंतागुंतीच्या गंभीर सामाजिक समस्येची उकल सातत्याने होत राहील. जोपर्यंत समाज आहे तोपर्यंत समाजविरोधी वर्तन करणारे असणारच जोपर्यंत गुन्हेगार आहेत आणि गुन्हे घडत आहेत तोपर्यंत गुन्ह्याच्या हा सैद्धांतिक अभ्यास चालूच राहिल हे निश्चित.

११.४ गुन्ह्यांचे प्रकार

प्रस्तावना (Introduction) :

गुन्हेगारी म्हणजे गुन्हे घडणे, गुन्ह्यांच्या स्वरुपावरुन गुन्हे करण्याच्या पद्धतीवरुन आणि गुन्हे जेथे घडतात त्या प्रदेशावरुन गुन्ह्याचे प्रकार पडतात. त्याचप्रमाणे गुन्हेगाराच्या वयावरुन, लिंगावरुन आणि गुन्हा एकट्याने केला की सांघिकपणे यावरुन गुन्ह्याचे प्रकार पडतात. गुन्हे हे संघटीतपणेच घडतात. उदाहरणार्थ, दहशतवादी कृत्ये, दरोडेखोरी, गुंडगिरी आणि चोरटा व्यापार हे गुन्हे असे आहेत की, जे एकट्यादुकट्याचे काम नव्हे अशा स्वरुपाचे आहेत. तर चोरी, फसवणूक, काळाबाजार, भ्रष्टाचार असे अनेक आर्थिक फसवणूकीचे गुन्हे असतात की जे एकेकटी व्यक्ती आपापल्या कामाच्या ठिकाणी करु शकते आणि ती व्यवस्थेतील विपथगामी वर्तन करुन बेकायदेशीरता आणण्यास कारणीभूत ठरते. या प्रकारांचा परामर्श स्वतंत्रपणे घेतला पाहिजे कारण प्रत्येक प्रकारात गुन्हेगारांचे कौशल्य, गुन्हा करण्याच्या वेळची स्थिती आणि गुन्ह्याचे बळींवर होणारे परिणाम वेगवेगळे असु शकतात. शिवाय, बेकायदेशीरतेच्या नियमनासाठी समाजाने केलेली व्यवस्था (कायदे आणि दंडसंस्था) ही देखील वेगवेगळी असते त्यामुळे गुन्हेगारीच्या प्रत्येक प्रकाराचा स्वतंत्र अभ्यास होऊ शकतो आणि त्याची कारणमीमांसाही भिन्नभिन्न असु शकते.

गुन्ह्याचे तीन प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) व्यक्तित्वाविरुद्धचे गुन्हे (Against the person or person at things, character and name):

गुन्हेगाराकडून दुसऱ्या व्यक्तीचा खुन होतो, तो खुन खासगी वैरभावनेतून होतो. खुन करण्याची कधी कधी इच्छा नसते परंतु त्या व्यक्तीला त्रास देण्याची इच्छा असते. अशा वेळी त्या व्यक्तीला मारहाण केली जाते, भिती दाखवली जाते वा छळ केला जातो. ती मरेल अशी योजना असतेच असे नाही पण गुन्हेगाराच्या चुकीने हत्यार जिव्हारी लागते, गोळी छातीत वा डोक्यात घुसते आणि मृत्यू ओढवतो. व्यक्तीचा खुण करणे हा व्यक्ती विरुद्धचा गुन्हा आहे कारण ज्या व्यक्तीचा खुण होऊन त्याला मृत्यू येतो त्याला जगण्याचा हक्क नाकारला जातो. त्याच्या मरण्यामुळे त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या मुलांच्या व बायकोचाही हक्क दुरावला जातो. त्याच्या मरण्यामुळे त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या मुलांचा व बायकोचा हक्क दुरावला जातो. वास्तविक प्रत्येकाला जगण्याचा हक्क असताना वध, खुन, जीव घेणे हे गुन्हे गंभीर आहेत कारण ते दुसऱ्याच्या मुलभुत हक्कावरच गदा आणतात. पुर्वीपासून खुनास खुन, वैरातुन खुन, नकोसा झाला की काटा काढणे म्हणजेच मारुन टाकणे असे भयंकर कृत्य मानवी समाजात पाप समजले जाते. आजही माणुस माणसाला नकोसा वाटणे यासारखे दुसरे पाप नाही आणि म्हणुन व्यक्तिविरुद्धचा सर्वात गंभीर आणि घातक गुन्हा म्हणजे खुन, वध किंवा मारुन टाकणे.

मारुन टाकण्यासाठी कोणतेही तीक्ष्ण हत्यार वापरले जाते. शरीराच्या वेगवेगळ्या क्रियांना इजा पोहचविणे, श्वास रोखुन ठेवण्यासाठी गळा दाबणे, नरडीला इजा करणे, डोके दगडाने वा तीक्ष्ण हत्याराने फोडणे, पोटात तीक्ष्ण हत्यार खुपसणे जेणे करुन आतडी फुटतील आणि पचनक्रिया बंद पडेल याशिवाय डोळे काढणे, हातपाय तोडणे आणि रक्तस्त्राव होईल असे पाहणे. एखादी रक्तवाहिनी कापणे आणि रक्तस्त्राव होऊ देणे यांसारखे क्रुर आणि दुःखदायक इजा पोहचविणारे त्रास शरीराला दिल्याने मृत्यु ओढवतो. खुन करणे हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा यासाठी आहे की त्यामध्ये अमानवी हेतू आणि क्रिया दोन्हींचा अतिरेक होतो. मानवी प्राण्याला लहानाचे मोठे करण्यासाठी अनेक यातना व खस्ता खाल्या जातात. आणि अशा मोठ्या केलेल्या सजीव प्राण्याला मारुन टाकायचे म्हणजे वाईट कृत्य आहे. अलीकडे एखाद्याला मारुन टाकणे हे केवळ वैरातुनच केले जाते असे नाही तर ज्या व्यक्तीचा आर्थिक व्यवहारात उपयोग नसेल वा ज्या व्यक्तीपासून धोका असेल त्याला आणि त्याच्याशी संबंधीत इतर व्यक्तींनाही या जगात जीवंत ठेवले जात नाही. वास्तविक अशा व्यक्तीचे जीवन इतर अनेक प्रकारे चांगले व समाजापयोगी असु शकते. त्यांच्यावर प्रेम करणारी इतर अनेक माणसे असतात अशा वेळी त्यांना जगू न देण्याचा अधिकार काहींनी गाजवणे आणि ते ही दुसऱ्यांकरवी त्यांचा खुन करविणे हे अत्यंत मोठे पाप आहे. पुष्कळदा खुन करणारा पैसे घेऊन एखाद्याला केवळ मारुन टाकण्याचे काम करतो. तो प्रत्यशात बळीचा वैरी नसतो वा माहितही नसतो. यामागे अन्य बलदंड परंतु भ्याड, स्वार्थी आणि अत्यंत नीच मनोवृत्तीचा माणुस असतो. कधी खुन होताना खुनी पकडला गेलाच तर त्याला तर शिक्षा होतेच परंतु त्याने खुनामागच्या नीच प्रवृत्तीच्या माणसाचे नाव सांगितले तरी कायद्याने त्याला शिक्षा होत नाही कारण त्याच्याविरुद्ध न्यायसंस्थाही काही करु शकत नाही आणि म्हणून अनेक निरपराधी आणि प्रत्यक्ष गुन्हेगारीशी संबंध नसलेल्याना मरण येते.

अलीकडे जन्माला येण्यापूर्वीच स्त्रीच्या गर्भाशयात मुलीचा गर्भ असेल तर ती मुलगी जन्माला येण्यापूर्वीच स्त्रीचा गर्भपात करवुन घेतला जातो. तसेच जन्माला आल्यानंतर एखादे मुल नको असेल तर त्याला जन्माला येताच गळा दाबून मारुन टाकतात. रेल्वेखाली टाकतात

किंवा विना अन्नपाण्यावाचून मरण्यासाठी कचऱ्यात वा उकीरड्यावर फेकून देतात. भ्रुणहत्या वा बालहत्या हाही खुनाचा अमानुष प्रकार आहे. राजकीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे डावपेच म्हणून आज दररोज कोठे ना कोठे बाँब ठेवणे, गाड्या उडविणे आणि विमानाची अपहरणे करुन त्यातील प्रवाशांना ठार मारणे हेही मानवी हत्यांचे क्रूर प्रकार आहेत. हे व्यक्तीत्व नाकारण्याचा हेतुने झालेले गुन्हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे आणि अमानवी प्रवृत्तीचे प्रदर्शन करतात.

व्यावसायिक गुन्हे :

व्यवसाय म्हणजे जेथे उच्च ज्ञान आणि धंद्यातील कौशल्य आहे त्याच्या सहाय्याने जे व्यवहार चालतात ते. उदाहरणार्थ, वैद्यकीय व्यवसाय, वकीली व्यवसाय, शिक्षकाचा व्यवसाय, याशिवाय उद्योजक आणि छोटे मोठे व्यापारी आपापले स्वतंत्र उद्योग सांभाळत असतात. या व्यवसायाच्या निमित्ताने त्याचा रोज नानाविध लोकांशी संपर्क येतो. आर्थिक व्यवहार होतात. देवघेव होते. अशा व्यवहारामध्ये जर त्यांना पैसा मिळविण्याचा मोह झाला तर ते त्यांच्या व्यवहारात दुसऱ्याला फसवतात आणि वाजवीपेक्षा अधिक नफा, धन, संपत्ती व मालमत्ता जमवू लागतात. व्यवसायाचे काही नीतिनियम असतात, काही बंधने असतात, काही संकेत असतात ते प्रत्यकाने पाळावयाचे असतात. उदाहरणार्थ, शिक्षकाने विद्यार्थ्याला मन लावून विषयाबद्दलचे जास्तीतजास्त ज्ञान द्यावे अशी अपेक्षा असते परंतु शिक्षक ज्ञान देण्यामध्ये टाळाटाळ करतात. शिकविण्याऐवजी इतर फायद्याची कामे करतात आणि त्यातुन विद्यार्थ्याचे नुकसान करतात. विद्यार्थ्याला ज्ञान मिळवून पदवी हवी असते ती मिळविण्याचे खोटे आश्वासन शिक्षक देतात आणि परिक्षेपुरतीच तयारी करुन घेतात आणि परिक्षेत कॉपी करु देतात आणि विद्यार्थी पास होतात. येथे शिक्षक ज्ञान देताना आणि विद्यार्थ्याला कॉपी करायला लावून परिक्षा देताना गैर मार्गाचीच शिकवण देतात. व्यवसायात गैरव्यवहाराची सुरुवात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यापासून होते आणि त्या गैरव्यवहाराचे रुपांतर कायद्यांच्या उल्लंघनात आणि गुन्हेगारीत होते. वकीलांनी सत्य परिस्थितीजन्य पुरावा सादर करुन गुन्हेगाराला योग्य शासन होण्यास न्यायालयाच्या कामात मदत केली तर तो वकीली पेशा होतो. परंतु वकिलांनी लाच देवून वा घेऊन खोटे पुरावे सादर करुन आरोपीला सोडविले तर तो धंदा होतो. त्यांचे अनैतिक वर्तन हा एक प्रकारचा गुन्हा असतो जो त्यांच्या व्यवसायाचा पावित्र्याचे हरण करणारा असतो. व्यावहारिक नीती आणि स्वच्छ व्यवहार यांचे उल्लंघन झाले की गुन्हे घडतात, बेकायदेशीरित्या बोकाळते आणि व्यावसायिक कायदेशीरतेचे उल्लंघन होते.

संघटित गुन्हे :

गुन्हा अशा स्वरुपाचा असतो की जो एकेकटी व्यक्ति करु शकत नाही. त्यासाठी एकापेक्षा अनेक व्यक्तींनी जबाबदारी उचलावी लागते. गुन्हा करण्याची एक प्रक्रिया असते. त्यात वेळ, स्थळ आणि करावयाच्या क्रियांचा क्रम यात चुक होऊन भागत नाही. कोणी केव्हा कोणते काम कसे करावयाचे याचे नियोजन करावे लागते. उदाहरणार्थ, आंतरराष्ट्रीय पातळीवरील चोरटा व्यापार मग तो सोन्याचा असो की कपड्यांचा, मादक पदार्थांचा असो की हत्यारांचा असो त्यामध्ये हजारो माणसे गुंतलेली असतात आणि त्यांच्या कामामधील धोके हेही त्यांना माहित असावे लागतात. त्यांची संघटना इतकी नियोजनबद्ध असते की त्यामध्ये माणसेही एकमेकांना माहित नसतात. बिनबोभाट काम चालते. अशा गुन्ह्यामध्ये व्यापार, हिंसक कारवाया, बँकेवरील दरोडे, विमानांचे अपहरण, मोठ्या माणसाची पळवापळवी, कोट्यावधी रुपयांची मालांमधील भेसळ, चलनी नानी व नोटा छापणे अशा स्वरुपाचे गुन्हे असतात आणि ते संघटीतपणे केले तरच यशस्वी होतात. कधी-कधी हिंसक कारवाया याही संघटितपणे कराव्या लागतात.

अलीकडच्या दशकात बोकाळलेला दहशतवाद हाही संघटीत गुन्ह्याचा अतिशय नियोजनबद्ध आणि अमानुष प्रकार आहे.

दहशतवाद :

दहशत बसवून दुसऱ्यांना भिती दाखविणे आणि भयभित करुन त्यांना लुबाडणे हाच उद्देश असतो. आजच्या जगात विविध देशांमध्ये आर्थिक हितसंबंधातून परस्पर विरोधी गट निर्माण झालेले आहेत. खनीज तेलाच्या विहिरी पश्चिम आशियामधील देशामध्ये अरब राष्ट्रामध्ये सापडल्यामुळे आणि खनीज तेल ही अतिशय गरजेची आणि सर्वांना हवी असलेली वस्तु असल्याने अमेरिका, रशिया, जपान आणि युरोप येथील श्रीमंत राष्ट्रेही तेलांसाठी या देशावर अवलंबून राहू लागली. भरमसाट किंमत वसुल करुन तेल पुरवीले गेले आणि अल्पशा काळात अन्य भौतिक व सांस्कृतिक प्रगती नसलेल्या अरबांनी कोट्यावधीची मालमत्ता आणि संपत्ती साध्य केली. या राष्ट्रातील लोकांचा धर्म इस्लाम आहे आणि इतर राष्ट्रांचा ख्रिश्चन, हिंदू, शिख व बौद्ध. यामुळे धार्मिक अंतरही स्पष्ट आणि भेददर्शक आहे. अमाप पैसा आणि धार्मिक द्वेष यामुळे कोणत्याही हिंसक मार्गाने दुसऱ्यांना वश करण्याकडे कारवाया सुरु झाल्या. दहशत बसवून दुसऱ्यांना लुबाडण्याचे यश एकदा प्राप्त झाले हे समजल्यानंतर याच मार्गाने प्रत्येक देशामध्ये ज्या ज्या गटांना मुख्य राजकीय प्रवाहापासून दूर व्हायचे आहे त्यांनी आपापली शक्ती संघटीत केली आणि देशांतर्गत शांततेला धोका निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. श्रीलंका, भारतातील पूर्वेकडील राज्ये, उत्तरेकडील प्रांत, जम्मु काश्मिर येथील अराजक माजवणाऱ्या संघटनांच्या कारवाया या देशातील शांतता सतत बिघडवतात. कष्टाने उभ्या केलेल्या सार्वजनिक वास्तु आणि व्यवस्थांचे नुकसान करतात. कधी धार्मिक तर कधी वांशिक, कधी भाषिक तर कधी प्रादेशिक भेदामुळे वैमनस्य निर्माण करतात आणि मुख्य सरकारी यंत्रणा, पोलीस व्यवस्था, सैन्यदल यांना सातत्याने उपद्रव निर्माण करतात. त्यांच्या संघटना स्वतःची रक्षक दले निर्माण करतात आणि हिंसात्मक कृत्ये करतात. निरपराध माणसे मरतात. प्रशिक्षित पोलीसही मरतात. आज दहशतवाद या गुन्ह्याच्या प्रकारात अनेक घातक कृत्यांचा समावेश आहे. त्यात निरपराध जनतेचे नुकसान आणि जगण्याचा हक्क हिरावून घेतला जातो. काही गट नक्षलवादी म्हणवून घेतात व ते गरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी गावागावातील जमीनदार आणि धनाढ्य शेतकऱ्यांच्या संपूर्ण कुटुंबाची एकेका दिवसात हत्या करुन त्यांनी गरीबावर केलेल्या अन्यायाचा सुड घेतात. त्यांच्या कृत्यांमागची ही विचारसरणी न्याय असली तरी त्यांची हिंसात्मक पद्धती पूर्णतः चुकीची आहे. कारण त्याच्या कुटुंबियांचा काय दोष? त्यांना नाहक मरण पत्करावे लागावे हे चुक आहे. विपथगामी वर्तनावर आधारित कोणाचीही दुष्ट कृत्ये हे गुन्हे आहेत.

दहशतवादांची पाळेमुळे ही गेल्या २५-३० वर्षातील जगाच्या पाठीवरील आहेरे-नाहीरे यांच्यातील दरी रुंदावण्यामुळे आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या दुरुपयोगामुळे निर्माण झालेल्या विषमतेमध्ये आणि विद्वेषामध्ये रुजली आहेत. प्रत्येक लहानमोठ्या देशांमध्ये दहशतवादाची कृत्ये घडत आहेत आणि त्याचा बिमोड करावा असे वाटत असुनही तो कसा करावा याचा निश्चित मार्ग सापडलेला नाही. काही देशांनी 'टाडा' सारखे कायदे केले आहेत. टाडा लावून कित्येक दहशतवाद्यांना पकडून खास वेगळी व्यवस्था असलेल्या तुरुंगामध्ये ठेवले आहे. असे असले तरी या प्रकारच्या गुन्ह्यांचा प्रकार अनेक अर्थानी गुंतागुंतीचा आहे. असंभवनीय आणि अनपेक्षितपणे घडणारा आहे. त्यामुळे त्यामागचा दहशतीचा उद्देश हा खरोखरीच त्रासदायक आहे. अगदी अलीकडे अकरा सप्टेंबर २००१ साली अमेरिकेतील दोन जगप्रसिद्ध इमारती विमांनानी

जमीनदोस्त केल्या, कारण अमेरिकेने यापुर्वी केलेल्या विविध देशांमधील हिंसक कारवायाचा आणि आर्थिक नाकेबंदी करणाऱ्या धोरणांचा बिमोड करुन सुड घेण्याचा मोठा कट मुसलमानी धर्मांध गटांनी रचला होता.

सर्व देशांनी मिळून दहशतवादाचा बिमोड करण्याची आवश्यकता आहे. दहशतवादाचा बिमोड तर झाला नाही पण प्रत्येक देशांमध्ये सामाजिक विघटनाची कक्षा रुंदावत चालली आहे. सामाजिक विघटनामुळे कौटुंबिक आणि व्यक्तीविघटन यांच्याही शक्यता वाढत आहेत.

पांढरपेशा गुन्हे :

पांढरपेशा माणसे म्हणजे सरकारी विभागामध्ये मोठ्या पदावर काम करणारी असतात. त्यांना त्यांचे काम करण्यासाठी अधिकार असतात आणि त्यासाठी भरपूर पैसा वापरण्यासाठी मिळतो. त्यांना या पैशांचा मोह होतो. अधिकार वापरुन ते स्वतःचे स्वतः लाभ करुन घेतात. शासकीय सत्तेचा गैरवापर करुन सार्वजनिक पैशाचा स्वतःसाठी लाभ करुन घेणे हा पांढरपेशा गुन्हा आहे. स्वतःच्या नातेवाईकांसाठी आणि मुलांसाठी फायद्याच्या जागा मिळवून देणे, नोकऱ्यांमध्ये बढती देणे आणि कंत्राटे मिळवून देणे. फायद्याच्या एजन्सीज मिळवून देणे हे पांढरपेशा गुन्हे आहेत.

अधिकारांचा दुरुपयोग करुन युरीया खतामध्ये, पेटंट औषधांमध्ये, सुवासिक अत्तरे इत्यादींमध्ये भेसळ करणे, बाटल्यांवर वेगळी लेबले लावणे व आत हलक्या प्रतीचा माल भरणे इत्यादी व्यवहार हे पांढरपेशा गुन्हे आहेत. "पांढरपेशा मंडळींनी असे करु नये" अशी समाजाची नीती असते आणि त्या नितीविरुद्ध वर्तन करणारी ही मंडळी सामाजिक विघटनाचेच काम करतात. समाजातील नितिमत्ता बिघडविण्याचे काम करतात.

पांढरपेशा मंडळी आपल्याच व्यवसायातील इतरांची बदनामी करतात व एकूण पांढरपेशा व्यवसायालाच बदनाम करतात. पांढरपेशा मंडळी वृत्तपत्रांना बातमी आल्यामुळे बदनामी तर होतेच, शिवाय कुटुंबाची बदनामी होते. मुलीची लग्ने जमत नाहीत. त्यांच्या तरुण मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत आणि तेही देशोधडीला लागतात. पांढरपेशा गुन्हेगारी समाजहिताच्या दृष्टीने अतिशय वाईट आहे. कारण ज्या मंडळीकडून दिशादर्शनाची अपेक्षा आहे तीच मंडळी दिशा बदलून चुकीच्या मार्गांनी गुन्हे करतात. कायदे मोडतात आणि रारसोसपणे समाजात वावरतात त्यावेळी त्यांचा चुकीचा मार्गच बरोबर व सोपा (झटपट पैसा व प्रसिद्धी मिळवून देणारा आहे) आहे असेच पुष्कळांना वाटू लागते. बेकायदेशीरित्या यामुळे फोफावत जाते.

भ्रष्टाचार :

भ्रष्ट आचार हाच गुन्हा आहे. समाजातील व्यवहार सर्वांना परंतु कोणालाही अन्यायकारक असु नये म्हणून नितीनियम आणि बंधने असतात. कोणत्याही समाजाला बंधनाशिवाय जीवन शक्य होणार नाही असा एकही समाज अस्तित्वात नाही की, जेथे समान मुल्ये, उद्दिष्टे, नितिनियम आणि बंधने मानणारा वर्ग नाही. प्रत्येक समाजात सामूहिक समाजजीवन जगणाऱ्यांचा आणि ध्येयसिद्धीसाठी सामुहिकपणे प्रयत्नशील राहणाऱ्यांचा एक मोठा गट असतो. समान कायदे, मुल्ये आणि नियम यांनी योग्य आचार कोणते ते निश्चित केलेले असते. त्या योग्य आचारांशिवाय मन मानले तसे नियमबाह्य वर्तन म्हणजे भ्रष्टाचार, लाच देणे-लाच घेऊन कामे करणे हा भ्रष्टाचार आहे. दुधात पाणी मिसळणे आणि दुध वाढवून विकले तर ते

पाणी मिसळण्याचे कृत्य आहे. तो भ्रष्टाचार होय. दुसऱ्याच्या पुस्तकातून तयार छापील पाने कापून घेतली व ती आपली म्हणून आपल्या पुस्तकातील इतर लिखित मजकुरासोबत छापुन टाकली तर तो भ्रष्टाचार होय. भ्रष्ट म्हणजे स्वच्छ नाही. मुळचे आहे तसेच निर्मळ नाही तर त्यात काही घाण मिसळली गेली आहे असे. गंगेचे मुळचे वाहणारे पाणी ठिकठिकाणी लोकांनी घाण टाकल्यामुळे खरब होते. ते प्रदूषित आणि अपवित्र होते. तसाच माणुस वागताना निर्मळ व पवित्र भावनेने न वागता कपटी वा स्वार्थी भावनेने वर्तन करु लागला तर ते कृत्य 'भ्रष्टाचार' होते. काही स्वार्थी मंडळी, आळशी वा नालायक असतात. म्हणून यशासाठी ती भ्रष्ट मार्गाचा स्विकार करतात आणि यशस्वी होतात. असे करताना ते दुसऱ्यांचे यश हिरावून घेत असतात. परंतु त्याची त्यांना फिकीर वाटत नाही. समाजहित व्यक्ती हितापेक्षा श्रेष्ठ मानावे लागते. ज्या समाजात समाजहितासाठी असणारे कायदे पाळले जातात आणि समाजहिताची कदर केली जाते. तेथे भ्रष्टाचार कमी असेल, जेथे हे घडत नाही तेथे भ्रष्टाचार आहे असे दिसते.

राजनैतिक गुन्हे :

पुर्वीपासून चालत आलेला अनुभव लॉर्ड ॲक्टन याच्या वाक्यात सामावलेला आहे. 'राजकीय सत्ता भ्रष्टाचार करावयास लावते आणि सर्वंकष सत्ता (लोकांचा अंकुश नसलेली) तर संपुर्णतः भ्रष्ट असते.' कोणत्याही समाजातील मुठभर मंडळी - जी राज्यकारभार चालवितात, मग ती एकटा राजा व त्याचे प्रधानमंडळ असो किंवा सरंजामदार असो किंवा अलीकडचा हुकुमशहा असो ते भ्रष्ट होतात, मोहात पडतात आणि जनतेला किंवा प्रजेला लुबाडून कोट्याधिश होतात. अठराव्या शतकातील चौदावा लुई स्वतःच्या राणीच्या अत्तराचा खर्च स्वतः न करता प्रजेकडून मीठावर कर बसवून वसुल करीत असे. मीठ माणसाला रोज लागणारी वस्तु असून ती तो विकत घेणारच हे माहित असल्यामुळे मिठावर जास्त कर बसविला तर मीठाचा खप जास्त असल्यामुळे खुप पैसा मिळेल हे त्याने ओळखले होते. राजाने प्रजेच्या हितासाठी कामे करण्याऐवजी प्रजेला लुबाडणे म्हणजे राजकीय गुन्हा आहे.

सत्तेवर असणारे जेव्हा संपत्ती जमविण्यासाठी आणि लायकी नसतानाही स्वतःसाठी प्रतिष्ठेच्या जागा व वस्तु बळकवतात तेव्हा ते ज्या मार्गाचा अवलंब करतात तो कायदेशीर नसतो म्हणून ते वर्तन राजकीय गुन्हा असते. नोकरीवरील पदावर नेमणूक करणे फायदेशीर व्यवहार असलेली कंत्राटे मिळविणे, बाजारात गाळे मिळविणे, फुकटात प्लॉट्स नावावर करुन घेणे हे सत्तेवर असणाऱ्या मंडळींना जमते. कारण सरकारी यंत्रणा त्यांच्या आदेशानुसार चालते. अलीकडच्या पंधरा वर्षातील मेहता बंधुचे बँकांना फसविणे, बोफोर्स तोफांमध्ये दलाली घेणे, हवाला व्यवहारातील जैन यांनी वापरलेली परदेशातील भारतीयांची पैसे गुंतविण्याची पद्धती, जनावरांच्या चाऱ्यामध्ये घोटाळा करुन पैसे मिळविणे, पेट्रोलमध्ये रॉकेल मिसळलेल्या पंपाच्या मालकाकडे दुर्लक्ष करणे, गॅसकुपन्स देताना गॅसधारकांकडून पैसे घेणे, जातीचा दाखला देताना खासदार, आमदार आणि स्थानिक नगरसेवकही पैसे देतात. हे सर्व राजकीय गुन्हे आहेत.

राजकीय गुन्ह्याचे सर्वात गंभीर स्वरुपाचे उदाहरण म्हणजे निवडणूक पद्धतीचा वैयक्तिक स्वार्थासाठी वापर करणारे राजकारणी लोक, निवडून येण्यासाठी मतदारांच्या मताला फार किंमत असते. मते दिली तर प्रतिनिधी निवडून येतो म्हणून मतदार प्रतिनिधींशी सौदा करतो. मतदार निवडून देण्यासाठी मताच्या बदल्यात पैसे, वस्तु, जमीन, नोकरीची हमी असे काही मागतो किंवा कधी कधी एखाद्या गुन्ह्याच्या आरोपातुन सुटकाही मिळवतो. अशा स्वरुपाचे वर्तन राजकीय गुन्हा असते. याउलट उमेदवार मतदाराला मतांच्या मोबदल्यात आश्वासने देतो,

त्याची व त्याच्या कुटुंबीयांची आणि आजुबाजुच्या मतदारांचीही मते मिळण्याची हमी घेतो. हा राजकीय सौदा पद्धतीचा गैरवापर करणारा आहे. प्रत्यक्ष निवडणूक होताना पेट्या पळविणे, मतदार पळविणे, अधिकाऱ्यांना धाक दाखवून मतपत्रीकांवर शिक्के मारुन घेणे, मतदारांनी मतदान करण्यासाठी येऊ नये म्हणून दहशत निर्माण करणे हे सर्व राजकीय गुन्हे आहेत. निवडून आल्यानंतर सत्तेतील राजकीय प्रतिनधीना प्रत्येक ठिकाणी मान मिळतो, सर्व सवलती न मागता मिळतात आणि गैरमार्गाने व्यवहार केले तरी ते दडपून टाकता येतात. अशा राजकीय मंडळीचे गट असतात आणि ते संगनमताने स्वतःच्या गटामध्ये सत्तेचा गैरवापर करुन खुप संपत्ती मिळवतात. संपत्ती मिळवण्यासाठी विविध मार्ग चोखाळतात. निवडणुकांच्या काळात खर्च केलेला पैसा वसुल करतात. आपल्या मुलांबाळांचे आणि ज्यांच्यापासून काही आर्थिक लाभ होतील अशांचे भले करुन देतात. हे सर्व बेकायदेशीर आहे परंतु राजकीय सत्तेच्या जोरावर ते हे उद्योग करतात म्हणून हे राजकीय स्वरुपाचे गुन्हे आहेत.

चोरटा व्यापार :

कोणत्याही गावात व्यापार करण्यासाठी तेथील शासनाची परवानगी आवश्यक असते. बाजाराची जागा ठराविक असते. तिच्या जागेसाठी कर भरावा लागतो. येणारा आणि विकला जाणारा माल कोणता आहे याची रीतसर नोंदणी व्हावी लागते. त्यावरही कर भरावा लागतो. परवानगीशिवाय व्यापार केला तर तो गुन्हा समजण्यात येतो. नियमाप्रमाणे व्यापार होतो आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी तपासनीस असतात. या तपासनीसांनी मालाच्या भावावर, गुणवत्तेवर आणि स्वच्छतेवर लक्ष ठेवायचे असते. अशावेळी जर दुर्लक्ष झाले, भेसळ झाली तर अशा व्यापारास चोरटा व्यापार म्हणतात. व्यापार ज्या वस्तुंचा असतो त्यावर एका गावाहुन दुसऱ्या गावी जाताना जकात कर असतो. चोरटा व्यापार करताना कर चुकविण्याकडे व्यापारांचा कल असते. ज्या वाहनामधून वा ज्या रस्त्यावरुन मालाची ने-आण होते ते मार्ग सोडून त्या वाहनावरील नंबर बदलून, पाण्यातुन रात्रीच्या वेळी बोटीमधून मालाची ने-आण केली जाते. पोलीसांना धमकावून वा लाच देऊन वा अमीष दाखवूनही वस्तु बाजारात आणतात. या सर्व बाबी बेकायदेशीर होतात आणि त्यामुळे अशा व्यापाराला चोरटा व्यापार म्हणतात. चोरटा व्यापार ही काही अलीकडची गुन्हेगारी नाही तर पूर्वीपासून, ज्यावेळी समुद्रमार्गे किंवा जनावरांपासून (उंट, घोडे) व्यापार होत असे. त्यावेळी चांचगिरी होत असे आणि व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्यांचा माल चोरुन वा लुटुन नेत असत. एखादा व्यापारी संच चोरटा व्यापार करीत असेल तर त्याचा प्रतिस्पर्धी पोलीसांना वा सरकारी यंत्रणेला बातमी देवून तो पकडला जाईल हे पाहत असे.

११.५ विद्यार्थ्यांमधील कुचेष्टाखोरी (रॅगिंग) (RAGGING)

रॅगिंग पूर्वीपासून एक गमतीची प्रथा म्हणून चालु होती. ती केवळ सेनेतील सैनिक - छात्रामध्ये किंवा उच्चशिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये हा प्रकार एक प्रकारची नव्याची जुन्यांशी ओळख करुन घेण्यासाठी असलेली प्रथा असते. नव्यांना संस्थेतील वातावरण माहित व्हावे आणि तेथील आधीपासून राहणाऱ्यांची ओळख व्हावी यासाठी मोठे व वरच्या वर्गातील विद्यार्थी खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना "तुम्ही नवीन आहात आणि तुम्हाला काही येत नाही / काय येते" हे पहावे यासाठी गमतीचे खेळ खेळायला लावतात वा चाचणी घेतात. अशा प्रंथामध्ये काही गैर आहे असे वाटत नाही. परंतु यालाच वाईट वळण लागले तर त्यातुन गुन्हेगारी होते. अलीकडे वरच्या वर्गातील विद्यार्थी खिलाडू वृत्तीचे असतातच असे नाही. ते गमतीमागची

खिलाडू वृत्ती लक्षात न घेता खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना आपले नोकर समजतात आणि बुट पुसायला लावतात, काही लैंगिक विकृती दर्शविणारे हावभाव करायला लावतात आणि त्यांची व्यंगे बाहेर काढतात. अशा विकृत खेळांमुळे खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना लाज वाटते, घाण वाटते आणि अपमानास्पद वाटते. काहींमध्ये खिलाडू वृत्ती नसल्यामुळे ते असे अपमान सहन करु शकत नाहीत. ते असे काही करण्यास विरोध करतात. विरोध केला की वरच्या वर्गातील विद्यार्थी जास्तच जबरदस्ती करु लागतात. चेष्टांचे रुपांतर कुचेष्टाखोरीत होऊ लागते. त्यातुन अन्याय होतो. लैंगिक छळ, शारीरिक इजा, बदनामीकारक भाषा, शिवीगाळ आणि मानहानी या गोष्टी परोकाटीला जातात आणि संयुक्त गुन्हेगारीत पर्यवसान होते.

अलीकडे अनेक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रॅगींगमुळे अनैतिक आणि लैंगिक अतीरेकांचे प्रकार घडले व त्याचे आघात सहन न झाल्यामुळे काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. काहींनी शिक्षण सोडून दिले आणि काहींनी तर कायमचा धसका घेऊन त्यांचे मानसिक रुग्णांमध्ये परिवर्तन झाले. "रॅगिंग विरोधी कायदा" करावा लागला आणि रॅगींग हा एक गुन्हा झाला.

११.६ भारतातील गुन्हेगारीचे प्रमाण

कोणत्याही देशात गुन्हेगार किती आहेत याची आकडेवारी असते, लोकसंख्येच्या प्रमाणात किती गुन्हेगार आहेत यावरुन टक्केवारी काढली जाते. उदाहरणार्थ, भारतात १९६३ ते १९६८ पर्यंत गुन्हेगारी एकसारखी वाढत राहिली आणि १९८४ नंतर सर्वत्र काही गुन्ह्याचे प्रमाण वाढत राहिले. हुंडाबळी, स्त्रियांची जळीत प्रकरणे, गुंडाकरवी होणारे खुन, हरीजन आणि आदीवासी यांच्यावर होणारे हल्ले, बँकेवरील दरोडे, धार्मिक दंगलीतून होणारी प्रकरणे. नक्षलवादी कारवाया आणि देशाच्या उत्तर आणि उत्तरपूर्व सिमेवरील राष्ट्रविरोधी आंदोलने, वाढते रेल्वे अपघात आणि यामुळे सर्व देशात गुन्हेगारीचे प्रमाण आणि प्रकार वाढत आहेत. तुलनेने भिकारी, भुरट्या चोऱ्या, छोट्या-मोठ्या घरफोड्या कमी होत आहेत.

पोलीस खात्याकडे निरनिराळ्या पोलीस ठाण्याकडून दाखल झालेल्या गुन्ह्यांची नोंद दररोज / दरमहिन्याला होते. अलीकडे (वायरलेस) बीनतारी यंत्रणा, संगणकाची सोय व संगणक प्रशिक्षित स्टाफ यांच्यामुळे यापुढील काळात गुन्ह्याबाबतची आकडेवारी अधिक अचुक होत राहील आणि गुन्हेगारीचे प्रमाण समजणे सुलभ जाईल.

गुन्हेगार कोण? ज्याला पोलीसांनी पकडून कोर्टापुढे उभा केला तो. ज्याच्याविरुद्ध तक्रार आली पण ज्याला पकडले नाही त्याला गुन्हेगार समजता येणार नाही. कित्येक गुन्हे घडतात त्यावेळी एखाददुसरी व्यक्ती पकडली जाते व इतरांना पोलीसांनी न पकडल्यामुळे त्या मुक्तपणे समाजात वावरतात. गुन्हेगारांपैकी कित्येकजण गुन्हा करुनही फरार झालेले असतात आणि पोलीसांच्या हाती लागत नाहीत. कधी कधी पोलीसांकडून खऱ्या गुन्हेगाराऐवजी संशयावरुन एखाद्या निष्पाप माणसालाच पकडले जाते. कित्येकदा संशयावरुन पकडल्या गेलेल्या माणसाविरुद्ध पुराव्याअभावी पोलीसांना खटला भरता येत नाही. त्यामुळे गृहखात्याच्या आकडेवारीवरुन गुन्ह्याचे प्रमाण ठरविता येत नाही. कारण खरे गुन्हेगार संख्येने कितीतरी जास्त असतात.

पोलीस खात्याचा कारभार ज्यांच्या हातात असतो ते अधिकारी आणि हवालदार किती प्रामाणिक असतात यावर आणि त्यांची कार्यक्षमता व त्यांच्याजवळ असलेली वाहने ही किती पुरेशी आहेत यावर गुन्हेगारीवरील नियंत्रण, गुन्हेगार पकडण्यातील त्वरा अवलंबून असतात. नवनवीन गुन्हे घडत आहेत, गुन्हेगार नवीन तंत्रे वापरीत आहेत त्यामुळे पोलीसांना जुन्याच यंत्रणेसह कार्य करणे चक्रावून टाकणारे होत आहे. धार्मिक दंगली आणि गुंडगीरी यांना राजकीय पुढारी उत्तेजन देण्याचे प्रमाण वाढते आहे आणि राजकीय पुढारी मतदारांना नाराज होऊ नयेत म्हणून पाठीशी घालत असतात. याचा मेळ बसणे अवघड होत आहे. गुन्हेगारी वाढली म्हणून विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर टीका करतात आणि सत्ताधारी पक्षांतील मंडळी पोलीस यंत्रणेतील अधिकाऱ्यांना जबाबदार धरतात. मध्यतंरी "सामाजिक दंगली आटोक्यात आणण्यात अपयश आलेल्या अधिकाऱ्यांना निलंबीत करण्यात येईल असा अध्यादेश" राज्यसरकारने काढला. कामाची जबाबदारी (Accountability) अधिकाऱ्यांनी उचलण्याची हमी घेतली तरच ती यंत्रणा कार्यक्षमपणे काम करु शकेल. पुष्कळदा प्रत्यक्ष आकडेवारीपेक्षा गुन्हेगारीचे नमेके प्रमाण ठरविणे अवघड आहे हे लक्षात येते.

आकडेवारी मिळण्याची ठिकाणे :

गुन्हेगारीची नोंद पोलीसखाते, कारागृह आणि न्यायालय या तीन ठिकाणी होत असते. संघराज्यात ती केंद्रीय शासनाकडे केंद्रीत / एकत्रीत केली जाते आणि मग प्रसिद्ध केली जाते. पुष्कळदा राज्यसरकारांजवळ पुरेशी यंत्रसामुग्री व कार्यक्षम अधिकारी नसतात. त्यामुळे योग्य तऱ्हेने नोंद होत नाही. काही खासगी संस्थाही गुन्ह्याबाबतची माहिती संशोधनासाठी गोळा करीत असतात. त्या माहितीचाही गुन्हेगारीचा अंदाज घेताना उपयोग होतो. ज्या गुन्ह्याची नोंद केंद्रीय शासनाच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालात नाही असे कित्येक गुन्हे आज भारतीय समाजात घडत आहेत. निरनिराळ्या खात्यांमध्ये त्यांनी मोठ्या पदांच्या जागा भुषविल्या आहेत आणि भ्रष्टाचार, वशीलेबाजी, पैशांचा आणि मालमत्तेचा अपहार व गैरवापर इत्यादी व्यवहार सर्रास चालू आहेत. लाचलूचपत, अन्नभेसळ, करचुकवेगिरी हे गुन्हे वाढत आहेत. कारण शासनाची अंमलबजावणी कमी पडत आहे. गुन्हेगारी बर्फाच्या (हिमनग) लादीप्रमाणे केवळ एकदशांश वर आणि नऊदशांश पाण्याखाली लपल्याप्रमाणे आहे असे म्हणता येईल.

गुन्हेगारी समस्येची कारणे :

वाढते दारिद्र्य, वाढलेली लोकसंख्या आणि त्याप्रमाणात गरजा भागविणाऱ्या वस्तुची टंचाई, बेरोजगारी ही आर्थिक आहेत. चंगळवादामुळे मोजकेच लोक (४ ते ५%) श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. तर कोट्यावधी लोक (४०) कोटी गरीबी रेषेखाली (किमान अन्न, वस्त्र आणि पाणी नसणे) जगत आहेत. याशिवाय व्यापारी क्षेत्रात लबाडी आणि भेसळ वाढत आहेत. श्रीमंतांविरुद्ध गरीबांनी चिडुन उठावे आणि आपल्या हक्काचे अन्न मागून घ्यावे यासाठी क्रांती व्हावी लागते. परंतु अशी क्रांती होण्यासाठी वैचारिक परीवर्तन व्हावे लागते. भारतात निरक्षरता, जातीयता, विषमता आणि विभिन्नता आहे त्यामुळे सर्व गरीब व सुशिक्षित एकवटून प्रस्थापित श्रीमंताविरुद्ध उठाव करतील असे क्वचितच घडते. याउलट गरीब अधिक गरीब होत आहेत आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. भारतात तरी दारिद्र्य दुर झाल्याशिवाय गुन्हेगारी कमी होणार नाही. जगण्यासाठी लागणाऱ्या किमान गोष्टी - रोजचे अन्नधान्य, भाजीपाला, दुध, साखर, तेल, साबण, किमान कपडे, पुस्तके, औषधे स्वस्त भावाने मिळाले पाहिजेत. असे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत काळ्याबाजाराचे महाग वस्तु विकणारे व्यापारी लबाडी करीत राहतील. अन्नातील भेसळ होत राहील, चोऱ्या होत राहतील. राजरोस लुटमार होईल आणि

बेकायदेशीरित्या वाढतच राहील. आर्थिकदृष्ट्या कमजोर गटांना विकासासाठी मदत केली नाही तर त्यांच्यातील नैराश्य वाढत जाईल आणि राजकीय पक्ष व धार्मिक संघटना अशा निराश जनतेला हिसंक कारवायांसाठी किंवा राष्ट्रद्रोही उपद्रव देणाऱ्या घटनांमध्ये वापरतील.

भरमसाठ लोकसंख्या हे गुन्हेगारीला प्रोत्साहन मिळणारे दुसरे कारण आहे. लोकसंख्या जास्त असल्यामुळे रस्ते, रेल्वेगाड्या, वाहने आणि इतर वस्तु पुरणार नाहीत व त्या वस्तुसाठी प्रत्येक ठिकाणी भांडणे होत राहतील. विना टिकिट प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढतच राहील. थोडे काही मनाविरुद्ध झाले तर जमावाची सहनशीलता संपते आणि बसेस जाळतो. दवाखाने आणि शिक्षणसंस्था येथील किंमती सामानाची नासधुस करतो. रस्ते अडवून वाहतूकीत अडथळे निर्माण करतो ही गुन्हेगारी समाजाचे स्वास्थ बिघडवतात आणि असा अस्वस्थ समाज विकासापासून वंचित राहतो.

११.७ सारांश

गुन्हे जेव्हापासून घडत आहेत तेव्हापासून गुन्ह्याच्या कारणांचा शोध मानव सातत्याने घेत आलेला आहे. त्यामुळेच अपराधाच्या अथवा गुन्ह्याच्या कारणांचा शोध एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे असे म्हणता येईल. मानवी स्वभाव व त्याचे व्यक्तीमत्त्व हे तर अत्यंत गुंतागुंतीचे आहेच पण त्याचबरोबर त्याच्या सभोवताली असणारी सामाजिक, आर्थिक परिस्थिती आणि पर्यावरण हे देखील तितकेच गुंतागुंतीचे आहे व ते अधिकाधिक गुंतागुंतीचे बनत चालले आहे. त्यामुळेच गुन्ह्याच्या कारणांचा शोध हा गुंतागुंतीचा व बहुआयामी विषय बनला आहे. गुन्ह्यांच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न समाजशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, मनोविकृतितज्ज्ञ यांनी केला आहे व त्यातुनच गुन्ह्यांची विभिन्न कारणे, कारणमीमांसा आपल्या समोर अभ्यासासाठी उपलब्ध झाली आहे. गुन्ह्यांची व्याख्या, स्वरुप, गुन्हेगारी वर्तन हे काळ व स्थळ यावर अवलंबून असते. काळस्थळानुसार गुन्हेगारीविषयक दृष्टिकोनही बदलत जात असतो हे स्पष्ट करताना अपराधशास्त्रज्ञ स्टीकेन चॅफेर यांनी सांगितलेला विचार महत्त्वाचा वाटतो. काळ व स्थळानुसार गुन्हा व गुन्हेगार यांची व्याख्या बदलते. आज ज्यास आपण गुन्हा मानतो तो उद्या कदाचित गुन्हा मानला जाणारही नाही. उदा. 'गर्भपात' हा आवश्यकता असेल तर डॉक्टर करु शकतात.

११.८ कठीण शब्द

१. मनोविकृतितज्ज्ञ → मानवी मनाचा अभ्यास करणारे
२. पैलू → विविध मार्ग
३. विवेकी → सद्बुद्धी
४. सराईत → वारंवार एकच कृत्ये करणारा
५. आकस्मिक → कळत-नकळत घडणारी घटना
६. समिक्षा → मुल्यमापन करणे
७. नामाभिधान → शिक्का मारणे, शिक्कामोर्तब करणे
८. सक्रीय → उत्साही
९. अबाधीत → कायम, नियमीत

११.९ अभ्यासाचे प्रश्न

१) गुन्हेगारी सिद्धांताचे विविध दृष्टिकोण स्पष्ट करा.
२) रॉबर्ट मर्टन यांचा नामाभिधान सिद्धांत विशद करा.
३) गुन्हा म्हणजे काय सांगुन गुन्ह्याचे प्रकार सांगा.
४) पांढरपेशी गुन्हा आणि भ्रष्टाचार यावर भाष्य करा.
५) चोरटा व्यापार यावर टिप्पणी लिहा.

❖❖❖❖

१२

सायबर गुन्हेगारी

घटक रचना :

१२.० उद्दिष्टे
१२.१ प्रस्तावना
१२.२ सायबर गुन्हेगारी
१२.३ महिलांविरुद्ध हिंसा
१२.४ लहान मुलांची तस्करी
१२.५ स्त्रियांची तस्करी
१२.६ सारांश
१२.७ कठीण शब्द
१२.७ अभ्यासाचे प्रश्न

१२.० उदिष्ट्ये

१) सायबर गुन्हेगारीचा अर्थ समजुन घेणे आणि सायबर गुन्हेगारी कशाला म्हणतात हे समजुन घेणे उदिष्टे आहे.
२) सायबर गुन्हेगारीची जागतिक पार्श्वभुमी जाणून घेणे.
३) महिलांचविरुद्ध हिंसेचा अभ्यास करणे.
४) महिलांविरुद्ध हिंसा कोणत्या कारणामुळे घडते त्याचे अध्ययन करणे.
५) महिलाविरुद्ध हिंसेचे प्रकार कोणते-कोणते आहेत याचा अभ्यास करणे.
६) नक्षलवाद म्हणजे काय ? याचा सविस्तर अभ्यास करणे.
७) नक्षलवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
८) लक्षलवाद निर्माण होण्याची कोण-कोणती कारणे आहेत याचा सविस्तर अभ्यास करणे.
९) तस्करी म्हणजे काय याचा अर्थ समजावून घेणे.
१०) लहान मुलांची आणि स्त्रियांची तस्करी याविषयी माहिती जाणून घेणे.
११) तस्करी ही जागतीक घटना कशी आहे याविषयी अध्ययन करणे.
१२) स्त्रियांची तस्करी ही एक जटील घटना आहे यांचा सविस्तर अभ्यास करणे.
१३) लहान मुलांची तस्करी आणि महिलांची तस्करी याला जबाबदार घटकांचा अभ्यास करणे.

१२.१ प्रस्तावना

गुन्हेगारी शेत्रात समाजातील इतर क्षेत्राप्रमाणेच नवनवीन बदल होत असतात, नविन प्रकार घडताना आढळतात, जग जसे बदलत आहे, तसेच गुन्हेगारीची तंत्रे, स्वरुपही बदलत असताना दिसत आहे. अपराधशास्त्रात याद्वारे नविन अभ्यासक्षेत्राची भर पडते. गेल्या तीन दशकांमध्ये जगातील जवळपास सर्वच देशामध्ये संगणक क्षेत्राचा शिरकाव व विकास झालेला दिसतो. झपाटयाने वाढणाऱ्या संगणकिकरणामुळे आणि संगणक क्रांतीने जगाला एका खेडयात रुपांतरीत केले आहे. ''संगणक जाणे'' (कॉम्पुटर नेटवर्क) इंटरनेट, वेबसाईट, यामुळे जगातील समस्त समाज ''परस्परसंवादी'' झाला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या (Information Technology) या सर्वस्पर्शी तंत्रज्ञानामुळे जगातील संवाद, व्यापार, शिक्षण, संस्कृती, उदयोग यासहीत सर्वच क्षेत्रात परिवर्तन झालेले आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वच क्षेत्रात मोठया प्रमाणात होताना दिसतो आहे. याचे कारण त्याची गती आणि जगातील अंतर नष्ट करण्याची कुवत होय. कोणत्याही तत्रज्ञानाचा उपयोग जसा होतो तसाच दुरुपयोगही होतो. संगणक अथवा माहिती तंत्रज्ञानाचा वापर गैरप्रकारांसाठी, गुन्हेगारीसाठी केला जात आहे. यालाच ''सायबर गुन्हा'' (Cyber Crime) म्हटले जाते.

सायबर (Cyber) यामुळे इंग्रजी शब्दांचा मुळ अर्थ To fly - उड्डान करणे हा आहे. म्हणजेच संगणकाच्या माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन इंटरनेटद्वारे आपण प्रत्यक्ष एके ठिकाणी बसुन जगातील कोणत्याही व्यक्तीपर्यंत पोहचु शकतो. त्यासाठी प्रत्यक्ष जाण्याची गरज नाही. असे तंत्रज्ञान असणारा समाज ''सायबर समाज'' म्हणून ओळखला जातो व अशा समाजात अशा तंत्रज्ञानाचा वापर करुन केलेला गुन्हा म्हणजे ''सायबर गुन्हा'' होय. याबाबत कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडियाच्या सॉप्टवेअर विभागाचे अध्यक्ष दिपक शिकारपूर आपल्या ''सायबर कायदा आणि आपण'' या पुस्तकात म्हणतात, ''संगणकीय माहितीचा गैरवापर करुन वा अनाधिकृतरित्या दुसऱ्याच्या संगणकावर प्रवेश माहितीचे नुकसान करणे वा ती नष्ट करणे असे विकृत प्रकार गेली दहा वर्षे सायबर विश्वात सर्रास चालू आहेत. वरील कृष्णकृत्य करणारे लोक हे निष्णात संगणकतज्ञ वा वापरकर्ते असतात''.

थोडक्यात चोर ज्याप्रमाणे घरात घुसून पैसे, सोने नाणे, वस्तुची चोरी करतो त्याचप्रकारे सायबर गुन्हेगार बेकायदेशीररित्या दुसऱ्या व्यक्ती वा संस्थेच्या संगणकाच्या प्रणालीत शिरकाव करुन त्यातील माहिती, ज्ञान व अन्य सामग्री बिघडवतात, नष्ट करतात किंवा चौर्यकर्माने फाईल्स, प्रोग्रॅम्स स्वत:साठी उपयोगात आणतात. मात्र हे करण्यासाठी संगणक बुध्ध्दीमत्ता आणि ज्ञान अपरिहार्य आहे. त्याशिवाय हे शक्य नाही. सायबर गुन्हा संगणक अज्ञानी माणुस करुच शकत नाही. हे सांगताना “The shrinking universe” या ग्रंथात तपन भट्टाचार्य म्हणतात. “Here, the thief actually a hacker did not steal the bank notes of gold biscuits or even other valuables that can easily be utilised by anybody. it is a computer cirme. Where the stolen ‘goods’ were actually computer files or programmes, which are perhaps useless to most of us. They are invaluable to computer experts, who know how to utilize them”.

सायबर गुन्ह्यात चोरीचा माल म्हणजे दुसऱ्याच्या संगणकातील फाईल्स, प्रोग्राम्स माहिती चोरुण घेणे, बेकायदेशीररित्या चोर मार्गाने 'पासवर्ड' मिळवून दुसऱ्याच्या संगणात शिरुन माहिती, ज्ञान लुटणे म्हणजे 'सायबर' गुन्हा होय.

१२.२ सायबर गुन्हेगारी

सायबर गुन्हेगारी कोण करु शकतो याची माहिती "सायबर कायदा आणि आपण" या ग्रंथात दिपक शिकापूर, सो. सरिता भावे, उज्वल मराठे यानी दिली आहे. ती याप्रमाणे.

१) जाणूनबुजून किंवा नकळत संगणक विषाणू पसरविणारे

२) आक्षेपार्ह व अश्लिल माहिती पाठविणारे व बाळगणारे.

३) अनाधिकृतरित्या इतरांच्या वेबसाईटवर प्रवेश करुन माहिती पळविणारे, नष्ट करणारे वा बदलणारे.

४) अनधिकृत सॉफ्टवेअस बाळगणारे व विकणारे.

५) डिजीटल पत्रे वा माहिती बदलणारे व विकणारे.

६) इ-मेलचा वापर करुन धमक्या देणारे व इतर गुन्हे करणारे.

७) वेबसाईटसाठी "डोमेन" नावे अनाधिकृतरीत्या बळकावणारे.

८) इतर लोकांचे पासवर्ड चोरुन अनधिकृतरीत्या माहीती चोरणारे व पळवणारे.

९) डिजीटल सही / प्रमाणपत्राची नक्कल, चोरी व गैरवापर करणारे.

सायबर गुन्हेगारीची जागतिक पार्श्वभुमी :

जागतीक पातळीवरील चित्र पाहता धोकादायक व हानीकारक संगणककृती या १९८७ सालापासुन सुरु झालेल्या होत्या. त्यावेळी दोन पाकीस्तानी भावंडानी सी ब्रेन व अशर हे दोन संगणक विषाणू (कॉम्प्युटर व्हायरस) निर्माण करुन सोडले होते. त्यामुळे संगणकांना बाधा पोहोचली होती. १९८८ साली रॉबर्ट मॉरीस या कॉर्नेल विदयापीठाच्या विदयार्थ्याने अशाच विषाणुंचा प्रदूर्भाव करुन इंटरनेटचे कामकाज कही दिवसांसाठी बंद पाडले होते. त्याने इंटरनेट किटक (Internet worm) निर्माण करुन युनिव्हर्सीटी ऑफ कॅलिफोर्निया बर्कले परिसरात आघात केला होता. त्यानंतर हजारो इंटरनेटधारक संगणकांना या विषाणुंची बाधा झाली होती त्यानंतरच इंटरनेटवर "विषाणू हल्ला" (Virus attack) होऊ शकतो हे स्पष्ट झाले.

यानंतर पीटरबर्ग येथील कार्नेज मेलॉन विदयापीठात कॉम्प्यूटर इमरजन्सी रिस्पॉन्स सेंटर (CERT) यांची स्थापना संगणक सुरक्षा करण्यासाठी करण्यात आली. सुरक्षा धोक्याची माहिती व सुरक्षा व्यवस्था या संस्थेद्वारे पुरविली जाते. या संस्थेने १९९४ मध्ये सर्व नेटवर्क व्यवस्थापकांना संदेश पाठवून कळविले की, हजारो पासवर्डस हे हस्तक्षेपी व्यक्तीने चोरले आहेत. काही वर्षांपूर्वी फक्त ५० गुन्हे हे सुरक्षाभंग केल्याचे होते. १९९३ साली १३०० इंटरनेट हे अश्लिल साहित्य प्रसारणासाठी उपयोगात आणल्याचे उघडकीस आले. ब्रिटनमधील एका चाचांच्या समुहाने बारा बहुराष्ट्रीय उदयोगसमुहाच्य वेबसाईट हॅक केल्या व बरीच गुप्त माहिती चोरली आणी परत करण्यासाठी दहा लक्ष पाऊंड खंडणी मागितली. विकसीत देशाप्रमाणे विकसनशली देशातही सायबर गुन्हेगार निर्माण होत आहेत, क्रेडीट कार्डचे नंबर चोरणे, त्याचा

गैरवापर करणे, इ-मेल खोटया पाठवून बँक संस्था यांना फसविणे असे प्रकार घडताना आढळतात.

गुन्हेगारी क्षेत्रातील मादक द्रव्ये, अश्लिल साहित्य, दहशतवाद आणि पैशाची लूट (Drugs, Pornography, terrorism, Money laundering) या चारही आजच्या प्रमुख गुन्हेप्रकारांचे अस्तित्व सायबरगुन्ह्यात आढळते. म्हणुनच तपन भट्टाचार्य म्हणतात, "The cyber space has all something more too. Therefore, it is no wonder that cyber cyber cirmes would thrive the same way as the worldly crimes do". आजच्या जगातील चांगली, हिणकस अशी सर्व वैशिंष्टे सायबर विश्वात आहेत, काही विशेषही त्यात आहे, त्यामुळे जगातील इतर गुन्हेगारीप्रमाणेच सायबर गुन्हेगारीही मोठ्या प्रमाणात वाढेल यात आश्चर्य वाटायला नको".

भारतामध्ये केंद्र सरकारने "माहिती तंत्रज्ञान कायदा २०००" हा १८ मे २००० रोजी लोकसभा व राज्यसभेत मंजूर केला व पुढे २० जुन २००० रोजी राष्ट्रपतीनी त्यास मान्यता देऊन शिक्कामोर्तब केले. सायबर कायदा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या "माहिती तंत्रज्ञान कायदा २०००" मध्ये एकूण १३ प्रकरणे आहेत. त्यातील प्रकरण अकरावे हे 'सायबर गुन्हे' या विषयासंबंधी स्वतंत्र आहे यात सायबर गुन्ह्यांचे प्रकार आणि त्यावरील शिक्षा, दंड याची तरतुद दिलेली आहे. ती खालील प्रमाणे आहे.

भारतीय कायदयानुसार सायबर गुन्हा (माहिती तंत्रज्ञान कायदा २०००)

कलम ६५ : संगणकीय दस्ताऐवजातील फेरफार

संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क यासाठी वापरावयाचे आणि कायदयानुसार जतन करावयाचे संगणकीय संकेत, जो कोणी जाणुनबुजून किंवा हेतुपूर्वक लपवेल / नष्ट करेल किंवा त्यात फेरफार करेल किंवा हेतुपूर्वक, जाणीवपूर्वक दुसऱ्यास असे संकेत लपविण्यास / नष्ट करण्यास / फेरफार करण्यास कारणीभुत ठरेल त्यास तीन वर्षापर्यतची कैदेची किंवा दोन लाख रुपया पर्यंतच्या दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा देता येतील.

कलम ६६ - संगणक यंत्रणा हॅक करणे

१) कोणा व्यक्तीचे नुकसान होण्यास जो जाणीवपूर्वक करणीभुत होता किंवा अशी हानी लोकांना पोहचविण्यास आपण कारणीभुत होऊ शकू याची जाणीव असुनही जो संगणकातील माहिती नष्ट करतो, बदलतो किवा त्यातील काही माहिती नष्ट करतो, बदलतो किवा त्यातील काही माहिती गाळून टाकतो, त्या संगणकाची उपयुक्तता नष्ट करतो तो "संगणक हॅकर" ठरतो. २) जो कोणी संगणक हॅक करतो त्याला तीन वर्षापर्यंत कैदेची किंवा दोन लाख रुपयापर्यनच्या दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा दिल्या जातील.

कलम ६७ - इलेक्ट्रॉनिक स्वरुपात अश्लील माहितीचे प्रकाशन

लोकांची लैगिक विषयक उत्सुकता वाढविणारे किवा त्याना कुमार्गाला नेणारे लोकांची किंवा त्यांना भ्रष्ट करणारे असे कोणतेही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील साहित्य वाचविण्यासाठी, पाहण्यासाठी किंवा ऐकण्यासाठी प्रकाशित करणारा किंवा प्रसारीत करणारा किवा अशा साहित्याच्या प्रकाशनाला कारणीभुत ठरणाऱ्या व्यक्तीस शिक्षा दिली जाईल. गुन्हा दुसऱ्यांदा

केलेला असेल किवा पहिल्याच्या पाठोपाठच केलेला असेल तर जास्तीत जास्त दहा वर्षापर्यंतची कैदेची आणि दोन लाख रुपयापर्यतच्या दंडाची शिक्षा दिली जाईल.

कलम ६८

कलम ६८ मध्ये शासनास वा नियंत्रण अधिकार असलेल्या अधिकाऱ्यांना संगणक प्रणालीबाबत योग्य तो आदेश देण्याचा किंवा कामकाज थांबविण्याचा अधिकार बहाल केला आहे. याचा भंग करणाऱ्यास जास्तीत जास्त तीन वर्षे शिक्षा अगर दोन लाखांचा दंड होऊ शकतो.

कलम ६९ - माहिती पुरविण्याबाबत शासन / नियंत्रणकाचे बंधन

देशाच्या एकतेसाठी, देशाच्या सार्वभौमत्वासाठी किंवा सार्वजनीक हितासाठी तसेच दखल पात्र गुन्हयाला मिळणारे प्रोत्साहन रोखण्यासाठी कोणत्याही संकणकाद्वारे देण्यात येणारी माहिती अडवून मिळविण्याचा शासनसंस्थेला वा नियंत्रकाला अधिकार आहे. संगणकधारकाने तांत्रिक माहिती व सहाय्य देणे बंधनकारक आहे. या कलमानुसार नियंत्रकास वा शासनास देशहितासाठी माहिती न देणाऱ्या व्यक्तीस जास्तीत जास्त सात वर्षाची शिक्षा देण्याची तरतुद आहे. देशहित व समाजहितविरोधी या तंत्रज्ञानाचा उपयोग होऊ नये यासाठी ही तरतुद आहे.

कलम ७० - संरक्षित किंवा सुरक्षित यंत्रणा

१) योग्य ते सरकार, अधिकृत गॅझेटमधील प्रकटनाद्वारे कोणताही संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क सुरक्षीत यंत्रणा म्हणून घोषित करु शकतो.

२) योग्य ते सरकार उपकलम १) खाली जाहीर केलेल्या संरक्षित यंत्रणा हाताळण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींना लेखी आदेशाद्वारे संबंधीत यंत्रणा हाताळण्याचा अधिकार देऊ शकतो.

३) या कलमातील तरतुदीचा भंग करीत जी व्यक्ती संरक्षीत यंत्रणेपर्यंत प्रवेश मिळवेल किंवा प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न करेल ती व्यक्ती जास्तीतजास्त दहा वर्षे मुदतीपर्यतची कैदेची शिक्षा आणि दंडाच्या शिक्षेला पात्र राहिल.

कलम ७१ - गैरसादरीकरणाबद्दल दंड

कोणताही परवाना किंवा डिजीटल स्वाक्षरी दाखला मिळविण्यासाठी नियंत्रकाकडे जो कोणी गैर माहिती सादर करेल किंवा जो कोणी महत्वाची माहिती दडवून ठेवेल त्याला जास्तीतजास्त दोन वर्षापर्यंतची कैदेची किंवा एक लाख रुपयापर्यंतच्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

कलम ७२ - खासगीपणा व गुप्तता तत्वाचा भंग

या कलमानुसार इलेक्ट्रॉनीक नोंदी / पुस्तके / रजिस्टर / पत्रव्यवहार / माहिती / दस्तऐवज किवा इतर स्वरुपातील साहित्य ज्या व्यक्तीचे आहे त्याच्या परवानगीशिवाय त्याच्या इलेक्ट्रॉनीक साहित्यापर्यंत प्रवेश मिळविणे वा संमतीशीवाय अन्य व्यक्तीस उघड करुन दाखविणे यासाठी जास्तीत जास्त दोन वर्ष मुदतीपर्यंतची कैद किंवा एक लाख रुपयापर्यतचा दंड किंवा दोन्हीही शिक्षा देता येतील.

कलम ७३ - खोटा तपशील प्रकाशन

माहिती तंत्रज्ञान कायदा (सायबर कायदा) नुसार डिजिटल स्वाक्षरी दाखल्यातील काही तपशील खोटा प्रकाशीत केल्याबद्दल दोन वर्षापर्यतची कैद किंवा एक लक्ष रुपयांपर्यत दंडाची तरतुद आहे.

कलम ७४ - फसवणूकीच्या हेतुंसाठी प्रकाशन

काही फसवणूकीच्या हेतुनी बेकायदेशीर करेल किवा दुसऱ्यासाठी इतर मार्गानी उपलब्ध ठेवेल त्याला जास्तीतजास्त दोन वर्षापर्यतची मुदतीची कैद किवा एक लाख रुपयांपर्यतचा दंड किवा दोन्हीही शिक्षा देता येतील.

कलम ७५ -

कलम ७५ नुसार याबाबत भारताबाहेर घडणाऱ्या सायबर गुन्हयांना किंवा कायदेभंगानाही हा कायदा लागू केलेला आहे. तर कलम ७६, ७७ नुसार कोणताही संगणक, संगणक यंत्रणा क्लॉपीज, कॉम्पॅक्ट डिस्क, टेपड्राइव्ह किवा संगणक संबधीत साधनसुविधा, या कायदयाचा भंग झाल्यास जप्त करण्यात येतील सायबर कायदा निर्माण करणारा भारत हा जगातील तेरावा देश आहे.

सायबर सुरक्षेचे मार्ग : सायबर पोलिस

सायबर गुन्हेगार हे संगणकतज्ज्ञ असल्याने, त्यांना पकडण्यासाठी 'सायबर पोलीस'हे संगणक तज्ञ असणे गरजचे असते. इ-मेल बाबत गैरप्रकार होऊ नयेत म्हणून इ-मेलचा मेसेज सांकेतिकीकरणाने (Encryption) कोणासही सहजासहजी कळणार नाही अशा रुपात पाठविला जातो. हा इ-मेल कसा वाचायचा याची 'की' इ-मेल ज्याला पाठविला जातो त्यास दिली जाते. त्यामुळे ज्याच्याकडे 'की' आहे तोच इ-मेल वाचु शकतो. ज्यास (Decryption key) म्हटले जाते.

याशिवाय संगणकाच्या संरक्षणासाठी अनेकप्रकारचे सुरक्षा उपाय केले जात आहेत. त्यामध्ये संगणक सुरक्षेसाठी (Firewall) ही संरक्षक ढाल तयार केली जाते. बाहेरुन आलेले संदेश फायर वॉलद्वारे तपासुन घेऊनच संगणकामध्ये प्रवेंश करु शकतात. बऱ्याचदा 'अज्ञान रिमेलर' वापरुन गैरप्रकार खोटे फसवे संदेश दिले जातात. त्याबाबत जागरुकता पाळावी लागते.

संगणक गुन्हयांना जागतीक स्वरुपात व्याप्ती आहे. त्यामुळेच संगणक गुन्हेगारी जगभर पसरलेली आहे. त्यामुळे यावर त्यामुळेच संगणक गुन्हेगारी जगभर पसरलेली आहे. त्यामुळे यावर नियंत्रण ठेवणे कठीण बाब आहे. सायबर गुन्हयांसाठी दहशतवाद, अमली पदार्थ याच्याप्रमाणेच आंतरराष्ट्रीय कायदा तयार करणे गरजेचे ठरते. यापुढील काळात संगणकाद्वारे होणारी सायबर गुन्हेगारी वाढेलच पण त्याबरोबर इतर प्रकारच्या गुन्हेगारीतही सायबर गुन्हे तंत्राचा व संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसुन येईल. इ-कॉमर्स, इ-गर्व्हर्नन्स, इ-लर्नीग, याप्रमाणे इ-क्राइम हा प्रकार उदयाला आला आहे म्हणता येईल.

१२.३ महिलांविरुध्द हिंसा (VIOLENCE AGAINST WOMEN)

इतिहासाच्या वेगवेगळया कालखंडात स्त्रियांच्या स्थिती आणि गतीमध्ये कालानुरुप बदल होत गेला. आधुनिक काळात स्त्रिया अनेक क्षेत्रात प्रगतीपथावर आहेत. स्वतंत्र अस्तित्व, स्वतंत्र ओळख आणि स्वतंत्र व्यक्तीमत्वाची आस लागलेली स्त्री आज आपणास पाहावयास मिळेल. आत्मभान आणि निर्भयता प्राप्त करण्यासाठी स्त्रियांचा संघर्ष आजही चालू असलेला

आपणास पाहावयास मिळतो. भारतीय उपखंडात आणि भारतात स्त्रियांच्या संदर्भात प्रचंड मोठी उलथापालथ झालेली दिसुन येते.

प्रत्येक कालखंडाच्या विविध टप्प्यांवर आपले अस्तित्व अबाधीत ठेवण्यासाठी स्त्रियांनी मोठा संघर्ष केला आहे. अत्यंत प्रतिकुल अवस्था आणि परिस्थिती असताना, सामाजिक बंधने तसेच कौटुंबीक बंधने झुगारत अनेक स्त्रियांनी जाणिव - जागृतीची परंपरा निर्माण केली.

स्त्रियांचा संघर्षाचा इतिहास आणि वर्तमान काही प्रमाणात समानतेची स्थिती अशी अवस्था असली तरी स्त्रियांच्या संदर्भात असमानतेची भीषण वास्तवता आजही आपणास पाहावयास मिळते. शिक्षण, धर्म, व्यवसाय, राजकारण, आर्थिक अधिकार इत्यादी संदर्भात असणारी असमानता अस्वस्थ करणारी आहे. स्त्रियांच्या संदर्भात असमानतेतुन अनेक गहन समस्या पुढे येतात बलात्कारासारखी हिंसक समस्या आज समाजापुढील मोठे आव्हान आहे. मुलगी झाली म्हणून सुनेचा तसेच पत्नीचा छळ होण्याच्या घटना आजही पुढे येतात. स्त्रिभ्रूणहत्या ही समस्या तर समाजाच्या तर समाजाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहे. अंधश्रध्देपोटी संशयातुन अनेक महिलांना ठार करण्याची लोकांची मानसिकता विकृतीचेच प्रतिक आहे. हुंडयापायी बळी जाणाऱ्या स्त्रियांची संख्या आजही कमी नाही. अशा एक ना अनेक समस्या स्त्रियांच्या हिंसेच्या संदर्भात असलेल्या दिसुन येतात.

महिलांविरुध्द हिंसेचे कारणे

महिलांविरुध्द हिंसेचे स्वरुप सार्वत्रिक आहे. जगातील विविध देशांमध्ये महिलांच्या बाबतीत हिंसेचे अनेक प्रकार आपणास पहावयास मिळतात. महिलांच्या विरुध्द हिंसेला विविध कारणे, विविध घटक किंवा परिस्थिती कारणीभुत असली तरी काही सार्वत्रिक किंवा सामान्य करणांची चर्चा आपण करणार आहोत.

१) हुकूमशाही पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्था

भारताची कुटुंबव्यवस्था ही पुरुषसत्ताक मानसिकतेवर आधारीत आहे भारतात राजकीय लोकशाही असली तरी त्या लोकशाहीतील कुटुंबव्यवस्था ही हुकुमशाही आणि पुरुषसत्ताक आहे. भारतात स्त्रियांना समानता, सुरक्षा देण्यासाठी ४२ कायदे बनविण्यात आले आहेत. या सर्व कायदयांचे संदर्भ पाहिल्यास पुरुषसत्ताक व्यवस्था अडचणीत येते. म्हणुनच स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते आणि अनुषंगाने हिंसा होते. उदा. हुंडाबळी, विविहितेचा छळ, सतीची प्रथा, स्त्रीभ्रूणहत्या.

२) महिलांच्या प्रतिद्वेषाची भावना

महिलां विरुध्द हिंसेच्या अनेक घटनांमध्ये घृणेच्या भावनेमुळे महिलांना हिंसेचे शिकार व्हावे लागते. ही भावना हिंसापूर्ण कार्याचे मुळ असल्याचे अनेकदा दिसून येते. अनेकदा अपराधी व्यक्ती सामान्य व्यक्ती असतात. त्यांचा पुर्वेइतिहास हा हिंसेच्या कार्याशी संबंधीत नसतो. तेव्हा एकाच निष्कर्षापर्यंत पोहोचावे लागते तो म्हणजे स्त्रियांना हिंसा करुन असे अपराधी एकप्रकारे समाधानी होतात. म्हणजेच महिलांच्या प्रति असलेली द्वेषाची भावना ही एक प्रकारची मानसिक प्रक्रिया असते, जिथे स्वरुप येते.

३) परिस्थिती

परिस्थितीजन्य कारणांमुळे बहुधा पीडीत स्त्रीया तसेच गुन्हेगार हे दोन्ही घटक फारसे जबाबदार नसतात. कधी कधी अशी परीस्थीती निर्माण होते की, ज्याचे परिणाम हिंसात्मक असतात. पती - पत्नीच्या भांडणांमध्ये आणि पत्नीच्या संदर्भात होणाऱ्या हिंसेमध्ये हा घटक अधिक प्रभावी ठरतो. तसेच कित्येकदा बलात्काराच्या घटना अचानक होतात. अशा घटनांमध्ये गुन्हेगाराने गुन्ह्याची जाणीवपूर्वक योजना केलेली नसते. परंतु परिस्थिती पोषक बनते आणि हिंसक घटना घडतात.

४) व्यसनाधीनता (नशा)

हिंसेच्या अनेक प्रकरणांमध्ये असे आढळून येते की, गुन्हेगार किंवा आक्रमक व्यक्ती नशेमध्ये होता उत्तेजक द्रव प्राशन केल्यानंतर व्यक्तीची सारासार विचार करण्याची शक्ती क्षीण होते. परिणामी हिंसक कृत्ये घडतात. दारुडया पतीने पत्नीवर केलेले हिंसक हल्ले सर्रास घडत असतात. अशा घटनांना व्यसनाधीनता किंवा नशा कारणीभुत ठरते. नशा केलेला व्यक्ती स्वत:वरील नियंत्रण हरवुन बसतो, परिणामांची जाणिव त्याला नसते, अशा मानसिक अवस्थेत तो हिंसक होण्याची शक्यता वाढते.

महिलांविरुद्ध हिंसेचे प्रकार / वर्गीकरण

१) अपराधिक हिंसा -

भारतीय समाजातील स्त्रिया प्राचीन काळापासून अपमान, यातना आणि शोषणाच्या शिकार झालेल्या आहेत आधुनिक काळात महिलांच्या स्थितीमध्ये थोडे परिवर्तन झाले असले तरी काही दशकापूर्वी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. महिला विरुद्ध हिंसेच्या प्रकारामध्ये अपराधीक स्वरुपाच्या हिंसेचा समावेश होतो. अपराधिक स्वरुपाच्या हिंसेमध्ये प्रामुख्याने बलात्कार, अपहरण आणि हत्या यांचा समावेश होतो. बलात्काराची समस्या केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगभर गंभीर समस्या म्हणून मानली जात आहे. अन्य देशाच्या तुलनेत भारतात या समस्येची तीव्रता कमी आहे. अमेरिकेत सरासरी दरवर्षी दर एक लाख लोकसंख्येमागे बलात्काचे प्रमाण २६ आहे. कॅनडात हे प्रमाण सरासरी ८ तर इग्लंडमध्ये हे प्रमाण ५.५ एवढे आहे. भारतात हे प्रमाण ०.५ एवढे आहे. भारतात सरासरी चार तासांत सात बलात्कार होतात. दरवर्षी साधारणत: १५००० बलात्काराच्या घटना घडतात.

अपराधिक हिंसेमध्ये बलात्काराएवढीच अपहरणाची समस्यादेखील गंभीर आहे. अल्पवयीन मुली तसेच स्त्रियांना फुस लावून आणि जबरदस्तीने पळवून नेणे या घटनेला अपहरण असे म्हणतात. अपहरणाच्या उददेशांमध्ये अवैध शरीरसंबंध प्रस्थापीत करणे, इच्छेविरुद्ध विवाह करणे तसेच आर्थिक अपयशांचा समावेश होतो. भारतात १९९२ ते ९८ या कालावधीत झालेल्या सर्वेक्षणानुसार एका वर्षात जवळपास १५,००० महिलांचे अपहरण झाल्याच्या घटना घडतात. भारतात अपहरण होणाऱ्या महिलांचे प्रमाण साधारणत: दर लाख लोकसंख्येमागे २.० एवढे आहे. भारत सरकारच्या १९९८ च्या अहवालानुसार प्रत्येक ३३ मिनिटाला एक किंवा एका दिवसात ४३ तर वर्षात १५,६१७ महिला अपहरणाच्या घटना घडतात. अपहरण होणाऱ्या स्त्रियांमध्ये अविवाहीत स्त्रियांची संख्या अधिक आहे. अपहरणाच्या एकूण प्रमाणामध्ये ८०% पेक्षा जास्त प्रकरणांमध्ये लैगिंक अत्याचार हा प्रधान उददेश असतो.

२) कौटुंबीक हिंसा -

भारतातील कौटुंबीक हिंसाचाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता आणि या हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची मोठी संख्या लक्षात येते. भारतीय संविधानाच्या कलम १४ अन्वये महिलांना भेदभावापासुन मुक्ती, कलम १५ अन्वये स्त्री-पुरुष समानता आणि कलम २१ अन्वये जिविताचे व स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे, हा व्यापक हेतू डोळयासमोर ठेवून महिलांनी कौटूंबीक अत्याचाराला बळी पडू नये म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ व नियम २००६ संपूर्ण भारतात २६ ऑक्टोबर २००६ पासुन लागु केला आहे.

कौटुंबिक हिंसाचारामध्ये शारीरीक, शाब्दिक, लैगिंक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानीत करणे, तिला शिविगाळ करणे, अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे तसेच धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, अपत्य नसल्यामुळे तिला बोलने जखमी करणे किंवा पिडीत स्त्रीचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे किंवा तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंडयाची मागणी करणे, महिलांचे स्वत:चे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासुन तिला वंचीत करणे, घराबाहेर काढणे इत्यादीचा समावेश होतो.

कौटुंबिक हिसेंमध्ये हुंडाबळीप्रमाणेच पत्नीला मारहाण हा घटकदेखील तेवढाच महत्वपूर्ण आहे. हिंसक मारहाण, तोंडात मारणे, लाथ मारणे, चावणे, यातना देणे, मारुन टाकणे यासारख्या घटनांचा समावेश होतो. पत्नीला मारहाण होण्याच्या विविध कारणांमध्ये प्रामुख्याने पतीची व्यसनाधीनता (नशा), पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणे, हुंडा किंवा आर्थिक अपेक्षा, गैरसमज, पत्नीचे आक्षेपार्ह वर्तन, पत्नी पसंत नसणे, कुटुंबातील अन्य सदस्यांची गैरमर्जी इत्यादी कारणांचा समावेश होतो. भारतीय समाजातील कुटुंबात विधवा स्त्रिया आणि वृद्ध स्त्रियांच्या संदर्भात होणाऱ्या हिंसेच्या घटना होदेखील चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे.

३) सामाजिक हिंसा

सामाजिक हिंसेमध्ये सामाजिक घटक प्रभावी ठरतात. अशा प्रकारच्या हिंसेमध्ये प्रामुख्याने स्त्री-भ्रणहत्या, स्त्रियांची छेडछाडं, संपत्तीमध्ये स्त्रियांना हिस्सा देण्यास नकार देणे, अल्पवयीन विधवा स्त्रियांना सती जाण्यासाठी दबाव टाकणे, सुनेला हुंडा आणण्यासाठी त्रास देणे इत्यादी घटनांचा समावेश होतो. सर्वसाधारणपणे सामाजीक स्वरुपाच्या हिंसेला सामाजिक प्रतिगामी परंपरा आणि बुरसटलेली विकृत मानसिकता जबाबदार असते. प्रतिगामी शक्ती धर्माचा, श्रध्दांचा आणि परंपरांचा आधार घेऊन अशा हिसेला चालना देत असतात.

सर्वसाधारणपणे निसर्गत: एक हजार पुरुषांच्या मागे ९५२ मुली जन्माला येतात. भारतात हे प्रमाण दरहजारी ९६१ असल्याचा इतिहास आहे. परंतु मागील तीस वर्षात हे प्रमाण कमी होत गेल्याचे दिसते. स्त्रियांचे सरासरी आयुष्य पुरुषापेक्षा जास्त असते. ही एक नैसर्गीक रचना आणि प्रक्रिया आहे. परंतु आधुनिक काळात तंत्रज्ञानाचा गैरवापर करुन स्त्री-भ्रुणहत्या केल्या जाता आहेत. गेल्या तीस वर्षात स्त्री-भ्रूण हत्येच्या रुपाने मोठया प्रमाणात स्त्रियांची हत्या होत आहे असे म्हणावे लागेल. परिणामी २०११ च्या जनगननेणुसार दरहजार पुरुषांच्या मागे स्त्रियांची संख्या ९४० एवढी कमी झाल्याचे दिसुन येते. स्त्रियांना असमान वागणूक देण्याच्या परंपरांमध्ये स्त्री-भ्रूणहत्या ही स्त्रियांसंबंधी होणारी मोठी हिंसा आहे. अनेक सामाजिक घटक या समस्येला जबाबदार आहेत. आजपर्यंत सोनोग्राफी यंत्राद्वारे मुलीना गर्भातच संपवले जाते होते.

मात्र आता महानगरांमध्ये जनुकीय यंत्रणा आणि जनुकीय प्रयोगशाळांचा आधार होऊन गुणसुत्रात बदल केले जात आहेत.

कुटुंबाअंतर्गत मुलींच्या बाबतीत होणारी हिंसा ही देखील गंभीर आहे. त्याला देखील सामाजिक घटक जबाबदार असलेले दिसुन येतात. पाच वर्षाखालील मुलीवर होणाऱ्या लैंगीक अत्याचाराचे प्रमाण चारशे पटीने वाढले आहे. सतीप्रथेविरुध्द राजा राममोहन रॉय यांनी आंदोलन केले. जनजागृती केली. त्यामुळे ब्रिटिश सरकारला सतीबंदीचा कायदा करावा लागला, परंतू राजस्तानसारख्या राज्यात सतीप्रथा पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न अधुनमधुन होत असल्याचे निदर्शनास येते. दलित आणि आदिवासी स्त्रियांच्या बाबतीत घडलेली हिंसक प्रकरणे सतत समोर येत असतात. जातीय विद्वेषातुन दलित स्त्रिची नग्न धींड काढणे, आदिवासी स्त्रियांच्या अज्ञानाचा आणि असहायतेचा गैरफायदा घेऊन बलात्कार करणे अशा घटना नेहमीच घडत असतात. अंधश्रध्दा, चेटूक यासारख्या भ्रमाच्या आहारी जाऊन स्त्रियांच्या संदर्भात हिंसेचे प्रकरण सतत घडत असलेली आपण पाहत असतो. संशयाच्या आधारावर स्त्रियांना ठार मारण्याच प्रमाण देखील मोठे आहे.

१२.४ लहान मुलांची तस्करी

प्रस्तावना (Introduction)

भारतात बालमजुरींची मोठी संख्या आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्डस ब्युरोच्या म्हणण्यानुसार असे अनेक प्रकरण आहेत जेथे मुले रात्रभर गायब होतात. काही प्रकरणांमध्ये मुलांना त्यांच्या घरांतुन विकत घेतले आणि बाजारात विकले जाते. इतर बाबतीत नोकरीची संधी सादर केल्यामुळे मुलांना तस्करांच्या हातात (ट्रॅफिक्र्सच्या हातात) फसविले जाते. प्रत्यक्षात आगमनानंतर ते गुलाम बनतात. भारतात श्रम, भिकारी आणि लैंगीक शोषण यासारख्या बऱ्याच कारणांस्तव मोठया संख्येने मुलांचा संहार केला जातो. या गुन्हाच्या स्वरुपामुळे, हे ट्रॅक करणे कठीण आहे. आणि कायदयाच्या खराब अमंलबजावणीमुळे त्यास प्रतिबंध करणे कठीण आहे. बालकांच्या तस्करीसाठी भारत हा एक प्रमुख भाग आहे, कारण त्यापैकी बऱ्याच मालवाहु जहाजांमधुन प्रवास करणे किंवा भारताकडे जाणे नियत आहे. जरी बहुतेक तस्करी देशातच घडत असली तरीही नेपाळ आणि बांगलादेशातील बऱ्याच मोठया प्रमाणात बालकांची लागण झाली आहे. गरीबी आणि कमकुवत कायदयाची अमलबजावणी करणारी प्राथमिक कारणे आणि बालकांची तस्करी करणारी बरीच भिन्न भिन्न कारणे आहेत.

बालकांच्या तस्करीची कारणे

भारतातील व्यावसायिक लैंगिक शोषण आणि बालकांच्या तस्करीचे मुळ कारण म्हणजे दारिद्रय, शिक्षणाचा अभाव आणि त्याच बरोबर कुटुंबाच समोपदेशनाचा अभाव इत्यादी कारणे बालकांच्या तस्करीचे सांगता येतील. भारतातील बेरोजगारीचा दर खुपच जास्त आहे आणि येथे आर्थिक संधी नाहीत. मुलांना जेव्हा कामाची लालच दिली जाते तेव्हा त्याना खुप मोठा आर्थिक फायदा होईल असे सांगितले जाते परंतु खऱ्या अर्थाने त्यांना खाण्यापिण्यासाठी सुध्दा तरसावे लागते आणि त्यांना लैंगीक छळा सारख्या समस्येला तोंड दयावे लागते किंवा कर्जातुन आणि गरीबीतुन बाहेर पडण्यासाठी आपल्या स्वत:च्या मुलाना तस्करांना विकावे लागते. भारतासारख्या देशात देवदासी प्रथा सुध्दा बालकांची तस्करी करण्यासाठी कारणीभुत आहे. काही भागात लहान

मुलींना देवदासी म्हणुन सोडले जाते व त्याना धर्माच्या नावाखाली लैंगीक शोशनासाठी बळी पडावे लागते. किंवा धार्मीक गुलामगीरीत जीवन जगण्यास भाग पाडले जाते. दुसरे एक म्हत्वाचे कारण म्हणजे पर्यटकांच्या मागणीमुळे देखील बऱ्याच मुलांची तस्करी करण्यात आली आहे.

बाल तस्करीचे प्रकार

ह्यामध्ये घरकामासाठी लहान बालकांचा वापर, गुलामगीरी, जबरदस्तीचे बालश्रम, बेकायदेशीर काम आणि व्यावसायिक लैंगीक शोषण इत्यादी बाल तस्करीचे प्रकार सांगता येतील.

१) घरकाम नोकर

कौटुंबिक गुलामगिरीचा विचार करता मुले अतिशय संवेदनशील असतात. बऱ्याचदा मुलांना सांगीतले जाते की त्यांना मध्यमवर्णीय घरातील दासी म्हणुन काम करण्यासाठी उत्कृष्ट मजुरी दिली जाईल परंतु सामान्यतः त्यांना कठोरपणे कमी पैसे दुरव्यवहार आणि कधी-कधी लैंगीक अत्याचार केल्या जातात. अशा प्रकारच्या तस्करी ओळखणे कठीण आहे कारण ते सार्वजनीक घरांच्या आत होते जेथे सार्वजनिक अंमलबजावणी होत नाही. दरवर्षी शहरी भागातून काम करण्यासाठी शेकडो मुलींची ग्रामीण भागातुन तस्करी केली जाते.

२) जबरदस्ती बालश्रम

कायदेशीररित्या भारतातील मुलांना उघडपणे काम करण्यास परवानगी नाही. परंतु बऱ्याचदा बंधनकारक काम आणि घरगुती कामांसाठी त्यांची तस्करी केली जाते. शिवाय देशामध्ये परवानगी नसल्यामुळे विदेशात मुलांची तस्करी केली जाते. पैसे देणाऱ्या किंवा मालकाकडून पैशाची परतफेड व्हावी या कारणास्तव लहान - लहान बालकांकडून विट, रेती, दगड इत्यादी उचलून घेतले जातात व बांधकाम सुध्दा लहान-लहान बालकाकडून घेतले जाते. मुलांना कामाचा ताण यातुन सुटका करण्यासाठी पळून सुध्दा जाता येत नाही कारण त्यांच्यावर खुप मोठया प्रमाणात नियंत्रण ठेवले जाते. लहान - लहान बालकावर शारीरीक, भावनीक किंवा लैगिंक छळ इत्यादींचा गैर वापर केला जातो. ग्रामीण भागामधील मुले मोठ - मोठया कारखान्यामध्ये रोजगार मिळविण्यासाठी त्यांच्याकडे काम करतात.जसे की, कापसाचे मिल्स, कापुस बियाने उत्पादन, मॅन्युअल वर्क कौटुंबीक कामे दगडाच्या खाणी, विटाच्या भटया आणि चहाचे मळे यामध्ये त्याना जबरदस्तीने काम करण्यास भाग पडतात. बालकाना कुठलेच स्वातंत्र नसते. त्यांना कमी पैशात काम करुन घेतात काम करण्याची इच्छा नसताना त्याना त्यामध्ये ढकलले जाते आणि त्यांचे बालपण हिरावून घेतात.

३) बेकायदेशीर कार्य / काम

लहान मुले / मुली यांचा देह विक्री करण्यासाठी बऱ्याचदा बेकायदेशीर वापर करुन घेतला जातो. वयस्कर व्याप्तीपेक्षा लहान मुल आणि मुलींना देहविक्रीसाठी मोठया प्रमाणात मागणी असते. या बालकांना पैशाचे आमीष दाखवून त्याना अशा बेकायदेशीर व्यवसायात ओढले जाते. एवढेच नाहीतर रस्त्यावर हिंडणाऱ्या लहान मुला-मुलीना पळवून नेले जाते व त्यांना अपंग केले जाते किंवा डोळे काढून रस्त्यावर भिक मागण्यास प्रवृत्त केले जाते. जो मुलगा / मुलगी जास्त अपंग आहे अशा मुलांना जास्त भिक मिळते म्हणुन त्यांना जास्त आपंग केले जाते व त्यांच्याकडून भिक मागुन घेतले जाते. अशा प्रकारचे काम तस्करी मुला-मुलींकडून करुन घेतात.

युनिसेफचा असा अंदाज आहे की आठरा वर्षाखालील ३००००० पेक्षा अधिक मुले / मुलींच शोषण होत आहे. बहुतेक मुलं १५ ते १८ वयोगटातील असतात. तर काही ७ ते ८ वर्षाच्या वयोगटातील असतात. सैनीकी शिक्षण देऊ म्हणुन मुलांनाच मोठया प्रमाणात अपहरण केल जाते. यामध्ये बऱ्याचदा मुलांच लैंगीक शोषण केल जाते आणि हयात लैंगीक संक्रमीत आजारांमुळे संपतात. काही मुलांना त्यांच्या कुटुंबियाकडून आणि समुदायाकडून अत्याचार करण्यास भाग पाडण्यात आले आहे.

४) व्यावसायीक लैगिंक शोषण -

लैगिंक शोषण हा एक संवेदनशिल मुददा आहे. याला अनेक देशाना तोंड दयावे लागत आहे. लैंगीक अत्याचारामध्ये ड्रग्स, अन्न, निवारा, संरक्षण इत्यादी गोष्टीचा समावेश होतो. पैशाच्या आमीषामुळे लैगिंक अत्याचार, लौगीक शोषण, बाल अश्लीलता आणि बाल वेश्याव्यवसाय हा लैगिंक शोषणाचा मुददा आहे. केवळ मुंबई शहरातच महिला आणि मुलांचे व्यावसायीक लैगिंक शोषण दरवर्षी अंदाजे ४०० दशलक्ष अमेरीकन डॉलर उत्पन्न करतात. महिला व बाल विकास मंत्रालयाने प्रायोजीत केलेल्या कित्येक मुलांची तस्करी करणे शोधुन काढणे कठीण असले तरी देशभरात सुमारे तीन दशलक्ष वेश्याव्यवसाय करणाऱ्यांच्या मुलींची संख्या आहे. कारण वयानी लहान असणाऱ्या मुलींची मागणी आहे. हयामध्ये मुलांची संख्या देखील ४०% जवळ पास आहे.

तस्करी विरुद्ध कारवाई -

लहान मुला / मुलींची तस्करीसाठी भारत देश हा एक केंद्र म्हणुन ओळखला जातो.भारत सरकारसाठी हा मुददा अतिश्य महत्वाचा आहे. अवैदय वाहतुक प्रतिबंध कायदा प्रथम १९५६ मध्ये दुरुस्त करण्यात आला. महिला व बालकांच्या लैगिंक शोषण आणि लैगिंक शोषणास प्रतिबंध घालण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे. यामध्ये कयदयाने तस्करीची व्याख्या करण्यात आली आहे. २००३ मध्ये भारताने संयुक्त राष्ट्र संघाच्या बैठकीत ट्रान्झेशनल ऑर्गनाइजेशन क्राईम विरुद्ध बंदी घातली. त्यामध्ये खासकरुन महिला आणि मुला / मुलीची तस्करी नोंदवली जाईल. लोकांमध्ये तस्करीची भावना जागृत करण्यासाठी मदत करते. यामध्ये तस्करी थांबते यासाठी मदत करते. धमकावणी, वाहतुक, हस्तांतरण बळजबरीने किंवा जबरदस्तीने किंवा ताकदीचा वापर करुन किंवा जबरदस्तीने अपहरण, फसवणूक, फसवणूकीचा दुरुपयोग शोषण करण्याचा हेतु यावर शासनाने बंधने आणली.

१२.५ स्त्रियांची तस्करी

महिला तस्करी हा स्त्रीच्या आत्मसन्मानावरचा सर्वात मोठा घाला आहे. ज्या समाजाने नेहमीच स्त्रिला आद्यशक्तीचे रुप मानले आहे किंवा ज्या समाजाने नेहमीच एखादया देवीला श्रद्धास्थानी मानुन तीची भक्तीभावे पुजा केली आहे, त्याच समाजात आजच्या आधुनिक युगात मानवी व महिला तस्करीची कारणमीमांसा करावी लागते ही जरी थोडी निराशेची बाब असली तरी त्यासाठी भारताच्या पुढाकाराने महिलांची तस्करी-विषयावरील आंतरराष्ट्रीय स्थरावर काही उपाय सुचविले जात आहे. मुळात महिला तस्करीसारख्या उदयोगाला चालना मिळते कशी किंवा पीडीत महिला या दुष्यचक्रात कशा आडकतात हे समजुन घेणे गरजेचे आहे. जागतिक बँकेच्या २०१५ च्या अहवालानुसार जगात स्त्रियांचे प्रमाण ४९.५५ इतके आहे. ८१ देशामध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरूषापेक्षा अधीक आहे. तर ३६ देशामध्ये पुरुषांचे प्रमाण अधीक आहे. मात्र जगभरातील

मालमत्तेपैकी केवळ एक टक्का मालमत्तेच्या त्या मालक आहेत. याउलट वेश्याव्यवसायासाठी जगभरात महिलांची तस्करी होत असुन अमली पदार्थानंतर होणारी ती सर्वात मोठी तस्करी आहे.

आजच्या स्त्री ला समाजामध्ये महिलांची तस्करी ही एक वाढत चाललेली समस्या आहे. ज्यामध्ये पिडीतेचे लैगिंक शोषण आणि श्रम यांचा समावेश होतो. पुरूष आणि स्त्रिया दोघेही या तस्करीच्या बळी असु शकतात. परंतु जगभरातील प्राथमिक बळी महिला आणि मुली आहेत. त्यापैकी बहुतेक स्त्रिया आणि मुली लैगिंक शोषणासाठी यांचा उपयोग केला जातो. तस्कर मुख्यत्वे स्त्रियांना लक्ष्य करतात करण ते महिलांच्या दारिद्रयाचा आणि गरीबीचा फायदा घेतात मुली व महिला बेरोजगारीमुळे, शिक्षणाच्या अभावामुळे व इतर कारणांमुळे हया घटनेला बळी पडतात. महिलांचे लैगिंक शोषण ही एक जटील घटना आहे जी परदेशात सुद्धा या घटनेचे पडसाद उमटलेले दिसतात परदेशात काम करण्यासाठी म्हणून नेलेल्या स्त्रियांना या घटनेला बळी पडावे लागते. स्त्रिया सुद्धा हया घटनेकडे अतिशय वाईट नजरेने बघतात परंतु तस्करी करणारे स्त्रियाच्या दारीद्रयाचा आणि गरिबीचा फायदा घेताना दिसतात तस्कर महिलांच्या परिस्थितीचा फायदा घेतात आणि त्यांना गुन्हेगारी क्षेत्रात लोटतात. स्त्रियांना व्हिसा काम आणि इतर प्रवास दिला जाईल असे अमीष दाखविले जाते. हयामुळे महिला तस्करीचा बळी होऊ शकतात. महिलाना पुरेसे वेतन या खोटया वाद्याद्वारे महिला सुद्धा या घटनेच्या शिकार बनतात. महिलांना सुद्धा हे माहीत नसते की आपणाला परदेशात जाऊन असे वाईट काम करावे लागले. स्त्रियांची तस्करी करणारे महिलांना नोकरीची खोटी जाहिरात दाखवून त्याना जबरदस्तीने लैगिंक शोषणासाठी बळी पाडतात.

आंतरराष्ट्रीय कायदयांतर्गत सरकारला त्यांच्या नागरीकांचे संरक्षण करणे आणि पिडीतांचे संरशण करणे हे महत्वाचे उदिष्ट बंधनकारक आहे.

महिला तस्कीरीची कारणे

महिला तस्कीरीची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) गरिबी -

विशेषत: गरिब देशांमध्ये नेपाळ, श्रीलंका या देशांमध्ये महिलांची तस्करी करण्याचे मुळ कारण म्हणजे गरिबी हे होय. आर्थिकदृष्टया कमकुवत पालक स्वत:च आपल्या मुला / मुलींची विक्री करतात व पैशासाठी दलाल मुलांची / मुलींची विक्री करतात.

२) बेरोजगार -

जेव्हा कुटुंबातील सदस्य बेरोजगार असतात तेव्हा कुटुंबाच्या पालन पोषणाचा भार स्त्रियांवर पडतो. घर चालविने आवघड जाते तेव्हा स्त्रियांना घराच्या बाहेर काम करण्यासाठी पडावे लागते. घराबाहेर पडलेल्या स्त्रियांचा फायदा दलाल / तस्कर घेतात व त्यांना कुटुंबाच्या गरजा भागविल्या जातील असे अमीष दाखवून त्याना वाईट कामाकडे किंवा अवैदय कृत्य करण्याकडे ओढले जाते. अशा प्रकारे तस्करी करणारे स्त्रियांच्या बेरोजगारीचा गैर फायदा घेतात.

३) बालविवाह -

बालविवाह ही अतिशय वाईट प्रथा सध्या जीवंत आहे. शिवाय हुंडा ह्या कारणामुळे सुद्धा मुला / मुलींच्या आई-वडीलांवर लग्नाची जबाबदारी पडते, हुंडा, लग्न इत्यादी खर्चापायी मुला / मुलींच्या आई-वडीलांवर आर्थिक बोजा होतो हे सुद्धा स्त्रियांची तस्करी हे कारण ठरु शकते.

४) सामाजिक कलंक -

भारतीय समाजात खासकरुन ग्रामीण भागात अविवाहीत, विधवा आणि लैगिंक अत्याचाराला बळी पडलेल्या महिला किवा मुलींना समाज स्विकारत नाही. त्यांना खाली पहावे लागते. त्यांना समाजाने न स्विकारल्यामुळे सुद्धा तस्करीला बळी पडावे लागते. त्यांच्या आयुष्यात निराशा येऊन त्या तस्करांच्या बळी पडतात.

५) धार्मिक आचरण -

गेल्या काही दशकापासुन ज्या मुलींचा देवाशी विवाह लावला जातो त्यांना त्या देवाच्या परीसरात राहावे लागते. तेथे देवाची भक्ती करणारे अशा मुलींचे लैगिंक शोषण करतात पर्यटक सुद्धा अशा महिलांचे किंवा मुलीचे शोषण करुन त्यांना तस्करी करणाऱ्यांच्या अमीषाला बळी पडतात.

६) घरगुती हिंसा -

घरगुती हिंसेमुळे सुद्धा महिलांना आणि मुलींना तस्करी सारख्या वाईट घटनेला बळी पडावे लागते. काही माणसे आपल्या पत्नीला वाईट वागणुक देतात. सासुसासरे मुलींचा छळ करतात या छळाला कंटाळून त्यातुन सुटका करुन घेण्यासाठी सुद्धा घटनेच्या बळी होतात.

७) नैसर्गिक आपत्ती -

नैसर्गिक आपत्ती म्हणजे महापुर, भुकंप चक्रिवादळ अशा नैसर्गिक घटनेमुळे मुल / मुली आणि महिला बेघर होतात अशा बेघर झालेल्या स्त्रियांचा फायदा महिलांची तस्करी करणारे घेतात.

८) स्थलांतर -

स्थलांतर हे सुद्धा महिलांच्या तस्करीचे प्रमुख कारण सांगता येईल. काही लोकांना वेगवेगळया कारणामुळे स्थलांतर करावे लागते जसे की रोजगार, नोकरी, नैसर्गीक अपत्ती. मोठ-मोठे धरणाची निर्मिती इत्यादी कारणामुळे लोकांना स्थलांतर करावे लागते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे आणि तेथे जाऊन रोजगार शोधणे तेथील परीसराचा अभ्यास नसल्यामुळे किंवा माहिती नसल्यामुळे माणसाला नको त्या माणसाच्या संपर्कात यावे लागते आणि अशा परिस्थितीत तस्करी करणारे अशा स्थलांतरीत महिला / मुली यांचा गैरफायदा घेऊन तस्करी सारख्या वाईट घटनेमध्ये ढकलतात.

१२.६ सारांश

स्त्रियांचा संघर्षाचा इतिहास आणि वर्तमान काही प्रमाणात समानतेची स्थिती अशी अवस्था असली तरी स्त्रियांच्या संदर्भात असमानतेची भीषण वास्तवता आजही आपणास पाहावयास मिळते. शिक्षण, धर्म, व्यवसाय, राजकारण आर्थिक अधिकार इत्यादी संदर्भात असणारी असमानता अस्वस्थ करणारी आहे. स्त्रियांच्या संदर्भात असलेल्या असमानतेतुन अनेक गहन समस्या पुढे येतात. हुंडयापायी बळी जाणाऱ्या स्त्रियांची संख्या आजही कमी नाही. अशा एक ना अनेक समस्या स्त्रियांच्या हिंसेच्या संदर्भात असलेल्या दिसुन येतात.

भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशात बेकारीचे, दारीद्र्याचे आणि बेरोजगारीचे प्रमाण मोठया प्रमाणात असल्यामुळे येथे तस्करी करणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आजच्या स्थितीला लहान मुलांची आणि महिलांची तस्करी वाढत चाललेली समस्या आहे. ज्यामध्ये पिडीतांचे लैगिंक शोषण आणि कठीण काम यांचा समावेश होतो. लहान लहान मुलांकडून त्यांना न झेपणारे कामे करुन घेतले जातात. जसे की दगडाची खाण, विट भट्टी अशा ठिकाणी मुलांकडून कामे करुन घेतले जातात मुलींना / महिलांना इच्छा नसताना त्यांचे जबरदस्तीने लैगिंक शोषण केले जाते. सुरुवातीला त्यांना पैशाचे अमीष दाखवून कमी वेळेत जास्त पैसा मिळेल, खोटे बोलुन चागले काम मिळेल असे अमीष दाखवून त्यांना नेले जाते व वाईट कामाला लावले जाते. अशा प्राकारे महिलांची व मुलांची तस्करी करणारे त्यांचा गैर फायदा घेऊन त्यांना अवैदय कामा मध्ये लोटतात.

१२.७ कठीण शब्द

१) बालमजुर - चौदा वर्षा खालील मुलांकडून काम करुन घेणे
२) प्रतिबंध - बंद करणे, आळा घालने
३) दारीद्र्य - गरीबी, पैशाची कमतरता
४) स्थलांतर - एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर जाणे
५) धार्मिक आचरण - धर्माला मानने, धर्माचा प्रभाव असणे.
६) अपहरण - पळवून नेने
७) जटील - अवघड, गुंतागुंतीची घटना
८) नैसर्गीक अपत्ती - निसर्गात घडणाऱ्या वाईट घटना

१२.८ अभ्यासाचे प्रश्न

१) लहान मुलांची तस्करी यावर भाष्य करा.
२) महिलांची तस्करी याविषयी तुमच्या शब्दांत माहिती लिहा.
३) लहान मुलांची तस्करीचे प्रकार लिहा
४) महिला तस्करीचे कारणे सांगा.

❖❖❖❖

१३

आरामदायी पर्यटन
(LEISURE TOURISM)

घटक रचना :

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ संकल्पना
१३.३ पर्यटनाची व्याख्या
१३.४ पर्यटनाची वैशिष्ट्ये
१३.५ पर्यटनाचे घटक
१३.६ पर्यटनाचे प्रकार
१३.७ सारांश
१३.८ अभ्यासाचे प्रश्न
१३.९ संदर्भ सूची

१३.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVE)

१. पर्यटन ही संकल्पना समजून घेणे.
२. पर्यटनाच्या साहसी पर्यटन पर्यावरण, ग्रामीण आणि शहरी पर्यटन संकल्पनांचे सविस्तर विश्लेषण करा.

१३.१ प्रस्तावना

पर्यटनाची संकल्पना सर्वाधाने व्यापक स्वरुपाचे पाहण्यास येते. याचा संबंध सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय व पर्यावरणाशी जोडण्यात आला आहे. यामध्ये मानव आणि निसर्ग यांच्या सहसंबंधात पर्यटन संकल्पना अभ्यासता येईल. कारण मानवाने निसर्गातील संबंधाचे रुपांतरण पर्यटनाशी जोडले आहे. निसर्गातील प्रत्येक घटकाच्या स्वरुपामध्ये आनंद निर्माण करण्यासाठी वातावरणाची पर्यटनामध्ये करतात त्याचे स्वरुप विविध प्रकारे अभ्यासता येते. पर्यटन हे नैसर्गिक आणि मानव निर्मितीच्या स्वरुपात आढळून येते. यामध्ये नैसर्गिक घटकांमध्ये पर्वत, जंगल, घाट, नदी, समुद्र इत्यादी घटकांचा समावेश होतो. तर मानवनिर्मिती घटकांमध्ये बाग, बगीचे, निसर्गसृष्टी, मानवपर्यावरण शहरी, ग्रामीण, अडथळे, पर्यटन, पर्यावरणीय पर्यटन इत्यादी घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांचे नियोजन करण्यातून

पर्यटन विकास कार्यक्रम निर्माण करण्यात आला आहे. यामध्ये पर्यावरणाचे संर्वधन, जतन आणि विकासाचे नियोजन करण्याच्या आधारे पर्यटनाचा विकास करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये पर्यटनाची संकल्पना, स्वरुप, वैशिष्ट्ये आणि प्रकार इत्यादींचा समावेश केला आहे.

१३.२ संकल्पना (CONCEPT)

पर्यटनाची संकल्पना अभ्यासत असताना निसर्ग आणि मानवी संबंध जोडण्यात आले आहे. निसर्गाशिवाय पर्यटनाचा विकास करता येत नाही. त्यामुळे निसर्ग हा पर्यटनाचा केंद्र बिंदू मानून त्यापासून आनंद घेण्यासाठी वापर केला जातो. पण हे करत असताना निसर्गातील जैवविविधता व चिरंजीवी या संकल्पनाचा वापर केला जातो. त्यामुळे निसर्गाचा विनाश न करता त्यांचे संवर्धन जतन आणि विकास करण्याचा प्रयत्न पर्यटनामध्ये केला जातो. त्याच्यातून आर्थिक उत्पन्न मिळते त्याचा वापर असे पर्यटन विकास प्रकल्पाची निर्मिती केली जाते. तसेच स्थानिक जनतेच्या आर्थिक प्रगतीसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातात. त्यामुळे स्थानिक जनतेला उद्योगाची निर्मिती केली जाते. त्यानुसार पर्यटन हे विकासाचे साधन म्हणून नव्याने ओळख निर्माण करण्यात येते.

पर्यटनाचा अर्थ (Meaning of Tourism) :

पर्यटन ही मानवी इतिहासातील पूर्वीच्या घटना प्रमाणे दिसून न येता तीचे आधुनिक स्वरुपात रुपांतरण केले आहे. पर्यटन या शब्दाची निर्मिती Jews भाषेत Torach म्हणजे अभ्यास किंवा संशोधन आणि Tour शब्दाचा अर्थ विभागणी करणे म्हणजे Tourism अभ्यास विभागणी असा अर्थ घेतला आहे तर Latin भाषेत मुळ शब्द Tornos म्हणजे प्रवास संकल्पना आहे. तर संस्कृत शब्दात Paryatan म्हणजे एका ठिकाणी राहण्यापासून दुसऱ्या ठिकाणी जाऊन ज्ञान संपादन करण्याच्या असा अर्थ घेण्यात येतो. आता Deshatan म्हणजे या शब्दांचा अर्थ आर्थिक फायद्यासाठी असा होतो. 'Tirthatan' म्हणजे या शब्दाचा अर्थ देवदर्शनासाठी केले पर्यटन असा होतो. या शब्दाचे उद्देश अनेक प्रकारचे असतात. पर्यटन शब्द हा मानवाने निसर्गाशी जोडलेला संबंध त्यातून आनंद, समाधान आणि सुख प्राप्ती होते तसेच निसर्गाबद्दल आपलेपणाची भावना निर्माण होते.

१३.३ पर्यटनाची व्याख्या (DEFINITION OF TOURISM)

१) सन १९१० साली Herman Van Scheullard यांनी पर्यटनाची व्याखा केली आहे. त्यांच्या मते, "पर्यटनाचा मुख्य उद्देश हा आर्थिक स्वरुपाचा असतो. परकियाचे अंतर्गत आणि बर्हिगत स्वरुपाचे प्रवेश राहणे आणि प्रवास त्या सर्व बाबीचा शहर किंवा प्रदेशामध्ये केले जातो त्याला पर्यटन असे म्हणतात."
("The sum total of operation mainly of economic nature which is directly related to entry, stay and movement of foreigner inside or outside a certain city or region is tourism.")

२) UNWTO च्या मते, "पर्यटन ही व्यक्तीचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास आणि राहणे याचबरोबर पर्यावरणाचा आनंद व्यवसाय आणि इतर बाबींसाठी उपयोगात आणला त्याला पर्यटन असे म्हणतात."

("Tourism comprises the activities of persons traveling to and staying in places outside their usual environment for not more then one consecutive year for leisure business and other purposes.")

३) World Tourism Organization (WTO) यांच्या मते पर्यटन ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये पर्यटक २४ तासापेक्षा अधिक काळ एखाद्या पर्यावरणाच्या ठिकाणी राहून पुढे जातो ज्याचा मुख्य हेतू आनंद घेणे, व्यवसाय करणे आणि इतर हेतू असतात, जे ठिकाण भेट देताना exercise क्रिया म्हणून केली जात नाही.

("Travel to and stay in place outside their usual environment from more then twenty-four (24) hours and not more than one consective year for leasure business and other purposes not related to the exercise of an activity remunerated from within the place visited.")

४) World Travel and Tourism Council (2000) यांच्या मते, पर्यटन हा सर्वात मोठा उद्योग आहे ज्यामध्ये गुंतवणूक, रोजगार आणि राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होते.

("Tourism industry is the biggest industry in the terms of investment, employment and GDP.")

वरील सर्व व्याख्यांमधून असा अर्थ स्पष्ट होतो की, पर्यटक हे एक अंतर्गत आणि बर्हिगत बाजूने एका ठिकाणाहून दुसऱ्या प्रदेशामध्ये राहण्यासाठी जातो त्याचे विविध उद्देश असतात. त्यामध्ये आनंद मिळवणे, व्यवसाय आणि इतर घटकांचा समावेश होतो व पर्यटन हे प्रामुख्याने आनंद मिळवण्यासाठी जरी असले तरी व्यक्तीचे स्थलांतरण हे विस्थापनाच्या स्वरुपात देखील विकासात्मक स्वरुपात दिसते.

पर्यटन हा सर्वात मोठा उद्योग म्हणून समोर येतो. हा उद्योग विकसनशील आणि विकसित देशामध्ये व्यवसाय करण्यात येतो. यामध्ये आर्थिक उत्पन्न वाढीबरोबर पर्यावरणाचे संवर्धन आणि विकासाच्या संदर्भात पाहिले जाते. विकसनशील देशात पर्यटनाच्या माध्यमातून व्यवसाया बरोबर रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देतो. च्यामते जागतिक स्थरावरती १२% जागतिक आर्थिक उत्पन्न वाढवण्याबरोबर २०० लाखो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देतात. पर्यटनाच्या माध्यमातून पर्यटन विकासासाठी विविध कार्यक्रम नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आकर्षण, सुख सुविधा ही पर्यावरणाची हाताळणी संरचनात्मक वापर, कार्यक्रम आणि व्यवसाय इत्यादी घटकांचा समावेश यामध्ये करण्यात आला.

१३.४ पर्यटनाची वैशिष्ट्ये (CHARACTERSTICS OF TOURISM)

पर्यटन संकल्पनेचा अर्थ समजून घेण्यासाठी त्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) सेवेचे सुक्ष्म स्वरुप (Intrangible nature of service) :

पर्यटनामध्ये वस्तू आणि सेवा या दोन्हीचा समावेश सेवेच्या स्वरुपात केला आहे. यामध्ये वस्तू हे उत्पादन आहे तर सेवा ही सादरीकरण आहे. या दोन्ही घटकाचा समावेश पर्यटनाच्या वैशिष्ट्यामध्ये सेवेचे स्वरुप म्हणून करण्यात आला आहे.

२) प्रेरणादायी (Inseparability) :

पर्यटनाच्या वैशिष्ट्यांमध्ये पर्यावरणाचे उत्पादन आणि संवर्धनाचा पर्यावरणाच्या समतोलाची संबंधीत आहे. ते कुटुंबातील पर्यावरणाशी नाही. पर्यटनाच्या माध्यमातून विविध सेवा सुविधा पुरवण्यासाठी ग्राहकांना / उपभोक्त्यांना देण्यात येतात. त्यामधून स्फूर्ती निर्माण केली जाते.

३) नाशवंत पदार्थ (Perishability) :

पर्यटनाचे उत्पादन हे भविष्यकाळासाठी साठवणूक करता येते. पण सेवा करु शकत नाही. पर्यटनासाठीचे हॉटेल व विमान बैठक व्यवस्था या साठवून ठेवता येतात पण सेवा ही त्वरित द्यावी लागते. त्या साठवून ठेवू शकत नाही. उदा. उन्हाळी सुट्टीतील करमणूक सेवा.

४) निर्मिती आणि साठवण शक्यता नाही (No possibility of creating and holding stocks) :

पर्यटनाच्या सेवा सुविधांचा पुरवठा करत असताना वेळेची मर्यादा घालून दिलेला कालावधीत कराव्या लागतात. पर्यटन सेवा ही मर्यादित भागा पूरती असल्याने त्याचा साठा करु शकत नाही. त्यामुळे पर्यटन स्वरुप वेगळ्या प्रकारचे असते.

५) विभिन्नता (Hetrogeneity) :

पर्यटन क्षेत्रामध्ये प्रत्येक पर्यटकांना स्वतंत्र वेगळी सुविधा पुरवली जाते.

६) विशिष्ट पर्यटन व सेवांची वैशिष्ट्ये (Particular characteristics of Travel and Trourism services) :

पर्यटनाच्या क्षेत्रामध्ये सर्व सेवांची वैशिष्ट्ये वेगळ्या स्वरुपात असतात यामध्ये विशिष्ट कालावधी सेवा सुविधांची मागणी ही पर्यटन सेवांकडून केली जाते.

७) अनियमती प्रसंगोधित आणि मागणी (Seasonality and demand fluctuations) :

पर्यटनाच्या या वैशिष्ट्यामध्ये प्रत्येक वर्षामध्ये ऋतुमानानुसार पर्यटनाचे व्यावसायिकरण केले जाते. पर्यटनाच्या मागणी प्रमाणे पर्यटकांना विविध सुविधा पुरवल्या जातात त्यामुळे ९० ते १०० टक्क्यां पर्यंत पर्यटनाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. कारण पर्यटकांना अपेक्षित असणारी सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

८) बहुआयामी पर्यटन उत्पादन (Intendenpendence of Tourism products) :

पर्यटनाच्या आवडीचे कारण आकर्षक पर्यटन ठिकाणे पाहण्यास मिळतात. यामध्ये निवासाची सुविधा, वाहतुक साधने आणि जेवणाची सुविधा इत्यादी घटकांचा पर्यटनाच्या उत्पादनाचा परस्पर संबंधावरती दिसून येतो.

९) सेवा सुविधांची उच्च दर्जाची किंमत (High fixed cost of service operations) :

पर्यटन सुविधांच्या संदर्भात पर्यटन उद्योगाची निर्मिती अधिक सेवांची उच्च किंमत मोजली जाते. ही किंमत संधीच्या स्वरुपात निश्चित केली जाते. या सुविधा अधिक मागणीवरती

लक्ष देण्याची गरज निर्माण करतात. त्यामुळे एकूण किंमत आणि महसूल यांचे प्रमाण विस्तृत व्यवसायात वाढताना दिसून येते. हे पर्यटनाच्या विकासावरती परिणाम करते.

वरील सर्व मुद्यांवरुन पर्यटनाची वैशिष्ट्ये समजून घेता येतात. पर्यटन विकासासाठी अनेक प्रकारच्या सेवा सुविधांची मागणी करण्यात येते. त्या पर्यटकांना देण्यासाठी विविध घटकांकडून प्रयत्न केले जातात. त्यामुळे पर्यटन व्यवसाय अधिक गतिशील व विकसित करण्याचे काम चालू आहे.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यटनाची व्याख्या सांगून त्याची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

_____

_____

_____

_____

_____

१३.५ पर्यटनाचे घटक (COMPONENTS OF TOURISM)

पर्यटनाचा विकास करण्यासाठी अनेक घटकांचा समावेश केला जातो, पर्यटनाच्या विकासामध्ये नैसर्गिक पर्यावरण आणि नियोजनाची प्रक्रिया महत्त्वाची समजली जाते. त्यामुळे पर्यटनाचे स्वरुप विस्तृत स्वरुपामध्ये वाढत असल्याचे दिसून येतात. त्याचे घटक पुढील मुद्यांमधून सांगता येतील.

१) नैसर्गिक पर्यावरण (Natural Environment) :

अ) पर्यटक (Tourist)
ब) भौगोलिक स्थिती (Physiographic)
क) हवामान (Climate)

२) पर्यावरण बांधणी (Built Environment) :

अ) संसाधन (Infrastructure)
ब) पर्यटन अधिसंरचना (Tourism Superstructure)
क) माहिती (Information)
ड) नियंत्रण (Governance)
इ) संस्कृती (Culture)

३) हाताळण्याचे क्षेत्र (Operating Sectors) :

अ) दळणवळणाच्या संस्था (Transportation Agencies)
ब) पर्यटन नियोजक (Tours operators)
क) निवासाची सुविधा देणारे (Accommodation providers)
ड) जेवण आणि नाष्टा सुविधा केंद्र (Food and Restuarants facilities)
इ) करमणूक आणि कार्यक्रमाचे आयोजक (Entertainments and event organizer)

४) नियोजन, सुविधा देणारे, विकास आणि संघटनात्मक काम (Planning, Promotion, Development and Catalystorgans) :

अ) सार्वजनिक संघटन (Public bodies)
ब) खाजगी संघटन (Private bodies)

पर्यटनाच्या घटकांचा वापर केवळ पर्यटकापूरता मर्यादित स्वरुपाचा नसून देशामध्ये पर्यटन व्यवसाय निर्माण करण्यासाठी केला जातो. उदा. देशामध्ये थंड हवेचे ठिकाण आणि ऐतिहासिक ठिकाण यांच्या स्वरुपात पर्यटनामध्ये अधिक प्रमाणात वाढ होत आहे. जेव्हा पर्यटक एखाद्या देशाला भेट देतो तेव्हा आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे चलन वाढण्यात येते. त्यामुळे पर्यटन हे देशाची सामाजिक आणि आर्थिक मुल्य वाढविते. त्यामुळे प्रत्येक देशात पर्यटन विकासाची संधी व सेवा उपलब्ध करुन देते. जागतिक पर्यटन संस्थेच्या माध्यमातून पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न करत असतात. त्यातून नवीन नोकऱ्यांची संधी उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे स्थानिक समुदायाला आर्थिक प्रगती करण्याची संधी व सेवांची निर्मिती केली जाते.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यटनाचे घटक थोडक्यात स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

१३.६ पर्यटनाचे प्रकार (TYPES OF TOURISM)

पर्यटन विकासाचे प्रयत्न अनेक स्वरुपामध्ये केले जातात. त्यानुसार पर्यटनाचे प्रकार सविस्तर स्पष्ट करता येतील ते पुढीलप्रमाणे.

१) सांस्कृतिक पर्यटन (Cultural Tourism) :

पर्यटनाचा महत्त्वाचा प्रकार म्हणून सांस्कृतिक पर्यटन ओळख करुन देण्यात येते. जागतिक स्तरावरती अनेक सांस्कृतिक पर्यटन केंद्राची निर्मिती करण्यात आली आहेत. या

पर्यटन क्षेत्रामधून देशाच्या सांस्कृतिक वारसाचे संवर्धन, जतन आणि विकास केला जातो. त्या देशातील कलांचे सादरीकरण या पर्यटन प्रकारामध्ये केले जाते. यामध्ये धार्मिक, सामाजिक, सांस्कृतीक स्थळांचा समावेश केला जातो.

२) पर्यावरण पर्यटन (Ecotourism) :

पर्यटन क्षेत्रात पर्यावरण पर्यटन केंद्राचा प्रमुख सहभाग वाढत आहे. निसर्ग आणि मानव यांच्यातील संबंध दृढ करण्यासाठी पर्यावरण पर्यटन ठिकाणाची निर्मिती केली जाते पर्यावरणाचे संवर्धन, जतन आणि विकास करण्याबरोबर स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी याची निर्मिती केली जाते.

३) शैक्षणिक पर्यटन (Educational tourism) :

शैक्षणिक पर्यटन हे शैक्षणिक संस्था म्हणून पर्यटन केंद्र स्थापन करण्याचे काम केले जाते. या पर्यटनाच्या वाढीसाठी विशिष्ट वर्गाची वाढ होताना दिसून येते. या पर्यटन केंद्रामध्ये जेवण बनवण्याचे, वस्तू निर्मिती बरोबर फॅशनच्या विविध पद्धतीचे शिक्षण देण्यात येते. यासाठी अनेक पर्यटक या क्षेत्राकडे आकर्षले जातात.

४) आरोग्य पर्यटन (Health Tourism) :

आरोग्य पर्यटनाची विकास प्रमाण वाढू लागले आहे. ही पर्यटन केंद्रे आरोग्याची ठिकाणे निर्माण करतात. त्याचे दोन उपप्रकार पुढीलप्रमाणे -

अ) औषधी पर्यटन (Medical Tourism) :

औषधी पर्यटनामध्ये व्यक्तींना औषधाविषयीच्या वस्तू व सेवा यांच्या संबंधीचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी याचा समावेश केला आहे. यामध्ये आरोग्य सुविधा मिळविण्यासाठी या पर्यटनाची निर्मिती केली आहे. ज्यामध्ये आजार होण्या अगोदरच आजाराच्या लक्षण सुविधा आणि निर्मूलन करण्यासाठी या पर्यटनाचा वापर करण्यात आला. ज्यामध्ये पर्यटकांना आरोग्यविषयीची माहिती करुन दिली जाते.

ब) रोगमुक्तीसाठी पर्यटन (Wellness Tourism) :

रोगमुक्तीसाठी पर्यटनाचा मुख्य हेतू हा चांगले आरोग्य आणि बरे वाटण्यासाठी शारीरिक मानसिक आणि आर्थिक समाधान मिळवण्यासाठी केले जाते. या पर्यटनावापर यासाठी केला जातो.

५) सर्वसमावेशक पर्यटन (Inclusive Tourism) :

पर्यटनाच्या या प्रकारामध्ये कार्यात्मक मर्यादा आणि अपरिहार्यता या घटकांचा समावेश केला जातो. याच्यामध्ये ही संकल्पना समोर येते ज्यामध्ये सर्व प्रादेशिक घटकांच्या विकासासाठी तत्वाचा समावेश केला ज्याचा उद्देश जागतिक स्तरावरती सर्व घटकांचा समावेश करणे हा आहे.

६) साहसी पर्यटन (Adventure Tourism) :

साहसी पर्यटनामध्ये अतिनियोजित स्वरुपाच्या ठिकाणच्या परिस्थिती मध्ये केले जाते. ज्यामध्ये धोका पत्करणे आणि शारीरिक इजा होण्याची शक्यता असते. ज्यामध्ये पर्वत चढणे, चालणे, उंच उडी घेणे, पॅरागडालीत इत्यादी सारख्या क्रिया केल्या जातात.

७) शेती पर्यटन (Agritourism) :

शेती पर्यटन हा प्रकार शेती आणि पर्यावरण यांचा समतोल राखून केले जाते. ज्यामधून शेतीचे आर्थिक उत्पादन वाढवण्याचे काम केले जाते. स्थानिक शेतकऱ्यांना शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करुन शेतीला पर्यटनाचा दर्जा देण्याचे काम या प्रकारामध्ये करतात.

८) खेळाचे पर्यटन (Sport Tourism) :

खेळाच्या पर्यटन प्रकारामध्ये विविध प्रकारचे खेळ खेळले जातात. यामध्ये skiling, golf and scuba driving यांचा समावेश केला जातो. या खेळासाठी विशिष्ट सुट्टीच्या दिवसामध्ये पर्यटक यामध्ये सहभाग घेतात. विशेषतः उन्हाळाच्या सुट्टीच्या कालावधीत हे खेळाचे पर्यटन कार्यक्रम आयोजीत करण्यात येतात. या खेळात सर्व वयोगटातील व्यक्तीचा समावेश केला जातो. यामध्ये खेळ हा अधिक प्रमाणात खेळला जातो.

वरील सर्व पर्यटनाच्या प्रकाराचे स्वरुप स्पष्ट होते. पर्यटन ही विविध प्रकाराच्या स्वरुपात विभागलेले असते ते व्यक्तिला आनंददायी वातावरण निर्माण करत असते त्याचा मनमुराद आनंद घेण्याचे काम केले जाते.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यटनाचे स्वरुपानुसारचे प्रकार सविस्तर स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

१३.७ सारांश (SUMMARY)

आरामदायी पर्यटन ही संकल्पना विस्तृत अर्थाने वापरण्यात आली आहे. या प्रकारामध्ये पर्यटकाना विविध प्रकारच्या पर्यटनाचा आनंद घेता येतो. पर्यटक हा आपला आरामदायी वेळ घालवण्यासाठी निसर्गाच्या समवेत आपल्या जीवनातील काही वेळ देऊन आनंदी व समाधानी जीवन जगण्याचा प्रयत्न करत असतो त्यासाठी नवनवीन पर्यटन ठिकाणांचा शोध घेणे त्यासाठी राहण्याची, जेवणाची, दळणवळणाची साधने इत्यादी विषयाची सविस्तर माहिती मिळवणे या सारखी तयारी करावी लागते. त्यामुळे पर्यटनाचे योग्य नियोजन केले जाते. हे नियोजन करत असताना निसर्गाचा समतोल टिकवणे आणि त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक बनले आहे. यातून पर्यटन केंद्राचा विकास अधिक प्रमाणात होते. विशेषतः अविकसित, विकसनशील देशामध्ये पर्यटनाच्या विकासाकडे आर्थिक परिवर्तनाच्या दृष्टीने पाहिले जाते. ज्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवरती झाल्याचे स्पष्ट होते. या विकासातून गावातील प्रत्येक घटकाच्या

विकासाच्या संधी प्राप्त करुन देता येते. या सर्व बाबींचा विचार केल्यास पर्यटन विकासास अंतर्गत आणि बहिर्गत घटकामध्ये एक संघता निर्माण करण्यासाठी व्यवस्था कार्य करत असते. यामध्ये शासकीय आणि निमशासकीय पर्यटन संस्थाच्या माध्यमातून या विषयाचे विविध उपक्रम सादर केले जातात. त्याला पर्यटकाचा भरभरुन प्रतिसाद प्राप्त होतो. त्यामुळे पर्यटन प्रकल्पाचे स्वरुप गतिशीलरित्या विकसीत होऊ लागले आहे.

१३.८ अभ्यासाचे प्रश्न (QUESTION PATERN)

१. पर्यटनाची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये लिहा.
२. पर्यटनाची व्याख्या सांगून थोडक्यात त्याचे प्रकार स्पष्ट करा.

१३.९ संदर्भसूची (SUGGESTED READING)

1. Haralambosm and Heald (2009) Sociology Them and Prespective, New Delhi Oxford University Press.
2. Julia Jary and David Jary (2005) Dictionary of Sociology Collins.
3. Macionis John (2005) Sociology (10th Edition) Prentic Hall.
4. Schaeffer and Lamm (1998) Sociology (6th edition) MrGraw Hill.

❖❖❖❖

१४

आरामदायी पर्यटन - भाग २
(TYPES OF LEISURE TOURISM)

घटक रचना :

१४.० उद्दिष्ट्ये
१४.१ प्रस्तावना
१४.२ आरामदायी पर्यटन प्रकार
१४.२.१ साहसी पर्यटन
१४.२.२ साहसी पर्यटनाची व्याख्या
१४.३ साहसी पर्यटनाची वैशिष्ट्ये
१४.४ साहसी पर्यटनाचे प्रकार
१४.५ अभ्यासाचे प्रश्न

१४.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVE)

१. पर्यटन ही संकल्पना समजून घेणे.
२. पर्यटनाच्या प्रकाराबाबत सविस्तर माहितीचे विश्लेषण करणे.

१४.१ प्रस्तावना

आरामदायी पर्यटनाची संकल्पना विस्तृत स्वरुपात समजून घेता येईल. या पर्यटन प्रकारामध्ये पर्यटकात निसर्ग आणि मानवनिर्मित पर्यटन क्षेत्राचा मनमुराद आनंद घेण्याच्या हेतूने याची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे या पर्यटन प्रकाराला महत्व आले आहे. यामध्ये सर्व पर्यटक या प्रकारामध्ये सहभाग घेतात त्यामुळे याला अधिक आकर्षण निर्माण केले आहे. या पर्यटन प्रकारामध्ये निसर्गातील पर्यावरणाचा समतोल बरोबर मानवी समाजात गतिशीलता निर्माण केली जाते. ही गतिशीलता भौगोलिक, लोकसंख्या सामाजिक सांस्कृतिक राजकीय आणि आर्थिक परिस्थितीमध्ये दिसून येते. या पर्यटनामधून निसर्ग आणि मानव याचे जवळचे संबंध निर्माण होतात त्यामुळे गतिशील विकास साधला जातो.

जागतिकरणाच्या संदर्भात आरामदायी पर्यटन प्रकाराला महत्त्व आले आहे. नव्या अर्थव्यवस्था प्रक्रियेमध्ये आरामदायी पर्यटन प्रकार विकसनशील व विकसित देशामध्ये अधिक प्रमाणात वापरला जातो. आंतरराष्ट्रीय स्तरावर या पर्यटन व्यवसायातून जागतिक अर्थव्यवस्था

समृद्ध करण्याचे प्रयोग करण्यात आले आहेत. त्यामुळे याचा स्वीकार सर्व स्तरातून केले जाते. त्याचबरोबर सामाजिक सांस्कृतिक देवाणघेवाणीमधून संबंध प्रस्थापित होतात. त्यामुळे बहुसंस्कृतीवादी आणि एकजिनसीपणा याविषयी पर्यटनाचे प्रकार महत्त्वाचे भूमिका नोंदवताना दिसतात. हे एक समिश्रण आणि गुंतागुतींच्या स्वरुपात आढळून येते. तसेच आंतरराष्ट्रीय चल पुरवठ्यामध्ये वाढ बरोबर गुंतवणूकीचे प्रमाण वाढवताना दिसते. त्यातून आंतरराष्ट्रीय संबंधाची व्यवस्था स्थापित करण्यामध्ये पर्यटन महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. या सर्वांच्या पार्श्वभूमीवरती पर्यटनामध्ये साहसी पर्यावरणात्मक ग्रामीण आणि शहरी पर्यटन प्रकाराचे सविस्तर विश्लेषण समजून घेता येईल.

१४.२ आरामदायी पर्यटन प्रकार (TYPES OF TOURISM)

१४.२.१ साहसी पर्यटन (ADVENTURE TOURISM) :

पर्यटन हा मानवाला आनंददायी व सुखकर प्रवासाची प्रक्रिया म्हणून समजून घेता येईल. त्यामध्ये साहसी पर्यटनाला अमान्य साधारण महत्त्व आहे. हा पर्यटनाचा प्रकारात नवीन भौगोलिक पर्यावरणामध्ये जाऊन केले जाते. त्यामुळे त्याबद्दलची उत्सुकता आणि कल्पना प्रत्येक प्रवाशाच्या मनात आनंद निर्माण करणारी असते. यामध्ये प्रवाशाच्या सुट्टीच्या दिवशी निवासी राहून अनेक कार्यक्रम केले जातात. उंचावरुन उडी मारणे, समुद्रावरती फिरणे Paragliding parasailing ballooning rafting and rock climb इत्यादी सारख्या साहसी पर्यटनाचा आनंद पर्यटक घेतात. या पर्यटन प्रकाराची सुरुवात देशामध्ये सुरु झाली.

साहसी पर्यटनाची सुरुवात तीन वर्षापूर्वीपासून नेपाळ मधील हिमाचल या भागामध्ये करण्यात आली. त्याचबरोबर अफगाणिस्तान, भूतान, बाली अलगेरिया इत्यादी देशात झाल्याचे दिसुन येते. जागतिक स्तरावरती भारतात १० साहसी पर्यटनाचा ठिकाणाच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. मागील दहा वर्षाच्या कालावधी मध्ये साहसी पर्यटनाचे प्रमाण वाढले आहे. ज्यामध्ये पर्यटक हे सुट्टीचा कालावधी या पर्यटन प्रकाराचा आनंद घेतात. त्यामुळे पर्यटनाचे आर्थिक फायदे होऊ लागले. साहसी पर्यटनाच्या विशेष व्याख्या करण्यात आली नाही. Adventure Travel Trade Association या U.S. आधारित संघटनेच्या मते साहसी पर्यटन असे आहे की ज्याचा संबंध भौतिक क्रिया, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि निसर्गाशी मिळते-जुळते असणाऱ्या पर्यटनाला साहसी पर्यटन असे म्हणतात. साहसी पर्यटक हे नैसर्गिक पर्यटनाला सहासी पर्याटनाच्या बाहेरील वातावरणात मानसिक साहसी क्रियेचा खेळाचा आनंद घेत असतात. त्यामध्ये व्यावसायिक तंत्रज्ञान Network Photograhy Flash Packing सामाजिक या क्रिया केल्या जातात. हे नवीन ठिकाणच्या जागेचे खेळाची मागणी केली जाते.

भारतात साहसी पर्यटन हे अधिक प्रमाणात ६.२% इतके राष्ट्रीय उत्पन्नवाढी मध्ये भर घालत असते. त्यातून ८.७% टक्के इतका रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. भारत सरकारच्या पर्यटन विभागामार्फत 'अतिथी देवो भवो' ही योजना निर्माण केली आहे, त्यामुळे पर्यटन विकासाला अधिक प्राधान्य दिले जाते.

१४.२.२ साहसी पर्यटनाची व्याख्या

UNWTO यांच्या मते साहसी पर्यटन हे देशाअंतर्गत व आंतरराष्ट्रीय वरच्या स्तराचे असू शकते. ज्यामध्ये एक दिवस रात्रीचा समावेश असतो. त्यामध्ये एका वर्षाचा समावेश होत नाही. अशा पर्यटनाला साहसी पर्यटन म्हणतात.

(Adventure tourism can be domestic or international and like all travel, it must include on overnight stay but not last longer then one year)

साहसी पर्यटन ही परिस्थिती आणि धोका पत्करण्याचा प्रकार आहे. अमेरिकेत देशामध्ये साहसी पर्यटनाला आर्थिक राजकीय परिस्थितीमुळे मागासलेपणा निर्माण केला. Adventure Travel Trade Association मते साहसी पर्यटनाच्या अहवलानुसार साहसी पर्यटन हे नेहमी प्रमाणे उपयोगात आणण्याचे काम Haiti Rwand आणि Japan या देशामध्ये अधिक प्रमाणात आहे. त्याच बरोबर अंतर्गत क्षेत्रात कौमविद्या, North Korea, Iran, Rwanda यामध्ये राजकिय तणाव निर्माण झाले.

साहसी पर्यटनाची पद्धती शंभरहून अधिक काळ केला आहे. यामध्ये Macro Polo, Captain James, Cook and Sir Emest Snackletoh यांनी प्राथमिक भौगोलिक संस्थांचा अभ्यास करुन या खेळाची निर्मिती केली. त्यामध्ये व्यावसायिक साहसी क्रिया पर्यटन महत्त्वाचे आहे. या प्रकारामध्ये व्यावसायिक मार्गदर्शन, तंत्रज्ञान आणि साहित्याच्या मदतीच्या सहाय्याने करु लागले.

१८ व्या शतकाच्या मध्यकाळात पर्वत चढाई आणि नदीमध्ये होडी चालवणे यांचे साहसी पर्यटकामध्ये समावेश करण्यात येऊ लागला, १८६५ साली Matterhom पर्वत आणि Colorado नदीमध्ये या प्रकारचे पर्यटन करण्यात आले. सन १८९९ साली National Geographical Society आणि सन १९०४ साली Explorers Club च्या माध्यमातून साहसी पर्यटन या विषयी काम करण्यात आले. या संस्थाकडून शास्त्रीय पद्धतीने पर्वत आणि समुद्र क्षेत्राविषयाच्या साहसी पर्यटनाचा अभ्यास करण्यात येऊ लागला.

सन १९५० च्या कालावधीत जागतिक स्तरावरती साहसी पर्यटन प्रकाराला अधिक मान्यता देण्यात येऊ लागली. यामध्ये Maurice Herzogs Sir Edmuand Hillary and Tenzing Norgay यांनी पर्वती साहसी पर्यटनामध्ये काम केले. त्यांची जागतिक स्तरावरती नोंद घेण्यात आली.

सन १९२० च्या पहिले युनायटेड स्टेट मध्ये साहसी पर्यटनासंबंधी अधिक व्यावसायिक माहिती देण्यात आली. Don Hatch यांनी Green River मध्ये साहसी पर्यटन कार्यक्रम निर्माण केला. त्यांनी १९५६ मध्ये प्रथम राष्ट्रीय पार्क मध्ये साहसी पर्यटनाचा प्रयोग यशस्वी करुन दाखवला. Kerl Downey (1946) Abercombaie and Kent (1962), Micato Safris (1966) QARS (1969) यानंतर यांनी नदीमधील साहसी पर्यटनाचा प्रकार अधिक प्रमाणात सुरु करण्यात आला.

सद्यस्थिती मध्ये साहसी पर्यटन हे जलद गतीने बदलत आहे. याला उद्योगाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. व्यक्तिगत व व्यवसायिक संस्थेमार्फत या पर्यटनाचे आयोजन केले जाते. साहसी पर्यटक अधिकारी ग्रामीण भागामध्ये साहसी पर्यटन कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे काम करतो. युरोपातून आंतरराष्ट्रीय स्तरावरती ६९% टक्के इतक्या प्रमाणात साहसी पर्यटनाचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे या व्यवसायाला जागतिक स्तरावर चांगला प्रतिसाद मिळत आहे.

१४.३ साहसी पर्यटनाची वैशिष्ट्ये (CHARACTERISTIC OF ADVENTURE TOURISM)

साहसी पर्यटनाच्या व्यवहाराच्या स्वरुपानुसार त्यांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) पुर्नशांतता (Resilent) :

साहसी पर्यटन ही विशिष्ट स्थिती आणि धोका पत्करण्याची क्षमता असणारा पर्यटनाचा प्रकार आहे. युरोपामध्ये साहसी पर्यटनाच्या व्यावसायिक पर्यटनाची प्रक्रिया निर्माण करण्यात आली. हा व्यवसाय कोलंबिया, उत्तर कोरिया, इराण, रावनडा या देशांमध्ये आर्थिक दुरावस्था असताना ही सुरुवात करण्यात आले. त्यामुळे या उद्योगाला कमी प्रमाणात जरी नफा मिळाला तरी हा व्यवसाय पुर्नशांततेच्या स्वरुपात पाहण्यास मिळतो.

२) उच्च मुल्य असणाऱ्या ग्राहकांना आकर्षित करते (Attracts high value customers) :

साहसी पर्यटकाकडे पर्यटकांची उत्सुकता आणि आकर्षक पणाच्या म्हणून पाहिले जाते. यामध्ये ३००० पेक्षा अधिक तरुण वर्ग आकर्षित झाला आहे. त्यामुळे या पर्यटनाचा प्रसार व प्रचार अधिक प्रमाणात झाला आहे. परिणामी या व्यवसायात अधिक आर्थिक नफा मिळवण्याच्या दृष्टीने फायदेशीर करण्यात येतो.

३) स्थानिक अर्थव्यवस्थेला सहाय्य (Support Local Economies) :

साहसी पर्यटनामध्ये स्थानिक अर्थव्यवस्थेला सहाय्य प्राप्त करुन दिले जाते. पर्यटकाकडून पर्यटनकर फायदा आणि मजूरीच्या माध्यमातून स्थानिकांना आर्थिक सहाय्य प्राप्त होते. त्यामुळे स्थानिक भागातील लोकांना आर्थिक पुरवठा वाढत जातो. United Nations Environment Program (UNEP) या संस्थेच्या माध्यमातून सर्व समावेशक पर्यटन विकासाचा दृष्टीकोण विकसित करण्यात आला. या व्यवसायामधून भारतातील स्थानिकाला ४० टक्के फायदा झाला आहे तर थायलंड देशाला ७०% टक्के नफा झाला आहे. त्यामुळे साहसी पर्यटन हे स्थानिकांना आर्थिक मदत करुन देणारे आहे.

४) चिरंजीवी व्यवहाराला प्रोत्साहन (Envourages Sustainable) :

साहसी पर्यटन विकासाचा मुख्य हेतू हा पर्यावरणाचे संरक्षण बरोबर चिरंजीवी व्यवहाराला प्रोत्साहन देणे. कारण पर्यावरणातील समतोल राखणे गरजेचे असते. त्यासाठी नैसर्गिक वातावरण व अर्थपूर्ण संस्कृती अनुभवाची रचना करण्यासाठी प्रयत्न करतात त्यांचा हेतू चिरंजीवी पर्यटनाला व्यावहारिक प्रोत्साहन देणे महत्त्वाचे मानले जाते.

वरील सर्व मुद्यावरुन साहसी पर्यटनाची वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. साहसी पर्यटन व्यवसायामध्ये आर्थिक प्रगती अधिक प्रमाणात केली जाते. त्यामुळे पर्यटन क्षेत्राचा विकासामध्ये स्थानिक लोकांना पर्यटनकर व व्यवसायाच्या माध्यमातून विकास करता येतो.

१४.४ साहसी पर्यटनाचे प्रकार (TYPES OF ADVENTURE TOURISM)

साहसी पर्यटनाचे प्रकार हे त्यांच्या स्वरुपानुसार पाहण्यास मिळतात. यामध्ये प्रामुख्याने कठीण (Hard) आणि सोपे (Soft) या प्रकारामध्ये आढळून येतात. या दोन्ही प्राथमिक क्रिया आहेत. साहसी पर्यटनामधून आर्थिक फायदे होतात त्याचबरोबर पर्यटनाचा पर्यावरणाचा विकास सुद्धा करण्यात येतो. साहसी पर्यटनाचा प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) साहसी पर्यटनाचा कठीण प्रकार (Hard type of Adventure) :

कठीण प्रकारामध्ये उंचवठ्यावरती चालणे (Climbing) आणि (Caving) या प्रकाराचा समावेश केला जातो. या पर्यटन प्रकारामध्ये अधिक प्रमाणात धोका पत्करावा लागतो. यामध्ये कौशल्यपूर्ण कृती कराव्या लागतात. या क्षेत्रामध्ये पर्यटकाचा ओढा अधिक प्रमाणात आहे. कारण या पर्यटनाची साहसी कौशल्य व धोका पत्करण्याचे प्रमाण अधिक आहे. शेवटच्या तीन वर्षाच्या कालावधीत पाहिले तर असे दिसते की साहसी पर्यटनामध्ये २ टक्के इतके प्रमाण वाढत आहे. लॅटिन अमेरिकेतील लोकांची साहसी पर्यटनाबद्दल सर्व्हे केला त्यांच्या मते उत्तर अमेरिकेमध्ये साहसी पर्यटनासाठी सध्याच्या कालावधीत जाणे अधिक पसंत करतात. या पर्यटनामध्ये पर्यटकाला अधिक उत्सुकता असते. त्यामुळे या प्रकारच्या पर्यटनाकडे पर्यटकांचा कल आहे.

२) हळूवार साहसी पर्यटन (Soft Adventure) :

हळूवार साहसी पर्यटन प्रकारामध्ये पर्यटक हा विविध प्रकारच्या जागतिक स्तरावरील सहलीचे आयोजन करत असतो. लॅटिन अमेरिकन पर्यटक बाहेरील पर्यटनामध्ये केवळ ३०% इतक्या प्रमाणात हे पर्यटन करतात. २५% आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहली तीन प्रदेशामध्ये आयोजीत करतात. या पर्यटन प्रकारात यांना आर्थिक व्यापारामध्ये वाढ झाली आहे. यामध्ये लॅटिन अमेरिका उत्तर अमेरिका आणि युरोपियन देशामध्ये या प्रकारचे पर्यटन वाढत असल्याचे दिसून येते.

३) स्थान शोधण्याचा खेळ (Orienteering) :

Orienteering हा कौटुंबिक पर्यटनाचा प्रकार हा भौगोलिक नकाशाशास्त्राचा वापर करुन पर्यटन केले जाते. भौगोलिक क्षेत्रात पर्यटन करत असताना पर्यटकाला योग्य ठिकाणी पोहचण्यासाठी या प्रकाराचा उपयोग केला जातो. पर्यटकांना अपेक्षित असणारे पर्यटन स्थळ निर्देशीत करण्यासाठी या प्रकारात काम केले जाते. हा जमिनीवरील पर्यटन प्रकार आहे. यामध्ये अधिक पर्यटक समावेश होतात. या प्रकारात Canoe Orienteering, Foot Orienteering, Mountain Orienteering, Radio Orienteering, Car Orienteering, Mountain bike Orienteering, Mounted Orienteering यांचा समावेश होतो.

४) तरफाने ओलांडणे (Rafting) :

राफटिंग हा साहसी पर्यटनाचा प्रकार प्रसिद्ध आहे. सन १९७० च्या मध्य काळात याची सुरुवात झाली. या प्रकारात नदी मध्ये बोट चालवताना ३ किमी सरळ १० फूट खोल असणाऱ्या

नदी प्रवाहात हा खेळला जातो. हा प्रकार संघटीत स्वरुपात केला जातो. त्यासाठी अनुभवाची आवश्यकता असते. कारण यामध्ये धोका पत्करण्याची शक्यता अधिक असते. यामध्ये Multi Person Rafts केला जातो. या पर्यटनाचे संघटन International Rafting Federation (IRF) ही आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करते. त्यातून पर्यटन खेळाचे आयोजन केले जाते.

५) सायकल चालवणे (Cycling) :

साहसी पर्यटन प्रकारात सायकलिंग पर्यटन महत्त्वाचे आहे. साहसी पर्यटक हे सायकलचा वापर करुन हे पर्यटन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करतात. या प्रकारात रस्ते आणि पर्वत यावरती सायकलिंग केली जाते. अशा प्रकारचे पर्यटन फ्रान्स देशामध्ये अधिक प्रमाणात केले जाते. European Cyclists Federation मते सायकलिंग पर्यटनामध्ये २.३ प्रमाणात केले जाते. या प्रकाराचा सकारात्मक विकास संयुक्त राष्ट्रामध्ये होत आहे.

६) स्कुबा ड्रायव्हींग (Scuba Driving) :

स्कुबा ड्रायव्हिंग पर्यटनाचा प्रकार जागतिक स्तरावरती खेळला जातो. या प्रकारामये समुद्रावरती Scuba चा वापर करुन सामुदायिक पर्यटन केले जाते. या पर्यटनामध्ये समुद्राच्या लाटांवरती स्वार होण्याचा प्रकार आनंदाने केला जातो. भारतामध्ये गोवा, अंदमान निकोबार या समुद्रभागात ह्या खेळाचा प्रमाण अधिक आहे. त्यामुळे या खेळाची लोकप्रियता अधिक आहे.

७) पायरपेट (Hiking) :

साहसी पर्यटनामध्ये या प्रकाराला महत्त्वाचे स्थान आहे. या प्रकारात पर्यटक हा बाह्य वातावरणात जाऊन पर्यटन करतो. यामध्ये सुंदर पर्यावरणाच्या ठिकाणी जाऊन पर्यटन केले जाते. त्यासाठी निश्चित प्रकारचे नियोजनामध्ये कोणत्या वेळी व दिवशी करावयाचे याचा समावेश केला जातो.

८) खडतर प्रवास करणे (Trekking) :

पर्यटनाच्या या प्रकारामध्ये दिर्घकाळ पर्यावरणातील ठिकाणी चालत जाण्याची क्रिया केली जाते. ज्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे वाहन चालवण्यात येत नाही असा उंच आणि सखल भूप्रदेशामध्ये हा प्रकार केला जातो.

९) हवेत प्याराशुटच्या वापरावर तरंगणे (Paragliding) :

पर्यटनाच्या या प्रकारामध्ये पर्यटक पॅराशुटचा वापर करुन हे पर्यटन केले जाते. पर्यटक पॅराशुटचा वापर हा उंच डोंगराळ दरी भागांमध्ये जाण्यासाठी करत असतो त्यामुळे हा प्रकार साहसी पर्यटनामध्ये समावेश केला जातो.

वरील पर्यटन प्रकाराचा वापरांना महत्त्वाचे स्थान आहे. पर्यटनाच्या विकासामये साहसी पर्यटनाचा महत्त्वाची भूमिका आहे. या पर्यटनाकडे पर्यटकाचा ओढा अधिक आहे.

१४.५ अभ्यासाचे प्रश्न

१) साहसी पर्यटनाचे प्रकार सविस्तर लिहा.
२) साहसी पर्यटनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

❖❖❖❖

१५

पर्यावरणात्मक पर्यटन

घटक रचना :

१५.० उद्दिष्ट्ये
१५.१ पर्यावरणात्मक पर्यटन
१५.२ पर्यावरणात्मक पर्यटनाची व्याख्या
१५.३ पर्यावरणात्मक पर्यटनाची वैशिष्ट्ये
१५.४ पर्यावरण पर्यटनाचे नियोजन महत्त्व
१५.५ पर्यावरणात्मक पर्यटनाच्या मर्यादा
१५.६ ग्रामीण पर्यटन
१५.७ ग्रामीण पर्यटनाची व्याख्या
१५.८ ग्रामीण पर्यटनाची वैशिष्ट्ये
१५.९ ग्रामीण पर्यटनाची साधने
१५.१० भारतातील ग्रामीण पर्यटनाचा कार्यक्रम
१५.११ ग्रामीण पर्यटनाच्या समतोल आव्हान
१५.१२ शहरी पर्यटन
१५.१३ शहरी पर्यटनाची व्याख्या
१५.१४ शहरी पर्यटनाची वैशिष्ट्ये
१५.१५ शहरी पर्यटनासमोरील आव्हाने
१५.१६ शहरी पर्यटनाचे प्रकार
१५.१७ सारांश
१५.१८ अभ्यासाचे प्रश्न
१५.१९ संदर्भसूची

१५.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

१) पर्यावरण पर्यटन ही संकल्पना समजून घेणे.
२) पर्यावरणात्मक पर्यटनाची वैशिष्ट्याचा सविस्तर अभ्यास करणे.
३) ग्रामीण पर्यटन आणि शहरी पर्यटनाचा अभ्यास करणे.

१५.१ पर्यावरणात्मक पर्यटन (ECO-TOURISM

पर्यटन घटक हा मानवी जीवनाचा महत्त्वाचा घटक आहे. मानवाने निसर्गामध्ये राहून पर्यटनाची निर्मिती केली आहे. यातून मानवाने आपला विकास केला आहे. विशेषतः निसर्ग आणि मानव यांच्या संबंधाची बांधणी करण्यात आली आहे. याचाच भाग म्हणून 'green industry' smokless industry समाजनिर्मित नैसर्गिक पर्यावरणामध्ये केली आहे. त्यामुळे पर्यटकाचे आकर्षण अधिक प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे मानवाची भौतिक आणि मानसिक ताणतणावे निर्मूलन करता येऊ लागले. त्याचबरोबर पर्यावरणाच्या संवर्धन जतन आणि विकास यासंबंधीचे कार्य करण्यात येऊ लागले. याचा फायदेशीर परिणाम Galpagos Island वरील पर्यावरण व्यवस्था निर्माण केली आहे. तसेच अमेझॉन आदिवासीच्या नागरीकरणामध्ये झालेला बदल असेल. गुहेमधील रंगकामाचे विषय असतील. या सर्वातून पर्यावरण आणि मानवाच्या संबंधाची व्यवस्था स्पष्ट होते. यातून पर्यावरण पर्यटन संकल्पनेचा विकास होऊ लागला.

पर्यावरण पर्यटन ही संकल्पना व्यापक अर्थांनी समजून घेता येते. ही एक नैसर्गिक क्षेत्रातील आर्थिक क्रिया म्हणून ओळखली जाते. त्यामुळे पर्यावरण व्यवस्थेला आर्थिक मुल्य प्राप्त झाले आहे. या व्यवस्थेमध्ये पर्यटकाकडून आर्थिक व्यवस्था उभारली जाते ती या व्यवसायाचे नैसर्गिकरित्या जतन संवर्धन आणि विकास कार्यक्रमासाठी करण्यात येतो. पर्यावरण पर्यटन माध्यमातून निसर्गातील साधन सामग्रीचा योग्य वापर करण्याबरोबर चिरंजीवी विकास केला जातो. त्यामुळे नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन करता येते. त्याचबरोबर नैसर्गिक वातावरणामध्ये मानवी समाज प्रदूषण मुक्त स्वच्छ आणि सुंदर परिसराची निर्मिती केली जाते. त्यामुळे जैवविविधता टिकवता येते. त्याचबरोबर स्थानिक जनतेला आर्थिक वस्तू व सेवां सुविधा पुरवण्यातून आर्थिक प्रगती साधली जाते. या आधारे पर्यावरण पर्यटन संकल्पना सर्वार्थाने समजून घेता येईल.

१५.२ पर्यावरण पर्यटनाची व्याख्या (DEFINITION OF ECOTOURISM)

पर्यटनाच्या प्रकारामध्ये पर्यावरण पर्यटनाला महत्त्व आहे. याचा अर्थ असा की, पर्यावरण पर्यटन ही व्यापक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये संवर्धन, स्थानिक लोकांना आर्थिक लाभ आणि पर्यावरणाचा चिरंजीवी विकास याच्यातून पर्यावरण पर्यटन संकल्पना पाहता येते.

१) पर्यावरणात्मक समाज (१९९१) मते "पर्यावरण पर्यटन ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये नैसर्गिक परिसरात जबाबदारपणे वर्तन करतात. पर्यावरणाचे संवर्धन करणे आणि स्थानिक लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे होय."
(Ecotourism society (1991)- "Responsible travel to natural areas that conserve the natural environment and improve the living standard of local people."

२) Ecotourism Association of Australia (1992) याच्या मते, "पर्यावरण पर्यटन म्हणजे नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन आणि सांस्कृतिक घटकाचे संवर्धन आणि सहमती दर्शविण्यासाठी समज प्रोत्साहन देणे."

Ecotourism Association of Austrialia (1992) "Ecologically sustainable tourism that is protections the natural environment and encourage understanding appreliation and conservation of cultural elements".

३) The National Ecotourism strategy of Australia "यांच्या मते पर्यटन म्हणजे पर्यावरण आधारित पर्यटन आहे. ज्यामध्ये नैसर्गिक पर्यावरणाचे शिक्षण आणि विश्लेषण यांचा समावेश केला जातो."

(The National Ecotourism Strategy of Austrialia "Ecotourism is a type of natural based tourism that involves education and interpretation of the natural environment".)

४) Tickell (1994) च्या मते पर्यावरण पर्यटन म्हणजे नैसर्गिक जीवन आणि मानवी संस्कृती यांच्या विविधतेतील प्रवासाचा आनंद घेताना सोबत दोन्ही घटकांना इजा पोहचत नाही.

(Tickellyll 1994) "The journey to enjoy the impressive diversity of natural life and human culture without causing damage of any of them".)

वरील सर्व व्याख्यांवरुन पर्यटन पर्यावरणाचा अर्थ समजून घेता येतो की, पर्यावरण पर्यटन ही संकल्पना व्यापक अर्थाने निसर्ग आणि मानवी संस्कृतीचे संवर्धन जतन आणि विकासाच्या संदर्भातील बाब आहे. ज्यामध्ये नैसर्गिक समतोलाबरोबर चिरंजीवी विकासाचे धोरण निश्चित केले जाते. त्याचबरोबर स्थानिक लोकांच्या विकासासाठी प्रयत्न केले जातात.

१५.३ पर्यावरणात्मक पर्यटनाची वैशिष्ट्ये (CHARACTERSTICS OF ECOTOURISM)

पर्यावरण पर्यटन ही संकल्पना जागतिक स्तरावरती पर्यटन उद्योग म्हणून ओळखली जाते. WTO च्या मते पर्यावरण पर्यटन हे १०% (१९८५-२०००) इतके प्रमाण जागतिक पर्यटनाच्या पातळीवरती वाढले आहे. या व्यवसायामधून ५० टक्के जागतिक पर्यटनामध्ये वाढ होते. हे प्रत्येक वर्षी १०-३० टक्के इतक्या प्रमाणात वाढत जाते. त्याचबरोबर जागतिक पर्यावरण पर्यटनामध्ये २०% टक्के प्रमाणात वाढ होते. त्याचबरोबर जागतिक स्तरावर पर्यावरणाच्या संवर्धन, जतन आणि चिरंजीव विकासाची जाणीव व्यापक स्तरावर वाढत आहे. पर्यावरण पर्यटनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) नैसर्गिक पर्यावरणाचा भाग (Parts of natural environments) :

पर्यावरण पर्यटन हा नैसर्गिक पर्यावरणाचा भाग आहे. मानव आणि नैसर्गिक वातावरणात यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याचे काम या प्रकारामुळे होते. या पर्यटनाच्या प्रकारामध्ये निसर्गामध्ये घडणाऱ्या नवनवीन परिस्थितीचा मानव शोध घेत असतो. त्या पर्यावरणामध्ये प्रत्यक्ष भेट देऊन निसर्गाचा मनमुराद आनंद घेत असतो. त्याचबरोबर त्या वातावरणातून नवीन गोष्टीचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो.

२) चिरंजीवी पर्यावरण जबाबदारी (Responsibility of environment sustainability) :

पर्यावरण पर्यटनाचा मुख्य उद्देश हा चिरंजीवी पर्यावरणाच्या विकासाची जबाबदारी घेणे आहे. पर्यावरण पर्यटन प्रकारामध्ये प्रत्येक व्यक्तींनी आपली नैतिक व सामाजिक जबाबदारी म्हणून पर्यावरणाच्या चिरंजीवी विकासामध्ये सकारात्मक सहभाग नोंदवणे आवश्यक असते. ज्यामुळे पुढच्या पिढ्याच्या उपयोगासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन संवर्धन आणि विकास करण्यासाठी या प्रकारच्या पर्यटनाचा उपयोग केला जातो.

३) सांस्कृतिक वारसाचे आकर्षण (Attraction of cultural heritage) :

पर्यावरण पर्यटनामध्ये मुख्यतः सांस्कृतिक वारसाच्या ऐतिहासिक सामाजिक सांस्कृतिक प्रतिकांचा वारसा जपण्यासाठी प्रयत्न केले जातात. आपल्या पर्यावरणामधील ऐतिहासिक ठिकाणे किल्ले, गड, दूर्ग, धबधबे, घाट, माथे मंदिरे लेणी सर्वाचे आकर्षण पर्यावरण पर्यटनामधून केले जाते. पर्यावरणाचा समतोल जपत आपला सांस्कृतिक वारसाची जपणूक करणे ही सामुदायिक जबाबदारी आहे हे या पर्यटन प्रकारात स्पष्ट दिसते.

४) पर्यावरणावरील मानवीपणा (Human beining on Envoironment) :

पर्यावरणावरती मानवीपणाचे सामाजिक नैतिक व भावनिक नातेसंबंध निर्माण केले जाते. या पर्यटन प्रकारामध्ये मानवाचे निसर्गाशी अतुट नाते निर्माण होते. या प्रकारात मानव निसर्गाला केंद्रबिंदू मानून पर्यावरणाचे संवर्धन, जतन आणि विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होतो. त्यामुळे मानवतावादी भूमिका ही पर्यावरण पर्यटन विकासासाठी महत्त्वाची भूमिका निभावते.

५) आपले नैसर्गिक पर्यावरण (Our Natural Habitats) :

आपण ज्या परिस्थितीमध्ये राहतो त्याला मानवी परिस्थितीकी पर्यावरण म्हटले जाते. या पर्यावरणामध्ये नैसर्गिक वृद्ध वनस्पती जीव जंतू, प्राणी, सुक्ष्म जीवन, किटके इत्यादी समाविष्ट असतात त्याचे संवर्धन जतन आणि विकास करणे ही पर्यावरण पर्यटकाची जबाबदारी असते त्यामुळे आपले पर्यावरण सुरक्षित ठेवणे, ही सर्वांची जबाबदारी बनते.

६) निसर्गातील प्रवासात समावेश (Involves travel to natural destination) :

मानव हा निसर्गाचा भाग असल्याने पर्यावरण पर्यटनाशी त्याचे अतुट नाते निर्माण केले जाते. त्यामुळे पर्यटनाच्या विकासासाठी अधिक प्रयत्न करतात. पर्यावरणामध्ये होणारे बदल अनुभवण्यासाठी सुक्ष्म निरिक्षणाबरोबर त्यामध्ये समावेश होणे तितकेच महत्त्वाचा आहे. म्हणून पर्यावरण पर्यटनाची भूमिका ही नेहमी निसर्गासमवेत प्रवासात सहभाग नोंदवण्याचा असतो.

७) पर्यावरण बांधणीची जाणीव (Builds environmental awarness) :

पर्यटन हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने पर्यावरणाची जाणीव मानवी समाजात असते. ज्या परिसरात आपण राहतो त्या ठिकाणच्या परिस्थितीतील वनस्पती, पक्षी, प्राणी, जीव जंतू, जैवविविधता टिकवण्याविषयीची जाणीव निर्माण केली जाते. पर्यटनाच्या माध्यमातून पर्यावरणाविषयीचा आपुलकीची भावना निर्माण होते. या पर्यावरणाची सुरक्षा जतन संवर्धन आणि विकसाच्या बांधणीची जाणीव निर्माण केली जाते.

८) पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आर्थिक मदत (Provides direct financial benefits for concervation) :

पर्यावरण पर्यटनाच्या माध्यमातून पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आर्थिक मदत केली जाते. पर्यावरण पर्यटक हा पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आर्थिक साहाय्य करत असते. त्यामधून पर्यावरणाची सुरक्षा वाढवण्याच्या हेतूने प्रयत्न केला जातो. यातून वनसंरक्षण धरण, उंच माथेची बांधणी, पाणी सुरक्षा, कुंपण, वनजीवरक्षक इत्यादी गोष्टींवरती खर्च केला जातो.

९) स्थानिक लोकांच्या सक्षमीकरण आणि आर्थिक फायदे मिळवून देणे (Provides financial benefits and empowerment of local people) :

पर्यावरण पर्यटनाच्या माध्यमातून पर्यावरणाच्या संवर्धनाबरोबर स्थानिक जनतेचा विकास केला जातो. पर्यटनच्या अंतर्गत स्थानिक लोकांना व्यवसाय व रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे स्थानिक जनता पर्यटन विकासाचा भाग म्हणून काम करते. त्यामुळे त्यांना आर्थिक विकासाचा भाग म्हणून काम करते. त्यामुळे त्यांना आर्थिक लाभ मिळण्याचे प्रमाण वाढते तसेच त्यांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

१०) स्थानिक संस्कृतीचा आदर (Respect local culture) :

पर्यावरण पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक संस्कृतीचा आदर राखला जातो. पर्यावरणामध्ये मानवी समाजाने निर्माण केलेली प्रतिकात्मक संस्कृती असते. त्यामध्ये त्याच्या असणाऱ्या श्रद्धा, परंपरा, रुढी, प्रथा, नीती इत्यादींचा संस्कृतीच्या घटकाचा समावेश होतो. त्यांचा कोणत्याही प्रकारे अनादर होणार नाही त्यातून संघर्षात्मक परिस्थिती निर्माण होणार याची काळजीपूर्वक व्यवस्था केली जाते तरच पर्यटन व्यवसाय सुरक्षित राहू शकेल.

११) लोकशाही चळवळ आणि मानव अधिकाराचे सहाय्य (Supports human right and democratic movements) :

पर्यावरण पर्यटन हा निसर्गाच्या संवर्धनाची लोकशाही चळवळ आहे. ज्यामध्ये निसर्गातील प्रत्येक घटकाचे जतन, संवर्धन आणि विकासाची जबाबदारी लोकशाही मार्गाने घेतली जाते. पर्यटन क्षेत्रातील स्थानिक जनता आपला लोकशाही पद्धतीने सहभाग नोंदवतात. त्याचबरोबर मानव अधिकाराच्या सहाय्याने मदत देण्याचे काम करतात.

वरील सर्व मुद्यांवरुन पर्यावरण पर्यटनाची वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. पर्यावरण पर्यटन हा प्रकार अधिक समृद्ध, गतिशील व विकसित करण्यामध्ये पर्यटकाची भूमिका महत्त्वाची आहे. त्या संबंधीची पर्यावरण जाणीव आणि बांधिलकी जपण्याचे काम सातत्याने केले जाते. त्यामुळे निसर्ग आणि मानव यांच्यामध्ये आपलेपणाची भावना निर्माण केली आहे. यामधूनच पर्यावरण पर्यटनाचा विकास होत आहे.

१५.४ पर्यावरण पर्यटनाच्या नियोजनाचे महत्त्व (IMPORTANCY OF ECOTOURISM PLANING)

पर्यावरण पर्यटनाचा विकास करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे. पर्यटन विकासाच्या नवी संधी पर्यटकांना उपलब्ध करुन देणे महत्त्वाचे आहे. यासाठी नियोजनात्मक कार्यपद्धती अमलात आणणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने त्याचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.

१) पर्यावरण पर्यटनाचे जैवविविधता टिकवणे (Conservation of Bio-Diversity) :

पर्यावरणाच्या पर्यटन प्रकारामध्ये निसर्ग आणि मानव यांच्यातील संबंध घनिष्ट निर्माण होतात तेव्हा निसर्गातील जैवविविधता टिकवणे ही मानवाची महत्त्वाची बाब म्हणून समोर येते. जैवविविधतेमधील प्रत्येक घटकाचे संवर्धन जतन व विकास करण्याच्या दृष्टीकोनातून पर्यावरण पर्यटन विकासाचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे.

२) पर्याय विकास निती विकसित करणे (Developing Alternative development strategies) :

पर्यटन विकास करत असताना पर्याय विकास निती पद्धतीचा उपयोग करणे महत्त्वाचे आहे. पर्यावरण पर्यटन विकास करत असताना पर्यावरणाच्या समतोलासाठी पर्याय विकास निती वापर करुन जैवविविधता बरोबर पर्यटनाचा नवीन पर्याय उभारण्यासाठी पर्यायी विकास नीतीचा वापर केला जातो. त्यामुळे पर्यटन विकासाला महत्त्वाचे स्थान निर्माण करण्यात येते.

३) नागरी समाजातील पर्यावरण पर्यटनास महत्त्व (Importancy of Environmental Tourism in Civil Society) :

पर्यावरण पर्यटन विकास करताना नागरी / सभ्य समाजाची निर्मिती केली जाते. जागतिक स्तरावरती पर्यावरण पर्यटनाच्या माध्यमातून सभ्य समाज निर्माण करण्यास मदत होते. सभ्य समाजाचा निसर्ग संबंध प्रस्थापित करण्यामध्ये या पर्यटन महत्त्वाची भूमिका निभावत असते.

४) पर्यावरण पर्यटनातून आर्थिक विकास (Economic Development) :

पर्यावरण पर्यटनातून आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिली जाते. पर्यावरण पर्यटनामधून जागतिक स्तरावरती 3.4 trillion dollars चे उत्पादन वाढ करण्यासाठी मदत झाली आहे. जागतिक स्तरावरती पर्यटक पर्यावरण पर्यटनाला अधिक आर्थिक विकासात प्रयत्न करत असतात. त्यामुळे परकीय देशातील चलनाची वाढ व्यवसायामुळे होते त्यामुळे हा पर्यटनाच्या या प्रकारातून आर्थिक विकास होतो.

५) स्थानिकांना नोकरीची संधी (Local People employement / job opportunity) :

पर्यावरण पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक लोकांना नोकरीची संधी उपलब्ध केली जाते. या प्रकारामध्ये स्थानिकांना पर्यावरणविषयक माहिती असते, अशा लोकांना योग्य प्रशिक्षण देऊन पर्यावरणाविषयकच्या पर्यटनाची शास्त्रीय माहिती देऊन नोकरीची संधी उपलब्ध करुन देता येते. तसेच वस्तू व सेवांची निर्मिती करण्यामध्ये स्थानिकांचा त्यांना सहभाग वाढवता येईल.

६) पर्यावरण पर्यटन योजना निर्मिती (Produced Environmental planning for Ecotourism) :

पर्यटन पर्यावरणाचा विकासात योजनांची निर्मिती करत असताना पर्यावरणाच्या विकासाचे धोरण निश्चित करणे आवश्यक असते. हे करताना पर्यावरण पर्यटन योजनांची निर्मिती परिस्थितीची भौगोलिक जैवविविधता नैसर्गिक आणि मानवी संबंधाची इत्यादीचा विचार करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासकीय आणि निमशासकीय संस्थांच्या माध्यमातून पर्यावरण पर्यटनाची योजना करताना नियोजनपूर्वक कार्य करणे आवश्यक आहे.

वरील सर्व पर्यावरणाच्या पर्यटनाच्या नियोजनाच्या महत्त्वाच्या मुद्यांवरुन पर्यावरणाच्या पर्यटनाचे महत्त्व स्पष्ट होते. पर्यटनाच्या या प्रकारामुळे निसर्ग आणि मानव यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो.

१५.५ पर्यावरणात्मक पर्यटनाच्या मर्यादा (LIMITATION OF ECOTOURISM)

पर्यावरण पर्यटन या प्रकारामध्ये पर्यावरणाचा संवर्धन जतन आणि विकास करण्यासाठी प्रयत्न केला जातो. पण हे करत असताना अनेक समस्या व मर्यादा यांना सामोरे जावे लागते या सर्व मर्यादांचे विश्लेषण पुढील मुद्याच्या आधारे करता येते.

१) पर्यटन पर्यावरणाचे अनियोजन (Mismanagement of Ecotourism) :

पर्यटन पर्यावरणाचे योग्य प्रकारे नियोजन केले जात नाही त्यामुळे या प्रकाराला मर्यादा निर्माण होते. या प्रकाराला पर्यटकाकडून भरगोस असा प्रतिसाद मिळत असला तरी अपेक्षित सेवा व सुविधांचा पुरवठा निर्माण करण्यामध्ये सरकारला अपेक्षित यश आले नाही. त्यासाठी अपेक्षित असणारे संरक्षणात्मक नियमनाची तरतुद या मध्ये केली नाही. तसेच या प्रकारामध्ये सुविधा देण्यासाठी अधिक खर्च करावा लागतो. त्यामध्ये शासनसंस्था आणि राजकीय गट हे राजकारणाच्या फायद्यासाठी या वरील खर्च करतात. पण त्याचा पर्यावरणाच्या पर्यटनाचा विकासास उपयोग करता येत नाही. त्यामुळे पर्यावरण पर्यटनाच्या नियोजनामध्ये मर्यादा निर्माण होतात.

२) पर्यावरणाच्या विकासाकडे दुर्लक्ष (Neglected of Environmental Development) :

पर्यटन पर्यावरणाचा मुख्य हेतू हा पर्यावरणाचा विकास करणे असा जरी असला तरी प्रत्यक्षात मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पर्यावरणामधील जैवविविधता, हवामान, जंगल, भूमी, जल, पशु पक्षी आणि जीवजंतू इत्यादींच्या संवर्धन विकास आणि जतनाचा बदल कार्य करणे गरजेचे असते. त्या संबंधी नियमावली व तरतूदी करण्याबरोबर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. त्याविषयी स्थानिक लोक पर्यटक आणि शासन व्यवस्था यामध्ये समन्वयाची भूमिका घेतली जात नाही त्यामुळे पर्यावरणाच्या विकासाकडे दुर्लक्ष होते.

३) स्थानिक संस्कृतीचा द्वेष (Threasts to Indigenours Culture) :

पर्यटन पर्यावरण हे स्थानिक संस्कृतीच्या संवर्धना विषयक कार्य करत असते असे मानले जाते. पण प्रत्यक्षात तसे केले जात नाही. या पर्यटन प्रकारापासून स्थानिक जनतेचा विकास केला जात नाही तर त्यांची घरे, शेती, सार्वजनिक ठिकाण इत्यादीचे नुकसान केले जाते. या प्रकारचे पर्यटकांकडून पर्यटनाच्या नावाखाली स्थानिक जनतेची घरे, जंगले, शेती, पशु, पक्षी, पिण्याचे पाणी प्रदूषित केले जाते. त्याच्या जीवन संस्कृती पद्धतीवरती आक्रमण केले जाते. तसेच त्यांची संस्कृती इतरांच्या संस्कृतीपेक्षा दुय्यम प्रकारची समजली जाते. परिणामी स्थानिक संस्कृतीचा द्वेष आणि अमानवी स्वरुपाची वागणूक या पर्यटकांकडून दिली जाते. स्थानिक जनतेला आपल्या संस्कृतीची अभिव्यक्ती आणि संवर्धन करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. त्याचबरोबर जंगली प्राण्यांना त्रास देण्यात येतो. त्यामुळे पर्यावरण पर्यटनाचा दर्जा खालावत चालला आहे.

४) जनतेचे विस्थापन (Displacement of People) :

पर्यावरण पर्यटनाच्या विकासासोबत त्यापासून इतर बाबीच्या परिणामाचा विचार करणे गरजेचे आहे. या प्रकारापासून विकासाची दुसरी बाजू विस्थापन म्हणून समोर येते. शासन व भांडवली संस्था पर्यावरण पर्यटनाच्या नावाखाली जंगल भागातील परिसर नियंत्रित केला जातो. शासन जंगलाचे क्षेत्र निश्चित करते तेव्हा त्या क्षेत्रामधून स्थानिक जनतेला आपल्या मुळच्या ठिकाणीपासून विस्थापित व्हावे लागते. त्यामुळे स्थानिक जनतेच्या शेती संस्कृतीपासून दूर जावे लागते. त्यांच्या उदरनिर्वाहाच्या वस्तू व सेवा निर्मितीचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांच्या निवारा, शिक्षण व नोकरीच्या प्रश्नाकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. त्यांना आपला सामाजिक आर्थिक उपजीविकेसाठी स्थलांतर करावे लागते. या प्रश्नाकडे पर्यटन विभाग दुर्लक्ष करतो. त्यामुळे पर्यावरण पर्यटनाच्या मर्यादा निर्माण झाल्या आहे.

५) भांडवली कंपन्याचे आक्रमण :

पर्यावरण पर्यटन प्रकारामध्ये स्थानिक जनतेच्या उपजिवेसाठी भांडवली कंपन्याचे आक्रमण केले आहे. भांडवली कंपन्या आपला नफा मिळविण्यासाठी पर्यावरण पर्यटनाचा उपयोग करत आहेत, हे करत असताना या कंपन्या पर्यावरणातील जैवविविधता, जंगल, शेती, पाणी, हवामान, प्राणी आणि पक्षी यांच्यावरती आक्रमण होते. भांडवली कंपन्या पर्यटनाच्या नावावरती स्थानिक संस्कृतीवरती आक्रमण करतात. त्याच्या अभिव्यक्ती आणि संवर्धनाविषयी अपेक्षित आर्थिक तरतुदी केल्या जात नाहीत, तर आर्थिक आक्रमण केले जाते.

६) भ्रष्टाचार :

पर्यावरण पर्यटन विकास करत असताना भ्रष्टाचाराच्या समस्या निर्माण केल्या जातात. पर्यावरणाच्या विकासासाठीचा निधी हा विकासासाठी उपयोगात आणला जात नाही. विकासाच्या निधी मध्ये शासन ठेकेदार आणि अशासकीय संस्था यांच्या संगनमताने भ्रष्टाचाराचा प्रकार केला जातो. त्यामुळे पर्यटन विकासामध्ये मर्यादा निर्माण होतात.

वरील सर्व मुद्यावरुन पर्यटन पर्यावरणाच्या प्रकाराला मर्यादा निर्माण केल्या जातात. पर्यटन पर्यावरण अपेक्षित विकास करावयाचा असेल तर या सर्व मर्यादा सोडवणे अपेक्षित आहे.

१५.६ ग्रामीण पर्यटन (RURAL TOURISM)

प्रस्तावना :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेमध्ये गतीमान परिवर्तन घडून येत हे. त्याचा परिणाम शहरी आणि ग्रामीण जीवनावरती होताना पाहण्यास मिळतो. विशेषतः ग्रामीण भागातील शेती व व्यवसाय यावरती अधिक प्रमाणात परिणाम झाला आहे. या भागाची अर्थव्यवस्था शेती आधारित व्यवसायावरती अवलंबून आहे. त्याचा राष्ट्रीय उत्पन्नावरती परिणाम होताना दिसतो. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. ज्याचा उपयोग कृषी उद्योगाच्या निर्मितीसाठी करण्यात येतो. या संसाधन उपयोग करत असताना पर्यावरणाच्या समतोलाबरोबर चिरंजीवी विकास बरोबर ग्रामीण भागाच्या विकासासाठी उपयोग करता येतो. याविषयी विचार करणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागावरती औद्योगिकरणाचा परिणाम हा शुद्ध खेडे आणि औद्योगिक खेडे या स्वरुपामध्ये पाहण्यास मिळते. असे असले तरी या ग्रामीण भागाचे नैसर्गिक सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासंबंधित त्यांचे स्वतंत्र अस्तित्व टिकवणे गरजेचे आहे. त्यासाठी ग्रामीण भागात चिरंजीवी विकासाची भूमिका घेऊन नवीन प्रयोग करणे आवश्यक बाब बनली आहे. या संकल्पनेमध्ये ग्रामीण भागातील पर्यावरणात्मक, सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, जीवनपद्धतीमध्ये चिरंजीवी विकास करण्यासाठी ग्रामीण पर्यटनाची संकल्पना समजून घेता येते. ग्रामीण भागातील शेती, घराचे प्रकार, परंपरा रुढी, प्रश्न रंगपूर्णता कार्यक्रम सण, उत्सव, जत्रा, खेळ साहित्य कथा, गाणी, नृत्य कलाकृती इत्यादीचा समावेश यामध्ये केला आहे. पर्यटकांना ग्रामीण सांस्कृतिक जीवनाचा परिचय करण्यासाठी याचा विकास करण्यात आला आहे. यासाठी ग्रामीण समाजातील लोक या पर्यटन प्रकारामध्ये सहभाग घेऊन ग्रामीण पर्यटनाचा प्रकल्प यशस्वी करण्याचा प्रयत्न करत आहेत.

१५.७ ग्रामीण पर्यटनाची व्याख्या (DEFINITION OF RURAL TOURISM)

१) KOVACS 2002 "ग्रामीण पर्यटन हे शेती आणि ग्रामीण पर्यटनाच्या असा समान अर्थ अनेक अभ्यासकांनी विकासाच्या संदर्भात केला आहे. ग्रामीण पर्यटन हे कृषी व्यवसायाच्या संदर्भात शेतीमालाचे व्यापारीकरण, राहण्याची व्यवस्था आणि आनंदी सेवांची निर्मिती करण्याची अभिव्यक्ती म्हणजे ग्रामीण पर्यटन असे म्हणतात."

(KOVACS 2002 : "Expression of Rural Tourism, agro tourism and village tourism are used many time as synonyms by experts and developers. This fact can be explained with the diverse activities of the area. Countryside hospitality is more or less connected to the agribusiness and this marketing product consist of accommodation service, catering and leisure time services")

२) ANTAL (1996) "ग्रामीण पर्यटन हे एक उत्पादन आहे की जीचा दृष्टिकोन हा पुरवठा व्यवस्थापन आणि व्यापारीकरण क्रिया महत्त्वाची मानली जाते. ग्रामीण पर्यटन ही व्यापारीकरणाची प्रक्रिया आहे. जे पर्यटन उत्पादन आणि ग्रामीण गुंतागुंतीची व्यवस्था आहे ज्यामध्ये अथितिव्यवस्था आणि आकर्षक स्वरुपाचे विशेष उत्पादनाचा समावेश केला जातो."

ANTAL 1996 "Rural tourism can be defined as a tourist product, which approach accentuates the importance of supply management and marketing activities. The rural tourism, as an elements of Hungarian tourism supply as a tourism product, is a compler rural supply of a given settlement (or group of settlements) which involves the special elements of hospitality and attractiveness and these elements are organized into special product."

CSIZMADIA 2000 ''ग्रामीण पर्यटन हे स्थानिकाचे संघटनात्मक सहकार्य आणि सेवा पुरवठ्याची हाताळणी करणे बरोबर ग्रामीण पर्यटनाचे पाहणी, त्यांचे प्रादेशिक आकर्षकपणा सेवा आणि राहण्याची आणि न राहण्याच्या सुविधा पर्यटक त्याचे आरामदाय क्रियेची मागणी आणि पर्यटकांना व्यावसायिक सुविधा पुरविणे इत्यादी घटकांचा समावेश ग्रामीण पर्यटन म्हणून केला जातो.''

(CSIZMADIA 2000 "Regional tourism can e characterized as a cooperation of local organizations and service providers operating in a well-looked-after rural environment having a regional attractiveness, serving the resident and non resident tourist' demands of leisure activities and providing commercial service for customers.")

लाने (१९९४) ''ग्रामीण पर्यटन हे प्रामुख्याने ग्रामीण भागात आढळून येते. पारंपरिक ग्रामीण भाग कार्यात्मक लहान मोठे दोन पारंपारिक वैशिष्ट्य समावलेले असते. जो स्थानिक कुटुंबाशी संबधीत आहे आणि ग्रामीण पर्यावरणाच्या ऐतिहासिक भौगोलिक आणि आर्थिक गुंतागुंत पद्धती प्रर्दशित केले जाते.''

According to Lane (1994) "Rural tourism should be located in rural areas, funcationally rural, rural in scale i.e. usually small, scale be traditional in character : grow slowly and organically be connected with local familiers and represent the compler pattern of rural environment, economy, history and location."

३) ब्रामवेल आणि लाने १९९४ यांच्या मते, ''ग्रामीण पर्यटन हे बहुआयामी प्रक्रिया आहे जी फक्त कृषी आधारित पर्यटन आहे. यामध्ये कृषी आधारित सुट्टीचा समावेश होतो. परंतु पर्यावरणवादी आणि सुट्टीचा स्वरुपाच्या आवडीचा समावेश होतो. ज्यामध्ये चालणे Climbing and riding सुट्टी साहसी खेळ, आणि आरोग्य पर्यटन, शिकार angling, शैक्षणिक सहली कला आणि ऐतिहासिक पर्यटन आणि इतर पर्यटन इत्यादींचा समावेश होतो.''

Baramwell & Lane 1994, "Descried rural tourism as multifacted activity rather than farm-based tourism only. It not only includes farms based holidays but also comprises special interest nature holidays and ecotourism, walking, climbing, and riding, holidays, advertirs, sports and health tourism, huntling and angling, education travel, arts and heritags tourism and in some areas, ethnic tourism."

४) जिंगमीमग आणि लिव्हा (२००२) ग्रामीण पर्यटन हे पर्यटनाची प्रक्रिया मुख्य उद्दिष्ट ग्रामीण भागातील नैसर्गिक आणि मानवतावादी सामाजिक संबंध निर्माण करणारे आहे.

Jingming & Lihua 2002 "Rural tourism refers to those traveling activities that aim at pursuing nature and humanistic attraction with rurality in rural area."

थोडक्यात, ग्रामीण पर्यटन हे प्रादेशिक ग्रामीण भागामधून निर्माण झालेले उत्पादन आहे. ज्यामध्ये पर्याय विकास धोरण, लोकांच्या भावना, आर्थिक उत्पादन आणि स्थानिक नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन करण्याबरोबर ग्रामीण संस्कृतीचे दर्शन केले जाते.

ग्रामीण पर्यटनाचा विकास हा युरोपियन खंडातील ऑस्ट्रिया आणि फ्रान्स या देशामध्ये झाला. ऑस्ट्रियामध्ये शासनाने ग्रामीण पर्यटनाचा विकास हा व्यवसाय म्हणून समोर येतो. त्याच्या विकासासाठी विशेष सुविधा देण्यात येते. फ्रान्स शासनाने शिक्षणाच्या भूमिकेमधून पर्यटन विकासविषय सविस्तर कार्यक्रम केला आहे. सन १९८९-९० च्या दशकात ग्रामीण भागात शासनाने ग्रामीण पर्यटन विकास करण्याच्या संधी उपलब्ध करुन दिले आहे. त्यामुळे पर्यटक हा ग्रामीण भागाशी संबंध निर्माण करेल. ग्रामीण पर्यटन हे प्राथमिक स्थितीवरती आधारभूत असते. ज्यामध्ये पर्यटन आणि सांस्कृतिक घटक यांचा संबंध प्रस्थापित केला जातो. ग्रामीण पर्यटन विकासातून आर्थिक फायद्यामध्ये वाढ होते, त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होते. त्यातून ५.१५% इतके प्रमाण आहे तर २००-३०० व्यक्तिना रोजगाराच्या संधी उपलब्ध करता ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण लोकांना रोजगार संधी उपलब्ध करुन दिली जाते.

१५.८ ग्रामीण पर्यटनाची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF RURAL TOURISM)

ग्रामीण भागामध्ये पर्यटनाच्या विकासाचा उद्देश ग्रामीण भागात समृद्ध स्वरुपाचा विकास घडवून आणणे, हे करत असताना नैसर्गिक परिस्थितीचा समतोल सांभाळून विकासाचे उद्दिष्ट निश्चित केले जाते. ग्रामीण पर्यटनाचे वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) ग्रामीण पर्यटन हे अनुभव आधारित आहे (Experience oriented Rural Tourism) :

ग्रामीण भागातील समृद्ध जीवनाचा अनुभव घेण्यासाठी या पर्यटनाची निर्मिती केली आहे, ग्रामीण भागातील शेती व व्यवसाय याविषयीची माहिती मिळविण्यासाठी कार्य केले जाते. ग्रामीण भागातील सन, उत्सव, यात्रा, नृत्य, गायन, वादन, कलाप्रकार विषयीची संस्कृती चे सादरीकरण करण्यासाठी व त्याचा अनुभव घेण्यासाठी याचा उपयोग केला जातो. ग्रामीण भागाचा अनुभव प्राप्त करण्यासाठी हे पर्यटन करतात.

२) प्रसिद्ध ठिकाण दर्शवणे (The locations are sparsely populated) :

ग्रामीण भागातील संस्कृती दर्शविणारी ठिकाणे यामध्ये समावेश केला जातो. या भागात असणारे विविध प्रकारच्या कलाकृती, मंदिरे, लेणी, ताम्रपट, शिलालेख यामधून ग्रामीण संस्कृती कलादर्शकता दिसून येते. तसेच नवीन शेतीचे व उद्योगाच्या प्रयोगासंदर्भातल्या नोंदी दर्शवण्यासाठी कार्य केले जाते.

३) नैसर्गिक पर्यावरणाचे प्रभूत्व (It is predominantly in Natural Environment) :

ग्रामीण पर्यटनामध्ये नैसर्गिक वातावरणाच्या प्रभूत्वाला महत्त्व दिले जाते. या भागात नैसर्गिक वातावरणातील हवामान, जमीन, पाणी, जंगल, प्राणी, पक्षी आणि इतर घटक याच्यामुळे प्रभूत्व निर्माण झाले आहे. या नैसर्गिक वातारणाचा पर्यटकांना मुक्तपणे आस्वाद घेण्याचे काम केले जाते. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल न करता या परिस्थितीचा समायोजन करण्यात येते.

४) स्थानिक उत्साह आणि हंगामी कार्यक्रम (In meshes with seasonality and local events) :

ग्रामीण भागामधील संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी विविध कार्यक्रम केले जातात. या पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपण्याचे काम ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून केले जाते. यासाठी विविध प्रकारचे सण, उत्सव, कलाकृती, यात्रा महोत्सव कार्यक्रमाचा हंगामी स्वरुपात आयोजन केले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील संस्कृती चिरकाल टिकवण्याचा प्रयत्न यामधून केला जातो.

५) ग्रामीण संस्कृतीचे आकर्षण (The Primary attraction is rural culture):

ग्रामीण पर्यटनाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणून ग्रामीण संस्कृतीचे आकर्षण म्हणून पाहिले जाते. ग्रामीण भागातील जीवन संस्कृतीचे चित्रिकरण करण्याचे काम या पर्यटन प्रकारामध्ये केले जाते. ग्रामीण भागातील जंगल शेती आणि पारंपारिक कलाकृती हस्तउद्योग यामधून सांस्कृतिक आकर्षण निर्माण केले जाते. यातून ग्रामीण भागाच्या संस्कृतीचे सादरीकरण पर्यटकांना आकर्षित करुन घेते.

वरील सर्व मुद्यांमधून ग्रामीण भागातील पर्यटन स्वरुप स्पष्ट होते. ग्रामीण पर्यटनामध्ये निसर्ग आणि मानव संस्कृतीशी अतुट नातेसंबंध निर्माण केले जाते, यातून पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करण्यासाठी ग्रामीण पर्यटनाची निर्मिती केली आहे.

१५.९ ग्रामीण पर्यटनाची साधने (RESOURCES OF RURAL TOURISM

ग्रामीण भागातील पर्यटनाच्या विकासाकरिता स्थानिक संसाधनाचा वापर करुन ग्रामीण पर्यटनाची निर्मिती केली जाते, ग्रामीण भागाची ओळख निर्माण करण्यासाठी त्या भागातील भौगोलिक परिस्थिती जैवविविधता आणि मानवी जीवन संस्कृती यांचा समावेश करावा लागतो. याचा शेती व्यवसाय सांस्कृतिक प्रथा, परंपरा, लोककला आणि पर्यावरणात्मक पर्यटनाच्या क्रियांच्या कार्यक्रमाचा समावेश यामध्ये करण्यात येतो. त्यामुळे ग्रामीण भागाच्या नैसर्गिक वातावरणाचे नियंत्रण व विकास करण्याच्या अनुषंगाने पर्यटन विकास केला जातो. ग्रामीण पर्यटनाची संसाधने पुढीलप्रमाणे आहेत.

१) शेती (Agriculture) :

ग्रामीण पर्यटनाच्या विकासाच्या संसाधनामध्ये शेती हा महत्त्वाचा घटक मानला जातो. ग्रामीण भागात सर्वात अधिक शेती केली जाते. शेतकरी आणि जमीन याचे पारंपारिक स्वरुपाचे नाते दिसून येते. ग्रामीण भागातील हवामान, जमीन, पाणी, पर्यावरण याच्या आधारे शेतीमध्ये नवनवीन प्रयोग केले जातात. या भागामध्ये फळ बागायती, फुले, शेती, फार्महाऊस, बागायती शेती, सेंद्रिय शेती, हंगामी शेती या सारख्या प्रयोगातून ग्रामीण पर्यटकांना आकर्षित केले जाते. ग्रामीण भागामध्ये शेती बरोबरच मत्स शेती, बंदिस्त शेळीपाल, पक्षी व प्राणी पालनाचे उद्योग, दुग्ध, रेशम निर्मिती सहकारी शेती, महिलांचे शेतीतील सहभाग यामुळे ग्रामीण भागात शेती संसाधनांकडे पर्यटकांचे आकर्षण वाढत आहे.

२) सांस्कृतिक वारसा (Cultural Heritage) :

ग्रामीण पर्यटनातील महत्त्वाचे संसाधन म्हणून सांस्कृतिक वारसाकडे पाहिले जाते. ग्रामीण भागामध्ये संस्कृती ही स्थानिकांच्या जीवन जगण्याच्या मार्ग म्हणून पाहिला जातो. ग्रामीण भागाच्या सांस्कृतिक घटकामध्ये ग्रामीण जीवनशैली प्रथा, परंपरा, कला, ज्ञान, भाषा, हस्तकला, विणकाम, मातीकाम, खेळणी निर्मिती या सारख्या कला प्रकारातून संस्कृतीचा वारसा जपला जातो. ग्रामीण भागात सण, उत्सव, यात्रा यासारख्या अनेक कार्यक्रमातून संस्कृतीचे प्रदर्शन भरवले जाते. हा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी ग्रामीण पर्यटन विशेष लक्ष देते.

३) पर्यावरण पर्यटन कार्यक्रम (Eco tourism activities) :

ग्रामीण पर्यटनामध्ये पर्यावरणाच्या विकास संवर्धन आणि जतन यावरती महत्त्व दिले जाते. ग्रामीण भागातील पर्यावरणाच्या समतोल बिघडू न देता त्याचा विकास करण्यासाठी पर्यावरण पर्यटन कार्यक्रमाचा साधन म्हणून वापर केला जातो. ग्रामीण भागातील वातावरण, भौगोलिक स्थान, समतोल जपण्यासाठी ग्रामीण पर्यटन प्रयत्न करते. ग्रामीण भागात सहज सुलभ रित्या पर्यटनाचा विकास करण्यासाठी पर्यावरण पर्यटन कार्यक्रम साधन म्हणून उपयोगात आणतात.

वरील सर्व मुद्यातून ग्रामीण पर्यटनांची संसाधने स्पष्ट होतात. त्या आधारे ग्रामीण पर्यटनाचा विकास केला जातो. ग्रामीण भागामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून नैसर्गिक पर्यावरणाचा समतोल आणि आर्थिक विकासाला चालना देण्यात येते.

१५.१० भारतातील ग्रामीण पर्यटनाचा कार्यक्रम (RURAL TOURISM ACTIVITIES IN INDIA)

ग्रामीण पर्यटनाचा विकास व्हावा या मुख्य उद्देशातून ग्रामीण पर्यटनाचा कार्यक्रम करण्यात आला. ग्रामीण भागातील नैसर्गिक पर्यावरणाचा समतोल आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण काम म्हणून ग्रामीण पर्यटन कार्यक्रमाकडे पाहण्यात येते. त्यानुसार ग्रामीण पर्यटनाचे विविध कार्यक्रम पुढील मुद्यावरुन स्पष्ट करता येतील.

१) ग्रामीण भागात राहणे (Staying Rural Area) :

ग्रामीण भागामध्ये राहण्याचा अनुभव घेण्यासाठी खेड्यातील घरामध्ये झोपडीत आणि Tents मध्ये राहता येते. ग्रामीण भागामध्ये राहत असताना स्थानिक लोक ज्या प्रकारच्या ठिकाणी राहतात त्याविषयीचा अनुभव घेण्यासाठी या पर्यटन प्रकारात ग्रामीण भागात राहण्याचा अनुभव घेतात.

२) शेतीमध्ये काम करणे (Working in agricultural fields) :

ग्रामीण भागामध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने शेती कामाचा अनुभव या प्रकारात घेतला जातो. ग्रामीण भागात शेती करण्याच्या विविध पद्धती या कार्यक्रमात प्रत्यक्ष काम करता येते त्याविषयी सविस्तर माहिती मिळते.

३) पर्यावरण पूरक दळणवळण साधनांचा वापर (Use of eco-friendly transportation modes) :

ग्रामीण पर्यटनाचा अनुभव घेत असताना पर्यावरणाला पूरक असा वाहनाचा वापर केला जातो. ग्रामीण पर्यटन करत असताना सायकल, सुर्यऊर्जेवरती चालणारी वाहने, बैलगाडी, घोडागाडी यासारख्या साधनांचा वापर केला जातो.

४) प्राणी आणि पक्षी निरक्षण नैसर्गिक चालताना (Bird and Animal watching natural walk) :

ग्रामीण पर्यटन करत असताना निसर्गाचे निरक्षण करण्यासाठी चालत जावे लागते, त्यामुळे ग्रामीण भागातील सौंदर्य अनुभवता येते. तसेच नवीन प्राणी व पक्षी यांचे निरीक्षण करण्याचा आनंद घेता येतो. त्यामुळे एक वेगळा अनुभव या पर्यटनाच्या प्रकारात घेता येतो.

५) स्थानिक लोक संस्कृतीचे प्रदर्शन (Exhibiting local flock) :

ग्रामीण पर्यटनामध्ये लोककलांना महत्त्व दिले जाते. यांचा विकास व्हावा व त्या चिरंतन काळ टिकाव्यात यासाठी प्रयत्न या कार्यक्रमात केला जातो. ग्रामीण भागात लोककला प्रकारात भारुड, ओवी, भजन, लावणी, तमाशा, पारंपरिक गीते, गाणी इत्यादींचा विकास करण्यासाठी प्रयत्न या प्रकारात केला जातो. त्यामुळे ग्रामीण पर्यटन कार्यक्रमातून लोक संस्कृतीचे प्रदर्शनास संधी प्राप्त होते.

६) यात्रा उत्सव सहभाग साजरीकरण (Participating in fairs and festivals celebrations) :

ग्रामीण भागातील सण, उत्सव, जत्रा, यात्रा यामध्ये सहभागी होऊन आनंद घेता येतो. ग्रामीण पर्यटनामधून ग्रामीण उत्सवाचे सादरीकरण जवळून सहभाग घेता येतो. त्यामुळे पर्यटनामध्ये नवीनच निर्माण केले जाते.

७) ग्रामीण खेळ खेळणे (Playing Rural Games) :

ग्रामीण भागात पारंपरिक खेळ खेळले जातात. त्यातून ग्रामीण जीवनाचा अनुभव पर्यटकांना घेता येतो. ग्रामीण भागात कबड्डी, खो-खो, धावण्याच्या शर्यती, बैलगाडी स्पर्धा, सायकल स्पर्धा, वजन उचलणे, भजन वादन, गायन स्पर्धा या सारखे अनेक खेळ या भागामध्ये खेळण्यात येतात. त्यामुळे ग्रामीण जीवनाचा वेगळा आनंद ग्रामीण पर्यटनामधून घेण्यात येतो.

वरील सर्व मुद्यावरुन ग्रामीण पर्यटनाचा कार्यक्रम स्पष्ट होतो. ग्रामीण जीवन वास्तव अनुभवणे या उद्देशातून ग्रामीण पर्यटन या प्रकाराची ओळख करुन घेता येते.

१५.११ ग्रामीण पर्यटनाच्या समतोल आव्हान (CHALLENGES ON RURAL TOURISM

ग्रामीण भागाच्या विकासाकरिता ग्रामीण पर्यटनाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे, ग्रामीण भागात नैसर्गिक पर्यावरणाचा चिरंजीव विकास करण्यासाठी बरोबर आर्थिक विकासाचे साधन म्हणून ग्रामीण पर्यटनाकडे पाहत आहे. या पर्यटन प्रकारामुळे ग्रामीण भागातील शेती, पर्यावरण,

लोककला, परंपरा यांचे संवर्धन केले जाते. हे करत असताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते, ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) पर्यावरण आणि स्थानिक संस्कृतीच्या संवर्धनाचे आव्हान (Challenged to preservation environment and local culture) :

ग्रामीण पर्यटनाचा मुख्य उद्देश हा पर्यावरण आणि स्थानिक संस्कृतीचे संवर्धन करणे आहे. पण प्रत्यक्षामध्ये तशा प्रकारच्या क्रिया केल्या जात नाही. ग्रामीण भागातील पर्यावरणाचे प्रदूषण अधिक प्रमाणामध्ये वाढले आहे. ग्रामीण पर्यटनातील पर्यटक हे ग्रामीण भागातील पर्यावरणाची दूरदशा निर्माण करतात. यांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी प्रयत्न करत नाहीत. तसेच नवीन सांस्कृतिक आक्रमण करुन स्थानिक संस्कृतीत अडथळे निर्माण करतात. त्यामुळे स्थानिक संस्कृतीच्या संवर्धनाची समस्या निर्माण होते.

२) जमीन वापराचे कायदे संबंधी समस्या (Problems related to law of land use) :

ग्रामीण पर्यटनाच्या विकासामध्ये जमीनीच्या वापरा संदर्भातील कायदेशीर अडथळे निर्माण होतात. ग्रामीण भागातील अधिग्रहण करत असताना जमीनीच्या मालकी हक्काची समस्या निर्माण होते. या कामासाठी जमीनीचे विशेष आर्थिक क्षेत्र व अकृर्षी जमीन म्हणून मान्यता घ्यावी लागते. त्यामुळे स्थानिक शेतकरी पर्यटन विकासासाठी जमीन उपलब्ध करुन देत नाही. त्यामुळे जमीन कायद्याची अंमलबजावणी करुन जमीन काढून घेण्यासाठी आरक्षित जमीन करण्याची कामे शासनाच्या अंतर्गत केली जातात.

३) ग्रामीण पर्यटन उद्योगास प्रशिक्षीत मानवसंसाधनाची कमतरता (Use of eco-friendly transportation modes) :

ग्रामीण पर्यटन विकासासाठी प्रशिक्षित मानवसंसाधानाची आवश्यकता आहे. ग्रामीण पर्यटनातील नवीन विकासासाठी मनुष्यबळ हे स्थानिक पातळीवरती निर्माण करण्यात येत नाही. हे पर्यटन अधिक लोकापर्यंत पोहचवण्यासाठी प्रशिक्षित विभागामार्फत कार्यक्रम करणे आवश्यक आहे. तसा ग्रामीण भागातून प्रतिसादाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे योग्य माहिती ग्रामीण पर्यटनाची मिळत नाही त्यामुळे अडथळे निर्माण होतात.

४) आर्थिक सहाय्याचा आणि संसाधनाची कमतरता (Limitation of insufficient financial support and infrastructure) :

ग्रामीण पर्यटनाचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुदीची कमतरता भासत असते. या पर्यटनाला अपेक्षित आर्थिक साहाय्य मिळत नसल्यामुळे अपेक्षित विकास करता येत नाही. यासाठी शासकीय आणि निमशासकीय संस्थांच्या मार्फत काम केले जात नाही. तसेच संसाधनांचा अपेक्षित विकास केला जात नाही. त्याच्या सुधारणा करण्यासाठी योग्य अंमलबजावणी केली जात नाही. त्यासाठी आर्थिक सहाय्याची कमतरता केली जाते.

५) पर्यटन क्रियेमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग कमी असतो (Lack of local people involvement and participation in tourist activities) :

ग्रामीण भागातील स्थानिक लोकांना सहभाग कमी असतो. त्यामुळे ग्रामीण पर्यटनास मर्यादा निर्माण होतात, या भागातील लोक शेती आणि व्यवसायामध्ये व्यस्त असतात. त्यामुळे

ह्या लोकांना स्थानिक पर्यटन विकास कार्यक्रमात सहभाग घेण्याचे प्रमाण कमी असते. हे लोक शहरी भागामध्ये कामाच्या शोधात तरुण वर्ग अधिक स्थलांतरित होतो त्यामुळे या पर्यटन विकासामध्ये स्थानिक लोक सहभाग कमी प्रमाणात नोंदवत असतात.

६) स्थानिक लोकसंख्येतील निरकक्षरता प्रमाण अधिक (Illitercy level of local population) :

ग्रामीण पर्यटनाचा विकासामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग अत्य अल्प असतो. कारण निरकक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण अल्प आहे. कारण अपेक्षित सेवा सुविधाचे प्रमाण अत्य अल्प आहे. त्यांना शाळा महाविद्यालयामध्ये शिक्षण घेताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे ग्रामीण पर्यटनाच्या विषयीची माहिती आणि प्रशिक्षण देण्यामध्ये निरक्षरता सर्वात मोठे आव्हान म्हणून पाहिले जाते.

७) भाषेचा अडथळा (Language barriers) :

ग्रामीण पर्यटनाचा विकास करत असताना भाषेची मर्यादा स्पष्ट दिसते. ग्रामीण भागातील भाषा ही लोकभाषा, बोली भाषा असते. त्यामुळे या भाषा स्थानिकांना इतर लोकांशी संवाद साधण्यात मर्यादा निर्माण करतात. ग्रामीण भागात बाहेरील प्रदेशातील पर्यटकांना अपेक्षित माहिती घेण्यासाठी संवादाची समस्या भाषेच्या अडथळ्यामुळे निर्माण होते. यामुळे ग्रामीण पर्यटनास अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.

वरील सर्व मुद्यावरुन ग्रामीण पर्यटनामध्ये अडथळे निर्माण करणारे आहेत, ग्रामीण भागाचा विकास करावयाचा असेल तर ग्रामीण पर्यटनाचे क्षेत्र अधिक वाढणे आवश्यक आहे. त्यासाठी शासकीय निमशासकीय संस्थात्मक स्तरावरती विकास करणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण भागातील स्थानिक जनतेचा विकास प्रकल्पाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदला बरोबर विकासात सहभागी करुन घेणे आवश्यक आहे. तरच ग्रामीण पर्यटनातील आव्हाने दूर करता येतील.

आपली प्रगती तपासा :

१) ग्रामीण पर्यटनाची व्याख्या सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
२) भारतातील ग्रामीण पर्यटनाचे कार्यक्रम स्पष्ट करुन त्या समोरील आव्हाने सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१५.१२ शहरी पर्यटन (URBAN TOURISM)

प्रस्तावना :

शहरी पर्यटन ही संकल्पना व्यापक अर्थाने जागतिक स्तरावरती विकसित व विकसनशील राष्ट्रामध्ये पाहिली जाते. यामध्ये प्रत्येक व्यक्तींना शहराविषयी असणारे आकर्षण बहुआयामी स्वरुपात या क्रिया केली जाते. शहराचा पर्यटना संदर्भामध्ये प्रसिद्ध ठिकाणाच्या आणि ऐतिहासिक घटनाच्या बाबतच्या शहराचा समावेश केला जाते. ही एक प्रक्रिया आहे ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पर्यटक शहरांना महत्त्वपूर्ण भेटी देत असतात. शहरी भागातील इमारती शहराची रचना नैसर्गिक ठिकाणे यांना पर्यटक भेट देत असतात. जागतिक स्तरावरती ५० टक्के लोक शहराकडे वळत आहेत. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था समजून घेता येते. शहरी पर्यटन हे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेकडे वाटचाल करत असतात. सामाजिक सांस्कृतिक आर्थिक आणि राजकीय घटकाकडे विकासात्मक प्रक्रियेकडे जात आहे. त्यातून जागतिक स्तरावरती निर्माण झालेले तांत्रिकते बरोबर शासन यंत्रणेच्या समस्ये संदर्भात काय करण्यात येते.

शहर पर्यटनाच्या बाबतच्या व्यष्ठी अध्ययन पद्धती तंत्राचा वापर करुन संशोधन अधिक प्रमाणात केले आहे. या संशोधनामध्ये शहराच्या पर्यटन विकासाबाबत नवीन दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. यामध्ये भौगोलिकता, पुर्णनिर्मिती ऐतिहासिक वारसा, घटना याचा कार्यक्षेत्रदृष्ट्या अभ्यास करण्यात आला आहे. यासंबंधी सामाजिक शास्त्राच्या दृष्टीने सामाजिक घटक जागतिक क्षेत्र शहराचा पुर्ण अभ्यास करण्यासाठी या पद्धतीचा वापर करण्यात येतो. यामध्ये सामाजिक सांस्कृतिक घटक स्थलांतरण नैसर्गिक घटक विकासात्मक कार्यक्रम यांचा सहभाग यामध्ये करतात.

शहरी पर्यटनासंबंधी Judith Reutsche (2006) यांनी त्यांच्या Urban Tourism : What Attracts Listors to Cities या पुस्तकात त्यांनी शहरी पर्यटनाचे प्राथमिक आणि दुय्यम भाग स्पष्ट केले आहेत. प्राथमिक भागामध्ये शहर पर्यटन विकासाची स्थळे, सांस्कृतिक सुविधा, प्रदर्शन, कला, निकेतन, फिल्म ठिकाण, व्यावसायिक केंद्रे आणि इतर आकर्षने, खेळाच्या सुविधा अंतर्गत, बर्हिगत, करमणूक केंद्रे, आनंददायी ठिकाणे इत्यादींचा समावेश यामध्ये करतात. तर दुसऱ्या भागांमध्ये दुकाने व्यापारापेठ सहाय्यकता दळणवळण सुविधा, वाहन तळ, ठिकाणाची माहिती देणारे नकाशे, दर्शकता मार्गदर्शक यांचा समावेश होतो. त्यामुळे शहरी पर्यटनाकडे आकर्षण अधिक प्रमाणात वाढते. यातून नविन ठिकाणांचा शोध किंवा निर्मिती करतात. गुंतवणूक वाढ समुदाय सुविधा वाढ करणे.

१५.१३ शहरी पर्यटनाची व्याख्या (DEFINITION OF URBAN TOURISM)

शहरी पर्यटन म्हणजे शहरी भागात पर्यावरणाचा समतोला बरोबर आर्थिक विकास साध्य करण्यास आहे. ज्यामध्ये पर्यटन व्यवसायामध्ये गुंतवणूकीचे आकर्षण निर्माण केले जाते. त्याच बरोबर आनंदाच परिस्थितीचा अनुभव पर्यटकांना दिली जाते. याला व्यापक अर्थाने शहरी पर्यटन म्हटले जाते.

१५.१४ शहरी पर्यटनाची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF URBAN TOURISM)

शहरी पर्यटनाचा विकास अधिक प्रमाणात शहरांमध्ये होऊ लागली आहे. या भागामध्ये पर्यटक आकर्षित करण्यासाठी शहराचे ऐतिहासिक प्राचीन शहर नियोजीत शहर आणि रुपांतरित शहरामध्ये यांचा समावेश होतो. त्यानुसार पर्यटक आपला आवडीनुसार शहराची निवड करत असतो. ज्यातून त्याला पर्यटनाचा आनंद व समाधान घेता येईल. शहरी पर्यटनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) शहराची उत्साही खेळकर आणि चिरंजीवी भेट (City of visit has to be playful, festive and sustainable) :

शहरी पर्यटनाची मुख्य वैशिष्ट्ये म्हणून शहराची उत्साही खेळाडू आणि चिरंजीवी भेट देण्याचे येते. शहराचा विकास करताना निसर्ग आणि आर्थिक विकासाच्या मुद्यांचा विचार केला जातो. शहरी पर्यटनाच्या आकर्षणामागचा मुख्य उद्देश हा असतो त्यामुळे शहरी पर्यटन हे उत्साहाबरोबर चिरंजीवी विकासाच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते.

२) स्थानिकाबरोबर आंतरक्रिया आणि समोरासमोर भेट (Encountering and interacting with locals) :

शहरी पर्यटनामध्ये पर्यटक स्थानिक लोकांना समोरासमोर भेटून चर्चा करतात. जागतिक स्तरावरती शहरी पर्यटनाचे आकर्षण अधिक प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे परदेशी पर्यटक शहरासंबंधी असणारी व्यापक माहिती जाणून घेण्यासाठी स्थानिकांशी आंतरक्रिया करत असतात. त्या शहारविषयी भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय इत्यादि संबंधी पर्यटनाच्या अनुषंगाने माहितीचे संकलन केले जाते.

३) शहराच्या स्वत:चा पर्यटन प्रदेशाचे विकेंद्रीकरण (Decentralization of tourist areas in the city itself) :

शहरी पर्यटनामध्ये पर्यटन प्रदेशाचे विकेंद्रीकरण केले जाते. शहर हे स्थलांतरणाचे केंद्र बनत जात असल्याने शहराचे विकेंद्रीकरण अधिक प्रमाणात होते, त्याचे स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व ठेवून शहराचा पर्यटन चिरंजीवी विकास करण्यात येतो. शहराचे स्वरुप स्वतंत्र विकेंद्रीत निर्माण करण्यामध्ये शासन स्थानिक लोक व पर्यावरणात्मक घटक कार्यशील असतात त्यामुळे शहरे स्वत: विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पर्यटन विकास करत आहेत.

४) शहरी पर्यटनामध्ये आकर्षक सकारात्मक गुंतवणूकीचे मदतीचे चित्र (Help in attracting investment due to projection of a positive image) :

शहरी पर्यटनामध्ये आकर्षक सकारात्मक गुंतवणूक प्रमाण वाढत आहे. शहरामध्ये असणारे ऐतिहासिक वास्तू, धार्मिक मंदिरे, विशेष रिसॉर्ट, हॉटेल, राजवाडे, बंगले, बागा इत्यादीमध्ये सकारात्मक गुंतवणूकीचे चित्र दिसत आहे. शहराचा विकास करत असताना विशिष्ट विभागामध्ये आर्थिक गुंतवणूकीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे पर्यटकांना अपेक्षित असणारी गुंतवणूक केंद्रे सहज उपलब्ध करण्यात येत आहेत.

५) शहरात ऐतिहासिक बांधणीस आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देतात (Tourism in cities provides economic utility to historic building) :

शहरी पर्यटनाचा मुख्य उद्देश ऐतिहासिक स्थळाचे संवर्धन जतन आणि विकास करणे आहे. यासाठी आर्थिक गुंतवणूक प्रमाण वाढीस प्रोत्साहन देण्याचे काम करतात. शहरी पर्यटन विकास करत असताना आर्थिक गुंतवणूक करणे सोईस्कर केले आहे. त्यामुळे पर्यटनाचा विकासाबरोबर आर्थिक प्राप्ती पण केली जाते. त्यातून शहरी पर्यटनामध्ये आर्थिक गुंतवणूकीचे प्रमाण वाढत आहे.

वरील सर्व मुद्यांवरुन शहरी पर्यटनाची वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. शहरी पर्यटनाचा विकास हा नैसर्गिक, ऐतिहासिक वारसा आणि चिरंजीवी विकासादृष्टीने कार्य केले जाते. त्यामुळे शहरी पर्यटनाकडे पर्यटकांचे आकर्षण अधिक आहे. शहरी पर्यटन हे जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये परिवर्तन निर्माण करणारे आहे.

१५.१५ शहरी पर्यटनासमोरील आव्हाने (CHALLENGES IN URBAN TOURISM)

शहरी पर्यटन हे शहराचा नैसर्गिक आणि आर्थिक विकास करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कार्य केले जाते. शहराचा विकास करत असताना नियोजन बद्ध योजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यासाठी नेमकी कोणती शहरी पर्यटनाच्या विकासाची आव्हाने आहेत ती पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) संसाधनाचे अतिरिक्त वापर आणि विध्वंश (Overuse and deteroration of resources) :

शहरी पर्यटनाच्या विकासामध्ये स्थानिक संसाधनाचा अतिरिक्त व विध्वसंक वापर केला जातो. शहराचा विकास करत असताना जमीन, हवा, पाणी, वीज पुरवठा यासारख्या संसाधनाचा वापर अतिरिक्त केला जातो त्यामुळे स्थानिक लोकांच्या संसाधनाचा अतिवापर करतात त्यामुळे शहराचे पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची शक्यता अधिक असते. शहरामध्ये विविध प्रकारचे प्रदूषण निर्माण केली जातात. त्यामुळे संसाधनाचा ऱ्हास होण्याची शक्यता अधिक आढळते.

२) सुविधांचा अतिरिक्त विकास (Over development of facilities) :

कोणत्याही पर्यटनाच्या विकासासाठी संसाधनाचा वापर करावा लागतो. शहरी पर्यटनाच्या विकासासाठी सुविधा निर्माण करण्यासाठी योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. शहराच्या सुविधांच्या नावाखाली विकास करत असताना अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे नैसर्गिक पर्यावरणाचे विकासाच्या अतिरेकी सुविधा निर्माण करताना नुकसान होते. त्याच्या व्यवस्थापनाची आणि नियोजनाची जबाबदारी घेण्यात येत नाही, त्यामुळे शहर पर्यटन विकासासमोर आव्हान निर्माण होते.

३) स्थानिकांच्यासाठी जीवनाच्या गुणवत्ता ढासळतात (Reduced quality of life for local) :

शहरी पर्यटनाचा विकास करत असताना स्थानिकांच्यासाठी जीवनाच्या गुणवत्तेवरती त्याचा परिणाम होतो. शहर पर्यटन निर्माण करत असताना स्थानिकांना आपल्या राहत्या घरी,

जमीन, परिसर यांच्या पासून अलग केले जाते. त्यांना अपेक्षित असणाऱ्या सेवा सुविधांचा तुटवडा निर्माण केला जातो. त्यांच्या विकासाचे साधनांचा पुरवठा कमी करुन तोच शहरी पर्यटनाच्या विकासासाठी वापर करतात. परिणामी स्थानिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेचा दर्जा ढासळतो किंवा कमतरता निर्माण होण्याचे आव्हान म्हणून समोर येते.

४) शहरी पर्यटनाच्या गुणवत्तेच्या अनुभवाची कमतरता (Reduced quality of visitor experience) :

शहरी पर्यटनाचा विकास हा पर्यटकाच्या गुणवत्तापूर्ण अनुभवावरती निर्धारित होतो. शहरी पर्यटनाला आवश्यक असणाऱ्या सेवा सुविधा पाहिजे तितक्या प्रमाणात उपलब्ध करुन दिल्या जात नाही. शहरी पर्यटकांना निवासाची दळणवळणाची जेवणाची आणि इतर सेवा सुविधांचा पुरवठा अपेक्षितप्रमाणे गुणवत्तापूर्ण मिळणे आवश्यक असते, त्या सेवा व सुविधा यांची उपलब्धता करुन देण्याचे नियोजन शहरी पर्यटन प्रकारात अपेक्षित होईलच असे नाही. त्यामुळे शहरी पर्यटनाला योग्य प्रतिसाद भेटेल त्याकडे पर्यटक कसा आकर्षला जाईल या संबंधीचे आव्हान स्वीकारावे लागेल.

५) विकास विरुद्ध संवर्धन (Preservation Vs Development) :

शहरी पर्यटनाचा विकास करताना अनेक आव्हांनाना सामारे जावे लागते. विकासाचे उद्दिष्ट पूर्ण करत असताना संवर्धन करणे तितकेच आवश्यक असते तरच निसर्ग आणि मानवी समाजाचा समतोल टिकवता येतो. तेच शहरी पर्यटनाच्या विकासामध्ये निसर्गाचा समतोल टिकवणे अत्यंत महत्त्वाचे असते ते करणे आवश्यक होऊन बनते. तेव्हा शहर पर्यटनासमोर निसर्गाचे संवर्धन व विकास करुनच पर्यटनाचे प्रकल्प उभारावे लागतात. या सर्व बाबींचे नियोजन करण्याचे आव्हान स्वीकारावे लागते.

६) भौगोलिक अवकसासंबंधी मापनाची अनिश्चितता (Georraphically Spatial scale discountinuties) :

शहराच्या पर्यटन विकासासाठी भौगोलिक अवकाशाचे मापन करणे आवश्यक आहे. कारण शहराचे भौगोलिकक्षेत्र पर्यटनासाठी आरक्षित करावे लागते. त्यासाठी भूमपान करणे गरजेचे आहे. शहराला पर्यटनाला अपेक्षित क्षेत्राची नोंद करणे काही कारणांमुळे शक्य होत नाही. त्यामुळे शहरीभागातील कोणते नेमके क्षेत्र निश्चित केले याची स्पष्ट नोंद केली जात नाही. परिणामी शहरी पर्यटनाचे भौगोलिक अवकाशासंबंधी मापनाच्या अनिश्चितेचे आव्हान स्पष्ट दिसून येते.

७) शहराची अतिदाट वस्ती (City Congestion) :

शहराचे आकारमान व लोकसंख्या अधिक प्रमाणामध्ये वाढत आहे. त्यामुळे शहराचे वस्तीक्षेत्र वाढत आहे. शहरीकरणाच्या प्रक्रियेत लहान नगराचे मोठ्या वस्तीमध्ये रुपांतरण गतिशील रित्या होत आहे, शहरामध्ये शिक्षण, नोकरी, आरोग्य, राहण्याच्या सेवा-सुविधा आणि आकर्षण यामुळे स्थलांतरणाचे प्रमाण अधिक दिसून येते. शहरात वाढत्या लोकसंख्येमुळे दाट वस्ती निर्माण होते. त्यामुळे रोजचे स्थलांतरणामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे शहराचा विस्तार अधिक प्रमाणात होतो. तेवढेच शहराच्या पर्यटन नियोजनाच्या समस्या वाढत जाता हा वाढता स्थलांतरीताचे प्रमाण शहर पर्यटनाच्या विकासाचे आव्हान म्हणून समोर येते.

८) सरकारीकरण विरुद्ध खाजगीकरणाची सहभागीत्व (Public vs Pvt. Sector partnership) :

शहरी पर्यटनाच्या विकासामध्ये सरकारी आणि खाजगी संस्थाच्या माध्यमातून कार्य केले जाते. ते करत असताना सरकारी आणि खाजगी क्षेत्राचा किती सहभाग असावा याच्या नियोजनाचे आव्हान स्वीकारावे लागते. शहराच्या पर्यटन विकासाची जबाबदारी सरकारी क्षेत्राच्या स्तरावरती अधिक निर्धारित केली जाते पण सद्यस्थितीमध्ये सरकारी क्षेत्राबरोबर खाजगी क्षेत्राशी भागीदारी अधिक प्रमाणात वाढते. त्याच्या देखभाल दुरुस्ती संवर्धन आणि विकासाच्या कामासंदर्भात प्रश्न उपस्थित केले जात आहे. या कामामध्ये दफ्तर दिरंगाई, कामाची जबाबदारी टाळाटाळ, वेळेवरती नियोजन नसते, संसाधनातील कमतरता निकृष्ट दर्जा आणि भ्रष्टाचार इत्यादीचे प्रमाण अधिक वाढत आहे. त्यामुळे शहरी पर्यटनाच्या विकासाबाबतची आव्हाने समोर दिसून येतात.

वरील सर्व मुद्यावरुन शहरी पर्यटनाच्या विकास आव्हाने स्पष्ट होतात. शहरी पर्यटनाचे योग्य नियोजन व विकास करणे याची जबाबदारी संबंधीत विभागाने घेणे आवश्यक आहे. या नियोजनामध्ये सर्व घटकांचा समावेश सकारात्मक पातळीवरती करावा लागेल. त्या दृष्टीने शहरी पर्यटनाचा विकास नियोजनबद्ध रित्या करता येईल.

१५.१६ शहरी पर्यटनाचे प्रकार (TYPES OF URBAN TOURISM)

शहरी पर्यटनाचे व्यापक स्वरुपात असल्यामुळे त्याच्या प्रकाराचे स्वरुप विभिन्न प्रकारे दिसते. शहराची रचना कोणत्या पर्यटन प्रकारानुसार करण्यात आली आहे. त्यानुसार त्याचे प्रकार स्पष्ट करता येतात. याला पर्यटकाचा प्रतिसाद ज्या प्रमाणात असेल त्यानुसार शहराचा प्रकार दिसून येतो. शहरी पर्यटनाचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) शहरीकरणाचे पर्यटनवाद (Tourism Urbanisation) :

शहरीकरणाच्या प्रकारामध्ये विशेष ची सुविधा असते. अशा ठिकाणी या प्रकारची निर्मिती केली जाते. शहरी भागामध्ये पर्यटकांना सेवा सुविधा राहण्याची जेवणाची उत्तम सोय असणाऱ्या ठिकाणी या प्रकाराचे पर्यटन अधिक विकसित होते. शहरी भागामध्ये या सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात त्या ठिकाणी या पर्यटनास अधिक आकर्षण असते.

२) ऐतिहासिक शहर पर्यटन (Tourism Historic Cities) :

ऐतिहासिक शहर पर्यटन प्रकारामध्ये ऐतिहासिक, स्वरुपाच्या शहराचा समावेश होतो. ही शहरे पूराण वस्तू, किल्ले, गड, युद्धाचे ठिकाणी समाधी आणि प्रार्थना स्थळे, शिल्प कला, वास्तू कला, इ. प्रकारच्या घटकांचा समावेश यामध्ये होतो. ऐतिहासिक शहरे, अभ्यासू पर्यटकांना महत्त्वाच्या नमुना म्हणून त्यांचा समावेश होतो. या हडप्पा, मोहिजोदडो, लाहोर, म्हैसूर यासारख्या शहरांचा समावेश करता येतो.

३) शहर रचना क्रियीत (Converted Cities) :

शहरी पर्यटनाच्या नव्याने निर्मिती करण्यात येते. त्याला रुपांतरित शहर असे म्हणतात. या शहराची निर्मिती ही नियोजनबद्ध स्वरुपात केली जातात. त्यापद्धतीची रचना करण्यात येते.

शहरी भागामध्ये आरामदायी बागा, पार्क, स्मारके, मनोरंजन केंद्रे, इत्यादींची निर्मिती केली जाते. ज्यामुळे शहरी पर्यटन प्रकाराकडे पर्यटकांचा ओढा कसा वाढ होईल त्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न केले जातात.

४) भांडवली शहर पर्यटन व सांस्कृतिक शहर पर्यटन (Capitalistic City Tourism and Cultural City Tourism) :

शहरी पर्यटनाचा विकास करत असताना भांडवली उत्पादन पद्धती आधारित शहराची निर्मिती केली जाते. ज्या शहरामध्ये आधुनिक तंत्रज्ञान व सेवा सुविधांचा समावेश यामध्ये केले जाते. ज्या शहरी पर्यटकांना अधिक आकर्षित करतात. शहराच्या विकासाने भांडवली उत्पादन व सेवांचे शहरी पर्यटन निर्मितीमध्ये महत्त्व आहे. सांस्कृतिक शहराची निर्मिती करत असताना कला वास्तू शिल्प कलाकृती वास्तू पद्धती, ग्रामीण-शहरी संस्कृती दर्शन फॅशन आधुनिकता यांचा समावेश यामध्ये करण्यात येतो. शहरातील आधुनिक व खाणपान वेशभूषा चालीरिती जीवन जगण्याच्या पद्धती याचे स्वरुप पाहण्यास मिळते. उदा. रोमन शहराचे संस्कृती शहर पर्यटनास प्रसिद्ध आहे.

५) औद्योगिक शहर पर्यटन (Industrial City Tourism) :

औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमध्ये शहराच्या पर्यटनाचा विकास अधिक प्रमाणात पाहण्यास मिळतो. शहरी पर्यटकांना नवीन औद्योगिक शहरांना भेट देऊन नवीन उत्पादन पद्धती व तेथे याचे नियोजन कशाप्रकारे केले आहे याचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी शहरी पर्यटनाचा उपयोग केला जातो. शहराच्या विकासामध्ये उत्पादन तंत्रज्ञान आणि सेवा याचा वाढता वापर यामुळे औद्योगिक शहरामध्ये पर्यटनाचे आकर्षण व हेतूपूर्वक पर्यटन केले जाते. उदा. दुबई, अबुदाभी शहरामध्ये औद्योगिक शहरांचे पर्यटन अधिक प्रमाणात दिसून येते.

६) मेट्रो केंद्रीय शहर पर्यटन (Metro Centres of cities tourism) :

शहरी पर्यटनामध्ये मेट्रो केंद्रिय शहर पर्यटनाचे महत्त्व वाढत आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत शहराचे स्वरुप मेट्रो केंद्रिय बनत आहे. या शहरामध्ये भांडवली वस्तू व सेवांसाठी गुंतवणूक करण्यासाठी शहरी पर्यटक आकर्षित केला जात आहे. त्यामुळे शहरात आय.टी. सेवा, मॉल्स, बीग बाजार, इ कॉमर्स, आयटी झोन पार्क, विमानतळे, मेट्रो, बुलेट ट्रेन, इटनेक कॅफे भाग यांचे प्रमाण वाढत आहे. अशा शहरामध्ये वस्तू व सेवांची उपलब्धता व्यावसायिक स्वरुपात उपलब्धता करुन देण्यासाठी पर्यटकांना आकर्षित केल्या जातात. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये परिणामकारक बदल पाहण्यास मिळतो.

वरील सर्व मुद्यांवरुन शहरी पर्यटनाचे प्रकार स्पष्ट होतात. त्यातुन शहर हे पर्यावरणात्मक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय पायाभूत सुविधांचे केंद्र म्हणून प्रसिद्धीस येते, शहरी पर्यटनाच्या विकासास आवश्यक असणाऱ्या सेवा व सुविधा प्राप्त केल्या जातात त्याचा परिणाम आर्थिक विकास व वाढीवरती होतो. त्यामुळे शहरी पर्यटन अधिक विकसित होताना पाहण्यास मिळते.

१५.१७ सारांश (SUMMARY)

पर्यटन ही मानवी समाजातील महत्त्वपूर्ण बाब बनली आहे. पर्यटन हे भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय घटकाच्या संबंधित बाब आहे. त्यामुळे मानवी विकासास अधिक संधी व सुविधा निर्माण करते. त्याचा जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासावरती परिणाम घडवून आणला जातो. त्यामुळे पर्याय वस्तू व सेवांची निर्मिती करण्यात येते. प्रत्येक शहरामध्ये पर्यटनाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे शासनाच्या महसुलामध्ये वाढ होते. त्यासाठी शासकीय, निमशासकीय संस्था पर्यटन व्यवसायामध्ये अधिक काम करताना दिसतात. प्रत्येक शहराच्या भागामध्ये विशिष्ट प्रकारचे पर्यटन विकसित करण्यात येते. हा प्रकार वस्तू व सेवांच्या आकर्षणात वाढ करतो. त्यामुळे त्याचे विभिन्न प्रकार दिसून येतात. पर्यटनाच्या प्रकारात साहसी पर्यटन, पर्यावरणीय पर्यटन, ग्रामीण आणि शहरी पर्यटन याच्या स्वरुपामध्ये पर्यटनाची विभागणी केली जाते. प्रत्येक पर्यटनाचे स्वरुप हे विभिन्न आहे. त्यामुळे प्रत्येक पर्यटनाच्या प्रकारामध्ये पर्यटकाची निवड महत्त्वाची ठरते. केवळ पर्यटन संशोधना सोबत आनंद, उत्सव करण्यात येतो. यासाठी पर्यटकांना वेळ व दिवस निवडावा लागतो. त्यानुसार पर्यटनाचा हंगामानुसार पर्यटन प्रकाराची निवड केली जाते. या पर्यटनामध्ये निसर्ग आणि मानव यांचे संबंध घनिष्ठता निर्माण केली जाते. त्यामुळे पर्यावरणाचे जतन संवर्धन व विकास करण्यासाठी विशेष लक्ष दिले जाते. पर्यटकांना निसर्गाच्या सानिध्यात राहता यावे यासाठी राहण्याची, खाण्यापिण्याच्या सुविधा उपलब्ध करुन ठेवल्या जातात. प्रत्येक पर्यटक या सर्व परिस्थितीचा आनंद घेत असतो. त्यातून पर्यटन विकास प्रकल्पाची उभारणी करण्यात येते. यातून निसर्गाचे संवर्धन व प्रदूषणाचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडत जातो. त्यातून पर्यावरणाचे नैसर्गिक स्वरुप संवर्धन विकास व जतन करता येत नाही. तसेच मुळनिवासी संस्कृती वरती परकीय संस्कृतीचे आक्रमण अधिक प्रमाणात होऊ लागले आहे. ही संस्कृती आक्रमणे मुळ कला, साहित्य, गायन, नृत्य वादन असा अनेक प्रकारावरती वर्चस्व प्रस्थापित करत आहेत. त्यामुळे त्याच्या संवर्धनाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. पर्यटन प्रकल्पामुळे मानवी वस्त्यामध्ये विस्थापन अधिक प्रमाणात होत आहे. त्यामुळे पुर्नवसनाचे प्रश्न अधोरेखित ठेवले जात आहे. विकासाची बाजू विस्थापन म्हणून समोर येते. या सर्व बाबींचा विचार करुन पर्यटन केंद्राचा विकास करणे आवश्यक आहे.

१५.१८ अभ्यासाचे प्रश्न

१. पर्यटनाची व्याख्या सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. साहसी पर्यटनाची व्याख्या सांगून प्रकार आणि वैशिष्ट्ये यांचे विश्लेषण करा.

३. पर्यावरणात्मक पर्यटनाची व्याख्या सांगून त्याची वैशिष्ट्ये सांगा.

४. ग्रामीण पर्यटनाचा अर्थ सांगून त्याच्या समोरील आव्हाने सविस्तर लिहा.

५. शहरी पर्यटनाची व्याख्या सांगून त्याची वैशिष्ट्ये व प्रकार सविस्तर लिहा.

१५.१९ संदर्भ सूची

1. Haralawbos M and Heald (2009) Sociology Themes and Prespectives, New Delhi, Oxford University Press.
2. Julia Jary and David Jary (2006) Dictionary of Sociology Collins.
3. Macionis John (2005) Sociology (10th Edition) Prentice Hall.
4. Schaeffer and Lamm (1998) Sociology (6th Edition) McGraw Hill.
5. Gregory Ashwarth, Stephen J. Page 2011. Urban tourism research : Recent progress and current paradoxes, Tourism Management 32.15. www.elsevier.com
6. file:///G:/CPDFJ%20The% 20 concept% 20 of % 20 Ecotourism % 20 Evolution% 20nd…html.
7. Gtheorghe chela 2011 Ecotourism : Definition and concepts Journal of tourism, 15
8. Manzoor Ahmad Khan, 2015, Adventure tourism in India, International Journal of Mltidiciplinary Research and Development Vol. 2(4) 374-379.
9. Sreenath Padmanabhan 2018, A scope for Adventure Tourism in India - A Review, International Journal of Pure and Applied Mathematics Vol. 118(8) 4747-4752.
10. Deborah Edwards, Tony Griffin, Bruce Hayllar and Brent Ritchie : 2011, Understanding Urban Tourism Impact : An Australian study, Sustanable Tourism Cooperative Research Center www..crctourism.com.au.
11. Branka Blazevie, Marinela Krstinic Nizic 2015 City organization as Urban challenge for tourism Destinations Tourism in Southern and Eastern Europe Vol. 3, pp 19-33
12. Ruvandra Irinapopescu, Razvan - Andrei Corbos 2010. the Role of Urban Tourism in the strategical Development of Brasov Area, Theoretical and Empirical Researches in Urban Management vol. 7 (16)
13. Adventure Tourism Development Index 2011 Report
14. Bani Chatterjee, Madhumita Das 2015, Ecotourism in India A Example of Bhitarkanika Wildlife Sancturary, Yojana, Vol. 9 pp. 42-47.
15. Tugha Kipex 2013, Role of Ecotourism in sustainable Development http://dx.doi.org110.5772155749.
16. Humairu Irshad 2010 Rural Tourism - An overview, Government of Alberta. Agriculture and Rural Development
17. Global Report on Adventure Tourism 2014. World Tourism Organization (UNWTO) Spain, www.unwto.org.
18. Dulam Bhavyasree. Prof. Chandrakanth N. 2017. A Survey on Urban Tourism Development and its characteristics, International Journal of Advance Research Ideas and Innovations Technology Vol. 3 www.igariit.com.

❖❖❖❖

१६ अ

पर्यावरण जागृतीचे महत्व

(IMPORTANCE OF ECOLOGICAL CONSCIOUSNESS)

घटक रचना :

१६.० उद्दिष्ट्ये
१६.१ प्रस्तावना
१६.२ पर्यावरणाचा अर्थ
१६.३ पर्यावरणाच्या व्याख्या
१६.४ समकालीन समाजातील पर्यावरण संबंधी माहिती
१६.५ समकालीन पर्यावरणसंबंधी समस्या
१६.६ पर्यावरणाची अवनति ऱ्हास
१६.७ पर्यावरण आणि शाश्वत विकास
१६.८ पर्यावरण जागृतीचे महत्व
१६.९ सारांश
१६.१० अभ्यासाचे प्रश्न
१६.११ संदर्भ सूची

१६.० उद्दिष्ट्ये

१. पर्यावरणाचा अर्थ समजून घेता येईल
२. पर्यावरणाच्या घटकांची ओळख होईल
३. विविध तज्ञांनी दिलेल्या पर्यावरणाच्या व्याख्या अभ्यासता येतील
४. पर्यावरण घटका संबंधी स्पष्टता होईल
५. मानवी जीवन आणि संबंधीची माहिती मिळवण्यास मदत होईल

१६.१ प्रस्तावना

पर्यावरण हि संकल्पना स्थल आणि काल सापेक्ष असते. पर्यावरण म्हणजे सभोवतालील निसर्ग किंवा आजूबाजूची परिस्थिती यांचा अभ्यास होय. पर्यावरणात सजीव व निर्जीव घटकांचा समावेश असतो. अशा प्रकारच्या घटकांच्यात सतत आंतक्रिया घडत असतात. जैविक म्हणजे

सजीव अंर्तभाव होत असतो. तर अजैविक म्हणजे निर्जिव घटकात, हवा पाणी, जमीन, सुर्यप्रकाश, आर्द्रता, तापमान आणि खनिज संपत्ती यांचा आंर्तभाव होत असतो. असे सर्व घटक नेहमी एकदुसऱ्यावर प्रभाव निर्माण करत असतात या क्रिये-प्रकियेमधून पर्यावरण निर्माण होत असते.

आजच्या सजीवांना आवश्यक असलेला प्रमुख घटक म्हणजे ऑक्सिजन असतो. पृथ्वीच्या वातवरणातील प्राणवायूच्या वाढत्या प्रमाणांमुळे सजीवांची निर्मिती झाली. काही सजीव सौरउर्जा, पाणी - आणि कार्बन डाय - ऑक्साईड यांच्या मदतीने स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात. तर काही सजीव वनस्पतीच्या आयत्या अन्नावर जगू लागले. यामुळे सजीवांच्या जडण घडण जटील स्वरुपाचे जीवन निर्माण झाले.

पृथ्वीच्या पृष्ठावर सजीवांची उत्क्रांती झाली यातून प्राणी निर्माण झाले. यामध्ये मानवांची उत्क्रांती झाली. मानवांनी आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गावर आधारी आपली संस्कृती निर्माण केली. म्हणून इतर प्राण्यांच्या तुलनेत मानव हा सर्वात वेगळा आहे. कारण मानवाकडे बुध्दिमत्ता, कल्पनाशक्ती, स्मरणशक्ती, आकलनशक्ती, विचारशक्ती असल्यामुळे निसर्गात निर्माण होणाऱ्या विविध परिस्थितीत समायोजन करण्याची क्षमता अधिक आहे. परंतू मानवाने निसर्गाशी जुळते मिळते घेण्यापेक्षा निसर्गावर ताबा मिळवून त्यांना अतिरिक्त वापर करु लागला आहे. विविध प्रकारचे यांत्रीक तांत्रीक शोध निर्माण करुन निसर्गाचा अतिरिक्त उपभोग घेतला जात आहे. शेतीचा विकास करुन, भटकंती थांबून वस्ती निर्माण केली. अन्नधान्य उत्पादनासाठी शेती बरोबर पशुपक्षी पालन संस्कृती विकसीत केली. निसर्गाचा घटक असणारा मानव निसर्गावर मात करुन अतिरिक्त उपभोग घेवू लागला. विकासाच्या नावा खाली निसर्गाला विदृप करु लागला आहे. मानवानी जमीन, समुद्र, नदी, जंगल वगैरे घटकात बदल करु लागला आहे. यामुळे निसर्ग चक्रांत बदल घडत आहेत. यामुळे नैसर्गिक वातावरणात सतत बदल घडून येत आहेत. मानवानी नैर्सिक जैविक विविधताला व्यवसायकि स्वरुप दिले आहे. शेतीसाठी नविन यंत्र तंत्राचा उपयोग करुन जमिन नापिक बनवली जात आहे. औद्योगिक क्रांती घडवून नविन तंत्रज्ञान विकास करुन लोकसंख्येत वाढ होत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रगतशील उद्योग निर्माण केले जात आहे. ज्यामुळे लोकांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. औद्योगिकरणामुळे नैसर्गिक साधसंपत्तीचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. शहरीकरण निर्माण केले जात आहे. मानवी राहणीमान उंचावले, ऐश्वर्यसंपन्न जीवनाकडे समाज जात आहे. निसर्गातील मुलभूत संपदा. मृदा, पाणी, हवा, वनस्पती, खनिजे इत्यादी अतिरेकी वापर केला जात आहे.

१६.२ पर्यावरणाचा अर्थ

पर्यावरण ही संकल्पना बहूव्यापक, सर्वसमावेश असल्याने क्लिष्टही आहे. सामान्यपणे आपल्याला असे म्हणता येईल की सजीवांची निर्मिती, वाढ व निर्जीव घटकांची गरज असते. या सर्व घटकांच्या एकत्रित स्थितील पर्यावरण असे म्हणतात. सभोवतालची परिस्थिती अनेक घटकांपासून बनलेली असते व हे सर्व घटकांचा अभ्यास केला असता आपल्या असे लक्षात येते हे घटक दोन नैसर्गिक असतात तर काही मानव निर्मित असतात. या घटकांचा परस्परांशी संबंध येतो व त्यातूनच एकत्रित स्थिती निर्माण होऊन पर्यावर तयार होते पर्यावरण हे स्थळ व

काळाप्रमाणे बदलत जाते व म्हणूनच पर्यावरणीय स्थिती याला स्थळ -कालसापेक्ष असे म्हटले जाते. उदाहरणार्थ, समूद्रकिनाऱ्यावरील व हिमालयातील पर्यावररणीय स्थितीत फार मोठा फरक दिसून येतो किंवा हिमयूगात जेव्हा पृथ्वीवरच्या तापमानात घट झाली तेव्हा त्या ठिकाणी असलेले प्राणी, वनस्पती, वातावरण वेगळे होते व बऱ्याच प्रमाणात या कमी तापमानामूळे डॉयनोसोरसारख्या सजीवांची नाश झालेला आढळतो. अनिश्चित तापमानात टिकून राहतील असेच सजीव शिल्लक राहिले, त्यानंतर तापमानात वाढ झाली व यात हिमयूगातील सजीवांचा नाश होऊन जे सजीव उष्ण तापमानात राहू शकतात तेच फक्त टिकून राहिले. एकाच काळात भिन्नभिन्न प्रदेशांत भिन्नभिन्न प्रकारचे पर्यावरण आढळून येते. पर्यावरण जीवसापेक्ष असते कारण एका पर्यावरणातील सजीवांना दूसऱ्या पर्यावरणात पोषक परिस्थिती नसते उदाहरणार्थ पाण्याबाहेर काढलेला मासा तडफडून मरतो, तर इतर स्थलचर प्राणी प्राण्यातील कमी प्रमाणात असलेल्या व श्वसनास निरुपयोगी असलेल्या विद्राव्य प्राणवायूमूळे मृत्यू पावतात. थोडक्यात प्रत्येक पर्यावरणाचा स्वतःचा असा एक समतोल असतो. सर्व ठिकाणी असलेल्या पर्यावरणाचा एकत्रित असा पृथ्वीवरील पर्यावरणाचा अविचारी व अविवेकी वापर करुन हा नैसर्गिक समतोल बिघडवला आहे. आज मानवाच्याच नव्हे तर सर्व पृथ्वीच्याच अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे. म्हणूनच पर्यावरणाचा सखोल अभ्यास करुन हा समतोल पून्हा प्रस्थापित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यावरणाचा अर्थ सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१६.३ पर्यावरणाच्या व्याख्या :-

१) **बर्नाड नोबेल यांच्या मते** "पर्यावरण म्हणजे विविध परिस्थिती संस्था प्रणालीच्या परस्पर संबंधातील संतुलनमुलक, स्वरुपाचे अध्ययन".

२) **जॉन लॉक यांच्या मते** "पर्यावरणशास्त्र म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन, मानवी जीवनावर पर्यावरणाचा असणारा प्रभाव यांच्या अभ्यासाप्रमाणे पर्यावरणाच्या संदर्भात मानवजातीला ज्या समस्यांना तोंड दयावे लागते त्या समस्यांचा विचार करुन उपायांचा शोध घेणारे शास्त्र होय".

३) **पुरडोस आणि ॲडसन यांच्या मते**, "पर्यावरण शास्त्र म्हणजे सजीवांवर होणारा परिणाम परिस्थिती व स्थितीचे विश्लेषण आणि त्या बदल्यात सजीवांची प्रतिक्रिया यांचा अभ्यास होय. तसेच पर्यावरणाचे व्यवस्थापन व अभ्यासाकरिता विविध ज्ञानशाखांच्या ज्ञानाचा उपयोग करणे म्हणजे पर्यावरण शास्त्र होय".

४) **मॅकनॉघटन आणि वुल्फ यांच्या मते**, "सजीवांच्या जीवित राहणे, त्यांची वाढ, विकास आणि पुनरुत्पादन यावर प्राकृतिक व सजीव घटकांच्या होणाऱ्या संयुक्त परिणामास पर्यावरणशास्त्र असे म्हणतात."

५) **प्रा. सर्जेराव एन. बोराडे यांच्या मते**, "पर्यावरण म्हणजे निसर्ग निर्मित सजिव - निर्जिव मानव, पशू - पक्षी, वनस्पती, जीवजंतू, नदी डोंगर समुद्र, हवा आकाश, चंद्र सुर्य वगैरे सर्व घटक होय. या सर्व घटकांच्या सकारत्मक आणि नकारात्मक बदलांचा आणि परिणमाचा वैज्ञानिक कसोटी प्रमाणे होणारा अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय."

६) **बकुल यांच्या मते**, "सजीव व त्यांच्या सभोवतालचे पर्यावरण यांच्या सहसंबंधाचे शास्त्र म्हणजे पर्यावरणशास्त्र होय."

७) **पेट्राइटस यांच्या मते**, "परिस्थितित जे घटक सजीव सृष्टीच्या हितांवर नियंत्रण ठेवून प्रसाराचे विपुलतेचे, निर्मितीचे व उत्क्रांतीचे नियमन करतात अशा घटकांचा अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र होय".

८) "पर्यावरणातील साधनसंपदांचा संवर्धन, व्यावस्थापन नियोजन, विश्लेषण आणि मानवी हित डोळयासमोर ठेवून केलेला शास्त्रीय अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय".

९) "मानवी अस्तीत्व आणि सजीवांच्या सृष्टीवर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचे शास्त्रीय पध्दतीचा अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र होय".

आपली प्रगती तपासा :

१) पर्यावरणाची व्याख्या द्या.

_____

_____

_____

_____

_____

१६.४ समकालीन समाजातील पर्यावरण संबंधी माहिती

ज्यावेळी एखादया विशिष्ट प्रकारचा प्राणी कायमचाच नष्ट होतो. म्हणजेच त्या जातीतील एकही प्राणी शिल्लक राहत नाही, त्यास प्रजातींचा सर्वनाश असे म्हणतात. उदा. डायनॉसॉर. नैसर्गिक कारणे तसेच मानवी वर्तणूकीमूळेही प्रजातीचा सर्वनाश होत आहे. पर्यावरणाची अवनती करण्यास हा घटकही जबाबदार असतो.

लोकसंख्या व ज्ञानाच्या कक्षा जशा वाढू लागल्या तसतशी पर्यावरणातील प्रजातीचा सर्वनाश होऊ लागला. प्राण्यांची निवासक्षेत्रे मूख्यतः दूर्गम प्रदेशात व विशेषतः जंगलात असतात पण मानवाच्या निर्वाणीकरण क्रियेमूळे ही ठिकाणे नष्ट होऊ लागली व प्राण्यांची सूरक्षितता नाहीसी झाली. त्यामूळे हळूहळू विशिष्ट प्राण्यांची संख्या वेगाने कमी होऊ लागली

आहे. शिकार, व्यापार व करमणूक या कारणांसाठी कित्येक प्राण्यांचा बळी गेला याचा विचारच न केलेला बरा.

आधूनिकीकरण व उच्च राहणीमानाबरोबर व्यापार करण्यासाठी सर्प, बेडूक, हत्ती, वाघ, सिंह यांची अनिर्बंध हत्या होत आहे. डायनॉसॉर व मायलोडॉन या प्राण्याच्या अतिप्राचीन काळातल्या जाती हिमावरणांनी नष्ट केल्या पृथ्वीच्या बदलत्या गूरुत्वाकर्षणीय व चुंबकीय क्षेत्राचा परिणामही या प्राण्यांवर झाल्याचा सिध्दांत मांडण्यात आला. गेल्या ५०० वर्षात अनेक प्राण्यांच्या जाती पृथ्वीवरुन नाश पावल्या. यूरोपातील डोडो पक्षी इ. स. १६८० च्या सूमारास पूर्णतः नष्ट झाला.

मानवाने निसर्गात ढवळाढवळ केल्याने नामशेष झालेल्या पक्षांच्या जातीतले 'पॅसेजर विजन' हे एक प्रमूख उदाहरण आहे. जंगलाचे प्रमाण कमी झाल्याने सस्तन प्राण्यांच्या २१ पक्ष्याच्या १२ व सरपटणाऱ्या प्राण्याच्या ६ प्रजातींचा सर्वनाश झाल्यास पूढील महत्वाचे धोके पर्यावरणावर होतील.

- मानवास धोके : आरोग्य, अन्न आणि निवारा, करमणूक, संपत्ती व सामाजिक एकता इ.
- वातावरणीय आणि पाण्याच्या चक्रात धोके : हवामन बदल, सागराच्या पातळीत वाढ, वातावरणीय प्रदूषण इ.
- जमीन व मृदेस धोके : मृदेची झीज प्रजातींची विविधता व प्राण्याची पिळवणूक इ.
- सागरास धोके : मातीची झीज, वसतीस्थानांची हानी इ. प्रजातीचा सर्वनाश थांबवता येईल का ? प्रजातींच्या सर्वधनासाठी पूढील उपाय योजना करता येईल.
- दूर्मिळ वनस्पती, प्राणी, प्रजातीचे विनाशापासून रक्षण.
- वनस्पती, प्राणी इ. च्या अनूवंशकीय जनूकांची जोपासना करणे.
- वनांचा विनाश थांबविणे.
- पर्यावरण समतोल राखणे.
- रोगजंतूनाशके व इतर रसायनांचा वापर मर्यादित करणे.
- संरक्षणासाठी आर्थीक मदत व प्रलोभने पूरविणे.
- प्रशिक्षण व तांत्रिक क्षमता उभी करणे.
- जनजागृती करणे.

१६.५ समकालीन पर्यावरण संबंधी समस्या :

वस्तीस्थानांची अधोगती आणि त्यांचे लहान भागांमध्ये विभाजन होणे हे नैतिक विविधतेच्या ऱ्हासाचे सर्वात मूख्य कारण आहे. उष्ण कटिबंधासाठी जंगलतोड वाढल्यामूळे मोठ्या प्रमाणांवर प्रजातींचा सर्वनाश होत आहे.

सर्व प्रजातीचा विशिष्ट प्रकारचे अन्न आणि वसतिस्थान आवश्यक असते. ह्या गरजा जर तीव्र असतील आणि वसतिस्थान स्थानीय असेल तर अशा प्रजातींचे निर्मूलन होण्याची

शक्यता अधिक असते. वसतिस्थानांचे विभाजन भूमिवापर बदलांमूळे अनेकदा शेतजमीनीसाठी, पाळीव प्राण्यांसाठी, रस्त्यांसाठी वसाहतीसाठी किंवा कारखाने काढण्यासाठी होत असते भविष्यात अशाच प्रजाती अस्तित्वात राहतील. ज्या अशा विभाजती वसतीस्थान तग धरु शकतील किंवा अति सूरक्षिततेच्या जागेत जोपासल्या जातील.

उष्ण कटिबंधीय जंगले अतिशय महत्वाची आहेत. कारण ७०% पेक्षा अधिक जगातिक जैविक विविधता येथे अस्तित्वात आहे. सर्व्हेनूसार किंवा प्रत्यक्ष अभ्यासाने असे दिसून आले आहे की ही जंगले झपाटयाने कमी होत आहेत.

सजीवांच्या वसतिस्थानांचा ऱ्हास पूढील तीन प्रकार होतो.

अ) वसतिस्थानांचा विनाश (Destruction) :

विविध कारणांसाठी जंगलतोड, वृक्षतोड केली जाते. जमीन ओलीता खाली आणण्यासाठी, कानल काढण्यासाठी किंवा गवताळ कूरणे करण्यासाठी प्रत्यक्षच वस्तीस्थाने नष्ट केली जातात.

ब) वसतिस्थानांचे लहान भागांमध्ये विभाजन (Eragmentation) :

मानवी विकासासाठी उदा. नागरी क्षेत्रात वाढ, शेतजमीनीसाठी, रस्ते जोडण्यासाठी प्रजातीची वसतिस्थांने संपूर्ण नष्ट न करता लहान - लहान भाग त्याच्यासाठी राखून ठेवतात परंतू एवढ्या लहान विभागात ते सूरक्षित राहू शकत नाहीत किंवा अन्नही शोधू शकत नाहीत.

क) वसतिस्थानांची अवनती (Gegradation) :

प्रदूषण प्रजातीवर आक्रमण इ. कारणाने प्रजातींची अवनती होते. त्यांना दीर्घकालीन कोणाचा सहवास लाभत नाही आणि वन्यजीवनाची अवनती किंवा ऱ्हास होतो. वसतिस्थानाच्या ऱ्हासाची कारणे पूढील प्रमाणे आहेत.

१) शेती :-

वसतिस्थानाच्या विनाशाचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे शेती हे होय. लोकसंख्यावाढीमूळे आजही अनेक लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे.

२) भूमी विकास :-

भूमी किंवा शेतजमीन विकास म्हणजे गृहविकासासाठी नवीन विकसीत करणे, रस्ते, कार्यालये, मॉल्स पार्किंग आणि औद्योगिक कारणांसाठी भूमी किंवा जमीनीचा विकास केला जातो व त्यातून वसतीस्थाने नष्ट होतात.

३) पाणी विकास :-

मोठमाठाली धरणे बांधण्यासाठी, औद्योगिकीकरणासाठी पाणीपूरवठा करण्यासाठी आणि इतर अनेक कारणासाठी वसतिस्थाने नष्ट करुन पाणी विकास केला जातो.

४) प्रदूषण :-

जगाला सर्वात मोठा धोका प्रदूषणापासूनच आहे वन प्रजातीनाही प्रदूषणाचा धोका मोठ्या प्रमाणावर पोहचत आहे व त्यामुळे अनेक प्रजाती संपूर्ण नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

५) जागतिक :-

प्रजातींच्या विनाशास जागतिक उष्णता (Global warming) हे ही एक कारण आहे. उदा. समूद्राशेजारीला प्राणी पाण्याखाली निवाऱ्याची जागा शोधतात. परंतू पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने निवासस्थाने नष्ट होतात.

आपली प्रगती तपासा :

१) सजीवांच्या वस्तीस्थाने ऱ्हासाचे प्रकार

_____

_____

_____

_____

_____

१६.६ पर्यावरणाची अवनती / ऱ्हास (DEGRADATION OF ENVIRONMENT)

पर्यावरण अवनती किंवा ऱ्हास म्हणजे मानवी क्रियांमूळे जैविक प्रक्रियांना पर्यावरणाच्या प्राकृतिक परिस्थितीत निर्माण केलेला बिघाड होय. औद्योगिक क्रांती, आधूनिक प्रगती, नागरीकरण, शास्त्रीय संशोधनात वाढ, लोकसंख्येतील प्रचंड वाढ तसेच विकास व तंत्राानातील जीव घेणी स्पर्धा इ. विविध घटक पर्यावरणाच्या अवनीतीला कारणीभूत आहेत.

पर्यावरणातील जैविक घटनांपैकी मानव हा एकमेव बुध्दीमान घटक आहे. तोच पर्यावरणात अमूलाग्र बदल घडवून आणू शकतो. पर्यावरणाची अवनती म्हणजे नैसर्गिक साधन - सामग्रीचा बेसूमार वापर उदा. हवा, पाणी आणि मृदा यांच्या अतीवापराने परिसंस्था व वनप्राणी यांचा मोठ्या प्रमाणावर विनाश झाल्याने पर्यावरणाची होणारी हानी होय. ज्यावेळी पर्यावरण कमी महत्वाचे होते किंवा निकामी ठरते त्यावेळी पर्यावरण कमी महत्वाची अवनती होत आहे असे समजले जाते. ज्यावेळी प्राण्यांची राहण्याची ठिकाणेच नष्ट केली जातात, जैविक वैविध्य नष्ट केले जाते किंवा नैसर्गिक साधन सामुग्रीचा मोठ्या प्रमाणावर अवैध वापर केला जातो. त्यावेळी पर्यावरणाचा ऱ्हास किंवा अवनती होत असते.

पर्यावरणांची अवनती ही नैसर्गिक किंवा मानवामुळे होत असते. कधी - कधी मानवी क्रिया इतक्या प्रचंड प्रमाणात आणि विस्तृत प्रमाणात असतात की त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास जागतिक पातळीवर घडून येतो. यात प्रामूख्याने ओझोन वायूचा क्षय, उर्जा स्त्रोतांचा ऱ्हास वातावरणात हरितग्रह परिणामात होणारी वाढ, वाळवंटीकरण, अणूस्फोटामूळे होणारा संहार इत्यादी जागतिक पातळिवरील घटनांचा उल्लेख करता येइल.

पर्यावरण / ऱ्हास अवनतीची कारणे (Causes of Environment)

पर्यावरण अवनतीची कारणे पूढीलप्रमाणे आहेत.

१) औद्योगिकीकरण (Industrialisation)

औद्योगिकीकरणामुळे कारखान्यांचे प्रमाण वाढले. कारखान्यातून बाहेर पडणारी रसायने, घातक द्रव्ये व विविध प्रकारचे वायू हवेची दर्जा घसरुन त्यांच्या परिणाम त्या

परिसरातील लोकांवर होत आहे. आम्लपर्जन्यामूळे वनस्पतीवर परिणाम होतो तसेच नदयांचे पाणीही प्रदूषीत होते.

औद्योगिकीकरणामूळे नैसर्गिक साधनसामग्रीही कमी होत आहे. त्यामूळेही प्रदूषणात वाढ होत आहे भारतातील मोठ्या शहरामध्ये प्रदूषण पातळी वेगाने वाढत आहे. भारतात सर्वात जास्त प्रदूषित शहर मुंबई असल्याचे निर्दशनास आले आहे.

२) लोकसंख्येचा विस्फोट (Population Expolosion)

विसाव्या शताकात जगाच्या अनेक भागात लोकसंख्येचा विस्फोट झालेला आढळतो. मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्येचा पिस्फोट पर्यावरणाच्या अवनतीस कारणीभूत ठरतो. लोकसंख्येतील प्रत्येकजण आपले अस्तित्व टिकविण्यासाठी पर्यावरणाचा आधार घेतो. उदा. पारंपारिक पध्दतीमध्ये अन्न शिजविण्यासाठी लाकडे जाळत असत. यामुळे मोठ्या प्रमाणावर जमीन लागवडीखाली आणली जाते. जनावरांची जोपासना करण्यासाठी अति चराईचा वापर होतो. त्यामुळे वातावरणातील घटनांच्या मूक्त प्रक्रियेमूळे जमिनीची धूप होवून जमीन नापिक बनते. मोठया प्रमाणावरील लोकसंख्या पोटा-पाण्यासाठी शहराकडे धाव घेते. म्हणजेच शहरीकरणात वाढ होते, आदिवासी भागातील लोक शिकार करुन व जंगलतोड करुन उदरनिर्वाह करतात. त्यामुळे वन्यप्राणी व वनस्पतीचा नाश होतो. पर्यायाने वाढतो लोकसंख्या पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरते.

वाढत्या लोकसंख्येमूळे जमिनीवर व सागरी साधनसामग्री वर मोठया प्रकमाणावर ताण पडतो. त्यामुळे भारतातील दरमानसी जमिनीचे प्रमाण कमी-कमी हात चालले आहे त्याला लोकसंख्येचा विस्फोट हेच कारण आहे.

३) यांत्रिकी शेती (Farm Mechanization)

यंत्राच्या साहाय्याने (उदा. टॅक्टर) शेती केल्यास जमिनीची धूप मोठया प्रमाणावर होते. त्यामुळे जमीन नापीक बनते त्याचप्रमाणे गरजेपेक्षा जास्तपाणी जमिनीस दिल्याने जमीन क्षारयुक्त बनते म्हणजेच नापीक होते. पाणीपूरवठा करणे हे जरी तंत्रज्ञान असले तरी त्याचा उपयोग प्रमाणात केली पाहिजे. त्याचप्रमाणे जास्त पिके घेतल्यानेही जमीन नापीक बनते.

४) जंतूनाशके व कीटक नाशकांचा वापर (pasticides & Insecticides)

शेतीमध्ये मोठया प्रमाणावर उत्पादन होण्यासाठी रासायनिक फवाऱ्याचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो. त्यामुळे जमिनीतील उपयुक्त प्राणी (उदा. गांडूळ) जे निसर्गचक्रात महत्वाचे काम करतात ते मारतात. त्याचप्रमाणे जंतनाशके व कीटक नाशकातील विषारी द्रव्य वनस्पतीद्वारे प्राण्यांच्या शरीरात जातात. म्हणूनच अनेक देशामध्ये डीडीटीच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

५) झाडे तोड (Felling of Trees)

मोठया प्रमाणावर झाडांची तोड केल्यामुळे जंगलाचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याने मृदेची धूप होऊ लागली आहे. कारण मातीवरील झाडांचा आडथळा दूर झाला आहे.

विकसनशील व अप्रगत देशामध्ये झाडे मोठया प्रमाणावर तोडली जातात. ग्रामीण भागातील लोक जळणासाठी किंवा लाकडांचे ओंडके करुन विकण्यासाठी झाडे तोडतात. मुंबई शेजारील लोणावळा किंवा महाबळेश्वर येथे ही याच कारणाने जंगल कमी झालेले दिसून येते. यामूळे पर्यावरणाचा समतोल ढासळतो.

६) बदलती (आधूनिक) जीवन पद्धती (Changing life styles)

नागरी व अर्धनागरी भागातील लोकांची बदलती जीवन पद्धती पर्यावरणाच्या अवनतीस कारणीभूत ठरते. शहरातील मध्यम वर्गीय लोक व श्रीमंत लोक एअर कंडिशनर (Air Conditioners), फ्रीज, पाणी व शीत पेयासाठी प्लस्टीकच्या बाटल्या व मोठया प्रमाणावर प्लॅस्टीकच्या पिशव्यांचा वापर करतात. प्लॅस्टीकच्या या सर्व वस्तू जमिनीची धूप व पाण्याच्या प्रदूषणास मदत करतात.

आजच्या संगणकयूगात घरगूती संगणक, मोबाईल व इतर अनेक इलेक्ट्रॉनिकच्या वस्तूंचा वापर वाढला आहे ही सर्व उपकरणे दोन किंवा तीन वर्षात जूनी व कालबाहय होतात व नविन कमी किंमतीत उपलब्ध होतात. त्यामूळे मोठया प्रमाणावर ई-कचरा तयार होतो व त्याचा पर्यारणावर अनिष्ट परिणाम होतो.

७) वाहने (Automobiles)

दळणवळणाच्या वाहन साधनामूळे हवेचे प्रदूषण मोठया प्रमाणावर होते. हवेतील एकून ५०% प्रदूषण हे वाहनांमूळेच होते. कार्बन मोनाक्साईड व नायट्रोजनचे ऑक्साईड हे दोन पर्यावरणास अतिशय धोकेदायक ठरतात.

भारतातील मोठमोठया शहरात मोठया प्रमाणावर वाहनांचा उपयोग होत आहे. विशेषतः मुंबई व दिल्ली या ठिकाणी तर इतकी वाहने आहेत की त्यांच्या पार्किंगसाठी सूद्धा जागा नाही. त्यामूळे एवढ्या प्रचंड वाहनांच्या धूराने शहराचे वातावरण पूर्ण खराब केले आहे.

८) नागरीकरण (Uerbanization)

रोजगाराच्या अपेक्षेने, सूविधा, सेवा व इतर सेवा ग्रामीण भागात उपलब्ध नसल्याने ग्रामीण लोक शहराकडे येऊ लागली त्यामूळे शहरात लोकांची गर्दी होऊ लागली एवढ्या लोकांना नागरी सूविधा पूरविणे अशक्य झाले. व याचा परिणाम पर्यावरणावर मोठया प्रमाणावर झाला. हवेचे पाण्याचे व आवाजाचे प्रदूषण या लोकसंख्येमूळे वाढले.

९) गरिबी (Poverty)

पर्यावरणाच्या अवनतीचे गरिबी हे एक कारण आहे. तिसऱ्या जगातील लोक, गरिब लोक उपजीविकेसाठी जंगलतोड, अति चराई, पारंपारिक पध्दतीने अन्न शिजविणे इ. वापर करतात. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. त्याचप्रमाणे गरीब ग्रामीण लोक निरक्षर असल्याने शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर खतांचा व रासायनिक द्रव्यांचा वापर करत असल्याने जमीन नापीक बनते.

१०) सरकारी धोरण (Government Policies)

पर्यावरणाच्या अवनतीस सरकारी धोरणेही कारणीभूत असतात. उदा. अनेक देशामध्ये जंगलातील लाकडे तोडण्याचा परवाना विनासायास दिला जातो. त्यामुळे लाकडे तोडून उदरनिर्वाह करणारे धंदा म्हणूनच हे काम करतात.

११) विकासात्मक प्रकल्प (Development Proect)

मोठमोठी धरणे, जलाशय व कॅनल्स शेतीला पाणीपूरवठा करण्यासाठी बांधली जातात. परंतू त्यामूळे अनेकदा शेतीला प्रमाणापेक्षा जास्त पाणी दिल्याने जमिनीची धूप होते किंवा भूमीपात होण्याचीही शक्यता असते. ज्याप्रमाणे अनेक खनिज प्रकल्पामूळे पर्यावरणास हानी पोहोचते.

१२) नैसर्गिक कारणे (Natural Causes)

इतरही अनेक नैसर्गिक कारणांमूळे पर्यावरणाची अवनती होते. उदा. ज्वालामूखी, भूकंप, वादळे, त्सूनामी, जंगलाला लागलेला वनवा इत्यादी.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यावरण ऱ्हासाची कारणे सांगा.

_____

_____

_____

_____

_____

पर्यावरण अवनतीचे परिणाम (Impact of Environment Degradation)

पर्यावरणाची अवनती नैसर्गिक किंवा मानवी कारणांमूळे होते. पर्यावरण अवनतीची पर्यावरणावर पर्यायाने लोकमाणसांवर मोठ्या प्रमाणावर हानीकारक परिणाम होतात. त्यातील काही महत्वाचे परिणाम पूढीलप्रमाणे आहेत.

१) जागतिक तापमान वाढ (Global Warming)

२० व्या शतकापासून पृथ्वीच्या तापमानात सातत्याने वाढ होत आहे. कार्बनडाय ऑक्साइड (Co2), नायट्रस (C2o), मिथेन (CH4), क्लोरोक्येरोकार्बन्स (CFGS), ओझोन (O3) आणि हवेतील पाण्याचे बाष्प यांना हरितग्रह वायू (Greenhouse Gasses) असे म्हणतात. यामूळे पृथ्वीवरील सरासरी तापमान ठरते. पृथ्वीवरील सजीवांना आपले अस्तित्व टिकविण्यासाठी ठराविक तापमानाची गरज असते. परंतू या तापमानात वाढ झाल्यास अनेक संकटांना तोंड दयावे लागते. प्रदूषणामूळे हे तापमान सतत वाढत आहे.

२) आम्ल पर्जन्य (Acid Rain)

हवेत मोठ्या प्रमाणावर कार्बनडाय ऑक्साईड, गंधक क्लोरीन वायू व नायट्रोजन वातावरणात मिसळताता. पाण्यात मिसळून त्यांची आम्ले तयार होतात व त्या मूळे जो पाऊस

पडतो त्यास आम्ल पर्यन्य असे म्हणतात याचा परिणाम वनस्पती, प्राणी व वस्तूशिल्पकार होतो आम्लयूक्त पावसामूळे वनस्पतींची पाने गळतात व त्यांची वाढ खूंटते. तसेच आम्लपर्जनयामूळे जंगले नष्ट होऊन वाळवंटीकरणाचा वेग वाढतो तलाव व सरोवरातील मत्स्यजीवन धोक्यात येते.

आम्लपर्जन्यामूळे इमारतीची बांधकामे यांचे विदारण होण्यास मदत होते. पिण्याचे पाणी आम्लयूक्त झाल्यास श्वसनाचे व पोटाचे विकार जडतात. तसेच स्वीडन शास्त्रज्ञांच्या मते रक्ताचा कर्करोगही यामूळे होऊ शकतो.

३) ओझोनचा क्षय (Depletion of ozone)

ओझोन (O3) हा ऑक्सिजन पासून निर्माण होणारा वायू वातावरणाच्या स्थितांबर या थरात आढळतो. हा वायू सूर्यापासून भूपृष्ठाकडे येणारे अल्ट्राव्हॉयलेट (UV) सारखे अदृश्य किरण अडवतो. हे नीलकिरण खूप विध्वंसक असतात. यामूळे पृथ्वीवरील जीवसृष्टी तासाभरात नाहीसा होईल म्हणून ओझोनच्या भरात पृथ्वीचे संरक्षण कवच असे म्हणतात. या वायूचा थर समूद्रसपाटीवर १२ ते ३५ कि. मी. दरम्यान आढळतो वाढत्या प्रदूषणामूळे या ओझोनचा क्षय होत आहे. ओझोन थरास छिद्र पडले आहे. या बातमीने संपूर्ण मानवजात अस्वस्थ झाली आहे.

क्लोरा - फ्ल्यूरो कार्बन (CFCS) या रायायनिक संक्लिष्टामूळे ओझोनचा क्षय होतो असे अनूमान काढण्यात शास्त्रज्ञांना यश आले आहे त्यामूळे प्रगत देशांनी CFC's च्या उत्पादनावर व वापरावर बंदी घातली आहे. पर्यावरणावर सर्वात मोठ्या प्रमाणावर अनिष्ट परिणाम करणारा हा घटक आहे.

४) वाळवंटीकरण (Desertfication)

अति लागवड, जंगलतोड, अति चटाई उदयोगांना जागा तयार करणे व शेतीला प्रमाणापेक्षा जास्त पाणी देणे इ. कारणामूळे वाळवंटीकरण होते. वाळवंटीकरणामूळे जमीन निरुत्पादक बनते, पावसाचे प्रमाण कमी होते. जमिनीची धूप होते. प्राण्यांचा निवारा नष्ट होतो. त्यामूळे प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होतात.

५) सागरी - जीवन नष्ट होते (Depletion of marine life)

जगावर प्रदूषणाचे अरिस्ट आले की त्याचा परिणाम सागरी - जीवनावर मोठ्या प्रमाणावर होतो. सागरी प्रदूषणामूळे सागरी प्राण्यांवर व वनस्पतीवर होतो. सागरी प्रदूषणामूळे पाण्यातील पूनरुत्पादनाची प्रक्रिया थंडावते. तेल व कार्बनयूक्त पदार्थाच्या तवंगामूळे प्रकाशसंश्लेषण (Photosynthesis) प्रक्रिया पूर्णपणे थंडावते व प्राणवायूचा तूटवडा निर्माण होतो.

६) जमिनीची धूप (Soil Erosion)

निसर्गाला मृदा तयार करण्यास हजारो वर्षे लागतात व ती मृदा मानवी हस्तक्षेपामूळे काही दिवसांत नष्ट होते. जमिनीची धूप झाल्याने हे होते. जमिनीचा ऱ्हास होतो आतिषपर्जन्य वादळी वारे व जमिनीची धूप या करणानेही जमिनीचा ऱ्हास होतो. जमिनीची शेतीच्या दृष्टीने उत्पादनक्षमता वाढविणे, नीवन तंत्रज्ञान विकसित करणे इ. गोष्टीकडे लक्ष दिल्यास भूसंपदेचे योग्य व्यवस्थापन आणि संवर्धन करणे वर्तमानकाळाबरोबरच भविष्यकाळासाठीची फायदेशीर ठरणार आहे.

७) हवा प्रदूषण (Air Pollution)

हवेच्या प्रदूषणामूळेही पर्यावरणाची अवनती होते. हवेतील धूर, धूरके यामूळे प्रकाश किरण इतस्तत: पसरतात व दिसण्यामध्ये अडथळे निर्माण होतात हवेतील प्रदूषणामूळे शेती व वनस्पतींचे मोठ्या प्रमाणावर नूकसान होते. हवा प्रदूषणामूळे आम्लपर्जन्य पडतो, हवेतील प्रदूषणामूळे जैविक घटकांवर परिणाम होतो. उदा. रंग काळे होणे, झीज हाणे.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यावरण ऱ्हासाची कारणे कोणती आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

१६.७ पर्यावरण आणि शाश्वत विकास (ECOLOGICAL CONSCIOUSNESS FOR SUSTAINABILY)

संयुक्त राष्ट्रसंघाने १९८७ मध्ये नॉर्वेचे भूतपूर्व पंतप्रधान आणि जागतिक आरोग्य संघटनेचे संचालक जी. एच. ब्रंटलँड यांच्या अध्यक्षतेखाली जागतीक पर्यावरण आणि विकास आयोगाची स्थापना केली या समितीने पर्यावरण संदर्भात शाश्वत विकासाची संकल्पना मांडताना पुढील प्रमाणे काही उद्देश समोर ठेवले होते.

अ) विश्वातील सामाजिक आणि पर्यावरणीय गंभीर समस्यांचा आढावा घेणे.
ब) पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यावहारिक उपाय सुचविणे.
क) नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेणे.
ड) निसर्गातील साधन संपत्तीचा आज वापर करताना भविष्यातील पिढीसाठी पण तिचे जतन करणे.

या चार उद्दिष्टातून पर्यावरण संवर्धन शाश्वत संकल्पना निर्माण झाली.

शाश्वत विकासा संकल्पना / व्याख्या

१) **रॉबर्ट ॲलन यांच्या मते**, "शाश्वत विकास हा असा विकास आहे की मानवी गरजांचे निरंतर ठिकणारी नैसर्गिक साधने आणि मानवी जीवनाच्या दर्जात सुधारणा करणे होय."

२) **प्रा. सर्जेराव एन. बोराडे यांच्या मते**, "निसर्गातील स्त्रोतांचा मानवी गरजा भागविण्यासाठी वापरताना निसर्गावर दुष्परिणाम होणार नाही आणि भविष्यातील पिढीसाठी ही नैसर्गिक साधने शिल्लक राहतील हा विचार करुन केलेला विकास म्हणजे निरंतर विकास होय."

३) **जी. एच. ब्रटलँड अहवाल १९८७ नुसार** "निरंतर विकास म्हणजे जो विकास भविष्यातील पिढयांच्या गरजा पूर्ण करण्यात कोणतीही समस्या होणार नाही याचा विचार करुन वर्तमानकालीन गरजांची पुर्तता करणे होय."

४) **रिओ परिषद / वसुंधरा परिषदतील संकल्पना :** संयुक्त राष्ट्रसंघाची १९९२ मध्ये पर्यावरण व विकास परिषद (UNCED) ब्राझील मधील रिओ-दि-जानिरो येथे भरली होती. या परिषदेला वसुंधरा परिषद (The Earth Summit) या नावानी ओळखली जाते. या परिषदेत पर्यावरण आणि शाश्वत विकास या संकल्पनेवर चर्चा झाली होती. **अजेंडा २१ :-** आज जगाला भेडसावणाऱ्या पर्यावरण संबंधी समस्यांवर चर्चा करण्यात आली होती. या समस्या लोकसंख्या, हवा व पाणी प्रदूषण, उर्जा, अन्न-धान्यां दुर्भिक्षा, विविध क्षेत्रातील संसाधन व्यवस्थापन संबंधी होती. या संदर्भात महत्वाचे पाच करार पैकी शाश्वत पर्यावरणा संबंधीचा एक होता. यामध्ये २१ व्या शतकातील शाश्वत विकासासाठी सामाजिक, आर्थिक आणि राजकिय क्षेत्रासाठी जागतीक पातळीवर एक कृती आराखडा निश्चित करण्यात आला होता.

पर्यावरण शाश्वत विकासाचे घटक

१) नैसर्गिक साधनासंपत्तीचा कार्यक्षम वापर :-

आर्थिक विकासासाठी नैसर्गिक संसाधानाचा वापर अनिवार्य असतो. परंतू नैसर्गिक संपत्तीचा डोळसपणे वापर महत्त्वाचा असतो. शाश्वत विकास संकल्पनेत देखिल नैसर्गिक साधनाच्या वापरावर पूर्ण पणे बंदी आपेक्षीत नाही. तर नैसर्गिक पर्यावरणाचा वापर आधिक कार्यक्षमतेने करणे. ज्यामुळे दिर्घकालीन फायदे मिळवता येतील. वर्तमानकालीन व भविष्यातील पिढीसाठी पण फायदा होईल याची काळजी घेणे.

२) भविष्यातील पिढीचे गुणात्मक जीवन :-

शाश्वत विकास संकल्पनेचे उद्दिष्टये नैसर्गिक साधनसंपत्ती व पर्यावरणाचा वापर आजच्या पीढीचा जीवन स्तर उंचविण्या बरोबरच भविष्यातील पिढीचाही गुणात्मक जीवनमान खालावले जाणार नाही याची काळजी घेणे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत वापर करणे आवश्यक आहे.

३) प्रदूषण कमी करणे :-

शाश्वत विकास या संकल्पनेत पर्यावरणाचे प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. स्वच्छ सुंदर आरोग्यदायी पर्यावरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करण्याचा प्रयत्न केला जातो. पर्यावरणाचे वाढते प्रदूषण म्हणजे भविष्यातील पिढयांच्या जीवनात समस्या होय. यासाठी प्रदूषण नियंत्रणाचे मार्ग अवलंब केले जातात,

४) आर्थिक विकास :-

शाश्वत विकास म्हणजे आर्थिक विकासाच्या मार्यादा घालणे. आसा अर्थ नाही तर नैसर्गिक साधने व पर्यावरण यांचा वापर कसा काटेकोरपणे करावे हे शिकवले जाते. वर्तमान आणि भविष्यातील आर्थिक विकासाला समन्वय साधणे होय.

आपली प्रगती तपासा :

१) शाश्वत विकास म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

_____

शाश्वत विकासाचे महत्त्व / गरज

१) जगातील विविध देशात विकासाच्या भिन्न अवस्था आहेत. विकास करणे हा प्रत्येक मानवाचा मुलभूत हक्क आहे. विकसित राष्ट्रांनी तो मितवला आहे. परंतू त्यांनी पर्यावरणाच्या गैरवापराकडे दुर्लक्ष केले आज जगातील समाज शाश्वत विकासाच्या अभावामुळे गरीब व श्रीमंत देान भागांत विभागला आहे. यामुळे आज बहुतांशी प्रश्न अशाश्वत पद्धतीने केलेल्या नैसर्गिक संपत्तीचा उपभोग व पदार्थाची निर्मिती यातून उदभवले आहेत.

२) आजपर्यंतचा विकास मानव केंद्रीत होता. हा विकास काही विकसीत देशातच दिसून येत आहे. वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीमुळे हवा, पाणी, ध्वनी मृदा, अन्न इत्यादीत प्रदुषण वाढत आहे. नैसर्गिक संपत्तीचा अतिरिक्त वापर होत आहे. अशा पद्धतीने विकासाची प्रक्रिया सुरु राहिली तर आपण लवकरच सर्व विनाशाच्या दिवसाला (Doom's day) तोंड दयावे लागेल. यासाठी आपणाला सामाजिक घटकांचा विकास आणि पर्यावरण प्रक्रियेशी समन्वय साधणे आवश्यक आहे.

१) दारिद्रय निमुर्लन :- जगातील लोकांचे दारिद्रय कमी करायचे असेल तर शाश्वत विकास करणे काळाची गरज आहे.

२) संसाधनातील दरी कमी करणे :- जगात गरीब-श्रीमंत हि दर नैसर्गिक संसाधनामुळे निर्माण झाली आहे. जर नैसर्गिक संसाधने दरी कमी केलीतर आर्थिक विषमता कमी होईल.

३) पर्यावरण ऱ्हास कमी :- प्रगत देशातील लोकांनी निसर्गाचा आर्थिक वापर करुन पर्यावरण ऱ्हास आहे यामुळे मानवी जीवनात धोका निर्माण झाला आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने पर्यावरण प्रदूषण टाकणे महत्वाचे आहे.

४) भूमी संवर्धन :- मानवाला लागणारे अन्न, वस्त्र, निवारा या गरजा भूमी शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून जमिनी पोत कायम राखणे आवश्यक आहे.

५) जैवविविधतेचे संवर्धन :- निसर्गचक्र कायम ठेवण्यासाठी निसर्गातील प्रत्येक सजीव व निर्जीव घटक महत्वाचे आहे.

आपली प्रगती तपासा :

१) शाश्वत विकासाचे महत्त्व सांगा.

१६.८ पर्यावरण जागृतीचे महत्त्व

पर्यावरणातील समस्या केवळ तंत्रज्ञानामुळे सुटणार नाहीत यासाठी संपूर्ण पर्यावरणाचे आकलन होणे गरजेचे आहे. जर आपणास पर्यावरण आणि मानवी जीवन समजले तर आपण सुखी आणि समृद्ध होऊ शकतो. म्हणून पर्यावरण चळवळी मार्फत जनजागृती करणे महत्त्वाचे आहे. त्या महत्त्वपूर्ण बाबी पुढील प्रमाणे आहे.

१) सजीवा विषयी आदरभाव (Respect of Living Things)

निसर्गातील संपूर्ण प्राणीमात्रांना बद्दल आदरभाव निर्माण होणे महत्त्वाचे आहे. हा आदरभाव मानव वांशशस्त्री स्वरुपाचा नसावा तर जगा व दुसऱ्याला जगू दया म्हणजे "जिवो जिवस्या जिवनम्" म्हणजे विश्व कल्याणाचा विचार प्रग्ल्भ होईल.

२) जैविक घटकात परखट संबंध (Inter relatiship of organism)

विश्वातील मानवी आणि अमानवी सजीवांचा विकास होता हे सामाजीक मुल्य हे मानवाच्या संकुचीत दृष्टीकोना प्रमाणे ठरत असतात. म्हणजे मानवी समाजाच्या उपभोगावर आधारीत असते. व्यक्तीगत इतर सजीवांना स्वतंत्र्य अस्तित्व नसते. कारण परिसंखेत प्रत्येक सजीवाचे जीवन इतरांवर आधारीत असते. याला मानवही अपवाद नाही याची जाणीव प्रत्येक माणसाला होणे गरजेचे आहे.

३) वर्गविरोधी स्थिती (Anit class Posture)

जैवविविधता प्रतिकाचे तत्व म्हणजे हे सर्व सजीवांना मिळून आहे. यामध्ये कोणताही वर्ग किंवा जातवादी नसावी सर्वाना समान संधी मिळावी प्राण्याप्रमाणे मानवी समाजात ही या तत्त्वाचे महत्व आहे.

४) जैवविविधतेचे तत्त्व (Principles of Divorsity)

विश्वातील संपूर्ण सजीवांचे कल्याण होईल या जीवन मुल्यनुसार जैवविविधता निर्माण झाली आहे मानवांनी स्वतःच्या विकासासाठी इतर सजीवांमात्राचा ऱ्हास करु नये निसर्गावर प्रेम करुन सर्व जीवमात्रांचा फायदा करावा. यातच सर्वाचा फायदा आहे. निसर्गावर वर्चस्व किंवा नियंत्रण मिळवण्यापेक्षा नियर्गाला मित्र बनवून जीवन जगावे.

५) धोरण बदल (Change in Policies)

मानवी समाजाचा जीवनशैलीच्या धोरणात बदल करणे गरजेचे आसते. नियोजनात्मक धोरणामूळे अर्थव्यवस्थाचा, तंत्रज्ञान व तत्वप्रणाली यावर परिणाम ऱ्होन असतो. उदा. भांडवलवाद, गांधीवाद, मार्क्सवाद.

६) लोकसंख्या नियंत्रण :

जगात लोकसंख्या विस्फोट होत आहे. यामुळे मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गाचा अतिरिक्त वापर केला जात आहे. यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत आहे. वेळीच लोकसंख्या नियंत्रण तत्वाचा वापर करावा लागेल. हि बाबी निसर्गाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

७) जीवनाचा आनंद (Appreciation of quality of life)

जीवन शैलीतील बदलामुळे जीवनात आनंद मिळत असतो. राहणीमानातील बदल, पर्यटन यामुळे आनंद मिळतो. निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवण्यात निसर्ग प्रेम वाढते. जागृती निर्माण होत असते. निसर्गपर्यटन होणे महत्वाचे आहे.

८) सहभागाचे बंधन (Obligation to Participation)

निसर्गाबददल जागृती झाल्यानंतर आपण हे निसर्ग संवर्धनासाठी योगदान करणे गरजेचे आहे. थोडक्या एक व्यक्ती एक झाड संवर्धन केले पाहिजे. या प्रमाणे विविध निसर्ग घटकाचे संरक्षण केले पाहिजे.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यावरण जनजागृतीचे महत्त्व सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१६.९ सारांश

पर्यावरण प्रदुषणामुळे निसर्गातील जैविक आणि अजैविक पदार्थावरही त्याचा परिणाम होतो. उदा. रंग जाणे, रंग काळा होणे, झीज होणे व तूकडे पडणे इ. त्याचप्रमाणे हवा प्रदूषणाचा सर्वात जास्त परिणाम मानवावर होतो.

निसर्गातील सर्व सजीव हे आपले बहुमूल्य वारसा आहेत. म्हणून आपल्या वारसाचा आपण बहुमान केला पाहिजे. हा विचार प्रत्येक मानवाने आपल्या निसर्ग संपत्तीला जतन केले पाहिजे.

नवीन भौतिक, दृष्टीकोन स्विकारुन आपण जीव केंद्रीत संकल्पेन न्याय देणे आवश्यक आहे. या नैतिक दृष्टीकोनात केपण मानवाचा विचार न करता विश्वातील प्रत्येक सजीवांचा संवर्धन करुन आदर करणे गरजेचे आहे.

मानवतावादी दृष्टीकोन हा पर्यायवरणातील नैतीकता सत्यात मांडण्यासाठी सांगीतील जात आहे. मानवतावाद आणि जैववाद या दृष्टीकोनाला समान महत्व दिले जाते.

निसर्गातील प्रत्येक घटक प्रत्येक्ष किंवा अप्रत्येक्ष मानवी विकासाचे साधन आहे. या साधनाचा वापर करतात आपण शाश्वत दृष्टीकोनातून विचार होणे गरजेचे आहे. म्हणजे निसर्गाचा उपभोग घेत असतांना आजच्या गरजा बरोबर भविष्यातील पिढीच्या गरजांचा हि विचार होणे महत्वाचे आहे म्हणजे निसर्गाचा उपभोग मर्यादी करवी हा विचार होय.

निसर्गातून मानवाचा अन्न, वस्त्र, निवारा, औषध या सारख्या विविध गरजा पूर्ण होत असतात म्हणजे निसर्ग जीवंत राहिला तर मानव हि जीवन राहिल ही जाणिव प्रत्येक व्यक्तीला होणे आवश्यक आहे. निसर्ग हा आपल्यासाठी निर्माण झाला आहे. हा मर्यादीत विचार न करता संपूर्ण सजीव सृष्टीच्या कल्याणाच आणि संबंधाचा विचारच आपल्या शाश्वत जीवन जगण्याचे मार्ग आहे तो आज प्रत्येक मानवांनी स्विकारणे काळाची गरज आहे.

१६.१० अभ्यासाचे प्रश्न :

१. समकालीन समाजातील पर्यावरण समस्याची चर्चा करा.
२. पर्यावरण शास्त्रा संबंधी शाश्वत विकासाची संकल्पना स्पष्ट करा.
३. पर्यावरणशास्त्रीय जागृतीची महत्व थोडक्यात स्पष्ट करा.
४. टिपा लिहा
   अ) पर्यावरण जागृती
   ब) शाश्वत पर्यावरण संवर्धन
   क) पर्यावरण ऱ्हासाची कारणे
   ड) पर्यावरण ऱ्हासाची परिणाम
   इ) सजीवांच्या वस्तीस्थाने ऱ्हासाचे प्रकार
   फ) शाश्वत विकासाचे महत्त्व
५) मानवी निसर्गातील ढवळाढवळी निर्माण होणारे धोके कोणते ?

१६.११ संदर्भ सूची

१) Haralambos M and Heald 2009 socialaya Temes prespectives New Delhi oxford university.
२) Marshall Gordon Dictionary of Sociology New Delhi oxford University press.
३) प्रा. एम. एम. लिमण (२०१६) पायभूत अभ्यास शेठ प्रकाशन मुंबई

४) युवराज मोरधा आणि सर्जेराव बोराडे, (२०१७) पायाभूत अभ्यास : समकालीन समाज निराली प्रकाशन, पूणे

५) सर्जेराव बोराडे, डॉ प्रदीप गांगुर्डे आणि शिल्पा जाधव (२०१८) विकासाचे समाजशास्त्र, निराली प्रकाशन, पूणे.

६) सर्जेराव बोराडे (२०१७) समाजशास्त्र, निराली प्रकाशन, पूणे.

७) Sarjerao Borade and Dr. P. Gangarde. (2017) fundamentals of sociology, Nirali Prakashan, Pune.

❖❖❖❖

१६ ब

शहरी पर्यावरण आणि स्त्रीवादी पर्यावरण

घटक रचना :

१६.० उद्दिष्ट्ये
१६.१ प्रस्तावना शहरी पर्यावरणशास्त्र
१६.२ शहरी पर्यावरणाची व्याख्या
१६.३ शहरी पर्यावरणाचे स्वरूप
१६.४ स्मार्ट सिटी
१६.५ पर्यावरणीय स्त्रिवादाची तत्त्वे
१६.६ मेरी मिलोर
१६.७ वंदना शिवा
१६.८ पर्यावरणीय स्त्रिवादाचे महत्त्व
१६.९ सारांश
१६.१० अभ्यासाचे प्रश्न
१६.११ संदर्भ सूची

१६.० उद्दिष्ट्ये

१) शहरी पर्यावरणशास्त्राची ओळख करुन घेता येईल.
२) शहरी पर्यावरणती समस्यांचा आढावा घेणे.
३) स्मार्ट सिटी संकल्पन समजून देणे.
४) पर्यावरणावरील स्त्रीवादाची माहित करुन घेणे.
५) मेरी मिलोर आणि वंदना शिवायीच्या योगदानाची माहिती देणे.
६) पर्यावरणीय स्त्रीवादाची महत्व स्पष्ट करणे.

१६.१ प्रस्तावना - शहरी पर्यावरण शास्त्र (URBAN ECOLOGY)

२० व्या शकतकाऱ्या शेवटच्या अर्ध्यात पृथ्वीची लोकसंख्या जलद गतीने वाढत आहे. २००७ साली ती ६६० कोटी एवढी होती. २१ वे शतक हे शहरी करणाचे शहर म्हणून ओळखले जात आहे. २०३० पर्यंत ६०% पेक्षा अधिक लोक शहरी क्षेत्रात राहणारे असतील. १९५० मध्ये केवळ १९% लोक शहरात होते. अमेरिका किंवा युरोप पेक्षा आफ्रिका, आशिया आणि लॅटिन

अमेरिकाची लोकसंख्या वाढ होईल तेव्हा अनेक महानगरे निर्माण झाली आहेत. याचा परिणाम नैसर्गिक पर्यावरणावर घातक परिणाम होत असतो.

१६.२ शहरी पर्यावर्णाची व्याख्या

१) **सुकोप आणि विटींग** (१९९८) यांच्या मते शहरी पर्यावरणाचा अभ्यास विषय परिणामाचा अभ्यास करणे हा आहे. यामध्ये व्याख्या दोन भागात केली आहे. एक म्हणजे पर्यावरण विषयक प्रक्रिया आणि शहरी भागातील जैविक घटक वनस्पती, प्राणी आणि लोकसंख्या सहसंबंधाचे विश्लेषण केले जाते. दुसऱ्या भागात शहरातील लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी अनेक विध दृष्टिकोन परिसंस्थेत कार्यरत असू शकतात.

२) **सर्जेराव एन. बोराडे** यांच्या मते "शहरी पर्यारणशास्त्र हा असा शास्त्रीय अभ्यास आहे की ज्या महज्वे जैवीक विविध घटकांचे जीवन. एक दुसऱ्यांशी येणाऱ्या सहसंबंधाचा संदर्भाची शहरी पर्यावरण होय."

३) "शहरी पर्यावरणशास्त्र म्हणजे पर्यावरण व्याख्या ज्यामध्ये मानवी जीवन मान, मनमोहक शहरी जीवन वगैरे बाबीचा अभ्यासाचा समावेश असतो."

शहरी पर्यावरणाचा अर्थ (Meaning of Urban)

शहरी पर्यावरण शास्त्र म्हणजे शहीर नागरी जीवन आणि शहरी आकृषक मनरंजक सेवा यांचा समावेश असतो. शहरी पर्यावरण शास्त्र नवीन जीवनशैलीचा अभ्यासाच्या उद्देशाने निर्माण झालेले शास्त्र आहे. ज्यामुळे मानव व पर्यावरणाच्या संदर्भातील प्रक्रियांचा सजीवांच्या परिसंस्थावरण होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला जातो. पर्यावरणाला शाश्वत आणि सर्वसमेशक अभ्यास केला जातो. पर्यावरण शास्त्रात शहरी जीवनात सुलभ पद्धतीने अभ्यास केला जातो. १९ व्या शतकातील जीवशास्त्र आणि प्राणीशास्त्रात पर्यावरणशास्त्राचा अभ्यास केला जाऊ लागला आहे. पर्यावरण आणि जैविक घटकांचे गुंतागुंतीचे संबंध समजावून सांगणारे हे शास्त्र आहे. पर्यावरण व्यवस्था ही जैविक समूह अभ्यास करणारे शास्त्र आहे. पर्यावरणशास्त्र ही एक विज्ञानाचा भाग आहे यामुळे संपूर्ण अभ्यास होणे विशेष महत्त्वाचे आहे.

आपली प्रगती तपासा :

१) शहरी पर्यावरण संकल्पना लिहा.

_____

_____

_____

_____

_____

१६.३ शहरीपर्यावरणाचे स्वरुप

सुकोप यांच्या मते दाटलोकवस्ती ज्यामुळे उन्हाळ्या पेक्षा ही अधिक उष्णता जाणवते त्यामुळे कार्यक्षमता कमी होऊन आळस वाढतो. **हैरिस** यांनी शहरात बांधलेल्या उंच इमारतीचा अभ्यास केला आहे. औद्योगिक भाग शहरात मध्यवस्तीतील व्यावसायिक भाग, उपनगरतील घरबांधणी आणि मध्यमवर्गीयांची घरे यांची त्यांनी तुलानामक अभ्यास केला आहे. आज रेश हा घरबांधणीसाठी पर्यावरण संबंधित नविन कायदा केला आहे. यामहत्वे चार प्रकारचे बदलांचा अभ्यास केला.

शहरी समस्या

शहर म्हणजे सर्व समावेशक प्रगतीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिवहन, शिक्षण वगैरे परिपूर्ण मानले जाते तरी आज शहरी करणातून अनेक प्रकारच्या समस्या निर्माण यापैकी काही समस्या अभ्यासू

१) स्थलांतर :-

शहरीकरण प्रक्रियेत स्थलांतर ही एक महत्वाची प्रक्रिया आहे. यामुळे एका भागातील लोक दुसऱ्या भागात स्थलांतर करतात. जगातील बहुतेक विकसनशील देशातील शहर वाढीचा दर प्रगत देशाच्या तुलनेत उच्च आहे. ग्रामीण भागातील लोक शहरात स्थलांतर करतात. यामुळे नविन शहराची निर्मीती होत असते. यामुळे शहरातील वाहतूक, निवास, पाणी रोजगार वगैरे सेवांवर ताण पडत असतो.

२) गृहनिर्माण :-

वाढत्या शहरी करणामुळे वाढीव लोक संख्याला गृह पुरवठा करण्याचे मोठे आव्हान निर्माण होते. आज शहरी गृहाच किती रोजच्या रोज वाढत आहेत. मध्यमवर्गीयांना घराची किमत आणि उत्पन्नांचे ताळमेळ घालणे थोडे अवघड होत आहे. तर कमी उत्पन्न गणंतर घर खरेदी करणे स्वप्न होऊ लागले आहे यामुळे हे लोक झोपडपट्टी निर्माण करुन राहतात. यामुळे सुद्धा हवा प्रकाश, पाणीपुरवठा. सांडपाणी वगैरे समसया निर्माण होतात. युनायटेड नेशन्स सेंटर फॉर हयूमन सेटलमेंटस ने एकनवीन संकल्पना मांडली आहे अशा लोकांसाठी सुरक्षित आणि निरोगी निवारा पाणीपुरवठा, स्वच्छतागृह ड्रेमेज, घरगुती कचरा व्यवस्थापन वगैरे तरतूदीच्या आहेत.

३) शुध्द पाणी पुरवठा :-

शहरातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित असतात कारण शहरातील पाणी मुळातच अपूरे असते. भविष्यातील वाढत्या लोकसंख्येला पुरेशा पाणी पुरवठ्याचा अभाव असतो.

४) अस्वच्छता :-

शहरीभागातील झोपडपट्टी, आणि अनधिकृत चाळी यांच्या कमालीची अस्वच्छता असते. यामुळे अनेक प्रकाराचे रोग आणि आजारांचा प्राधुर्भाव होत असतो, मलेरिया - डायरिया असुरक्षित कचरा व्यवस्थापन ही शहरांची मोठी गंभीर समस्या आहे. आणि कचरा व्यवस्थापन मोठे आव्हान शहरी संस्थाना निर्माण झाले आहे.

५) आरोग्य आणि शिक्षण :-

मानवी विकासासाठी शिक्षण आणि आरोग्य महत्वाची मानली गेली आहेत. ग्रामीण भागाच्या तुलनेत थोडी ठिक असते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था दिवसेंदिवस संकुचिन होत आहेत. नागरिकांना खाजगी आरोग्यसेवा घ्याव्या लागत आहेत. शिक्षणाच्या बाबतीत पण ती परिस्थिती आहे. आज सर्वच खाजगी शिक्षण संस्था आहेत त्यांची फिस उच्च असते. सरकारी शाळांची स्थिती निराशाजनक आहे. महानगर पालिकेच्या शाळा बंद पडत आहेत.

६) शहरी वाहतूक व्याख्या :-

वाढल्या लोकसंखेला सरकारी वाहतूक व्यवस्था अपूरी हात आहे. उच्च उत्पन्न व्यक्ती खाजगी वाहणे खरेदी करत आहेत. यामुळे मोठ्या शहरात वाढत्या खजगी वाहनांचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरी प्रदुषणात ही वाढ होत आहे.

७) शहरी अपराध :-

आज शहरी गंन्हेगारी एक आव्हान निर्माण झाले आहे. चोरी पाकीटमारी, हिंसाचार, वेश्या व्यवसाय, झुगार, भ्रष्टाचार, फसवेगीरी वगैरे मार्गांनी शहरात लोक जीवन जगत आहेत.

८) पर्यावरण :-

शहरात मानवनिर्मित आणि नैसर्गिक पर्यावरणाचे धोके निर्माण होत आहेत. वाढती उष्णता भूजल पुनर्भरण, जंगलतोड, डोंगर सपाटीकरण, खाडी नदीना अरुंदीकरण वगैरे वातावरणातील हवा पाणी दुषीत असते प्लास्टीकचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील सांडपाणी नदी समुद्रात सोडले जात आहे यामुळे मानव आणि इतर सजीव सृष्टीला धोका निर्माण होत आहे.

आपली प्रगती तपासा :

१) शहरी पर्यावरणाचे स्वरुप थोडक्यात लिहा.

_____

_____

_____

_____

_____

१६.४ स्मार्ट सिटी

.

काही दिवसापुर्वी भारत सरकारने १०० स्मार्ट शहरांची घोषणा केली आहे. आज जगातील ७०% लोकसंख्या शहरात राहत आहे म्हणून भारत देशाला अशा ५०० स्मार्ट शहरांची गरज आहे. तर आपण शहरी लोकसंख्येला सर्व सेवासुविधा देवू शकतो. म्हणून भारत सरकारने शहरी राहणीमानावर गुंतवणूक करण्यावर भर दिला आहे. स्मार्ट सिटी बरोबरच 'मेक इन इंडिया' ची पण शासनाने घोषणा केली आहे.

स्मार्ट सिटी संकल्पना :-

स्मार्ट सिटी या संकल्पने अंतर्गत शहराचा पूर्ण चेहरा मोहरा बदलून टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामध्ये रिअल इस्टेट, संपर्क व्यवस्था, बाजारपेठा यांना विशेष प्राधान्य दिले जाते. शहरांना वायफाय सुविधा उपलब्ध करुन देणे वगैरे. सरकारने आज ज्या शहरांना स्मार्ट सिटी म्हणून जाहिर केले आहे. त्यामध्ये विशेष आर्थिक क्षेत्र, आधुनिक करप्रणाली, परकीय भांडवल गुंतवणूक इत्यादी गोष्टींना प्राधान्य दिले जात आहे. कारण खाजगी उदयोगांच्या गुंतवणूकीतूनच ही स्मार्ट सिटी उभी राहण्याची शक्यता आहे.

स्मार्ट सिटीचे स्वरूप / वैशिष्टये

१) भारतात स्मार्ट सिटीची संकल्पना राबवीणे सहज शक्य नाही. कारण शहरात राहणारे लोक उदयोजक, पर्यटक यांच्या मदतीने व नविन तंत्रज्ञान त्यावर आधारित गोष्टी यावर स्मार्ट सिटीचे भवितव्य अवलंबून आहे. वास्तवात अशी शहरे निर्माण होण्यास २० - ३० वर्षाचा कालावधी लागू शकतो.

२) नागरी समाजशास्त्रज्ञांची शहरी पर्यावरण मुल्यमापन करताना केवळ रेल्वे, पाणी यांसारख्या सुविधा असणाऱ्या ठिकाणी शहरांची निर्मिती होत नाही तर लोकांच्या गरजा पर्याय व निर्णय यानुसार शहरनिर्मिती केली जात आहे. आज जगात सर्वत्रच गरजा व इच्छा यांनुसार शहरे वसत आहेत. शहरांना स्वतंत्र अस्तित्व नसते तर लोकांच्या गरजांनुसार अपेक्षानुसार निर्माण हात असते.

३) मुंबई जवळ असणाऱ्या समुद्र किनाऱ्यांमुळे मुंबई व्यापाराचे केंद्र बनले व यातून कापड उद्दोग त्याच बरोबर, आर्थिक व शैक्षणिक केंद्र बनले. विविध उद्दोगांच्या निर्मितीमुळे अनेक लोक रोजगारांसाठी स्थलांतर करु लागल्यामुळे मुंबई वेगाने औद्योगिकर व शहरीकर होत गेले आहे. आज ही मुंबई ही भारताची आर्थिक औद्योगिक राजधानी म्हणून ओळखली जात आहे.

४) चिन देशाचा जगातील शहरीकरण प्रक्रियेचा वेग सर्वात जास्त आहे. १४ दशलक्ष लोक दर वर्षी शहरांकडे स्थलांतर होत असतात. म्हणून चिन मध्ये लियुझोड वन सिटी हे शहर स्टीफानो बोरी या आर्किस्टेक्चर यांनी डिझइन केलेले जगातील पहिले वन शहर आहे. ज्या मध्ये शहरी घरे कार्यालय, हॉटेल, रुग्णालये आणि शाळा हे सर्व झाडांनी आणि वेलींनी व्यापलेले आहेत. यामध्ये संपूर्ण पण पर्यावरण विचार केला आहे.

शहरातील लोकसंख्या वाढीस आर्थिक बदल हे एक महत्वाचे कारण आहे. मागिल काही वर्षात आर्थिक रचनेत बदल होत आहेत शहरातील अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे कारण म्हणजे औद्योगिक उत्पादनाकडून शहरे आज सेवा क्षेत्राकडे जात आहेत. तरी आज शहरी विकासा बरोबर पर्यावरण संवर्धनाची काळजी घेणे गरजेचे आहे. अन्यथा महापुर, सुनामी, भूकंप, डोंगर घसरण वगैरे सारख्या आपत्ती निर्माण होण्याचा मोठा धोका आहे.

आपली प्रगती तपासा :

१) स्मार्ट सिटी संकल्पना स्पष्ट करा.

१६.५ पर्यावरणीय - स्त्रिवादाची तत्त्वे (PRINCIPLES OF ECO-FEMINISM)

पर्यावरणीय स्त्रिवादाची तत्त्वे प्रामुख्याने समाजातील विषमता, असामंजस्य शासंक अशा विरुध्द विचाराची तत्त्व म्हणजे पर्यावरणीय स्त्रीवादाची तत्त्व होय यांचा पुढील प्रमाणे अभ्यास करता येईल.

अ) स्त्री आणि निसर्गाच्या विस्थापन समानता (Resisting of Equation of woman and Nature) :

पर्यावरणीय स्त्रीवादी हा आधुनिक प्रगत शेती मध्ये स्त्रोय पारंपारीक काळापासून पुरुषा प्रमाणे योगदान करत आहेत. स्त्रीयांचा संबंध फुले, प्राणि, जंगल आणि समुद्र कार्य करत असतात. तर पुरुष यंत्र, कारखाने आणि पाश्चत तंत्रज्ञान संबंधीत व्यवसाय करत आहेत.

यामुळे स्त्रीयांचे शोषण हे निसर्गाप्रमाणे होत आहे. जसे वनसंपतीचा आज अतिरिक्त वापर केला जात आहे. पश्चात्य स्त्रीया पारंपारीक काळापासून प्राण्यांची संगोपण कार्य करत आहेत. कारण त्यांना बाल संगोपणाचा चांगला अनुभव असतो.

ब) स्त्री आणि प्राण्यांच्या विस्थापन समानता

जगात असंख्य स्त्री कामगार प्राणी व्यवस्थापनाचे व्यवसाय करतात. शेळया मेंढ्या गाई म्हैस वगैरे कामे स्त्री संबंधी आहेत. स्त्रीवादी संदर्भानुसार स्त्री आणि प्राणी यांचा संबंध पुरुष वर्गाने जोडला आहे.पर्यावादी स्त्रीवादी विचार नुसार अनेक राष्ट्रात स्त्री पुरुषापेक्षा प्राण्याना अधिक आवडतात. जगातील दुग्ध व्यवसाय करणारी राष्ट्र हि स्त्री वर्गातर अन्याय करतात. वनस्पती प्राणी अधिकार कार्येकर्ते हे पर्यावरणवादी स्त्री वादी तत्त्वाला सहमत असतात कारण स्त्री आणि प्राणी अन्याय अत्याचार थोडयाफार फरकाने सारखाच आहे. पर्यावरणीय स्त्रीवादी विचारवंताचा मते प्राण्यांवरील अत्याचार हा पुरुषसत्ताक संबंधाचा जोडला आहे.

क) स्त्रीवादी राजकीय प्रर्यावरण

पर्यावरणीय स्त्रीवाद आणि स्त्रीवादीय राजकीय प्रर्यावरण हे सांस्कृतीक संरचनात्मक जबाबदाऱ्या ह्या पर्यावरणास आणि पुरुषसत्ताक तत्त्वानुसार पार पाडत आहेत. उत्तर संरचनात्मक सुप्तता आणि राजकीय प्राचीनकाळ दबाव तंत्र बदल करुन नविन व्यापक पर्यावरणाची तत्त्व स्थापीत केली आहेत.

स्त्रीवादी राजकीय पर्यावरणशास्त्र मध्ये पर्यावरण आणि स्त्री यांना सामाविशक असे तत्त्व मांडली आहेत त्यानुसार वंशवाद जातीवाद प्राणी अत्याचार आणि इतर मतभेद बाजुला केले आहेत. पुरुषसत्ताक दबावा पासून स्त्री पुक्तीचा विचार मांडला आहे. पर्यावरणीय राजकीय स्त्रीवाद हा जमिनदारी मुक्त नैसर्गिक विचाराचा स्विकार करतो. वनस्पती, प्राणी, मुले, स्त्रीचा आणि इतर घटकाच्या मुक्तीचा विचार मांडला आहे.

पर्यावरणीय स्त्रीवादाची तत्त्वे ही स्त्री मुक्ती बरोबरच पर्यावरणालाही शोषण मुक्त करण्याचा विचार मांडला आहे पारंपारीक सत्ता म्हणजे पुरुषसत्ताक राजकीय सत्ता आणि जमिनदारी यांच्या दबावा पासून स्त्री आणि निसर्गाला शोषण मुक्त केले पाहिजे. आज पर्यंत स्त्री आणि निसर्ग हे अत्याचार सहन करत आले आहेत म्हणून उदयाच्या उज्वल समाजासाठी पर्यावरणीय राजकीय काळाची गरज आहे.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यावरणीय स्त्रीवादी तत्त्व थोडक्यात सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१६.६ मेरी मिलोर

मेरी मिलोर यांनी त्यांच्या ग्रंथातला उद्देश ऐतिहासीक आणि विकास प्रक्रियेत विविध घटका बरोबर स्त्री-पर्यायावरणवाद विशेष महत्व दिले आहे. यांचा संबंध हा पर्यावरणवाद आणि स्त्रीवादी पर्यावरणवादाशी जोडला आहे. मिलोर यांनी अशाय दृष्टिकोणातून विश्लेषण केले आहे. या ग्रंथतील सिध्दांत तसे खूप कठिण असले तरी ही अशक्ये नाही असे त्यांचे मत आहे त्यांच्या मते स्त्रीवादी पर्यावरणवाद, स्त्रीवाद आणि पर्यावरणवादी विचारांच्या अंतरीक सहसंबंध जोडून शैक्षणिक संस्थां आणि इतर प्रसार माध्यमातून शिकवणे आवश्यक आहे.

स्त्रीवाद आणि पर्यावरण यांचे विश्लेषण करणे आगदी सोपी गोष्टी नाही. मिलारे यांनी या घटकांच्या विश्लेषणासाठी विविध घटक आणि परिस्थितीचा आढावा घेताला आहे. सालवादी तत्वज्ञाना पर्यावरणवादी स्त्रीवादानुसार वसतूस्थितीची लवकरात लवकर जाणिव परंतू मेरील यांनी पर्यावरणवादी स्त्रीवाद आणि स्त्रीवाद परंपरेचे विवेचन केले होते. त्यांनी पारंपारीक व स्थानिय स्त्रीवादी जुन्या कामाला प्रतिकार केला. त्यांच्या मते ते विचारन असिद्धांतीक आणि असंतुलित स्वरुपाचे आहे. तरी ही काही यांनी आपल्या ग्रंथात योग्यं मुलांचा विचार करुन विश्लेषणात्मक लिखान केले आहे.

मिलोर यांचे पुस्तक आठ प्रकरणात विभागले आहे. पहिल्या प्रकारणात प्रस्थावना आणि स्त्रीवाद पर्यावरणवादाचे उद्देश सविस्तर पणे मांडला आहे. प्रकरण दोन मध्ये त्यांनी स्त्रीवादी उदय आणि इतिहासाच आढावा घेतला आहे. तसेच स्त्रीवाद चळवळी समोतर दक्षिण व उत्तर

सिद्धांता जमिनी सारा पासूनचे विवेचन केले आहे. प्रकरण तीन मध्ये विविध विचारधार आणि त्यांचा स्त्रीवादी दृष्टिकोनाचा आढावा घेतला आहे. मिलोर यांनी प्रथम उत्तर सिद्धांतावर चर्चा केली आहे. यामध्ये मिलोर यांचा उद्देश समस्येवर उपाय शोधण्याचे होता. मिलोर यांनी पर्यावरणवादी स्त्रीवादाचे दोन संप्रदयाक विचारात विभाजन केले आहे.

अ) affinity eco feminsin हा दृष्टीकोन झालवादी, पंरपरावादी, संस्कृतीकवादी आणि धार्मिक यांच्या संकल्पनेनुसार स्त्रीचा संबंध निसर्गाशी आहे.

ब) समाजवादी पर्यावरण-स्त्रीवाद हा दृष्टिकोन मार्क्सवादी तत्वज्ञानानुसार संत्वनात्मक विश्लेषणानुसार स्त्री समस्येकडे पाहिले जाते. मिलोर हया स्पष्टपणे समाजवादी पर्यावरण स्त्रीवादी संप्रदायात आहेत. यामुळे परंपरावादी स्त्रीवादी पय्रावरणवादीच्या विरोध करतात. त्यांच्या ततवज्ञानुसार स्त्री मुलभूत विचाराने निसर्गा संबंधीत आहे.

प्रकरण चार मध्ये परंपरावादी स्त्रीवादी पर्यावरणवादी विचाराला विरोध केला आहे. मिलोर यांनी ।स्ंहो आणि ।स्ंद्ग्हो या संकल्पना निर्माण केल्या आहेत. मानवता आणि निसर्ग यांचा संबंध सांगीतला आहे.

आपली प्रगती तपासा :

१) मेरी मिलोर यांच्या स्त्रीवादी विचार सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१६.७ वंदना शिवा

वंदना शिवा यांचा जन्म ५ नोव्ह. १९५२ ला देहादुन येथे झाला. शिवा यांनी पर्यावरण संवर्धनासाठी अहिंसात्मक चिपको आंदोलनात सहभाग घेतला ती एक समाजशास्त्रज्ञ, पर्यावरण कार्यकर्ता पर्यावरणीय स्त्रीवादी विचारक आहे त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे. वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाच्या अतिरिक्त वापरावर लिखान केले आहे. १९७८ मध्ये पश्चिमी ओटेरिओ विद्यापीठ कॅनडा मध्ये पी. एच. डी. पदवी केली आहे जेरी मैंडम, एडवर्ड गोल्डविथ राल्फ मैडम यासारख्या आंतरराष्ट्रीय फोरमच्या नेत्या बरोबर कार्य केले आहे. अल्टर ग्लोबलाइजेशन मुवमेंट नावाच्या जागतीक संघटनेत कार्य केले आहे.

वंदना यांचे वडिल वन संरक्षक आणि आई निसर्ग प्रेम शेतकरी होती. चेंजेस इन इ कन्शेप्ट ऑफ पिरियाडिसीटी ऑफ लाईट या शोध प्रबंध पदवी प्राप्त केली. भारतातील बंगलोर येथे भारतीय विज्ञान एवं भारतीय प्रबंधन संस्थेत पर्यावरण नीतीवर अंतर्विषयक संशोधन कार्य केले आहे.

डॉ. वंदना शिवा पर्यावरण कार्यकर्ता समाजशास्त्रज्ञ. पर्यावरण आणि स्त्री अधिकारा संबंधी अनेक पुस्तकाचे लिखाण केले आहे. वंदना शिवा ह्या पर्यावरणासंबंधी चळवळीत सहभाग घेणारी प्रथम महिला आहे. त्यांनी राष्ट्रीय आणि आंरराष्ट्रीय संघटना मार्फत पर्यावरण संरक्षा संबंधी आवाज उठवला आहे. इंटरनेशनल फोरम ग्लोबलाईशनच्या सदस्य असलेल्या वंदना शिवा यांनी १९८४ मध्ये भारतीय सरकारच्या हरित क्रांतीला विरोध केला होता. त्यांचे म्हणने आहे की रासायनिक खतांच्या अतिरिक्त वापरामुळे पर्यावरण हानी होईल.

१) हरितक्रांती :-

जेव्हा १९८४ ला हरितक्रांतीला विरोध केला या मागे एक कारण आहे. पंजाब मध्ये हरितक्रांतीमुळे शेतीचा विकास झाले. चीनमध्ये लालक्रांती झाली पण भारतात बी-बीयानांची क्रांती झाली या हरीतक्रांतीमुळे शेतकरी संपन्न होतील. संपन्न शेतकरी कधीही शसस्त्र (हथियार) उचलणार नाही. पंजाब मध्ये खालिस्तानच्या मुद्दयांवरुन शस्त्र उचलली होती. हरितक्रांती केवळ अन्न उत्पादन क्रांती नाही तर रसायन विक्री करण्याची क्रांती आहे. रासायनिक उत्पादन काही काळा नंतर आपल्या शेतीलाच नापीक बनतात. आपल्या देशात कोणत्याही गोष्टीची कमी नाही. पोषकअन्न तेल की कमी आहे हरितक्रांतीच्या नावाने शेतकरी मिश्रित शेतीच्या ऐवजी एक पीकावर भर देतील यामुळे संपूर्ण जमिन पाणी वापर करीत सुधारीत बीयाने अधिक किंमतीला खरेदी केली जातील. रासायनिक खते किटकनाशके वगैरे वर भरपूर खर्च केला जाईल. काही काळासाठी सब्सिडी दिली जाईल नंतर ती हारवली जाईल. याची जाणीव शेतकऱ्यांना होणार नाही. यामुळे नफा कमी होईल.

२) शेतकरी आत्महत्या :-

शेतकरी काय कि घ्यावे हे पण ठरवू शकणार नाहीत. हे दिल्ली आणि वांशिग्टन सारख्याच ठिकाणी बसून ठरवले जाईल. हा एक भयंकर आतंकवाद सुरु झाला आहे. यामुळे ९० च्या दशका नंतर शेतकरी आत्महत्या करण्यास मजबुर होत आहे. हा अन्न सुरक्षाचा मार्ग नाही. हा तर शेतकऱ्यांना खत्म करण्याच डाव आहे. कारण वंदना शिवाच्या नुसार आपले उत्पादन कमी नाही. आपले उत्पादन अमेरिके पेक्षा अधिक आहे. जगात सोयाबीन आणि मक्का फक्त भारतातच उत्पादन केली जान नाही. म्हणून आपण मिश्रिशेती अत्पादन घेतले पाहिजे. कृषी क्षेत्रात अमेरिके पेक्षा भारताचे उत्पादन अतधिक आहे. पण अमेरिक अर्थव्यवस्थ केवळ एक क्षेत्रावर आधारित नाही. त्यांची औद्योगिक अर्थव्यवस्था पेट्रोलियम पदार्थावर आधारित आहे. आज पेट्रोलचे भाव दिवसेनदिवस वाढत आहेत. यामुळे अमिरीकेची व्यवस्था धोक्यात येईल. आपली शेती नैसर्गिक आहे तेव्हा मोठे संकट असेल ज्या ठिकाणी सुधारीत शेती केली जाते तेथेच शेतकरी आत्महत्या आधिक प्रमाणात होतात. १९६५ से अमेरिकेत बाजारात रासायिक उत्पादन आणाली आहेत. आज त्यांची सबसिडी बंद केली आहे. आज आपल्याला शेतकरी आत्महात्या थांबवाव्या लागतील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे लागेल. रासायिक उत्पादनासाठी कर्ज घेतले जाते तर आपकी शेती रसायन मुक्त केली पाहिजे. तसेच आंरतरराष्ट्रीय बहुराष्ट्रीय कंपनिय नुसार शेती न करता नैसर्गिक शेतीवर भर दिला पाहिजे.

३) पर्यावरण :-

निसर्ग आपला कचरा योग्य ठिकांणी उपयोगात आणत असतो. मनुष्य मल मुत्र, झाडे, पाने आदी गोष्टी पासून खत बनले पाहिजे. या सर्व गोष्टी जमिनीच पोत राखण्यासाठी उपयोगी आहेत. परंतु या घटकांना पिण्याच्या पाण्यात टाकून दुषित केले जात आहे. यामुळे नदि समुद्र

तलाव हे पाण्याचे स्त्रोत दुषित होऊन आजारांना आमत्रण दिले जात आहे. मैदाने शेती सडका रस्ते छान केले जात आहेत. यामुळे घरकचरा निर्माण होऊन त्याच्या व्यवस्थापनाची समस्या शहरा समोर निर्माण झाली आहे.

थोडक्यात वंदना शिवा हि प्रथम पर्यावरणवादी विचाराची स्त्री आहे त्यांनी विविध समस्यांवर पर्यावरणीय आणि स्त्रीवादी आंदोलनात सहभाग घेतला आहे. लिखानातून योगदान ही केले आहे.

आपली प्रगती तपासा :

१) वंदना शिवा यांच्या पर्यावरणीय स्त्रीवादी योगदानाची चर्चा करा.

१६.८ पर्यावरणीय स्त्रीवादाचे महत्त्व

१) चिपको आंदोलन : स्त्रियांचे पिळवणूक आणि पर्यावरणाचा ऱ्हास होताना पुरूष वर्चस्वाचा मोठा सहभाग असतो. "चिपको आंदोलन" म्हणजे वृक्षतोड थांबण्यासाठी स्त्रियांनी केलेले आंदोलन होय. यामुळे भारताच्या जुन संस्कृतीत आहे. धर्मामध्ये विविध झाडांना पवित्र मानुन त्यांची पुजा केली जाते स्त्रियांनी १९७० मध्ये सहिद्रयाच्या खोऱ्यातील झाडे इंधनासाठी वाचविणे होते पण झाडे तोडू नगदी पिके घ्यावीत शेतकऱ्यांनी झाडे तोडण्यास प्रारंभ केला होता तेव्हा झाला स्त्री मीठ्ठी / कवटाळून घेतले त्याला चीपको आंदोलन म्हणून ओळखले जाते.

२) हरिपट्टा चळवळ : स्थानिक समुदयाने झाडे जावण्याच्या मोहिमेला एक भाग म्हणून हरितपट्टा चळवळ सुरु केली. स्त्रिया समुदयांनी, पाणी टंचाई, जमिनिची धूप आणि झाडे तोडणे या समस्यांचा विचार केला. हरिनपट्टा चळवळीचे ध्येय असे हेाते की, नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण केल्यामुळे समाज आर्थिक विकासाचा पाया घालणे. इतर देशांत पण पर्यावरण जतन करण्यासाठी विविध चळवळी स्त्रियांनी सुरु केल्या आहेत.

३) मानव व निर्जीव घटक : परिस्थितीकीय स्त्रीवादाचे प्रणेते मानव आणि निर्जीव वस्तू यांच्यातील सहसंबंधाना महत्व असते. नदी डोंगर समुद्र जमिन वगैरे बाबीचा स्त्री जीवनतील संबंध असतो.

४) पर्यावरणविषयक न्याय : पर्यावरणीय स्त्रीवाद हा पर्यावरण आणि स्त्रीवाद यांचा बुध्दिनिवड पाया आहे. यामध्ये स्त्रियांचे हक्क, शांतता, श्रम आणि पर्यावरणीय न्याय यांवर भर दिला आहे

परिस्थितीकिय स्त्रीवादाचा विश्वास असतो. स्त्रियांची पिळवणूक म्हणजे निसर्गाची पिळवणूक होय. या गोष्टीवर उपाय शोधण्याचा प्रयत्न पर्यावरणीय स्त्रिवादात केला जातो.

५) सर्वनाश टाळणे : पर्यावरणीवादी म्हणतात. मानवाच्या कृतीमुळे त्यांच्या सर्वनाश अटळ आहे. पर्यावरणीय स्त्रीवादी म्हणतात की स्वतःचा विचार ही संकल्पना श्रेष्ठ आहे. जमिनिची मालकी पुरुषांकडे असल्यामुळे या सर्व समस्या निर्माण होत आहेत. यातील दुर्देवाची बाब अशी आहे. मनुष्यबळ, प्राणी आणि जमीन या मौल्यवान वस्तूंकडे आर्थिक संसाधने म्हणून पाहिले जात आहे. पण खरे तर ही मानवी अस्तीत्वाची साधने आहेत.

६) पर्यावरणीय संवर्धन : आधुनिक शेतीसाठी रासायनिक खते. किटकनाशके यांचा वापर वाढला आहे संसाधनाचा ऱ्हास होत आहे. छोटे शेतकरी विस्थापीत होत आहेत. जमिन नापिक होत आहे आज केवळ स्त्रीयांचे जुळते नाते आहे. प्लास्टिक, औद्योगिक प्रदुशण आणि कचरा यामुळे मानवाच्या दैनंदिन जीवनाला धोका निर्माण झाला आहे. यासाठी संवर्धन भूमिका स्त्रीयांची आहे. स्त्री चांगल्या प्रंकारे पर्यावरणाची काळजी घेऊ शकते. स्त्री पृथ्वीची माता आहे म्हणून त्यांना पृथ्वीची काळजी घ्यायची आहे.

आपली प्रगती तपासा :

१) पर्यावरणीय स्त्रीवादाचे महत्त्व सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१६.९ सारांश

आज आपल्या पैकी प्रत्येकांनी स्थानिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरणाचा ऱ्हासा विरुध्द आवाज उठविला पाहिजे. आपण अन्नातील भेसळ, ओझनच्या थरातील ऱ्हास, घातक रसायने, वाहनातील विषारी वायु या सर्वावर बंदी घालण्यासाठी स्वतः पासून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पर्यावरण शास्त्रीय घटकांचा अभ्यास करत असतांना शहरी जीवनांच्या संदर्भात पर्यावरण अभ्यासाने काळाची गरज आहे कारण नैसर्गिक पर्यावरणाचा विचार न करता कारखाना, रस्ते, रेल्वे, मोठमोठ्या इमारती वगैरे सिमेंटचे जंगल निर्माण केले जात आहे. यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, बर्फ वर्षाव, उष्णतेत वाढ, सुनामी महापुर वगैरे सारख्या नैसर्गिक आपत्ती निर्माण होत आहेत. आधुनिक काळात इंटरनेट सेवेच्या विकासामुळे मानवा बरोबर इतर सजीव सृष्टीला धोका निर्माण झाला आहे. यामुळे स्मार्ट सिटी सारखी संकल्पना राबवत असताना पर्यावरण संतुलनाचा विचार होणे गरजेचे आहे.

पर्यावरणीय संतुलनाचा विचार करताना स्त्रीयांचा हि विचार होणे गरजेचे आहे पुरुषसत्ताक संस्कृतीत पर्यावरणा बरोबर स्त्री वर्गाचे हि शोषण केले आहे. आज गर्भजल परिक्षण करुन स्त्री गर्भपात केला जात आहे. स्त्री पुरुश विषमता निर्माण होत आहे. स्त्री संवर्धन होणे काळाची गरज आहे.

१६.१० अभ्यासाचे प्रश्न

१) शहरी पर्यावरणाची व्याख्या आणि महत्व सांगा.
२) भारतातील स्मार्ट सिटी संकल्पनेची चर्चा करा.
३) समकालीन समाजातील पर्यावरण समस्यांची चर्चा करा.
४) वंदना शिवा आणि मेरी मिलोर यांच्या योगदानाला लिहा.
५) पर्यावरणीच स्त्रीवाादाचे महत्व स्पष्ट करा.

१६.११ संदर्भग्रंथ सूची

१) Morry Mellor 1997, Femninism & Ecology New York University press.
२) Schaeffer and Lamm 1998 Sociology - Me Grow Hill
३) बोराडे सर्जेराव २०१७ समाजशास्त्र निराली प्रकाशण पूणे
४) Macionis John (2005) Sociology Prendice Hall
५) Sarjerao Borade and Dr. P. Gangurde (2017) Fundamentals of Sociology, Pune, Nirali Prakashan.

❖❖❖❖